
दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०४६



REFBK-0024257

संपादक: डॉ. य. दि. फडके प्रकाशकाची प्रस्तावना: डॉ. बाबा आढाव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 FEB 1999

(क्र. मा. प.)
५०००-१२-८२

संदर्भ निबंध
३०४६
२४२५७
१६८८४


महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानचे प्रकाशन

ब्राह्मणेतर चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते

दिनकरराव जवळकर

समग्र वाङ्मय

संपादक : डॉ. य. दि. फडके



एकमेव विक्रेते : श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ३०

प्रकाशक :
महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान
७३ नाना पेठ, पुणे ३०

एकमेव विक्रेते
श्री विद्या प्रकाशन,
२५० शनिवार, पुणे ३०

मुद्रक :
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ३०

मुखपृष्ठ : सुभाष अवचट, पुणे

मुखपृष्ठ छपाई : मुद्रा, पुणे

© म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठान

पहिली आवृत्ती : ८ मे १९८४

किंमत : साठ रुपये

या ग्रंथास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

अनुक्रम

प्रकाशकाची प्रस्तावना : डॉ. बाबा आढाव । पाच

संपादकीय प्रस्तावना : डॉ. य. दि. फडके । १

दिनकरराव जवळकर लिखित :

श्री शिवस्मारक पुराण । ५१

छत्रपती पद्य संग्रह । ६५

देशाचे दुष्मन । ७७

सवाल पहिला । ११५

सवाल दुसरा । १२५

मर्दहो, नाकें कापून घ्या ! । १३५

१९५० सालची ब्राह्मण परिषद । १४५

जेधे-जवळकर । १५७

श्री. जवळकरांची कैफियत । १९३

" कैवारी " व " तेज " यांमधील लेख । २३१

क्रांतीचें रणशिंग । २७३

शेतकऱ्यांचे हिंदुस्थान । ३१३

□

प्रकाशकाची प्रस्तावना



महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीत श्री. दिनकरराव शंकरराव जवळकर यांचे आगळे स्थान आहे. सत्यशोधक–ब्राह्मणेतर चळवळीचा समग्र इतिहास उपलब्ध नसल्याने जवळकरांच्या कार्याचे महत्त्व लक्षात येणे काहीसे अवघड बनले. सत्यशोधक–ब्राह्मणेतर चळवळीतील मिळतील ती जुनी कागदपत्रे संकलित करण्याचा प्रयत्न म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठानमार्फत सुरू आहे. हाती आलेल्या कागदपत्रांच्या आधारे समग्र चळवळीचा इतिहास लिहिता येईल असा विश्वास अद्यापि वाटत नसला तरी इतिहासाच्या या साधनांची शक्यतोवर जुळणी करण्याचे काम सुरू आहे. काही कागदपत्रांचे पुनर्मुद्रणही करण्यात आले. उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास महात्मा फुल्यांच्या जीवनकार्यातील काही अनुपलब्ध लेखन प्रयासाने प्राप्त करून प्रसिद्ध करण्यात प्रतिष्ठानला यश आलेले आहे. म. फुल्यांचे रजिस्टर्ड मृत्युपत्र, ओतूर अभियोगाची कागदपत्रे, तृतियरत्न नाटक, सत्यशोधक समाजाच्या पहिल्या वार्षिक सभेचा वृत्तांत, म. जोतीराव फुल्यांच्या समकालिनांनी लिहिलेल्या आठवणी, म. फुलेंचा अस्सल फोटो आतापर्यंत प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. म. फुले यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांचे समग्र वाङ्मय गत वर्षी प्रसिद्ध करण्यात आले. म. फुले यांचे समकालीन दलित पुढारी गोपाळ बाबाजी वलंगकर यांची विटाळ–विध्वंसन ही पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली. म. फुल्यांच्या सूनबाई—चंद्रभागा ऊर्फ लक्ष्मीबाई यांचे संबंधातील पत्रव्यवहार व कोर्ट-कचेऱ्यांतील कागदपत्रे प्रसिद्ध करण्यात आली. म. फुले यांचे इतर सहकारी डॉ. विश्राम रामजी घोले, नारायण मेधाजी लोखंडे, डॉ. संतुजी लाड, भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील, बाळाजी कुसाजी डुंबरे पाटील, भीमराव महामुनी, रामय्या व्यंकय्या आय्यावारू, मोरो विठ्ठल वाळवेकर, सावित्रीबाई फुले, डॉ. यशवंत फुले, शकुंतलाबाई रोडे, धोंडीराम कुंभार, वीर लहुजी वस्ताद साळवे, ग्यानबा कृष्ण ससाणे, ताराबाई शिंदे इत्यादी मंडळींबद्दलची माहिती, त्यांच्या कार्याचे लिखित पुरावे उपलब्ध होत आहेत.

'म. फुलेंच्या बरोबरच सत्यशोधक चळवळ संपली.' असे विधान बऱ्याच थोरा-मोठ्या विद्वानांनी केलेले आहे. भारतीय समाजात सांस्कृतिक पातळीवर एवढ्या प्रचंड

स्वरूपात उलथापालथ घडवून आणणारी चळवळ एखाद्या व्यक्तीच्या मरणावरोवर संपुष्टात येते असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणारे नाही व न्यायाचेही नाही. प्रतिष्ठानाने अंगीकारिलेल्या कामाला अगोदरच रूप उशीर झालेला आहे. ब्राह्मणेतर समाजात विद्या व ज्ञानोपासनेच्या प्रेरणा अद्यापही तुटपुंज्या आहेत. वर्णजाती व्यवस्थेमुळे हाताची आणि डोक्याची फारकत झाली. कर्मविपाक सिद्धान्तामुळे निर्माण झालेल्या मानसिक गुलामगिरीच्या विळख्यातून या समाजाची सुटका झालेली नाही हे कटू सत्य आहे. सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास लिहावा, त्यासाठी साधनांची जुळवाजुळव करावी, व्यासंगी वृत्तीने ते काम अंगीकारावे असे कोणाला वाटले नाही. आपल्या हितसंबंधांना हा इतिहास इजा निर्माण करील असे ज्यांना वाटले त्यांनी बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष केले, त्यांनी तर १८१८ ते १८७८ या कालाला 'अंधारयुग' म्हणण्याचा पायंडा पाडला. ज्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले, त्यांच्याबद्दल ब्राह्मणेतर समाजाला विश्वास वाटला नाही. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची झळ या कामालाही लागली. राजकीय सत्तेची सूत्रे बहुजन समाजाच्या हातात आली असली तरी त्यातील लब्ध-प्रतिष्ठितांना हे काम अडचणीचे वाटू लागले आहे. आजही त्या परिस्थितीत फारसा फरक पडला आहे असे म्हणता येणार नाही, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. म. जोतीराव फुल्यांचा पुतळा महाराष्ट्राच्या विधिमंडळासमोर उभा राहिला असला तरी पुण्यातील म. फुलेंचे राहते घर व त्या ठिकाणी उभारावयाच्या स्मारकाची योजना अद्यापही कागदावर धूळ खात पडलेली आहे. सावित्रीबाई फुले यांचे संबंधात नवीन माहिती उजेडात आली ती कशी खोटी आहे हे सांगण्यासाठी काही मंडळींनी लेखण्या परजल्या; परंतु या पहिल्या भारतीय शिक्षिकेची ओळख देखील देशाला व महाराष्ट्राला नसावी याची खंत कोणाला वाटली नाही. प्रतिष्ठानने अंगीकारलेल्या या कामाला अल्प प्रमाणात का होईना, उत्साहवर्धक प्रतिसाद मिळू लागलेला आहे. श्री. गोपीनाथ एकनाथ पालकर, पुणे; 'दिनमित्र'कार मुकुंदराव पाटील, पुणे; पंढरीनाथ सीताराम पाटील, बुलढाणा; 'जागृति'कार भगवंतराव पाळेकर, बडोदा; 'विजयी मराठा'कार श्रीपदराव शिंदे, कोल्हापूर; यांचे संग्रह. याशिवाय 'राष्ट्रवीर' बेळगाव, 'ज्ञानोदय' पुणे, 'ज्ञानप्रकाश' पुणे, 'तेज', 'कैवारी', 'केसरी', 'दिनबंधू' इत्यादी पत्रांच्या फाइल्स उपलब्ध झालेल्या आहेत. छोट्या-मोठ्या पुस्तिका हाती आल्या आहेत. या उपलब्ध सामग्रीच्या आधारे आम्ही काही वाङ्मय प्रसिद्ध करीत आहोत. 'आम्ही पाहिलेले फुले', 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' यानंतर आता दिनकरराव शंकरराव जवळकर यांचे समग्र वाङ्मय आम्ही प्रकाशित करीत आहोत.

श्री. दिनकरराव शंकरराव जवळकर यांचे जीवन झंझावातासारखे आहे. वयाच्या अवघ्या तीस-बत्तिसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. अवघ्या बारा-चौदा वर्षांत त्यांनी आपल्या लेखणीने व वक्तृत्वाने ब्राह्मणेतर समाजात खळबळ निर्माण केली. जवळकरांचे वडील त्यांच्या लहान वयातच वारले होते. त्यांचे मूळ गाव पुण्याजवळच राचीचो

आळंदी असले तरी त्यांचे पालनपोषण पुण्यातील त्यांच्या आजोळी झाले. जवळकरांचे मामा श्री. बाबुराव गोडसे हे सदाशिव पेठेतील नगरकर तालमीजवळ राहात. त्यांचा दुधाचा व्यवसाय होता. जवळकरांच्या शिक्षणाबद्दल फारशी माहिती उपलब्ध झालेली नाही. श्री. बाबुराव गोडसे यांची भेट सात-आठ वर्षांपूर्वी झाली होती. ते बरेच वयोवृद्ध होते. शाहू महाराज व जवळकर यांच्या एकदोन आठवणी ते सांगू शकले. जवळकरांची जन्मकुंडली त्यांच्याजवळ असल्याचे ते म्हणाले होते. परंतु ती हाती येण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. गोडसे यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे जवळकरांचा जन्म सन १९०२ सालचा. ३ मे १९३२ रोजी जवळकरांचे गंडमाळा विकाराने पुण्यात निधन झाले. पुणे महानगरपालिकेतून उपलब्ध झालेल्या मृत्यु-दाखल्यावर त्यांचे मृत्यु-समयीचे वय ३० वर्षे असल्याचे नोंदलेले आहे. काहींच्या मते त्यांचा जन्म सन १८९८ सालातील असावा. १९२५ रोजी जवळकरांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नी श्रीमती इंदूताई जवळकर ह्या हयात आहेत. सन १९२५ ते १९३२ या काळात त्यांना दोन मुले झाली. १९२७ साली जन्मलेल्या रायबाचे त्याच्या वयाच्या अठरा-एकोणिसाव्या वर्षी अपघाती निधन झाले. १९३० साली जन्मलेला शिवाजी सध्या एका मोठ्या सरकारी हुद्द्यावर नोकरी करीत आहे. शिवाजीराव व आम्ही सहाध्यायी. मॅट्रिकपर्यंत आम्ही दोघेही पुण्याच्या शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये एका वर्गात शिकत होतो. शिवाजीराव राष्ट्र सेवा दलातही होते. त्यांच्या आईला आम्ही सर्वजण माँ म्हणूनच संबोधतो. जवळकर हयात असल्यापासूनच त्या माहेरी राहात. आई-बापांची ही एकुलती एक मुलगी. जावई 'घरजावई' असावा ही त्यांची मनीषा. जवळकर व गायकवाड हे एकाच वाड्यात पुण्याच्या शुक्रवार पेठेतील पालकरांच्या वाड्यात राहात. जवळकरांच्या निधनानंतर माँनी फार हलाखीत दिवस काढले. त्या शिवणकाम करीत, तर त्यांच्या आई वनारसीबाई गायकवाड ह्या भाजीपाला विकत. हा सारा तपशील सांगण्याचे कारण जवळकरांनी केलेल्या काही आर्थिक व्यवहारांबद्दल अनेक समज-गैरसमज आहेत. घर-प्रपंचाकडे जवळकरांना लक्ष देण्यास कितपत फुरसत होती याबद्दल शंकाच आहे. कारण १९२५ ते १९३२ या काळातच 'देशाचे दुष्मन' पुस्तकावरील खटला, 'मजूर' पत्रातील लेखावरील खटला, वैयक्तिक सत्याग्रहातील तुरुंगवास, लंडनला प्रयाण व मुंबईतील 'तेज' व 'कैवारी' पत्रांचे संपादन, ब्राह्मणेतर पक्षासाठी चाललेले दौरे-ह्या साऱ्या धकाधकीत त्यांना घर नावाच्या चिजेकडे लक्ष देणे केवळ अशक्य होते. त्या काळातील आठवणी माँच्या तोंडून ऐकणे हे फार अवघड व मनाला अस्वस्थ करणारे काम आहे. भणंग सामाजिक कार्यकर्त्यांबरोबर संसार करण्याचे दिव्य माँनी पार पाडले.

माँनी दिलेल्या माहितीमुळेच जवळकरांचे वाङ्मय गोळा करता आले. जवळकरांच्या मित्र-परिवाराचे पत्ते मिळाले. शिवाजीरावांना सोबत घेऊन ही ठिकाणे शोधून काढली. मित्राच्या मुलाला पाहून अनेकांनी छोट्या-मोठ्या पुस्तिका काढून दिल्या. कोल्हापूरचे 'पुढारी'कार गणपतराव जाधव जवळकरांचे अंतेवासी. त्यांनी 'तेज'-'कैवारी' पत्राच्या

फाइल्स हवाली केल्या. आठवणी सांगताना ते गहिवरले. गोपीनाथ एकनाथ पालकर यांचा वाडा शिवाजीरावांच्या निवासस्थानाजवळ आहे. पालकर बंधू (गवंडी) ब्राह्मणेतर चळवळीत प्रथमपासून होते. पालकरांनी अनेक कागदपत्रे जतन करून ठेवलेली होती. कागदपत्रे नेणारी माणसे परत आणून देत नाहीत या कटू अनुभवामुळे पालकरांच्या पुस्तिकांचे हस्तलिखित करून घेण्याचे काम शिवाजीरावांच्या पत्नी सौ. लिलाताईंनी पूर्ण केले. एकेक पुस्तिका मिळवायची. हस्तलिखित पूर्ण करून परत करायची. नंतर दुसरी पुस्तिका घ्यायची. पालकरांचे वय झालेले. त्यांचा मूड पाहून काम करावे लागे. पालकरांची वैचारिक शाळा जवळकर परंपरेची. त्यामुळे काम काहीसे सोपे झाले. वर्ष-दीड वर्ष हे काम चालले. 'क्रान्तीचें रणशिंग' हे पुस्तक मिळविण्यासाठी विदर्भात अक्षरशः पायपीट करावी लागली. ज्यांनी हे पुस्तक प्रकाशित केले ते बाबूराव भोसले दिवंगत झालेले. त्यांच्या पत्नीने काही पत्ते दिले. वर्धा, अमरावती, बुलढाणा, मोर्शी, चिखली—त्या भ्रमंतीला काही मर्यादा नव्हती. शेवटी ते पुस्तक भोसल्यांच्या घराजवळच वाघ सराफांच्याकडे मिळाले. जवळकरांचा नागपुरातील मुक्काम त्यांच्याकडे होता. वाघांचे चिरंजीव म्हणाले, "जवळकरांना रोज सायंकाळी ताप येई. सकाळी तें हिंडत, सभा परिषदांना जात. चळवळ कशी वाढवता येईल याबद्दल ते अखंडपणे बोलत." विदर्भातील भ्रमंतीमुळे चळवळीची माहिती मिळाली. नव्या ओळखी झाल्या. कृष्णराव भालेकर, भीमराव महामुनी, मोतीराम वानखडे, आनंदस्वामी वडगांवकर, नानासहेब अमृतकर, डॉ. नायडू, पंढरीनाथ पाटील, इत्यादींच्या कार्याचा परिचय झाला. सत्यशोधक जलशांची माहिती मिळाली. श्री. बोरमारे या वृद्धाने तर अनेक कवने गाऊन दाखवली. चळवळीतील जिवंतपणाचा प्रत्यय आणून दिला. सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळ तळापर्यंत भिडली असल्याचे लक्षात आले.

दिनकरराव जवळकरांना एवढ्या लहान वयात सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीची प्रेरणा कोठून मिळाली असेल? असा प्रश्न निर्माण होणे सहज शक्य आहे. परंतु जवळकर शाहू चौकात राहात होते. शिवाजी मराठा हायस्कूलची सुरुवात १९१६ साली झालेली होती. शाहू महाराजांनी पुण्यावर लक्ष केंद्रित केले होते. पुण्यातले 'शाहू पॅलेस' हे भेटीगाठीचे केंद्र होते. अनेक संस्थानिक उन्हाळ्याच्या दिवसांत पुण्यास येऊन राहात. नाटककार मामा वरेरकर, संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्याबरोबर जवळकरांचा परिचय झाला. मोरवाले नाईकांच्या वाड्यात वरेरकरांच्या नाटकाच्या तालमी चालत त्या माडीतच जवळकरांचे वास्तव्य होते. १९१६ साली मिश्र-विवाहाला मान्यता देणारे पटेल-विधेयक मध्यवर्ती कायदेमंडळापुढे आले. सनातन्यांनी त्याला विरोध केला. शाहू महाराजांनी मिश्र-विवाहाला मान्यता देणारा कायदा कोल्हापूर संस्थानात संमत केला. नाट्यगुणाची देन जवळकरांना प्रथमापासून असावी. 'प्रणय प्रभाव' हे नाटक त्यांनी लिहिले. ते उपलब्ध होऊ शकले नाही. गुरुवर्य बाबूराव जगतापांनी त्या नाटकात भूमिका केल्याची एक आठवण प्रसिद्ध झालेली आहे. या नाटकाच्या

प्रयोगावर बंदी घालावी अशी सनातन्यांची मागणी केली असावी. जवळकरांच्या लेखणीचे सामर्थ्य महाराजांनी हेरले व त्यांना कोल्हापूरला नेले.

याच कालखंडात भारतीय राजकारणाच्या पातळीवरही अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी चालू होत्या. १९१७ साल अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. मॉन्टेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा घोषित झाल्या. त्यामुळे आता सत्तान्तर होणार अशी हवा निर्माण झाली. ब्रिटिशांच्या हातून सत्ता मिळविण्यासाठी अनेक जाती पुढे सरसावल्या. ब्राह्मणेतर पक्षाची निर्मिती याच काळात झाली. 'विजयी मराठा', 'जागृती', 'जागरूक' इत्यादी पत्रे सुरू झाली. कोल्हापूरला गेल्यावर जवळकरांनी 'तरुण मराठा' पत्र सुरू केले. ब्राह्मणेतर चळवळीशी जवळकरांचे नाते जमले. तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात शाहू महाराजांचे चरित्रकार अण्णासाहेब लठ्ठे 'ब्राह्मणेतर चळवळ' या प्रकरणात लिहितात : "मात्र मॉन्टेग्यूसाहेबांच्या २० ऑगस्ट १९१७ च्या भाषणाचा परिणाम या रांगत्या स्थितीतील चळवळीवर अपेक्षेबाहेर घडून आला. दक्षिणेतील ब्राह्मणेतर वर्गास आता नवीनच आशा वाटू लागल्या. इंग्रजी राज्याचे दिवस आता भरले. युरोपातील युद्धाच्या जबरदस्त मारातून इंग्लंड आता बचावून राहात नाही आणि हिंदुस्थानातील इतर जनता कोणत्या का स्थितीत असेना, आपणाकडे नव्या मनूतील प्रभुपद येणार असे त्यास वाटू लागले. जातिभेदाच्या विषारी वातावरणात आपल्या देशबांधवांची बौद्धिक आणि नैतिक अवनती किती झाली आहे याचा विसर त्यांना पडला. हिंदुस्थानातील ही मनुष्यरूपी मुकी मेंढरे आपण बुद्धिमान लोक जिकडे हाकून नेऊ तिकडे येतील असा त्यांना भ्रम झाला होता. आमच्या जातीच्या हाती सत्ता आली तरी ती इंग्रजी सत्तेपेक्षा बरीच असे त्यांचे प्रतिनिधी खुद्द हिंदुस्थान सरकारच्या कायदे-मंडळात बोलू लागले. हा सर्व प्रकार पाहून राजकीयदृष्ट्या निद्रिस्त असलेली प्रजा खडबडून जागी झाली आणि परकीय सत्तेच्या अंगभूत असलेल्या इंग्रजी राज्यपद्धतीतील बागुलबुवा दाखवून इतर वर्गांना गप्प बसविणाऱ्या पुढारलेल्या वर्गांच्या राजकीय चळवळ्यांबद्दल त्यांना आता भीती वाटू लागली, आणि शक्यतो प्रयत्न करून जात्यभिमानी लोकांच्या वाढू पाहणाऱ्या सत्तेस आळा घातला पाहिजे असे इतर सर्व जातींना वाटू लागले."

राजर्षी शाहू महाराजांनी या काळात कितीतरी उलाढाली केल्या. राजकीय सत्ता ब्राह्मणेतरांच्या हातात यावी यासाठी त्यांनी जंग जंग प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक पत्र या संदर्भात अन्यत्र प्रसिद्ध झालेले आहे. ब्राह्मणेतर व दलित समाजाची अस्मिता जागी करण्यासाठी त्यांनी प्रयत्नात कसूर पडू दिली नाही. औंधच्या पंत-प्रतिनिधींनी बाबुराव यादव यांचा 'गरिबाचा कैवारी', श्रीपतराव शिंदे यांचा 'विजयी मराठा', बी. के. पिसाळ यांचा 'विश्वबंधू' आणि जवळकरांचा 'तरुण मराठा' या पत्रांतील लिखाणाबद्दल ब्रिटिश राजप्रतिनिधीकडे तक्रार केली. शाहूमहाराजांना ब्रिटिश राज-

प्रतिनिधीकडे खुलासा करावा लागला. जवळकरांनी कोल्हापूर सोडून जावे असे शाहू-महाराजांनी त्यांना सांगितले. ही घटना १९२१ च्या एप्रिल महिन्यातील आहे.

'तरुण मराठा' पत्र बंद करून जवळकर कोल्हापुरातच राहिले असावेत. 'तरुण मराठा' पत्राच्या फाइल्स अद्याप तरी उपलब्ध झालेल्या नाहीत. ६ मे १९२२ रोजी शाहूमहाराजांचे निधन झाले. त्यानंतर जवळकर पुण्यात आले. पुण्यात त्या वेळी शिवस्मारकाचा वाद सुरू झालेला होता. १९२१ साली पहिली निवडणूक झाली आणि मध्यवर्ती कौन्सिलांचा कारभार सुरू झाला. ब्राह्मणेतर पक्षाचे प्रतिनिधी कौन्सिलवर निवडून गेले. १९२३ साली उमेदवारी मिळण्याच्या प्रश्नावरून ब्राह्मणेतर पक्षात फाटाफुटीला सुरुवात झाली. ब्राह्मणेतर पक्षातील मतभेदांबद्दल बडोद्याचे 'जागृती'कार पाळेकर यांनी २०-१०-१९२३ च्या अंकामध्ये 'ब्राह्मणेतर चळवळीची विघटना' या शीर्षकाखाली दोन अग्रलेख लिहिले आहेत. त्यांनी पक्षांतर्गत मतभेदाची सहा कारणे नमूद केलेली आहेत —

(१) कौन्सिलातील जागा-संबंधात वेगवेगळ्या जातींमध्ये आशा उत्पन्न झाल्या.
(२) मराठेतर जाती व सत्यशोधक समाज यांच्यावर क्षात्रजगत्गुरूंचे, जगत्गुरुत्व लादण्याचे प्रयत्न.
(३) प्रागतिक पक्षाशी सहकार्य की स्वराज्य पक्षाबरोबर सहगमन ?
(४) शिवस्मारकाचा वाद, सर्व ब्राह्मणेतर चळवळीशी व कौन्सिल निवडणुकीशी भिडविण्याचा प्रयत्न.
(५) मदिरायन संबंध
(६) वैयक्तिक महत्त्वाकांक्षा.

या सर्व वादविवादात जेधे-जवळकरांनी एक विशिष्ट भूमिका बजावलेली आहे. 'शाहूनिष्ठा' हा त्यांच्या भूमिकेचा गाभा आहे.

शाहूमहाराजांच्या निधनानंतर ब्राह्मणेतर चळवळीचे कोल्हापूर केंद्र बदलून पुणे झाले. ही प्रक्रिया तशी स्वाभाविक म्हणावी लागेल. कारण ब्राह्मणेतर चळवळीने शत्रू मानलेले चिपळूणकर-टिळक पुण्यातले. १९२० साली टिळक गेले. तरीही 'गायकवाड'वाडा हे हल्ल्याचे ठिकाण बनले. 'जेधे मेन्शन' नावारूपास आले. निवडणुकीच्या काळातील मतभेदांमुळे 'जागृती'कार पाळेकर अस्वस्थ झालेले असावेत. पुण्यातील तरुण पुढाऱ्यांबद्दल 'जागृती'कार लिहितात :

'सुशिक्षित पण स्वभावतः भावनावश व दुराग्रहाच्या शिकवणीने भारलेले तरुण, व्यतिपात योगावर जन्मलेली व सतरा ठिकाणी गुण उधळून शिवराळपणाचा धंदा करणारी शेंडे नक्षत्राच्या पायगुणाची उडाणटप्पू पोरे' ... हा निर्देश जेधे-जवळकर, गवंडीबंधू इत्यादींच्या बद्दल होता हे उघड आहे.

पुण्यातील शिवस्मारकाचा वाद काहीसा विकोपाला गेला होता. पुण्यातील मराठा समाजामध्येही या प्रश्नावर तट पडले. जवळकरांनी 'शिवस्मारक पुराण' प्रसिद्ध केले. पुण्यातील तरुणांनी ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारांना 'कुलकलंक' हे विशेषण बहाल केले. शिवस्मारक हे मराठ्यांच्या वतीने केले जाणार की सर्वांच्या वतीने होणार हा वादाचा मुद्दा होता. ते मराठ्यांचेच राहावे असा आग्रह शाहूवादी तरुणांचा होता. पुढे ५–६ वर्षे हा वाद धुमसत होता. त्यात शेवटी तडजोड झाली. श्रीशिवाजी सोसायटीच्या ११ सभासदांनी राजिनामे दिले. त्यात जेधे–जवळकरांचीही नावे आहेत. जवळकर त्या काळात 'विजयी मराठा' पत्रात 'तरवारीचे वार' या शीर्षकाखाली 'आग्यावेताळ' या टोपण नावाने लिहीत असावेत. पुणे नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी त्यांनी ब्राह्मणेतर पक्षाच्या वतीने उमेदवारी केलेली दिसते. परंतु निवडणुकीपूर्वीच त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतलेला दिसतो.

१९२५ साली पुणे नगरपालिकेत म. फुल्यांच्या पुतळ्याचा वाद झाला. म. फुले यांच्या पुतळ्याच्या उभारणीला विरोध झाला आणि त्याचे पडसाद सर्वत्र उमटले. जवळकरांच्या लेखणीने आग ओकायला सुरुवात केली. 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक याच काळात प्रसिद्ध झाले. प्रस्तुत ग्रंथात त्या पुस्तकाचा समावेश आहे. या पुस्तकाची प्रसिद्धी व पुण्यातील मेळे यातून ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद रस्त्यावर आला. म. फुलेंच्यावर कुत्सितपणे टीका करणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळक यांच्या भूमिकांवर जेधे–जवळकरांनी जोरदार हल्ले करून प्रतिमाभंग करण्याचा प्रयत्न केला. 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक हा त्यापैकीच एक मासला आहे. जवळकरांच्या लिखाणाबद्दल मतभेद बाळगूनही असे म्हणावेसे वाटते की, म. फुल्यांच्या कार्याची व लिखाणाची उपेक्षा करून हिंदू धर्मातील पुनरुज्जीवनवादाला आक्रमक स्वरूप देणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या भूमिकेचा समाचार घेतला गेला नाही. मराठी भाषेचे शिवाजी म्हणून चिपळूणकरांचा गौरव झाला.

म. फुल्यांनी धर्मातीत भूमिका घेतली. स्वातंत्र्य-समता या मानवी मूल्यांचा स्वीकार करून त्यांनी सत्यशोधक चळवळीचा पाया घातला. सनातनी साम्राज्यशाहीच्या विरोधात त्यांनी बंड पुकारले. म. फुलेंच्या कार्याची सुरुवातच मुळी स्त्री व अस्पृश्यांच्या शिक्षणापासून झाली. या घटनेचे स्वागत करण्याऐवजी चिपळूणकरांनी म. फुलेंच्या भाषेचे शुद्ध लेखन तपासून त्यांची प्रच्छन्न टवाळी केली, तर आगरकरांनी 'रेव्हरंड फुले' म्हणून संभावना केली. लो. टिळकांनी 'गीतारहस्य' लिहून धार्मिक राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली.

१९१६ सालच्या लखनौ करारामुळे जातीय निवाड्याला मान्यता मिळाली. त्यानंतरच्या काळात म. गांधींनी सामाजिक प्रश्नांची दखल घेतली तरी मूलतः धर्म हेच राजकारणाचे प्रेरणा स्रोत मानले गेले. गीतेतील कर्मविपाक सिद्धान्ताचा गांधींनी उघडउघड स्वीकार

केला. ब्राह्मणेतरांच्या चळवळीतील शिवराळ भाषेबद्दल जितके बोलले जाते तेवढ्या प्रमाणात प्रस्तुतच्या मुद्द्यांची दखल घेतली जात नाही.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळातच जोतीराव फुल्यांनी स्वातंत्र्य व समतेचे अनेक संदर्भ स्पष्ट केले. जोतीराव केवळ समाजसुधारक होते असे म्हणणे न्याय्य होणारे नाही. जोतीरावांनी धार्मिक राष्ट्रवादाला नकार देऊन विश्व-मानवतावादी, विश्व-कुटुंबवादाची भूमिका घेतली. 'समग्र फुले' या धनंजय कीर व डॉ. स. गं. मालशे यांनी संपादित केलेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म. फुल्यांची ही वैचारिक देणगी स्पष्ट केली आहे.

आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिवर्तनाचा आग्रह धरणाऱ्यांना नेहमीच तारेवरची कसरत करावी लागते. परकीयांचे हस्तक अशी विशेषणे स्वीकारावी लागतात. समता व न्यायाधिष्ठित समाज-रचनेची उभारणी करावयाची झाल्यास वर्ण-जाती, स्त्री-दास्यअंताची भूमिका घ्यावी लागते. सर्वांगीण परिवर्तन व सत्तान्तर यांची सांगड जमली नाही तर काय होते हे विद्यमान राजकीय परिस्थितीवरून लक्षात येते.

दिनकरराव शंकरराव जवळकर यांचे ब्राह्मणेतर चळवळीतील स्थान या संदर्भात तपासले पाहिजे व त्यांचे ऋण मनमोकळेपणाने मान्य केले पाहिजे. जवळकरांना स्वतःच्या गुणदोषांची व मर्यादांची जाणीव होती. 'तुरुंगातील १०८ दिवस' या पुस्तकात त्यांनी प्रांजळपणे अनेक बाबी मांडलेल्या आहेत. त्यांच्या भाषेची अभिव्यक्ती काहीशी रोमँटिक पद्धतीची होती. हजारो माणसांची अंतःकरणे पेटविण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत व वक्तृत्वात होते. जणू काही लेखणीच्या टोकाला विष लावूनच ते लिहीत असत. काहींची अंतःकरणे पेटत असत तर काहींची विद्ध होत असत. जवळकरांना याचीही जाणीव होती. जनक्षोभ व सार्वजनिक उद्रेकातील बेरीज-वजाबाकीचे गणित त्यांना समजत होते. परंतु त्या चक्रातून बाहेर पडणे त्यांना जमलेले दिसत नाही. उलट दैनंदिन राजकारणाशी संबंध आल्यामुळे संधिसाधूपणा वाटावा येथपर्यंत त्यांनी घेतलेल्या काही भूमिका ताणलेल्या दिसतात. जेधे-जवळकरांनी शाहूमहाराजांनंतर ब्राह्मणेतर समाज हलवला. पुण्यातील छत्रपती मेळ्यात दोघांनी हातात डफ घेऊन गाणी म्हटली, पोवाडे गायले. 'देशाचे दुष्मन' पुस्तकाच्या खटल्यात जेधे, जवळकर व बागडे यांना तोंड द्यावे लागले तर 'मजूर' पत्रावरील खटल्यात लाड व जवळकर यांना शिक्षा स्वीकारावी लागली. 'देशाचे दुष्मन'वरील खटल्यात जवळकरांना कोर्टाने जामीन देण्यास देखील नकार दिला होता.

सन १९२८-१९३१ या काळात जवळकरांनी 'कैवारी' व 'तेज' या पत्रांचे संपादन केले. ही पत्रे तशी अल्पजीवी ठरली. जवळकरांच्या लेखणीचा एक मोठा वाचकवर्ग होता. केवळ एवढ्या आधारावर कोणतेही वृत्तपत्र चालवणे अवघड असते. अलीकडील काळातील आचार्य अत्र्यांच्या दैनिक 'मराठा' या वृत्तपत्राचे उदाहरण या

संदर्भात घेता येईल. अन्यांच्या पाठोपाठ 'मराठा' वृत्तपत्र बंद पडले. १९२८ सालापासून जेधे आणि जवळकर यांच्यातील मतभेदाला सुरुवात झाली असावी. भास्करराव जाधव व जवळकर यांची युती झाली. भास्करराव जाधव हे मुंबई राज्याचे अबकारी मंत्री होते. सत्तेचा संबंध आल्याबरोबर ब्राह्मणेतर पक्षात वैयक्तिक हेव्यादाव्यांना ऊत आला.

'कैवारी' बंद करून जवळकरांनी 'तेज' पत्र काढले. याबद्दल जवळकरांनी ९ मे १९३१ रोजी 'तेज'च्या पहिल्या अंकामध्ये स्वतःच्या सहीने पुढीलप्रमाणे निवेदन केलेले आहे.

"कैवारी" व "तेज"

१९२८ साली मुंबईस 'कैवारी' नावाचे साप्ताहिक आमच्या संपादकत्वाखाली निघून ते २९-३० असे चालले. 'कैवारी' पत्राचे आम्ही जरी संपादक होतो, तरी त्याला सल्लागार मंडळ व पुढे ट्रस्टी अशी अनेक बंधने जरूर नसता आम्ही आमच्या हाताने, केवळ पक्ष संघटनेकरता लावून घेतली आणि त्याचा व्हावयाचा तो परिणाम झालाच. भांडवलशाहीच्या शेपटाला धरून राजकारणी वैतरणी तरणाऱ्या आमच्या प्रसिद्धिलंपट मित्रांना आमची सोशॅलिस्ट मते पटली नाहीत; परंतु सर्वस्वी जबाबदारी घेण्याची एकाच्याही अंगात ताकद नसल्यामुळे संपादकाच्या आणि सल्लागारांच्या मतभेदात 'कैवारी'चे एक वर्ष गेले. तुमच्या 'कैवारी'च नव्हे तर सबंध ब्राह्मणेतर जनताही सोशॅलिझमकडे जात आहे हे पाहून आम्ही हिंदुस्थानचा किनारा दुसऱ्या खेपेस सोडताच 'कैवारी' पत्रावर चोहोकडून व्याजबट्ट्याचे काकपिंड चघळणाऱ्या व्याजाळू मित्रांनी आपला भांडवलशाहीचा उकिरडा पाखडायला सुरुवात केली. आणि त्यामुळे आम्ही युरोपमध्ये असतानाच त्या वेळचे संपादक श्री. गणपतराव जाधव यांना कैवारी पत्र बंद ठेवणे भाग पडले. अस्सल जमीनदारापेक्षा जमीनदारी मिरवू पाहणाऱ्या नकली कपर्दिकांची मनःस्थिती वाघाने मारलेल्या शिकारीवर वक्रदृष्टी ठेवणाऱ्या गिधाडापेक्षा वेगळी नसते. हिंदुस्थानचा २२ कोटी शेतकरी इंग्रजी पेढीवर गहाण लावून त्याच्या बदला स्वराज्य मागण्याची भांडवलीबुद्धी, महाराष्ट्रीय शेतकऱ्यांच्या डोक्यावर दारिद्र्याचे निखारे ठेवताना बापाला बाप तरी कशी म्हणेल?

आमची गेली बारा वर्षे ब्राह्मणेतर चळवळीच्या सर्व तऱ्हेच्या सुख-दुःखात गेली. ब्राह्मण्याचा बीमोड करण्याकरता जे जे पाठीराखे आमच्या पाठीवर हात टाकून 'भले शाबास' म्हणण्याकरता धावून आले, त्यांचे आम्ही आभारी आहोत. पण काहींचा ब्राह्मणेतर जनतेला लुबाडण्याचा दुष्ट हेतू होता हे पुढे प्रकाशात आपोआप येत गेले. ब्राह्मणेतर चळवळ ही शेतकऱ्यांची आहे असा ब्राह्मणेतर जनतेचा समज आहे आणि तो खराही आहे; पण शेतकऱ्यांचे खरे शत्रू कोण याची व्याख्या न ठरल्यामुळे सचाबरोबर लुच्चेसुद्धा कंबर कसून उभे राहिले. १९२९ साली पक्षाचे नाव बदलून त्याची जन्मावरून तत्त्वावर उभारणी करा असे आम्ही सांगून पाहिले. यामुळे आमच्या लोक (?)-

प्रियतेला धक्का बसेल हे आम्ही जाणून होतो; परंतु त्याला इलाज नव्हता. चळवळीचे ध्येय व कार्यक्रम ठरवा असे अनेक वेळा सांगून पाहिले; परंतु जेथे काही न करण्याचा निश्चय त्या दगडाला शेंदराचा सहा मण मुलामा चढवला तरी तो थोडाच पावणार ?

गेल्या वर्षी युरोपातून आल्याबरोबर पुन्हा पत्र सुरू करून शेतकऱ्यांची संघटना करण्याचा निश्चय ठरला होता; परंतु स्वातंत्र्ययुद्धाची रणधुमाळी माजली असता आमचे वैयक्तिक स्वातंत्र्यच निश्चित नव्हते आणि त्याप्रमाणे काही ब्राह्मणेतरांच्या निषेधाचे प्रहार होत असता आम्हावर मुंबई युद्ध-मंडळातून १५ महिन्यांचा सरकारी सक्त अनुग्रह झाला. गांधी-अर्विन समेटामुळे सुटका होताच अखेरीस सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून महाराष्ट्रात जो शेतकरी समाज आहे त्याचा बचाव, संघटना करण्याकरता आम्ही हे नवीन पत्र काढीत आहोत. "कैवारी"वर ज्या शेतकरीबंधूंचे प्रेम होते ते तर आमचे आहेतच; परंतु याशिवाय जो कामकरी कारागीरवर्ग आहे तोही या वेळी नेटाने पुढे येऊन निदान महाराष्ट्रात तरी संघटित होईल जशी आम्हास पूर्ण उमेद आहे. "कैवारी" आमच्या एकट्याचा असता तर आम्ही तोच सुरू केला असता; पण पुन्हा हक्काचे नाहक झगडे लढण्यास आम्हाला वेळ नाही. त्यापेक्षा नवीन असले तरी ज्यांनी 'कैवारी'ची वर्गणी भरली असून पुरे अंक मिळाले नाहीत त्यांना 'तेज' देऊन त्यांच्या वर्गणीचा बदला देण्याची जोखीम सोसण्यास मोठा तोटा आहे हे माहीत असूनही आम्ही तो अंगावर घेत आहोत.

सर्वांचा कृपाभिलाषि
दिनकरराव जवळकर

जवळकरांच्या या निवेदनातून त्यांची वैचारिक भूमिका बदलत गेलेली आहे हे स्पष्ट दिसते. अर्थात जेधे–जवळकरांचे मध्ये नंतरच्या काळात कितीही मतभेद झालेले असले तरी या उभयतांनी संयुक्तपणे जो लढा दिला त्याची काही वैशिष्ट्ये आहेत. जेधे–जवळकरांनी जाणीवपूर्वक दलितांच्या चळवळीतही भाग घेतलेला आहे. शाहूमहाराजांच्या भूमिकेशी ते सुसंगत ठरणारे वर्तन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथे केलेल्या 'चवदार तळे' सत्याग्रहाला जेधे–जवळकरांचा पाठिंबा होता. तर १९३२ सालात नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहात जवळकरांनी भाग घेतला होता. ब्राह्मणेतर पक्षाचे नाव बदलून 'शेतकरी पक्ष' करावे अशी त्यांनी सूचना केलेली आहे. शेतकरी वजा हिंदुस्थान बरोबर शून्य (शेतकरी – हिंदुस्थान = ०) असे समीकरण त्यांनी मांडले. 'तेज' पत्रात पुढील घोषणा वाचावयास मिळतात : 'सावकार-शाहीचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे.' 'सामाजिक दुष्ट चालीरीतींचा विध्वंस केला पाहिजे.' 'प्रत्येकशे तकरी धार्मिक बंधनातूनमुक्त व्हावयास पाहिजे.' 'शेतकरी हिंदुस्थान' हे पुस्तक जवळकरांनी लिहून पूर्ण केले व त्यांचा 'पिझंट इन्डिया' हा इंग्रजी अनुवादही

प्रसिद्ध करणार असल्याचे त्यांनी दिनांक १३-३-१९३० रोजी लंडनहून पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. याच पत्रामध्ये त्यांनी म. फुले यांचे इंग्रजी भाषेत अजून एकही चरित्र नाही याविषयी खंत व्यक्त केली असून 'सत्यशोधक समाज आणि तत्त्वज्ञान' हे पुस्तक लिहून मी हिंदुस्थानला परत येईन असे म्हटले आहे. 'पिझंट इन्डिया' किंवा शेतकरी हिंदुस्थान हे पुस्तक उपलब्ध होऊ शकलेले नाही. १९३० सालात त्यांनी म. गांधींचे नेतृत्व स्वीकारून असहकाराच्या चळवळीत भाग घेतला व कारावास पत्करला. 'तेज' पत्राच्या दिनांक १८ जुलै १९३१ च्या संपादकीयाचे शीर्षकच मुळी 'सत्यशोधक म. गांधी' असे आहे. सोशॅलिझमचा स्वीकार त्यांनी उघडपणे केलेला आहे. शेटजी भटजी लाटजी हा शब्दप्रयोग त्यांनी लोकप्रिय केलेला आहे. कोणाही माणसाला मराठा जातीत घेण्यासाठी शिवाजी मिशनची कल्पना त्यांनी प्रसृत केली. या पार्श्वभूमीवर जवळकरांनी १९२९ सालच्या मुंबईच्या कापड गिरणी कामगारांच्या संपात घेतलेल्या विरोधी भूमिकेचे समर्थन करणे अवघड आहे. सरकारात मंत्रिपदावर असलेल्या भास्करराव जाधवांमुळेच त्यांनी अशी भूमिका घेतली असावी असे दिसते. त्यांची व्यसनाधीनता व लंडनला प्रयाण यामुळे अनेक वाद निर्माण झालेले आहेत. ब्राह्मणेतर चळवळीच्या अस्तकालात त्याला काहीसे व्यक्तिगत हेव्यादाव्याचे स्वरूपही आलेले आहे. त्या काळातील पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्याची तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात दखल घेतली पाहिजे. १९३० साली जेध्यांनी व त्यापाठोपाठ जवळकरांनी काँग्रेस-प्रवेश केला. ब्राह्मणेतर पक्षात फूट पडली. मुंबई सोडल्यानंतर जवळकर विदर्भात गेले. अनेक शेतकरी परिषदांतून त्यांनी भाषणे केली. प्रकृती मुळातच अशक्त. धकाधकीच्या या काळात त्यांना गाठीक्षयाने ग्रासले. ३ मे १९३२ रोजी पुण्यात निधन झाले.

जवळकरांना जाऊन ५२ वर्षे झालेली आहेत. आता निर्लेप मनाने ब्राह्मणेतर चळवळीचा विचार झाला तर जवळकरांची वैचारिक देन स्पष्ट होऊ शकेल. 'समग्र जवळकर' हा ग्रंथ वाचकांच्या हातात देण्यात आमच्या मनात हाच प्रमुख उद्देश आहे.

डॉ. य. दि. फडके यांनी या पुस्तकाचे संपादन करून प्रदीर्घ प्रस्तावना लिहिलेली आहे. काही दिवसांपूर्वीच देशभक्त केशवराव जेधे यांचे पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील काही भाग या पुस्तकात येणे स्वाभाविक आहे. 'जेधे-जवळकर' हे जोडनावच मुळी लोकांच्या स्मरणात आहे. या ग्रंथातील कागदपत्रे उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. गोपीनाथ एकनाथ पालकर, 'पुढारी'कार श्री. गणपतराव जाधव, 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटलांचे चिरंजीव डॉ. आर. एन. पाटील, चिखलीचे पंढरीनाथ पाटलांचे बंधू ॲड. रामचंद्र सीताराम पाटील, 'विजय मराठा'कार श्रीपतराव शिंदे यांचे नातू श्री. विजय माधवराव शिंदे, नागपूरचे श्री. वाघ सराफ, श्री. शिवाजीराव जवळकर इत्यादींनी आम्हाला अनमोल साहाय्य केले. महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाने दिलेले अनुदान, जवळकर कुटुंबियांनी केलेली आर्थिक मदत

यामुळेच प्रस्तुतचा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. श्री विद्या प्रकाशनचे मधुकाका कुलकर्णी, भंडारी मुद्रणालयाचे श्री. सा. रा. भंडारी, आमचे सहकारी मित्र डॉ. अनिल अवचट, प्रा. सीताराम रायकर, श्री. दत्ता काळेबेरे, श्री. बापु विरुळे यांनी केलेल्या साहाय्याची नोंद करणे आवश्यक वाटते. जुन्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला खतपाणी घालण्याच्या उद्देशाने किंवा कोणाची निंदा-नालस्ती करण्याच्या हेतूने आम्ही हा प्रपंच केलेला नाही. सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीच्या अभ्यासकांना नव्हे तर १९२० नंतरच्या महाराष्ट्राच्या व देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाच्या अभ्यासकांना प्रस्तुतचा ग्रंथ एक अस्सल साधन म्हणून अतिशय मोलाचा ठरेल असा आमचा विश्वास आहे.

३० एप्रिल १९८४ —बाबा आढाव



प्रस्तावना



पेशवाईच्या अस्तानंतरच्या गेल्या पावणेदोनशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रात ज्या सामाजिक व राजकीय चळवळी झाल्या त्या सर्वांचा साधार व सविस्तर इतिहास अद्याप लिहिला गेलेला नाही. त्यामुळे सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीसारख्या साठ वर्षांहून अधिक काळ चाललेल्या चळवळीतील यशापयश, चढउतार, ताणतणाव, दुफळी व गटबाजी यांबद्दल बहुतेकांना फारशी माहिती नसते. अलीकडच्या काळात महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहूमहाराज, सीताराम केशव बोले वगैरेंची विस्तृत चरित्रे श्री. धनंजयराव कीर यांनी मोठ्या मेहनतीने लिहिली. त्यामुळे या थोर व्यक्तींच्या कार्याकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले. डॉ. गेल ऑमवेत यांनी मार्क्सवादी दृष्टिकोणातून या चळवळीवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या महाराष्ट्रातील राष्ट्रवादी प्रवाहाशी समांतर वाहात असलेल्या सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीच्या तसेच दलित मुक्ती चळवळीच्या प्रवाहास पूल बांधून जोडण्याचा कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. त्यात त्यांना फारसे यश आले नाही. या दिशेने त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल अभ्यासकांनी अद्याप घेतलेली नाही.

खरे म्हणजे डॉ. विश्राम रामजी घोले, कृष्णाजी पांडुरंग भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, रामय्या व्यंकय्या अय्यावारू, मारोतीराव नवले, धोंडीराम नामदेव कुंभार, नारो बाबाजी महाधट, हरिश्चन्द्रराव नवलकर, भाऊ कोंडाजी पाटील डुंबरे, मुकुंदराव पाटील, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, भाऊराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे, केशवराव बागडे, आनंदस्वामी, बाबूराव जेधे, दिनकरराव जवळकर वगैरे सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील प्रमुख नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या कामगिरीविषयी आजवर फारच थोडे लिहिले गेले आहे. तसे पाहिले तर दीनबंधूचे आद्य संपादक कृ. पां. भालेकर, दीनमित्रकर्ते मुकुंदराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे आणि दिनकरराव जवळकर यांनी सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीसंबंधी विपुल लेखन केले आहे. त्यांपैकी वेळोवेळी छोट्या पुस्तिकांच्या रूपात प्रसिद्ध झालेल्या या कलमबहाद्दरांच्या लेखनाकडे आजवर दुर्लक्ष झाले आहे. त्यांचे बरेचसे लेखन आता सहजासहजी उपलब्ध न होणाऱ्या वृत्तपत्रांत व नियतकालिकांत विखुरलेले आहे. याखेरीज त्यांनी जी छोटीमोठी पुस्तके लिहिली तीही

बरीचशी दुर्मिळ झाली आहेत. अशा परिस्थितीत गावोगाव फिरून खासगी संग्रह धुंडाळून हे सर्व साहित्य मिळविणे हे जिकिरीचे व वेळ खाणारे काम असते. महात्मा फुले प्रतिष्ठानने अर्वाचीन महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली ही साधने मिळवून ती अभ्यासकाप्रमाणेच जनतेलाही उपलब्ध करून देण्याचे ठरविले. दिनकरराव जवळकर यांच्या लेखांचा व पुस्तिकांचा हा संग्रह महात्मा फुले प्रतिष्ठानने गेली काही वर्षे हाती घेतलेल्या या उपक्रमाचाच एक भाग आहे.

दिनकर शंकर जवळकर यांचा जन्म १८९८ साली चोराची आळंदी येथील पाटील घराण्यात झाला. त्यांची सांपत्तिक स्थिती बेताचीच होती. ते जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिकले. महात्मा जोतीराव फुले व शाहूमहाराजांपासून स्फूर्ती घेतलेल्या तरुणांनी लोकमान्य टिळकांच्या प्रस्थापित नेतृत्वाला सवाल, नेमस्त किंवा प्रागतिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उदारमतवादी (लिबरल) पक्षाच्या सहकार्याने १९१७ नंतर पुणे शहरात जबरदस्त आव्हान दिले. पुण्याच्या शुक्रवार पेठेतील जेधे मॅन्शन हा टिळक-विरोधकांचा बालेकिल्ला बनला. कोल्हापूरचे छत्रपती शाहूमहाराज यांचा या तरुणांवर वरदहस्त होता. लोकमान्य टिळकांना पुणे शहरातर्फे मानपत्र देण्यास विरोध करणाऱ्यांत व किर्लोस्कर थिएटरमधील त्यांची सभा उधळण्यात धायगुडे, पालकर (गवंडी) बंधू या मंडळींनी हिरीरीने भाग घेतला. सोलापूरला एप्रिल १९२० मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या प्रांतिक अधिवेशनाच्या वेळीही दंगल झाली. त्यात बालचंद कोठारी या ब्राह्मणेतर चळवळीच्या त्या वेळच्या नेत्याने पुढाकार घेतला होता. १९१७ नंतरच्या या प्रक्षुब्ध वातावरणात दिनकरराव जवळकर सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीकडे ओढले गेले.

हिंदूंतील आंतरजातीय विवाहाला मान्यता मिळावी म्हणून १९१८ साली विठ्ठलभाई पटेल यांनी मांडलेल्या विधेयकाविरुद्ध टिळक पक्षाने मोहीम उघडली होती. त्या वेळी पटेल बिलाची तरफदारी करणारे 'प्रणयप्रभाव' नावाचे एक नाटक जवळकरांनी लिहिले. नाटकाच्या तालमी संपल्यानंतर त्याचा प्रयोग होणार होता; पण तेवढ्यात बंदीहुकूम बजावला गेल्याने त्याचा पहिला प्रयोगही होऊ शकला नाही अशी जवळकरांचे मित्र संदेशकार अच्युतराव कोल्हटकर यांची साक्ष आहे. हे नाटक अद्याप उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे त्याच्या आशयाबद्दल काहीच लिहिता येत नाही. पण परक्या सरकारलाही त्यावर बंदी घालावी लागली, यावरून त्यात स्फोटक मालमसाला ठासून भरलेला असला पाहिजे असे वाटते. कदाचित ब्राह्मण पुढाऱ्यांच्या तक्रारीमुळे सरकारने बंदी घातली असावी ! यासंबंधीचा निःसंदिग्ध पुरावा मिळाला नाही.

जवळकरांच्या लेखणीची धार लक्षात घेऊन छत्रपती शाहूमहाराजांनी बाबूराव यादव या विश्वासू अनुयायामार्फत त्यांना कोल्हापूरला बोलावून घेतले. शाहूमहाराजांचा आश्रय मिळाल्याने त्यांना आयुष्यात प्रथमच चैनीत राहता येऊ लागले. स्वतः जवळकरांनीच म्हटले आहे, " शाहूमहाराजांच्या आश्रयाखाली सार्वजनिक चळवळीला मनुष्यस्वभावाची माहिती आणि निर्भयता या अनेक गोष्टी जरी मला लाभल्या तरी कसलेही

श्रम न करता खर्च होतील तेवढे पैसे लहान वयात माझ्या हाती येऊ लागल्यामुळे सार्वजनिक कार्यात घातक होणारी डामडौलाची सवय जडली होती.'' जवळकर कोल्हापुरात 'तरुण मराठा' हे वृत्तपत्र चालवीत. या पत्राचे जुने अंक तलास करूनही मिळू शकले नाहीत. जवळकरांच्या पत्राची भाषा भडक व तिखट होती असे समकालीन सत्यशोधक व ब्राह्मणेतर पत्रांनीही म्हटले आहे. टिळकपक्षावर आणि विशेषतः नारायणराव गुंजाळ वगैरे टिळकपक्षातील मराठा पुढाऱ्यांवर लिहिताना जवळकरांच्या लेखणीस धरबंद राहात नसे. ब्राह्मणेतर चळवळीत उडी घेण्यापूर्वी दिनकरराव जवळकर काही दिवस नारायणराव गुंजाळ यांच्या गटात वावरत होते म्हणूनच त्यांना दीनमित्राच्या एका पत्रलेखकाने, '' पकडून आणलेले गुंजाळ कंपूतील चुकार तट्टू '' म्हटलेले आहे. (दीनमित्र : २८ डिसेंबर १९२१)

'तरुण मराठा' पत्रात जवळकरांनी नारायणराव गुंजाळ यांच्यावर झोड उठवली तेव्हा दीनमित्रासारख्या सत्यशोधक वृत्तपत्रानेही जवळकरांचा निषेध केला. '' कोल्हापुरात 'तरुण मराठा' नावाचे वर्तमानपत्र निघत आहे. हे पत्र सत्यशोधक मताचे म्हणवीत आहे आणि म्हणूनच आज आम्हास त्याच्या धोरणासंबंधाने दोन शब्द लिहिणे भाग आहे. सत्यशोधक समाज आज चाळीस-पन्नास वर्षे काम करीत आहे. तो साधारणतः जरी ब्राह्मणाविरुद्ध असला तरी तो माणुसकीविरुद्ध नाही. थोड्या दिवसांपूर्वी सदर पत्रात पुण्याचे रा. नारायणराव गुंजाळ यांच्यासंबंधाने एक पत्र प्रसिद्ध झाले. रा. गुंजाळ हे सत्यशोधक समाजाचे वैरी आहेत हे आम्हास मान्य आहे व यासंबंधाने आम्ही त्यांचा योग्य तो समाचार घेऊ पण असा समाचार घेण्याचा सरळ मार्ग सोडून रा. गुंजाळ मराठ्यांचे लेकावळे आहेत, ते अकरमाशे आहेत, असली असंबद्ध विधाने करणे योग्य नाही. अशा ग्राम्य विधानाने समाजध्येयास काळोखी लागत आहे. लेकावळे असणारांना सत्यशोधक समाजात घेण्याची मनाई आहे असे थोडेच आहे ? त्याचप्रमाणे रा. गुंजाळ यांच्या सहीचे एक पत्र तरुण मराठ्याने प्रसिद्ध करून त्यात रा. केळकर यांनी चार हजार रुपये उपटल्याचे छापले आहे, पण हे पत्रच मुळी खोटे असल्याचे रा. गुंजाळ केसरीत प्रसिद्ध करतात ! यानंतर तरुण मराठ्याने अनंदस्वामीची मुलाखत प्रसिद्ध केली आहे. तरुण मराठ्याचे प्रतिनिधी म्हणून अनंदस्वामी रा. गुंजाळांस भेटण्यास गेले होते असे तरुण मराठ्याचे म्हणणे आहे; पण याही बाबतीत आम्ही मुद्दाम अनंदस्वामींची चौकशी करून मुंबईस त्यांच्याजवळ मित्रामार्फत खुलासा विचारला तेव्हा यांनी साफ सांगितले की, तरुण मराठ्याने छापलेले सर्व खोटे आहे तेव्हा अशा कल्पित कादंबऱ्या प्रसिद्ध करणारांचा स्पष्ट निषेध करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.'' (दीनमित्र : १६ मार्च १९२१)

जवळकरांनी दीनमित्रकारांची टीका चुकीची आहे असे २० मार्च १९२१ च्या मराठ्याच्या अंकात दाखविण्याचा प्रयत्न केला आणि '' तरुण मराठ्याचा सूड घेण्याच्या हेतूने रा. गुंजाळांनी बनावट पत्र पाठविले नसेल कशावरून ? '' असा प्रतिप्रश्न विचारला.

(दीनमित्र : ६ एप्रिल १९२१) तरुण मराठा व दीनमित्र या वृत्तपत्रांमधील वाद १९२१ अखेरपर्यंत चालू राहिला. हा वाद खेळत असतानाच जवळकरांनी दीनमित्राच्या १३ जुलै १९२१ च्या अंकात 'जाहीर विनंती' म्हणून एक पत्र प्रसिद्ध केले. त्यात म्हटले होते, "कै. बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र बहुतेक लिहून संपत आले आहे. त्यातच सत्यशोधक समाजाचा इतिहास लिहावयाचा आहे. करिता प्रत्येक गावी जे जे गृहस्थ सत्यशोधक समाजाची सेवा करीत असतील त्यांनी आपली नावे व थोडक्यात चरित्र पाठविण्याची मेहेरबानी करावी. अस्पृश्यबंधूंनी वरिष्ठ वर्गाकडून छळ होत असलेल्या व झालेल्या दुर्दैवी बांधवांची माहिती पाठवावी. जे जनसेवक जिवंत नसतील त्यांचीही माहिती कळविण्याची कृपा करावी." जवळकरांच्या या जाहीर विनंतीस कोणी व किती प्रतिसाद दिला हे जसे पुराव्याअभावी सांगता येत नाही, त्याचप्रमाणे त्यांनी लिहिलेले टिळक-चरित्रही हाती लागले नाही. काही वर्षांनी त्यांनी लिहिलेल्या 'देशाचे दुष्मन' या पुस्तकात कदाचित त्यांनी या आधी लिहिलेल्या हस्तलिखितातील मजकूर समाविष्ट केला असण्याची शक्यता आहे.

नारायणराव गुंजाळांसंबंधी केलेले बेगुमान आरोप अखेर जवळकरांच्या अंगलट आले. 'तरुण मराठा' पत्राचे मुद्रक श्री. एस. पी. सावंत यांनी गुंजाळ यांना पाठविलेले माफी पत्र 'केसरी'त प्रसिद्ध झाले तसेच ब्राह्मणेतर पत्रांनीही प्रसिद्ध केले. या पत्रात म्हटले होते, "मी आपली माफी मागवून कळवितो की दिनकर शंकर जवळकर राहणार कोल्हापूर यांचेवर विश्वास ठेवून मी सपशेल फसलो आहे व त्यामुळे सदरचा मजकूर छापला गेला. मी फार दिलगीर आहे." (केसरी : १३ डिसेंबर १९२१ व दीनमित्र : १४ डिसेंबर १९२१) जवळकरांच्या बेफाम लेखणीमुळे खुद्द छत्रपती शाहूमहाराजही अडचणीत आलेले दिसतात. औंधच्या पंतप्रतिनिधींनी 'गरिबांचा कैवारी', 'विश्व-बंधु' व 'तरुण मराठा' या कोल्हापुरातील वृत्तपत्रांविरुद्ध ब्रिटिश राजप्रतिनिधीकडे तक्रार केली तेव्हा राजप्रतिनिधीला उत्तरादाखल लिहिलेल्या १० एप्रिल १९२१ च्या पत्रात 'तरुण मराठा' पत्राच्या संपादकाला आपण कोल्हापूर सोडून जाण्यास सांगितले असल्याचे म्हटले आहे (—धनंजय कीर, **राजर्षि शाहू छत्रपती**, पृ. ४९६) जवळकर ताबडतोब कोल्हापूर सोडून गेलेले दिसत नाहीत. १९२१ च्या डिसेंबरअखेर-पर्यंत त्यांची व दीनमित्रकारांची लढत चालूच होती.

दीनमित्रकर्ते मुकुंदराव पाटील यांनी २१ डिसेंबर १९२१ च्या दीनमित्राच्या अंकात पत्रलेखकाचे नाव प्रसिद्ध न करता एक खाजगी पत्र छापले आहे. हा पत्रलेखक जवळकरांचा सहकारी असावा. त्याने लिहिले आहे, "आपण मजबद्दलच नव्हे, रा. जवळकरांसंबंधानेही मनात कसलीच अढी आणू नये. तरुण मराठा पत्राचे संपादक रा. जवळकर आहेत पण ते XXX च्या हातातले. तेच काय खुद्द मीही बाहुला आहे. टोणगा गाभणा तर नववा महिना एवढेच बोलून येथे भागत नाही! तर त्या टोणग्याच्या दुधाचा खवा करून हा बघा पेढा आणला येथपर्यंत आम्हाला धूम ठोकावी लागते! तेव्हा

आपणास एवढीच विनंती की आपण आमच्या पत्रातील टीकेकडे अगदी दुर्लक्ष करा. काय सांगावे ! आमच्या पत्रात कधी कोणता मजकूर छापला जाईल हे आम्हासच पुष्कळ वेळा माहीत नसते." खुद्द जवळकरांनीही मुकुंदराव पाटील यांना खाजगी पत्र पाठवून विचारले होते "हे आपण काय केले ? आपण गप्प बसला असता तर बरे झाले असते." (दीनमित्र, २८ डिसेंबर १९२१)

"'तरुण मराठा' बंद झाला असून जवळकर कोठे गडप झाले ते समजत नाही कारण त्यांच्यावर पुण्याचे वारंट सुटले आहे" अशी बातमी दीनमित्राच्या कोल्हापूरच्या बातमीदाराने ४ जानेवारी १९२२ च्या अंकात दिलेली आढळते. शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर (६ मे १९२२) जवळकरांचा आधार पुरता तुटला. इंदूर, ग्वाल्हेर भागात काही दिवस घालवून ते पुण्याला परतले. या काळात श्रीपतराव शिंदे यांच्या 'विजयी मराठा' या पुण्याहून निघणाऱ्या पत्रात ते 'भवानी तरवार' या टोपणनावाने अधून-मधून लिहीत होते. १९२२ च्या नोव्हेंबरात जवळकरांनी पुण्याहून पुन्हा 'तरुण मराठा' पत्र सुरू केले. पहिल्याच अंकातील अग्रलेखात 'तरुण मराठा'कारांनी कोल्हापूरच्या वास्तव्यात आलेल्या अनुभवांचे कथन केले. "पाहुण्यांच्या हातून साप मारून स्वतःची बायको गरोदर आहे अशी सबब सांगणाऱ्या चांडाळ मुत्सद्यांचा आम्हाला अगदी पुरापुरा वीट येऊन गेला आहे. स्वदेश सेवेत जर लपंडाव, पॉलिसी, मखलाशी सुरू झाली की तीच स्वदेश सेवा नरकयातनांप्रमाणे खडतर भासू लागते. तरुण रक्ताचे सरळ आत्मे भावनांच्या भरात बेगुमान पुढचा पाय पुढे ठेवतात. पण त्याचा फायदा कोण कसा घेईल. गूळखोबऱ्याची दुकाने कोठे आहेत याचा त्याला पत्ता नसल्यामुळे ते प्राणी कसे कसे फशी पडतील हे सांगण्याचा अधिकार आज तरुण मराठ्याला स्वानुभवाने प्राप्त झाला आहे." आपल्या प्रभावी वक्तृत्वाचा, फर्ड्या लेखणीचा उपयोग करून घेतला जातो हे जवळकरांना कळल्यासारखे वाटले तरी नंतरही त्यांचा चलाखीने उपयोग करून घेणारे मुरब्बी मुत्सद्दी त्यांना भेटलेच ! आणि एकदा आलेल्या अनुभवाने जवळकर शहाणे मात्र झालेले दिसत नाहीत. या लेखात, "कै. टिळकांप्रमाणेच देशोद्धारासाठी कै शाहूमहाराजांनीही राजनिष्ठेचे ढोंग केले होते" असे जवळकरांनी म्हटले. त्यांचे "हे विधान आम्हास भयंकर दिसते" अशा शब्दात दीनमित्रकारांनी त्यावर टीका केली आहे. (दीनमित्र, २२ नोव्हेंबर १९२२) पुण्याला परतल्यावर जवळकर गावातल्या राजकीय उलाढालीत केशवराव जेधे यांच्याबरोबर उत्साहाने भाग घेऊ लागले.

दरम्यानच्या काळात ब्राह्मणेतर पक्षाची मवाळांबरोबरची युती संपुष्टात आली होती. जेधे मॅन्शन विरुद्ध गायकवाडवाडा ही लढत निकराला येत होती. पुण्यात होणाऱ्या शिवछत्रपतींच्या संकल्पित स्मारकाबाबतचा वाद पेटला आणि 'तरुण मराठा मंडळा'ची स्थापना करून जेधेबंधू, पालकरबंधू, जवळकर, विठ्ठलराव झेंडे वगैरेंनी ग्वाल्हेरचे राजे अलिजाबहादर माधवराव शिंदे, यांच्या नेतृत्वाखालच्या शिवस्मारक समितीविरुद्ध बंड पुकारले. तसे पाहिले तर १९१७ साली ग्वाल्हेरचे खासेसाहेब पवार व बडोद्याचे

खासेसाहेब जाधव यांनी प्रथम श्रीशिवस्मारकाची योजना मांडली तेव्हाच बडोद्याच्या 'जागृति'कार पाळेकरांनी इषारा दिला होता, "शिवस्मारक संस्था फक्त क्षत्रिय मराठ्यांकरिता असणार किंवा महाराष्ट्रातील मागासलेल्या सर्व जातींनाही त्याचा फायदा मिळणार याचा खुलासा व्हावा. मागाहून गैरसमज किंवा तंटेबखेडे होण्यास जागा राहू नये." [जागृति, ८ डिसेंबर १९१७] पुण्याचे शिवस्मारक "निव्वळ मराठ्यांचे करावे" असे शाहू छत्रपतींना वाटत होते पण तसे केले तर विशिष्ट जातीसाठी उभारल्या जाणाऱ्या स्मारकाची कोनशिला प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते बसविणे शक्य झाले नसते. हे लक्षात घेऊन श्रीशिवाजी स्मारकाला अखिल भारतीय स्वरूप देण्यास शाहूमहाराजांनाही संमती द्यावी लागली. १९ नोव्हेंबर १९२१ ला म्हणजे गांधीजींची असहकाराची चळवळ ऐन भरात असताना ब्रिटनच्या युवराजांच्या हस्ते कोनशिला बसविण्याचा समारंभ थाटामाटाने साजरा झाला होता. शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर मात्र शिवस्मारक समिती अलिजाबहादर शिंदे सरकारांच्या सर्वस्वी आधीन झाली. २५ मे १९२२ रोजी शिंदे सरकारांच्या मुंबईतील 'समुद्र महाल' या निवासस्थानी समितीची सभा भरली. या सभेत सांगलीच्या पटवर्धनांसारख्या ब्राह्मण संस्थानिकांचा समितीत समावेश करण्याचे व गोपाळराव देवधर यांना समितीचे चिटणीस नेमण्याचे ठरले. तेव्हा श्रीशिवस्मारक शिवाजी मराठा सोसायटीच्या मालकीचे असावे आणि मराठेतर लोकांना त्याच्या व्यवस्थेत हात घालता येऊ नये असा आग्रह जेधेबंधू, पालकरबंधू, जवळकर वगैरे तरुण मराठा मंडळाच्या धुरीणांनी आग्रह धरला.

तरुण मराठा मंडळाच्या या प्रमुख नेत्यांनी काढलेल्या छत्रपती मेळ्यानेही १९२२ सालच्या गणेशोत्सवात पुणे शहरात खळबळ उडवून दिली. तोपर्यंत गणेशोत्सवातील मेळ्यांतून टिळक पक्षाची स्तुती करणारी आणि सुधारक, नेमस्त पुढारी व स्त्रिया यांची नालस्ती करणारी पदे म्हटली जात.

"अहो हे सुधारक नव्हे । पण असती वेडझवे ।
यांचे कळेनात काय कावे । मारा यांना पैजार"

किंवा

"बट आय ॲम रिफॉर्मर । आय डोंट लाईक सच मर्मर
आय वुईल टेक माय वाइफ नियर । साहेबाच्या"

असली पदे फार लोकप्रिय होती.

"बिस्कुटे उष्टी त्वा खावी । साहेबी लक्तरे ल्यावी ।
सर्वदा लाळ घोटावी । रात्रंदिन जी जी करावी ॥"
"तुज मिळेल म्हारीण कोणी । वाकडी जी सात ठिकाणी ।
काळुंद्री घुबडावाणी । तू राजा मग ती राणी ॥"

या मेळातल्या लोकप्रिय पदांत ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणाऱ्याबरोबरच अस्पृश्य मानल्या गेलेल्या स्त्रियांची हेटाळणी केली जात असे.

१९२१ सालच्या गणेशोत्सवातील मेळ्यांत असली पदे म्हटली गेली तेव्हा, " कित्येक कुलस्त्रियांनी वर्तमानपत्रात पत्रे लिहिली ... येत्या वर्षी सुधारकांनी, सत्यशोधकांनी व सुशिक्षित स्त्रियांनीही मेळे तयार करून वक्रतुंड धर्माभिमान्यांची चांगली पूजा बांधावी; त्यांच्याच भाषेत त्यांचे उसने वाण परत करावे अशी टीका एका ' कलम–शिलेदारा 'ने ' जागृति ' पत्राच्या ९ सप्टेंबर १९२२ च्या अंकात सूचना केलेली आढळते.

जेधे, जवळकर वगैरेंच्या मनातही असाच विचार घोळत असल्याने त्यांनी छत्रपती मेळा काढला. या मेळ्यात भाग घेतलेले श्री. दिनकरराव माने यांनी जेध्यांच्या आठवणी सांगताना लिहिले आहे, " मेळा काढून हा पहिला हल्ला करण्याची कल्पना केशवरावांची ! जेधे मंडळींनी पदरचा पैसा घातला. तरुण कॉलेजिअन्स, पूर्व पुण्यातील तालमी यांचा हळूहळू पाठिंबा मिळाला आणि छत्रपती मेळ्याची पडघम टिपरी झडली की, ' अरे, आला छत्रपती मेळा, पळा भटांनो ! पळा ! पळा ! ' हा ठेका सुरू ! आम्हाला रात्ररात्रभर जागरणे, मेळ्यांची पालुपदे घोळून घोळून घसे बसलेले. तुफान गर्दीचा सहानुभूतीचा घेराव, हसऱ्या पोलिसांचे स्वयंसेवक दल. जाईल त्या भागात जयनाद, मेळेवाल्यांच्या भगव्या रंगाच्या फेट्यांचा थाट, किती आकर्षक होता. ' सारा नकट्यांचा बाजार ', ' कुठेही भट आडवा आला राज्याचाही निकाल होईल, जाईल नाशाला ' अशा कवी केशवरावांच्या हिट चाली ! केशवरावांनी छत्रपती मेळ्यासाठी नुसती पदे रचली एवढेच नव्हे तर " शिवाजी आमुचा राणा, मराठी आमुचा बाणा " हा गझल म्हणून त्यांनी तो लोकप्रियही केला. जेध्यांच्या या उपक्रमात जवळकरही सामील होते. ' छत्रपती-पद्यसंग्रह ' ही पुस्तिका दिनकरराव जवळकरांनीच प्रकाशित केली आहे.

या पुस्तिकेतील कोणती पदे जवळकरांनी लिहिली व कोणती केशवरावांनी लिहिली हे निश्चित सांगणे आज पुराव्याअभावी अशक्य आहे. मूळ पुस्तिकेत फक्त सोळा पदे छापलेली आहेत; ही पदे कोणी रचली हे नावनिशीवार दिलेले नाही. अर्ध्या अधिक पदांत भटावर विशेषतः चित्पावन ब्राह्मणांवर आणि टिळकांवर झोड उठविलेली आहे. ' ओळखा कोण हा नकटा ' या पदात लोकमान्य टिळकांवर जळजळीत टीका केलेली आहे. छत्रपती शाहूमहाराज व महात्मा गांधी यांची स्तुती करणारी पदे आहेत त्याचप्रमाणे महात्मा फुले यांच्या शिकवणीची आठवण करून देणारी दोन पदेही आहेत. पेशव्यांचे तसेच समर्थ रामदासस्वामींचे स्तोम माजविणाऱ्या ब्राह्मणांवर काही पदांत जोरदार हल्ला चढवलेला दिसतो. या पदांमध्ये कवित्वगुण बेताचेच असले आणि यमक जुळविण्यावरच रचनाकाराचे लक्ष केंद्रित झालेले दिसते तरी पदांतून व्यक्त होणारा आवेश व असंतोष हा समकालीन श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडत असला पाहिजे.

१९२२ साली छत्रपती मेळा प्रथम गणेशोत्सवात सामील झाला. तेव्हा ५ सप्टेंबर १९२२ च्या अंकात केसरीकर्त्यांनी लिहिले, " अभिनंदनीय गोष्ट म्हणजे यंदा येथील सत्यशोधक बंधू या उत्सवात सामील झाले ही होय. यंदा त्यांच्यातर्फे सुमारे तीनचार मेळे

निघाले. या उत्सवात सामील न होणाऱ्या वर्गात आजपर्यंत हा समाज मोडला जात असे." लोकमान्यांचे निवासस्थान असलेल्या गायकवाडवाड्यात सर्व मेळेवाले हजेरी लावीत असत. या प्रघातानुसार छत्रपती मेळाही गायकवाडवाड्यात शिरला तेव्हा तेथे पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. "व्यवस्थापकांनी मद्यपाननिषेधपर एखादे पद म्हणा असे सुचविले पण आपण येथे दारूबाजी बंद करण्यासाठी आलो नसून गुरुबाजीस ऊर्फ भटशाहीस गाडण्याकरिता आलो आहो म्हणून (छत्रपती मेळेवाल्यांनी) सांगितले. 'रावबाजीच्या मूर्खपणाने गेली पेशवाई । व्हा, बंधूंनो सावध आता, गाडा भटशाही ।' हे पद म्हटले. नंतर 'जेथे जेथे भट हे येती, तट तेथे पडती । या गोष्टीची आम्हा आता आली प्रचिती ।' हे कडवे म्हटल्याबरोबर भटांची काही मंडळी शेम शेम म्हणून ओरडली. त्याबरोबर मेळेवाले मोठ्या जोरात उभे राहिले. मंडळी स्वस्थ बसली व मेळ्याची पदे शांतपणे ऐकून घेतली. 'शाहू छत्रपती महाराजकी जय' म्हणत मंडळी बाहेर पडली" अशा शब्दात विजयी मराठ्याने १८ सप्टेंबर १९२२ च्या अंकात सत्यशोधकांनी टिळकांच्या वाड्यावर चढविलेल्या हल्ल्याचे वर्णन केलेले आढळते. केसरीकर्त्यांनी १२ सप्टेंबर १९२२ च्या अंकात लिहिले, "सत्यसमाजिस्ट वगैरे कित्येकांनी काहीतरी कुरापत निघावी असे वर्तन कोठेकोठे केले, परंतु आज ते उत्सवात सामील तरी होऊ लागले. उद्या तेही राष्ट्रीय भावनेच्या एकाच प्रवाहात येऊन मिळतील अशी आशा आहे." मात्र सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रवाहाचा राष्ट्रवादी स्वातंत्र्य चळवळीशी मिलाफ होणार नाही व तो तसाच समांतर वाहात राहणार हे लक्षात येताच छत्रपती मेळ्याचे आव्हान संपुष्टात आणण्यासाठी पुण्यातल्या ब्राह्मण नेत्यांनी नाना प्रकारचे उपाय योजून पाहिले. १९२२ नंतर ही धामधूम चांगली पाचसहा वर्षे चालली होती.

ब्राह्मण विशेषतः चित्पावन ब्राह्मण आणि त्यातही केसरीकंपू हेच तेवढे जेधे-जवळकरांच्या माऱ्याचे एकच लक्ष होते असे नाही. ब्राह्मणेतरांमधील बड्या बड्या धेंडांचा मुलाहिजा न ठेवता त्यांच्यावरही ते तुटून पडत असत. श्रीशिवस्मारक समितीतल्या बुजुर्गांना घायाळ करणारे एक श्रीशिवस्मारकपुराण जवळकरांनी ४ सप्टेंबर १९२३ रोजी लिहून पुरे केले आणि 'आग्यावेताळ' या टोपणनावाने सतरा अध्यायांची पोथी प्रकाशित केली. श्रीशिवस्मारकासाठी जमा झालेल्या रकमेपैकी सतरा हजार रुपयांच्या रकमेबाबत वाद निर्माण झाल्याने जवळकरांनी या पुराणाचे सतरा अध्याय आणि प्रत्येक अध्यायात सतरा ओव्या अशी रचना केली आहे. संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी १९२० साली पस्तीसशे रुपयांच्या रकमेबाबतच्या वादात असेच एक फंडपुराण रचून तात्यासाहेब केळकर, अण्णासाहेब नेने वगैरे लोकमान्य टिळकांच्या निकटच्या सहकाऱ्यांवर तुफान हल्ला चढवला होता. जवळकरांचे 'श्रीशिवस्मारकपुराण' ही ब्राह्मणेतर चळवळीतील प्रचार-मोहिमेची तशीच एक आवृत्ती होती. या पुराणात शिंदे सरकार, पी. सी. पाटील, बाबूराव जगताप, भास्करराव जाधव, खासेराव पवार, खासेराव जाधव, शंकरराव कदम कातरणीकर,

कीर्तिवानराव निंबाळकर वगैरे विरोधकांची टवाळी केली होती. तर विठ्ठल रामजी शिंदे, विठ्ठलराव झेंडे, बाबूराव तसेच केशवराव जेधे हे बंधू, गवंडी (पालकर) बंधू वगैरेंची प्रशंसा केली होती. 'मेंढ्यावरी लोकर दाट भारी। थंडीस त्यांच्या बहु ते निवारी' असल्या पद्यापेक्षा आपल्या पद्यरचनेच्या वेगळेपणाकडे वाचकांचे लक्ष वेधताना 'आग्यावेताळा'ने म्हटले होते, "भावनेच्या झंझावातात कल्पनाचक्षूंना दिसेनासे झाल्यामुळे जर 'कादंबऱ्या कवीचे' ठेकेदार वस्तुवर्णन साधले नाही किंवा घटापटाच्या खटपटी करणाऱ्या पाणिनीच्या पणजोबाचे लष्करी कायदे पाळले नाहीत तरी खप्पा न होता खुल्या दिलाच्या भल्या मर्दांना हा नुसता 'पोरखेळ' म्हणून तरी कौतुक वाटेल ना? 'शाहिरांच्या चाहत्या जगा! मराठी रसवंतीच्या मोहिनेने ब्याब्या ब्रह्मात तल्लीन होणाऱ्या रसिका!' 'कार्य काय आणि करतोस काय! हे मना विचारा ते आता' असली काव्ये करता येत नाहीत याबद्दल माफी असावी" [विजयी मराठा, २७ ऑगस्ट १९२३]

अलिजाबहादर शिंदे सरकारांच्या श्रीमंत पक्षाविरुद्ध प्रचार करण्यासाठी केशवराव जेधे यांनी श्रीशिवस्मारक नावाचे एक साताहिकही १९२३ च्या दसऱ्याच्या मुहुर्तावर सुरू केले. ते आठ महिने चालवून १९२४ च्या जुलै महिन्यात बंद केले. या वृत्तपत्राचे अंक उपलब्ध झाले नाहीत. मात्र त्यात प्रसिद्ध झालेला मजकूर 'खोडसाळ' व 'बीभत्स' असल्याची पत्रे जागृतीच्या २६ एप्रिल १९२४ च्या अंकात छापलेली आढळतात. या वृत्तपत्रात जवळकरांनी बरेच लेखन केले असणार! श्रीशिवस्मारकाबाबत मराठा समाजात दुफळी माजल्याने स्मारकाचे काम रेंगाळू लागले. पाच ऑक्टोबर १९२४ रोजी खासेराव जाधवांचे निधन झाले तर ५ जून १९२५ रोजी अलिजाबहादर शिंदे दिवंगत झाले. दरम्यान १९२४ च्या नोव्हेंबर महिन्यात केशवराव जेधे, गवंडी बंधू, विठ्ठलराव झेंडे, शंकरराव मोरे, दिनकरराव जवळकर वगैरे मंडळींनी श्रीशिवाजी सोसायटीचे राजीनामे देऊन मिटते घेतले. अखेर १६ जून १९२८ रोजी मुंबईचे गव्हर्नर लेस्ली विल्सन यांनी शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले. पुतळा तयार करण्याची योजना पार पडली ती कोल्हापूरच्या छत्रपती राजाराजमहाराजांनी पुढाकार घेतल्यामुळे!

एकोणीसशे चोवीस साली 'नकट्यांचा बाजार सारा' या छत्रपती मेळ्यात म्हटल्या जाणाऱ्या पदामुळे खवळलेल्या ब्राह्मण श्रोत्यांनी ब्राह्मणेतरांबरोबर मारामारी केली. केसरीकर्त्यांनी १६ सप्टेंबरच्या अंकात या प्रकाराबद्दल छत्रपती मेळ्याच्या चालकांना दोष दिला. "या मेळ्याच्या लीला काही अपवाद सोडून दिल्यास ब्राह्मणेतर पक्षालाही संमत नव्हत्या. जेधे कंपूच्या मेळ्याकडून दुर्वर्तन झाल्यास सबंध समाजास विनाकारण तोशीस लागू नये म्हणून सत्यशोधक समाजाच्या चिटणिसांनी यंदा आम्ही सत्यशोधक मेळा काढला नाही आणि इतर कोणत्याही मेळ्याशी आमचा संबंध नाही असे आगाऊ जाहीर केले होते. अर्थातच ज्या एकदोन मेळ्यांनी गेल्या उत्सवात बेमर्याद पुंडाई केली असता त्यांस त्यांच्या संकुचित अनुयायांच्या खेरीज इतर कोणाचीही सहानुभूती नव्हती.

मिरवणुकीच्या आधी एकदोन दिवस मोकळीक मिळाल्याने संधी साधली तेवढ्या वेळात जोगेश्वरीच्या देवळानजिक व गायकवाडवाड्यापुढे या टोळभैरवांनी दंगा करण्याची आपली हौस पुरी करून घेतली आणि मिरवणुकीनंतर म्युनिसिपालिटीच्या हेल्थ ऑफिसवर कित्येकांनी हल्ला करून सामानाची नासधूस केली व ढेकणे नावाच्या कारकुनास निष्कारण बेदम मार दिला...वस्तुस्थिती अशी आहे की, छत्रपती मेळ्याच्या पदात नुसत्या ब्राह्मणवर्गालाच नव्हे तर प्रत्यक्ष लोकमान्य टिळकांना अश्लील शिव्या आहेत. अर्थातच टिळकांच्या वाड्यात या मेळ्याला निमंत्रण दिले गेले नाही; पण निमंत्रण नसताना त्या मेळेवाल्यांनी स्वतःबरोबर शे-दोनशे बाजारबुणगे घेऊन वाड्यात घुसण्याचा हट्ट धरला....केसरीचे ट्रस्टी व मॅनेजर सरळपणे सांगत असता त्यांचे डोक्यात मारून दांडगाईने आत शिरण्याचा त्यांनी यत्न केला तेव्हा वाड्यातील व्यवस्थापकांनी व स्वयंसेवकांनी त्यांस वाड्यापुढून घालवून दिले. पळपुट्यांनी दुरून दगड-पत्र्यांचे तुकडे फेकण्याचे शौर्य दाखविले."

या मारामारीचे वृत्त देताना मवाळ पक्षाच्या 'ज्ञानप्रकाश' पत्राने वस्तुस्थितीचा विपर्यास केला असे वाटल्यामुळे केशवराव जेधे यांनी छत्रपती मेळ्याचे चिटणीस या नात्याने एक पत्र लिहून ते प्रसिद्ध केले. "ता. ६ च्या ज्ञानप्रकाशात छत्रपती मेळ्याविषयी अगदी गैरसमज पसरविणारा मजकूर आला आहे. ता. ४ रोजी गुरुवारी ९॥ वाजता जोगेश्वरीचे गणपतीपुढे हजेरी देण्याकरिता मेळा गेला होता. त्या वेळी नियमाप्रमाणे गणपतीचे नमन झाल्यावर पेशवाईचा पोवाडा म्हणण्यात आला. तो मंडळीला आवडल्यामुळे आणखी एक पद म्हणण्याचा आग्रह चालकांकडून झाला. छत्रपती मेळ्याची पदे जरी भटशाहीच्या विरुद्ध आहेत तरी त्यामध्ये ब्राह्मणांच्याविषयी योग्य अशीच टीका आहे. तसेच जनहिताच्या दृष्टीने मेळ्याची पदे म्हटली जातात. तशाच तऱ्हेचे पद जोगेश्वरीच्या गणपतीपुढे आग्रहामुळे म्हणण्यात आले. त्या वेळी लोकसमुदाय जवळजवळ दोन हजारांवर जमला होता. म्युनिसिपालिटीने टिळकांचा जो पुतळा बसविला त्याविरुद्ध वरील पद असल्यामुळे ब्राह्मण समाजाला ते आवडले नाही. म्युनिसिपालिटीने जनतेच्या पैशाचा दुरुपयोग चालविला आहे. याविषयी या पदाने पूर्ण खात्री झाली. परंतु ब्राह्मण समाज हा मूळचाच छत्रपती मेळ्याविषयी द्वेषाने अत्यंत भडकलेला असल्यामुळे त्यांना ते पद न रुचून त्याने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. त्यामुळे ब्राह्मणेतर श्रोतृसमुदाय यांच्यामध्ये लठ्ठालठ्ठी झाली. छत्रपती मेळ्याने काठ्या मुळीच उचलल्या नाहीत व मारामारीत भागही घेतला नाही. श्रोतृसमुदायात जी लठ्ठालठ्ठी झाली याबद्दल छत्रपती मेळा मुळीच जबाबदार नाही. छत्रपती मेळ्याविषयी ज्ञानप्रकाशकारांनी जो मुद्दाम गैरसमज पसरविला आहे तो त्यांच्या ब्राह्मणी मवाळ हृदयास अनुसरूनच आहे. ब्राह्मण समाजाने ज्या पदाला आरडाओरड केली ते पद छत्रपती पद्यावलीत पाहावे म्हणजे त्यात अर्वाच्य असे काय आहे ते ज्ञानप्रकाशकारांनाच दिसेल. ज्ञानप्रकाशने टिळक-चरित्रावर जी टीका केली आहे त्यापेक्षा या पदातील न्याय्य टीका पुष्कळच

सौम्य आहे हे कोणालाही दिसून येईल."

अर्वाच्य किंवा अश्लील शब्दांचा वापर फक्त छत्रपती मेळेवाले करीत होते असे नाही. १९२४ सालच्या गणेशोत्सवात टिळक पक्षाचे एक फड गाजवणारे वक्ते भालाकार भोपटकर यांनी केलेल्या भाषणात वापरलेली भाषा व विनोद सद्‌भिरुचीच्या तत्कालीन सर्वमान्य समजुतीशी सुसंगत नव्हते म्हणून तात्यासाहेब केळकरांनी केसरीतून त्याबद्दल जाहीर माफी मागितली होती. 'सुशिक्षित परंतु भावनाविवश व दुराग्रहाच्या शिकवणीने भारलेले तरुण व्यतिपात योगावर जन्मलेली व सतरा ठिकाणी गुण उधळून शिवराळपणाचा धंदा करणारी शेंडे नक्षत्राच्या पायगुणाची उडाणटप्पू पोरे' अशा शब्दात जेधे-जवळकरांचा निर्देश करून 'जागृति' पत्राचे संपादक भगवंतराव पाळेकर यांनीही अर्वाच्य शब्दांच्या वापराबद्दल जेधे-जवळकर यांच्यावर कडक टीका केली.

कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जाती किंवा वर्णानुवर्षे पायदळी तुडवले गेलेले जनसमूह जेव्हा आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध किंवा आपल्याला कंठाव्या लागणाऱ्या अपमानाविरुद्ध लढाईचा पवित्रा घेतात तेव्हा त्यांच्या तोंडातून ओव्या येण्यापेक्षा शिव्यांचा वर्षाव होणे हे स्वाभाविक असते, अटळ असते म्हणूनच ते समर्थनीय नसले तरी समजण्यासारखे असते. वाणीला आणि लेखणीला घातलेला विवेकाचा लगाम भावना-प्रक्षोभामुळे ढिला झाला की वाणीला तसेच लेखणीला धरबंद राहात नाही. महापुराचे गढूळ पाणी जसे बंधारे मोडून वेडेवाकडे सुसाट वेगाने नासधूस करीत धावते तसा प्रकार सामाजिक चळवळीत परिवर्तनास अनुकूल व प्रतिकूल असणाऱ्यांचे प्रचारयुद्ध निकराला येते तेव्हा होत असतो. अरेला कारे म्हटले तरच निभाव लागतो. या भूमिकेतून केशवरावांनी कर्मठ सनातनी तसेच परंपरावादी ब्राह्मणांच्या मेळ्यातून केल्या जाणाऱ्या प्रचाराविरुद्ध तोफ डागली तेव्हा असाच भडका उडाला.

एकोणीससे पंचवीस साली महात्मा फुले यांचा पुतळा बसविण्यासंबंधी केशवराव जेधे यांनी मांडलेल्या ठरावाला टिळक पक्षीयांच्या वर्चस्वाखाली नसलेल्या नगरपालिकेने विरोध केल्यामुळे उभय पक्षांतील तेढ अधिक विकोपाला गेली. या परिस्थितीचे पडसाद या वर्षांच्या गणेशोत्सवातील मेळ्यात उमटणे साहजिक होते. मवाळ तसेच जहाल समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण नेत्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांना साकडे घातले आणि विविध निर्बंध घालून मेळेवाल्यांना जखडण्याचे प्रयत्न केले. ब्राह्मणांच्या या कारवायांसंबंधी विजयी मराठाकारांनी लिहिले, "गजाननाच्या हातातल्या हरळीच्या, गवताच्या काड्या सत्यशोधक, सरकार, सुधारक, मुसलमान किंवा महात्मा गांधी यांच्या नाकात जितक्या लीलेने खुपसता येतात तितक्याच लीलेने त्या काड्यांनी ब्राह्मण गुलामगिरीचे डोळेही फोडता येतात ही गोष्ट छत्रपती मेळ्याने अगदी आरंभालाच पुण्याच्या ब्राह्मणांच्या प्रत्ययाला आणून दिली. गेले वर्षी गायकवाडवाड्यातून छत्रपती मेळ्यावर सोडलेले भाडोत्री गुंड हा पुण्यातील गणेशोत्सव नेस्तनाबूद करून टाकण्याचा पुण्याच्या ब्राह्मणांचा पहिला प्रयत्न होय. पण तो त्या वर्षी त्यांची पुण्याई कमी पडल्यामुळे की काय कोण जाणे सिद्धीस गेला

नाही. गायकवाडवाड्यातील या गुंडांच्या दंगलीत सरकारच्या अत्यंत विश्वासू पोलिस खात्यातील एका गृहस्थांच्या हातावरही चांगला प्रसाद मिळाला. " सरकारची पायधरणी करून त्यांच्या हाताने पुण्याच्या गणेशोत्सवाच्या हातापायात बेड्या घातल्याबद्दल हरकत घेऊन विजयी मराठाकारांनी बजावले, " प्रत्येक मेळ्यात ३० पेक्षा जास्त माणसे असता कामा नयेत अशा अर्थाची कलमे असून ती येथील डि. मॅ. मार्फत जाहिरनाम्याच्या द्वारे प्रसिद्ध झाली आहेत. ही कलमे लोकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर व भाषणस्वातंत्र्यावर गदा आणणारी आहेत. "

टिळकांच्या पुतळ्याची विटंबना होईल या भीतीने पोलिसांची मदत मागितली गेली. त्यामुळे लोकमान्यांच्या हयातीत जसा गणवेशातल्या पोलिसांचा त्याचप्रमाणे साध्या वेशातील गुप्तचरांचा त्यांच्याभोवती गराडा असे तसाच तो १९२५ साली त्यांच्या पुतळ्याभोवतीही पडला होता. गायकवाडवाड्याभोवती पोलिस गस्त घालीत होते. जेधे मॅन्शनच्या आसपास तर पोलिसांचा नुसता सुळसुळाट होता. छत्रपती मेळ्याच्या एकंदर २९ पदांपैकी दोनच पदे मेळ्यातील पदांची तपासणी करण्यासाठी सरकारने नेमलेल्या समितीने मंजूर केली. १९२५ सालच्या गणेशोत्सवाच्या वेळच्या कडक पोलिस बंदोबस्तामुळे गायकवाडवाड्यापुढे झालेले दंगलीचे किरकोळ प्रकार वगळता, एकंदरीने गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडला.

त्याच वर्षी केळकर गटाच्या मंडळींनी छत्रपती मेळेवाल्यांना वठणीवर आणण्यासाठी त्यांच्यामागे खटल्यांचे शुक्लकाष्ठ लावून दिले. टिळक पक्षाविरुद्ध तसेच ब्राह्मणांविरुद्ध केला जाणारा प्रचार शिगेला पोहोचला होता. रामचंद्र नारायण लाड 'मजूर' नावाचे वृत्तपत्र काढीत असत. त्यात जवळकरांच्या जळजळीत लेखणीतून आगीचा वर्षाव होत होता. ११ सप्टेंबरच्या 'मजूर'च्या अंकात 'लढाईचा पहिला दिवस' या शीर्षकाच्या लेखात ब्राह्मणांना षंढ म्हटले होते. भटाभटांचा सामना, भट ही व्यभिचारोत्पन्न जात आहे अशी विधाने केलेली होती. लिहिण्याप्रमाणेच जवळकरांचे बोलणेही बेलगाम होते. भर सभेत ब्राह्मण स्त्रियांचा निर्देश टंच किंवा टचाचलेल्या माद्या असा ते बिनदिक्कत करीत असत. त्या काळातले पुण्यातले एक नगरसेवक रामचंद्र गोविंद दंडवते यांनी मजूर पत्राचे संपादक, मुद्रक, प्रकाशक रा. ना. लाड यांच्यावर इं. पी. कोड कलम ५००, ५०४, ५०६ खाली फिर्याद दाखल केली तेव्हा लाड यांनी एकूण रागरंग ओळखून सरळ बिनशर्त माफीपत्र लिहून दिले. " कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व कै. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांची, सर्व स्त्री-पुरुष ब्राह्मण समाजाची, सनातन धर्मियांची, रामचंद्र गोविंद दण्डवते वकील, नारायणराव गुंजाळ, बाबूराव फुले तसेच पुणे म्यु. चे इतर सभासद यांची जाहीर सपशेल बिनशर्त माफी : पत्र लिहिण्यास अत्यंत दिलगिरी वाटते की मी 'मजूर' वर्तमानपत्राचे सुरुवातीपासून आजपर्यंत वरील व्यक्तींविषयी व समाजाविषयी जो अश्लील, निंदात्मक व असभ्य मजकूर छापून प्रसिद्ध केला त्याबद्दल मी अत्यंत नम्रतापूर्वक माफी मागतो व थोर अंतःकरणाने वरील गृहस्थांनी माफी दिली

आहे. आजपासून असल्या असत्य, असभ्य व निंदात्मक वाङ्मयाचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने प्रसार मी 'मजूर' पत्रामध्ये किंवा दुसऱ्या कोणत्याही पत्रामध्ये करणार नाही, अगर उत्तेजन देणार नाही." हे लेखी आश्वासन लाड यांनी दिले तरी प्रक्षोभक प्रचार करण्याचे व्रत त्यांनी सोडले नाही.

एकोणीसशे पंचवीसच्या ऑक्टोबर महिन्यात लो. टिळकांचे धाकटे चिरंजीव श्रीधरपंत यांनी छत्रपती मेळ्याच्या पद्यावलीमुळे आपल्या वडलांची बदनामी होते अशी हरकत घेऊन सिटी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांच्या न्यायालयात फिर्याद दाखल केली. छत्रपती पद्यसंग्रहातील तिसऱ्या पदात 'हा असा म्हसोबा सोट्या' असे टिळकांना उद्देशून म्हटले होते. अकराव्या पदात त्यांना फार शिवीगाळ केली होती असे श्रीधरपंतांनी न्यायालयात सांगितले. त्यांच्या बाजूने लक्ष्मणशास्त्री लेले यांची साक्ष झाली. "तात्या, अण्णा, भाऊ, बापू खिसेकापू हे जमलेले" या ओळीत तात्यासाहेब केळकर, अण्णासाहेब भोपटकर, भालाकार ऊर्फ भाऊसाहेब भोपटकर, भाऊसाहेब लवाटे आणि श्रीधर बळवंत ऊर्फ बापू टिळक यांची नावे गुंफण्यात आली होती. छत्रपती पद्यसंग्रहाचे मुद्रक लाड होते तर संग्राहक म्हणून त्यावर जवळकरांचे नाव छापलेले होते. केशवराव जेधे यांचा पुस्तकात कोठे नामनिर्देश नसल्याने त्यांना या खटल्यात गोवता आले नाही तरी पुस्तकाच्या प्रकाशनात व प्रसारात केशवरावांचा फार मोठा वाटा होता. तसेच त्यातील काही पदे त्यांनी रचली होती हे जाणत्यांना माहीत होते. "छत्रपतीपद्यसंग्रहातील पदे पास करण्याबद्दल जेधे यांच्या सहीचे दोन अर्ज आले होते व त्यासोबत पुस्तकेही होती. जी पदे आक्षेपार्ह वाटली त्यावर काट मारून ती मॅजिस्ट्रेटच्या सहीशिक्क्यानिशी परत केली आहेत. यासंबंधी अर्जाशिवाय डि. मॅ. च्या कचेरीत दुसरी कागदपत्रे नाहीत." डिस्ट्रिक्ट मॅ. चे कारकून साहेबराव यांनी न्यायालयात दिलेली ही साक्ष या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे.

जवळकरांनी हस्तलिखित प्रत दिली व मी ती धंदा या नात्याने छापली असा लाड यांचा युक्तिवाद होता तर पुस्तक ब्राह्मणवर्गाची नालस्ती होण्यासाठी प्रसिद्ध केले नसून टिळकांचे खरे चरित्र लोकांना समजावे या उद्देशाने आपण हे पुस्तक प्रसिद्ध केले असा जवळकरांचा दावा होता. वादग्रस्त अकरावे पद टिळकांच्यासंबंधी नसून पुणे नगरपालिकेसंबंधी आहे असेही त्यांनी न्यायालयात सांगितले. आरोपींच्या बाजूने कोल्हापूरचे दिवाण रावबहादूर अण्णासाहेब लठ्ठे यांची साक्ष घ्यावी असा बचाव पक्षाने आग्रह धरला. माझा खटल्याशी संबंध नाही त्यामुळे माझी साक्ष अनावश्यक आहे. मला कोल्हापुरात फार काम असल्याने फार गरज असल्यास कमिशनने साक्ष घ्यावी असे लठ्ठे यांनी मॅजिस्ट्रेटला लेखी कळविले. लोकमान्य टिळकांसंबंधी कोल्हापूर दरबारचे दफ्तरातील काही महत्त्वाची पत्रे हजर करण्यासाठी लठ्ठे यांच्या साक्षीची जरूर आहे असे आरोपीतर्फे सांगण्यात आले. परंतु डि. मॅ. ने कमिशन पाठविण्यास नकार दिला. लाड व जवळकर यांच्या बचावासाठी पाच हजार रुपयांचा मदत-निधी गोळा करण्याचे आवाहन करणारे एक पत्रक पुण्यातील

प्रमुख ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या सह्यांनिशी काढण्यात आले होते. तेही न्यायालयात सादर करण्यात आले. २३ एप्रिल १९२५ रोजी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांनी खटल्याचा निकाल दिला. छत्रपती पद्यसंग्रहातील टीका प्रामाणिक बुद्धीने केलेली नसून अत्यंत गलिच्छ स्वरूपाची व लोकमान्य टिळकांची बदनामी करणारी आहे असा निवाडा देऊन फ्लेमिंग-साहेबांनी जवळकर व लाड यांना प्रत्येकी पाचशे रुपये दंड व दंड न दिल्यास पाच महिने दंड साधी कैद अशी शिक्षा फर्मावली. आरोपींनी अपील केल्यानंतर प्रत्येकी फक्त पन्नास रुपये वसूल करण्यात आला.

एकोणीसशे पंचवीसच्या मार्च महिन्याच्या सुरुवातीस केशवराव जेधे यांनी पुणे नगरपालिकेची निवडणूक जिंकून नगरसेवक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. या वेळी पुणे नगरपालिकेत निवडून आलेले एकूण ४३ सभासद होते. त्यांत पाच जागा मुसलमानांसाठी राखीव होत्या. बाकीच्या निवडून आलेल्या ३८ सभासदांमध्ये दहा ब्राह्मण होते. एकवीस सभासद बहुजन समाजातील होते तर तीन गुजराती भाषिक, दोन मारवाडी आणि दोन दक्षिण भारतीय (मूळचे मद्रासकडचे) ब्राह्मणेतर सभासद होते. नगरपालिकेत ब्राह्मण सभासद अल्पसंख्य असले आणि ब्राह्मणेतरांचे बहुमत असले तरी नगरपालिका टिळक पक्षीयांच्या वर्चस्वाखाली होती. नारायणराव गुंजाळ, रंगोबा लडकत, किराड, बाबूराव फुले, बारणे वगैरे ब्राह्मणेतर सभासद टिळक पक्षीयांच्या पाठीशी उभे राहात. जेधे, मानुरकर, पाटोळे, वायाळ, विठ्ठलराव झेंडे, सणस वगैरे ब्राह्मणेतर पक्षाच्या सभासदांचा गट अल्पसंख्य होता. नगरपालिकेचे अध्यक्ष लक्ष्मणराव आपटे हे प्रख्यात वकील नेमस्त विचारसरणीचे होते अशा परिस्थितीत केशवराव जेधे यांनी मांडलेला कोणताही ठराव बहुमताच्या अभावी फेटाळला जाणार होता हे उघड होते आणि केशवरावांनाही ते माहीत होते. तरीही केशवरावांनी नाना प्रकारचे ठराव मांडून त्यांच्यावर चर्चा घडवून आणण्याचा धडाका लावला.

नगरपालिकेच्या खर्चाने चालणारे सार्वजनिक हौद व नळ स्पृश्यास्पृश्य वगैरे भेदाभेद न ठेवता सर्वांना मोकळे ठेवावेत या केशवरावांनी मांडलेल्या ठरावावर ३१ जुलै १९२५ रोजी भरलेल्या नगरपालिकेच्या सभेत चर्चा झाली. लवाटे, चंद्रचूड, दामले, गोखले, डॉ. फाटक वगैरे ब्राह्मण सभासदांनी ठरावाला कसून विरोध केला. खुद्द अध्यक्ष आपटे म्हणाले, " या ठरावाने पुण्यात बखेडा व गोंधळ माजेल. या ठरावाने आमच्या डोक्यावर मोठे खापर फुटणार आहे. आमची बायकामाणसे या गोष्टीला तयार नाहीत. हा ठराव सर्व सभासदांनी नापास करावा अशी माझी सूचना आहे. " त्यांच्या या आवाहनाला केशवरावांनी जोरदार हरकत घेतली तेव्हा त्यांचा व अध्यक्षांचा खटका उडाला. मतदान घेण्यात आले आणि बारा विरुद्ध पंधरा मतांनी केशवरावांचा ठराव फेटाळला गेला.

एकोणीसशे पंचवीसच्या जुलै महिन्यात केशवरावांनी महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा बीस हजार रुपये खर्च करून नगरपालिकेने पुणे शहरात सार्वजनिक ठिकाणी

बसवावा असा ठराव नऊ सभासदांच्या सह्यांनिशी नगरपालिकेकडे पाठवला होता. या आधी बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २२ जुलै १९२४ रोजी रे मार्केटजवळ लो. टिळक यांच्या पुतळ्याचे अनावरण पं. मोतीलाल नेहरू यांनी केले होते तर त्याच वर्षी त्याच ठिकाणी सप्टेंबर महिन्याच्या आरंभी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पुतळ्याचे अनावरण महात्मा गांधींच्या हस्ते करण्यात आले होते. त्या वर्षी पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर होते आणि त्यांच्यामागे निर्विवाद बहुमत असल्याने चिपळूणकर–टिळक यांचे पुतळे राज्यकर्त्यांच्या नापसंतीची पर्वा न करता नगरपालिकेला बसवता आले होते. टिळकांचा पुतळा मुंबईचे शिल्पकार वाघ यांनी तयार केला होता. पण पुतळ्याचा खर्च नगरपालिकेच्या निधीतून देण्याबद्दल न्यायालयाने मनाई हुकूम बजाविल्याने केसरी-मराठा संस्थेने पुतळ्याच्या खर्चाकरिता दहा हजार रुपये देऊ केले होते. मात्र टिळकांच्या पुतळ्याकरिता नगरपालिकेने काही खर्च करू नये हा सरकारचा दावा अखेर न्यायालयाने फेटाळल्यामुळे नगरपालिकेला पुतळ्यासाठी खर्च करता आला. चिपळूणकर व टिळक यांचे पुतळे उभारण्याचा हा निर्णय ब्राह्मणेतर पक्षातील मंडळींना मुळीच आवडला नव्हता. महात्मा फुले यांच्या कर्मभूमीत त्यांचा पुतळा नसावा ही गोष्ट त्यांना बोचत होती म्हणून केशवरावांनी हा प्रश्न धसाला लावण्याचे ठरविले.

महात्मा फुले यांचा पुतळा बसविण्यास टिळक पक्षातील ब्राह्मणांचा तसेच ब्राह्मणेतरांचाही प्रखर विरोध होता. भालाकार भोपटकरांनी केशवरावांच्या ठरावावर केलेले भाष्य मासलेवाईक होते. "पुण्यातील नागरिकांची कोणती सेवा कै. जोतीरावांनी केली की त्यामुळे त्यांचे सार्वजनिक स्मारक करून त्यांनी त्यांचे उतराई व्हावे ? ... कै. जोतीराव हे 'पब्लिक' म्हणजे सार्वजनिक गृहस्थ नसून 'सेक्शनल' म्हणजे विशिष्ट पंथीय होते. श्री. जेधे यांनी आपला ठराव मुकाट्याने मागे घ्यावा अशी त्यांना आमची मित्रत्वाची सूचना आहे ... जोतीरावांचा पुतळा बसविण्यास अगदी योग्य स्थळ म्हणजे पुणे शहर नसून कोल्हापूर होय." महात्मा फुले यांचा पुतळा उभारणे काही ब्राह्मणेतर नगरसेवकांनाही मान्य नव्हते. ब्राह्मणांशी युती करून ते आपला ठराव हाणून पाडणार याची केशवराव आणि त्यांच्या मित्रांना पुरती कल्पना होती. केशवरावांचे ज्येष्ठ मित्र विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे यांनी ब्राह्मणेतर नगरसेवकांच्या विरोधाविषयी १३ जुलै १९२५ च्या अंकात लिहिले, "आम्हाला नुकतीच अशी गुणगुण कळली आहे की, पुणे म्युनिसिपालिटीतील काही ब्राह्मणेतरच या पवित्र कार्याचे विरुद्ध जाऊ पाहात आहेत .... याविरुद्ध जाऊ पाहणारांत कोणाचा विरोध केवळ व्यक्तिविषयक आहे तर कोणाच्या विरोधाच्या मुळाशी व्यक्तिविषयक स्वार्थ आहे असे म्हणतात. यांपैकी व्यक्तिविषयक विरोधाची बाब मिटणे अवघड नाही. श्री. जेधे यांच्याऐवजी ही पवित्र कामगिरी आपण पार पाडावी अशी जर कोणाची इच्छा असेल आणि हेच कोणाच्या विरोधाचे कारण असेल तर श्री. केशवराव त्यांच्या इच्छेच्या आड येतील असे आम्हास वाटत नाही." बयाने जेमतेम तिशीचे असलेले आणि पहिल्यांदाच नगरसेवक म्हणून निवडून

आलेले तरणेबांड केशवराव महात्मा फुले यांचे स्मारक उभारण्याच्या बाबतीत पुढाकार घेत आहेत हे त्यांच्याच ब्राह्मणेतर पक्षातील काही बुजुर्गांना पसंत नव्हते, तर काहींना या सत्कार्यासाठी केशवराव आणि जवळकर, लाड वगैरे मित्रांनी ज्या तऱ्हेने प्रचार चालवला होता ती तऱ्हा आवडत नव्हती. लाडांच्या 'मजूर' पत्रातून जवळकर बेगुमानपणे हल्ला चढवत होते. टिळकांचे निष्ठावंत अनुयायी गणपतराव नलावडे यांनी 'संग्राम' पत्र काढून शिवराळ भाषेत 'मजूर' पत्रातील लेखांना उत्तरे देण्याचे कार्य चालविले होते. गोखले, न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ, ह. मो. जोशी वगैरे 'संग्राम' पत्रात लिहीत तर 'मजूर' पत्रात जवळकरांप्रमाणेच बापट नावाचे ब्राह्मण गृहस्थही लिहीत असत.

एकोणीसशे पंचवीसच्या जुलै महिन्यातच अखेरच्या आठवड्यात 'देशाचे दुष्मन' पुस्तकाची जाहिरात केशवराव जेधे यांच्या नावानिशी 'विजयी मराठा' पत्रात झळकली. पुस्तकाचे लेखक होते दिनकरराव जवळकर. प्रकाशक केशवराव जेधे आणि मुद्रक होते रामचंद्र नारायण लाड. केशव गणेश बागडे या वकिलांनी प्रस्तावना लिहिली होती. 'बिचारे टिळक जिवंत नाहीत' असे शीर्षक देऊन केशवरावांनी प्रकाशक म्हणून केलेले निवेदनही बागडे यांच्या प्रस्तावनेसह पुस्तकात छापले होते.

'देशाचे दुष्मन' पुस्तकाची भाषा जळजळीत आहे, त्यातील शब्द धारदार आहेत आणि त्यामुळे ब्राह्मण समाज तसेच टिळकपक्षीय मंडळींचा भडका उडणार हे जेधे-जवळकर ओळखून होते. 'देशाचे दुष्मन' पुस्तकाचे प्रकाशक केशवराव होते एवढेच नव्हे तर जवळकर जसजसे लिहीत तसतसा मजकूर केशवरावांना व इतर मित्रांना ते वाचून दाखवीत. केशवरावांनी त्यावर पसंतीची टाळी दिली की, मगच तो पुस्तकात समाविष्ट केला जात असे. या बैठकींना हजर असलेले दिनकरराव माने त्याबद्दलच्या आठवणी सांगताना लिहितात, "त्या वेळी जवळकर गवंडी वाड्यात राहावयास आले. त्यामुळे तेथे आमच्या सगळ्या तरुण मित्रांचा चांगलाच संच जमत असे ... या वेळी रामबाण उपाय म्हणून जवळकरांनी 'देशाचे दुष्मन' हे एक छोटेखानी पुस्तक लिहिले. गवंडी वाड्यात जमायचे. जवळकरांनी सिगरेट शिलगावयाची आणि केशवराव मान डोलावतील तशी ती मुक्ताफळे लेखांकित करावयाची ! अधूनमधून चहा, भजी व भेळ! कसे मजेदार लेखन चालावयाचे. पुस्तक प्रसिद्ध झाले आणि कोणते मथळे ओरडावयाचे याची विक्रेगाऱ्या पोरांना केशवरावांनी संथा दिली....होईल ती विक्री हॉटेलखाती खर्च. पण मूर्ती लहान आणि कीर्ती मोठी. अशी या पुस्तकाची कहाणी झाली."

या वेळी ब्राह्मणेतर चळवळीचे दुसरे एक फर्डे लेखक केशव सीताराम ठाकरे यांचे वास्तव्य पुण्यात होते. जवळकरांची शब्दकळाही ठाकऱ्यांच्या शब्दकळेसारखी तिखटजाळ आणि वाचताना प्रतिपक्षीयांना ठसका लागावा अशी होती. 'कोदंडाचा टणत्कार' वगैरे पुस्तके लिहून नाव कमावलेले केशवराव ठाकरे तेव्हा त्यांचे 'प्रबोधन' साप्ताहिक पुण्यात चालवीत असत. 'ब्रह्मवांत्युत्पन्न' टिळक-चिपळूणकर असा जवळकरांनी

केलेला उल्लेख ठाकऱ्यांची आठवण करून देणारा होता. कारण ब्रह्ममुखोत्पन्नऐवजी ब्रह्मवांत्युत्पन्न हा शब्द म्हणजे प्रबोधनकारांनी मराठी भाषेत टाकलेली नवी भर होती. प्रबोधनकारांप्रमाणेच जवळकरांनीही कोकणस्थ पेशव्यांच्यावर तुफान हल्ला चढवताना कायस्थ प्रभूंची तरफदारी केली होती. ठाकऱ्यांच्याप्रमाणेच जवळकरांनाही राम गणेश गडकऱ्यांच्या भरजरी भाषेने भुरळ घातली होती. 'देशाचे दुष्मन' पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर त्यावर दिनकर शंकर जवळकरांचे लेखक म्हणून नाव असले तरी ते प्रबोधनकार ठाकरे यांनीच लिहिले आहे अशी भालाकार भोपटकर वगैरे टिळक पक्षीयांची समजूत होती. त्यामुळे खुद्द प्रबोधनकारांनी 'ज्ञानप्रकाश'मध्ये पत्र लिहून 'तो मी नव्हे' अशा आशयाचा खुलासा केला होता.

'देशाचे दुष्मन' हा 'मशिनगनी' ग्रंथ लिहिल्याबद्दल आणि त्यातील जोरदार व तर्कशुद्ध विवेचन तसेच उत्तम भाषा याबद्दल प्रबोधनकार ठाकरे यांनी जवळकरांची पाठ थोपटली तर विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे यांनी जेधे-जवळकर यांना धन्यवाद दिले. दीनमित्रकर्ते मुकुंदराव पाटील यांनी मात्र जवळकरांच्या शिवराळ टीकेबद्दल नेहमीच नापसंती व्यक्त केली. जागृतिकर्ते पाळेकर यांनाही टीकेची ही रीत रुचण्यासारखी नव्हती. सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष या नात्याने भास्करराव जाधव यांनीही जेधे, जवळकर, लाड वगैरेंची प्रचाराची पद्धत आपल्याला आवडत नसल्याचे टाइम्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधीला मुलाखत देऊन सांगितले होते. जेधे, जवळकर, लाड हे तरुण नेते ब्राह्मणेतर चळवळीतील अतिरेकी जहाल प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करीत आहेत असे या चळवळीतील काही वडिलधाऱ्या मंडळींना वाटत होते.

चिपळूणकर-टिळक यांच्यावर जवळकर ज्या तऱ्हेने चिखलफेक करीत होते त्याच तऱ्हेने महात्मा फुले यांच्यावरही याच काळात विरोधकांकडून चिखलफेक होत होती. 'सत्यशोधक का ख्रिस्तसेवक' या शीर्षकाची गणपतराव नलावडे यांनी प्रसिद्ध केलेली एक पुस्तिका पुणे नगरपालिकेच्या सभासदांना वाटण्यात आली होती. विश्वनाथ महादेव फुले या नावाच्या जोतीरावांच्या चुलतभावाच्या नातवाने या पुस्तिकेस प्रस्तावना लिहिली होती. जोतीराव हे धर्मद्रोही होते असे सांगून विश्वनाथराव फुले यांनी प्रास्ताविकात म्हटले होते, "असा स्वधर्म व स्वकुल बाटगा पुरुष आपल्या वंशात होऊन गेला हे सांगणेदेखील मोठे लाजिरवाणे आहे." भाऊबंदांनी भरीला घातल्यामुळे आपण असे लिहिले असे सांगून काही महिन्यांनी विश्वनाथरावांनी माळी समाजाच्या सभेत जाहीर माफी मागितली खरी, पण जोतीरावांच्या विरुद्ध त्यांच्याच कुटुंबियांचा वापर करण्याचा टिळक पक्षीयांचा डाव काही काळ का होईना यशस्वी झाला होता. जोतीरावांच्या चुलतभावाचे दुसरे एक नातू बाबूराव फुले हे टिळक पक्षाचे होते आणि पुणे नगरपालिकेचे ते या काळात सभासदही होते.

'सत्यशोधक का ख्रिस्तसेवक' या पुस्तिकेच्या लेखकाने पुरावे न देता ऐकीव

माहितीवर विसंबून जोतीरावांवर खोटेनाटे आरोप केले होते. "जोतीबांनी प्रत्यक्ष धर्मांतर केले होते की नाही याचा पुरावा अद्याप मिळालेला नाही. तथापि तो लवकरच मिळेल. पण ते खिस्त्यांनी हिंदू धर्माविरुद्ध सोडलेले एक पगारी प्रचारक होते ही गोष्ट त्यांच्या अस्तित्वाइतकीच सत्य होती. तेव्हा अशा स्वधर्मशत्रूचे स्मारक म्युनिसिपालिटीने उभे करणे म्हणजे हिंदू धर्माच्या मुडद्यावर येशू खिस्ताचा सांगाडा उभे करणे होय... जोतीबांनी धर्मांतरदेखील केले होते असे पाद्रीसाहेबांनी तोंडी बोलून दाखविले. परंतु पुरावा मात्र अद्याप मिळवता आला नाही. सत्यशोधक समाजाच्या पुण्याईने व येशूच्या आशीर्वादाने तो मिळवून लवकरच उजेडात आणीन असा भरवसा आहे." जोतीबांनी आपल्या घरी वाढविलेले अनाथ मूल हे त्यांच्यापासून एका विधवेला झालेले मूल होते असल्या बेछूट आरोपांनी जोतीरावांची बदनामी करण्याचा निंद्य प्रयत्न असल्या पुस्तिका काढून टिळक पक्षीयांनी राजरोस चालवला होता. "सत्यशोधक समाज या नावाखाली जे लोक एकत्र जमत असत ते सारे एकजात कुटाळ, धर्मद्रोही, दुराचारी होते असे अनुमान काढल्यास बावगे होणार नाही." अशी 'सत्यशोधक की खिस्तसेवक' पुस्तिकेच्या कर्त्याची समजूत होती.

जोतीराव फुले तसेच चिपळूणकर-टिळक या आपापल्या आराध्य दैवतांच्या अभिमानाने उभय पक्ष हिरिरीने धुळवड खेळत असल्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या वातावरणात केशवराव जेधे यांनी मांडलेल्या महात्मा फुले यांच्या पुतळ्यासंबंधीच्या ठरावावर ४ सप्टेंबर १९२५ रोजी पुणे नगरपालिकेच्या खास सभेत चर्चा झाली. याच सभेत केशवरावांनी पाठविलेले इतर बारा ठरावही मांडले गेले. त्यांपैकी एका ठरावात मस्तानीचा पुतळा उभारावा अशी केशवरावांनी सूचना केली होती. प्रत्येक नगरसेवकास प्रेक्षकांसाठी म्हणून तीनच तिकिटे देण्यात आली होती. त्यामुळे सभागृहात प्रेक्षकांची संख्या मर्यादित असली तरी सभागृहाबाहेर मोठा जमाव होता. केसरीने ८ सप्टेंबर १९२५ च्या अंकात या सभेचा वृत्तांत दिला आहे. "प्रथम 'जोतीबांच्या चरित्राची माहिती देणारी पुस्तिका सभासदांस वाटली होती काय?' असा बायाळ यांनी अध्यक्षांना (लक्ष्मणराव आपटे) प्रश्न केल्यावरून अध्यक्षांनी होय असे उत्तर दिले. 'तत्पूर्वी प्रसिद्ध झालेले 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक सभासदांच्या माहितीसाठी का दिले नाही?' असा मानुरकरांनी प्रश्न विचारताच अध्यक्ष म्हणाले, "ते पुस्तक वाटण्याच्या लायकीचे नाही. ते मी वाटले असते तर १५३ कलमाखाली माझे हातून गुन्हा घडला असता असे मला वाटल्यावरून मी ते वाटले नाही." ठराव मांडताना केशवरावांनी केलेल्या भाषणावरून त्यांची व अध्यक्षांची बाचाबाची झाली. विजयी मराठाकार लिहितात, "म्युनिसिपालिटीने दोन 'भटांचे' पुतळे उभे केले असे म्हणताच देहभान विसरलेल्या अध्यक्षांचा पारा कमालीचा चढला आणि 'भट' हा शब्द परत घेण्याबाबत त्यांनी जेधे यांस सांगितले. टिळक व चिपळूणकर हे भट (ब्राह्मण) जातीत जन्मले नसून इंग्रज, जर्मन, जपानी इत्यादी कुलांत जन्मले असे जर अध्यक्षांस वाटत असेल तर त्यांनी तसे जाहीर करावे. भट्ट या शब्दावर येणे-

प्रमाणे निष्कारण रण माजल्यावर श्री. जेधे यांनी आपल्या ठरावावर भाषण करताना सांगितले की, जोतीरावांनी विधवा स्त्रियांच्या बाळंतपणाची सोय केली. विधवा बाया पोटची मुले टाकतात याला आधार काय म्हणून अध्यक्षांनी केशवरावांना प्रश्न विचारला. अध्यक्ष व श्री. जेधे यांची सभेत बरीच खडाजंगी जुंपली. अखेर हे शब्द परत घेणार नाही म्हणून जेधे यांनी अध्यक्षांना बजावले. त्यांनी अध्यक्षांच्या अरेरावी वर्तनाचा तोंडावर निषेध करून ताबडतोब सभागृह सोडले. त्याबरोबर मेसर्स वायाळ, झेंडे व सणस या सभासदांनीही तोच मार्ग स्वीकारला.

केशवराव आणि त्यांचे तीन मित्र यांनी सभात्याग केला तरी मानुरकर तसेच सरकार-नियुक्त सभासद नुरुद्दीन काझी व सुभेदार घाडगे यांनी सभागृहातील चर्चेत केशवरावांच्या ठरावाला पाठिंबा देऊन त्यांची बाजू उचलून धरण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला. चार मते अनुकूल व बाकीची विरुद्ध पडून केशवरावांचा ठराव प्रचंड बहुमताने फेटाळला गेला. महात्मा फुले यांचा पुतळा उभारण्यास विरोध करणाऱ्या नगरसेवकांमध्ये जहाल, मवाळ तसेच गांधीवादी अशा सर्व गटांचे ब्राह्मण होते. बहुसंख्य नगरसेवकांनीही केशवरावांच्या ठरावाला कडाडून विरोध केला. "टिळकांचे ब्राह्मणेतरांवर फार प्रेम होते. त्यांच्या पासंगालासुद्धा जोतीबा उरणार नाहीत." असा रंगोबा लडकत यांनी निर्वाळा दिला तर, "असला धर्मद्रोही माणूस फुल्यांच्या घरात जन्मला म्हणून आम्हाला लाज वाटते" असे बाबूराव फुले म्हणाले. "टिळकांच्या पुतळ्याचा ठराव ब्राह्मणेतरांच्याच बहुमताने मंजूर झाला व आजचा ठराव त्यांच्याच बहुमताने नापास होणार आहे यामुळे ब्राह्मणांना दोष देण्यास जागा राहणार नाही." अशा शब्दात लक्ष्मणराव गोखल्यांनी समाधान व्यक्त केले; तर समारोपादाखल अध्यक्ष लक्ष्मणराव आपटे म्हणाले, "जेधे यांचे बाग ठराव कोणाही सभ्य माणसास वाचवणार नाहीत इतके अश्लील आहेत. पण मी ब्राह्मण म्हणून मजवर उगाच दोषारोप नको एवढ्यासाठीच मी ते आपल्यासमोर मांडले. त्यांपैकी बरेच नियमबाह्य व बेकायदा आहेत. या ठरावात निव्वळ वाद वाढविण्याचाच हेतू दिसतो." केशवरावांचा मुख्य ठराव फेटाळला गेलाच. त्याबरोबर इतर ठरावही बेकायदा ठरवण्यात आले. एवढेच नव्हे तर जातिजातीत द्वेष पसरविणाऱ्या व अश्लील वर्तनाबद्दल केशवरावांविरुद्ध बारणे यांनी मांडलेला निंदाव्यंजक ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आणि मगच नगरपालिकेचे काम संपले.

या वादळी सभेनंतर उभयपक्षांनी जाहीर सभा घेऊन परस्परांवर तोंडसुख घेण्याचा उद्योग चालू ठेवला. त्यामुळे पुण्यातील वातावरण अधिकच तापले. नऊ सप्टेंबर एकोणीसशे पंचवीसच्या अंकात टाइम्स ऑफ इंडिया या सरकारधार्जिण्या इंग्रजी दैनिकाने पुण्यातील वादाची दखल घेतली. मजूर पत्राचे चालक व त्यांचे साथीदार म्हणजे लाड, जवळकर व जेधे हे अश्लील भाषेत बेजबाबदार लेखन करीत आहेत अशी टीका करून या मंडळींना सुरक्षित जागी (म्हणजे तुरुंगात ?) नेऊन ठेवणे इष्ट आहे असे टाइम्सने सूचित केले होते. सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष भास्करराव जाधव यांना असला प्रचार

मान्य आहे का असा सवाल टाइम्सच्या प्रतिनिधीने भास्करराबांची मुलाखत घेऊन विचारला. जोतीराव फुले यांचा पुतळा उभारावा यासाठी, " एका विशिष्ट कंपूने जी ब्रह्मद्वेषमूलक चळवळ केली त्या चळवळीशी आपला व सत्यशोधक समाजाचा काहीएक संबंध नाही " असे भास्करराबांनी सांगितल्याचे टाइम्सचे म्हणणे होते. याउलट केशवराव जेधे यांच्याविषयी लोकांत गैरसमज पसरू नये म्हणून जाधवरावांनी टाइम्सला पाठवलेला खुलासा जसा त्या पत्राने प्रसिद्ध केला नाही तसेच केशवराव जेधे यांनी टीकेला दिलेले उत्तरही प्रसिद्ध करण्याचे सौजन्य टाइम्सने दाखविले नाही अशी विजयी मराठाकरांनी २१ सप्टेंबर १९२५ च्या अंकात तक्रार केली.

१७ सप्टेंबर १९२५ रोजी केशवराव जेधे यांचा निषेध करण्यासाठी व नगरपालिकेचे अध्यक्ष लक्ष्मणराव आपटे यांचे अभिनंदन करण्यासाठी पुण्यातील हिंदू नागरिकांची एक जाहीर सभा शिवाजी मंदिरात भरली. सभेचे अध्यक्ष काशीनाथ ठकूजी जाधव म्हणाले, " जोतीबा फुल्यांपेक्षाही येथे समाजसेवा करणारे कै. भोर वकील, भाऊसाहेब रंगारी व माळी समाजातील बळवंतराव सातव यांसारखे जोतीबांपेक्षा हजारो पटींनी श्रेष्ठ असे पुढारी होऊन गेले— हिरे व गारगोटी इतका फरक टिळक व फुले यांत आहे. " जेधे यांचा ठराव फेटाळणाऱ्यांचे अभिनंदन करण्याचा ठराव बोत्रे पाटील यांनी मांडला तर जेधे यांच्याविरुद्ध नगरपालिकेने एकमताने पास केलेला निंदाव्यंजक ठराव या सभेसही पूर्णपणे संमत आहे हा ठराव न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी मांडला. आक्षेपार्ह लेखनाचा ठराव मांडणारे वामनराव पोतदार म्हणाले, " 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक म्हणजे शिव्यांचे नरककुंड आहे. मोल्सवर्थच्या कोशातील सर्व अश्लील व गलिच्छ शब्द यात आले आहेत. "

जाहीर सभेत हे ठराव मंजूर करून घेऊन टिळक-पक्षीय स्वस्थ बसले नाहीत. जेधे, जवळकर, बागडे, लाड यांच्यावर खटले भरून त्यांना न्यायालयात खेचण्यात आले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या पुतण्याने-श्री. कृष्ण महादेव चिपळूणकर वकील यांनी— देशाचे दुष्मन पुस्तकाने चिपळूणकर घराण्याची बदनामी होते या आरोपावरून सिटी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांच्या न्यायालयात फिर्याद केली. याच पुस्तकाने लोकमान्य टिळकांचीही बदनामी केली जात आहे अशी फिर्याद श्रीधर बळवंत टिळक यांनीही फ्लेमिंग यांच्यासमोर केली. पण कृष्णराव चिपळूणकर यांची तक्रार आधीच दाखल करून घेतली असल्याने श्रीधरपंतांची फिर्याद दाखल करून घेण्याचे फ्लेमिंग यांनी नाकारले. १४ ऑक्टोबर १९२५ रोजी कृष्ण महादेव चिपळूणकर यांनी गुदरलेल्या फिर्यादीची सुनावणी सुरू झाली तेव्हा जेधे, जवळकर व लाड न्यायालयात हजर होते. बागडे वेळेवर हजर राहिले नाहीत म्हणून मॅजिस्ट्रेटने पकड वॉरंट काढले, पण तेवढ्यात बागडे न्यायालयात हजर झाल्याने पकड वॉरंट रद्द करण्यात आले. देशाचे दुष्मन पुस्तकाबद्दलचा खटला सिटी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांच्यासमोर न चालविता दुसरीकडे तो वर्ग करावा असा आरोपींनी उच्च न्यायालयाकडे अर्ज केला होता. पण उच्च न्यायालयाने तो नामंजूर केला. कृष्ण

महादेव चिपळूणकर वकील यांनी केलेल्या खटल्यात त्यांच्याखेरीज विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे सख्खे पुतणे डॉ. त्र्यंबक लक्ष्मण चिपळूणकर तसेच लक्ष्मणशास्त्री लेले व वा. गो. आपटे यांच्या साक्षीही झाल्या. फिर्यादी पक्षातर्फे भास्करराव जाधव यांचीही साक्ष काढण्यात आली होती. "देशाचे दुष्मन हे पुस्तक मी वाचले नाही. सर्व आरोपी सत्यशोधक समाजाचे सभासद आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. देशाचे दुष्मन हे पुस्तक अगर दुसरे कोणतेही पुस्तक प्रचारासाठी प्रसिद्ध करण्याला सत्यशोधक समाजाने परवानगी दिलेली नाही." असे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष या नात्याने भास्करराव जाधव यांनी न्यायालयात सांगितले.

'देशाचे दुष्मन' पुस्तकावरील खटल्याची सुनावणी चालू असताना १९ ऑगस्ट १९२६ रोजी दिवसाढवळ्या घडलेल्या एका प्रकारामुळे पुण्यातील वातावरण तंग बनले. सरदार बावडेकरांची मुलगी द्वारकाबाई शाळेतून घरी परतत असताना हरी नारायण धनवडे नावाच्या मराठा तरुणाने मेहुणपुऱ्याच्या बोळाच्या तोंडाशी तिच्यावर हल्ला केला. धनवडे याने तिची मानगूट धरून तिला ढकलून खाली पाडले व तिचा गळा धरला. मुलगी बेशुद्ध पडली. आरडाओरड ऐकताच नारायण विष्णू सहस्रबुद्धे, फडणीस, भोईटे वगैरे तरुण तिच्या मदतीला धावले. धनवडेला त्यांनी पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतरही तो शिताफीने निसटून एका घरात लपून बसला. तेव्हा व्यायामपटू सदुभाऊ गोडबोले यांनी त्या घरात घुसून त्याला अक्षरशः उचलून रस्त्यावर आणले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. या प्रकाराचा संबंध सत्यशोधकांनी व ब्राह्मणेतर पक्षातील तरुणांनी चालवलेल्या प्रचार-मोहिमेशी जोडला गेला.

धनवडे याच्या माथेफिरू कृत्यामुळे सर्व सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचीच बदनामी होण्याचा प्रसंग आला होता. एखाद्या अतिरेकी कृत्याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतात हे सामाजिक चळवळीच्या इतिहासात अनेकदा दिसते. त्यातही वादाच्या रण-धुमाळीत प्रचाराची पातळी घसरत गेली की अत्याचाराचे बळी होतात त्या स्त्रिया! "एकट्या ब्राह्मणकुमारी विरुद्ध सर्व ब्राह्मणेतर पुणे असे या अत्याचाराला अविचाराचे, अन्यायाचे व गैरमुत्सद्दीपणाचे स्वरूप आणू देऊ नये." असे कळकळीचे आवाहन देवराव नाईक या ब्राह्मण कार्यकर्त्याने केले. कोल्हापूरच्या 'हंटर' पत्राचे संपादक खंडेराव बागल यांनी धनवडे प्रकरणाविषयी लिहिले, "स्त्री-जात मग ती कोणाचीही असो, तिजवर पुरुषाने मग तो कोणत्याही जातीचा असो, असा हात टाकणे हा केवळ अधम-पणा आहे आणि या कृत्याचा निषेध करण्याचे कामी कोणत्याही ब्राह्मणी पत्राला आम्ही हार जाणार नाही. वाईट ते वाईटच. पण केसरीकारांनी वड्याचे तेल वांग्यावर घालून सत्यशोधकी चळवळीशी याचा संबंध नेऊन पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. ब्राह्मणेतरांत काही पाजी लोक असतील. पण तो व्यक्तीचा दोष आहे. साऱ्या समाजावर तो आरोप कसा घालावयाचा?"

द्वारकाबाई बावडेकरवर हात टाकणाऱ्या हरी नारायण धनवडेविरुद्ध ताबडतोब खटले

भरण्यात आले होते. त्यांपैकी एक शिवीगाळ केल्याच्या व धमकी दिल्याच्या आरोपावरून गोखले वकिलांनी भरला होता. ३१ ऑगस्टला खटल्याचा निकाल लागून प्रत्येक आरोपाबद्दल पंधरा रुपये दंड ठोठावण्यात आला आणि धनवडेकडून जातमुचलका व जामीन मागण्यात आला. द्वारकाबाई बावडेकरवर हात टाकल्याबद्दलच्या खटल्याचा निकाल ३ सप्टेंबरला सिटी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांनी दिला. 'मी या मुलीला धरलीच नाही, ब्राह्मणांनीच मला मारले' हे धनवडेचे म्हणणे अग्राह्य ठरवून फ्लेमिंगसाहेबांनी त्याला नऊ महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली. फटके मारण्याची शिक्षा देता येत नाही म्हणून निरुपाय झाला नाही तर तीही शिक्षा दिली असती असे मॅजिस्ट्रेटसाहेबांनी उद्गार काढले.

धनवडे खटल्याचा ताबडतोब निकाल देणाऱ्या फ्लेमिंगसाहेबांनीच १५ सप्टेंबर १९२६ रोजी 'देशाचे दुष्मन' खटल्याचाही निकाल दिला. पुस्तकाचे लेखक दिनकरराव जवळकर व मुद्रक रामचंद्र नारायण लाड यांना प्रत्येकी एक वर्ष साधी कैद व अडीचशे रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने कैद अशी शिक्षा सांगण्यात आली. इं. पी. को.च्या पाचशेव्या कलमान्वये जवळकर व लाड यांना दोषी ठरविण्यात आले; बागडे यांच्या प्रस्तावनेतील तसेच जेधे यांच्या निवेदनातील शब्द बदनामीकारक नसले तरी दोघांनीही जवळकरांस गुन्हा करण्यास मदत केली म्हणून मॅजिस्ट्रेटसाहेबांनी जेधे व बागडे यांना दोषी ठरविले. पुस्तकातील एकूण बत्तीस उतारे बदनामीकारक आहेत असे फिर्यादी पक्षाचे म्हणणे होते. त्यांपैकी फक्त नऊ उताऱ्यांमुळे विष्णुशास्त्री चिपळूणकरांची बदनामी होते असे फ्लेमिंगसाहेबांनी मान्य केले. 'नीच कोटीतले', 'बदअवलादीच्या', 'ब्रह्मवांत्युत्पन्न', 'गिधाडे', 'ब्रह्मलाळोत्पन्न', 'गाढवाचा पोर', 'कुत्रा', 'जंत' वगैरे शब्दांमुळे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची बदनामी होते असा मॅजिस्ट्रेटसाहेबांनी निष्कर्ष काढला. फिर्यादी कृष्ण महादेव चिपळूणकर व साक्षीदार त्र्यंबक लक्ष्मण चिपळूणकर हे विष्णुशास्त्री यांचे निकटचे नातेवाईक असल्याने आरोपींनी केलेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या बदनामीमुळे त्यांच्या भावना दुखावल्या जाणे स्वाभाविक आहे असेही फ्लेमिंगसाहेबांचे मत होते.

'देशाचे दुष्मन' खटल्याचा फ्लेमिंगसाहेबांनी दिलेला निकाल आणि त्याआधी जानेवारी १९२६ मध्ये बाबूराव फुले यांच्याविरुद्ध महात्मा फुले यांच्या चुलतभावाच्या नातवाने भरलेल्या बदनामीच्या खटल्यात दिलेला निकाल यात विसंगती वाटण्यासारखी परिस्थिती होती. "जोतीबा खिस्ती झाला होता व तो गुंड, पुंड व मुखंड होता" या बाबूराव फुले यांच्या उद्गारामुळे महात्मा फुले यांची बदनामी होते असा दावा करण्यात आला होता. या खटल्याचा निकाल देताना बाबूराव फुले यांनी केलेली विधाने बदनामीकारक नाहीत; आरोपीच्या भाषणात मत्सर अगर द्वेषबुद्धी नाही; त्यामुळे टीकेच्या योग्य मर्यादांचे उल्लंघन झाले आहे असे आपल्याला वाटत नाही असा अभिप्राय देऊन फ्लेमिंग यांनी बाबूराव फुले यांना दोषमुक्त ठरवले होते. बाबूराव फुले यांच्यावर फिर्याद करणारे गजाननराव फुले

हे जोतीराव फुले यांच्या चुलतभावाचे नातू असल्याने त्यांना निकटचे नातेवाईक म्हणता येणार नाही असेही फ्लेमिंगसाहेबांनी मत दिले होते. मात्र 'देशाचे दुष्मन' खटल्यातील फिर्यादी कृष्ण महादेव चिपळूणकर हे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चुलतभावाचे नातू होते तरीदेखील त्यांना विष्णुशास्त्रींचे 'निकटचे नातेवाईक' म्हणण्यास मॅजिस्ट्रेट-साहेबांची तयारी होती. दोन्ही निकालपत्रांतील ही विसंगती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या निष्णात कायदेपंडिताने नेमकी हेरली. जेधे, जवळकर यांना झालेल्या शिक्षेविरुद्ध सेशन्स कोर्टात अपील करण्यात आले. ते बाबासाहेब आंबेडकरांनी चालवले. त्याआधी १८ सप्टेंबरला केशवराव जेधे, बागडे यांना जामिनावर सोडण्यात आले. मात्र जवळकरांना जामीन नाकारण्यात आला. १५ सप्टेंबरला फ्लेमिंगसाहेबांनी निकाल दिल्यापासून ते २८ सप्टेंबरला जामिनावर सुटका होईपर्यंत केशवराव जेधे व बागडे जवळकरांबरोबर येरवडा तुरुंगात होते. केशवरावांची राहणी साधी होती व ते निर्व्यसनीही होते. जवळकर मात्र व्यसनी होते. चहा, सिगरेट, दारूशिवाय त्यांचे चालत नसे. तुरुंगात त्यांनी या प्रिय गोष्टींशिवाय दिवस काढले खरे! बंदीवास संपल्यानंतरच्या काळात ते त्यांच्या आहारी गेले.

१८ ऑक्टोबर १९२६ रोजी पुण्याचे सेशन्स जज्ज जे. डी. लॉरेन्स यांनी 'देशाचे दुष्मन' खटल्यातील अपिलाचा निकाल दिला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची बदनामी झाली म्हणून अब्रूनुकसानीचा दावा करणारे कृष्ण महादेव चिपळूणकर यांना विष्णुशास्त्रींचे निकटचे नातेवाईक म्हणता येत नाही असे लॉरेन्ससाहेबांनी मत दिले. एक तर फिर्यादीचे आजोबा त्र्यंबकराव व विष्णुशास्त्रींचे वडील कृष्णशास्त्री हे एकत्र कुटुंबात न राहता वेगळे राहात. फिर्यादीचा जन्म विष्णुशास्त्री वारल्यानंतर झालेला आणि त्याला विष्णुशास्त्रींबद्दल फारशी माहिती नाही, या वस्तुस्थितीकडेही न्यायमूर्तीं लॉरेन्स यांनी लक्ष वेधलेले आहे. फिर्यादीला विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे निकटचे नातेवाईक का म्हणता येणार नाही यासाठी बचावपक्षाच्या वकिलांनी अन्य न्यायालयीन निर्णयांचा दिलेला हवाला लॉरेन्ससाहेबांनी स्वीकारला. फ्लेमिंगसाहेबांनी आक्षेपार्ह ठरवलेल्या नऊ उताऱ्यांपैकी फक्त एक उतारा वगळता अन्य उतारे आपल्याला आक्षेपार्ह वाटत नाहीत असेही न्यायमूर्ती लॉरेन्स यांनी मत दिले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची बदनामी करण्याचा किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या भावना दुखावण्याच्या हेतूने पुस्तक लिहिले गेलेले नाही असे मत देऊन हे पुस्तक म्हणजे सर्वसामान्यतः ब्राह्मण्याविरुद्ध केलेला हल्ला आहे असा त्यांनी निर्वाळा दिला. पुस्तकातील भाषा सदभिरुचीची द्योतक नाही तसेच लेखकाची टीका खोडसाळपणाची वाटते असाही न्यायमूर्तींचा अभिप्राय होता. पुस्तकाचे लेखन प्रस्तावनाकार बागडे व प्रकाशक म्हणून निवेदन करणारे केशवराव जेधे यांच्या मदतीशिवाय झालेले होते आणि प्रस्तावना किंवा प्रकाशकाच्या निवेदनाशिवाय ते प्रसिद्ध करता आले असते असे लॉरेन्ससाहेबांचे मत झाले. या कारणामुळे त्यांनी सर्व आरोपींना दोषमुक्त ठरविले आणि त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेली दंडाची रक्कम परत

करण्याचा हुकूम दिला.

लॉरेन्ससाहेबांनी दिलेला हा निकाल केसरीकर्त्यांना अर्थातच रुचला नाही. "असली निंद्य व बाष्कळ टवाळी करण्याचा हेतू चिपळूणकरांच्या आत्म्यांची मने दुखविण्याचा नव्हता आणि त्यांची भाषा बेअब्रूकारक नाही असा अभिप्राय प्रकट करणाऱ्या सेशन्स जजांच्या मनोरचनेची आम्हास तरी कल्पना करवत नाही...भाषा गलिच्छ आहे. पुस्तकाचा एकंदर रोख ब्राह्मण समाजाला उपमर्दकारक आहे. याविषयी जजसाहेबांना शंका नाही. परंतु भाषा बदनामी करणारी नाही असे साहेबबहादूर म्हणतात." ब्राह्मणांच्या तसेच टिळक पक्षाच्या वृत्तपत्रांनी लॉरेन्ससाहेबांच्या निकालाबद्दलची नाराजी व्यक्त केली तर ब्राह्मणेतर पक्षाच्या पाठीराख्या वृत्तपत्रांनी जेधे–जवळकर–बागडे दोषमुक्त ठरल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

'देशाचे दुष्मन' खटल्यातील अपील चालवताना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेल्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे, वादकौशल्यामुळे ब्राह्मणेतर पक्षाचे नेते प्रभावित झाले होते. १९४८ साली डॉ. आंबेडकरांच्या छप्पन्नाव्या वाढदिवसानिमित्त पुण्यात अहिल्याश्रमात भरलेल्या जाहीर सभेत शंकरराव मोरे यांनी आठवण सांगितली. "'देशाचे दुष्मन' खटल्यातील वकीलपत्र घेण्यास मुंबईचे कोणीही वकील तयार नव्हते. सत्यशोधक हे आधुनिक काळातील राक्षस आहेत असेही त्यांनी उद्‌गार काढले. परंतु डॉ. आंबेडकरांनी मात्र ही केस हाती घेऊन आपल्या बुद्धिमत्तेची व वक्तृत्वाची चमक दाखविली." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या काळात मुंबई विधानमंडळात प्रश्न विचारूनही पाठपुरावा केला. न्यायदानाचा व अधिकाराचा असा धडधडीत दुरुपयोग केल्याबद्दल सरकारने फ्लेमिंगसाहेबांविरुद्ध कोणती पावले उचलली, निदान त्यांच्याकडून त्याबद्दल खुलासा मागवला का असे प्रश्न डॉ. आंबेडकरांनी विचारले होते.

'देशाचे दुष्मन' खटल्यातून जेधे, बागडे व जवळकर दोषमुक्त ठरले तरी जवळकरांना दुसऱ्या एका खटल्यात १५३ अ कलमाखाली सहा महिने सक्तमजुरी व पाचशे रुपये दंड आणि दंड न दिल्यास आणखी दोन महिने तुरुंगवास अशी शिक्षा झाल्यामुळे १२ नोव्हेंबरला पुन्हा येरवडा तुरुंगात परतावे लागले. 'जाहीर सवाल नंबर १', 'मर्द हो! नाके कापून घ्या' आणि '१९५० सालची ब्राह्मण परिषद' या तीन पुस्तिका प्रसिद्ध करून बादशहाच्या प्रजाजनांमध्ये द्वेष पसरविण्याच्या आरोपावरून डे. पोलिस सुपरिंटेंडेंट बापट यांनी भरलेल्या खटल्याची सुनावणी ३१ ऑगस्ट १९२६ ला असिस्टंट कलेक्टर स्लेडन यांच्यासमोर प्रथम सुरू झाली होती. 'जाहीर सवाल नंबर १' या पुस्तिकेत शूद्रकमलाकर या ग्रंथात निरनिराळ्या ब्राह्मण जाती कशा निर्माण झाल्या यासंबंधी दिलेल्या उपपत्तीवर तुफान हल्ला चढवला होता.

"मर्द हो! नाके कापून घ्या" या सोळा पानी पुस्तिकेच्या चित्रातील भटाचा चेहरामोहरा तात्यासाहेब केळकरांशी मिळताजुळता वाटावा असा होता. त्यांच्या प्रतिसहकार पक्षाची 'पतिसरकार' म्हणून टवाळी केली होती. "म. गांधींना शिव्या दिल्याच

पाहिजेत," "टिळकांचे राजकारणाचा अभिमान धरलाच पाहिजे. पण मी सांगेन तेच टिळकांचे राजकारण समजले पाहिजे" वगैरे नियम घालून देणाऱ्या नेत्याचा सरळसरळ नामनिर्देश केलेला नसला तरी या पुस्तिकेचा रोख विशेषतः तात्यासाहेब केळकरांविरुद्ध होता, हे समकालीन वाचकाला सहज ओळखता येत होते. '१९५० सालची ब्राह्मण परिषद' या पुस्तिकेत १९५० साली ब्राह्मण परिषद भरली तर कोणते ठराव मंजूर होतील याबद्दल जवळकरांनी उपहासाने लिहिले होते. ब्राह्मणांची आणि विशेषतः ब्राह्मण स्त्रियांची टर उडवण्याचा जवळकरांचा उद्देश होता हे उघड होते. या पुस्तिकेमुळे जवळकर कायद्याच्या कचाट्यात सापडले. मात्र शिक्षेविरुद्ध त्यांनी अपील केले तेव्हा जानेवारी १९२७ च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत त्यांनी भोगलेली शिक्षा पुरेशी आहे असे वाटून न्यायमूर्तींनी फक्त दंडाची रक्कम तेवढी कायम ठेवून त्यांना सोडून देण्याचा हुकूम दिला. "आता ब्राह्मण ब्राह्मणेतरांत तेढ राहिली नाही" असे शिक्षा कमी करण्याचे कारण सांगण्यात आले.

महात्मा फुले पुतळ्यासंबंधीचा वाद आणि 'देशाचे दुष्मन' वरील खटला यामुळे केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर हे ब्राह्मणेतर पक्षाचे पुण्यातील कार्यकर्ते उरले नव्हते तर ब्राह्मणेतर पक्षाच्या नेमस्त, सरकारधार्जिण्या नेतृत्वाला आव्हान देऊन ब्राह्मणेतर चळवळीला लढाऊ वळण देण्याचा प्रयत्न करणारे जहाल नेते बनले होते. ब्राह्मणेतर पक्षात या दोन तरुणांची युती प्रभावी ठरू लागली होती. याचा पडताळा पक्षातील वृद्ध, अनुभवी नेत्यांना येऊ लागला आणि जेधे-जवळकरांची जोडी फोडण्यासाठी प्रयत्न होऊ लागले.

एकोणीसशे सत्तावीसच्या जानेवारी महिन्यात जवळकर तुरुंगातून सुटल्यानंतर सत्यशोधक समाजास नवे चैतन्य मिळवून देण्यासाठी भास्करराव‌ांनी जेधे-जवळकर जोडीचा उपयोग करून घेतला. फेब्रुवारी १९२७ पासून ब्राह्मणेतर वृत्तपत्रात भास्करराव‌ांच्या नावे सत्यशोधक समाज-पत्रिका झळकू लागल्या. १९२७ साली महात्मा फुले यांच्या जन्मशताब्दीच्या सोहळा साजरा होणार होता. एप्रिल महिन्यात जाधव-जेधे-जवळकर या तिघांनी सातारा जिल्ह्याचा संयुक्त दौरा केला. "जवळकरांची भाषा, जेध्यांचा पोक्तपणा आणि भास्करराव‌ांचे ज्ञान, अनुभव आणि महत्त्व यांचा संगम फलद्रूप झाल्याविना राहणार नाही." हे कोल्हापूरच्या हंटरकर्त्यांनी दौऱ्यापूर्वी केलेले भाकित खरे ठरले. या दौऱ्यामुळे सातारा जिल्ह्यात पंधरा हजारावर लोकांनी सत्यशोधक समाजाचे सभासद म्हणून नावे नोंदवली. तेहेतीस गावी समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. ऑगस्ट महिन्यात तर रीतसर नावे नोंदवल्या गेलेल्या शाखांची संख्या सत्तर झाली आणि सप्टेंबरपासून 'सत्यशोधक समाज' या नावाचे मासिक सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. त्याआधी मे महिन्यात ऐन उन्हाळ्यात केशवराव‌ांनी जवळकर‌ांबरोबर वऱ्हाड व मध्यप्रांताचा दौरा केला. या दौऱ्यात भास्करराव जाधव आपल्याबरोबर का नाहीत याचा खुलासा जवळकरांनी वर्ध्याच्या जाहीर सभेत केला. "सर्वांनी मिळून दौरा करणे कामाच्या दृष्टीने सोईचे न

वाटल्याने विभागणी करून आम्ही दोघे या भागाला आलो.'' सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष हा जेधे-जवळकरांच्या भाषणाचा विषय असे. आधी केशवराव बोलत. त्यांचे बोलणे साधे, मनापासूनचे असे. वक्तृत्वगुणापेक्षा त्यांच्या भाषणातील कळकळ श्रोत्यांना प्रभावित करीत असे. जवळकर मात्र फड गाजविणारे वक्ते! अंगकाठी किरकोळ, रंगरूप सुमार. मात्र भाषेचा ओघ तसाच दिमाख, कल्पनांची आतषबाजी, बोचरा विनोद, कोटीबाज आक्रमक शैली यामुळे जवळकर सर्वसामान्य श्रोत्यालाही तासन् तास खिळवून ठेवीत असत.

जाधव, जेधे, जवळकर या त्रयीने सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीच्या प्रचारासाठी चालविलेल्या प्रयत्नांमुळे ब्राह्मणेतर पक्षातील सत्यशोधकांची मतप्रणाली मान्य नसलेली मंडळी अस्वस्थ झाली. २८ ऑगस्ट १९२७ रोजी मुंबईत ब्राह्मणेतर परिषदेचे खास अधिवेशन भरले होते. तो मुहूर्त साधून संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी 'जेधे-जवळकर' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाला लिहिलेल्या पन्नास पानांच्या प्रस्तावनेत टिळकभक्त अच्युतरावांनी जेधे-जवळकरांसारख्या टिळकांच्या टीकाकारांची मनापासून पाठ थोपटली. जवळकरांचा व अच्युतरावांचा स्नेह फार वर्षांपासूनचा! जवळकरांमुळे अच्युतराव केशवरावांना ओळखू लागले. ब्राह्मणेतर वर्गास वरचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी चाललेल्या चळवळीतील 'अग्रगण्य ब्राह्मणेतर वीर' अशा शब्दात अच्युतरावांनी जेधे-जवळकरांचा गौरव केला. अच्युतरावांच्या विस्तृत प्रस्तावनेइतकीच पुस्तकात छापलेली जवळकरांची कैफियतही चटकदार असल्याने वर्षभरात या पुस्तकाच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या. या पुस्तकाची लोकप्रियता लक्षात घेऊन खंडेराव गणपतराव कालेकर या ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकर्त्याने 'सत्यशोधकांचा वेद अथवा जेधे-जवळकरांस उत्तर' या नावाची पुस्तिका प्रसिद्ध केली. सीताराम केशव बोले या ब्राह्मणेतर पक्षाच्या नेत्याने कालेकरांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली होती.

सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष यांची गल्लत करणाऱ्यांना कालेकरांनी दोहोमधला फरक समजावून दिला. ''सत्यशोधक चळवळ सुरू असता ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उत्पन्न होण्याचे कारण निराळे आहे. सत्यशोधक चळवळ जशी धार्मिक आहे तशी ब्राह्मणेतर चळवळ नाही. जे लोक सत्यशोधक नाहीत त्यांना ब्राह्मणेतर चळवळीत भाग घेता येतो. सत्यशोधक चळवळीत ब्राह्मण चालतो, पण ब्राह्मणेतर चळवळीला त्या मार्गात बंधने आहेत. सत्यशोधक समाजावर ब्रह्मद्वेषाचा आरोप काहीजण करतात; पण ब्राह्मणेतर चळवळ तेढ कमी करणारी आहे. ब्राह्मणेतर मार्ग हा सलोख्याचा मार्ग आहे. हा व्यवहाराचा मार्ग; त्यात भावनांचा प्रश्न नाही ..ब्राह्मणेतर आणि सत्यशोधक चळवळ ही एकच असा काही लोकांनी ग्रह करून घेतलेला दिसतो. पण या दोन्ही चळवळी निसर्गतः एकमेकीच्या विरुद्ध आहेत. एक लढाईचे शिंग फुंकणार तर दुसरी समेटाची भाषा बोलणार. सत्यशोधक भिक्षुकशाही नको असे म्हणतात. ब्राह्मणेतर सर्वांच्या बाटण्या सारख्याच आणि न्याय्य व्हाव्यात असे म्हणतात. सत्यशोधक समाजात

अहिंदूंचा प्रवेश दुष्कर. ब्राह्मणेतर चळवळीत अहिंदू चालतात. ब्राह्मणेतर चळवळ ही राजकीय चळवळ आहे. आज असे आढळते की सर्व सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीत आहेत...ब्राह्मणेतर चळवळ ही समतादर्शक चळवळ आहे. ती हातात हात घालून काम करू इच्छिते. हिंदू समाजाची वर्णव्यवस्था बदलण्याचा, सुधारण्याचा किंवा नष्ट करण्याचा तिचा उद्देश नाही.'' जेधे-जवळकर यांच्यासारख्या तरुण नेत्यांना मात्र सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष या दोहोंमध्ये फरक करण्याची गरज वाटत नव्हती. १९२० सालच्या डिसेंबर महिन्यात जेधे मॅन्शनमध्ये जन्माला आलेली ब्राह्मणेतर लीग म्हणजे सत्यशोधक चळवळीला फुटलेला नवा धुमारा होता अशी जेधे-जवळकरांची धारणा होती. म्हणून हे दोघे सत्यशोधक समाजाचा विस्तार करण्यासाठी भास्कररावांना साथ देत होते.

मात्र इंग्रज राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ राहून त्यांच्या कृपाप्रसादाच्या व आशीर्वादाच्या बळावर कायदे मंडळाचे सभासदत्व तसेच मंत्रिपद मिळवायचे आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने चालविलेल्या स्वातंत्र्यलढ्यास विरोध करायचा हे भास्करराव जाधवांचे सरकारधार्जिणे धोरण जेधे-जवळकरांना १९२६-२७ साली रुचेनासे झाले होते. खरे म्हणजे सरकारची तळी उचलण्याचे काम ब्राह्मणेतर पक्ष स्थापन होण्याआधीपासून भास्कररावांनी इमाने इतबारे कितीतरी वर्षे चालविले होते. इंग्रज राज्यकर्त्यांनी १९२२ साली भास्कररावांना मुंबईच्या कायदेमंडळातील सर कासवजी जहागीर यांच्या मोकळ्या झालेल्या जागेवर सरकारतर्फे सभासद म्हणून नेमून त्यांच्या राजनिष्ठेचे चीज केले. त्यानंतर १९२३ व १९२६ च्या निवडणुकीत भास्करराव ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले. इंग्रज राज्यकर्त्यांशी असलेले आपले घनिष्ठ संबंध भास्कररावांनी कधी लपवले नाहीत. १९२६ च्या आरंभी मद्रास ब्राह्मणेतर परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सर लेस्ली विल्सन यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. जेधे-जवळकरांनी महात्मा फुले यांचा पुतळा उभारण्याच्या वादात भडक प्रचार केल्यामुळे इंग्रज सरकारच्या सहानुभूतीस आपण पारखे होत आहोत असे भास्कररावांचे प्रामाणिक मत होते. सातारचे तरुण सत्यशोधक नेते भाऊराव पायगोंडा पाटील यांनाही भास्कररावांचे सरकारधार्जिणे धोरण पसंत नव्हते. इंग्रज सरकारच्या बळचणीस उभे राहून त्यांच्या सल्ल्याने व आश्रयाने ब्राह्मणेतर चळवळ चालवली तर तिच्यात आणि मवाळ पक्षात फार फरक राहणार नाही असे ब्राह्मणेतर चळवळीतील जहालांना वाटत होते.

श्रीपतराव शिंदे यांच्या 'विजयी मराठा'मागे जेधे मॅन्शनचे पाठबळ होते. या पत्राच्या ३ ऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकात 'ध्येय व धोरण' स्पष्ट करताना म्हटले होते. ''ब्राह्मणेतर पक्ष किंवा सत्यशोधक समाज म्हणजे मवाळपक्ष अगर प्रार्थना समाज होऊ देणे 'विजयी मराठा'ला इष्ट वाटत नाही...ब्रिटिश सत्ता जेथे साहाय्यभूत होईल तेथे तिचे साहाय्य घेणे आणि जेथे ती आमच्या आकांक्षांना आड जाईल तेथे तिला जोराने विरोध करणे हे 'विजयी मराठा'चे राजकीय क्षेत्रातील धोरण आहे.'' ४ डिसेंबर रोजी महात्मा गांधींना ब्राह्मणेतरांतर्फे जेधे मॅन्शनमध्ये जाहीर पानसुपारी करण्यात आली. त्या वेळी

स्वागतपर पद्य केशवराव जेधे यांनी म्हटले. रामराव शिंदे वकील यांनी इंग्रजीत व श्रीपतराव शिंदे यांनी मराठीत भाषण करून ब्राह्मणेतर पक्षाच्या धोरणाविषयी माहिती दिली. उत्तरादाखल भाषण करताना ब्राह्मणेतरांनी आत्मबलावर आपली उन्नती करून घ्यावी असा गांधीजींनी सल्ला दिला. परक्या राज्यकर्त्यांवर ब्राह्मणेतरांनी अवलंबून राहू नये असा त्या उपदेशाचा अर्थ होता हे केशवरावांसारख्या तरुणांना समजल्याशिवाय राहिले नाही. १९२४ च्या अखेरीस केसरीत लेख लिहून बालचंद कोठारी यांनी ब्राह्मणेतर पक्षाने राष्ट्रीय सभेपासून दूर न राहता तिच्यात येऊन मिसळावे असे आवाहन केले होते. दीनमित्रकारांनी कोठारींच्या सूचनेवर भाष्य करताना म्हटले, "काँग्रेसमध्ये जाऊन इतर पक्षांच्या सहकारितेने काम करणारा ब्राह्मणेतर पक्ष स्थापन करता येईल पण तो स्थापन करण्याचा काळ आज तरी महाराष्ट्रात आलेला नाही. ज्या वेळी ब्राह्मणेतर पक्ष मद्रासप्रमाणे महाराष्ट्रात निवडणुकीत यशस्वी होईल त्या वेळी तो काँग्रेसमध्ये स्वतंत्र अस्तित्व दाखविण्यास समर्थ झाला असे म्हणता येईल." गांधीयुगात काँग्रेसच्या अखिल भारतीय पातळीवरील पक्षसंघटनेत ब्राह्मणांचा वरचष्मा कमी झालेला असला तर महाराष्ट्रातील काँग्रेसवर टिळकपक्षीय ब्राह्मणांचेच वर्चस्व होते.

आठ जुलै १९२६ रोजी जेधे मॅन्शनमध्ये अखिल भारतीय ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा पानगलच्या राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. ब्राह्मणेतर पक्षाचा जो सभासद असेल त्याने दुसऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाचा सभासद असता कामा नये असा ठराव या सभेत मंजूर करण्यात आला. ब्राह्मणेतर पक्षाचा सभासद अन्य राजकीय पक्षाचा सभासद असल्याचे आढळून आल्यास त्यास दुसऱ्या पक्षाच्या सभासदत्वाचा राजीनामा देण्यास सांगावे आणि त्याने तसे न केल्यास ब्राह्मणेतर पक्षातूनही त्याची हकालपट्टी करावी असेही ठरविण्यात आले. ब्राह्मणेतर पक्ष हा केवळ हिंदूपुरता मर्यादित न ठेवता त्या पक्षाचे ध्येय, नियम व कार्यपद्धती मान्य असेल अशा ब्राह्मण जात वगळून इतर कोणत्याही जातीच्या, पंथाच्या अगर धर्माच्या हिंदी माणसास पक्षाचे दरवाजे खुले करावेत असेही ठरवण्यात आले. या ठरावामुळे ब्राह्मणेतर पक्षात राहूनही काँग्रेसचे लिबरल फेडरेशनचे किंवा मुस्लिम लिगचे सभासदत्व आधी घेतलेल्या लोकांना दोन्ही डगरींवर हात ठेवण्याऐवजी कोणत्यातरी एका संघटनेचे सभासदत्व निवडावे लागणार होते. गांधीजी व काँग्रेस यांच्याकडे ओढा असलेल्या जहाल तरुणांपुढेही पेच निर्माण झाला होता. बिगरहिंदूंना ब्राह्मणेतर पक्षात सामावून घेण्याचे धोरणही काहीजणांना योग्य वाटत नव्हते.

दामोदर सावळाराम यंदे यांच्यासारखी मंडळी ब्राह्मणेतर हिंदू काँग्रेस अशा नव्या नावाचा आग्रह धरीत होती तर केशवराव बागडे वगैरेंचा गट 'हिंदू' नाव घालण्याची आवश्यकता नाही असे म्हणत होता. ब्राह्मणेतर पक्षाच्या स्थापनेपासून या पक्षात मराठा, जैन, लिंगायत समाजाच्या कार्यकर्त्यांनी तसेच शिंपी, भंडारी वगैरे जातींच्या मंडळींनीही काम केले होते. सातारा जिल्ह्यात धनजीशहा कूपर यांच्यासारखे पारशी धनिकही

ब्राह्मणेतर पक्षाच्या पाठीशी उभे होते. ब्राह्मण वगळून बाकी सर्वांना पक्षात प्रवेश देण्याचे पानगलचे राजेसाहेब व भास्करराव जाधव यांचे धोरण बॅ. डोंगरे, सयाजीराव सिलम, पुप्पाला ह्या मुंबईच्या कार्यकर्त्यांना मान्य नव्हते. ब्राह्मणेतर नावाऐवजी 'रयत पक्ष' असे एखादे नाव ध्यावे, ब्राह्मणेतरांत अहिंदूंचा समावेश नसावा, तसेच पक्षाचा काँग्रेसशी विरोध नसावा असे सिलम, पुप्पाला वगैरे मुंबईच्या कामाठीपुऱ्यातील कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. कोल्हापूरच्या 'हंटर' पत्राच्या संपादकांनी (खंडेराव बागल) यासंबंधीच्या चर्चेत बजावले, "राष्ट्रीय सभा ही आमची माता आहे. तिच्यात अद्याप अनेक दोष आहेत. परंतु तिजकडे पाठ फिरवून ब्राह्मणेतर पक्षाला यश येणे शक्य नाही. काँग्रेसच्या विचारांची दिशा उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे बदलत चालली आहे. आज सर्व पक्षाला एकत्र आणण्यास खादीसारखे दुसरे साधन नाही. साऱ्या ब्राह्मणेतर लोकांनी शुद्ध खादीच वापरावी. ब्राह्मणेतरांनी नोकरीची आशा टाकली पाहिजे. सरकारच्या कच्छपी जाणारा पक्ष केव्हाही लोकप्रिय होणार नाही." जेधे, जवळकर, भाऊराव पाटील वगैरे तरुण नेत्यांची भूमिका हंटरकर्त्यांच्या या विचारांशी मिळतीजुळती बनू लागली होती.

एकोणीसशे सत्तावीसच्या जुलै महिन्यात मद्रासच्या ब्राह्मणेतर पक्षाने कोईमतूर येथे खास अधिवेशन भरवून आपल्या सदस्यांपैकी ज्यांना काँग्रेसचे सभासद व्हावयाचे असेल त्यांना तसे करण्याची परवानगी दिली. मद्रासच्या ब्राह्मणेतर पक्षाने स्वीकारलेल्या या धोरणाची दखल घेऊन पुढील विचारासाठी जेधे-जवळकरांनी जेधे मॅन्शनमध्ये २४-७-१९२७ रोजी सायंकाळी सर्व ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची खास सभा बोलाविली. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्षात भास्करराव जाधव यांच्या गटाचे बहुमत असल्याने मद्रासप्रमाणे काँग्रेसपक्षात जाण्यास पक्षाने परवानगी दिली नाही. या खास सभेमुळे जहाल तरुणांचा कल कोणीकडे आहे हे स्पष्ट झाले होते.

"स्वतःच्या पोळीवर मंत्रिपद, पदव्या व नोकऱ्या यांचे तूप ओढून घेण्यासाठी हपापलेल्या" व त्यासाठी इंग्रजांची खुशामत करणाऱ्या ब्राह्मणेतर पक्षातील जुन्या जाणत्या पुढाऱ्यांबरोबर पक्षातील जहाल तरुणांचे मतभेद कसे व का वाढत गेले हे केशवराव जेध्यांनी १९५० साली शेतकरी-कामगार पक्षाच्या दाभाडी अधिवेशनात केलेल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले आहे. "दुसऱ्या फळीत बहुतेक लोक नव्या जाग्रत झालेल्या तरुण ब्राह्मणेतरांपैकी होते...बहुजन समाजाला राजसत्ता घ्यावयाची होती...व त्यासाठी परकीय साम्राज्यशाहीविरुद्ध लढणे अपरिहार्य होते...ब्राह्मणेतर पक्षातील आपल्या पुढाऱ्यांची मतलबी शिकवणूक पसंत पडेना. खरी सत्ता हाती घ्यावयाची असेल तर लढा इंग्रजांविरुद्ध केला पाहिजे असे ते उघडपणे म्हणू लागले. इंग्रजांविरुद्ध लढा म्हणजे लाठीमार, गोळीबार, दीर्घकाल तुरुंगवास व कदाचित प्राणत्याग या सर्वांना तोंड देण्याची तयारी असली पाहिजे. ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढारीपणाला ही सुळावरची पोळी नको होती. साहेबांचे हस्तक बनून मिळेल त्या तुकड्यावर समाधान मानण्यास

ते तयार होते..." १९०५ च्या सुमारास कॉंग्रेसमध्ये मवाळ पुढारी व जहाल अनुयायी यांच्यात जसा झगडा सुरू झाला तसाच झगडा १९२५ ते १९२९ पर्यंत व त्यानंतरही ब्राह्मणेतर पक्षात चालू झाला.

पक्षांतर्गत लढतीबरोबरच महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, सायमन कमिशनची नेमणूक अशा अनेक महत्त्वाच्या घडामोडींमुळे १९२७ साल गाजले. या वर्षात जेधे व जवळकर एकजुटीने काम करीत होते. १९ व २० मार्च १९२७ रोजी महाडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद' भरली. बाबासाहेबांचे समारोपाचे भाषण झाल्यानंतर आभारप्रदर्शनाच्या वेळी दुजोरा देताना बाबासाहेबांचे सहकारी अनंत विनायक चित्रे यांनी अध्यक्षांसह सर्वांनी महाड येथील चवदार तळ्याचे पाणी प्यावे आणि सार्वजनिक विहिरीतील किंवा तलावातील पाणी वापरण्याचा सर्वांना असलेला अधिकार प्रस्थापित करावा अशी सूचना केली. परिषदेची सांगता होत असताना अचानक मांडल्या गेलेल्या या कल्पनेमुळे परिषदेत सहभागी झालेले सवर्णांचे प्रतिनिधी चकित झाले. तरी २० मार्च रोजी सकाळी सुरबा टिपणिसांच्या घरी भरलेल्या बैठकीत डॉ. आंबेडकर व त्यांचे निकटचे सहकारी गंगाधरपंत सहस्रबुद्धे, शिवतरकर, टिपणीस आणि स्वतः अनंतराव चित्रे यांनी विचारविनिमय करून ही कृती करण्याचे ठरविले होते हे त्या वेळी फारच थोड्यांना माहीत होते. सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये वगैरे ठिकाणांचा अस्पृश्य मानल्या गेलेल्यांनाही मुक्तपणे वापर करता यावा हा ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सीताराम केशव बोले यांनी ४ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात मांडलेला ठराव रीतसर मंजूर झाला होता. महाडच्या नगरपालिकेने बोले यांच्या ठरावाची पूर्ती ५ जानेवारी १९२४ ला केली असली तरी चवदार तळ्याचे पाणी पिऊन कायद्याने दिलेल्या हक्काची अंमलबजावणी १९२७ पर्यंत दलितांनी केली नव्हती. या कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या नगरपालिका, लोकल बोर्ड वगैरे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनुदान बंद करावे असा ठराव मांडून सीताराम केशव बोले यांनी आधीच्या कायद्याचा पाठपुरावा केला होता. बोले यांच्या नव्या ठरावालाही मान्यता देऊन मुंबईच्या कायदेमंडळाने आधीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले होते. मात्र कायद्याने दिलेला हक्क बजावून चवदार तळ्याचे पाणी चाखून परतलेल्या दलितांवर सवर्णांनी हल्ला चढवला आणि त्यांना बेदम मारहाण केली. २१ मार्च रोजी महाडच्या ब्रह्मवृंदाने एक हजार कलश पाणी काढून त्यात पंचगव्य मिसळून वेदमंत्रांच्या घोषात चवदार तळे शुद्ध करून घेतले. यानंतर ३ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केल. महाड नगरपालिकेने पूर्वीचा ठराव रद्द करून चवदार तळे दलितांना वापरता येणार नाही असे ठरवल्यावर त्याविरुद्ध सत्याग्रह करणे अटळ झाले.

महाडला सत्याग्रह पुकारा असे आवाहन करणारे पत्र जेधे-जवळकर यांनी वृत्तपत्रात प्रसिद्ध केले. "...अस्पृश्यांच्या बरोबर येण्यास आम्ही तयार आहोत. आणि आमच्य

सर्व ब्राह्मणेतरबंधूंना अस्पृश्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याकरता त्यांचेबरोबर येण्यास विनंती करीत आहोत. सार्वजनिक विहिरी, हौद, पाणवठे व देवळे या निकडीच्या प्रश्नाचा कायमचा निकाल लावून घ्यावा अशी आम्ही सर्व अस्पृश्य पुढाऱ्यांना विनंती करीत आहोत." जेधे व जवळकर यांनी आणखी एक पत्रक प्रसिद्ध करून महाडचा सत्याग्रह कसा करावा याबद्दल काही सूचनाही केल्या होत्या. "(१) सत्याग्रहाला पूर्ण अनत्याचारी स्वरूप असावे. (२) सत्याग्रह यशस्वी होण्याकरता त्यात कसलाही ब्राह्मण समाविष्ट करून घेऊ नये. (३) एकदोन माणसे न पाठवता एकदम हजार-पाचशे माणसांनी मंगलवाद्ये वाजवीत हिंदूधर्माची पताका घेऊन तळ्यावर जाऊन पाणी प्यावे. (४) देवळे, विहिरी, पाणवठे यांत शिरून आपले हक्क बजावण्याची मोहीम सुरू करण्याकरता महाडलाच तेवढ्याकरिता खास परिषद बोलवावी आणि त्याच दिवशी तळ्यावर जावे. अस्पृश्यांबरोबर येऊन हिंदू धर्माची अब्रू राखण्याकरिता शेकडो ब्राह्मणेतर तरुणांची तयारी आहे. अस्पृश्य पुढाऱ्यांनी बिलकूल विलंब न करता याबाबतीत निश्चित धोरण प्रसिद्ध करावे आणि ब्राह्मणेतरांनी अस्पृश्यतेचा कलंक काढून टाकण्यास मदत करावी."

महाड–सत्याग्रहाची कल्पना डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत भारताच्या दुसऱ्याच अंकातील अग्रलेखात मांडली होती. जेधे–जवळकरांनी ही कल्पना त्यांच्या वऱ्हाड दौऱ्यानंतर उचलून धरली असे बाबासाहेबांचे मत होते. महाड सत्याग्रहाबाबत जेधे–जवळकरांची योजना बाबासाहेबांना बव्हंशी मान्य असली तरी योजनेच्या दुसऱ्या कलमाला त्यांचा विरोध होता. ... "ब्राह्मण लोक आमचे वैरी नसून ब्राह्मण्यग्रस्त लोक आमचे वैरी आहेत असे आम्ही जाहीर समजतो...." ब्राह्मण तेवढा हरामखोर अशी भूमिका न घेता ब्राह्मण आणि ब्राह्मण्य यांतील फरक ओळखण्याचा सूक्ष्म विवेक बाबासाहेबांनी नेहमी दाखवला तसा जेधे किंवा जवळकरांनी नेहमीच दाखवला नव्हता. महाडच्या सत्याग्रहात कोणाही ब्राह्मणास भाग घेऊ देऊ नये हे जेधे–जवळकरांचे म्हणणे डॉ. आंबेडकरांप्रमाणेच वऱ्हाडातील ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्ते वामनराव घोरपडे तसेच वर्ध्याच्या 'ब्राह्मणेतर' पक्षाचे संपादक यांनाही मान्य नव्हते.

बहिष्कृत हितकारिणी सभेच्या विद्यमाने २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडला सत्याग्रह सुरू होणार अशी घोषणा करण्यात आली होती. ब्राह्मणेतर पक्षाचे प्रमुख नेते भास्करराव जाधव हे मूळचे महाडचे! त्यांनी १२ डिसेंबर १९२७ रोजी पत्रक काढून पाठिंबा देण्यापलीकडे महाड सत्याग्रहाबाबत दुसरी हालचाल केल्याचे आढळत नाही. जेधे–जवळकर मात्र महाड सत्याग्रहात भाग घेण्यासाठी महाडला निघाले. २६ डिसेंबरला म्हणजे महाड परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सकाळची बैठक संपणार तेवढ्यात सभामंडपात दाखल झालेल्या जेधे–जवळकरांनी डॉ. आंबेडकरांच्या विनंतीनुसार भाषणे केली. आदले दिवशी परिषदेसाठी जमलेल्या लोकांनी भाला, संग्राम ही वृत्तपत्रे आणि मनुस्मृती हा ग्रंथ जाळल्याबद्दल केशवरावांनी त्यांचे अभिनंदन केले.

हजारो सत्याग्रहींनी सत्याग्रह करण्याची तयारी दर्शविली असूनही डॉ. आंबेडकरांनी जिल्ह्याधिकाऱ्याने परिषदेच्या ठिकाणी येऊन स्पष्ट केलेल्या सरकारी धोरणामुळे सत्याग्रहाचा बेत तहकूब केला. न्यायालयात केलेल्या फिर्यादीचा निकाल लागेपर्यंत सत्याग्रह थांबवणे इष्ट आहे अशा आशयाचे भाषण करून जवळकरांनीही कलेक्टरच्या उपदेशास पाठिंबा दिला. महाड सत्याग्रह स्थगित करण्याची बाबासाहेबांची चाल विजयी मराठाकर्त्यांना पसंत पडली नसावी. जेधे व जवळकर तुरुंगात जाण्याची तयारी करून महाडला गेले होते असे सांगून विजयी मराठ्याने म्हटले होते, "या वेळी पुढारी लोकांनी कच खाल्ली नसती तर दोन-तीन हजार लोक सत्याग्रह करून तुरुंगात जाण्यास सज्ज झाले असते .... सत्याग्रही वीरांच्या बाजूला ब्राह्मणेतर पक्षीय अखिल मराठा समाज उभा होता." विजयी मराठाकारांचे हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नव्हते. अखिल मराठा समाज महाड सत्याग्रहाच्या बाजूने नव्हता. महाडकर मराठा पुढारीही आपण तटस्थ राहणार अशा घोषणा करीत होते. जेधे-जवळकरांप्रमाणे सत्याग्रहाला सक्रिय पाठिंबा देण्यास फारच थोडे ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्ते तयार होते. महाडला मनुस्मृती जाळली गेली हा प्रकार भास्करराव जाधवांना आवडला नव्हता.

एकोणीसशे सत्तावीस साल जसे महाडच्या चवदार तळ्याच्या प्रकरणामुळे गाजले तसे ते लो. टिळकांचे धाकटे चिरंजीव श्रीधरपंत टिळक यांनी ब्राह्मणेतर पक्षातील जेधे-जवळकरांसारख्या तरुणांबरोबर व डॉ. आंबेडकरांबरोबर केलेल्या सहकार्यामुळे गाजले. छत्रपतीपद्यसंग्रह व देशाचे दुष्मन या पुस्तकांबद्दल जेधे-जवळकरांवर खटला भरणारे श्रीधरपंत १९२७ साली सत्यशोधकांच्या संगतीत वावरू लागले. केसरीच्या विश्वस्तांबरोबरचा रामभाऊ व श्रीधरपंत या टिळकपुत्रांचा न्यायालयातील तंटा विकोपाला गेला होता. २७ नोव्हेंबर १९२७ रोजी महात्मा फुले यांचा शतसांवत्सरिक उत्सव महाराष्ट्रात थाटाने साजरा झाला. मुंबईच्या फुले जन्मशताब्दी समारंभात श्रीधरपंत टिळकांनी केलेले भाषण गाजले. "...मी सत्यसमाजिस्ट नसलो तरी मी एक सत्यशोधक आहे. प्रत्येक बाबतीत सारासार विचार करून वर्तन ठेवणारी व्यक्ती सत्यशोधक आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक व्यक्ती सत्यशोधक बनणे हे राष्ट्रहिताचेच आहे. महात्मा फुले जन्मास आले त्याच दिवशी भट पेशव्यांच्या वाड्याला आग लागली हा योगायोग काही विलक्षण आहे." महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजावर केसरीने टिळकांच्या हयातीत व नंतरही नेहमीच झोड उठवली असताना लोकमान्यांचे चिरंजीव महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करताना पाहून सत्यशोधकांना व ब्राह्मणेतर पक्षाच्या मंडळींना 'काळाने सूड उगवला' असे वाटले. श्रीधरपंतांचे जेधे-मॅन्शनमध्ये येणे-जाणे वाढले. जेधे, श्रीपतराव शिंदे, जवळकर गायकवाडवाड्यातल्या लोकमान्यांच्या दिवाणखान्यात गप्पागोष्टी करू लागले.

आठ एप्रिल १९२८ रोजी श्रीधरपंतांनी गायकवाडवाड्यात डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली समता संघाची शाखा स्थापन केली डॉ. आंबेडकर आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर

दलितांनी लोकमान्यांच्या दिवाणखान्यात एकत्र चहापान केले. ११ मे १९२८ रोजी श्रीधरपंतांनी समाजसमतासंघातर्फे सहभोजनाचा कार्यक्रम घडवून आणला. त्यात निरनिराळ्या जातींच्या लोकांनी भाग घेतला. श्रीधरपंतांच्या या उपक्रमामुळे लोकमान्यांची पवित्र वास्तू विटाळली गेली, सूर्यापोटी शनी यावा तसे जन्मलेले टिळकांचे दिवटे चिरंजीव घराण्याच्या कीर्तीला काळे फासत आहेत असे टिळक-भक्तांना वाटत होते तर श्रीधरपंत म्हणजे हिरण्यकश्यपूच्या घरी जन्मलेल्या प्रल्हादासारखे आहेत असे ब्राह्मणेतर पक्षाचे लोक म्हणत होते.

श्रीधरपंतांच्या रूपाने ब्राह्मण–ब्राह्मणेतर तसेच दलितांमधील अंतर प्रथम कमी व अखेर नाहीसे करून सामाजिक जीवनातील तटबंद्यांना खिंडार पाडणारा एक नवा प्रवाह निर्माण झाला होता. पण २५ मे १९२८ रोजी त्यांनी आत्महत्या केल्याने नुकताच कोठे झुळझुळ वाहू लागलेला हा प्रवाह कायमचा आटून गेला. अवघ्या तिसाव्या वर्षी भावना-प्रधान श्रीधरपंतांनी केसरी–मराठा संस्थेच्या विश्वस्तांबरोबरच्या तंट्याला कंटाळून, वैतागून आत्महत्या केली तेव्हा जेधे, जवळकर, श्रीपतराव शिंदे, डॉ. आंबेडकर हे त्यांनी जोडलेले नवे मित्र हळहळले.

श्रीधरपंतांच्या आत्महत्येनंतर त्यांचे ज्येष्ठ बंधू रामभाऊ विश्वस्तांबरोबर एकाकी लढत देऊ लागले तेव्हाही त्यांच्या पाठीशी जेधेबंधू व जवळकर उभे राहिले. एका खटल्यात रामभाऊंना दहा दिवस येरवड्याच्या तुरुंगात काढावे लागले. ३० सप्टेंबर १९२८ रोजी रामभाऊ टिळक कारावासातून सुटले, तेव्हा त्यांच्या स्वागतास एकही ब्राह्मण गृहस्थ हजर नव्हता. जेधे, शिंदे, जवळकर वगैरे त्यांच्या मित्रांनी हारतुरे घेऊन त्यांचे स्वागत करून त्यांना मिरवीत गायकवाडवाड्यात आणले व तेथील मधल्या पटांगणात सभा घेऊन जवळकरांनी त्यांची तरफदारी करणारे भाषण केले.

एकोणीसशे सत्तावीस व अठ्ठावीसच्या आरंभी काही महिने जेधे व जवळकरांनी एकजुटीने काम केले. १९२८ च्या आरंभी दिनकरराव जवळकर यांच्या संपादकत्वाखाली 'कैवारी' पत्र मुंबईत चालू करण्याचे ठरले. या पत्राच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते भास्करराव जाधव, उपाध्यक्ष बाबूराव जेधे व सल्लागार मंडळात केशवराव जेधे होते. सल्लागार मंडळाच्या संमतीने 'कैवारी' पत्राचे धोरण ठरविले जाईल असे जाहीर आश्वासन देण्यात आले होते. मुंबईत नवे वृत्तपत्र काढण्याची आवश्यकता का भासली याबद्दल जाहिरातीत स्पष्टीकरण देण्यात आले होते. "पुढील दोन वर्षांत सायमन कमिशनच्या नेमणुकीमुळे ज्या राजकीय उलाढाली होणार आहेत त्या वेळी ब्राह्मणेतर पक्षाची बाजू नेटाने मांडण्याकरिता 'कैवारी' पत्र सुरू होत आहे. ब्राह्मणेतर पक्षामध्ये संघटना, शिस्त उत्पन्न करण्याकरता आज अशा सामुदायिक व जबाबदार पत्राची अत्यंत आवश्यकता आहे." सायमन आयोगामध्ये एकाही हिंदी माणसाची नेमणूक केली नाही म्हणून भारतातील सर्व राजकीय पक्षांनी सायमन कमिशनचा निषेध केला आणि

आयोगाचे सदस्य भारताला भेट देतील तेव्हा त्यांच्यावर बहिष्कार घालावा असे अनेक पक्षांनी ठरविले. असल्या या आयोगाशी सहकार्य करावयाचे की त्यावर बहिष्कार घालावयाचा या प्रश्नावर ब्राह्मणेतर पक्षात रण माजले. जेधे–जवळकरांच्या युतीला तडे गेले आणि पुढे दोघेही एकमेकांचे विरोधक बनले त्याची सुरुवात या प्रश्नावरील मतभेदापासून झाली.

सायमन कमिशनबरोबर सहकार्य करू नये असे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, जेधेबंधू, केशवराव बागडे, श्रीपतराव शिंदे, भाऊराव पाटील वगैरेंचे मत होते; तर भास्करराव जाधव, जवळकर वगैरेंना कमिशनवर बहिष्कार न घालता सहकार्य करावे असे वाटत होते. सायमन आयोगाची नियुक्ती होताच त्यासंबंधीचे धोरण ठरविण्यासाठी ब्राह्मणेतर पक्षाची पुढारी मंडळी २० नोव्हेंबर १९२७ रोजी मुंबईच्या वंडेकर मॅन्शनमध्ये जमली. सायमन कमिशनवर बहिष्कार घालावयाचा ठराव या सभेने पास केला असे 'विजयी मराठा 'कारांनी लिहिताच भास्करराव जाधवांनी तावडतोब खुलासा केला, " या विधानास कोणता आधार आहे ते कळत नाही. वरील सभेत हिंदी गृहस्थाची नेमणूक केली नसल्याने कमिशनची रचना ब्राह्मणेतर पक्षास गैर वाटते. सबब तिचा निषेध करण्यात आला. बहिष्काराचा ठराव झाला नाही, बहिष्कार घालावा किंवा न घालावा यासाठी जादा परिषद भरवावी असे ठरले. " या प्रश्नाचा विचार व निर्णय करण्यासाठी दोन्ही गट प्रयत्न करू लागले.

३० डिसेंबर १९२७ रोजी पुणे जिल्हा ब्राह्मणेतर परिषद भरली. वऱ्हाडचे ब्राह्मणेतर पुढारी नानासाहेब अमृतकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेने सायमन-कमिशनवर बहिष्कार घालण्याचा ठराव मंजूर केला. पुणे जिल्हा शाखेवर बहिष्कारवादी गटाच्या जेधेबंधूंचे नियंत्रण होते. खुद्द अध्यक्ष नानासाहेब अमृतकर मात्र कमिशनबरोबर सहकार्य करावे या मताचे होते. ३० व ३१ डिसेंबर १९२७ रोजी अकोला जिल्हा ब्राह्मणेतर परिषद दिनकरराव जवळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या परिषदेत सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्यास नकार देणारा ठराव करण्यात आला आणि कमिशनबरोबर सहकार्य करा म्हणणारांची सरशी झाली. अध्यक्षीय भाषणात जवळकर म्हणाले, " ज्याअर्थी ब्राह्मण लोक कमिशनवर बहिष्कार पुकारीत नाहीत (आहेत ?) त्याअर्थी ब्राह्मणेतरांचा काहीतरी फायदा असला पाहिजे. ब्राह्मणांनी जी गोष्ट चांगली म्हटली ती नेमकी ब्राह्मणेतरांना जाचक असते हा परंपरागत अनुभव आहे. त्याचप्रमाणे भांडवलशाहीनेही बहिष्कारास होकार दिला आहे. या दोन्हीवरही आमचा विश्वास नाही. " एकाच दिवशी भरविण्यात आलेल्या या दोन जिल्हा परिषदांनी परस्परविरोधी भूमिका घेतल्याने ब्राह्मणेतर पक्षातले दुमत स्पष्ट झाले. ८ एप्रिल १९२८ रोजी वऱ्हाड-मध्यप्रांताच्या ब्राह्मणेतर पक्षाच्या प्रांतिक अधिवेशनात अध्यक्ष रावबहादूर नायडू यांनी सायमन कमिशनपासून फायदा होत असल्यास तो आपण जरूर करून घेतला पाहिजे असा सल्ला दिला.

सायमन कमिशनबाबतचे धोरण ठरविण्यासाठी कल्याण येथे भरलेल्या मुंबई प्रांतिक

ब्राह्मणेतर परिषदेचे अध्यक्षही रावबहादूर नायडू होते. सायमन कमिशनशी सहकार्य की त्यावर बहिष्कार या ठरावाबाबत विषयनियामक समितीत तसेच खुल्या अधिवेशनात खडाजंगी झाली. सहकार्य करावे असे म्हणणाऱ्या सरकारधार्जिण्या जाधव गटामागे बहुमत असल्याचे सिद्ध झाले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, बागडे, जेधेबंधू, भाऊराव पाटील यांनी बहिष्कार घालावा असा आग्रह धरला. पण त्याचा उपयोग झाला नाही. सायमन कमिशन बरोबर सहकार्य करावे असे म्हणणाऱ्यांत भास्करराव जाधव अग्रभागी होते याचे कोणालाच आश्चर्य वाटले नाही. मात्र जवळकर जेध्यांची संगत सोडून भास्कररावांची साथ करीत असलेले पाहून अनेकांना आश्चर्य वाटले, तसेच वाईटही वाटले. कल्याणच्या परिषदेपूर्वी जागृतिकारांनी जवळकरांना खास आवाहन केले होते, "सायमन कमिशन स्वराज्याचे गाठोडे घेऊन येणार आहे व त्या वेळी खैरातीच्या प्रसंगी ब्राह्मणेतर हजर राहिले नाहीत तर त्यांना पुढे केव्हाही काहीही मिळणार नाही अशी जवळकरांनी आपली चुकीची समजूत करून घेतली आहे. परंतु आम्ही त्यांना असे आश्वासन देतो, की सायमन कमिशनपासून देशाला काही लभ्यांश नाही व विहिरीतच पाणी भरले नाही तर पोहऱ्यात तरी कोठून येणार ? कमिशनने शिफारस केलेल्या सुधारणा देशाला मान्य होणार नाहीत व पुढे बहिष्कार घालावा लागणारच आहे. त्यापेक्षा अगोदरच बहिष्कार घातलेला काय वाईट ? श्री. जवळकर यांनी कल्याणच्या परिषदेत कमिशनवरील बहिष्काराला पाठिंबा द्यावा अशी आमची त्यांना विनंती आहे. श्री. जवळकर हे बाणेदार व स्वाभिमानी आहेत आणि ब्राह्मणेतर पक्षाच्या व स्वदेशाच्या हिताकरिता स्वतःची चूक कबूल करण्यास ते माघार घेणार नाहीत अशी आमची खात्री आहे. म्हणूनच त्यांना वरील विनंती आम्ही करीत आहोत." जवळकरांना असे आवाहन करणे म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखे होते याची कल्पना बडोद्याच्या जागृतिकारांना नसावी.

'कैवारी' पत्र चालवण्यासाठी मुंबईत आलेले जवळकर तोपर्यंत भास्करराव जाधव यांच्या पुरते कह्यात गेले होते. जाधवरावांचा वरदहस्त असल्यामुळे ते ब्राह्मणेतर पक्षाचे सरचिटणीस झाले. कल्याणची परिषद संपल्यावरही सायमन कमिशनवर बहिष्कार घालावा असे म्हणणाऱ्या मंडळींबद्दल खोटानाटा, खोडसाळ मजकूर 'कैवारी' पत्रात येतच राहिला. तेव्हा बाबूराव जेधे यांनी सदर वृत्तपत्राच्या सल्लागार मंडळीतील आपल्या पदाचा राजीनामा दिला. "कैवारी पत्राच्या काही अंकांतून श्रीमंत खासेराव पवार, श्रीपतराव शिंदे, केशवराव बागडे, तसेच पुणे जिल्हा (ब्राह्मणेतर) काँग्रेसमध्ये बहिष्काराचा ठराव पास करणाऱ्या अनेक पुढाऱ्यांविषयी व्यक्तिविषयक, गैरसमज पसरविणारी, निंदास्पद, बदनामीकारक अशी बेजबाबदार टीका कारण नसताना संपादकाच्या लहरीप्रमाणे येत असते. वेळीअवेळी माझे नावाचा उपयोग करून सदर टीकेला पाठिंबा आहे असे सदर पत्राचे संपादक भासवीत आहेत." जेध्यांचा हा राजीनामा १३ ऑक्टोबर १९२८ च्या अंकात प्रसिद्ध झाला व त्याच अंकात 'जेधे–जवळकरांची ताटातूट' जागृतिकारांनी जगजाहीर केली. दरम्यान सायमन कमिशनवर बहिष्कार न घालता त्यावरोबर सहकार्य

करावे असा ठराव ब्राह्मणेतर पक्षात मंजूर झाला. १९२८ च्या सप्टेंबर महिन्यात इंग्रज सरकारने जाधवरावांना शेतकी व अबकारी खात्याचे मंत्रिपद दिले.

सायमन कमिशनबाबत स्वीकारावयाच्या धोरणाविषयीचे मतभेद हे जेधे–जवळकर-मधील वेबनावाचे फक्त एक कारण होते. याखेरीज इतर अनेक कारणे होती. 'कैवारी' पत्राने मुंबईतील गिरणी कामगार युनियनचे नेतृत्व करणाऱ्या डांगे वगैरे कम्युनिस्ट नेत्यांविरुद्ध भास्कररावांच्या धोरणानुसार प्रचार मोहीम सुरू केली होती व कामगार चळवळीत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद सुरू केला होता. बहुसंख्य गिरणीकामगार ब्राह्मणेतर होते. १९२८ साली मुंबईतल्या कापड गिरणीतील कामगारांनी सहा महिने संप केला होता या संपातूनच गिरणी कामगार युनियन ही कम्युनिस्ट नेत्यांच्या प्रभावाखालची कामगार संघटना स्थापन झाली होती. कामगार चळवळीच्या क्षेत्रातील कम्युनिस्टांचा वाढता प्रभाव इंग्रज राज्यकर्त्यांच्या तसेच गिरणी मालकांच्या डोळ्यात सलत होता. कम्युनिस्टांच्या 'अनिष्ट प्रभावापासून' ब्राह्मणेतर कामगारांचा बचाव करण्याचे आपले कर्तव्य आहे असे समजून आळवे व कासले या त्यांच्या पुढाऱ्यांना वश करून घेण्याचा आपण कसा प्रयत्न केला याचे वर्णन भास्कररावांनी आपल्या रोजनिशीत केले आहे. कासले यांनी गिरणी कामगार युनियनचे अध्यक्षपद सोडू नये आणि अधिक पाठीराखे मिळवून कम्युनिस्टांना विरोध करावा व अखेर त्यांची हकालपट्टी करावी असा भास्कररावांनी त्यांना सल्ला दिला होता. इंग्रज राज्यकर्ते व गिरणीमालक यांच्याशी संगनमत करूनच हा खेळ भास्करराव खेळत असावेत. १९२४ सालीही काँग्रेसचा कामगारांवरील प्रभाव कमी करण्यासाठी जातीय तत्त्वावर कामगार संघटना स्थापावी असा तोडगा त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांना सुचवला होता. गिरणी मालकांच्या संघटनेकडून व त्यांचे एक प्रवक्ते सर होमी मोदी यांच्याकडून कम्युनिस्टविरोधी प्रचारासाठी पैसा दिला जात होता.

कैवारी पत्रात जवळकरांनी चालवलेला हा प्रचार भास्करराव जाधव व गोविंदराव शिंदे यांच्या साथीने व इंग्रज आणि गिरणी मालक यांच्या आशीर्वादाने चालवलेल्या कम्युनिस्टविरोधी राजकारणाचा एक भाग होता. 'श्री. कासल्यांच्या फोटोने ब्राह्मणांचा जळफळाट', 'श्री. आळव्यांना ब्राह्मणांनी कसे छळले?', 'युनियनचा फंड घेऊन डांगे पळणार', 'कामगारांना भटांनी तोंडघशी पाडले' वगैरे कैवारी पत्रातील मथळे वाचले तरी त्यावरून जवळकरांनी कसा प्रचार चालवला होता त्याची कल्पना येते. या काळात जवळकरांच्या हातात भरपूर पैसा खेळत होता. चैनीत राहण्याची, भपकेबाज पोषाख करून मिरविण्याची त्यांची जुनी सवय पुण्यात केशवरावांच्या संगतीत त्यांनी सोडून दिली होती. मुंबईत आल्यानंतर त्यांची साधी राहणी सुटली; हातात पैसा खेळू लागल्याने मद्यपानाचे प्रमाण वाढले. 'कैवारी' पत्रास दारूगुत्तेवाले जाहिरातींचा मलिदा देऊ लागले. दारूच्या जाहिराती कैवारी पत्रात पाहून केशवराव जेधे नाराज झाले. दारूबंदीचा कायदा अंमलात आणावा अशी विनंती ठरावाद्वारे ब्राह्मणेतर पक्ष करीत असे. ५ मे १९२८ रोजी केशवरावांच्या अध्यक्षतेखाली आसवली येथे भरलेल्या सभेत जवळकर

हजर असतानाच एक ठराव मंजूर झाला होता. भास्करराव जाधव अबकारीमंत्री व 'कैवारी' पत्राच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष! अशा स्थितीत दारूच्या जाहिराती 'कैवारी'सारख्या ब्राह्मणेतर पक्षाच्या मुखपत्रात फडकणे योग्य नाही असे केशवरावांना वाटत असे. कामगार चळवळीत फूट पाडण्यासाठी जाधव–जवळकरांनी चालवलेले प्रयत्नही केशवरावांना पसंत नव्हते. १९२९ च्या मार्च महिन्यात डांगेप्रभृती ३१ प्रमुख कम्युनिस्टांची धरपकड करून मीरत कट खटला भरण्याची तयारी इंग्रज सरकारने चालवली. जवळकरांनीही अचानक आपण २७ मार्चला विलायतला जाणार असल्याची घोषणा केली. आपण पाचसहा महिने इंग्लंडात राहणार असून आपल्या गैरहजेरीत गणपतराव जाधव हे 'कैवारी' पत्राचे संपादक म्हणून काम पाहतील असे सांगून त्यांनी वाचकांचा निरोप घेतला. इंग्रज सरकार व भास्करराव जाधव यांची मेहेरनजर असल्यामुळेच जवळकरांना विलायतची यात्रा घडत होती हे उघड होते. जवळकरांची विलायतसफर हेही जेधे–जवळकरांमधील वाढत्या वितुष्टाचे एक कारण होते.

एकोणीसशे अठ्ठावीस व एकोणतीस या दोन वर्षांत केशवराव जेधे शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन चालवलेल्या चळवळीत मुख्यतः गुंतले होते. १९२७ साली मुंबई सरकारचे गृहमंत्री सर चुनीलाल मेहता यांनी तुकडेबंदी विधेयक कायदेमंडळात मांडले होते. तुकडेबंदीमुळे छोट्या छोट्या जमीन तुकड्यांना शेतकरी मुकतील आणि बड्या जमीन मालकाच्या पदरी शेतमजूर किंवा कारखान्यात मजुरी करण्याखेरीज त्यांना गत्यंतर राहणार नाही असे विरोधकांचे म्हणणे; तर तुकडेबंदीमुळे मोठ्या प्रमाणावर शेती करणे शक्य होईल व शेती किफायतशीर होईल असा सरकारचा दावा होता. या विधेयकापाठोपाठ सरकारने सारावाढीचा प्रस्तावही मांडला. गुजरातमध्ये बार्डोली सत्याग्रहाचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल यांनी यशस्वीरीत्या केले तेही १९२८ सालातच! १ जुलै १९२८ रोजी बारामती येथे भरलेल्या सभेत जेधे व जवळकर यांची भाषणे होऊन त्यात तुकडेबंदी व सारावाढीसंबंधीच्या विधेयकाचा निषेध करण्यात आला व बार्डोलीच्या सत्याग्रहास पाठिंबा देण्यात आला. २५ जुलै १९२८ रोजी पुण्यात जेधेबंधूंनी मुंबई इलाखा शेतकरी परिषद आयोजित केली होती. परिषदेचे अध्यक्ष कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे तर स्वागताध्यक्ष होते बाबूराव जेधे. या परिषदेत काँग्रेस व स्वराज्य पक्षाशी संबंधित नेत्यांनीही भाग घेतला होता. पाच हजार शेतकरी मिरवणुकीने कौन्सिल हॉलकडे गेले. शिंदे, केळकर, परांजपे, गंगाधरराव देशपांडे, दा. वि. गोखले, जेधेबंधू, जवळकर, रामराव शिंदे यांच्या शिष्टमंडळाने कायदे-मंडळातील चाळीस सभासदांना भेटून जमीन विभागणी बंदीच्या व सारावाढीच्या विधेयकास असलेला विरोध त्यांच्या कानी घातला. चव्वेचाळीस गावच्या साठ हजार शेतकऱ्यांच्या सह्यांनिशी एक अर्ज लालजी नारायणजी यांच्या हाती देण्यात आला. तुकडेबंदी व सारावाढीच्या प्रस्तावांना सर्व पक्षांचा असलेला विरोध लक्षात घेऊन सरकारने विधेयकावरील चर्चा पुढे ढकलली खरी पण तेवढ्याने विरोधकांचे समाधान झाले नाही.

बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांची गाऱ्हाणी ऐकून त्यांच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी ब्राह्मणेतर पक्षाने नेमलेल्या समितीत जेधे व जवळकर या दोघांनीही सभासद म्हणून काम केले. १९२९ च्या सप्टेंबरपर्यंत शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबतचे जेधे-जवळकरांचे मतभेद उघड व्यक्त झाले नव्हते. १९२९ च्या अखेरीस ५-६ महिन्यांसाठी विलायतेला गेलेले जवळकर जेमतेम तीन आठवड्यांत परतले. जवळकरांचे अचानक विलायतेस जाणे आणि ताबडतोब परतणे हे एक गूढच होते. पण इंग्लंडहून परतल्यानंतर त्यांनी भास्करराव जाधवांना पत्र लिहून काही सूचना केल्या. ब्राह्मणेतर पक्षाने आपले जातिनिदर्शक नाव बदलून 'शेतकरी पक्ष' असे नवे नाव धारण करावे. हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा मिळावा हे पक्षाचे उद्दिष्ट असावे आणि भिक्षुकशाहीने चालवलेल्या शोषणाविरुद्ध शेतकऱ्यांना संरक्षण दिले पाहिजे हे तत्त्व मान्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीस — मग अशी व्यक्ती जन्माने ब्राह्मण का असेना—पक्षात प्रवेश द्यावा असे जवळकरांचे म्हणणे होते. पक्षाचे नाव बदलण्याच्या त्यांच्या सूचनेस रावबहादूर बोले, वि. पां. चव्हाण व आनंदराव सुर्वे या तिघांनी टाइम्स ऑफ इंडियात पत्र लिहून विरोध केला. याउलट गिरणी कामगार युनियन ही कम्युनिस्टांची संघटना आहे हे या तिघांचे म्हणणे मीरत कट खटल्यातील एक आरोपी कासले यांना अडचणीत टाकणारे ठरेल हे लक्षात घेऊन कासले यांचे वकील के. एस. गुप्ते यांनी बोले-चव्हाण-सुर्वे या त्रयीवर टीका केली. ब्राह्मणेतर पक्षात या वेळी मराठे व मराठेतर अशी दुफळी झाली होती. बोले, बागडे वगैरे मंडळी मराठेतर गटाचे नेतृत्व करीत होती तर पक्षातील मराठा जातीचे नेते ब्राह्मणांची-भूमिका वठवीत आहेत असे मराठेतर ब्राह्मणेतर नेत्यांचे म्हणणे होते. ही मंडळी जाधव, जवळकर गट व जेधेबंधूंचा गट या दोन्हीवर टीका करीत होती. कारण आपसात भांडणाऱ्या दोन्ही गटांचे नेतृत्व मराठा जातीचे असल्यामुळे त्यात निवड करण्यास वाव नव्हता असे मराठेतर नेत्यांचे म्हणणे होते. सायमन कमिशनसमोर साक्ष देताना, चौदा अगर त्याहून जास्त राखीव जागा मराठेतर ब्राह्मणेतर जातींना मिळणार असतील तर मराठ्यांचा राखीव जागांवरील हक्क अजिबात काढून टाका असे आपले म्हणणे नाही असा सुर्वे यांनी खुलासा केला होता ब्राह्मणेतर पक्षाचा त्याग करावयास हे मराठेतर नेते तयार नव्हते. मात्र मराठा विरुद्ध मराठेतर असा वाद निर्माण करणे त्यांना गैर वाटत नव्हते. ब्राह्मणेतर पक्षात जाधव-जवळकर विरुद्ध जेधे गट अशी दुही झाली होतीच. त्याखेरीज मराठे-मराठेतर असे द्वैत निर्माण झाल्याने पक्षात एक तिसरी फळीही तयार झाली.

२३ जुलै १९२९ रोजी मुंबई इलाख्यातील काँग्रेस नेत्यांनी 'लँड लीग'ची म्हणजे शेतकरी संघाची स्थापना केली. शेतकऱ्यांची ही नवी संघटना स्थापण्यात टिळक पक्षाचे तात्यासाहेब केळकर, दा. वि. गोखले तसेच वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या गांधीवादी नेत्यांनीही पुढाकार घेतला होता. त्यामुळे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे अध्यक्ष असलेल्या शेतकरी परिषदेच्या कार्यकारी मंडळाने या नव्या संघटनेबरोबर सहकार्य करावे की नाही

असा प्रश्न निर्माण झाला. कर्मवीर शिंदे यांना काँग्रेस नेत्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या नव्या संघटनेबरोबर सहकार्य करावे असे वाटत होते. त्यांचा हा विचार जेधेंबंधूंना प्रथम पसंत पडला नाही पण अखेर त्यांनी जेधेबंधूंचे मन वळविले. भास्करराव यांच्या सरकार-धार्जिण्या गटाला मात्र काँग्रेसप्रणीत लँड लीगबरोबर युती करू नये असे वाटत होते. त्यामुळे जवळकरांच्या 'कैवारी' पत्राने लँड लीगबरोबर सलगी करू पाहणाऱ्या कर्मवीर शिंदे व केशवराव जेधे यांच्यावर टीकेची झोड उठवली. कैवारी पत्रातून खोटानाटा खोडसाळ मजकूर प्रसिद्ध होऊ लागला. शेतकरी परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकीत काय घडले याबद्दलची वस्तुस्थिती कर्मवीर शिंदे व दा. वि. गोखले यांनी केसरीत स्पष्ट केली. "मुंबई इलाखा शेतकरी परिषदेच्या स्टँडिंग कमिटीने लँड लीगशी सहकार्य करण्याचा ठराव पास केला तो स्टँडिंग कमिटीच्या अध्यक्षाने आपल्या कास्टिंग व्होटच्या जोरावर केला. कारण ह्या कमिटीच्या सभेस चार सभासद हजर होते. त्यांपैकी बाबूराव गोखले आणि मीच काय ते या ठरावाला अनुकूल होतो. बाकी उरलेले जेधेबंधूंविरुद्ध होते वगैरे मजकूर कैवारी पत्राने प्रसिद्ध केला होता. त्यावर रा. जवळकर मला भेटावयास आले तेव्हा त्यांना हा सर्व प्रसिद्ध झालेला मजकूर खोटा आहे असे मी स्पष्ट सांगितले आणि त्यांनी तसे प्रसिद्ध करण्याचे कबूलही केले. तरी 'कैवारी'च्या दुसऱ्या अंकात स्टँडिंग कमिटीने 'निर्लज्जपणाने सहकार्याचा ठराव पास केला' वगैरे मजकूर पुनः लांबलचक व अनर्गल भाषेत प्रसिद्ध केला आहे. हे फारच खोडसाळपणाचे आहे, असे प्रसिद्ध करणे सदर कमिटीचा अध्यक्ष या नात्याने मी माझे कर्तव्य समजतो."

श्री. दा. वि. ऊर्फ बाबूराव गोखले यांनीही कर्मवीर शिंदे यांच्या म्हणण्यास दुजोरा दिला. शिंदे आणि गोखले यांची पत्रे प्रसिद्ध झाल्यावर कैवारीचे संपादक म्हणून काम पाहणारे जवळकरांचे सहकारी गणपतराव जाधव यांनी पत्र लिहून 'कैवारी'तील मजकूर केशवराव जेधे यांनी सांगितलेल्या हकीकतीवर आधारलेला आहे असे सांगून केशवरावांनाच बोल लावला. "लँड लीगशी सहकार्य करण्याच्या बाबतीत शेतकरी परिषदेच्या कार्यकारी मंडळाने केलेल्या ठरावासंबंधाने जो वाद उपस्थित झाला आहे त्यात 'कैवारी'कडे दोष नाही. रा. जेधे यांनी जी हकीकत ब्राह्मणेतर पक्षापुढे सांगितली ती 'कैवारी'ने छापली. याबाबतीत जेधे यांनी खुलासा करणे जरूर आहे. त्यांनी जर खुलासा केला नाही तर रा. शिंदे व गोखले यांचेच म्हणणे खरे आणि रा. जेधे यांची बाजू लंगडी आहे असा लोकांचा समज होईल." जाधवांचे हे पत्र वाचल्यानंतर केशवराव संतापले आणि त्यांनी सणसणीत उत्तर दिले.

"'कैवारी' पत्राचे संपादक यांनी 'शिंदे की जेधे खोटे' हा वाद पुढे ठेवून मुंबई इलाखा शेतकरी परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेविषयी बराच गैरसमज माजविला आहे. सरदार वल्लभभाईंच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या लँड लीगच्या सभेच्या अगोदर दोन दिवस मुम्बई इलाखा शेतकरी परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा जेधे मॅन्शनमध्ये झाली होती. त्या सभेस सभेचे अध्यक्ष मे. व्ही. आर. शिंदे, सभासद

दा. वि. गोखले, रा. बाबूराव जेधे व मी असे चौवेजण हजर होतो. सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली परवा स्थापन होणाऱ्या लँड लीगशी सहकार्य करावे असे रा. गोखले यांनी सुचवले, त्यास बाबूराव जेधे व मी असे दोवे विरुद्ध होतो. परंतु गोखले यांची सूचना रेकॉर्डवर घेण्यास काहीच हरकत नाही असे सांगितले आणि अध्यक्ष शिंदे यांचेही तेच म्हणणे पडले. सेक्रेटरी या नात्याने मला रा. गोखले यांची सूचना ठराव-रूपाने उतरून घेणे आणि अध्यक्षांच्या सूचनेला मान देणे भाग पडले. नंतर दोन दिवसांनी सकाळी मे. शिंदे लँड लीगच्या सभेला जात असता मला आणि बाबूराव जेधे यांना बोलावण्यात आले. मी व बाबूराव दोघेही नाही म्हणत असता बाबूरावांना आग्रहाने लँड लीगच्या सभेस नेले; परंतु त्यांनी 'आमच्या मंडळींच्या संमतीशिवाय आम्हाला सहकार्य करता येत नाही' असे रा. केळकर यांना कळविले. ही घडलेली सर्व हकीकत जाधवराव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ब्राह्मणेतर पक्षाच्या सभेपुढे मांडली आहे आणि मुंबई इलाखा शेतकरी संघ स्थापन करताना १७ ऑगस्टच्या सभेत तशीच सांगितली आहे. मे. शिंदे केवळ शेतकरी कमिटीचे अध्यक्ष असल्याकारणाने आणि यांना तिघा सभासदांपैकी सहकार्यास एकाचा पाठिंबा मिळाल्याने लँड लीगशी सहकार्याचा ठराव पास झाला. कास्टिंग व्होटबद्दल सभेत कसरत करण्याची काही जरूर नव्हती.

आता रा. शिंदे यांच्या कास्टिंग व्होटबद्दल 'कैवारी'ने वितंडवाद माजविला आहे. आतापर्यंत 'कैवारी'चे धोरण पाहता ते असेच चकविणारे आहे. 'कैवारी'ने गिरणी कामगारांचा लटका कैवार घेऊन त्यांच्या चळवळीचे कसे तीन तेरा वाजविले हे जगजाहीर झाले आहे. इतकेच काय 'कैवारी' नावाला न शोभेल असे कित्येक वेळा 'कैवारी' पत्राचे धोरण असते. दारूची जाहिरातदेखील छापण्यात येत असते. एके काळी हे पत्र आम्ही आमचे समजत होतो पण तो आमचा भ्रम गेल्या नऊ महिन्यांपासून पार गेला. 'कैवारी' पत्रात नेहमी मोहीम सुरू होते तिच्या मुळाशी कावेबाजपणा असतो असे ठाम समजावे." या पत्रात केशवरावांनी जाधव व जवळकर यांचा उल्लेख केला नसला तरी केशवरावांचा हल्ला या दोघांवर होता हे माहीतगारांच्या लक्षात येत होते. लँड लीगशी सहकार्य करण्यास त्या संघटनेच्या स्थापनेपूर्वी जेधेबंधू तयार नसले तरी वि. रा. शिंदे यांनी केशवरावांची खात्री पटवल्यावर केशवराव लँड लीगचे काम उत्साहाने करू लागले. १८ ऑगस्ट १९२९ रोजी जेधे मॅन्शनमध्ये सभा होऊन त्यात शाहूमहाराजांच्या निधनानंतर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे लक्ष केवळ कौन्सिलातील कार्याकडेच वेधल्यामुळे बाहेरील कार्य थंडावले व फक्त निवडणुकीच्या वेळी हालचाल करणाऱ्या व अधिकारपदे मिळवण्यात गढून गेलेल्या जाधव गटावर आडवळणाने टीका केली गेली.

८ ऑगस्ट १९२९ रोजी मुंबईच्या कायदेमंडळातील ब्राह्मणेतर पक्षाच्या सभासदांची एक गुप्त बैठक भास्करराव जाधव यांनी बोलावली. सायमन कमिशनने केलेल्या पाहणीनंतर इंग्रज राज्यकर्ते राजकीय सुधारणांचा दुसरा हप्ता देण्याचा खल

करीत असता राजकीय सुधारणांबाबतची ब्राह्मणेतर पक्षाची बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला पाठवावयाच्या शिष्टमंडळात जवळकर व के. एस. गुप्ते यांची निवड करण्यात आली. भास्करराव जवळकरांना दुसऱ्यांदा विलायतची यात्रा घडवीत होते याचा केशवरावांनी ज्ञानप्रकाशमध्ये जाधवांना अनावृत पत्र लिहून स्पष्ट निषेध केला. "शिष्टमंडळ पाठविणे जरूर आहे, त्यात जबाबदार, निःस्वार्थी, योग्य मार्ग दाखविणारे, जनतेच्या विश्वासास पात्र असलेले, पक्षाकरिता झीज सोसणारे आणि इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व असलेले असे भारदस्त पुढारी यांची निवड ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकारी मंडळातर्फे कायदेशीररीत्या करण्यात यावी. ब्राह्मणेतर पक्षाच्या नावावर निव्वळ कायदे कौन्सिलातील सभासदांना कोणालाही डेप्युट करण्याचा अधिकार नाही." जेधे-जवळकर यांची युती संपून त्यांच्यातील लढाईला उघडउघड सुरुवात झाली होती. जवळकर जाधवांच्या हातातले बाहुले बनले होते व केशवरावांनी जाधवांच्या ब्राह्मणेतर पक्षातील वर्चस्वाला सरळसरळ आव्हान दिले होते.

जाधव, जेधे, जवळकर यांची युती झाली तेव्हाच जेधे-जवळकरांनी भास्करराव पासून सावध राहावे व हे त्रिकूट फार दिवस एकत्र काम करणे शक्य नाही असे भाकित भालाकार भोपटकरांनी वर्तविले होते. "श्री. जेधे-जवळकर हे ब्राह्मणद्वेषी असले तरी त्यांच्या मनाची ठेवण बिनलपंडावी आहे (sincere), त्यांच्यातील हा सद्गुण आम्हास अत्यंत प्रिय आहे. श्री. जेधे-जवळकरांसारख्या बिनलपंडावी तरुणांच्या मनाचे समाधान झाल्यावर जे ते आज ब्रह्मद्वेषी आहेत ते उद्या ब्रह्मप्रेमी बनू शकतील...स्वार्थ साधून व दिवाणगिरी लाटून मग जी समाजाची सेवा होईल तितकी करावयाची अशा स्वार्थी मनोवृत्तीचे श्री. जाधवराव आहेत म्हणून त्यांच्या नादी श्री. जेधे-जवळकरांसारख्या तडफदार तरुणांनी लागू नये...." जाधव, जेधे, जवळकर हे त्रिकूट फुटणार असे फक्त भालाकारांनाच वाटत होते असे नाही तर प्रबोधनकारांसारख्या ब्राह्मणेतर पक्षाच्या कट्ट्या पुरस्कर्त्यांनाही तसेच वाटत होते. 'जागृति', 'विजयी मराठा', 'नवयुग' तसेच 'दीनमित्र' या ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनाही जवळकरांची इंग्लंडला जाण्यासाठी भास्कररावांनी केलेली निवड चुकीची वाटत होती.

'जवळकर पुन्हा विलायतेस जाणार' या शीर्षकाच्या स्फुटात जागृतिकारांनी लिहिले, "जवळकर हे काही दिवसांपूर्वी इंग्लंडची यात्रा करून तेथे सुमारे तीन आठवडे राहून परत आले. ते तिकडे का गेले होते व त्यांच्या येण्याजाण्याचा खर्च कोणी दिला होता याचे सर्वांनाच गूढ पडले होते व अद्यापि त्याचा उलगडा झालेला नाही ... मद्रासच्या रामस्वामी मुदलियारसारखे किंवा सर परशुराम पात्रोसारखे पुढारी जात नाहीत मग जवळकरांना पाठविण्याची आवश्यकता मुंबई कौन्सिल ब्राह्मणेतरांना का वाटावी हे आम्हांस समजत नाही. शिवाय कौन्सिलपार्टी म्हणजे काही अखिल ब्राह्मणेतर पक्ष नव्हे.... जवळकरांपेक्षा गुप्ते इंग्रजी भाषेच्या बाबतीत सरस असतील परंतु तेही असल्या मोठ्या जबाबदारीस लायक आहेत असे म्हणवत नाही. या डेप्युटेशनच्या मुळाशी दुसरी काही

प्रेरणा आहे की काय अशीही एकंदर गोष्ट लक्षात घेता शंका आल्याखेरीज राहात नाही." रावबहादूर बोले, टाइम्स ऑफ इंडियात 'कुणबी' या टोपण नावाने पत्रे व लेख लिहिणारे वि. पां. चव्हाण व आनंदराव सुर्वे या मराठेतर, ब्राह्मणेतरांनी नावानिशी टाइम्समध्ये पत्र लिहून जवळकरांची निवड ज्या गुप्त बैठकीत करण्यात आली; त्या बैठकीस भास्करराव सह फक्त चार लोक हजर होते असा गौप्यस्फोट केला. जवळकर हे भास्करराव ांचे उजवे हात असून जाहीर व्याख्यानातून ते कम्युनिस्ट प्रामाणिक असल्याबद्दल शिफारसपत्र देत असतात इकडे या त्रयीने लक्ष वेधले.

जवळकर व गुप्ते हे दोघे ब्राह्मणेतर पक्षातर्फे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला जाणार अशी बातमी २४ ऑक्टो. १९२९ च्या ज्ञानप्रकाशात छापली जाताच ती सपशेल खोटी असल्याचे बाबूराव जेध्यांनी सहीनिशी विजयी मराठ्यात प्रसिद्ध केले होते. बाबूराव जेधे या वेळी पक्षाचे सरचिटणीस होते. पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा १० नोव्हेंबर १९२९ रोजी जेधे मॅन्शनमध्ये भरून त्या सभेत पक्षातर्फे इंग्लंडला पाठवावयाच्या प्रतिनिधीची निवड केली जाईल असे जाहीर करण्यात आले. बाबूरावांनी ही सभा अध्यक्षांच्या परवानगीवाचून बोलावली आहे व केशवरावांनी आपल्याला भेटून खुलासा करण्याऐवजी सरळ वृत्तपत्रात पत्र प्रसिद्ध केले अशी तक्रार भास्करराव ांनी जेधेबंधूंविरुद्ध केली. १० नोव्हेंबरची सभा पुण्यात भरण्याऐवजी मुंबईला भरवण्याचे बाबूराव जेधे यांनी २१ ऑक्टोबरला भास्करराव ांजवळ कबूल केले होते असा आरोपही भास्करराव ांनी वृत्तपत्रातील निवेदनात केला होता. पक्षातर्फे पाठविल्या जाणाऱ्या शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून जवळकर-गुप्ते इंग्लंडला जात नसून व्यक्तिगत कामासाठी जात आहेत. मात्र दोघेही ब्राह्मणेतर पक्षाचे सभासद असल्याने त्यांना इंग्लंडमध्ये पक्षाचा प्रचार करण्याचा हक्क आहे व त्यांना तसे करण्यास सांगितले आहे असे सांगून भास्करराव ांनी टीकाकारांना गप्प बसविण्याचा प्रयत्न केला.

भास्करराव ांनी जाहीर विरोध केला तरीही १० नोव्हेंबर १९२९ ची सभा जेधे मॅन्शनमध्ये भरवण्यात आली. सभेस कार्यकारिणीचे ११ सभासद हजर होते. प्रथम बाबूराव जेधे यांनी भास्करराव ांचे ९ नोव्हेंबरचे पत्र वाचून दाखवले. गुप्ते व जवळकर हे स्वतःच्या कामासाठी विलायतेस जात असून त्यासंबंधाने समाजात बराच गैरसमज उत्पन्न झालेला असून वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांनी त्या गैरसमजात भरच पडत आहे अशा वातावरणात कार्यकारी मंडळाची सभा भरणे हितावह न होता विवाद वाढवण्यास कारणीभूत होईल म्हणून १० नोव्हेंबरची सभा अध्यक्ष या नात्याने मी तहकूब करीत आहे व त्याप्रमाणे सर्व मेंबर लोकांस कळविले आहे. सभेचे अध्यक्ष असलेले आमदार नवले यांनी सभा कायदेशीर आहे की नाही हे ठरवून घ्यावे असे सुचवले तेव्हा कर्णेकर या एका सभासदाने भास्करराव ांची बाजू उचलून धरली तर जेधेबंधू, कर्मवीर भाऊराव व वि. रा शिंदे वगैरे दहा सभासदांनी सभा कायदेशीर असल्याचा निर्वाळा दिला. दहा विरुद्ध एक मतांनी मुंबई इलाखा शेतकरी संघास पाठिंबा देण्याचे ठरले. रा.

जवळकर व गुप्ते यांना ब्राह्मणेतर पक्षाविषयी विलायतेतील लोकांचा गैरसमज दूर करण्याबाबत पक्षाध्यक्षांनी केलेली विनंती ही अनधिकाराची व कार्यकारी मंडळाच्या हक्काची पायमल्ली करणारी आहे असा ठराव केशवराव जेधे यांनी मांडला व भाऊराव पाटील यांच्या दुजोऱ्यानंतर हा ठराव देखील बहुमताने मंजूर झाला. ही सभाच कायदेशीर नसल्याने या सभेत मान्य झालेले ठराव निरुपयोगी आहेत असे भास्करराव‌ांनी जाहीर केल्यामुळे त्यांच्या निषेधाची लाट सर्वत्र उसळली.

'दीनमित्र'कारांनी भास्करराव‌ांचे म्हणणे काय आहे हे नुसते नमूद केले तरी केशवरावांनी त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली व या दोघांच्या अंगात ना. जाधवरावांनी सोपविलेले काम करण्याची धमक आहे असे आपणास वाटते काय असे विचारून त्याबाबत खुलासा करण्याचीही विनंती केली. यावर उत्तर देताना 'दीनमित्र'कारांनी लिहिले की गुप्ते यांच्यासंबंधी आम्हास विशेष माहिती नाही व रा. जवळकरांसंबंधाने बोलायचे तर ते हे काम करण्यास लायक आहेत असे आम्हास वाटत नाही. रा. जवळकरांस आज ना. जाधवरावांनी निष्कारण महत्त्वास चढविले अशी तक्रार ऐकू येते पण यापूर्वी पुण्यासच पुणेकरांनी रा. जवळकरांस डोक्यावर घेतले होते. एकेकाळी गळ्यात गळे घालून फिरणाऱ्या केशवरावांना दीनमित्रकारांनी हाणलेला शेवटला टोला झेलणे भाग होते.

केशवरावांचा स्वभाव मुळात तापट. त्यात भास्करराव‌ांनी जवळकर व गुप्ते यांच्या विलायतवारीबाबत उडवाउडवीची उत्तरे देऊन आपल्या निर्णयाचे समर्थन केल्यामुळे केशवरावांचा संताप अनावर होऊन त्यांनी भास्करराव‌ांना जाहीर सवाल विचारले. '(१) आपण रा. जवळकर व गुप्ते यांना विनंती केली ती ब्राह्मणेतर पक्षाचे अध्यक्ष या नात्याने केली आहे काय? केली असल्यास आपणास तसा अधिकार आहे काय? आणि हे कृत्य पक्षाच्या शिस्तीला धरून आहे काय? (२) रा. गुप्ते व जवळकर यांना ब्राह्मणेतर पक्षाचे शिष्टमंडळ समजावे काय? (३) रा. गुप्ते व जवळकर यांना विलायतेस जाण्याइतकी आर्थिक परिस्थिती अनुकूल आहे की नाही हे आम्हास माहीत नाही पण ते विलायतेला गेल्यास त्यांचा खर्च कोण सहन करणार आहे? त्याची जबाबदारी ब्राह्मणेतर पक्षावर आहे काय? (४) त्यांनी कोणत्या मार्गाने व उपायाने गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करावा याबद्दल काही सूचना आपण केल्या आहेत काय? आपण त्यांना काही शिफारसपत्रे दिली आहेत काय? (५) रा. गुप्ते व जवळकर यांना विनंती करताना आपण त्यांच्या शिक्षणविषयक व व्यक्तिविषयक लायकीचा विचार केला आहे काय? ब्राह्मणेतर पक्षाविषयी खरोखरच गैरसमज असल्यास ते दूर करण्याचे सामर्थ्य या दोघांत आहे असे आपणास वाटते काय? (६) रा. गुप्ते यांनी आतापर्यंत पक्षात कोणती कामगिरी केली हे आपणास सांगता येईल काय? रा. जवळकरांची दोनतीन खाजगी वकीलपत्रे घेण्यापलीकडे ब्राह्मणेतर पक्षाशी त्यांचा इतर मार्गाने संबंध आल्याचे आपणास माहीत आहे काय? (७) रा. जवळकर यांनी आतापर्यंत आपणावर श्रीमंत खासेसाहेब

पवार, श्रीपतराव शिंदे, पक्षाचे उपाध्यक्ष रा. बागडे व रा. ब. बोले आणि इतर पुढाऱ्यांवर व्यक्तिविषयक व क्षुद्रपणाची टीका करून पक्षात बजबजपुरी माजविली व पक्षाची शिस्त व संघटना अनेक वेळा पायाखाली तुडविली हे आपणास माहीत आहे काय? रा. जवळकरांच्या संसर्गाने पक्षाविषयी अधिक गैरसमज उत्पन्न होईल असे पक्षाच्या हितचिंतकांस वाटल्यास ते चुकीचे होईल काय? (८) रा. गुप्ते यांना पुणे येथे सायमन कमिशनपुढे ब्राह्मणेतर पक्षाचे प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आपण पक्षाच्या कार्यकारी मंडळास धाब्यावर बसविले ही गोष्ट खरी आहे काय?" केशवरावांचे हे प्रश्न अडचणीत टाकणारे असल्यामुळे गुप्ते–जवळकर खासगी कामासाठी विलायतेला जात आहेत असे जाहीर करून भास्करराव‌ांनी सुटका करून घेण्याचा केलेला प्रयत्न त्यांच्या अंगलट आला. वऱ्हाडातील ब्राह्मणेतर पक्षाचे नेते आनंदस्वामी यांनी गौप्यस्फोट केला. "रा. गुप्ते यांची व माझी ते विलायतेस जाण्यापूर्वी मुंबईला भेट झाली त्या वेळी 'माझी खर्चाची सोय ना. जाधवराव यांनी केली आणि मला आयता चान्स आला. मग मी का जाऊ नये?' अशा तऱ्हेचे उद्‌गार त्यांनी मजजवळ काढले."

आपल्या निर्णयावर पक्षाचे नेते जाहीर टीका करीत असतानाही भास्करराव‌ांनी जवळकर–गुप्ते यांच्या विलायत-वारीची सोय केली आणि १० नोव्हेंबर रोजी जेधे मॅन्शनमधील सभा भरण्यापूर्वीच गुप्ते व जवळकर यांनी विलायतेची बोट पकडली. भास्करराव या वेळी दिवाणपद भूषवीत असले तरी जवळकर–गुप्ते यांच्या विलायत-यात्रेचा व दोघांच्या तेथील वास्तव्याचा आर्थिक भार उचलण्याइतके काही ते श्रीमंत नव्हते. दोघांच्या विलायतेस जाण्याचा खर्च कोणी व कसा केला हा स्वाभाविक कुतूहलाचा व टीकेचा विषय झाला. केशवरावांनी पुन्हा एकदा भास्करराव‌ांना जाहीर सवाल विचारले... रा. जवळकरांची स्थिती आमच्या डोळ्यांसमोर आहे. थोड्या दिवसांपूर्वी मुंबईला जाण्यासाठी त्यांना आम्हांस तांगा व गाडीभाड्याकरिता पैसे द्यावे लागत होते! त्याच जवळकरांना इंग्लंडच्या वाऱ्या करण्याइतका पैसा कोठून आला याचा नामदारांनी स्पष्ट खुलासा करावा. या दोघांना पैसे पुरविण्यात व त्यांच्या गुप्त कारवाईवर पांघरूण घालण्यात नामदारांचे अंग असावे असा लोकांना दाट संशय आहे. भांडवलवाल्यांना सामील होऊन जवळकरांची गिरणी कामगारांची चळवळ हार करण्याची कृष्ण कारस्थाने लक्षात घेता व इंग्लंडच्या सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार करता ते विलायतेतील हिंदुस्थानच्या हितशत्रूंच्या 'सोनेरी पिंजऱ्यात' खात्रीने सापडतील असे लोकांना वाटल्यास ते चुकीचे होईल काय?...या दुकलीचे इंग्लंडमध्ये कोणते खाजगी काम आहे व त्यांना हजारो रुपयांचा तनखा झऱ्यातील पाण्याप्रमाणे कोठून मिळतो हे आपणास पूर्णपणे माहीत असले पाहिजे..." विठ्ठलराव झेंडे, लिगाडे, अकडजचे माधवराव शितोळे देशमुख यांनीही वर्तमानपत्रात पत्रे लिहून भास्करराव‌ांवर कडक टीका केली. जेधे मॅन्शनमध्ये शंभरावर जास्त ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची सभा होऊन जाधव–जवळकर यांच्या कारवायांचा निषेध केला गेला. 'कैवारी' पत्राने अशिष्ट टीका करून ब्राह्मणेतर पक्षात बजबजपुरी

माजवली तसेच गुप्ते–जवळकर हे पक्षातर्फे इंग्लंडमध्ये कोणतीही चळवळ करण्यास नालायक आहेत अशा अर्थाचा मुख्य ठराव केशवरावांनी या सभेत मांडला.

जवळकरांच्या अचानक श्रीमंतीचे रहस्य जागृतीमध्ये 'पुण्या-मुंबईचा फिरस्ता' या टोपण नावाने लिहिणाऱ्या स्तंभलेखकाने अखेर फोडले. "रा. जवळकर हे सप्टेंबर महिन्यात कूपरच्या बंगल्यावर संधान जोडण्याकरिता गेले होते....१९२९ साली 'कैवारी' ना. जाधवांच्या ताब्यात आला, आणि त्याबरोबर न्यू कॅसल बार या देशी दारूच्या गुत्त्याची जाहिरात फडकली आणि दुसरे दारू मक्तेदार शहा आणि कंपनीचे मालक यांच्या जाहिरातींनी जवळकरांचा खिसा गरम झाला. न्यू कॅसल बारचे १२०० रु. रोख मिळाले, आणि दुसरे दारू मक्तेदार रुस्तुमशहा हे विलायती किरकोळ दारूचे लायसेन्स मिळविण्यासाठी कैवारी ऑफिसात दररोज चकरा घालू लागले .... ज्या जवळकरांना थर्ड क्लासच्या तिकिटाचे पैसे मिळण्याची मारामार तेच जवळकर आठवड्यातून दोनदा सेकंड क्लासने प्रवास करू लागले. ना. जाधवराव यांनी आपला हस्तक जवळकर मजुरांना फितवण्याकरिता अचूक सोडला. गिरणीमालक वाडियासेठदेखील जाधवरावांकडे चकरा मारू लागले. पुढे या फितुराने रा. कासले, रा. आळवे, रा. गडकरी वगैरे मजुरांचे पुढारी फोडण्याचे प्रयत्न केले. या फितुरीला रा. कासले व गडकरी बळी पडले. फितुरी-बद्दल वाडियासेठने गिरणीमालकांकडून भरपूर वेतन देवविले आणि अब्रूदार गब्रू झाले....कैवाऱ्याने ऊर्फ मजुरांच्या मारेकऱ्याने आपल्या बायकोच्या मैत्रिणीला अंगवस्त्राचा मान देऊन कुमार्गाला लाविले आणि शेवटी बिचारीच्या आयुष्याचे मातेरे केले." जवळकर मदिरा आणि मदिराक्षीच्या कचाट्यात सापडले होते. फुले, शाहूमहाराज ही माणसे निर्व्यसनी होती. मद्यपानाचा दुष्परिणामापासून बहुजन समाजाचे रक्षण व्हावे म्हणून त्यांनी नेहमीच मद्यपानाचा निषेध केला. निर्व्यसनी केशवरावही त्याच परंपरेचे पाईक! ब्राह्मणेतर पक्षाच्या मुखपत्रात दारूगुत्तेवाल्यांच्या जाहिराती झळकाव्यात, कैवारीचे संपादक व्यसनाच्या आहारी जावेत आणि भ्रष्टाचाराच्या जाळ्यात अडकावेत हे दृश्य निमूटपणे पाहणे केशवरावांना शक्य नव्हते म्हणून त्यांनी पक्षातील घाणेरड्या राजकारणाची लक्तरे चक्क चव्हाट्यावर टांगली!

या दिवसांत जवळकरांचा मुक्काम इंग्लंडमध्येच होता. तेथील 'डेली मेल' या साम्राज्यशाहीच्या कडव्या पाठीराख्या पत्रात जवळकरांचाच लेख प्रसिद्ध झाला. हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा दिल्यास पुन्हा पेशवाईचे दिवस येतील असे जवळकरांनी या लेखात म्हटले होते. त्यांच्या या लेखावर इंग्रज साम्राज्यवाद्यांचा हात फिरला असला पाहिजे असे त्यामुळे 'बॉंबे क्रॉनिकल' या कॉंग्रेसला अनुकूल असलेल्या वृत्तपत्राला वाटणे साहजिक होते.

केशवरावांबरोबरचा दुरावा तसेच तेढ यामुळे झालेल्या ताटातुटीमुळे जवळकरही खिन्न झाले होतेच. केशवरावांबरोबर पुन्हा आपली मैत्री जुळावी असेही जवळकरांना वाटत होते. पण तसे झाले नाही. जवळकरांबरोबरचे स्नेहपाश केशवरावांनी एकदा तोडले ते तोडलेच!

जुलै महिन्यात इंग्लंडमधून परतल्यावर त्यांनी सर्व मराठी बांधवांना उद्देशून एक जाहीर पत्रक काढले. " ता. १२ मार्चपासून (गांधींच्या दांडी यात्रेपासून) हिंदुस्थानातील राजकीय चळवळीचे नवे युग सुरू झाले. अर्थातच ' नवी विटी, नवे राज्य ' या न्यायाने आता जुन्या युगातील राजकीय पक्षोपपक्ष विसरून आपण हिंदभूमीची लेकरे आणि शिवाजीमहाराजांचे अनुयायी एवढेच नाते डोळ्यांसमोर ठेवून स्वराज्याच्या प्राप्तीसाठी झटू या. केवळ शिवाजीच्या नावाचा उच्चार करून स्वतःचा मोठेपणा मिरवण्याचे दिवस आता राहिले नाहीत. स्वराज्य, ब्रिटिश मालाचा बहिष्कार, खादीप्रसार इत्यादी अनेक कार्यक्रमांतून आपापल्या परिस्थितीप्रमाणे जो कोणता कार्यक्रम आपल्याला रुचेल तो आपण नेटाने व मनःपूर्वक चालविला पाहिजे. सरकारशी सहकार्य करण्याच्या कार्यक्रमाचे मोहपटल माझ्या डोळ्यांवरून साफ दूर झाले आहे. " जवळकरांचे हे मत-परिवर्तन म्हणजे त्यांच्या टीकाकारांनाही सुखद धक्का होता. जवळकरांची दृष्टी निवळली असे केसरीकर्त्यांनी म्हटले तर जागृतिकारांनी लिहिले, " सायमन कमिशनने मराठ्यांच्या जागा राखल्या म्हणून समाधान व्यक्त करणारे जवळकर सर्व मराठ्यांना हिंदी लढ्यात भाग घ्यायला ठासून सांगत आहेत.. टाइम्समध्ये कोणी ' कुणबी ' सहीने श्री. जवळकर यांच्यावर मोठा हल्ला केला आहे. या वेळी काँग्रेसचे कार्य उचलून धरले तरच पुढच्या प्राव्हिन्शिअल ऑटोनमीत मराठ्यांना राजकारणात वाव मिळेल या दृष्टीने श्री. जवळकर कार्य करीत असावेत असा आमचा समज आहे. " जवळकर काँग्रेसशी सहकार्य करण्याची भाषा बोलू लागले तरी त्यामुळे केशवरावांबरोबर त्यांचे सख्य झाले नाही. दोघेही आपापल्या वाटेने काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चाललेल्या स्वातंत्र्य-लढ्यात सामील होण्यासाठी चालत होते.

ब्राह्मणेतर पक्षाचे इतर नेते मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या सप्टेंबर महिन्यातल्या निवडणुकीची तयारी करण्यात गढले होते. या निवडणुकीत भास्करराव पहिल्या क्रमांकाची मते मिळवून निवडून आले. या निवडणुकीत ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर कोणाही उमेदवारास मत देऊ नका असा जवळकरांनी खासगी रीत्या व जाहीर प्रचार केला. जवळकर हे ब्राह्मणेतर पक्षाचे एक चिटणीस होते. कौन्सिलवर बहिष्कार व सरकारबरोबर असहकार करण्याचे आवाहन करून त्यांनी पक्षविरोधी वर्तन केले असा सरचिटणीस बाबूराव जेधे यांनी त्यांच्यावर ठपका ठेवला. आणि या ' आक्षेपार्ह वर्तनाबद्दल ' त्यांनी ३० सप्टेंबरला भरणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या सभेत खुलासा करावा असे त्यांना रीतसर नोटीस पाठवून सांगण्यात आले. एखाद्या सावकाराने कर्जदाराला ज्या भाषेत लिहावे तसे आपल्याला बाबूरावांनी लिहिले आहे अशी जवळकरांनी २७ सप्टेंबर १९३० रोजी भास्करराव यांना पाठविलेल्या पत्रात तक्रार केली, तसेच ब्राह्मणेतर पक्षातील मवाळ गटावर कडक टीका केली. कर्मवीर शिंदे कारावासात आहेत. साताऱ्याचे भाऊराव पाटील स्वराज्याश्रमाची म्हणजे तुरुंगाची वाटचाल करणार आहेत याची आठवण करून देऊन जेधेबंधूंनीही सत्याग्रहाच्या लढ्यात उतरावे असे त्यांनी सुचविले.

बाबूराव जेधे यांनी जवळकरांना पाठविलेली नोटीस आणि जवळकरांनी भास्करराव यांना लिहिलेले उत्तर दोन्हीचे ३० सप्टेंबर १९३० रोजी भरलेल्या कार्यकारी मंडळापुढे वाचन झाले. जवळकर यांना सभासद व चिटणीस म्हणून सस्पेंड करावे आणि नंतर त्यांचे सभासदत्व रद्द करावे अशी शिफारस करण्याचा ठरावही मंजूर झाला. हा ठराव मांडला जाणार इतक्यात जवळकरांची एक चिठ्ठी भास्करराव यांच्या हातात आली. आपल्याविरुद्ध कोणता ठराव झाला हे कळविण्याविषयी जवळकरांनी लिहिले होते म्हणून भास्करराव ठरावाची नक्कल करू लागले तेव्हा केशवरावांनी चिठ्ठी कोणाची व नक्कल कशाची करीत आहा असा भास्करराव यांना सवाल केला. भास्करराव यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने केशवरावांचा व त्यांचा खटका उडाला. तेव्हा अखेर चिठ्ठी जवळकरांची आहे हे भास्करराव यांनी कबूल केले.

१२ नोव्हेंबरला मंडईच्या पिछाडीस झालेल्या जाहीर सभेत अध्यक्ष म्हणून केशवरावांनी गोलमेज परिषदेच्या विरोधाचा ठराव मांडला. १८ नोव्हेंबरला केशवरावांवर वॉरंट बजावण्यात आले तेव्हा ते मिरवणुकीने फरासखान्यापर्यंत गेले. त्यांना अटक करून जुन्नरला नेण्यात आले. जिल्हाधिकारी पेरी यांनी केशवरावांना तीन महिने सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. केशवराव तुरुंगात असताना १६ जानेवारी १९३१ रोजी मुंबईत सोलापूर-दिनाच्या निमित्ताने जवळकरांनी आझाद मैदानावर राष्ट्रीय निशाण फडकावीत बंदीहुकूम मोडून भाषण केले. १२ जानेवारीला मल्लाप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, सारडा व कुर्बान हुसेन या सोलापूरच्या कार्यकर्त्यांना फाशी देण्यात आले होते. त्यांच्या फाशीचा निषेध करून हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत सर्वत्र हरताळ पाळण्यात आला होता. १६ जानेवारीस सत्याग्रह, लाठीहल्ला यामुळे आझाद मैदानाला युद्धभूमीचे स्वरूप आले होते. जवळकरांना व त्यांच्या सहकाऱ्यांना सव्वा वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावण्यात आली.

५ मार्च १९३१ रोजी गांधी व अर्विन यांच्यामध्ये समेट झाल्याने सरकारने सर्वच सत्याग्रहींना कारावासातून मुक्त केले. त्यामुळे सव्वा वर्षाची शिक्षा झालेले जवळकर अवघ्या दीड महिन्यात सुटले. १५ मार्चला नाशिकला झालेल्या काळाराम मंदिर-प्रवेशाच्या सत्याग्रहात दादासाहेब गायकवाड, राजभोज वगैरेंच्याबरोबर त्यांनी भाग घेतला. अस्पृश्य सत्याग्रहींना सनातनी सवर्ण हिंदूंनी मारहाण केली त्यात जवळकरांनाही मारहाण झाली. ९ मे १९३१ रोजी त्यांनी मुंबईत 'तेज' नावाचे नवे साप्ताहिक सुरू केले. "भांडवलशाहीच्या शेपटाला धरून राजकारणाची वैतरणी तरणाऱ्या आमच्या प्रसिद्धि-लंपट लोकांना आमची सोशॅलिस्ट मते पटली नाहीत म्हणून आपल्या गैरहजेरीत गणपतराव जाधव यांना 'कैवारी' पत्र बंद करावे लागले." असे पहिल्याच अंकातील लेखात जवळकरांनी सांगितले. "काँग्रेसमध्ये व्यापारी भांडवलवाल्यांचे वर्चस्व असले तरी जोपर्यंत काँग्रेसच्या शिरावर महात्मा गांधींचा वरदहस्त स्थिर आहे तोपर्यंत शेतकऱ्यांचे हित होवो ना होवो पण नुकसान मात्र खास होणार नाही." असा ते

निर्वाळा देऊ लागले. जवळकर विलायतेहून परत आल्यानंतर डाव्या विचारसरणीचे पुरस्कर्ते बनले होते. ब्राह्मणेतर चळवळीत केवळ 'मराठा' असल्याच्या भांडवलावर पुढारीपण मिळू लागले. मराठे-मराठेतर दुफळी माजली आणि तत्त्वनिष्ठेपेक्षा तोंड-पुजेपणाला महत्त्व आल्याने ब्राह्मणेतर चळवळीची शोचनीय अवस्था झाली असे ते सांगू लागले. जवळकरांचे हे 'तेज' साप्ताहिक जेमतेम चार-पाच महिने चालले आणि बंद पडले.

जवळकरांची प्रकृती वारंवार बिघडत होती. रक्तक्षयाचा विकार बळावत होता. अशक्तता वाढत होती. अशा अवस्थेत १९३१ च्या सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये नागपूरच्या तरुण ब्राह्मणेतर संघाचे सेक्रेटरी बाबूराव भोसले यांच्या आमंत्रणावरून जवळकरांनी नागपूर–वर्धा भागाचा दौरा करून ठिकठिकाणी व्याख्याने दिली. नागपूर येथील मित्रांच्या मदतीने तेथे एक वर्तमानपत्र काढावयाचे आणि ग्रंथमाला सुरू करावयाची असे त्यांनी ठरवले. ग्रंथमालेतील पहिले पुस्तक म्हणून 'क्रांतीचे रणशिंग' पुस्तक लिहावयास घेतले. आजारपणामुळे लेखनात सारखा खड पडू लागला. जवळकरांच्या आजारावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी त्यांना लिहिण्या–बोलण्यास तसेच वाचण्यास सक्त मनाई केली होती तरी थोडेसे बरे वाटताच वैद्यकीय सल्ला धुडकावून जवळकर पुस्तकाचा मजकूर सांगत असत. कशीबशी एकशेचार पाने लिहून झाली व ती छापली गेली पण त्यानंतर ३ मे १९३२ रोजी जवळकर निधन पावल्याने हे पुस्तक अखेर बाबूराव भोसले यांनी पुरे केले.

ब्राह्मणी तसेच ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनी जवळकरांच्या मृत्यूनंतरचे लेख प्रसिद्ध केले. त्यांत जवळकरांच्या जीवनकार्याचे आपापल्यापरीने मूल्यमापन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ११ मे १९३२ च्या अंकात दीनमित्रकारांनी लिहिले, "गेल्या चौदा वर्षांमागे ब्राह्मणेतर पक्षाचे कामाकडे कै. शाहू छत्रपती यांचे लक्ष गेले. त्यांच्या उदार आश्रया-भोवती जे अनेक गृहस्थ जमा झाले त्यांत कै. दिनकरराव जवळकर हे एक होते. यांना वाङ्मयाची आवड असल्यामुळे हे मनाने उदार होते. सफाईने बोलणे आणि चुरचुरीत लेख लिहिणे हे गुण यांच्या अंगात असल्यामुळे हे लवकरच पुढारी म्हणून पुढे आले. पण पुढाऱ्याच्या ठायी गंभीरपणा, दूरदर्शीत्व आणि परिस्थितीचे आकलन करण्याची शक्ती यांची जी आवश्यकता लागते ती यांच्या ठायी नव्हती. या एका दोषामुळे ते जसे चटकन चमकत तसेच ते मटकन बसत! तथापि त्यांनी आपल्या शक्तीच्याबाहेर समाजसेवा केली आणि त्या सेवेसाठी शारीरिक कष्ट सोसण्याचीही तयारी दाखविली ही विशेष अभिनंदनीय गोष्ट आहे. कोल्हापूर, सातारा, पुणे या भागात ब्राह्मणेतरांची चळवळ करण्यास यांची मुसांडीची धडाडी पुष्कळ अंशी कारण झाली. पुढे मुंबईस यांनी चळवळीस आरंभ केल्यावर यांचे सर्वच गाडे पालटले. तेथे त्यांना पुढारी म्हणून हजारो रुपये मिळाले; आणि ते युरोपची यात्राही करून आले. एक तडफदार कार्यकर्ता, चुरचुरीत लेखक आणि सफाईने बोलणारा वक्ता आम्हातून गेला याबद्दल आम्हास अत्यंत दुःख

होत आहे.'' १४ मे १९३२ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकात बडोद्याच्या 'जागृति' पत्रानेही जवळकरांचे चमकदार लेखन, प्रभावी वक्तृत्व आणि असामान्य धडाडी यांचे वाचकांना स्मरण करून दिले होते.

५ मे १९३२ च्या अंकात पुण्याच्या 'सकाळ'ने प्रसिद्ध केलेल्या मृत्युलेखात जवळकरांच्या खाजगी आयुष्यातील काही घटनांचा निर्देश केलेला होता. ''विलायतेला असताना सुद्धा त्यांच्या असभ्य वर्तनामुळे त्यांजवर एकदा खटला भरला होता ...'' याची नोंद घेऊन सकाळकारांनी म्हटले होते, ''त्यांनी कोणाही ब्राह्मणास कधी बरे म्हटले नाही. अनेक चळवळी केल्या त्या दुष्ट बुद्धीवर उभारलेल्या असल्याने सर्वच नाश पावल्या. स्वार्थ, अहंभाव आणि मत्सर हे त्यांचे मोठेच दोष होते.'' ज्ञानप्रकाशकारांनी मात्र जवळकरांच्या कामगिरीचे भरघोस कौतुक केले होते. ''जी गोष्ट कै. जोतिबा फुले यांना घडवून आणता आली नाही, जी घडवून आणण्यासाठी श्री. शाहूछत्रपतींची सत्ता व संपत्ती अपुरी पडली, जी साध्य करण्यासाठी लठ्ठे–जाधवरावांचे पुढारीपणही कमकुवत ठरले; ती ब्राह्मणेतर शेतकरीवर्गाची – बहुजनसमाजाची – जागृती श्री. दिनकररावांनी आपल्या वक्तृत्वाने, जिवापाड मेहनतीने व कमालीच्या युक्त्या-प्रयुक्त्यांनी अगदी अल्पकाळात घडवून आणली.'' या शब्दात ज्ञानप्रकाशकर्त्यांनी जवळकरांचा गौरव केला होता.

जवळकरांच्या मृत्यूनंतरही आता पन्नास वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. त्यामुळे अधिक तटस्थपणे त्यांच्या लेखनाकडे पाहणे आता शक्य झाले आहे. जवळकर हे मूलतः व मुख्यतः तत्त्वचिंतक नव्हते तर प्रभावी प्रचारक होते. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे किंवा भास्करराव जाधव यांच्या लेखनामागे जसे खोल तत्त्वचिंतन, वैचारिक शिस्त, विषयाचा सूक्ष्म व्यासंग, तर्कशुद्ध युक्तिवाद यांचे व्यापक अधिष्ठान होते तसे जवळकरांच्या लेखनात आढळत नाही. विचारशक्तीपेक्षा भावनेला आवाहन करून सामान्य वाचकास भडकावण्यावर प्रचारकी लेखनाचा भर असतो. जळजळीत भडक भाषा, विरोधकावर तुटून पडताना उपरोध, उपहास, टवाळी वगैरेंचा उपयोग असे प्रचारक करीत असतात. आपल्याला सोयीचा असा एकतर्फी युक्तिवाद करण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. सामाजिक चळवळींच्या इतिहासात लोकमत संघटित करताना असे लेखन अनेकदा प्रभावी ठरते. सामान्य माणसाच्या काळजाला हात घालण्याचे सामर्थ्य त्यात असते. या लेखनाच्या एकांगी, भडक रूपामुळे ते वादग्रस्तही ठरते; पण सामाजिक चळवळीचे रंगरूप लक्षात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतिहासाच्या अभ्यासकाला अशा लेखनाची दखल घ्यावीच लागते. महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने जवळकरांचे लेखन उपलब्ध करून दिले जात आहे ते याचमुळे!

◇◇◇



॥ श्री शिव-स्मारक पुराण ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०५६
दा. क्र. २५५५७
निबंध २७८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

श्री. "आग्यावेताळ" विरचित

॥ श्री शिव-स्मारक पुराण ॥

अर्पणपत्रिका

श्रीमत् समुद्र महाला ॥ तुझ्यामुळेंच हा गलबला ॥ हें पुराणही जन्मण्याला ॥ कारण तूंचि ॥ १ ॥ तुझी वर्णितांना थोरी ॥ ब्रह्मांदिकाहि येई घेरी ॥ कुळकवीही ठरे भिकारी ॥ ऐसा तूं प्रचंड ॥ २ ॥ तूंच वादाचा सागर ॥ तूंच दुफळीचा आगर ॥ तूंच अवदशेचा फेर ॥ ठरला मराठ्यांशीं ॥ ३ ॥ तुझ्यांत राही जरी देव ॥ तया दुहीचें भरेल हींव ॥ स्वत्त्वाची जाइल जाणीव ॥ ऐसा गुण तुझा ॥ ४ ॥ दुर्जना प्रथम नमन ॥ याच न्यायें हें अर्पण ॥ केलें आहे रे पुराण ॥ सख्या समुद्र–महाला ॥ ५ ॥ **आग्यावेताळ** मी अजाण ॥ घेई दिलें तें मानुन ॥ करूं नको बा अनमान ॥ हीच विनंति ॥ ६ ॥ श्री शिवस्मारक पुराण ॥ श्री **समुद्र महालार्पण** ॥ केलें अनन्यभावें जाण ॥ आग्यावेताळें ॥ ७ ॥

अध्याय १ ला

श्रीगणेशायनमः ॥ श्री शिवस्मारकायनमः ॥ राजर्षि नृपतयेनमः ॥ नमन सर्व चराचरा ॥ १ ॥ ॐ नमोजी माधवराया ॥ सर्व वादाचा जो मुख्य पाया ॥ वादी पहुडलेल्या शिंधया ॥ ध्यावा माझा नमस्कार ॥ २ ॥ जागृतीच्या सत्रा कुमारूं ॥ ध्येय जयांचें सरेंडरूं ॥ तयाहि माझा नमस्कारूं ॥ स्विकारोत सुखानें ॥ ३ ॥ मुद्रा संख्या सत्रा हजार ॥ ज्यानें झाला सर्व बाजार ॥ त्या रौप्य-राशीस नमस्कार ॥ अनन्यभावें करितसे ॥ ४ ॥ राहिले साहिलेले दानव ॥ चुकले माकलेले भूदेव ॥ वादांतिल चिलटें अभिनव ॥ तयाहि माझा नमस्कार ॥ ५ ॥ आतां पुरे नमस्कारूं ॥ वाढता होईल विस्तारू ॥ कंटाळेल कंपाझिटरू ॥ ह्मणेल छापूं कोठवरी ॥ ६ ॥ हा ग्रंथ लिहिण्या कारण ॥ शंका निघतिल विनाकारण ॥ ह्मणूनि करितो विवरण ॥ प्रस्तावनेसम समजा ॥ ७ ॥ कोणे एके काळाचे ठायीं ॥ बेत ठरविती नोकरशाही ॥ असहकारितेच्या समयीं ॥ निष्ठा कशी

कसावी ॥ ८ ॥ हीज रायल हायनेस ॥ वंद्य प्रिन्स ऑफ वेल्स ॥ आणावे हिंदुस्थानास ॥ चढाई करण्या गांधीवरी ॥ ९ ॥ प्रोगाम ठरला नेटकूं ॥ जाहिराती लागल्या फडकूं ॥ आनंदलेहो रावरंकू ॥ उत्साहाच्या भरानें ॥ १० ॥ श्री शिवाजी सोसायटी ॥ एक जात जींत मराठी ॥ इच्छा होती मोठी पोटीं ॥ शिवस्मारक करण्याची ॥ ११ ॥ राजर्षि जियेचे अध्यक्ष ॥ युवराजावरी रोखी लक्ष ॥ युवराज आणले समक्ष ॥ शिवस्मारक बसवाया ॥ १२ ॥ युवराज वदलें प्रेमानें ॥ शिक्षण चालवा जोमानें ॥ स्मारक सजणार विद्येनें ॥ हे शब्द राजपुत्राचे ॥ १३ ॥ नऊ लाखाचा जमेल फंड ॥ संस्था होतील त्या प्रचंड ॥ मराठे शिकतील हो उदंड ॥ ही आस सर्वा मनीं ॥ १४ ॥ मराठ्यांची एकनिष्ठा ॥ नव्हे नव्हे हो पोरचेष्टा ॥ सोसूनिया सर्व कष्टा ॥ तये दाविली त्यावेळा ॥ १५ ॥ सत्रा हजाराचें विवरण ॥ सत्रा अध्यायाचें पुराण ॥ सत्रा ओव्याचेंच जाण ॥ सत्रा पुढारी लीलांचे ॥ १६ ॥ ह्मणून थांबू सत्रावरी ॥ अध्याय संपवूं अगोदरी ॥ आग्या-वेताळाची भाजी भाकरी ॥ घेतील मानुनी सुजन ॥ १७ ॥ इति श्री शिव स्मारक पुराणें 'सत्रा' वाद कथायां पूर्ववर्णनपरः प्रथमोध्यायः समाप्तः ॥

अध्याय २ रा

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमत् प्रिन्साय नमः ॥ श्री व्हाइसरायेनमः ॥ नमन माझे गव्हर्नरा ॥ १ ॥ येरूं केले उपकारू ॥ म्हणोनि ठोकिले नमस्कारू ॥ शिव-स्मारक दिले उभारूं ॥ हे काय थोडे झाले ॥ २ ॥ येथवरी चालले ठीक ॥ काळाला देखवेना सुख ॥ जागी झाली त्याची भूक ॥ ग्रासिलें आमच्या प्राणा ॥ ३ ॥ मे महिना तारिख सहा ॥ जिने केले सारे स्वाहा ॥ हाय हाय रे दुर्दैवा ॥ काय वदूं आतां ॥ ४ ॥ मुंबापुरींत आमुचा जीव ॥ शाहुराया नृप राजीव ॥ ओवाळावा ज्यावरी जीव ॥ आपला वाटे सदा ॥ ५ ॥ करुणा आली नाहीं काळा ॥ नेले नेले हो वेल्हाळा ॥ शिव शिव तो लॉज पन्हाळा ॥ हंबरडा फोडूं लागे ॥ ६ ॥ अकस्मात् हे अरिष्ट ॥ हदरूनि गेला महाराष्ट्र ॥ जागे झाले अनेक दुष्ट ॥ आपुले डाव साधाया ॥ ७ ॥ निचेष्ट झाला ऐरावत ॥ कावळे बसले तया टोचित ॥ कोल्ही कुत्रीं आनंदांत ॥ धाक सगळा निमाला ॥ ८ ॥ सागर तीरीं राजमंदिर ॥ समुद्र महाल नाम सुंदर ॥ धनी तयाचे शिंदे सरकार ॥ गंगा जळींतला मीन ॥ ९ ॥ मनीं ब्राह्मण बटुचा प्रेमा ॥ जातभाई नये कामा ॥ ऐशी विचाराची रचना ॥ अलिजा बहादराच्या ॥ १० ॥ सत्य तेच मांडतो विचार ॥ रागावतील द्रव्य लाचार ॥ तत् पर्वेला कोण साचार ॥ जुमानील जाणपां ॥ ११ ॥ ऐसे ते शिंदे सरकार ॥ फर्माना सोडीती सत्वर ॥ समुद्र महालीं ठरणार ॥ शिवस्मारक योजना ॥ १२ ॥ जमले सारे जी हुजुर ॥ मोठमोठाले फेटे धर ॥ लंब्या बाता ठोकणार ॥ दरबारी होयबा ॥ १३ ॥ योजना केली बहुमतें ॥ स्मारक विद्येविना रिते ॥ होयबा डोलवी मानेते ॥ विसरले शाहुरायाला ॥ १४ ॥ विसरले शब्द युवराजाचे ॥ विसरले तत्व शाहुर्जाचें ॥ मेळे जमविले भटजीचे ॥ विसरले सोसायटीला ॥ १५ ॥ प्रसिद्ध झाले प्रोसिडिंग ॥ बाहेर पडले सारे बिंग ॥ विरोधाचे

वाजले शिंग ॥ तरुणें केला टणत्कार ॥ १६ ॥ प्रस्तावना येथें संपली ॥ मुख्य वादा पुढें पाही ॥ उडेल सगळी त्रिसाड घाई ॥ आग्यावेताळ हमी देत ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणें सत्रावाद कथायाम् श्रीमंतोन्मादपरो द्वितियोध्यायः समाप्तः ॥

अध्याय ३ रा

श्रीगणेशायनमः ॥ सुरुं वादाचा ओनामा ॥ एक पक्षी एक कामा ॥ दुफळी झाली अभेद्य ॥ १ ॥ एकास नांव श्रीमंतपक्ष ॥ दुज्या ह्मणावे तरुण पक्ष ॥ जनतेचें वेधलें लक्ष ॥ वाचाबाची सुरूं झाली ॥ २ ॥ तरुण मंडळ सरसावले ॥ निषेध निषेध ओरडले ॥ वृद्धहि मनांत चरफडले ॥ श्रीमंताच्यावरी ॥ ३ ॥ तस्करें लुटिली सोसायटी ॥ जाहली एकच हाकाटी ॥ सुरुं जाहल्या झटापटी ॥ वर्तमान पत्राच्या ॥ ४ ॥ दगड मातीचे डोलारे ॥ तरुण म्हणे नको बारे ॥ पूर्वी ठरलेले सारे ॥ झालेच पाहिजे हो ॥ ५ ॥ श्रीमंत म्हणे थांबा थांबा ॥ आणवूं आरते आरते रंगा ॥ नमूं ब्राम्हणचरणारविंदा ॥ सभ्या तरी आपण ॥ ६ ॥ बातमी फुटली हां हां म्हणतां ॥ जागी झाली सारी जनता ॥ हदरा बसला पुर्णे प्रांता ॥ सर्वांपरी जोरानें ॥७॥ अपमानीयली सोसायटी ॥ अपमानीयली दुनिया मराठी ॥ पैशाची देती दमधाटी ॥ चिरडूं म्हणे सहज ॥ ८ ॥ जागे झाले सभासद ॥ रिक्विझिशनचा तयार कागद ॥ सेक्रेटरीस केला सादर ॥ करवा म्हणती जादा सभा ॥९॥ सेक्रेटरी खरा फितुर ॥ झाला मनीं चिंतातुर ॥ बोलाविली सभा साचार ॥ केलें तयें धाडस ॥ १० ॥ आगष्ट मासीं हा धिंगाणा ॥ पुण्यास आला माधवराणा॥ "चोंबडे" डसले त्यांच्या काना ॥ भलभलते भासविलें ॥ ११ ॥ माधवराव रागावले ॥ गालिप्रदान देते झाले ॥ खरे पुढारी अपमानिले ॥ राजेपणाच्या आवेशी ॥ १२ ॥ सभासदही मग चिडले ॥ राजे खोटें ठरविले ॥ श्रीमंता मुखींत काढिले ॥ त्यावेळीं तेंच योग्य ॥ १३ ॥ भडकला वादाचा वणवा ॥ देवधरानें ठोकिल्या धांवा ॥ पगडी सांवरी भटजीबावा ॥ हलकल्लोळ उडाला ॥ १४ ॥ श्रीमंत पक्षही गडबडला ॥ समेट समेटही बडबडला ॥ डेप्युटेशन मागविता झाला ॥ स्वमताच्या पूर्तिसाठीं ॥ १५ ॥ डेप्युटेशन लटकें गेलें ॥ तें शिव्या सत्र उघडें झालें ॥ सर्व तरुण त्वेषें चिडले ॥ तरुण मराठा उसळला ॥ १६ ॥ डिसेंबरीची जादा सभा ॥ पुढील भागीं कळे तुम्हा ॥ आग्यावेताळ विनवी जना ॥ तोंवरी थांबावे ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् श्रीमन्तस्य नाचक्कीपरस्तृतीयोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय ४ था

श्रीगणेशायनमः ॥ नको नको हा पुन्हां पुन्हां ॥ परी ऐटिकेट या पुराणां ॥ सांभाळल्या पाहिजेत ॥ १ ॥ श्रोते ह्मावे सावधान ॥ मज नाहींत अष्टावधान ॥ राहिलें सांगणें एक जाण ॥ पहिल्या सत्याग्रहाचें ॥ २ ॥ स्मारकाचें काम सुरूं ॥ श्रीमंतानें केला जोरू ॥ तरुण गेले तया आवरूं ॥ झाला छोटा सत्याग्रह ॥ ३ ॥ काम राहिलें जाग्यावरी ॥

श्रीमंत बैसले घरच्या घरी ॥ पितर हंसले वरच्यावरी ॥ भ्याड श्रीमंता देखुनी ॥ ४ ॥ आतां बघूं सभा जादा ॥ डिसेम्बराच्या मुख्य वादा ॥ ज्यानें झाली सारी त्रेधा ॥ असा तो प्रसंग ॥ ५ ॥ आला आला डिसेंबर ॥ जमवूं लागती मेंबर ॥ बहुमताचा भरला बार ॥ तयार केला श्रीमंतें ॥ ६ ॥ भवानी पेठचे जे लोक ॥ छत्रपति-द्वेष्टे अनेक ॥ सहा रुपयास मेंबर एक ॥ श्रीमंत खरेदिती ॥ ७ ॥ खर्च केल्या रौप्यराशी ॥ सेना तयार केली खाशी ॥ शाहुंचे हेतु देण्या फांशी ॥ श्रीमंत पक्ष मथला ॥ ८ ॥ व्यर्थ व्यर्थ तुमची माता ॥ प्रसवली ऐशा भ्याड भूता ॥ होता जेव्हां वाघ जिता ॥ तेव्हां तोंडें लपविली ॥ ९ ॥ मेल्या वरी डाव साधिता ॥ शत्रुचिया धरुनि हाता ॥ मारतां शौर्याच्या बाता ॥ जळो जळो तें शौर्य ॥ १० ॥ हें शौर्य नव्हे हा सूड ॥ हें द्वेषाचें काळें तोंड ॥ लपवा संस्थानिका आड ॥ दावूं तरी नका हो ॥ १० ॥ राजर्षीच्या पुढें पुढें ॥ करीत होता हो केवढें ॥ पैशास्तवच कां एवढें ॥ धिक् धिक् असलें जिणें ॥ १२ ॥ ज्या नराला इमान नाहीं ॥ ज्या नराला ध्येय नाहीं ॥ ज्या नराला बाणा नाहीं ॥ तो एक षंढ जाणा ॥ १३ ॥ ज्या नराला चाड नाहीं ॥ जो निर्लज्ज भाड खाई ॥ जो सदा द्रव्यास पाही ॥ तो एक षंढ जाणा ॥ १४ ॥ जो पैशास्तव प्राण देईल ॥ जो धनास्तव विकी बाईल ॥ जें जिणें भूताचे आशाळ ॥ तो एक षंढ जाणा ॥ १५ ॥ पैसे मिळविती वेश्याही ॥ इमला उठवी राजेशाही ॥ परि तिजला सती अनुसयी ॥ ह्मणेल कांहो कोणी ॥ १६ ॥ ऐका ऐका श्रोतेजन ॥ जिवंत होते कांहींजण ॥ तयें राखला मराठी मान ॥ आग्यावेताळ सांगेल ॥ १७ ॥ इतिश्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायां षंढस्य लक्षणपरश्चतुर्थोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय ५ वा

श्रीगणेशायनमः ॥ शेमशेमच्या त्या सभा ॥ कोणी धजेना त्या जागां ॥ अध्यक्षाच्या पदावरी ॥ १ ॥ श्रीमंतें आणले मारेकरी ॥ सोडिले तरण्या पोरावरी ॥ परि शिव आमचा कैवारी ॥ गरीबाचा वाली तो ॥ २ ॥ शत्रुची केली मेजारिटी ॥ दिसण्यांत दिसे गोरगोमटी ॥ पैं येईल जईं उरापोटी ॥ तईं कळेल श्रीमंता ॥ ३ ॥ एका वनराजाच्यापुढें ॥ हजार रेडे काय बापुडे ॥ बहुसंख्या ढिली पडे ॥ पुरे एक छावा ॥ ४ ॥ मुरदाडांची मोठी सेना ॥ भाड्यानें आणली रंगणा ॥ साहील काय वार नाना ॥ सांग माझ्या बाचका ॥ ५ ॥ भाडोत्री जमले लाख ॥ तया जिंकी खरा एक ॥ सत्य करील पाठीराख ॥ असेना एक तो ॥ ६ ॥ सतीच करील जोहार ॥ वेश्या धरील बाजार ॥ तिजला कैचा कुळाचार ॥ संख्या तेथें कासया ॥ ७ ॥ स्वाभिमानी एक पुरुष ॥ लाखांत भरवील आवेश ॥ जिंकील तो अवघे विश्व ॥ संख्या तेथें कासया ॥ ९ ॥ श्रीमंतांची संख्या मोठी ॥ परि धडकी तयांच्या पोटी ॥ आणले होते आटापिटी ॥ अवसान तें व्यर्थ ॥ १० ॥ पाहुनि तरुणांचा जोर ॥ ज्यांच्या धैर्या न पारावर ॥ प्रत्यक्ष शिवाचे जे अवतार ॥ तमा नसे प्राणाची ॥ ११ ॥ ठरावाची लटपट केली ॥ खुमखुमी सारी मनिं

जिरली ॥ केली खटपट व्यर्थ झाली ॥ अवसान घातकी श्रीमंत ॥ १२ ॥ रक्या राऊतांचा जोर ॥ किती वेळ हो टिकणार ॥ वेळींच मागें सरणार ॥ असले शूर श्रीमंत ॥ १३ ॥ संपली दहा डिसेंबर ॥ येथून भांडण भेसूर ॥ सुडाची भावना बलवत्तर ॥ श्रीमंतांच्या ये मनीं ॥ १४ ॥ शिवस्मारक परिषद ॥ पार पडली निर्विवाद ॥ मुंबईस नव्हता हा भेद ॥ मराठ्यांत यावेळीं ॥ १५ ॥ आग्यावेताळ मी लेकरू ॥ पहात आहे सेवा करूं ॥ जर शब्द गेला अनिवारू ॥ थोर चित्तें अवलोकीं ॥ १६ ॥ सतरावी ओंवी आली ॥ मर्यादा येथे संपली ॥ लक्ष टाका पुढल्यावरी ॥ विनवी मर्यादेनें ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् श्रीमंत गुंड गोंधळपरो पंचमोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय ६ वा

श्रीगणेशायनमः ॥ दोन पक्ष झाले पहा ॥ करूं प्रत्येकीं वर्णना ॥ पुढल्या संदर्भासाठीं ॥ १ ॥ आदि पाहूं श्रीमंत पक्ष ॥ कोणकोणते वीर दक्ष ॥ तरुणांना करण्या भक्ष ॥ चंग बांधूनि थाटले ॥ २ ॥ उभय पक्षाच्या वर्णनानें ॥ पुढें सोपें हो समजणें ॥ ज्यांनीं माजविली मोठी रणें ॥ ते श्रीमंत कोणते ॥ ३ ॥ अलिजाबहादुर शिंदे सरकार ॥ श्रीमंत पक्षाचा मुख्य आधार ॥ गंगा जळींचा घमेंडखोर ॥ जोर दावी द्रव्याचा ॥ ४ ॥ शाहु पुढचे हें कोंकरूं ॥ राजकारणांतलें लेंकरू ॥ पाहे गवसणी गगना घालूं ॥ शक्य काय हे असे ॥ ५ ॥ शिंदे सरकारची सेना ॥ तपासावीं श्रोते जना ॥ यथा शक्तीमती त्यांना ॥ पुढे ठेवतों सुजनांच्या ॥ ६ ॥ यज्ञ भडकतां वादाचा ॥ कळीकाळाची बसे वाचा ॥ परी जागृति करी नंग्या नाचा ॥ धन्य धन्य मातापितरें ॥ ७ ॥ गालीप्रदाना नित्य करी ॥ श्रीमंताची बाजू सावरी ॥ धोंडा बांधोनियां उरीं ॥ डोहीं उडी टाकीत ॥ ८ ॥ नाहीं नाहीं तें बोलली ॥ उन्मादानें फुरफुरलेली ॥ वाही बगे ही लाखोली ॥ तरुणावरी सदा कदा ॥ ९ ॥ भुंकणें हेंच तुझें काम ॥ धनावरी तुझें प्रेम ॥ जागृति घेतलेले नाम ॥ व्यर्थ हातानें करी ॥ १० ॥ श्रीमंताचीं कुत्रीं कुलंगीं ॥ पुढें केलेली भित्रीं लफंगी ॥ केव्हां येईल श्रीमंता अंगीं ॥ हे त्यांनाही कळेल ॥ ११ ॥ इंग्रज प्रभूचे पडनोकरूं ॥ अति शाहण्याचें सूत्रधारू ॥ ऐसे पी. सी. पाटील थोरूं ॥ युक्त्या लढवी सदा कदा ॥ १२ ॥ गोड जिव्हा बकाचें ध्यान ॥ सोडूं पाहे कुचके बाण ॥ समाजांतली नासकी घाण ॥ लागलेली किडही ॥१३॥ टोळासमान घाली धाड ॥ विदवत्ता जयाची अवजड ॥ ऐसा "आर. जी. शिंदे" मूढ ॥ वकील कैसा जाणपां ॥ १४ ॥ वकील नव्हे हा हमाल ॥ श्रीमंताचे बोजे उचलणार ॥ याला स्वमत कैसे असणार ॥ कोरडा एल्एल्बी ॥१५॥ श्रीमंताचें हें वासरूं ॥ सोडून गेले गांवदरूं ॥ वापसलेले अनीवारू ॥ शेवट त्याचा ठरलेला ॥ १६ ॥ सत्रा पुराण अति सुरस ॥ पुढील भागीं चढेल रस ॥ श्रोते होतील समरस ॥ आग्यावेताळ सांगतो ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रा वाद कथायां श्रीमंत धुरिण वर्णनपर षष्ठमोध्यायः समाप्तः ॥

अध्याय ७ वा

श्रीगणेशायनमः ॥ बोम्ब्या गणेशायनमः ॥ पितळी दरवाजायनमः ॥ श्रीमंत पक्षांतल्या ॥१॥ भोळा वरुनी साधासुधा ॥ नेत्रें निरखी कोठें मलिदा ॥ परद्वेषी तत्पर सदा ॥ ऐसा जगताप मास्तर ॥ २ ॥ आधी होता तरुण पक्षीं ॥ चारा पाहोनी गेला पक्षी ॥ श्रीमंताच्या पडला भक्षी ॥ केवळ स्वार्थानें ॥ ३ ॥ शाळेंत नको वदे मराठे ॥ भरली पाहिजेत कट्टी भटें ॥ भूदेवांचें प्रेमवाटे ॥ या जगताप मास्तरां ॥ ४ ॥ हा मास्तर नव्हेच जाण ॥ भट पायाचें **पायताण** ॥ घालितो भावें लोटांगण ॥ भटाच्या चरणावरी ॥५॥ सत्य समाजा नांवें टेवी ॥ पत्रोंपत्रीं शिव्या वाहीं ॥ सत्यसमाजा तत्त्व नाहीं ॥ हा केवढा तत्त्वनिष्ठ ॥ ६ ॥ राजर्षींच्या पुढें जातां ॥ मारी सुधारणेच्या बाता ॥ ज्ञानप्रकाशीं धांवे आतां ॥ सत्य समाजा नडविण्या ॥ ७ ॥ साधु कसला हें लाचारूं ॥ श्रीमंत ताटाचें मांजरूं ॥ डोळे झाकून लागे नेहरुं ॥ कोठें गोळा लोणीयाचा ॥ ८ ॥ पैशापुरते केले सोंग ॥ आता विरुद्ध बांधी चंग ॥ भोळा नव्हे हा निस्संग ॥ समाज कंटक जाणावा ॥९॥ पाही श्रीमंताच्या हिता ॥ गरिबांना झाडी लाथा ॥ सत्रा हजार वादकर्ता ॥ हाच वाचकारे ॥ १० ॥ यानेंच केला घोटाळा ॥ हाच कारण रे गोंधळा ॥ साधुवृत्तिचा हा बगळा ॥ कापी मान सर्वांची ॥ ११ ॥ नाना रंगाचा हा नट ॥ वेष पालटी अनेकपट ॥ करील कोणती खटपट ॥ नाहीं नेम याचा ॥ १२ ॥ चोराला दावील मलिदा ॥ धन्याला देईन धतुरा ॥ स्वार्थ साधतां पुरोपुरा ॥ पर्वा यास दुजी न ॥ १३ ॥ हे जिजाबाईच्या शिवबाळा ॥ देशद्रोही तुझ्याही वेळां ॥ आजही जमला त्यांचा मेळा ॥ दुर्दैव मराठ्यांचें ॥ १४ ॥ दुर्दैव आमच्या देशाचें ॥ दुर्दैव सख्या शिवबाचें ॥ दुर्दैव देव शाहुचें ॥ ऐसे निपट जन्मले ॥ १५ ॥ क्षीरसागरीच्या नारायणा ॥ अजुनि तुला नये करुणा ॥ मराठे लागले रे मरणा ॥ कैचा तूं मग देव ॥ १६ ॥ थांबा थांबा हो वाचक ॥ सत्रा ओव्यांची आटक ॥ आग्यावेताळा देई भाक ॥ पुढें वाचण्याची ॥ १७ ॥ इतिश्री शिवस्मारक पुराणे सत्रा वाद कथायाम् जग-ताप वर्णनपर सप्तमोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय ८ वा

श्रीगणेशायनमः ॥ शिकला जर कृष्णाचा मामा ॥ लावील सत्या निजधामा ॥ ऐशीच गति झाली ॥ १ ॥ कोल्हापुरचा जाधव भास्कर ॥ विद्वत्तेनें झाला क्रूर ॥ श्रीमंत पक्षातला शिरजोर ॥ तयार शिव विकण्याला ॥ २ ॥ नित्य मता सोडी नवोनव ॥ सत्याची जया नाहीं चव ॥ हा पुढारी कीं स्वार्थी मानव ॥ कळो न देईल या जन्मीं ॥३॥ गंभीर मुद्रा वदे शांत ॥ अन्तरी कुचका सदा भिजत ॥ ही अर्वाचीन त्रिशंकु जात ॥ या उपमा दुजी नाहीं ॥ ४ ॥ बि. पी. जगताप इंजिनियर ॥ स्वच्छ जैसा सोपपियर ॥ अन्तरी दगडी कोळशाचा धूर ॥ सदा बूट पाटलोनिया ॥ ५ ॥ पांढरा परवेस हा पातला ॥ इंजिनियरी खेळ खेळला ॥ अखेरीला धूम पळाला ॥ जाऊन दडला संस्थानी ॥ ६ ॥

सेक्रेटरी के. एम. पवार ॥ कृष्ण वर्णाचा हा निशाचर ॥ सोसायटी बुडविण्या तत्पर ॥ मांगही लाजेल या ॥ ७ ॥ भेकडांत पहिला नंबर ॥ परि अवसानाचे अवडंबर ॥ श्रीमंत हातिचा हा रबर ॥ कसाही या ओढावा ॥ ८ ॥ श्रीमंताची ही धोकटी ॥ उपकरण दप्तर याचे पोटीं ॥ साधनें ठेविली अनेकपटी ॥ असले सेक्रेटरी ॥ ९ ॥ सोसायटीचें हें भगदाड ॥ श्रीमंत घाली येथून धाड ॥ प्रेतावरचे जणु गिधाड ॥ केव्हां जाईल देवा ॥ १० ॥ कोलंबोचा नारु पवार ॥ ओळखीला नको आधार ॥ अखंड कीर्ति सर्वभर ॥ हे पुढारी आमुचे ॥ ११ ॥ शंकरराव कातरणीकर ॥ ह्यातारा मोठा खबुतर ॥ काय बोलेल हो वरवर ॥ नेम नाहीं त्याचा ॥ १२ ॥ ग्वालेरीचा हा नोकर ॥ ही ओळख पुरोपुर ॥ वाचका दावी आकार ॥ याच्या काळजाचा ॥ १३ ॥ आमचे शहाबादी फत्तर ॥ सतरा जनांतले काळभोर ॥ केव्हां येतील शुद्धीवर ॥ वाट पाहूं अजुनि ॥ १४ ॥ श्रीमंताचे लंगडे घोडे ॥ नांव ठोसर टुण टुण उडे ॥ बाया बापड्यांतले पुतळे ॥ श्रीमंत पुढें करिती ॥ १५ ॥ ही लाल लगामाची घोडी ॥ बुट्टेपणी करी नासाडी ॥ आपोआप मारील दडी ॥ यात वेळ न लगे ॥ १६ ॥ पुराणाला चढला रस ॥ श्रीमंताचे वर्णन सुरस ॥ होईल तेतुकी कोशिस ॥ आग्यावेताळ करी ॥ १७ ॥ इति श्री शिव स्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् श्रीमन्तमुरदाड वर्णनपरोऽष्टमोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय ९ वा

श्रीगणेशायनमः ॥ नवमध्यायनमः ॥ श्रीमंत वर्णनाय नमः ॥ हें देखले नमन ॥१॥ शेटे नावाचें मास्तरूं ॥ श्रीमंत पक्षांतले पाखरूं ॥ राहिले होते चुकारूं ॥ अजून वर्णनांत ॥ २ ॥ हा श्रीमंताचा वस्तरा ॥ जाग्रतीवर घासे खराखरा ॥ भेडसावण्या लहानपोरा ॥ सदा पाजळलेला ॥ ३ ॥ ठुबे नांवाचे लक्ष्मीधर ॥ इमारतीचें कॉन्ट्रॅक्टर ॥ श्रीमंतांना मोठा आधार ॥ अशाच लोकांचा ॥ ४ ॥ ऐशी थाटली द्रव्यसेना ॥ डाव खेळूं लागे नाना ॥ राजर्षि द्वेषा देई चेतना ॥ ऐसे हे घरभेदे ॥ ५ ॥ पूर्वीचे शाहूचे नोकर ॥ कीर्तिवानराव निंबाळकर ॥ मागून झालेले फितूर ॥ मिळाले श्रीमंत पक्षा ॥६॥ शिंद्याचें ते होमपेंवर ॥ श्रीमंत खासेसाव पवार ॥ दिसण्यांत मोठा सुकुमार ॥ परि अंतरी निराळा ॥ ७ ॥ गोरा गोमटा गोडबोले ॥ करणी करतां वक्र चाले ॥ टाकी पाऊलावरी पाऊले ॥ आलिजाबहाद्दराच्या ॥ ८ ॥ खासेराव नांव जाधव ॥ म्हणवी मोठा स्वतःसाव ॥ परि विद्यार्थ्यावरीहि घाव ॥ घालण्या न चुके ॥ ९ ॥ दाखवीं मोठें राजकारण ॥ मुत्सद्याची ऐट आणून ॥ ओसाड गावची ही सुवाशीन ॥ अखेर पैं ठरली ॥ १० ॥ छातीस बांधुनिया कंबर ॥ वाद मिटविण्या घे येरझार ॥ बडोद्याहून येथवर ॥ सत्य तेथें विसरोनि ॥११॥ तरुणांना भुलवूं पाही ॥ वृद्धांना फसवूं जाई ॥ सत्याला फांशी देई ॥ केवळ स्वार्थानें ॥ १२ ॥ माधव नांवाचा घोरपडे ॥ शाईवाल्याचे बंधु बापुडे ॥ सरदार नसता उगाच चढे ॥ देई श्रीमंता थारा ॥१३॥ पत्रावळी येवढीं ज्यांची कुळें ॥ ऐसे अनेक समुद्रे मग्न झाले ॥ जातीवर जाण्या सदा टपले ॥ द्वेष करिति मराठ्यांचा ॥१४॥ काळाच्या

फिरत्या चक्रानें ॥ मराठे पिडले दारिद्र्यानें ॥ यांची साधली संधानें ॥ खरा मराठा दडपी ॥ १५ ॥ केवळ पैश्याच्या जोरावर ॥ मिळेल काय हो कूळ थोर ॥ ऐसें असतां खरोखर ॥ श्रीमंता हे समजेना ॥१६॥ ऐसे हे श्रीमंत वीर ॥ आग्यावेताळ वर्णी पामर॥ पुढील अंकीं तरुण पोर ॥ कळतील वाचका ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे, सत्रावाद कथायाम् श्रीमंत चिल्लर वर्णनपरो नवमोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय १० वा

श्रीगणेशायनमः ॥ हा तो विद्येचा ओनामा ॥ संसारीं हरघडी ये कामा ॥ याविण ना कुणी ॥ १ ॥ शिवस्मारकाच्या भांडणीं ॥ तरुण मनाची काय मांडणी ॥ जाणण्या श्रोते अतुर मनी ॥ जाणितसे मी ॥ २ ॥ विद्येचा वाद यांत मुख्य ॥ मतभेदानें तुटले सख्य ॥ तरुण पक्षीं कोण प्रमुख ॥ कसे कसे होत गेले ॥ ३ ॥ बी. एल. पाटील पूर्विचा ॥ नंतर मिळाला श्रीमंता ॥ भगवन्त शिंदे आतां ॥ जाती वानप्रस्थाश्रमा ॥ ४ ॥ व्ही. आर शिंदे वयोवृद्ध ॥ परी असत्यावरी क्रुद्ध ॥ माजे जरी घनघोर युद्ध ॥ रतिहि मागे सरेना ॥ ५ ॥ अस्पृश्याचें केले काज ॥ सर्व लोकांना श्रुत आज ॥ स्वार्थत्यागाचा जया साज ॥ शोभवीं संपूर्ण ॥ ६ ॥ दुजे विट्ठलराव झेंडे ॥ सत्यासाठीं सदा भांडे ॥ सर्वस्व अर्पण करण्यापुढें ॥ ऐसा लोक विरळाच ॥ ७ ॥ वीस हजार देण्या तयार ॥ सत्याग्रही खरा वीर ॥ स्वार्थत्यागा न पारावार ॥ अशा वृद्धवर्यी ॥ ८ ॥ ऐसे तरुण मंडळाचे अध्यक्ष ॥ सत्कार्यी जे सदा दक्ष ॥ तरुणाचें वेधिति लक्ष ॥ सदा सत्याकडे ॥ ९ ॥ विजयी मराठे श्रीपतराव ॥ दुफळीची जया पूर्ण जाणीव ॥ समतोल परी करी चढाव ॥ वेळीं कधी न डगमगे ॥१०॥ अलिजाबहादुर घेई चावा ॥ आमच्या विजयी श्रीपतरावा ॥ म्हणे पैशास्तव धरी दावा ॥ ऐसे श्रीमन्ती विधान ॥ ११ ॥ अरे शिंद्या श्रीमन्त माधवा ॥ आग लागो तुझ्या द्रव्या ॥ विजयी मराठा नव्हे हुजऱ्या ॥ धनराशीस भुलणार ॥ १२ ॥ तयें फुंकिले रणशिंग ॥ श्रीमन्ताची पांगापांग ॥ जो सदा सत्कार्यी दंग ॥ ऐसा विजयी मराठा ॥ १३ ॥ नव्हे नव्हे ही "जागृति" ॥ ही शाहुची तोफ धडधडती ॥ तुम्हा सारखी भुंकली कुतरीं ॥ तरी लक्ष ना दे ॥ १४ ॥ नोकरीवरी मारुनि लाथ ॥ समाजकार्या वाहुनि घेत ॥ ना खुषविण्या श्रीमन्त ॥ येवढें केलें ॥ १५ ॥ शाहुरायाच्या भक्तिसाठीं ॥ राहूं उभे कड्याच्या काठीं ॥ जहर ही पचवूं पहा पोटीं ॥ केवळ शाहुकरितां ॥ १६ ॥ ऐसा शाहू भक्तांचा तांडा ॥ फिरवील काळाच्याही तोंडा ॥ आग्यावेताळ म्हणे दंडा ॥ दंडाहो श्रीमन्त ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् मर्द तरुणवर्णनपरो दशमोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय ११ वा

श्रीगणेशायनमः ॥ तरुण वर्णनायनमः ॥ दिलदार वृत्तयेनमः ॥ नमन मोकळ्या मना ॥ १ ॥ तरुण पक्षाचें जेधे बंधू ॥ वाटे जयाचें चरणा वंदु ॥ शाहू सेवा पाहे

साधू ॥ सदा मुद्रा आनंदी ॥ २ ॥ जेधे मॅन्शनाची ख्यात ॥ भटा भिक्षुका धडकी भरत ॥ श्रीमंत पक्षिया हींव येत ॥ ऐकून नांव जेधे ॥ ३ ॥ शिव स्मारका करता तयार ॥ रुपये खर्चण्या दहा हजार ॥ लाजविले राजेही साचार ॥ धन्य धन्य ते जेधे ॥ ४ ॥ गवंडी बंधू पुणें शहरीं ॥ तरुण पक्षाची शिलेदारी ॥ गाजवी तत्त्वनिष्ठा खरी ॥ धन्य धन्य ते बंधु ॥ ५ ॥ बर्गे नांवाचे रामराव ॥ घाली दुस्मानावरी घाव ॥ शाहूरायावरी एक भाव ॥ निष्ठा अलौकिक ॥ ६॥ गणपतराव यशवंतराव ॥ शिंदे उपनावाचे भाऊ ॥ समुद्र महाल्या येई हिवूं ॥ जया पाहूनिया ॥ ७ ॥ दाजी बापूजी भिलारे ॥ जागतीज्योत शिवबाचें वारे ॥ थोर पक्षीं भीति थरारे ॥ जयाला देखोनिया ॥ ८ ॥ सुर्वे राणे लाइफ्-मेंबर ॥ प्रतिष्ठितांना करी बेजार ॥ पैसाळलेल्यांना अनिवार ॥ जोर जोरे हटविती ॥ ९ ॥ पाताडे, लोमटे निर्मळ ॥ लाळघोट्यांचे कर्दनकाळ ॥ श्रीमंत पळे रानोमाळ ॥ जयांना देखोनिया ॥ १० ॥ बेळगांवचा "राष्ट्रवीर" ॥ खानदेशचा "आत्मोद्धार" ॥ एक सवाई एक वीर ॥ ऐसें हें तरुण पक्षी ॥ ११ ॥ बाबुराव बागवे परब ॥ जयाची श्रीमंता जरब ॥ झगडती हो रात्रंदीन ॥ शिवस्मारकासाठी ॥ १२ ॥ मुंबईचे पवार, राणे ॥ सरळ मनाचें बापू माने ॥ कोरेगांवकर ही इमानें ॥ झगडती अहर्निश ॥ १३ ॥ गोपाळ क्लबचे निंबाळकर ॥ मोरे वाचस्पति अवतार ॥ ऐसा तरुणांचा संभार ॥ सदा तत्पर स्वधेर्यीं ॥ १४ ॥ साताऱ्याचें भाऊ पाटील ॥ विचारे केशवराव विश्राम ॥ तरुणांचेच करी काम ॥ भक्त शाहू रायाचे ॥ १५ ॥ एक एक रण धुरंधर ॥ जया शिवाजी राखणार ॥ जयांचा शाहू आधार ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ १६ ॥ आग्या वेताळ वंदी चरणा ॥ नमन माझे ऐशा तरुणां ॥ चालवाया पुढें लोणा ॥ ऐशाच जोरानें ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् तरुण सिंह वर्णनपर एकादशमोध्याय समाप्तः ॥

अध्याय १२ वा

श्रीगणेशायनमः ॥ तरुण मर्दाचे वर्णना ॥ आनन्दते माझी रसना ॥ प्रेमानन्दे उचंबळें ॥ १ ॥ अनेक पत्रें अनेक वीर ॥ अनेक मूर्ति अनिवार जोर ॥ वर्णिता नये पूर्वापार ॥ अल्पमती मी असे ॥ २ ॥ हजार हस्ते वंदावे ॥ हजार जिव्हे गुण गावें ॥ हजार वेळीं जन्मावें ॥ ह्यांचेच गुण गाया ॥ ३ ॥ हीं मराठ्यांची भावी पिढी ॥ अलौकिक यांची धडाडी ॥ आणलें श्रीमंतांना रडी ॥ अशा लहान वयींच ॥ ४ ॥ मराठी जनता त्या आधार ॥ मराठी इमान ही समशेर ॥ राजर्षि शाहू ही रणभेर ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ ५ ॥ बोलेल तैसाच करणार ॥ मेला तरी ना हटणार ॥ तत्त्वा आजीव धरणार ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ ६ ॥ शिवछत्रपतिची पुण्याई ॥ ह्याविण दुजा खजीना नाहीं ॥ इतिहासाची घेई ग्वाही ॥ ऐसा हा तरुण पक्षी ॥ ७ ॥ हर हर महादेव हा मंत्र ॥ जयाचेच हें वेद सूत्र ॥ शिव सेवेशीं जो सदा रत ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥८॥ जर शिवबाचा झाला छळ ॥ उलथे करील भूमंडळ ॥ भिरकावील तो कळीकाळ ॥ ऐसा

हा तरुण पक्ष ॥ ९ ॥ शिवरायाविण स्वार्थ नाहीं ॥ स्वाभिमानाविणें जिणें नाहीं ॥ शिवापुढें स्वर्गतुच्छही ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ १० ॥ नको हो इंद्राचे आसन ॥ पुरे तया शिवाचें चरण ॥ पुरें तया शाहूस्मरण ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ ११ ॥ बनलेले समाज संन्यासी ॥ सोडिले माया लोभाशीं ॥ एक रूप बनले शिवाशीं ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ १२ ॥ होऊं द्या संसाराची होळी ॥ जाऊं द्या सौख्य पायातळी ॥ शिवावरी प्राण ओवाळी ॥ ऐसा हा तरुण पक्ष ॥ १३ ॥ येऊं द्या हो अलिजाबहादर ॥ आणीक कोणताही कुबेर ॥ आमचा शिवाजी राखणार ॥ विकणार नाहीं कदा ॥ १४ ॥ असेल मोठा अधिकार ॥ असतील द्रव्य भांडार ॥ तया येईल काय सर ॥ आमच्या शिवरायाची ॥ १५ ॥ राखा राखा मराठी बाणा ॥ सार्थक करा आलिया जन्मा ॥ शिवप्रभूच्या राखा माना ॥ हेंच मराठीपण ॥ १६ ॥ 'आग्यावेताळ' मी तरुण ॥ वन्दी तरुणाचेंच चरण ॥ पुण्यप्रद त्याचे स्मरण ॥ करी अन्यन्य भावें ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् तरुणपक्षवर्णनपरो द्वादशोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय १३ वा

श्रीगणेशायनमः ॥ शिव स्मारकाच्या रंगणा ॥ घालावे हो कुंपणा ॥ सोसायटी ठरवी ॥ १ ॥ सोसायटीचे अधिकारी ॥ प्रतिष्ठिताचे पाणी भरी ॥ केली तये फंदफितूरी ॥ कुंपण होईना ॥ २ ॥ समुद्र महात्यांचे वर्तन ॥ सोसायटी निषेधी जाण ॥ केला ठराव सत्य पूर्ण ॥ दहा आगष्टी ॥ ३ ॥ मिनिट बुकावर गेला नाहीं ॥ भलते डाव खेळूं पाही ॥ पास ठराव फेकून देई ॥ ऐसे हे श्रीमत ॥ ४ ॥ तरुण मंडळाचे चिटणीस ॥ शाळेतून काढीं तयास ॥ गुंडाळिले सर्व डोक्यास ॥ श्रीमत पक्षानें ॥ ५ ॥ समुद्र महाले बांधी कंबर ॥ छळण्या तरुणांना सत्वर ॥ वर्णन येथून भेसुर ॥ ऐका हो वाचक ॥ ६ ॥ एकेकावरी आणी संकट ॥ सोडोनिया मार्ग घोपट ॥ धरली वाम भागी वाट ॥ श्रीमंत पक्षिये ॥ ७ ॥ रोज नवा नवा डाव ॥ नित्य नवे करीति भाव ॥ जया नाहीं ठिकाण ठाव ॥ ऐसे तर्क करी ॥ ८ ॥ कोणी म्हणे स्मारक जागा ॥ सोसायटीचीच नसे गा ॥ जमाखर्चही वदती खोटा ॥ सोसायटीचा असे ॥ ९ ॥ शिवाजी स्कूलचा फंड ॥ कोठें राहे जाणे देव ॥ कोणी गिळिला नये ठाव ॥ पत्ता लागो न देती ॥ १० ॥ गेणू कुंभार जागेवाला ॥ श्रीमंतानें जागा केला ॥ विटा रची त्या जागेला ॥ काय काय सांगावे ॥ ११ ॥ सत्रा हजार कोणीं दिलें ॥ वाद निघाला जोरानें ॥ लुच्चेपण बाहेर आले ॥ श्रीमंताचे तयीं ॥ १२ ॥ सोसायटीला बुडवीत ॥ दप्तरें खोटी ठरवीत ॥ श्रीमंत हिता पाहात ॥ ऐसे हे हुजरे ॥ १३ ॥ सोसायटीची जागा नाहीं ॥ ऐसी केली कोल्हे कुई ॥ असले मुर्दाड जातभाई ॥ आमच्या नशिबी ॥ १४ ॥ जळो जळो असली वाचा ॥ तोटा करी जी सोसायटीचा ॥ अपमान करी शाहुजीचा ॥ जी वाणी अभद्र ॥ १५ ॥ सत्याला जो आग लावी ॥ ऐसा तो जगताप भाई ॥ म्हणे आमची जागा नाहीं ॥ बडबडला नीचपणें ॥ १६ ॥ सत्रा अध्यायाचे पुराण ॥ श्रीमंताच्या उरीं

बाण ॥ करील त्यांची दाणादाण ॥ आग्यावेताळ जाणतो ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रा वाद कथायाम् जगतापोन्मादपर त्रयोदशोध्यायः समाप्तः ॥

अध्याय १४ वा

श्रीगणेशायनमः ॥ श्रीराजीनामायनमः ॥ श्री समुद्र महालायनमः ॥ नमन राजकारणाला ॥ १ ॥ सोसायटींत श्रीमंतें ॥ केले बहू संख्येतें ॥ झाले तरुणांना छळते ॥ वाटमारे श्रीमंत ॥ २ ॥ राणे देती राजीनामा ॥ वादविवाद होई कामा ॥ बाजूस राहाणें हें उत्तमा ॥ वाटले तया ते वेळीं ॥ ३ ॥ केव्हां करतील लफडें कांहीं ॥ श्रीमंताचा नेमच नाहीं ॥ ह्मणून राजीनामा देई ॥ आमचे व्ही. एम्. राणे ॥ ४॥ तदनंतर कांहीं दिन ॥ वाद चालला दैनंदिन ॥ सुर्वेहि तयार झाले जाण ॥ राजिनामा देण्याला ॥ ५ ॥ जगतापाची सुल्तानशाही ॥ हरघडी हरदीन ये प्रत्ययीं ॥ सुरक्षित असणें या समयीं ॥ शक्य नसे सुर्व्यांना ॥ ६ ॥ जळजळीत अग्नि वा पाणी ॥ राहील कैसे एके ठिकाणीं ॥ नाशा पावेल एक कुणीं ॥ एक जीव कदा नोहे ॥ ७ ॥ सांगाती असले वाटमारे ॥ एकटा प्रवाशी काय करे ॥ सोडणें असली तस्करें ॥ हेंच कल्याणप्रद ॥ ८ ॥ राजीनामे कैफीयती ॥ फडकल्या सर्व पत्रोपत्रीं ॥ श्रीमंतही बाजू सावरती ॥ सदा जी लंगडी ॥९॥ समुद्रमहालाची जी कमिटी ॥ लटकी उभारलेली खोटी ॥ सोसायटीची सवत कपटी ॥ तींत काय गोंधळ ॥ १० ॥ त्या सात जूनला भरली सभा ॥ श्रीमंतांची फाकली प्रभा ॥ पाजळीयल्या लंब्या जिभा ॥ तरूण पक्षावरी ॥ ११ ॥ त्या लटक्या कमिटीचा ॥ त्या बनावटी कम्पनीचा ॥ श्रीमंत सोनेरी टोळीचा ॥ शिंदे देत राजिनामा ॥ १२ ॥ शिंदे सरकार ह्मणे अगा ॥ सोडितो अध्यक्षाची जागा ॥ असल्या मूर्खांचा मी राजा ॥ कधीं न होईन ॥१३॥ शाबास रे अलिजाबहादर शाबास रे शिंदे सरकार ॥ भले पिटाळी जी हुजुर ॥ बेट्या तोंड पुजांना ॥ १४ ॥ खरी ठरली सोसायटी ॥ श्रीमंतपक्ष छाती पिटी ॥ डाव बसला उरापोटीं ॥ केला होता तये ॥ १५ ॥ शिंदे वदे प्रतिष्ठिता ॥ नका मारू व्यर्थ बाता ॥ तुही खरे पुढारी नसता ॥ फसवितां मजला ॥ १६ ॥ विरोध संपल्या वाचोनी ॥ सोसायटीच्या मतावाचूनी ॥ शिंदे नाये पुन्हा कधीं ॥ आग्यावेताळ सांगतो ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावादकथायाम् राजिनामामयश्चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय १५ वा

श्रीगणेशायनमः ॥ शिंदे देती राजीनामा ॥ सोसायटीच्या पडे कामा ॥ जो सर्वथैव ॥ १ ॥ श्रीमंताची हवेलंडी ॥ व्यर्थ रचल्या हो उतरंडी ॥ अखेरीस मिळाली गचांडी ॥ सर्वस्वाला ॥ २ ॥ श्रीमंते बांधल्या कंबरूं ॥ देऊं म्हणती सरेंडरूं ॥ जनता सारी फसती करूं ॥ धनाच्या जोरें ॥ ३ ॥ येथून श्रीमत् पी. सी. पाटील ॥ लढवी आपली नीति कुटिल ॥ स्वस्थ बसा हो एकपळ ॥ वदे तरुणांना ॥४॥ भरवी सभावरती

सभा ॥ खासगी ह्मणे तया उगा ॥ तरूणा फसवू जाई रोग हा ॥ केवळ वजनानें ॥ ५ ॥ आणियले खासे साहिब ॥ आणियले खासे जाधव ॥ ह्मणे खूष करा हो माधव ॥ सरेंडरोनी ॥ ६ ॥ द्या हो द्या हो सरेंडर ॥ टाहो फोडी करी जोर ॥ तरी नये शिंदे सरकार ॥ आपणामध्यें ॥ ७ ॥ स्मारक कमेटी आमची नव्हे ॥ ठरले हडसन खडसून हें ॥ राजीनामा योग्य आहे ॥ ऐसे मत जनतेचें ॥ ८ ॥ राजीनामा दिला महाराजे ॥ याणें तत्सत् प्रीति गाजे ॥ ओढूं पाही तया पुन्हाजे ॥ लबाड श्रीमंत ॥९॥ सत्रावीर सज्ज जहाले ॥ सह्यानिशी फर्मान सोडीले ॥ जागृतीनें जया छापिले ॥ मोठ्या हर्षानें ॥ १० ॥ करा तरुणांचा निषेध ॥ जो शाहूचाच निषेध ॥ जो शिवबाचाच निषेध ॥ सत्राजण वदे करा ॥ ११ ॥ तरुणें केली सत्सेवा ॥ श्रीमंता वाटे तत् हेवा ॥ करूनिया निषेध दावा ॥ जनतेस ह्मणे ॥ १२ ॥ गांवोगावीं पाठवी पत्रें ॥ तरुणावरी सोडी कुत्रें ॥ मूळचे हे मूर्ख भित्रे ॥ अवसान पै दाविलें ॥ १३ ॥ जनतेला वदे गे घेई ॥ अलिजाबहाद्दराच्या पायीं ॥ लोटांगण अनन्यभावेहीं ॥ यांचे काज साधण्या ॥ १४ ॥ जनता शाहूरायाची ॥ जनता प्यारी सत्याची ॥ पाठराखी तरुणाची ॥ जनता जनार्दन ॥ १५ ॥ श्रीमंतांना धुडकावले ॥ फर्मान कागदी राहिले ॥ श्रीमंत मूर्ख पै ठरले ॥ या कृत्यानें ॥ १६ ॥ सत्रा पुढाऱ्यांची टोळी ॥ फसवूं पाही जनता भोळी ॥ परी अपयश थोर कपाळीं ॥ आग्यावेताळे पाहिले ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् सत्रा जित फर्मानमयः पञ्चदशमोऽध्यायः समाप्त ॥

अध्याय १६ वा

श्रीगणेशायनमः ॥ आला जुलई महिना ॥ बावीस तारखेला सभा ॥ सोसायटीची ॥१॥ ' सरेंडरा 'चा येई ठराव ॥ हा तरुण मनीचा हो भाव ॥ श्रीमंत घालतील घाव ॥ सोसायटीवरी ॥ २ ॥ जाधवा केले अध्यक्ष ॥ जयाचे धनावरी लक्ष ॥ मागल्या आधाराची साक्ष ॥ आहें तदवतना ॥ ३ ॥ अधिकाराची दावी मिजास ॥ अपमानियले तरुणास ॥ पुरविण्या ' माधवा 'ची आस ॥ **आणि स्वार्थाची** ॥४॥ प्रतिष्ठिताना हृदय नाहीं ॥ आवडेना शिवजयंतीही ॥ ह्मणती जागा आपली नाहीं ॥ व्यर्थ दिवटे निपजले ॥ ५ ॥ तरुणाची सत्यावरी भिस्त ॥ राखियली तयांनीं शिस्त ॥ झगडणें त्याचें होते रास्त ॥ त्रयस्थही ह्मणेल ॥ ६ ॥ राहिलें जागीं सरेंडर ॥ सभा न झाली पुरेपुर ॥ अध्यक्षें केला पोबार ॥ मेकड मुलखाचा ॥ ७ ॥ विलंब लावीं स्मारकाला ॥ सहा महिने दूर लोटला ॥ राहिलें उभे निवडणुकीला ॥ येत्या कौन्सिलाच्या ॥ ८ ॥ सहा महिने ह्मणे थांबा ॥ कारण तयाही सांगेना ॥ काय असेल त्यांचे मना ॥ देव जाणेल बा ॥ ९ ॥ माथेफिरूं वदती तरुणा ॥ आपण करती मूर्खपणा ॥ या वृद्धपणीच्या लक्षणा ॥ काय नांव द्यावें ॥ १० ॥ अर्ध वर्ष थांबोनिया ॥ काय मिळालें सांगा या ॥ वेळ काढिला साधाया ॥ असेल नवा डाव ॥ ११ ॥ दक्षिण ब्राह्मणेतर लीग ॥ कौन्सिला उभे करी महाभाग ॥ श्रीमंतातलें हे महा रोग ॥ जाणले तरुणाने ॥ १२ ॥ तरुण ह्मणे

गे लीग बाई ॥ प्रतिष्ठितांना न थारा देई ॥ याची अपकीर्ति सर्व जगाही ॥ आज पसरलेली ॥ १३ ॥ जो साधिना मराठी हित ॥ पडेल नुसता भत्ता खात ॥ फसवील आमची मराठी जात ॥ पूर्वानुभवें ठरलेले ॥ १४ ॥ शिवस्मारक मराठ्यांचे ॥ मराठ्यांच्या शिक्षणाचें ॥ सोसायटीच्या मालकीचे ॥ हे सत्य त्रिवार ॥ १५ ॥ असेल जर यांना हे मान्य ॥ नातरी करी गे उभे अन्य ॥ दूर करी गे हे दुर्जन ॥ दक्षिणेच्या लिगे ॥ १६ ॥ तुझिया जाहिरनाम्यावरी ॥ या मताला दे दुजोरी ॥ तुझिया कर्तव्याला करी ॥ आग्यावेताळ विनवी ॥ १७ ॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रावाद कथायाम् लीग दुजोरामयः षोडशोऽध्यायः समाप्तः ॥

अध्याय १७ वा

श्रीगणेशायनमः ॥ श्री लीगायनमः ॥ ब्राह्मणतेरायनमः ॥ नमन सर्वपक्षाला ॥ १ ॥ लीगे ठरविला विचार ॥ याकरता स्पेशल जमणार ॥ पाडळी स्टेशन शेजार ॥ कूपर कारखानी ॥ २ ॥ तारीख एकोणीस आगस्टला ॥ पुढारी वर्ग जमा झाला ॥ सातारा जागा झाला ॥ जमले बहुविध ॥ ३ ॥ गांवोगांवचे पुढारी ॥ जमले तेथे एकतरी ॥ शिव-बाजू पाहे सावरी ॥ खरे मराठे ते ॥ ४ ॥ पाहोनी तरुणांचा नेट ॥ पाहोनी जनतेचा रोख ॥ श्रीमन्ताचा पाठीराख ॥ नाही जगी कोण ॥ ५ ॥ लीगनें केलें मान्य ॥ तत्त्व तरुणांचे सम्पूर्ण ॥ राखला शाहूजीचा मान ॥ धन्य धन्य लीग ॥ ६ ॥ जाधवराव गप्प जहाले ॥ रोज नवा नवे बोले ॥ ह्यातारपणी करी चाळे ॥ शोभे न तया ॥ ७ ॥ विजय झाला तरुणांचा ॥ प्रतिष्ठीताची बसली वाचा ॥ जयजयकार सत्याचा ॥ होणें हेंच योग्य ॥ ८ ॥ नवी बातमी आली कानीं ॥ जागा व्यापली सरकारांनी ॥ रस्ता नेला जागेवरुनी ॥ शिवस्मारकाच्या ॥ ९ ॥ हाहि श्रीमन्ताचा डाव ॥ सरकारा देती चिथाव ॥ विजयी मराठा घेई धाव ॥ या प्रकरणी ॥ १० ॥ काम थांबवी सरकार ॥ पुढें काय ते पहाणार ॥ गेली जागा तरी करणार ॥ योग्यतेच उपाय ॥११॥ सत्रा पुराण अतिसुरस ॥ वाचील तया कळेल खास ॥ कोण बाधले स्मारकास ॥ सम्पूर्णतेनें ॥१२॥ हें वाचोनी दावा अज्ञाना ॥ आवडेल शाहूरायांना ॥ आनंद होई शिवबाना ॥ पुराण पढण्यानें ॥ १३ ॥ वाचा स्वतः अनेकदा ॥ श्रीमंता ओळखा सदा ॥ हे पुराण दावी उचपदा ॥ मराठी जनतेला ॥ १४ ॥ म्हणून माझे मराठे भाई ॥ ही पुण्याई गाठी घेई ॥ शिवसेवेला तयार होई ॥ अहर्निश अनालस्ये ॥ १५ ॥ सन एकोणीसशे तेवीस ॥ सप्तम्बर चार तारखेस ॥ मंगळवारीं श्रावणमास ॥ लिहोन संपले ॥ १६ ॥ पुण्य ग्रामी आग्यावेताळ ॥ आधार तया तरुण मंडळ ॥ शाहूभक्त हा कर्ताबाळ ॥ काळ दुर्जनाचा ॥१७॥ इति श्री शिवस्मारक पुराणे सत्रा वादकथायाम् अंतमोध्यायः समाप्तः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः शुभं भवतु इत्यलम् ।

◇◇◇

छत्रपति पद्य-संग्रह

छत्रपति पद्य-संग्रह



पद १ लें — (चाल-एडका मदन०)

नमन गणराया । झणिं धांव लाज राखाया ॥ धृ० ॥
अज्ञानि वर्ग हा माठा । शिक्षणास देई फाटा ।
बुद्धि तया द्या आतां । शिक्षण घ्याया । आपुली लाज राखाया ॥ १ ॥
लोपली क्षात्रवृत्ति ती । मरहट्टे हिनदीन होती ।
लागले ग्रहण त्या कीर्ति । जागे करवा । आपुली लाज राखाया ॥ २ ॥
प्रगटवाच क्षत्रिय बाणा । दावा या मराठा बाणा ।
देशाच्या स्वाभिमाना । चेतना द्याया । देशाची लाज राखाया ॥ ३ ॥
दांभीक जना फसवीती । भलतेच मार्ग दाविती ।
अज्ञानि तयाला फसति । तया तराया । झणि धांव लाज राखाया ॥ ४ ॥
भट पुढारी स्वार्थी असति । देशाच्या नांवे वदति ।
जातीच्या हिताते पाहती । अशा दांभिका । स्वार्थत्याग बुद्धि द्याया ॥ ५ ॥

पद २ रें — (चाल-गुन्हेगारी धन्याची०)

बाबा भटानें केली आहे सारी धुळधाण ॥ धृ० ॥
जाती जातीचें तंटे लावुनि, दुरुन मजा पाही ॥
शहाणपणाचा आव आणुनि, उपदेशितो छान ॥ १ ॥
शूद्र मराठे शूद्र कुणबटे शूद्र म्हणे लोका ॥
ॲन्डी ब्रँडी फस्त करुनि करितो सारी घाण ॥ २ ॥
माड्या चढुनि, मांस खावुनि, जरि झाला भ्रष्ट ॥
तरी म्हणे मी श्रेष्ठ असे हो । इतरा ठरवी हीन ॥ ३ ॥
हात हातभर जीभ काढुनि । गप्पा झोडितो ।
स्वराज्य मिळण्या, एकी करुया, म्हणतो ब्राह्मण ॥ ४ ॥
जाती जातीचे बंड उभारी, एकी करुया म्हणतो ।
एकी फसली, स्वराज्य फसले । पेशवाईवर ताण ॥ ५ ॥

स्वराज्य असतां गमवूनि बसले । मूर्ख ब्राह्मण ॥
आतां बसले बोंबा ठोकीत । स्वराज्य द्या म्हणून ॥ ६ ॥
गांधीच्या तत्त्वा न जुमानि बनतो शिरजोर ॥
परि कौन्सिला जाबुनि बेटे । गांधिद्रोह करणार ॥ ७ ॥
सरकारचे जांवई जणु हे, रुसुनि बसतात ।
कोण जुमानि या चोरांना, तोंडघशी पडणार ॥ ८ ॥

पद ३ रें — (चाल – त्यजी भक्तासाटीं०)

शेंदूर फाशी उफराटा । बनविला म्हसोबा मोठा ॥ धृ० ॥
पावेल पहा नवसाला
देईल सौख्य देशाला
जरि द्याल तुम्ही फंडाला । पोसाल बगलबच्चांना ॥ १ ॥
हा असा म्हसोबा सोज्ज्वा
देशभक्त मोठा लठ्ठ्या
नवसाच्या घाला खेट्या । मग येईल पदव्या वाट्या ॥ २ ॥
जो म्हणे तयाला दुष्ट
तो ठरतो जगिं या नष्ट
भगतांचा तांडा रुष्ट । त्या होतील नर्की कष्ट ॥ ३ ॥
दागिने विका मग आतां
द्या फंड म्हसोबा करिता
देवळे बांधण्या पुरता । भगतांच्या सोई करितां ॥ ४ ॥
रस्त्यास नांव द्या त्याचे
हॉटेलहि त्या नांवाचे
शाळाहि त्याच्या नांवें । त्या नांवें वसवा गांवें ॥ ५ ॥
द्या स्वराज्य संधा नांव
त्या नांवें बांधि तलाव
चोराचा बनवी सांव । सावाबरि घालि घांव ॥ ६ ॥

पद ४ थें — (चाल – अहा दारुबाजी०)

भट बोकड मोठा । जातीवर जातोय बेटा ॥ धृ० ॥
याचा देश इराण । आमचा आहे हिंदुस्थान । याचा उतरला पाहिजे ताठा ॥ १ ॥
आमचा हिंदु-धर्म । याचे भट्टी कर्म । याची लुडबुड काढून टाका ॥ २ ॥
याची भाषा नाहीं । याचा धर्म नाहीं । याचा कशातहि नाहीं वाटा ॥ ३ ॥

आला कोठून बेटा । चित्पावनी काटा । आमच्या आमच्यामध्यें लावी तंटा ॥ ४ ॥
होतो डॉक्टर हाच । होतो वकील हाच । लुटण्याकरितां करि नाना तऱ्हा ॥ ५ ॥
यांनीं सोडला ताळ । पायीं बांधें चाळ । सोंग घेऊन नाचे हिजडा ॥ ६ ॥
आम्हा म्हणतो यजमान । नित्य करतो अपमान । शूद्र ह्मणतो आह्मा बेटा ॥ ७ ॥
धन्या केले चाकर । मारून मारून खेटर । मस्त झाला ऐतखाऊ रेडा ॥ ८ ॥
धर्मढोंग करून । अन्न आमचे खाऊन । करितो माकड चेष्टा ॥ ९ ॥
आह्मा ह्मणतो कनिष्ट । आपण होतो वरिष्ठ । जाई इराणी हॉटेला बेटा ॥१०॥
खाऊन माजला फार । करि कर्में जार । कपटानें वागतो बेटा ॥११॥
धर्मडाव खेळे । करी भट्टी चाळे । धर्माची करितो थट्टा ॥१२॥
ऐतखाऊ भट । आता झाली भ्रष्ट । यांनीं धर्माला लाविला बट्टा ॥१३॥
आह्मी धर्म रक्षक । भट धर्म भक्षक । धर्म गुरु ह्मणे कोण भ्रष्टा ॥१४॥

पद ५ वे—(गजल)

शिवाजी आमुचा राणा । मराठी आमुचा बाणा ॥ धृ० ॥
शिवानें धर्म राखिला । शिवानें शत्रु रगडिला ॥
जगविले हिंदु धर्माला । जगविले मायभूमीला ॥ १ ॥
शिवाजी मालक धर्माचा । शिवाजी क्षात्र हाडाचा ॥
तयातें शूद्र वदण्याला । नसावी लाज भटजीला ॥ २ ॥
शिवाच्या मर्द मराठ्यांनों । म्हणति भट शूद्र तुम्हांलाहो ॥
आठवा मानी शिवबांहो । जनाची लाज मानाहो ॥ ३ ॥
जगावे जीवन मानानें । रहावें स्वाभिमानानें ॥
मराठी हाच हा बाणा । शिवाचा बोल हा माना ॥ ४ ॥
भटांचें प्रस्थ मोडावें । रुढीचे पाश तोडावे ॥
शाहूचा हा असे बाणा । शिवाजी शाहुला माना ॥ ५ ॥

पद ६ वें—(चाल–आजि हौस.)

भट जात धूर्त ही जगतिं । करणी ठकाची करिती ॥ धृ० ॥
धर्माचे गुरु म्हणवीति । क्षत्रिया नीच लेखती ॥
देवळें घरें बनवीती । देवांना शिवूं ना देती ॥ १ ॥
गर्वानें चढला ताठा । विष्णूला दिधल्या लाथा ।
म्हणती श्रेष्ठ भट माना । भ्रष्टांना कां भोंदूना (?) ॥ २ ॥
विष्णू–राम–कृष्णाला । क्षत्रिय देव मूर्तीला ॥
क्षत्रीय वंशज नव ! शिवूं नये ह्मणति भटनाना ॥ ३ ॥

रामानें जग शोभविलें । कृष्णार्जून आमुचे झाले ॥
त्याचहि देवमूर्तींना । पारखे आम्हांला केलें ॥ ४ ॥
जातिचें बंड माजवितां । भोळयांना अज्ञ जनांना ॥
धर्माच्या नांवें छळितां । पैसा तयांचे घेतां ॥ ५ ॥
तीर्थाच्या सर्व ठिकाणचे । माजलेत बडवे साचे ॥
लोकांचे लुटिती पैसे । जार जार कर्में करिती ॥ ६ ॥
श्वानाला प्रिय मानिती । महारास नीच लेखिती ॥
श्वानाहून इतरा जाति । मानिती शूद्र भट ज्ञाति ॥ ७ ॥
जगताचा ईश्वर कर्ता । निर्मिली तयानें जनता ॥
श्रेष्ठ हा विप्र हो कैसा । ब्राह्मणी धर्म जगिं उलटा ॥ ८ ॥

पद ७ वें—(चाल–चलारे गणराया वंदू.)

कुठेहि आडवा भट आला । राज्याचाहि निकाल होईल जाईल नाशाला ॥ धृ० ॥
आसरा दिला ओसरीला । पाय पसरुनि । धनि फसवुनि । घरामधि घुसला ॥ १ ॥
शाहुनें प्रधान भट केला । साताऱ्याचें राज्य बळकुनि । पुण्यामाजि आला ॥ २ ॥
धन्याशी बेईमान झाला । छत्रपतिला कैद करोनि । राजा भट बनला ॥ ३ ॥
भटाचें काम नव्हे लढणें । सन १७६१ मध्यें दाखविलें यानें ॥ ४ ॥
बाईल्या राघोबा दादा । फडणीस नाना दीड शहाणा । अकलेचा कांदा ॥ ५ ॥
मारले नारायणरावा । स्वामिनीवर नजर ठेवणें । नानाचा कावा ॥ ६ ॥
मराठा महादजी शिंदे । विष घालुनी मारविले त्या कपटी नानानें ॥ ७ ॥
बांधिले हत्तीच्या पायीं । होळकराला कारण नसतां खरी पेशवाई ॥ ८ ॥
पेशवा रावबाजी दिवटा । चारून चारून । दोंद आणिलें भटजीच्या पोटा ॥ ९ ॥
माजवी रमणा परवतीला । भोजनभाऊ जमा करुनि बुडवी राज्याला ॥ १० ॥
नेभळा साऱ्या मुलखाचा । तोफ ऐकतां धूम पळाला । थेट दिव्या घाटा ॥ ११ ॥
बंधुनों सावध व्हा आतां । स्वदेश कार्यी द्या धुडकुनि । आडवा भट पडता ॥ १२ ॥

पद ८ वें

नकट्यांचा बाजार । सारा । लाज काय असणार
तयांना लाज काय असणार ॥ धृ० ॥
कमिटीमध्यें बसुनी नक्टे । विचार करिती पुतळ्याचा ।
लोकहिताला फाटा देऊनि । स्मारकास धजणार ॥ १ ॥
जनसेवेचें नांव करुनि । कमिटीमध्यें बसतात ।
टिळकाच्या स्मारकास खर्ची । रुपये सोळा हजार ॥ २ ॥

अडविति सडकेची जागा । तोडून टाकिती बागा ।
रयतेला नाडुनि नक्टे । टिळक उभा करणार ॥ ३ ॥
भटशाही करवीति नक्टे । स्तोम माजवी टिळकाचे ।
टिळकाचे मार्केट करविता । थप्पड त्या नसणार ॥ ४ ॥
कमिटीमध्ये भटजी नक्टे । विचार करिति नाकाचा ।
सरकारानें दिधली तंबी । काय त्यास करणार ॥ ५ ॥
लोकांना कळवीति नक्टे । बहुमत नाहीं पुरे पुरे ।
मार्केटा अजि नांव नको हो । पुढें करूं म्हणणार ॥ ६ ॥

पद ९ वें — (गजल)

अजिं महात्मा । धन्य गांधी । ख्याति त्याची सर्व जगतिं ॥ धृ० ॥
आत्मबलानें जगा झुलविलें । सरकारला नम्र केले ।
भारताला योग्य त्राता । जाहलासि तूं महात्मा ॥ १ ॥
असहकारिता पूर्ण विजयी । होण्यास्तव तूं झटपट करिसि ।
स्वराज्य–वादी जहाल घुबडें । तव कार्याला विरोध करिति ॥ २ ॥
काँग्रेसला तूं पूर्ण वळविलें । खादीमय तूं तिला बनविले ।
स्वराज्यवादी, जहाल वरती । सर्व जगाला तूं पटविले ॥ ३ ॥
जहाल भटजी जळफळताति । तव कार्याला विरोधि असति ।
नेट धरुनि कार्य करिसि । खरा खरा तूं थोर जगति ॥ ४ ॥

पद १० वें

ह्या स्वार्थसाधुते लोका, मग काहो तयाते पुसतां ॥ धृ० ॥
भिक्षांदेहि हे करिती, लोकांचे पैसे उकळीति
पब्लीक फंड त्या म्हणती, हा उपाय, चांगला काय
पैसे घेण्याला, आपली पोटें भरण्याला ॥ १ ॥
तिस वर्षें पुरीं त्या झाली, मराठ्यांनीं हवाली केली
ऐंशी हजाराची रोख थैली, टिळकापाशीं, रोख ती ऐशी
स्मारक करण्याला, शिवरायाच्या नांवें वदण्याला ॥ २ ॥
शहाण्णव सालीं काळ मोठा पडला, मराठ्यांनीं तगादा केला
टिळकास फंड मागितला, मग कां, नाकारिला कां
परत करण्याला, ठेविला भटे पोसाया ॥ ३ ॥
फंडाची पेटी फिरवीति, सर्वांचे पैसे उकळीति
अनाथ गृहें उघडीति, पोरें पोसति; भटांची नुसति
इतरा ज्ञाति, त्यांमध्यें येऊं ना देति ॥ ४ ॥

तळेगांवीं काच शाळा उघडी, सर्वांच्या पैशावर उडी
परि तेथें आपलें संवगडी, ह्या लाज कशी नाहीं आज
पैसे घेण्याला, आपलेच ते म्हणण्याला ॥ ५ ॥
चिरोल-केस फंड उभारिला, पर्स फंड पार लांबविला
घरी ज्युबिली फंड ठेविला, ह्या लाज, कशी नाहीं आज
पैसे घेण्याला, आपली पोटें भरण्याला ॥ ६ ॥
गोधर्म फंड काढिति, गोशाळा उघड्या करिति
भटभरती तेथें होती, नांवा पुरत्या, ठेविति गाया
दही दुधाचा घर बसल्या करिति धंदा ॥ ७ ॥
निरनिराळे उभारिति फंड, पैशाचे माजविति बंड
खाऊनि वसति मग पुंड, हिशोब मागतां, कोण मग पुसता
दाद नाहीं देत, फंडाला करिति गडप ॥ ८ ॥

पद ११ वें -- (चाल-सारा नक्ट्यांचा बाजार)

कारभार करणार, काय हे कारभार करणार रे । रयतेला नडणार ॥ धृ० ॥
तुमचे आमचे पैसे लुटूनि । हौद ठेविले भटजींना ।
देशाचे दुष्मन हे भटजी । भेद असा करणार ॥ १ ॥
हौदाला जरी कुत्रे शिवले । मूल टाकिले बोडकीनें ।
तरी न बाटे हौद भटांचा । तुम्हा आम्हा नडणार ॥ २ ॥
तुम्हा आम्हाला कुत्र्याहूनि । नीच मानिति भट जात ।
आपल्या स्पर्शें हौद विटाळे । भटजींचा आचार ॥ ३ ॥
माड्या चढुनि गांड्या फुकुनि । मद्य पिऊनि भट मेला ।
मेला तरी तो श्रेष्ठ ठरविति । इतरा हिन गणणार ॥ ४ ॥
ओंकारेश्वर मसनवटीवर । मढीं भटांची नेतात ।
आपण शिवता त्याच मढ्याला । भट नरकीं पडणार ॥ ५ ॥
टिळक म्हसोबा यांचा मोठा । असेल मोठा भटजींना ।
तुम्हा आम्हाला शूद्र म्हणाला । कोण त्यास पुसणार ॥ ६ ॥
पुतळा त्याचा उभा करविला । तुमच्या आमच्या धनावर ।
भोळी जनता भटें फसविति । स्वस्थ काय बसणार ॥ ७ ॥
तात्या आण्णा भाऊ बापू । खिसे कापू हे जमलेले ।
तुम्हा आम्हाला दिवसा लुटति । अजुन सहन करणार ॥ ८ ॥
भटजातीच्या पोटासाठी । जो झटपटला जन्मभर ।
त्या टिळकाच्या पुतळ्यासाठी । आम्हास कां हा भार ॥ ९ ॥

आज बोलती भटे भिक्षुके। जनता धन कां उधळिता।
टिळका वेळीं मेला होता। भटजींचा सुविचार॥ १०॥
हे पुतळ्याचे खूळ माजले। कशामुळें ते शोधावे।
मूळ उभे जोवरि मार्केटि। वाद सुरूं राहणार॥ ११॥
भट जातीचे हौद निराळे। मसनवटि आणि भट-पुतळे।
जोंवरि असले भेद निराळे। लढा बढत जाणार॥ १२॥

पद १२ वें — (चाल–राम भजन करलेना)

हीं भटें माजली फार। खऱ्याला कोण जगिं पुसणार॥ धृ०॥
शिवबाच्या गुरुपदिं बसविति। रामदास भंगडभाई।
कुठें शिवाजी तो रणगाजी। कुठे शिष्यिणीयार॥ १॥
शिवबाला हे शूद्र ठरवुनि। आडवे पडले अभिषेका।
त्या समयाला हा गोसवडा। झाला होता गार॥ २॥
खान बजाजी खरा मराठा। बाटून गेला पार।
श्री शिवबाने शुद्ध करविले। केला देशोद्धार॥ ३॥
या शुद्धीच्या समयी नव्हता। रामदास तो काय जिता?।
भगवाभंगड खाण्यापुरता। भूमीला तो भार॥ ४॥
राज्य कमविले श्री शिवबाने। शूर मराठे लढवोनि।
हा गोसवडा मठींत बैसे। गांजा खेची फार॥ ५॥
कुठे सिंह तो शिवबा राजा। कुठे रामदासी कोल्हा।
कुठे मराठे ते लढवय्ये। कुठे लाडू खाणार॥ ६॥
श्री शिवबानें राज्य कमविले। हातावर शिर घेवोनि।
हा गोसवडा दारोदारीं। झोळीसह फिरणार॥ ७॥
असे हजारो कुबडीवाले। राखुंडीतील संन्यासी।
राज्य कमाऊ जरी लागले। कशास मग तलवार॥ ८॥
शिवबाच्या गुरुपदीं शोभते। जिजाऊ माता ती देवी।
भगवाभंगड गुरु बनविति। नसताना आधार॥ ९॥

पद १३ वें — (चाल-पोवाड्याची)

जनीं जनार्दन, पंचमुखामधिं परमेश्वर माना।
आज्ञा त्याची तुम्हा आम्हाला, ध्यानिं तरी आणा॥ १॥
जरी भटाला दिली ओसरी, पाय पसरितो तनाबुनि।
मालक होतो चोर बनतो। उचल्या नाना आवटी॥ २॥

ज्या कामामधीं पडे भटोबा । कामाचा त्या नाश पुरा ।
इतिहासानें अनुभवानें । जे पटले ते ध्यानिं धरा ॥ ३ ॥
संन्याशाला सूळ, बेरडा सिंव्हासन मिळते ।
खऱ्या मराठ्या म्हणति कुणबट, गुरुपद चोराते ॥ ४ ॥
आडवा आला भटजी बोडका रस्त्यामधुनि जाताना ।
अशुभ ठरले याच जगामधिं, सार यातले उमजाना ॥ ५ ॥
ये दुनियेमें तीन कसाई, ढेंकूण पिसवू भटभाई ।
कबिराची ही शिकवण ध्यानीं का न अजून घेई ॥ ६ ॥
भट जातीचे नाही प्रयोजन, जोति म्हणे द्या हाकलून ।
जोतीबांची शिकवण साची, घ्या तुम्ही आता पडताळून ॥ ७ ॥
महार शिवता कोपे ब्राह्मण, ब्राह्मण जातीचा नोहे ।
तुकयाची ही अभंगवाणी । अजुन घुमत राहे ॥ ८ ॥

पद १४ वें — (भैरवी)

धन्य जाहला तूं शाहू । धन्य जाहला. सखा धन्य जाहला ॥ धृ० ॥
आमुचा सखा तूं शाहू । धन्य जाहलासि शाहू ।
धन्य जाहलासि जगिं । धन्य जाहला ॥ १ ॥
दीन जना धरुनि हाति । तत्त्वप्रेम करुनि हृदयि ।
देह रिझविलासि शाहू । धन्य जाहला ॥ २ ॥
रुढीपाश ताडताड । तोडून टाकियले तूं राज ।
विप्रबंड मोडिलेस । धन्य जाहलास ॥ ३ ॥

पद १५ वें — (चाल)

ओळखा कोण हा नक्टा

ओळखा कुणी हा नक्टा । दगडासम धट्टा कट्टा ॥
म्युनिसिपालिटीस दे चट्टा । अडविला मंडई कट्टा ॥
घ्या इनाम साधा सट्टा । ओळखा कोण हा नक्टा ॥
अति बेरड लुचा बेटा । जाति-हित पाहुन नक्टा ॥
क्षत्रिया पेटवी हट्टा । कौन्सिला पाठवी भट्टा ॥
इतरांस म्हणाला हाटा । ओळखा कोण हा नक्टा ॥
तागडी धरा वाण्यांनों । नांगरा स्मरा कुणब्यांनों ॥
सुइ दोरा घ्या शिंप्यांनों । कौन्सिल तुम्हास्तव " नोनो " ॥

'अथणी'स म्हणाला बेटा । ओळखा कोण हा नक्टा ॥
महारास म्हणे मी तुमचा । सही करतां बसली वाचा ॥
परदेश गमन पापाचें । क्षालनार्थ शास्त्रार्थाचें ॥
शेणाचा गिळला गोळा । ओळखा कोण हा नक्टा ॥
सक्तिचें शिक्षण होई । त्यामध्यें आडवा जाई ॥
अंड्याचा मारहि खाई । कोणाहि बोलु ना देई ॥
फंडाचा गिळला गट्टा । ओळखा कोण हा नक्टा ॥
जमविलें द्रव्य लाखानें । लुबाडिलें लोक काव्यानें ॥
ठेवला संच पोरांना । लाविले भिके इतरांना ॥
बंगालि दास वाघोबा । हा बैल कुठ नक्टोबा ॥
दासानें मरते समयीं । ठेवीले न जवळीं कांहीं ॥
नक्ट्यानें तशाच वेळीं । गंगाजळी केली जवळी ॥
कें ठेंहि पाहतां बेटा । जो सहज सांपडे नक्टा ॥

— मजूर ता. ६।७।२५

पद १६ वें

नक्ट्यांची दुनिया

चला ऊठ पहा भवताली । इकडे दिन दुनिया डुबली ॥
लागली आग निज देशा । तरि कां निजलाशी आळशा ॥
ही झोप कधीं सरणार ? ।
संग्राम कधीं करणार ? ॥
जर लोळत तूं पडणार ।
मग मायभूमि मरणार ॥
लागला पाठि संसार । कुत्ताच जसा जगणार ॥
कुत्र्याहुन गणिती हीन । तरि झाकितोसि का नयन ॥
उसळु दे समिंदर लाटा ।
हालु दे फणा उफराटा ॥
चालु दे तुफानी सोटा ।
दे जंगल उठवुन पेटा ॥
भडकु दे कळीच्या काळा । सोड हा स्मशानी चाळा ॥
तव हृदय तडकुनी जाई । पाहताच भिक्षुकशाही ॥

× × ×

या चला कवी-कांद्यानों । शृंगार काव्य-दासानो ।।
शृंगार कशाचा गाता । गाळात रुते भूमाता ।।
महालांत रुचे का कांता ! । संकटी पडे जर माता ।।
मेंढरा गुलामा हिंदी ! । साहतो कशी हि निंदा ।।

जो गुलाम जगती ठरला ।
स्वानंद तयाते मुकला ।।
आनंदाविन शृंगार ।
जणु प्रेताचा शिणगार ।।

राहुद्या गुलाबी कोडें । राहुद्याच ! कविवर थोडे ! ।।
राहु द्या नाच्य लवकाल । दारांत उभा कलिकाल ।।
दुःखात सुखाची आशा । ही नामर्दाची भाषा ।।
स्वातंत्र्या विना शृंगार । किटकांचा वेडाचार ।।

फेकल्याविना तलवार ।
शोभेल काय शृंगार ।।
साहिल्या विना शिरी वार ।
साजेल काय सुकुमार ।।

स्वातंत्र्य जयाना नाहीं । सौख्यहि तया नच कांहीं ।।
शक्तिचा सर्व भडिमार । दास्यावर करि अनिवार ।।
खंती न धरी दरकार । जरि जान त्यांत जाणार ।।
जो कधी तरी जाणार । कुणि तरी कधीं रडणार ।।

चालु द्या लेखण्या आता ।
बोलु द्या प्रतिभा माता ।।
शब्दास लागु द्या सूर ।
जो उलथी जगि भूसूर ।।

द्या सोडून लगाम, फेका । भाल्याच्या चहुवर फेका ।।
ब्रह्मांड हादरूनी सोडा । फत्तरास पाझर फोडा ।।
देणगी दिली देवानें । कविवरा तुला बहुमाने ।
जी तुझ्या हाती समशेर । चिरण्यास भाजी का शेर ।।

ना काव्य कसरती खेळ ।
परि हृदयाची खळबळ ।।
काव्यास्तव न करि कविता ।
देशास्तव गाई आता ।।

दे फेकून भाषाभार । थोडक्यात साधी सार ।।
ती गेली रे शिवशाही । शाहिरा काय तूं गायी ।।

जयी वीर तयी शाहीर । जयी दास्य तिथें हे पीर ॥
महाराष्ट्र गुलामी गुतला । शाहीरहि तेव्हां मेला ॥
× × ×
स्वातंत्र्य कशानें गेले । हे भटजी नक्टे नडले ॥
हिंदुच्या मुळावर आले । ऐक्यात आडवे पडले ॥
कोणास वदे हा नीच । कोणास दावि लाल्च ॥
कोणास म्हणे पड पाया । कवणास वदे दे जाया ॥
हिंदुच्या अभागी धर्मा ।
तव काय आले रे कर्मा ॥
केवढा तुझा अधिकार ।
आजला होत धिक्कार ॥
हत्तिचें मढें पडलेले । ना उचले, हाले, चाले ।
ठोकरी तयाला कोणी । चिरफाडी कोणी मधुनी ॥
घे भाग वाटुनी कोणी । टपलेरे बहु, संधानी ॥
ही निज धर्माची मात । का विलास बसला गात ॥
माजवी भटोबा जात ।
कालवी वीष अपसांत ॥
ही जात नसे हा घात ॥
यानेंच होय आकांत ॥
हें ब्राह्मण्याचें भूत । करि देशाला अपघात ॥
भोवले पुरातनकाळीं । ये गुलामगिरि मग जवळी ॥
वर्णत्व माऊली पोटी । जन्मली ' जात ' ही बेटी ॥
अवलाद करंटी खोटी । भेदाची जातच उलटी ॥
× × ×
संपादक काहो बसला । खरडिता रकाना कसला ॥
कुणि कसा नाटकी नटला ॥ सांगण्यास का अवतरला ॥
हे पुरे " गृह्य संस्कार " ।
बस झाले जयजयकार ॥
करण्यास शिव्याचा मार ।
केलात भुमीसी भार ।
पाहिजे चढविले कोणा । मिळवि स्वतः बहुमाना ॥
उगविणे निरर्थक फंड । लटकेचि दावि थोतांड ॥

◊◊◊

देशाचे दुष्मन

श्री. के. ग. बागडे यांचे प्रस्तावनेसह

देशाचे दुष्मन



आवृत्ति १ ली १९२५, किंमत ४ आणे.

प्रकाशक : केशवराव मारुतराव जेधे, जेधे-मॅन्शन, पुणे.

मुद्रक : रामचंद्र नारायण लाड, श्रीशिवाजी प्रिं. प्रेस, ५५६ सदाशिव पेठ, पुणे शहर.

श्री. केशवराव बागडे, बी. ए. एल्एल्. बी. यांची

प्रस्तावना

सदर पुस्तकाचे लेखक श्रीयुत दिनकरराव जवळकर यांनीं त्यांच्या या पुस्तकाची प्रस्तावना मी लिहावी, अशी इच्छा प्रदर्शित केली, व त्यांच्यासारख्या उत्साही गृहस्थाच्या म्हणण्यास मान द्यावा असें वाटल्यावरून मी हे चार शब्द लिहीत आहें. महात्मा जोतीराव फुले यांची कामगिरी राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. जसजसा काल लोटेल, तसतसें त्यांच्या कार्याचें महत्त्व सुजाण माणसांच्या प्रत्ययास अधिकाधिक येणार आहे. महात्मा फुले यांच्या हयातींत त्यांच्या निंदकांनीं वाटेल तशी कठोर टीका केली; त्यांच्या पवित्र कामगिरीविषयीं जाणून बुजून जनतेंत गैरसमज प्रसृत केला; कांहीं कुटाळ लोकांची मर्यादा याच्याही पुढें जाऊन त्यांनीं महात्मा जोतीराव फुले व त्यांच्या पत्नि पुण्यश्लोक मातुःश्री सावित्रीबाई यांचा नीचपणें छळ केला, व अखेर त्यांना मारेकरी घालून त्यांना जगांतून नाहींसे करण्याचा दुष्ट उपद्व्याप करण्यासहि त्यांच्या शत्रूंनीं कमी केले नाहीं. महात्मा जोतीराव फुले यांनीं ज्या बहुजन समाजाच्या हितार्थ आपला देह झिजविला, तो निरक्षर व अज्ञान असल्यामुळें व ज्यांच्या आसुरी स्वार्थाला त्यांनी आपल्या कामगिरीनें वेसण घातली, ते लोक सुशिक्षित पण स्वतःच्या स्वार्थासाठीं रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून टपून बसणारे असल्यामुळें महात्मा फुले यांच्या मोठेपणावर कृष्णपटल पडलें आहे. 'काल' हा फार निष्ठूर आहे; स्वार्थी माणसें स्वतःच्या पाताळयंत्रीपणानें व सैतानी स्वार्थांधतेनें असत्यावर सत्याचा, पापावर पुण्याचा, जनताद्रोहावर लोकसेवेचा, व स्वार्थपरायणतेवर परोपकाराचा मुलामा चढविण्याचे लाघवी प्रयत्न करून अजाण व

भोळ्या जनतेच्या डोळ्यांत धूळ फेंकून तिची दिशाभूल करूं शकतात. सर्वसाधारण जनता विचारक्षम व कार्यक्षम होईपर्यंत असा कटु प्रकार अनुभवाला येत जाणार हें निर्विवाद आहे. याच कारणपरंपरेमुळें आपल्या देशांत होऊन गेलेल्या ब्राह्मणेतर साधुसंतांना, राजकारणी मुत्सद्यांना, स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या वीरश्रेष्ठांना ब्राह्मण लोकांच्या निंदेच्या, छळाच्या व प्राणघाताच्या दिव्यांतून तावून सुलाखून निघावें लागलें व त्यांचें अद्वितीयत्व जगाच्या निदर्शनास येऊ शकलें !! अशा विभूतीच्या समकालीन निंदकांना वाटेल तितका उन्मादानंद झाला असला, तरी 'कालाचे' अपत्य 'इतिहास' ह्या बाबतींत सत्याचा निर्णय केल्यावांचून बहुतेक चुकत नाहीं. विभूतीसंबंधी समकालीन निंदा, छळ व प्राणघात वगैरे दुष्टांच्या कृतींना कालानें एकदां आपल्या उदरात ठाव देऊन त्यांना आपल्या भयंकर जठराग्नीची आंच दिली कीं त्यांतून त्या थोर पुरुषांच्या कृतीचे सत्कीर्तीरूप शुद्ध व तेजस्वी सुवर्ण बाहेर पडतें. महात्मा जोतीराव यांच्या चारित्र्याला सर्वभक्षी व सर्वसाक्षी कालाच्या कारभाराचा हा नियम तंतोतंत लागूं पडतो. त्यांचे निंदक व छलक स्मृतिशेष होत चालले असून महात्मा फुले यांच्या अनुयायांची संख्या गणित श्रेढीनें वाढत चालली आहे.

महात्मा जोतीराव यांच्या अफाट देशसेवेचें खरें स्वरूप जनतेच्या निदर्शनास आणण्यास त्यांच्या कामगिरीविषयीं जितकीं पुस्तकें प्रसिद्ध होतील तितकी आवश्यक आहेत. राज्यकर्त्यावर तोंडसुख घेण्यापेक्षा, ज्या दोषामुळें समाजातील संघटना बिघडली, बेकी माजली, तेज लोपलें व समाज स्वातंत्र्यरक्षणास असमर्थ बनला ते दोष नाहींसे करण्याचा प्रयत्न करणारे गृहस्थच खरे राष्ट्रोद्धारक होत. महात्मा जोतीराव यांच्या शिक्षणाकडे व त्यांनीं निधड्या छातीनें केलेल्या यथांग कार्याकडे लक्ष दिलें तर अर्वाचीन इतिहासांत त्यांना उच्चस्थान मिळणार यांत शंका नाहीं.

महात्मा फुले यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींवर प्रकाश पाडण्यास सहाय्यभूत होणारें हें पुस्तक लिहिण्याचा श्रीयुत दिनकरराव यांचा प्रयत्न अभिनंदनीय आहे. या पुस्तकांतील भाषापद्धती अगर विचार प्रदर्शनपद्धती ब्राह्मणांना आवडणार नाही; परंतु त्यामुळे रुष्ट न होता, सदर गृहस्थांचें पुस्तक वाचून त्यावर एकंदर पूर्व परिस्थिती ध्यानांत घेऊन विशेषतः रा. चिपळूणकर यांनी केलेली महात्मा फुले यांची निंदा लक्षात घेऊन शांतपणें मनन केलें पाहिजे. क्रियेस प्रतिक्रिया हा निसर्गदेवीच्या साम्राज्यातील अबाधितपणें व अव्याहतपणें परिणामकारक होणारा नियम आहे, तदनुरोधानें महात्मा जोतीराव यांची निंदा करणाऱ्यांना प्रत्युत्तर मिळणें साहजिक आहे. या प्रत्युत्तरादाखल केलेल्या प्रयत्नानें चिडून जाऊन प्रत्याघात करण्याचाहि मोह कित्येकांना अनावर होण्याचा संभव आहे. परंतु त्यायोगें जनतेचा अगर देशाचा फायदा न होतां तोटाच होणार ही गोष्ट सर्वांच्या नजरेस आणणे माझे कर्तव्य आहे, असें समजून मी ती विरोधी वाचकांच्या निदर्शनास नम्रपणे आणीत आहे. सुशिक्षित समाजास वळण लावण्याचा अभिमान धरणाऱ्या कै. चिपळूणकर यांच्यासारख्या गृहस्थानें महात्मा जोतीराव यांच्यावर बेभा

पणानें निंदास्त्र चालवावें, त्यांचा व त्यांच्या मतप्रणालीस मान्यता देणारे कै. टिळक यांचा पुणे म्युनिसिपालटीने बहुमान करावा; व याच म्युनिसिपालिटीपुढें महात्मा जोतीरावांचा पुतळा उभारण्याचा महत्त्वाचा गंभीर प्रश्न आला असतां, कांहीं ब्राह्मण-मान्य वर्तमानपत्रांनीं महात्मा फुल्यांची टवाळकी करावी, म्युनिसिपालटीच्या कांहीं सभासदांना या ठरावानें माकडचेष्टा करण्याचा मोह उत्पन्न व्हावा, ही अत्यंत उद्वेगकारक व चीड आणणारी बाब आहे. गोऱ्या नोकरशाहीचा दृष्टिकोन बदलण्याची उठाठेव करणाऱ्या काळ्या ब्राह्मणशाहीनें अगोदर स्वतःच्या वृत्ती अंतर्मुख करून त्यांचें पृथक्करण करून पाहावें. म्हणजे त्यात जनताद्रोह कसा सळसळतो आहे, हें प्रत्ययास येईल. इतरांवर केलेल्या अन्यायांची स्मृति जागृत करून ते अन्याय चालूं ठेवण्याचा खटाटोप करण्याऐवजीं, ते नाहींसे करण्यानेंच देशाची खरी सेवा होणार आहे. या पुस्तकानें अशी भावना उत्पन्न होवो अशी आशा व्यक्त करून ही प्रस्तावना संपवितो.

४२३ बुधवार, पुणें.
ता. २५ जुलई १९२५.

केशव गणेश बागडे

———

बिचारे टिळक जिवंत नाहींत –

म. जोतीराव फुले यांच्या स्मारकाचा ठराव पुणें म्यु. पुढें असल्यामुळें 'टिळकटलेले' बरेचसे पत्रकार म. जोतीरावांविषयीं आपलें अज्ञान मुद्दाम प्रगट करूं लागलें आहेत. ब्राह्मणी गुलामगिरीचें मंडन करणारें आणि सर्व जातीवर ब्राह्मणी वर्चस्व राखूं पाहणारे

वुटलेरिवाणाचे विप्र वड्डु,

"जोतीरावांचें स्मारक करण्यास योग्य अशी जागा कोल्हापूर आहे" अशी त्यांची टवाळी करून "पुणेकरांनीं त्यांचें स्मारक काय म्हणून करावे" असा आम्हाला सवाल टाकतात. दारूच्या पिपांत अखंड डुंबणाऱ्या दारूड्याप्रमाणें बरळणारे, दुसरे भटाळ बाटगे "टिळक–चिपळूणकरशिवाय पुण्याला काय किंवा अखिल हिंदुस्थानाला काय स्मारकरूपानें ललामभूत होण्याला दुसरे कोणी लायकच नाहींत" असें म्हणून "महात्मा फुले, क्षत्रिय कुलावतंस शिवाजी महाराज, देशसेवेकरितां अमीराचे फकीर बनलेले देशबंधु चित्तरंजन दास यांच्या स्मारकांना प्रत्येकी शंभर शंभर रुपड्या देऊन स्मारकाचें खूळ मोडून टाकावे असें म्हणून म. फुले, शिवाजी महाराज, देशबंधुदास यांची टवाळी करितात. कोठें बाबु चित्तरंजनदास आणि कोठें टिळकासारखे खाबू निपटनिरंजन डांस! कोठें महाराष्ट्राच्या हृदयसिंव्हासनावर आचंद्रार्क विराजमान होणारे रणगाजी शिवबा आणि कोठें भटी पंचपात्रींत खडबडणारा भटांचा टिळकोबा!! कोठें मृत महाराष्ट्रांतून कडव्या सत्यनिष्ठेचा झंजावात उत्पन्न करणारा प्रखर प्रभावी फुले महात्मा आणि कोठें महाराष्ट्राच्या हातीं पुराणाच्या कापूसवाती देणारा चिपळूणकरी टिळक दुरात्मा!!

कोंबडीच्या खुराड्यांत आर्यावर्ताची अतिव्याप्ति समाविणारे पाटलोण पंडित, रा. जवळकरांचे पुस्तक वाचून पहातील आणि स्मृति-श्रुतीची ढापणें डोळ्यावरून काढून महाराष्ट्राला निरखतील तर त्यांना टिळक-चिपळूणकरापेक्षां म. फुल्यांचा कर्तबगार पगडा ब्राह्मणेतरावरच काय ब्राह्मणावर देखील पडलेला आहे हें कबूल करावें लागेल. कळकटलेले कंकर, टिळकी छाप दारूनें धुंद झाले आहेत, त्यांना म. जोतीरावांची योग्यता कळणार नाहीं, पण शिवाजीचा महाराष्ट्र टिळक-चिपळूणकरी अत्याचार लाथेखाली तुडवीत म. जोतीरावाच्या जयजयकारानें असेतु हिमाचल भरतखंड हादरून सोडल्याशिवाय राहणार नाहीं. म. जोतीरावांनीं उभारलेल्या सत्यशोधकी गदेखालीं टिळक-चिपळुणकरी सैतानशाहीचा हात असलेला चेंदामेंदा महाराष्ट्रीय वर्तमानपत्राच्या कलमाकलमानें प्रत्ययास येत आहे, यापेक्षा म. जोतीरावाच्या योग्यतेसंबंधीं बलवत्तर पुरावा कोणता पाहिजे.

टिळक-चिपळूणकर मेले. महात्मा जोतीरावहि आपल्यांतून गेले. टिळक-चिपळूणकर देशाला मारून मेले. म. जोतीरावांच्या पायधुळीनें पावन झालेला मराठ्यांच्या महाराष्ट्र महात्म्याचें अद्वितीयत्व राष्ट्रेतिहासाला बिनशर्त लिहावयास लावील हें ब्राह्मणांनीं जाणून असावे. देशाकरितां आणि धर्माकरितां म. जोतीरावांनीं जन्मभर हालअपेष्टा भोगून महाराष्ट्रावर, अखिल हिंदुवर जें ऋण करून ठेवले आहे तें ऋण महाराष्ट्रानें, अखिल हिंदूनें म जोतीरावाकरितां आणि त्याच्या उज्वल ध्येयाकरितां मेल्याविना फिटणार नाहीं. शिवाजीचा महाराष्ट्र मरणाची किंमत धर्माच्या रणखंदल दंगलींत काय समजतों याची साक्ष इतिहास देत आहे.

हें पुस्तक छोटे असलें तरी त्याच्या प्रसिद्धिकरणाचें कारण फारच मोठें आहे. महाराष्ट्रांत भाराभर पुस्तकें आणि खंडोगणती लेखक नागवें सत्य लपवून जिकडे घुगऱ्या तिकडे उदो उदो करण्यास तयार होतात. महात्मा जोतीरावांच्या "गुलामगिरी" पुस्तकानंतर आज पन्नास वर्षांनीं या निर्भीड पुस्तकाचा महाराष्ट्राला लाभ होत आहे. कलमकसाई ब्राह्मणाच्या काळजावर जर घाव घालावयाचा असेल तर सत्यशोधकी कलमबहाद्दरांनीं आपल्या लेखणीला किती तीक्ष्ण धार लावावी लागते याचें ढळढळीत उदाहरण हें पुस्तक आहे. कै. बळवंतराव टिळक यांच्या मरणानंतर आज चार-पांच वर्षांनीं या पुस्तकाचा जन्म व्हावा आणि हें पुस्तक वाचण्यास टिळक जगूं नयेत याबद्दल आम्हाला दुःख होत आहे. ते जर आज जिवंत असते तर आपल्या सर्व पापाचे प्रायश्चित घेऊन हिंदमातेचे उतराई होण्याकरितां त्यांनीं म. जोतीरावांच्या प्रतिमेपुढें पगडीसह लोटांगण घातले असते. मृत्यूनें त्यांना दगा दिला आणि बिचाऱ्याला रावबाजी रघुनाथ, बाळाजीपंत नातू, विष्णु शास्त्री चिपळूणकर यांच्या पंगतींत कायमचें बसविले. सर्व दुर्जन दुष्टांना परमेश्वरानें क्षमा करून शांति द्यावी असें त्या दयाघन देवाजवळ अखिल सत्यशोधकातर्फे आम्ही प्रार्थना करितों.

जेधे मॅन्शन, पुणे,
ता. २५ जुलै, १९२५

केशवराव जेधे
प्रकाशक,

देशाचे दुष्मन

टिळक आणि चिपळूणकर ! दीन दुबळ्या दुनियेचे धुरंधर पुढारी ! राष्ट्राला खडबडून जागे करणारे नवयुगीन भारताच्या नव चैतन्याचें विद्युत्प्रवाह ! देशाभिमानाच्या चळवळीचे आद्यजनक ! लोकनायकांचें नेते, स्वदेशीचे प्रणेते, स्वकीयांचे चहाते आणि विद्वत्तेचे भाते ! देशाभिमान टिळकांचा व लेखाभिमान चिपळूणकरांचा ! अशी जोडी मागें झाली नाहीं; सध्यां नाहीं व पुढें होणार नाहीं. देशबंधु दास मेले पण त्यानें सुद्धां टिळकांच्या मरणाइतकें देशाचें नुकसान झालें नाहीं; ब्रह्मदेवानें जेव्हां सद्गुणाचें सहस्रभोजन घातलें, तेव्हां ही टिळक-चिपळूणकर नांवाची दोन भटें इतकी तुडुंब जेवली कीं, दुसऱ्यांच्या वांट्याला जायला सद्गुण शिल्लकच राहिला नाहीं. पश्चिमेचा उद्धार करण्याकरितां आकाशांतल्या बापाचा एकच पूत धांवत आला, पण पूर्वेचा ब्रह्मांड पांडित्याचा झेंडा फडकावण्याकरितां ब्रह्मदेवाच्या मुखांतून एक पलटणच्या पलटण येथें आली आहे. या पलटणीचे कर्ममार्तंड (Commander) कै. टिळक आणि चिपळूणकर हे होत ! टिळक-चिपळूणकर देवबाप्पाच्या भगतगणांनीं आपल्या आराध्य देवतेचा असा महागजर चालवलेला असतो, कीं हें ' टिळक-चिपळूणकर ' म्हणजे काय गौडबंगाल आहे, याचा नीट खुलासा करून टाकणें, हेंच खऱ्या देश-सेवकाचें आद्यकर्तव्य होऊन राहिले आहे, असें वाटूं लागतें. टिळक-चिपळूणकरांचा

कीर्तिदुंदुभि

एवढा आटारेटा करून जो दुमदुमला जात आहे, याच्या बुडाशीं खरोखरीच कांहीं नौबदी कारण आहे काय, याचा विचार करूं. टिळक-चिपळूणकर विद्वान् मुत्सद्दी होते म्हणून त्यांच्या नांवानें एवढा " की जय " होत आहे म्हणावे, तर रानडे-आगरकर, गोखले यांच्या खंबीर विद्वत्तेपुढें व गंभीर मुत्सद्दीपणापुढें हा टिळक-चिपळूणकरी थाट दुबळ्या कलावंतीणीनें केलेल्या नकली शृंगारासारखाच हीणकस ठरत आहे. निर्भीड, बिनतोड आणि धाडसी मत प्रतिपादण्यानें " टिळकमहाराजकी " होत आहे म्हणावे, तर राजारामशास्त्री भागवत, महात्मा फुले याच्या पुढें ही टिळक-चिपळूणकरी निर्भीडता, महाराणीमागें लुब्रेपणानें फिरणाऱ्या दासीपेक्षांहि हीनवृत्त आणि स्वार्थलोलुप ठरेल ! दिलफाट स्वार्थत्यागाच्या महायज्ञानें यांच्या कीर्तिचा धूर आकाशांत चढला म्हणावा, तर कै. दास, देशसेवेमुळें कोट्याधिशाचें भिक्षाधीश झाले आणि टिळक-चिपळूणकरी दुकल केवळ चळवळीच्या नांवावर वाघ्याचे पागे आणि भटजीचे शेटजी बनले. महामर्दुमकीनें इंग्रेज बहादुरावर खूपशर्तीनें चढाई केली म्हणून या पारशरामीयांची भलीभलाई बहारली, या म्हणण्यांत मात्र जेवढा तथ्यांश तेवढा मिथ्यांश आहे. इंग्रजांच्याविरुद्ध यापरशुरामीयनांनीं रणशींग फुंकलें म्हणा, कीं

संध्येची पळी

आपटून महाध्वनि केला म्हणा, इंग्रजाविषयीं या ब्रह्म-मुखकुलावतंसांच्या मस्तकांत तिडीक आणि हृदयांत तिरस्कारयुक्त द्वेष मात्र होता. प्रश्न एवढाच आहे कीं ब्राह्मणाचें राज्य टोपीकर बूटवाल्यांनीं घेतलें, म्हणून ही तिडीक होती, कां खरोखरीच सर्व जनतेला मुक्त करण्याकरतां होती! टिळक-चिपळूणकरांच्या ढोबळ चरित्रावरून ही दुक्कल महान् देशभक्त होती असें हमखास वाटूं लागतें आणि परप्रांतीय हिंदसेवक वरवरच्या भपक्याला फसलेहि आहेत! पंजाब म्हटले कीं, लाला लजपतराय यांची मूर्ति डोळ्यासमो:र उभी राहते, बंगाल शब्द उच्चारला कीं पाल, दास, घोष वगैरे अनेक अतिरथि महारथि दिसूं लागतात आणि महाराष्ट्र म्हटलें कीं टिळक-चिपळूणकर-केळकर-लवाटे-कवडे-देवधर हाटेलवाले; जोशी खानावळवाले अशी बडी बडी देशाची भक्ताळ धेंडें दिसूं लागतात. महाराष्ट्राचें मुख केसरीपत्र. या मुखाला बत्तीसच काय पण छत्तीस दांत आहेत, प्रत्येक दांत चावण्याच्या सनातन सवयीनें इतका सुंद आणि सुजरा बनला आहे, कीं ब्राह्मणाशिवाय कोणी दुसरा वर डोकें काढूं लागला कीं, त्याच्या नरडीला हा दात लागलाच. टिळक-चिपळूणकरांच्या चरित्राचें निपःक्षपातीपणानें निरिक्षण करणाऱ्यास टिळक-चिपळूणकर देशभक्त नसून अत्यंत नीचकोटींतले

देशाचें दुष्मन

होते, हें सहजच पटणार आहे. पंढरपूरच्या वारीला खऱ्या संताबरोबर कांहीं भामटेहि 'ग्यानबा तुकाराम' म्हणत जात असतात; भोळे भाबडे त्यांच्याहि चरणावर मस्तक ठेवीत असतात; तशांतलाच प्रकार टिळकांच्या बाबतींत झाला आहे. लाल, पाल व दास या महासाधुंच्या स्वातंत्र्य-देवीच्या दिंडींत टिळकोपंत आपल्या लग्यावर रोख ठेवून खऱ्या संतापेक्षांहि मोठा आविर्भाव आणून 'जयहरी' म्हणत राहिला; लोकांनीं म्हटले वाहवा टिळक वाहवा! पण सोंग टिकणार किती दिवस! अखेरीला हा संत नव्हे सैतान आहे हें आपोआप सिद्ध होत गेलें. स्वातंत्र्य तर राहूं द्याच, पण लांछित स्वराज्याच्या हप्त्याचा एक तुकडा मिळतोसा पाहून हा सोंगाड्या चोर एकदम जागा झाला आणि "महाराष्ट्रीयांनों, मी तुमच्याकरितां धरपडत आहे" असें जेव्हां तेव्हां ठासून सांगणाऱ्या टिळकांनीं महाराष्ट्रीय समाजाला दुखविण्यास व लाग साधण्याचा बेत करण्यास कमी केलें नाहीं. टिळक ब्राह्मण जातीकरितां स्वराज्य मागत नाहींत, मिळालें तर सर्वांनाच मिळेल, असें प्रौढीनें भूल देणाऱ्या टिळकांचें अंतःकरण अथणी मुक्कामीं बाहेर पडलें; "शिंप्यांना कौन्सिलांत जाऊन काय मशीन चालवायची आहे? कुणबटांना काय नांगर धरायचा आहे? वाण्यांना काय तागडी धरायची आहे?" ही टिळकांची हृदयरचना दाखविणारी ब्राह्मणी वचनें टिळक माऊलीच्या मुखांतून बाहेर पडली. ही मुक्ताफळें बाहेर पडतांच भटाभिक्षुकांनीं आतां आपल्या हातीं स्वराज्य पडणार! या आनंदानें टाळ्या पिटून परशुरामवासी पेशवाईला आनंदाश्रु ढाळावयास लावले! प्रत्येक

भारतीयाला समान हक्क प्राप्त करून देण्याकरतां चित्त वित्त वेचणारे कोठे लाल, पाल व दास आणि आपल्या भटाभिक्षुकां करितांच शेंडी झाडून स्वराज्य मागूं पाहणारा कोठे राष्ट्रीय दरवडेखोर टिळक! टिळकांच्या या अथणीच्या व्याख्यानानें ऊर्फ भामट्याच्या कबुलीजबाबानें टिळकांचें लोकमान्यत्व तर तिरडीवर चढलेच पण ब्राह्मण म्हटला कीं कसा पहिल्या प्रतिचा हलकट आणि अव्वल दर्जाचा अधम असतो याची जाहीर प्रचिती सर्व समाजाला आली. शिंपी, सोनार, माळी, मराठे आदिकरून जनतेच्या खऱ्या प्रतिनिधींनीं कौन्सिलांत जावयाचें नाहीं तर काय परान्नपुष्ट आणि खाल्ल्या घरचे वांसे मोजणाऱ्या भटाभिक्षुकांनीं कौन्सिलांत घुसायचे! पण गंमत अशी आहे कीं टिळक इतके मनाचे कुजकट आणि कृतिचे हलकट होते, म्हणूनच त्यांचा बोलबाला चालवला आहे. टिळक-चिपळूणकरांचा बोलबाला रानडे, आगरकर, गोखले, फुले, भागवत यांच्यापेक्षां जास्त माजवला जातो, याचें इंगितच मुळीं हें आहे. रानडे, आगरकर काय देशभक्त नव्हते! पण त्यांनीं ब्राह्मण्याचें स्तोम माजविण्याचा टिळकांसारखा पाजीपणा नाहीं, म्हणून बिचारे आर्यांचा उद्धार करायला आलेल्या या चितेपासून निघालेल्या भूतांच्या अवकृपेला कारण झाले. टिळक-चिपळूणकरांची आरति जशी जनता जागीं होईल, तस तशी आपोआप कमी होऊन, टिळक, चिपळूणकर या दोन चितोत्पन्न चित्पावनांची खरी ओळख पटत जाणार आहे! टिळकांच्या बाजारबुणग्या भगतात एकजात चितोद्भव लोकांचा एकरकमी भरणा आहे! हेच ब्रम्ह्याच्या लाळेंतून लोळत आलेले लघळलुचे टिळकांना तीन दिडक्यांचा

शेंदूर फासून

कचकावून पावणारा म्हसोबा बनवूं पहात आहेत. सर्व गुणांचें अधिष्ठान, विद्वत्तेचें स्टोअर हाऊस, वेदान्ताचा किताबखाना म्हणजे बळवंतराव टिळक! टिळकांच्या चरित्रांच्या उद्दाम सद्दींत पेशवाई मस्तवालपणा पूर्णत्वास पोचलेला आढळतो. ज्या सनातन सोनेरी टोळीचे टिळक-चिपळूणकर पुरस्कर्ते होते, त्या टोळीच्या हातांत धार्मिक; सामाजिक सूत्रें होतीं आणि इतर अज्ञान होते म्हणून या बोकेसंन्याश्यांचा कर्मयोग दहावीस लाखाला फळफळला. देशाची प्रगति खुंटविण्याकरतां अपशकूनच करण्यास पुढें बोडके येणाऱ्या बदअवलादीच्या संस्कृतीचे टिळक चहाते होते, चिपळूणकर प्रणेते होते; म्हणूनच कांहीं काळ यांच्या नाममहिम्याचा महागजर झाला; ज्या सोनेरी टोळीचे टिळक प्रमुख होते त्या टोळीनें आजवर काय प्रताप गाजवला आहे, याचा विचार करूं; म्हणजे टिळक चिपळूणकर देशाचे कैवारी कां वैरी याचा वाचकांना उलगडा होईल. "वर्णश्रेष्ठत्व, शुद्धबीजत्व, ब्राह्मण्य" या सदराखालीं मानवी बुद्धीच्या वाढमस्तकावर लंगरी खिळा ठोकणारी व शास्त्रोक्त गुलामांचा व्यापार करणारी जी व्यूतन्न पंडीतांची अहंमन्य टोळी, त्या टोळीचे टिळक-चिपळूणकर आधारस्तंभ होते. भारतीय बहुजन समाजाच्या मुखांतून वेदविद्या

हिसकावून अज्ञानाचा शेंदूर पाजून, स्वदेशाला निर्बुद्ध, निर्जीव करणाऱ्या कसाब कंगालांचा जयजयकार करणारे टिळक चिपळूणकर होते. भरमसाट भाकडकथाना धर्मग्रंथ ठरवून निव्वळ भटाभिक्षुकांच्या पोटापाण्याची सोय लावून देणारी जी अश्लील, वीभत्स पुराणें; त्या पुराणांची पकड बहुजनसमाजाच्या मानेला जास्त कशी करकचील हीच चिंता वाहणारे हे ब्रह्मवांत्युत्पन्न टिळक-चिपळूणकर होते. व्रतांच्या खर्चांत हिंदु धर्माला हजारो फूट खालीं गाडून जिवंत मुडद्यांच्या शरीरावरचे लचके तोडणारे, गिधाडें पुराणपुरुष टिळक-चिपळूणकराचे पूर्वज होतें! भगवान बुद्धाच्या मानवी उत्क्रांतिला हाणून पाडून, पुन्हां चार वर्णांच्या नांवाखालीं चार हजार जातीला प्रसवणारी ब्राह्मणी संस्कृतिची हडळ टिळक माऊलीची कृपासाऊली होती. " मन जाणे पापा आणि माय जाणे

मुलाच्या बापा "

अशा विचारसरणी मांडणाऱ्या ज्या पेठणी पंडितांनीं ज्ञानेश्वरमहाराजांना हीनकुल ठरवले, ज्या पगडभाई पंडितांच्या अठरापगड पुराणांचा चोथा चघळणारे टिळक-चिपळूणकर होतें. नामदेव, गोरा कुंभार, एकनाथ, सेना न्हावी, सज्जन कसाई, कबीर वगैरे अनेक संत महंतांना घटांत जन्मून पटांत मरणाऱ्या ज्या चिगलभटांनीं त्रास दिला, त्या भटकी ऊर्फ भिक्षुकशाहीचे टिळक पक्षपाती आणि चिपळूणकर पक्षपति होते. संत शिरोमणी तुकोबारायानें ब्राह्मण नरमादीपोटी आलेल्या देवाच्या लाडक्या कारट्याकरताच राखून ठेवलेले वेद आपल्या अभंग वाणीनें जगापुढें मांडले, म्हणून बिचाऱ्या तुकारामाचे ग्रंथ गंगेत तर बुडवलेच पण प्रत्यक्ष तुकारामालाहि डोहांत बुडवायला ज्या ब्रह्मलाळोत्पन्न लफंग्यांनीं कमी नसेल त्या भटाभिक्षुकांच्या आश्रयाचे टिळक–चिपळूणकर आदिनिधान होते! केवढें ते प्रौढ प्रताप क्षत्रिय कुलावंतस शिवछत्रपति! आजन्म देहाचें रान करून ज्यानें स्वराज्याकरितां जीविताचा संकल्प सोडला त्या शिवनृप श्रेष्ठाला या कलिच्या दत्तक पुत्रांनीं किती त्रास दिला! ब्राह्मण जातीच्या शेंड्या मुंड्या यवनी समशेरीच्या पात्यावर आणि ब्राह्मण बहिर्णींच्या अब्रूचें जोवीत यवनी दृष्टीच्या ओझरत्या फिरतीवर अवलंबून होते, अनाथ व नामर्द भटाच्या संरक्षणाकरतां हरहर महादेव अशी मेघगर्जना ठोकून यवनावर सिंहासारखा झडप घालणारा मर्दांचा मर्द शिवाजी भोंसला या ब्राह्मण नांवाच्या कृतघ्न सैतानांनीं शूद्र ठरविला आणि राज्याभिषेकाला नालायक म्हणून निकाल दिला! सह्याद्रीच्या कडेकपारींना दाराच्या अंगणाची पोरकट कळा आणणारा नेताजी पालकर! सिंहगडाच्या माथ्यावर पाय देऊन इंद्राचें सिंहासन बळकावण्याकरिता गेलेला तान्हाजी मालुसरा, हत्तीच्या मस्तीला मुठीनें मारणारा बलभीम जीवा महाल्या, धडापासून शीर तुटले तरी हातापासून पट्टा न सोडणारा, महाराष्ट्राला पावन करणारा वीरप्रभू बाजी; एकजात इमानी हृदयाच्या डोळ्यानें पोरावाळांचे मुडदे पाहूनहि स्वामिचोर न होणारे एकएक रणधुरंधर लेखणीचे मर्द बहादर प्रभू, पहाडाची हाडे कडाकडा फोडून दडलेले स्वातंत्र्य हिसकून घेणारे हे मराठे–प्रभू जर क्षत्रीय नसते, त्यांच्या अंगांत जर क्षात्रतेजाचे शंभर नंबरी वारे संचारत नसते तर घरांघरांतून या गोऱ्या गोमट्या टचाचलेल्या

भटणींच्या बिब्या

व्हावयाला वेळ लागला नसता. महाराष्ट्राच्या या क्षत्रिय मनगटात जर मराठी रक्ताचें तेज सळसळत नसते, तर आज रस्तोरस्ती मिरवणाऱ्या ब्राह्मण माद्या मुसलमानी इष्के शराबांत गळ्याइतक्या नाही, तरी कंबरेइतक्या खास बुडून गोबाच्या पडद्याआड डांबलेल्या दिसल्या असत्या. ज्या बाईलजाद्या भटाभिक्षुकांचें ब्रह्मतेज इस्लामी चांद-ताऱ्यापुढें थरथर कांपून माजघरांतल्या पलंगापर्यंत डोळे झांकीत असे. तेंच शेळपट ब्रह्मतेज–कृतघ्नपणाची कमाल करून-जेव्हां शिवबा राज्याभिषेकाला स्वारीत चालले तेव्हां डोक्याला धोंतरे बांधून मिरवणुकी पुढें आडवे पडलें. 'शूद्र राजा राज्याभिषेक करून घेतो, म्हणून धर्म बुडाला म्हणणाऱ्या भिक्षुकी मनाला, एखादी भटीण शूद्र पलंगावरून उड्या ठोकीत आली तरी समजत नाहीं! राज्याची भिक्षा मागायला अल्लक म्हणून येणारा गोसावडा रामदास या राज्याभिषेक प्रसंगी कोठल्या मठींत गांजा खेचीत बसला होता, याचा उलगडा भटोबा करतील काय? जेव्हां तेव्हां शिवाजीचें गुरुपद रामदासी झोळींत टाकणाऱ्या आजच्या भटांचा भगवा भंगड रामदास, बजाजीखानाच्या शुद्धीप्रसंगीं कोठें वेणुताईच्या महालांत

"सदा सर्वदा योग तुझा घडावा
तुझ्या कारणी देह माझा पडावा"

हा शृंगारमंत्र शिष्यीणीला शिकवीत होता काय? सहस्रभोजनाच्या वेळी पंगत ठोकून बसणारे हे अन्नावरचे कीडे या दोन्हीं प्रसंगी कोठे तोंड काळें करून बसले होते? बजाजीखानाचा शुद्धिविधि शिंघणापुरी शंभूपुढें एका गुरवानें केला. तेथें डोळ्यांत घासायला सुद्धां भट गेला नाहीं. रामदास शिवाजीमहाराजांना भेटला असल्यास अगदी शेवटीं भेटला, हें ऐतिहासिक सत्य लपवणाऱ्या टिळक-चिपळूणकरांच्या चेल्यांनीं उपरिनिर्दीष्ट दोन समारंभांत रामदास कुठल्या गिरीकंदरांत वनभोजनाला गेला होता, हें सप्रमाण दाखवून द्यावे. ज्या ब्राह्मण संस्कृतीनें शिवनृपाला सतावले, त्याच बारूळवासी संस्कृतीचें टिळक-चिपळूणकर हे आधारस्तंभ होते. कलुशाकवजी ह्या ब्राह्मण अवलादीनें तर शंभू छत्रपतिची ××× गिरी करून श्रेष्ठत्व मिळविलें आणि शेवटी निमकहरामपणाची जात दाखवली. कोंकणांतून वक्रगतीनें डोंगर चढून आल्यामुळें संवयीनें पुन्हां वक्रगतिनेच चालणाऱ्या

कों. ब्रा.ची

(कोंकणस्थ ब्राह्मणांची) आणखी एक निमकहराम टोळी घाट माथ्यावर पाठी पडशी टाकून आली. अगोदरच्या, ब्रह्मका सर्पोंना हा 'कों ब्रा' जोडीला मिळाल्यावर मग अन्यायाला, अधर्माला सीमा तरी कशी राहणार! धनाजी म्हणताच इस्लामी वारूच्या

तोंडचें पाणी पळत असे, त्या धनाजीशीं निमकहरामी करून, इतकेंच नव्हे तर ज्या गोष्टी लिहिण्यास लेखणी शरमते आणि नरमते असल्या गलिच्छ तऱ्हेनें बाळाजीनें स्वतःची शय्यासंपद धनाजीच्या घरीं गहाण टाकून पेशवाई बळकावली. कांहीं ब्राह्मण लोक बढतीसाठीं कुठल्याहि दाराने कसलेंहि साधन हातीं धरून स्वार्थ साधीत असतात, एवढें विधान ठोकायला पेशवाईचा इतिहास पुरेसा आहे. बाईल-बढतीची देवघेव करून मानवी सभ्यतेला काळीमा फासणारे ब्राह्मण हे आमचे वर्ण गुरू! साहजिक आहे, ज्यांचा परात्पर परमेश्वर ब्रह्मदेव जर स्वतःच्या कन्येवर बलात्कार करायला भीत नाहीं; तर त्याच्या या लाडक्या लेकरांनीं स्वतःच्या मुली वशिल्याकरिता नजराणा म्हणून पाठविल्या तरि तो ब्रह्मदेवाएवढा तरी गुन्हा नाहीं. असें प्रकार पेशवाईत असंख्य झाले आहेत. असल्या अधमाधम ब्रह्मवृंदांची तरफदारी करणारे टिळक-चिपळूणकर हे आधुनिक वकील होऊन गेले.

हिंदुस्थानच्या इतिहासांत मन संतप्त करून सोडणारी आणि एकंदर मानवजातीला कलंकभूत होऊन राहिलेली पेशवाई ऊर्फ दोनशें वर्षांपूर्वीची टिळकशाही कारकीर्द सुरू झाली. या पेशवाईंत काय अनाचार घडला नाहीं? कसले अत्याचार झाले नाहींत? मानवी कवटीच्या वीतभर कोठडींत जेवढी म्हणून नीचप्रतीची उत्पत्ति होऊं शकेल, तेवढी होऊन गेलीं. परमेश्वर कधींहि निजलेला नसतो पण पेशवाईचा अंमल पाहिला की या वेळीं परमेश्वर पेंगत तरी असला पाहिजे, किंवा क्षीरसागराला भरती आल्यामुळें त्याला या दुर्जन पेशव्यांच्या संहारार्थ येतां आलें नसावे असें वाटूं लागते. इतिहास संशोधनाच्या नांवाखाली हीच सोनेरीटोळी इतिहासाची पानें उलटी लिहिण्याचा पुण्याला शास्त्रीय प्रयत्न करीत आहे. आपल्या वाडवडिलांचें काळेबेरे पाप-पर्वत भूतकालाच्या खोल दरींत गाडणें हे इमानी वंशजाचें शतकृत्य ठरेल, यांत शंका नाहीं; पण आपल्या सैतानी पूर्वजाच्या कीर्ति-मंदिराचा बनावट पाया भरण्याकरतां दुसऱ्याच्या महापराक्रमाला कमी दर्जाचे ठरविण्याचा प्रयत्न करणें, हे ब्राह्मणाशिवाय दुसऱ्याच्या हातून होणारच नाहीं. पेशवाईचा इतिहास बदलण्याचा या टिळक-अनुटिळकांचा मोठा भागीरथ प्रयत्न चाललेला असतो आणि त्याबरोबरच कर्तुम अकर्तुम शिवरायाचें अलौकिकत्व रामदासी कफनीत गुंडाळून एकजात मराठ्यांच्या स्वाभिमानाला धक्का लवण्यांत येत असतो. शिवछत्रपति त्यांचे वंशज, व मराठे यांना कागदोपत्रीं, हातोहाती नामोहरम करण्याची परंपरा या पेशवाईपासून तों टिळकापर्यंत सुसंगत आहे. ज्या पेशवाईचा टिळक-चिपळूणकरांना मोठा पहाडी अभिमान होता, ती पेशवाई तरी काय होती? टिळक-चिपळूणकरांच्या आंतेवासी आप्तेष्टांच्या पेशवाईचें वर्णन करणें फारसें अवघड नाहीं. कलत्र आणि जिवोत्त कोणत्याही पेशव्याच्या कारकीर्दीत सुरक्षित नव्हते. आजच्या पेशव्यांच्या सुतकी टिळकानुटिळकांनीं किती जरी पेशवाईची काळीबेरी झांकण्याचा प्रयत्न केल, तरी इतिहास असा निःसंग आहे, कीं तो कोणाचीहि भीड न ठेवतां, शिष्ठाशिष्ठतेचा पडदा न ठेवतां पहिल्या बाजीरावाचा बाप बाळाजी कां धनाजी असा प्रश्न उपस्थित करा-

यला भीत नाहीं. इतिहासाचें एक पान सांगतें कीं नानासाहेब पेशवा बापाचें नांव बाजीराव लावीत होता, लागलीच दुसरें पान मल्हारराबाचाहि हा पुत्र असणें शक्य आहे, असें छातीठोक सांगायला कचरत नाहीं. जो इतिहास नारायणरावाच्या खुनाबद्दल एका डोळ्यानें दुःखाश्रु ढाळतो, तोच इतिहास चुलतीवर बलात्कार करूं पाहणारा नरपशू बरा मेला म्हणून आनंदाश्रुहि ढाळायला कमी करीत नाहीं. नारायणरावाची बायको नाना-फडणीसाच्या गळ्यात मिठ्या मारते तर इकडे नाना एका सोनारणीच्या पोराला सवाई माधव करतो; हें इतिहासच सांगत आहे. पेशवाईच्या भर अमदानींत नाना फडणीसानें घाशीरामी साधनावर एकहि भटीण धड ठेवली असेल काय? ज्यानें स्वामीणीवर पापदृष्टि ठेवून शेवटास नेली, तो पुरुषजातीला कलंकभूत होऊन राहिलेला नाना फडणीस, इतर सरदारांच्या आयाबहिणी दासीबटकीपेक्षां जास्त किंमतीच्या कशा समजणार? पुढें शेवटच्या रावबाजीनें तर काय पुणेंच डोक्यावर घेतलें, बायको घेऊन वाड्यांत गेला नाहीं म्हणून बापू गोखल्याची पाठ थोपटतांना आजच्या भटांना कढी वरपण्यासारखें अवसान भरतें, पण यावरून बापूशिवाय सर्व भटांच्या बायका वाड्यावर रात्र दोन रात्र मुक्काम करीत होत्या, हे ब्रह्ममुखानेंच सिद्ध होत नाहीं काय? ब्राह्मण्याच्या बीज शुद्धिचा टेंभा मिरवून प्रभू जातीला संकरज म्हणणाऱ्या राजवाड्यांनीं ह्या पेशवाई गडबडगुंड्यावरून तरी ब्राह्मण जात

व्यभिचारज

आहे, असें म्हणायला पाहिजे, पण त्यांना दुसऱ्याला नसते दोष लावतां येतात; स्वतःच्या जातींतले गडबडगुंडे कधींहि दिसणार नाहींत; ज्यांनीं राज्य कमविलें, त्यांच्यावर उलटून पडून या संशयित उत्पत्तिच्या आणि अशुद्ध बीजाच्या पेशव्यानों छत्रपतिला कैदेंत टाकलें; त्यांनीं लिहिणें, पुसणेंसुद्धां शिकूं नये म्हणून बंदोबस्त केला. मनुच्या काळीं शुद्राला छळणारे, हे सर्व समाजाच्या मिश्र रक्तानें ब्राह्मण मादीच्या कुशींत जन्मलेले पेशवे पुन्हां मनुपेक्षांहि निर्दय तऱ्हेनें ब्राह्मणेतरांना छळूं लागले. प्रभू जातीवर ग्रामण्यांचीं संकटें ओढवून अनेकांच्या गर्दनीवर सुऱ्या फिरवल्या! पेशव्यांच्या माय बहिणी दिवसा-ढवळ्या ढालगजपणा करून, त्यांचें शुद्धबीजत्व बुधवार चौकांत मांडू लागल्या आणि याबद्दल जो नांवे ठेवील त्यालाच हीन ठरवण्याचा पेशवे प्रयत्न करूं लागले. प्रभूची जात म्हणजे भयंकर निर्भीड आणि तडफदार! त्यांच्या तोंडून पेशवाईचें बींग पेशव्यांच्या तोंडावर उच्चारलें जाणें अगदीं त्रिकाल शक्य! असल्या निर्भीड व सत्यान्वेषि प्रभूंचा पाडाव करणें, हेंच पेशव्याचें कार्य ठरलें. त्यांची परंपराहि अजून त्यांचे सुहेर सुतके राखून आहेत. छत्रपतीचा शक बंद केला. छत्रपतींचा छळ आरंभिला हें एकनिष्ठ प्रभूंना कधींहि खपणार नाहीं, हें पेशवे जाणून होते. अडदांड मराठ्यांना नामोहरम करण्यांत पेशव्यांच्या बाटेतला एक मोठा कांटा म्हणजे

बुद्धिमान् प्रभूजात

त्यामुळें प्रभू जातीवर पेशव्यांनीं जी आग पाखडली तींतून ते प्रभू होते म्हणूनच निभावले; इतरांची छाती नाहीं. आज घटकेला व्यभिचारोत्पन्न भटजातीतला राजवाड्या-सारखा ब्राह्मण जर अजून प्रभूंच्या नांवानें खडे फोडतो ! यावरून पूर्वीच्या त्यांच्या द्वेषाचा बोध होणें फारसे अवघड नाहीं. वेद उच्चारला, सोंवळें नेसला म्हणून सातारा जिल्ह्यांत मिलवडी मुक्कामी ब्राह्मणांनीं

सोनारांच्या जिभा कापल्या.

शिंप्यांच्या पगड्या हिसकावण्यांत आल्या. बिचाऱ्या अस्पृश्यांच्या गळ्यांत तर धरणी बाटेल म्हणून थुंकण्याकरतां गाडगी अडकविली ! वाचकहो ! डोकें शांत ठेवून असल्या पेशवाईचा पुरस्कार करणाऱ्या टिळक चिपळूकराची किंमत ठरवा. वेश्येच्या माडीवरून उतरलेल्या भटावर, शूद्राच्या कांखेतून पावन होऊन आलेल्या भटणीवर अस्पृश्यांची सावली पडलीं म्हणून त्या अस्पृश्याला गुलटेकडीच्या मैदानात छाटून टाकणारे हे ब्रह्मराक्षस पेशवे आणि त्यांची परंपरा चालवूं पहाणारे हे सैतान टिळक-चिपळूणकर ! जर पुनर्जन्म असेल तर पेशवाईत गारद झालेले हे सारे जीव आज पुन्हा जन्मून ब्राह्मणांच्या चारी मुंड्या पिरगळण्यास कमी करणार नाहींत, पुनर्जन्म जितका सत्य तितकाच तो न्याय्यहि ठरेल ! पेशवाईचा इतिहास म्हणजे ब्राह्मण समाजानें लिहिलेलें आपलें

मृत्युपत्र !

ब्राह्मणांनीं 'ब्राह्मण' म्हणून जगावें कीं अखिल भारतीय हिंदूत मिसळून 'ब्राह्मण्या'च्या दृष्टीनें मरावें, याचा सडेतोड निकाल सांगणारे जज्जमेंट ! मनुष्याच्या खुनशी प्रवृत्तिचा उन्मत्त अतिरेक, जुलमी वृत्तीचा मस्त अभिनिवेश, धर्मसत्तेचा व राजसत्तेचा मिलाफ होतांच होणारे सैतानी खेळ पेशवाईचा इतिहास ऊर फोडून सांगत आहे, जीव तोडून गर्जत आहे. जोपर्यंत जगांत पेशवाईचे पक्षपाती टिळकानुटिळक गटारानें वळवळणाऱ्या गांडुळासारखे चळवळत आहेत. तोंपर्यंत अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न खडतर होऊन राहणारच ! कै. दास म्हणत "मी माझ्या स्वराज्यांत ब्राह्मणांच्या मुली महार,' धेडास द्यावयास लावीन" पण हे ब्राह्मण आहेत, म्हणजे 'ब्राह्मण्य' आहे तोपर्यंत स्वराज्य मिळत नाहीं आणि मिळालें तरी टिकत नाहीं. ब्राह्मण नाहीसें झाल्यावरच स्वराज्य मिळ-णार तर मग त्यांच्या मुलीकरतां कोणता जांवई शोधावा, याची पंचाईत पडणारच नाहीं. 'ब्राह्मण' ही चीज अशी आहे कीं ती भेदाशिवाय जगत नाहीं आणि गुलामगिरीशिवाय जन्मत नाहीं. पेशवाईनंतर ब्राह्मण्याची निराळी आवृत्ती निघाली. सत्तेचा रेच उतरल्यामुळें पर्वतीच्या रमण्यांत भटाभिक्षुकांना ओरगाळ्यानें दक्षिणा वांटून लठ्ठभारती पोळ पोसता येईनात, तेव्हां या फुकटखाऊ पोळांचे संरक्षण संरक्षण कसें व्हावें; ही भटाभिक्षुकांना काळजी पडली. स्वतःचें राज्य गेलें आणि छत्रपतींचें संस्थान टिकलें हें ब्राह्मणांना पहावेना !

परशुरामभाऊची करवीरकर छत्रपतीनें नरम केलेली हड्डी भटोबांच्या मनात सलत होती, खुपत होती. सातारकर छत्रपती पहिल्यापासून भटजीच्या काव्याला बळी पडलें नाहींत. सातारकर छत्रपती प्रतापसिंह यांनींहि ब्राह्मण्याच्या दास्यांतून ब्राह्मणेतरांना मुक्त करण्याची योग्य चळवळ सुरूं केली. पेशवाई अवशेष ऊर्फ आताच्या टिळकपंथाचे पितामह कै. लोकमान्य

बाळाजीपंत नातू

या जातीच्या अस्सल सैतानानें प्रताप सिंहावर संकट आणवून त्यांना पदच्यूत करविले. या वेळेचा इतिहास अंगावर शहारे आणणारा आहे, मस्तक फिरवून सोडणारा आहे. ब्राह्मणेतरांची मुक्तता करणारा पहिला छत्रपती ब्राह्मणांनीं कसा चोहोंकडून छळला! हा इतिहास वाचीत असतां, ज्याचें चित्त बेभान होणार नाहीं तो मनुष्यच नाहीं. केळकर–लेले–नातू-सांगलीकर पटवर्धन वगैरे भटाधिपतींनीं गोऱ्या साहेबांच्या तंबू पुढें दोन-दोनशे भटें उभीं करावीत आणि हा सातारचा छत्रपती आमचा धर्म बुडवतो असा शंख करावयास लावावे. प्रतापसिंहाकरतां सर्वस्वाचा त्याग करणारा नेकजात कायस्थ बच्या रंगो बापूजी गुप्ते याची कोणीकडे स्वामीनिष्ठा! आणि नीच जात भटबच्या नातूचा कोणीकडे राजद्रोह! ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या मनोरचनेतला हा भेद अवश्य लक्षांत ठेवावा; ज्या 'ब्राह्मण्या'च्या मगरमिठीच्या गळपट्टीकरतां टिळक-चिपळूणकरांनीं जन्मभर मनगटमुखाचा संयोग केला; ब्राह्मण्याच्या नासक्या आढीतून नातूसारखे इतके सडलेले आंबे निघालेत आणि त्यामुळें बहुतेक इतके डागाळलेत कीं ही आढीच्या आढीच बाहेर टाकून दिल्याशिवाय हिंदु समाजाचें मानसिक आरोग्य नीट राहणार नाहीं हें इतिहास सिद्ध करीत आहे. या नातूच्या नंतर ब्राह्मणेतरांचा वैरी आणि ब्राह्मणांचा कैवारी विष्णुभट्ट चिपळूणकर निघाला. बाळंभट नातूच्या वेळीं प्रतिस्पर्धी प्रतापसिंह होते, या विष्णुभटाच्या छाताडावर नाचायला सत्यशोधक समाजाचे आद्य प्रवर्तक

महात्मा जोतिराव फुले

होते. भगवान बुद्ध, महावीर, ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे संत-महंतांनीं ब्राह्मणावर हल्ले, फेरहल्ले चढविले पण ते त्यांच्यानंतर सर्व निष्फळ ठरले. महात्मा जोतिरावांनीं हिंदु समाजाला झालेल्या रोगाचें विनचूक निदान केलें; रोग बरे तर करावयाचेच पण जें ब्राह्मण्य तेंच नाहींसे केलें म्हणजे पुन्हां भिती राहणार नाहीं आणि अत्यंत धैर्यानें जिवावर उदार होऊन हिंदुचा उद्धार करण्याकरितां जोतिरावांनीं २४ सप्टेंबर १८७३ सालीं सत्यसमाजाची पुण्यांत स्थापना केली. पुण्यासारख्या ब्राह्मण्याच्या माथ्यावर मारलेली ही जोतिरावांची सत्यसमाजी मेख मस्तक भेदून आरपार काळजापर्यंत गेली आणि अशी पक्की रुतली कीं ब्राह्मण्याच्या घटका मोजीत, नाकीं सूत धरण्याखेरीज त्याच्या भगतांना आतां दुसरा उपाय राहिला नाहीं. पळी पळी दूध घालून मरत्या ब्राह्मण्याला

हुषारी आणण्याचा प्रयत्न होत आहे. पण ही सत्यसमाजी मेख आतां या ब्राह्मण्याच्या ओंकारेश्वरावर पोंचविल्याशिवाय सोडीत नाहीं, त्याला ब्राह्मण तरी काय करणार ? उलट्या दारांत उलटा दांडा ठोंकून सुलटा सरळ मार्ग करणारा वक्र मुत्सद्दी, धैर्यशाली पुढारी ब्राह्मणेतरांना लाभला पण यानें ब्राह्मणशाही पित्त सर्वांग खवळले, आणि एखाद्या दारुड्यासारखे तोंडी येईल ते गालिप्रदान जोतिरावावर करते झाले.

जोतिरावावर पहिला मोठा गहजब करणारा विष्णु चिपळूणकर ! या भटमान्य दुरात्म्यानें लेखणीला दोन जिभांची नागीण बनवून जेवढें ओकतां येईल तेवढें ओकलें. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या पुढें या टिळक-चिपळूणकर गाढवांच्या पोरांनीं आपल्या बापाची म्हणजे गाढवाची मिरवणूक काढून स्वतःच्या उत्पत्तीची खूण पटविली. पेशवाई असती तर जोतिरावांना हत्तीच्या पायी बांधलें असतें, कडेलोट केला असतां पण ज्या इंग्रजामुळें चिपळूणकराला हें शासन करितां येईना त्याच इंग्रजावर या भटबहाद्दरानें खार खावयास सुरुवात केली. इंग्रजी राज्य जोतिरावांचे

डोळे बाहेर काढण्यास

तयार नाहीं. यामुळें चिपळूणकरादि भटाभिक्षुकांना कलियुगाचा मोठा दरारा बसला आणि कलियुग उलथून सत्ययुग आणावयाचे असेल तर पहिले इंग्रज हाकलले पाहिजेत, असा चिपळूणकरांनीं लेखणीचा चंग बांधला. 'शूद्र' वर डोकें करून ब्राह्मणांची बरोबरी करूं लागतात हा केवढा अधर्म ! विष्णुभट चिपळुणकरानें जोतिरावावर आपल्या निबंधमालेंत जे शिंतोडे उडविलेत, जे वाक्प्रहार केलेत त्यावरून या मगरूर कुत्र्याला गोळी घालून कोणी मारलें असते तर तो देवाघरी अन्याय ठरला नसता. ह्या मस्तवाल कुत्र्याचे शिष्य बाळंभट टिळक ! सत्तेचा यांना शोष पडला होता. तो सयाजीराव गायकवाड, त्यानें भटांची खिचडी बंद करून यांची पेशवाई परंपरा उर्फ ऐतखाऊ झब्बूशाही मोडली म्हणून टिळकांची पगडी रागानें हातभर वर चढली. सत्ता असती तर सयाजीरावाला या पेशव्याच्या मानसपुत्रानें केस धरून खाली खेचला असतां; संमति बिल, पुण्याची सामाजिक परिषद या वेळीं या 'बाम्णाना' आपल्या हातांत सत्ता नाहीं म्हणून आपली फजिती होते, हें करून चुकले. करवीर छत्रपतीला टिळकांच्या पूर्वज पेशव्यांनीं शूद्र ठरविले असतां, हा शाहू छत्रपति क्षत्रिय म्हणवून घेऊं लागला, "अरे कुणबटा ! यदोक्त म्हणतो काय" अशी निर्लज्ज टवाळी करायला टिळकानु-टिळकांना शरम वाटली नाहीं. हातांत सत्ता नसल्यामुळें ब्राह्मण्याचा

"राम बोलो"

होत आहे, याची खूणगांठ टिळकांनीं मनांत बांधून, सत्ता काबीज करण्याकरितां कंबर कसून प्रयत्न चालविले. केसरी ऑफिस सर्व ब्राह्मणांनीं, त्यांतून चित्पावनांनी गजबजून सोडले. कोणतीहि टिळकांची संस्था घ्या, तिथें शेणांतल्या किड्याप्रमाणें चित्पावन

बुचबुचलेले दिसावयाचेच. 'अहोरूपम्' 'अहो ध्वनिः' या न्यायानें टिळकांनें नसोंपंताला म्हणावयाचें "वाहवा नसोंपंत! आपलें नाक अजून शाबूद आहे असें तुम्ही दाखवितां" नसोंपंतानें उलट टिळकांची पाठ थोपटायची व म्हणावयाचें "वाहवा! बळवंतराव, आपल्या शेपटीला इतक्या पापानेंसुद्धां अजून किडे पडले नाहींत" अशी एकमेकांची स्तुति करणारी एक टोळीच जमा झाली; महाराष्ट्राचे लाखो रुपये लुटून हमालाचे न्याहाल बनले. ब्राह्मण्य जगवण्याकरिता सत्ता मिळवूं पाहणारे टिळक आपल्याला विसरणार नाहींत, म्हणून प्रथम बरेचसें भोळे ब्राह्मणेतर त्यांच्यापाठी लागले होते. पण "इथे माझा तात्या, हें माझ्या आण्णाला; हें माझ्या बापूचेच, ह्याला भाऊ. शिवाय कोणी हात लावूं नये" इतकी नीच व स्वार्थी बुद्धि जेव्हां टिळकांची दिसली, तेव्हा ब्राह्मणेतरच काय पण त्यांचे शिष्य म्हणवणारे

श्री. अ. व कोल्हटकर

हे ब्राह्मण गृहस्थ सुद्धां बिघडून टिळकांच्या घशांत उतरलेल्या जनतेच्या पैशाचा हिशेब जाहीर रितीने प्रसिद्ध करू लागले. आपल्या स्वार्थाच्या विरूद्ध जाणाऱ्याशी ब्राह्मण जात कशी वागते, हे कोल्हटकरांच्या छळावरून दिसत आहे. विरूद्ध ब्राह्मण गेला तरी जो नीचशिरोमणी टिळक आपल्या शिष्यांहाती त्याला छळतो, तो ब्राह्मणेतराला किती त्रास देत असेल! ज्यांना आपल्या आया-बहिर्णींच्या डोक्यांवर न्हाव्याचा विळ्यासारखा वस्तार सप्ताहीं फिरताना पाझर फुटत नाही, त्यांना तुमच्या गर्दनावरून सुरा फिरवतांना दया कशी येणार? ब्राह्मणांची चैन बंद पडून ब्राह्मणेतरांना त्यांना छळता येईना, म्हणून इंग्रजावर त्यांचा डोळा. इंग्रज सोडून मराठयांचे राज्य असते आणि त्यांनी ब्राह्मण्याचा यज्ञ आरंभिला असता तरी भटांनी राजद्रोह केला असतां, हे शिवछत्रपति-पासून कालच्या शाहू छत्रपतिपर्यंत सप्रमाण सिद्ध होत आहे; यांना फक्त ब्राह्मणांची सत्ता पाहिजे होती, स्वकीयांची सत्ता पाहिजे म्हणावे तर शाहूछत्रपती, सयाजीराव हे काय परकीय राज्यकर्ते होते? पण ते ब्राह्मण्याचे गळू कापूं लागल्यामुळे या टिळक महाटिळकांचे माथे भणाणले आणि आपण बाळाजीपंत नातूनें अस्सल सुतकी कसें आहोंत; हे जाहीर रितीनें दाखवून दिले. चुकून ब्राह्मणीजहागिरीवर वाकडी नजर न करणारे टिळकानुटिळक, ब्राह्मणेतर संस्थानिकांचा कोठे वांकडा पाऊल पडतो आणि कोठे आपण आपला पेशवाई सूड उगवतो, याकरतां टपलेले असत. देश म्हणजे ब्राह्मण, देशसेवा म्हणजे भटांच्या चरणांवर

"घालीन लोटांगण
वंदिन चरण!"

देशोद्धार म्हणजे निरनिराळे फंड काढून भटमाउलीच्या मुखात चारा, पेंड, सरकी कोंबणे! देशाचें शिक्षण म्हणजे चार भटांची कारटी एके ठिकाणीं करून त्यांना घटापटाच्या खटपटी करावयास लावणे हे राष्ट्रीय शिक्षण! दुसरें कसलेंहि शिक्षण असो, नोकरी असो,

वर्तमानपत्र असो नाहीं तर पुस्तकें असोत प्रत्येक ठिकाणी भट घुसाडणें ही टिळकांच्या चरित्रांतील सूत्रबद्ध आचारपद्धति वाचकांनी लक्षांत घ्यावी. विलायतेला जाऊन आला म्हणून प्रायाश्चित्तादाखल

शेणाचा गोळा

घशांखाली सोडणारा टिळक ! किंजवडेकर खाटकाने बोकड मारून यज्ञ केला, म्हणून महावस्त्र अर्पण करणारा तात्या-अनुटिळक, करवीरकर छत्रपति ब्राह्मणेतरांचा पुरस्कार करूं लागताच हा " स्वराज्यद्रोही छत्रपति " आहे असें म्हणूं लागला, यांत कांहीं एक नवल नाहीं; उलट असल्या कडु अवलादीने असें म्हटलें नसतें तरच आश्चर्य ! टिळक-चिपळूणकरांनी जो देशद्रोही पंथ निर्माण केला, त्या पंथानें महात्मा जोतीरावांचें सर्व कार्य नामशेष करण्याचा कसून प्रयत्न केला. सत्यशोधक म्हटला की त्याला हरउपायानें नेस्तनाबूद करणें, हें या ब्रह्ममुखोत्पन्न जंतांचें जीवितसाफल्य होऊन बसलें होतें. एखाद्या कोंदणांतल्या कुठल्याशा भटाला ' देवाज्ञा ' झाली तर लागलीच ' ते सार्वजनिक कार्यात (?) भाग घेत असत. ते केसरीचे एकनिष्ठ वाचक होते ' असें लिहावयास केसरी चुकून विसरत नाहीं. पण ब्राह्मणेतरांचा कसलाहि अतिरथी कांहींहि करूं लागला, किंवा कैलासवासी झाला तरी भ्रतीवरला ढेंकूण मेल्यापेक्षां केसरीला जास्त विचार करवत नाहीं. कै. जोतिरावांची पहाडी धडाडी व अभिनंदनीय चळवळीची आघाडी ब्राह्मणी नजरेला दिसत तर नाहींच पण दिसली तर खपतहि नाहीं. १८२७ सालीं जोतिरावांचा जन्म झाला. जोतिरावांच्या जन्मदिवशींच

चिरंजीव परशुरामाला

शेवटचा धरडा लागला असेल ! हातापायाला तणावे देऊन परशुरामानें भीतीनें डोळे बासले असतील ! एकवीस वेळां क्षत्रीयांचा निःपात करणारा परशुराम, १८ व्या शतकांत क्षत्रियांना कुटिल राजनीतीनें छळूं पहाणारे परशुरामीयन यांचा चिपळूणकरांनीं आपल्या निबंधमालेंत मोठा गौरवपूर्ण निर्देश करून जोतिरावांना हिणविले आहे. पण एकाच हयातींत ब्राह्मण्याच्या शंभर हयाती जोतिरावांनीं मातीमोल केल्या. चिपळूणकरांच्या पोराबाळांच्या उरावर जोतीरावांचे सच्चे ब्राह्मण्यांचें थडगें बांधतील हा भविष्य काळांतला उघडा आराखडा पुराणांची चिपाडें चघळणाऱ्या चिपळूणकराला आकलन करतां आला नाहीं. चिपळूणकरांना चार भटभिक्षुकें मोठा विद्वान समजतात: धोरणी समजतात. पण ज्या विष्णुभटाला दयानंद सरस्वती व म. फुले यांच्या भविष्याला गवसणी घालणाऱ्या चळवळीचें ज्ञान झाले नाहीं, तो धोरणी विद्वान कीं ब्राह्मण्याच्या उकीरड्यावर पोथ्या-पुराणांचा कचरा फुंकणारा लंबXX ! विष्णुभटानें आपल्या निबंधमालेंत ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण राहिलेत असे जोतिरावांची टर उडवतांना ठणकावून दिले आहे. असल्या हीन हृदयाच्या विष्णुभटाचा, मोठा महात्मा म्हणून पुतळा उभारलेला पाहून ज्या क्षत्रीयाची टाळू तडकून जात नाहीं तो क्षत्रीयच नव्हे ! असल्या देशबुडव्या व

वीरवृत्तीच्या नामर्दशत्रुला मान देणें, हा क्षत्रियांचा अधःपात ठरेल ! राष्ट्राच्या क्षात्रवृत्तीला तेजोहीन करणाऱ्या असल्या अवसानघातकी भटुर्ड्यांना शक्य त्या रीतीनें तेजोहीन करून टाकले पाहिजे. कायदा संभाळून जेवढी शस्त्रास्त्रें यांच्यावर फेंकता येतील, तेवढीं फेंकून यांचा चक्काचूर उडवल्याशिवाय राष्ट्राला तरणोपाय नाहीं. अविच्छिन्न शत्रूपेक्षां हे प्रच्छन्न घरभेदेपण प्रथम नाहींसें केलें पाहिजे. इंग्रजी संरक्षणाची मायापाखर या विष्णुभटावर आणि गाढ अज्ञानाची झांपड अस्सल क्षत्रियावर होती, म्हणून हा विष्णुभट वचावला. आजच्या क्षत्रियांच्या उदयकालात असा एखादा तरी बरळू द्या, त्याच्या पिढ्यान्पिढ्या क्षत्रियांचें अस्तित्व पाठीवर उठलेलें दिसेल ! सध्यां क्षत्रीय जागे झालेत आणि हिंदु-मुसलमानांत विक्षेप येत चालला आहे, म्हणून भटांनीं क्षत्रियांचें अस्तित्व मान्य करून, आपल्या गोऱ्या गौरायांच्या संरक्षणाकरितां, हें सनातन कुत्र्याचें शेंपूट भीतीच्या नळींत घातले आहे. एवढी भीतीची नळी निघूं द्या; पुन्हां हें शेंपूट वांकडें होऊन, या जगावरले क्षत्रीय ब्राह्मणवाणींत तरी नाहींसें होणारच ! क्षत्रियांनीं या पुराणाचा चोथा चघळणाऱ्या भटांच्या संमतीवर आपलें क्षत्रीयत्व ठरवूं नये. ज्यांचें मनगट अजूनहि पाश्चात्य रणभूमीवर

जर्मनीला टोले

चढवतांना क्षात्रतेज दाखवूं शकते त्या वीरमर्द मराठ्यांनी ब्राह्मणांच्या वटवटीनें निस्तेज न होतां, आपल्या वाडवडिलांचें नांव राखलें पाहिजे. आणि पुन्हां इतिहासाची पेशवाई आवृत्ति निघूं नये, म्हणून हें ब्राह्मण्याचें भूत सात पाताळ गाडले पाहिजे. या क्षात्रवृत्ति विध्वंसक तृतियपंथी मनोरचनेचें ऊर्फ टिळक-चिपळूणकराचे पुतळे कसले उभारतां ! यांचें कागदाचे पुतळे करून जाहीर रीतीनें जाळण्याचे सण काढा ! क्षत्रियाची मुंज करतांना, त्यांच्या कमरेला हिंददेवीचा उद्धार करणारी समशेर लटकावतांना, परशुराम, चिपळूणकर, टिळक यांच्या मूर्ती करून आठ वर्षांच्या क्षत्रिय छाव्याकडून लाथेखाली तुडवा आणि मग शिव छत्रपतीची शपथ घ्यावयास लावा, असले क्षात्रविधी काढा. गुलामगिरीची ओठाळी ज्या हिसक्यानें तुटेल असा हडसून हिसका मारलात तर भारतमातेचा उजळमाथां व्हावयाला वेळ नको. महाराष्ट्राच्या मानगुटीवर महाराष्ट्राचें रक्त आणि अवसान यांचा फराळ करणारें हें ब्राह्मण्याचें भूत मानेवरच राहिलें, तर मग अस्पृश्य तर राहू द्याच, पण मराठ्यांनासुद्धा कांहीं करतां येणार नाहीं. एवढ्याकरितां शिवछत्रपतीनीं जसें ब्राह्मणांच्या इच्छेला लाथेखालीं तुडवीत राज्याभिषेक करून घेतला, त्यांचेंच अनुकरण करून, क्षत्रियांना शूद्र ठरवणाऱ्या या टिळक-चिपळूणकरांच्या बेइमान जातभाईंच्या अडथळ्याला टांचेखाली रगडींत हिंदुस्तानच्या उद्धाराकरितां नेटानें चला. सर्व हिंदू एक होत नाहींत, म्हणून हिंदुस्तानचें स्वातंत्र्य अडले आहे, आणि हें ब्राह्मण्य नडतें म्हणून हिंदू तेवढा एकजीव होत नाहीं. आतां मराठ्यांनीं या बाबतींत मागें राहून भागणार नाहीं ज्यांच्या पूर्वजांनीं पाचोळ्याचें परमेश्वर बनवून सबंध देश हलवून सोडला,

त्यांनी अस्पृश्य वगैरे बांधवांना मोठमोठे कार्यकर्ते बनवून पुन्हां पराक्रम गाजविण्याची वेळ आली आहे. टिळकानुटिळक तुमच्या उन्नतीच्या वाटेवर अपराकून करण्याकरता बोडके उभे राहतील; आपल्या बोडक्या विश्वा आडव्या लावतील, पण त्यांच्या या राष्ट्रघातकी प्रयत्नाकडे बिलकूल लक्ष देऊ नका. ब्राह्मण लोक ब्रह्मदेवाच्या ओकारीपासून झालेलें असोत किंवा

जुलाबापासून

झालेले असोत, त्यांची जन्मताच अशी वांकडी शेपटी असतें, की ती तापवलेल्या लाल नळकंडीत घातल्यावांचून करचळणार नाहीं. एखादे आठ वर्षाचे भटाचें कारटें साठ वर्षाच्या ब्राह्मणेतराला 'ये गेण्या पाटील' असले उर्मट शब्द वापरायला कचरत नाहीं. देवाच्या गाभाऱ्यांत एखादी डोकें तासलेली–जिच्या डोक्यावर रुपया छणदिशीं वाजवून घ्यावा असली–बोडकी पुजाऱ्याशीं व्यभिचार करून देवाला शिवली तरी भटांचा देव 'विंटाळत' नाहीं, पण गांधीसारखा ब्राह्मणेतर शिवला तरी त्यांचा देव बाटतो. केवढा हा मनुष्य जातीचा अपमान! ह्या अघोरपातकाची झाडेझडती ब्राह्मण कशी देणार! ब्राह्मणावर सावली पडली म्हणून मुंडी उडवणारी पेशवाई जाऊं द्या; पण आज विसाव्या शतकांत ब्राह्मणाच्या प्रेतालासुद्धां तुम्ही शिवलात तर अधर्म होतो; हा ओंकारेश्वरी अन्याय उघड्या माथ्यानें भर पुण्यांत मिरवतो आहे. ज्या नराधमांचीं प्रेतें पालथ्या मानेनें न्यावी लागतील, असलीं मात्रागमनी भटें जन्मतांच श्रेष्ठ आणि ज्यांच्या मरणानें दुनया दुःखानें कढकढेल ते ब्राह्मणेतर जन्मतःच नीच! हें आमची अठरापगड शास्त्रें सांगतात आणि आम्ही ऐकतो! ब्राह्मणेतरांनो! कुत्रें गल्लोगल्ली पोट भरून संतती उत्पन्न करूं शकते, ब्राह्मणांनीं तुम्हांला कुत्र्यापेक्षां श्रेष्ठ मानले आहे असें एखादे पुराण तरी दाखवाल काय? गाढ अज्ञान हें ब्राह्मणेतराचे साजशृंगार! धूर्तलबाडी ही ब्राह्मण्याची शिंगें! या शिंगानें धरणीचें पोट फाडीत शेषाच्या मस्तकापर्यंत ब्राह्मणानें पोचवले आहे. मराठ्यांनों! माळयांनों, सोनारांनों, शिंप्यांनों कान फाडून पुराणे काय सांगतात ते ऐका! मत्स्यपुराण ७० व्या अध्यायांत पुण्यवती स्त्रियांच्या सदाचरणाचा धर्म ऐकण्याविषयीं उत्सुक असलेल्या ब्रह्मदेवाला शिवानें जो पुण्यवती स्त्रियांचा धर्म सांगितला, त्यांत 'अनंगदान' व्रत आहे. भडकून न जातां हा हिंदुधर्माच्या नांवावरला पाजीपणा वाचा! क्षत्रियाच्या करारी हृदया! तूं ज्यांचें संरक्षण केलेस त्या हरामखोर लोकांचें धर्मरहस्य पहा! तुझ्या कुटुंबाकडे वांकडा डोळा करणाऱ्याच्या डोळयासकट जीवगोळयाचा खुळखुळा करून पोरांना खेळण्यास देणाऱ्या मर्दमराठ्या! तुझ्या धर्मगुरूची ही पापी दृष्टि वाचतांना भडकून बेभान होऊं नकोस! पुराणकर्ते जेहत्ते म्हणतात,

> "ज्या रविवारी हस्त, पुष्य अथवा पुनर्वसु यांतलें नक्षत्र येईल त्या दिवशीं स्त्रीनें उत्तम प्रकारें स्नान करून मदनाच्या नामांनीं विष्णुची सर्वांग पूजा करावी नंतर या व्रतांत (?) विद्वान ब्राह्मणांना बोलावून त्यांची

पूजा करून एक शेर साळीचें तांदूळ घृतपात्रासह द्यावे व यथेष्ठ भोजन घातल्यावर तो साक्षात कामदेव मानून आपला देह त्याला अर्पण करावा याप्रमाणें तेरा महिने करावे. नंतर गादी, गिरद्या, मच्छरदाणी वगैरे उपसाहित्यांनीं युक्त शय्या त्या ब्राह्मणाला द्यावी, अलंकार द्यावे मग लक्ष्मीसहित कामदेव नामक विष्णूची गुळाच्या कुंभावर स्थापिलेली प्रतिमा ब्राह्मणाला द्यावी, एक दुभती गाय द्यावी, नंतर त्याला प्रदक्षिणा करून निरोप द्यावा. हें व्रत (?) घेतल्यापासून जो ब्राह्मण रतिसुखासाठीं रविवारी घरीं येईल त्याला सर्वभावें करून मानावें "

हा मत्स्य पुराणाचा ७० वा अध्याय ! आमच्या कन्यागमनी ब्रह्माच्या मुखांतून पडलेल्या धर्मगुरूंची ही धार्मिक शिकवण ! बोला ! कोणता ब्राह्मणेतर या पुराणापुढें मान लववून आपली बायको दर रविवारी भटाच्या पलंगावर चढवायला तयार आहे ? ही पुराणें जाळायला जो ब्राह्मणेतर तयार होत नाहीं, तो अज्ञान तरी असला पाहिजे किंवा असा मत्स्य पुराणोक्त, बायको देऊन स्वर्ग जिंकणारा तरी असला पाहिजे ! या पुराणाचें पक्षपाती टिळक–चिपळूणकर ! या पुराणाचा जोतिरावांनी द्वेष केला म्हणून भटांनीं त्यांना छळले ! वेश्यांनाहि हाच धर्म सांगून भटांची सोय लावून ठेवली आहे. गोव्याकडे तर धर्माच्या नांवाखाली शेसविधी करून जातच्या जात वेश्या बनवली आहे. नंबुद्री भटाची कारटी लग्न न करतां मोपला पत्करते आणि लोठ्या ब्राह्मणेतरांच्या घरांत दर रविवारीं घुसत असतो. ही सध्याची स्थिती ! वाचकहो, या अध्यायाचा विचार करा ! असल्या पुराणांची बाजू उचलणाऱ्या भटाची मायबहीण शूद्रानें 'अनंगदान' देऊन पावन केली, तर तें क्षम्यच नव्हे काय ? उठ, मर्दा ! तुझ्या अब्रूवर या भटुर्ड्यांनीं पापदृष्टी ठेवली, सदाचाराच्या नांवाखालीं, धर्माच्या नांवाखालीं पूर्वजांच्या मायमाता भ्रष्ट केल्या; त्या दुष्मन भटुर्ड्यांच्या धर्मग्रंथांना, पोथ्यापुराणांना तूं लाथेखाली तुडवून जाळणार नाहींस तर तुझे पूर्वज दुःखानें हंबरडा फोडतील ! आजच्या नामर्द भटाची, हा असला धर्म आचरा म्हणून सांगायची माय व्याली नाहीं, पण आजचेच भट श्रुती-स्मृतीच्या खालोखाल या पुराणांना नेऊन बसवतात. त्याला टिळक–चिपळूणकर कृतीनें दुजोरा देतात, यावद्दल तूं काय करणार आहेस ? आंधळ्या हिंदुमर्दा, तुझ्या धर्माकरितां, धर्माच्या संरक्षणाकरितां हातावर शीर घें ! आणि पहिल्या झटक्याला हीं पुराणें ब्रह्मांडाएवढी होळी पेटवून त्यांत त्यांना ढकलून भस्म करून टाक ! बायका ब्राह्मणांना देणें हा धर्म ? शिवशिव ! हे नागवे धर्मग्रंथ डोळ्यांपुढें असतां ब्राह्मणांशीं सलोखा कसला करतां ? यापेक्षां सर्पाशीं मिठी मारा, तो तुमचा प्राण घेईल पण असली पुराणोक्त पत्निविषयक अब्रू घेणार नाहीं. प्राणापेक्षां अब्रू प्यारी आहे. बीभत्स पुराणें आणखी याहिपलिकडे वाहवलीं आहेत. राजा बाहेरून आला असतां, राणीच्या पलंगावरला भट वरूनच राणी अनंगदानव्रताने पतिव्रता झाली म्हणून सांगत आहे. ब्राह्मणांनों ! ब्राह्मणेतर चिडतात ते उगीच चिडत नाहींत. तुमची पुराणें तुमच्या हातून

तुम्ही जाळलीं नाहींत तरी सर्व ब्राह्मणी–भटणीवर अनंगदाानाचा सूड उगवला जाणार नाहीं, या भयाण भविष्याची खात्री कोणी द्यावी ! बाइलेच्या बाबतीत जनावराला सुद्धां चीड असते, मग हिंदुजनता तर माणसाची आहे. ती जसजशी जागी होणार तसतशी ह्या पुराणोक्त जखमा जास्त ठणकून सबंध देशांत भयंकर क्रान्ती होत जाणार ह्या क्रान्तिचा आग्यावेताळ चिथावून जाऊं नये अशी इंग्रज सरकारची इच्छा असेल तर सरकारनें चट सारी पुराणें

कायद्यानें जप्त

करावींत, त्याची एकही प्रत जवळ पाळील त्याला कडक शिक्षा ठणकवावी. अशा तऱ्हेनें कडक बंदोबस्त केला तरच पुढच्या सुशिक्षित जागृत ब्राह्मणेतर जगांत ब्राह्मण जातीला समाधानानें वागतां येईल. ब्राह्मण लोकांनीं स्वत:करतां हा खणून ठेवलेला

पुराणोक्त खड्डा

पुराणांच्या राखेनें बुजवून टाकावा ! धर्मग्रंथांच्या या जुलमी अरेरावीनें महात्मा जोतिरावाचें चित्त खवळून जाणें अगदीं सहज होतें. जोतिरावांनी व्याख्यानें, पुस्तकें, पत्रें वगैरे अनेक साधनांच्या द्वारें चळवळ उडवून दिली; त्यामुळें भिक्षुकशाहीचा पोटशूळ मुसळासारखा उठला. जोतिरावांच्या हाडीमासीं ही दुष्ट ब्राह्मण्याची जाणीव बाळकडु म्हणूनच आली होती. सातारा जिल्ह्यांत कटगुण गांवीं जोतिरावांच्या पणजाला तिथल्या ब्राह्मण कुलकर्ण्यानें सळो कीं पळो होईपर्यंत त्रास दिला. ज्या वंशांत जोतिरावांसारखा कुलदीपक जन्मणार तें घराणेंहि असले बहादर असणारच. भर पेशवाईच्या मगरमस्तींत जोतिरावांच्या पणजानें

ब्राह्मण कुळकर्णी छाटला

आणि कटगुण गांव सोडून पुणें जिल्ह्यांत खानवडी मुक्कामीं ठिया दिला. पणतुचें गुलामगिरीला तोंड देण्याचें धैर्य जोतिबांच्या पणजांतहि स्पष्ट दिसत होते. जोतिरावांची कार्यभूमी पुणें शहर व्हावी व त्यांच्या हातून यावच्चंद्रदिवाकरौ खळबळ उडवून सोडणारा, मानवी अपक्रांतिला धक्का बसावा, ज्या आखाड्यांत एक एक माजुरी पेशवा ऊतमात करून गेला, त्याच आखाड्यांत जोतिरावांनीं मैदान मारावें अशी परमेश्वरी योजना होती; म्हणून जोतिरावांचा आजा शेटीबा पुण्यास राहवयास आला. पेशव्यांच्या राज्यांतला अंदाधुंदीचा जुल्म पाहून ह्या गोऱ्हे उपनावांच्या शेटीबांना आपल्या वंशांत रंजल्या गांजल्यांना जुलमांतून मुक्त करणारा महात्मा निपजणार आहे, अशी कल्पनासुद्धां नसेल ? शेटीबांच्या कृष्णाजी, राणोजी व गोविंदराव या तीन पुत्रापैकीं गोविंदराव यांच्या पोटी शिवाजी महाराजानंतर बरोबर दोनशें वर्षांनीं १८२७ सालीं जोतिराव जन्मले. पुण्यांत आल्यावर यांचें गोऱ्हे हें उपनांव जाऊन, पेशवे दरबारांत फुलांचें काम पुरवित असल्यामुळें फुले हें उपनांव पडलें, आणि आज ते कोणत्याहि तेजस्वी ज्योतिपेक्षां जास्त फुलत आहेत. देशाच्या उद्धाराकरतां टिळकटलेले व कळकटलेले वांत्युद्भव विप्र जोरानें त्वंपुरा

करीत असतात; त्याच विप्रांनीं आमचा काय म्हणून छळ केला नाहीं ? गोविंदरावांनीं जोतिरावांना शाळेंत घातले तेव्हां हा तैलबुद्धीचा विलक्षण पराक्रमी मुलगा ' शूद्र ' आहे, म्हणून गोविंदरावांच्यापाठी लागून जोतिरावांना शाळेंतून काढावयास लावले. पण यावेळीं परमेश्वर निजला नव्हता आणि परशुरामहि सद्दींत नव्हता. टिळक–चिपळूणकरांच्या ब्राह्मण्य प्रेमावर निखारे पसरणारा महात्मा उत्पन्न व्हावा, ही महाकालाची मनीषाच ठरलेली दिसत होती. पाचकळ पुराणांच्या काळजाला हात घालून टिळकटलेल्या चिपळूणकरांचें दांत पाडणारा म्होरक्या, धैर्याचा गगनस्पर्शी मेरू ब्राह्मणेतरांना लाभावयाचा होता, म्हणूनच गफवार बेग मुनशी या सज्जन गृहस्थानें गोविंदरावांचें मन वळविले आणि वयाच्या १५ व्या वर्षी जोतिरावास पुन्हां शाळेंत घातले. १८४२ साली जोतिराव इंग्रजी शिकूं लागले, शिक्षणानें प्रगल्भ झालेल्या जोतिरावांच्या अस्सल तेजानें उसळी मारली, देशोद्धार कसा करावा याचा ते विचार करूं लागल; मातंग समाजांतील प्रसिद्ध लहुजी-बुवाजवळ दांडपट्टा शिकून तरवेज झाल्यावर बंडखोरी करावी असाहि त्यांच्या मनांत कांहीं दिवस विचार घोळत होता. जबरदस्त कर्तबगार माणसें जरा वाट चुकली कीं, भलतीकडे भडकतात पण मेंग्या मारुतीप्रमाणें स्वस्थ बसत नाहींत. जोतिराव म्हणजे उत्साहाचा, बर्तबगारीचा पहाडी पुरुष. जन्मताच पोलादी काळीज घेऊन आलेले महात्मे संकटाला थोडेच कचरणार ! बंड उभारूं ? कां राज्य उलथूं ? काय करूं ? या विषयीं तरुण जोतिच्या मनांत काहूर माजले, माझी हिंदुभूमी

माझा मायदेश

गुलामगिरींतून मुक्त करण्यांत माझा प्राण गेला तरी बेहत्तर ! अशी १८।१९ वर्षाच्या ह्या महाराष्ट्राच्या मार्टिन लूथरनें घनघोर प्रतिज्ञा केली. त्या काळच्या सर्व पुरुषांत जोतिरावांचें वाचन पहिल्या प्रतिचें होतें. स्वातंत्र्य मिळवूं शकेन, पण पहिले स्वातंत्र्य गेले का ? कसें गेले ? कोणते दुरभिमान भोंवले ? याविषयीं जोतिरावांचें विचार चालूं झाले, भारताची नाडी कशामुळें बिघडली आहे ? याचा विचार जोतिराव करूं लागले. हिंदूत दुफळी म्हणून हिंदुंचे राज्य गेले, दुफळी जातिभेदामुळें झाली आणि जातिभेद ब्राह्मणांनी पाडले ! खोटे ग्रंथ, लबाड व्रतें, स्वार्थी धर्म या भटाभिक्षुकांनीं माजवल्यामुळें, एकंदर राष्ट्र मानसिक दौर्बल्यानें खिळखिळे झांले आहे. जोतिरावानीं विचार कर, कर केला ! आणि शेवटीं निश्चय करून महाराष्ट्राला गर्जून सांगितले कीं लढवय्या महाराष्ट्रा ! मराठी मनगटाच्या पहाडी देशा ! तुला शूद्र म्हणणारा भटजी, कलीयुगांत क्षत्रीय नाहींत म्हणणारा हा दुष्मन, धर्माच्या नांवावर तुला लुटणारा बदमाष दरोडेखोर, धर्मीच्या नांवावर बायकावर पापी दृष्टि ठेवणारा हा पुराणीक, हेच दुष्मन, हेच हिंदुचे, हिंदुधर्माचे आणि हिंदुस्थानचे सातजन्माचें वैरी यांना हाकलून दे म्हणजे तुझे कोटकल्याण होईल !

" ब्राह्मणाचे येथें नाहीं प्रयोजन
द्यावे हांकलून जोति म्हणे "

हें ऐकून ब्राह्मणांच्या अंगाची आग झाली, कारण ब्राह्मण म्हणजे भूदेव ! त्यांना हा ' शूद्र जोति ' हाकलून द्या म्हणतो ! हरामखोर कृतघ्न चिपळूणकरानें आपली जात दाखवून जोतीरावांवर दुगाण्या झाडल्या. ब्राह्मणाकरितांच खटपट करणाऱ्या टिळक चिपळूणकर भटुड्यांनीं राष्ट्राकरितां काय केले, हें एक तरी भटोबा दाखवून देऊं शकेल काय ? सर्व हिंदुस्तानांतील ६ कोट अस्पृश्य आणि त्यांच्या दुप्पट असलेल्या ब्राह्मणेतराना दास्यातून मुक्त करणारा महात्मा जोतिराव ' सेक्शनल ' आणि तात्या, आण्णाच्या घशांत जनतेचे पैसे कोंबणारा

बदमाश टिळक

सर्व राष्ट्राचा उद्धारकर्ता ? ज्या टिळकानें अस्पृश्यांच्या सहभोजनाच्या जाहीरनाम्यावर सही केली नाहीं, असल्या त्या देशघातकी सैतानाला ' देशभक्त ' म्हणणें यापेक्षां मूर्खपणा तो कोणता ? सोवळ्या ओवळ्याची महती गावून भोळ्या ब्राह्मणेतरांच्या अज्ञपणाचा फायदा घेणारा हा चित्पावन टिळक सर्व राष्ट्राचा पुढारी होता, असें हवेतर भटांनीं म्हणावें; टिळकानें ज्या मराठ्यांना ' शूद्र ' ठरविण्याचा प्रयत्न केला ते अस्सल मराठे टिळकांच्या चित्रावर लाथ मारल्याशिवाय राहणार नाहींत. अस्पृश्यांशीं सहभोजनाला त्यार न होता हा ६ कोटी अस्पृश्यांचा उद्धारकर्ता कसा होतो ? थांबा भटांनो, जरा थांबा ? अस्पृश्य जागे होऊ द्या ! मांजरानें ताटांत तोंड घातले तर ज्या टिळकोबाचें ताट बाटत नव्हते; मांजरापेक्षाहि ज्यानें अस्पृश्यांना हीन लेखले ते अस्पृश्य जागे झाल्यावर टिळकांचे पुतळे मुंडकें गाळात कोंबून उलटे उभे करतील आणि विरोधाच्या वडवानलात अस्पृश्याशी रोटी व्यवहार करणाऱ्या, आपल्या हौदावर त्यांना पाणी भरू देणाऱ्या, त्यांना पहिल्याप्रथम शिक्षण देणाऱ्या जोतीरावाला डोक्यावर घेऊन नाचतील आणि असा जयजयकार करतील की तो ऐकूनच राहिलीसाहिलेली भटें पटापट माना टाकतील ! केवढें जोतिरावांचे दिलफाट धैर्य ! भटांच्या भयंकर विरोधाला न जुमानतां केवळ हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाकरितां त्यांनी हातावर शीर घेतले आणि अस्पृश्यांकरितां पहिली शाळा काढली. केवढा कर्तबगार सुधारक ! इतकेंच नव्हे तर जे जातीचे कांदे-रोटी व्यवहार करायला अजून दचकतात; तो व्यवहार जाहीर नोटीस देऊन त्यांनी केला. जो मनुष्य आहे, त्याच्या अन्नाला बाट नाहीं; हें हिंदु धर्माचें खरें तत्त्व अमलांत आणले. कोठें हे महात्मा जोतिराव आणि कोठें वेटींग रुममध्यें भात खाल्ला काहीं पोहें खाल्ले म्हणणारा लबाड टिळक ! वेटींग रुममध्यें भात खाल्ला असतां तर काय लागलीच प्राण गेला असता ? पण ब्राह्मणेतराचे सावली पडलेलें अन्न टिळकानें खाल्ले असते तर त्याचे पितर धडाधड नरकांत पडले नसते कां ? महात्मा गांधी म्हणतात अस्पृश्योद्धार झाल्याशिवाय हिंदुस्थान स्वतंत्र होणार नाहीं. आणि हे चिपळूणकर–टिळक भटजी म्हणतात, " ब्राह्मणांनीं कौन्सिलांत शिरल्याशिवाय देशोद्धार होणार नाहीं. मराठ्यांना शूद्र ठरविल्याशिवाय ब्राह्मणांचे फावणार नाहीं " ही टिळकांचीं

विचारसरणी! आज टिळकांचे मठ शिष्य व लठ्ठ जहाल गांधींच्या दुर्दम दणदणाटाला दचकून अस्पृश्योद्धार करा म्हणतात, पण हें भटांचें सौजन्य नसून गांधींचा पुण्यप्रभाव आणि सत्यशोधकांचा वर्मी टोला याचा परिणाम आहे. यामुळें त्यांना वरवरून तरी कबूली द्यावी लागते. महात्मा फुले यांनीं अस्पृश्यांची शाळा काढली, आपल्या घरांतल्या हौदावर पाणी भरण्यास परवानगी दिली म्हणून याच देशाच्या दुष्मन भटजींनीं जोतिरावांच्या अंगावर शेणमार करविण्यास कमी केले नाही. महाराष्ट्रात अस्पृश्योद्धारांच्या चळवळीचा पाया जोतिरावांनी घातला आणि

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

यांनीं सर्वस्वावर तुळशीपत्रें ठेवून तो धडा पुढें गिरविला. ब्राह्मण शिकला तर जास्त घातक होतो आणि ब्राह्मणेतर शिकला तर जगदुद्धारक होतो हें प्राचीन काळापासून दणकत आलेलें सत्य जरी बाजूला ठेवलें, तरी टिळक-चिपळूणकर व फुलें-शिंदे यांची तुलना करून विद्यमान स्थितीत सुद्धां हेंच सत्य ब्राह्मण्याचें नाक तळापासून उडवल्या खेरीज राहात नाहीं. हेंच सत्य गर्जून ठणकावतें आहे कीं, टिळक-चिपळूणकर ही नुसत्या ब्राह्मणांच्या पोटाकरता हेलपाटा खाणारी भटें होती. आणि फुले, विठ्ठलराव शिंदे, अस्पृश्याचे थोर कैवारी राजर्षि शाहु आणि महात्मा गांधी हेच हिंद देशाचे उद्धारक ठरत आहेत. "यद्यपि सिद्धं" च्या गद्धयावर बसून बेहद्द भामटेगिरी करणारे कोठें कीटक टिळक-चिपळूणकर आणि "सत्य असत्याशीं केलें मन ग्वाही नाहीं मानियेले बहुमता" म्हणणारे कोठें फुले-शिंदे-शाहु-गांधी! टिळकांचा

शिराळशेटी दिडका

बोलबाला करण्याकरितां कितीहि 'नागोबा नसोंबा' वारूळांतून चळवळत असोत, टिळक चिपळूणकरांच्या राष्ट्रीय पातकावर टिळकस्मारकांचें पांघरूण घालण्याचा केवढाहि अट्टाहास करोत, त्यानें टिळक-चिपळूणकर तर श्रेष्ठ ठरत नाहींतच पण हें पांघरूण घालणारेहि देशाचे दुष्मन ठरून जागृत जनता-क्रोधाला बळी पडणारे बोकड ठरत आहेत. टिळकांनीं चांभारांचा गणपति आपल्या गणपतीबरोबर नेला एवढ्याच राळ्याचा थाळा करून अस्पृश्योद्धाराचें श्रेय टिळकांच्या कडोसरीला लावूं पहाणाऱ्या त्यांच्या मुर्दाड चेल्यांना आम्ही असा इषारा देतो कीं तुम्ही तरी आणखी टिळकांना कमीपणा आणू नका. तुम्हीं त्यांचें अन्न खालें आहे, त्यांच्या जिवावर आपल्या पोराबाळांना सोन्यानें मढवले आहे. टिळक मातीच्या गणपतीला शिवायला तयार झाला आणि प्रत्यक्ष जिवंत हिंदु अस्पृश्याला मांजरकुत्र्याहूनच नव्हे तर मातीहून मातीमोल मानून दूर फेंकू लागला; एवढा बदमाष टिळक होता ऑं! असें अस्पृश्य कां म्हणणार नाहींत? एखाद्या ब्राह्मणानें अस्पृश्याकडून पंचवीस रुपये दक्षिणा घेतली, हें जसें त्या भटाला

मोठेंपण, तितकेंच टिळकांना हें भूषणावह आहे. देवबापाचें खूळ माजविल्याशिवाय भटभाई पोळ पोसले जाणार नाहींत, हें जाणून नुसता चांभारांचा गणपतीच काय पण प्रत्येक अस्पृश्याच्या झोपडींत शिरून व्रतवैकल्यें करा आणि भटांना दक्षिणा द्या, असें सांगायला कमी केले नसते. पण हा अस्पृश्योद्धार कसा ठरतो ? एखाद्या भामट्यानें अस्पृश्याचा खिसा कापला आणि त्यानें मोठ्या ऐटींत सांगितलें कीं, पाहा मी म. गांधींच्या आज्ञेप्रमाणें स्पृश्यास्पृश्य भेद पाळीत नाहीं. एखादा ब्राह्मण एखाद्या म्हारणीबरोबर बदव्यवहार करून अस्पृश्योद्धाराची शेखी मिरवूं लागला, किंवा एकाच गुत्त्यांत एकाच ग्लासानें हिंदु व मुसलमान बेवडा पिवून हिंदु-मुस्लीमच्या ऐक्याचे पोवाडे गावूं लागले, तर ज्या दर्जाचा त्यांचा देशहिताचा कनवाळा ठरेल, त्याच तोडीचा हा टिळकांचा

चांभारी गणोबाचा पान्हा

ठरत आहे. अस्पृश्यांना गणेशोत्सव, व्रतेवैकल्यें, ढोंगांस प्रोत्साहन देणें म्हणजे अस्पृशोद्धार नसून भटांच्या पोटाच्या कुरणाची चरण हद्द वाढविणें होय ! गेल्या वर्षाखालीं काशीच्या एका भटानें सुस्वरूप भंगिणीवर पापी नजर ठेवून बलात्कार केल्याचें वर्तमानपत्रात प्रसिद्ध होताच हा अस्पृशोद्धार असें केसरी पत्रानें म्हणावयास कमी केलें नाहीं. पण हाच संबंध उलटा होऊन एखाद्या भंग्यानें एखाद्या भटणीबरोबर संबंध ठेवला तर केसरीला तो अत्याचारी अधर्म वाटेल. तेव्हां अस्पृश्योद्धाराची आठवण राहणार नाहीं. रानडे, गोखले, आगरकर, भागवत, लोकहितवादी यांना त्राहिभगवान करून सोडणारे, टिळक–चिपळूणकर हे देशाचे कैवारी ? बोलणारानें जीभ चावली नाहीं पण ऐकणारांनीं तरी कान लांबू देता उपयोगी नाहीं. कै. आगरकरांनीं टिळकांच्या माकड-हाडावर ज्या डागण्या दिल्या, त्याच आज ब्राह्मण समाजाला कांहीं तरी ताळ्यावर आणीत आहेत. नाहींतर चिपळूणकर–टिळकांनीं स्वदेशाच्या उत्क्रांतीचा गाडा भटकीच्या कोंडवाड्यांत कोंडून महाराष्ट्र म्हणजे गुलामांचें राष्ट्र बनवून सोडलें असतें. पंच हौद-मिशनच्या हैदोसांत टिळकांचें उघडें झालेलें भ्याडपण काशीला मोर्तब होऊन जन्मभर भटाभिक्षुकांच्या तंत्रावर वागणारा ' नामर्द भट ' या परती टिळकांना देण्याजोगी पदवी नाहीं. भटमान्य चिपळूणकर आज जिवंत झाला, तर ब्राह्मण्य बुडतें म्हणून म. गांधींच्या नरडीचा घोट घ्यायला तो धांवला असतां, कुठल्या तरी नरकांतून येऊन तो अजूनहि गांधींची ही ब्राह्मण्यद्रोही चळवळ हाणून पाडण्याकरतां केसरीकर्त्यांच्या अंगांत कधीं कधीं संचारल्याचा भास होत असतो. स्त्री-शिक्षणाविषयीं टिळक–चिपळूणकरांच्या काय कल्पना होत्या, हें केसरीचे हजारो अंकच चाळून पाहावयाची गरज नाहीं. अगदी परवा पुण्यांत टिळकांनीं या स्त्री-शिक्षणाच्या बाबतींत विरोध करण्याकरतां आपल्या राष्ट्रीय उपरण्याखालची कुत्री भुंकायला सोडली. या कुत्र्यांच्या भोकाटीला कोणी जुमानीना तेव्हां

कुत्र्यांचे महा गुरु टिळक


किर्स्लोस्कर थिएटरमध्यें विरोध करावयास आला; आणि पूर्ण फजिती पावून, जोडे, अंडी वगैरेच्या वर्षावात, एकहि शब्द न बोलतां आले तसे चालते झाले. महात्मा जोतिराव असल्या टिळकीबाणाचे आणि भटकी मनाचे नव्हते. त्यांच्यापुढें विरोधाचा सैतान लटलट कांपत असे एवढी त्यांची जबर तत्त्वनिष्ठा व कणखर कार्यक्षमता होती. जी भटें आज आपल्या पोरीबाळीसुद्धां युनिव्हर्सिटीच्या भट्टींतून उबवून काढीत आहेत व जोतिरावांचें शिष्यत्व कृतीनें कबूल करीत आहेत तीच पुच्छगामी भटें, जोतिरावांनीं

१८४८ सालीं मुलींची पहिली शाळा

पुण्याच्या बुधवार पेठेंत भिड्यांच्या वाड्यांत काढली, तेव्हां " देश बुडाला, धर्म बुडाला कलि आला " म्हणून बाप मेल्यासारखी कोकलत सुटली. या कोकलत खंगरात पहिला नंबर चिपळूणकर आणि त्यांच्या खालोखाल शंख बहाद्दर टिळक ! टिळक-चिपळूणकर हे ब्राह्मण्याचे दोन हात होते. कोणी ब्राह्मण्याला कसोटा मारला कीं, हे दोन्ही हात त्यांच्याच तोंडावर आदळून अशी बोंबाबोंब करीत, असा तोंडाचा अजबखाना खोलीत कीं हें ब्रह्मदेवाच्या ओंकारीपासूनच झालेले असावेत, असा समंजस माणसाचा ठाम निश्चय होई. जोतिरावांनीं केलेल्या श्रमाचें फळ आज पुण्याच्या हुजूरपागेतील गर्ल्स हायस्कूलमध्यें पाहावयास सांपडत आहे, व हजारो भटांच्या लेकी-सुना त्यांतून 'मनुष्य' होऊन बाहेर पडत आहेत. जोतिरावांनीं नेट धरला नसतां तर ब्राह्मण जात रानटी आहे, म्हणून 'ब्राह्मणवाडा' गांवाच्या दूर बसविण्याची पाळी आली असती. ही शाळा स्थापन करतेवेळीं जोतिरावांचें वय अवघें २१ वर्षांचें होतें. ६ वर्षांखालीं सत्यशोधक म्हणवून घ्यायला मोठे मी मी म्हणवणारे भीत होते; पण पाऊणशें वर्षांपूर्वी हा २१ वर्षांचा माळ्याचा मुलगा जगावरील

नापाक व नापीक

गुलामांचीं खडकाळ हृदयें, आपल्या थोर पुण्याईचें बीजारोपण करून बगिचाची बहार आणावयास सिद्ध झाला. जुन्या-पुराण्या, नासक्या, कुजक्या मतांच्या उकिरड्यावर लोळून, सवंग लोकप्रियतेचा चिखल माखविणारी टिळकांची गाढवलोळी पाहा, आणि हिंद देवीच्या पंचकन्यांचा पुनरुद्धार करण्याकरतां स्वतःचा जीव धोक्यांत घालणारी ही जोतिरावाची सिंहाची झांप पाहा. भटणीच्या कुशींत मोहरा जन्मतो आणि माळणीचे पोटी पशूंच जन्मतो, असली टिळकी नजर ज्या भटाला नसेल त्याला हें कबूल करावेंच लागेल, कीं जोतिरावापुढें टिळक म्हणजे एक काठीचें कोल्हें व कोल्ह्याचा कुईकुयाट ठरत आहे. जोतिरावांचा याच स्त्रीशिक्षणाबद्दल इतका छळ झाला, कीं तो सहन करतांना साधारण मनुष्य पशूपलिकडे तरी गेला असतां, किंवा टिळकासारख्या जीर्ण-मतवाद्यांचा जोडेगुत्ताम तरी बनला असता. शाळेंत मुलींची संख्या वाढत चालली, कोणी तरी



फुकट मास्तरकीचें काम करावयास त्यांना एक जोडीदार पाहिजे होता; ब्राह्मणांनीं तर स्त्रियांना शिक्षण देणें म्हणजे त्यांना 'मडमा' बनविण्यासारखें महत्पाप आहे, असा जोराचा विरोध सुरूं ठेवलेला; स्त्रीजातीला ब्राह्मणांनी जितके नीच ठरवले आहे तितके दुसऱ्या कोणीहि ठरवले नाहीं. ब्राह्मण लोकांच्या मनांत त्यांच्या आया-बहिणींविषयीं, लेकी-सुनांविषयीं जो पुरातन काळापासून संशय आहे, त्याचें कारण समजत नाहीं. ब्राह्मणेतर लोक स्त्रियांना कधीच हीन लेखीत नव्हते व नाहीं. राज्यकारभारापासून तो गरिबांच्या झोपडीपर्यंत पुरुषवर्गाबरोबरीनें वागण्यास ब्राह्मणेतर स्त्रिया हमेश तयार असतात. ब्राह्मणेतर स्त्री अगदीं गोष्टींत ठेवा, तेथून ती राज्यसूत्रें हलवील पण त्यामुळें तिच्याविषयीं वाईट संशय कोणाला येणार नाहीं. अपवाद असतील पण ते फार थोडे! ब्राह्मणांत पूर्वी कांहीं तरी भयंकर गडबडगुंडा उडाल्यामुळें स्वतःच्या बायकावरचा त्यांचा विश्वास उडाला आहे.

"न स्त्री स्वातंत्र्यमर्हति"

हें ब्राह्मणी मुखाच्या भात्यांतून निघालेलें अस्त्र भटणींच्याभोंवतीच कां पडलें? अनृत, साहस, माया ह्या दुर्गुणांनीं भटांनीं आपल्या आया-बहिणींची जी शास्त्रोक्त ओटी भरली आहे, याचें कारणहि तसेंच बलवत्तर असलें पाहिजे. अजूनसुद्धां वयाच्या ४० व्या वर्षीं चिपळूणकरांनीं शूद्र ठरविलेल्या ब्राह्मणेतरांच्या गळ्यांत जाहीर रीतीनें भटणी पडत आहेत, असें वृत्तपत्रें ठोकीत असतात. कांहींतरी हा पौराणिक ब्रह्मघोटाळा असेल, ब्राह्मणांनीं स्त्री-जातीचा स्वानुभवावरून अपमान केलेला दिसतो, तसा इतरांनीं केलेला दिसत नाहीं. अशा स्वमातासंशयी भटजींच्या विरोधामुळें जोतिरावांना मुलींच्या शाळेला जोडीदार मास्तर मिळेना. टिळक-चिपळूणकरांचे बापजादे जोतिरावांना कोलमडून पाडण्याकरिता तयार होतेच. जोतिराव म्हणजे काय कच्च्या विटांचा मेरू नव्हता कीं कच्च्या गुरूचा चेला नव्हता. ह्या सच्च्या दिलाच्या हिंद-पुत्रानें स्वतःच्या कुटुंबाला, नवयुगीन महाराष्ट्राच्या आद्यमाता सावित्रीबाई फुले यांना मास्तरणीचें काम करावयास लावलें. स्त्री-शिक्षणावरचें पहिलें संकट ह्या नव्या मनूतील

भवानी मातेवर कोसळले.

आजच्या मास्तरणीसुद्धां या जुन्या चुन्यांच्या भट्ट्यांना मनगट पाहिल्याशिवाय सहन होत नाहींत, तर महाराष्ट्र मायबहिणीची ही पहिली विद्यादेवी, ब्राह्मणांच्या डोळ्यांत खड्यासारखी सलूं लागली असेल यात नवल नाहीं. भट जात विरोध करतांना नीचपणाची कमाल करते, हें पौराणिक, ऐतिहासिक सत्य स्वयंसिद्ध आहे. २० व्या शतकांत पटेल बिलाला संमती दिली म्हणून, कांहीं ब्राह्मण मुलींवर, स्वतःच्या मायभगिनींवर कर्मचांडाळ ब्राह्मण पशूंनीं हात टाकण्यास कमी केले नाहीं. हें प्रस्तुत लेखकानें स्वयंसेवक म्हणून काम करीत असता डोळ्यानें पाहिलें आहे; आणि अनेक ब्राह्मणेतर स्वयंसेवकांनीं धावत जाऊन त्याच नरपशूंच्या अघोरी उन्मादातून ब्राह्मण मुलींची

अब्रू वाचविली आहे. सध्यां जर ब्राह्मण स्त्रियांच्याहि बाबतींत ही स्थिती, तर पाऊणशें वर्षांपूर्वी या भटभाईंनीं केवढा कहर माजवला असेल ! जोतिरावांच्या कुटुंबावर शाळेंत जातांना या ब्राह्मण नराधमांनीं

खडे मारण्यास

कमी केले नाहीं. महाराष्ट्राच्या ह्या मायमाऊलीवर पडलेले खडे महाकालाच्या दणक्यानें आज मातीत मिसळूनहि गेले असतील; पण या खड्यानें ब्राह्मणेतर महाराष्ट्राच्या हृदयाला पडलेलीं भगदाडें मात्र इतकी लांब, रुंद व खोल आहेत, कीं सबंध ब्राह्मण्याच्या पुराण-ग्रंथांच्या मढ्यांनी तरी ते भरून जातील कीं नाहीं हें आज तरी सांगवत नाहीं. निष्ठुर भविष्याला मुठींत धरून जोतिरावांनीं काळाचा चाळा फिरवण्यासच सुरुवात केली होती. अशा महाकार्यांत असले भयंकर आघात सोसावे लागतातच, पण तेंच मनांत ठेवून सत्यशोधकांनीं त्यांचें उसणें फेडूं नये अशी आमची विनंती आहे. दर आठवड्याला एकांतींत न्हाव्याच्या पुढे आपल्या आया-बहिणींच्या मुंड्या तासण्याकरिता देणाऱ्यांनीं जोतिरावांच्या कुटुंबाला खडे मारले यांत नवल तें काय ! सर्पानें प्राण घेतलाच पाहिजे; नाहींतर तो सर्प कसला ! ज्यांना स्वमातांची पर्वा नाहीं ते किती हलकट आणि नीच वृत्तीचे लोक असले पाहिजेत हें जाणून त्यांच्या बायकांच्या मुंड्या **न्हाव्या हातून** सोडवण्यास ब्राह्मण माऊलींना उलट सहाय्य करण्यास आपणच तयार झाले पाहिजे. आपण एकाच दणक्यानें असल्या मुर्दाड लोकांच्या शास्त्रीय काचातून त्यांची मुक्तता करूं शकूं अशी आपली उमेद आहे. जोतिरावांच्या कुटुंबाला त्रास दिला, त्याचा सूड उगविणें हें क्षत्रीय कर्म नव्हे. हा शूरांचा धर्म नाहीं; स्त्रियांवर खडे मारण्याचे, स्त्रियांवर चळवळींतदेखील हात टाकण्याचें नीच कर्म ब्राह्मण म्हणविणाऱ्या पशूंकडूनच होत असतें, तें त्याचें त्यांनाच लखलाभ होऊं द्या ! आपली माता वीरप्रसू क्षत्रियमाता असते, ब्राह्मणांनीं स्वतःच्या मातेलासुद्धा

" जन्मना जायते शूद्रः "

या हुकुमानें ' ब्राह्मण्य ' लाभूं दिलें नाहीं. क्षात्र मातेच्या सुपुत्रांनीं या शूद्र मातेच्या भटांना इथून पुढें मिरवूं देऊं नये ! यांच्या हाती धार्मिक, सामाजिक सूत्रें असलीं तर हें ब्रह्मदेवाच्या बचाळीतले किडे, टिळक–चिपळूणकरांसारख्या

जंतांना महंत

बनवून तेवढ्यांत देशाचें वाटोळें करायला कचरत नाहींत. महात्मा जोतिरावांनीं सर्व हिंदूंकरतां चळवळ केली; पण ' सेक्शनल ' (जातिविषयक) अशी त्यांच्या हातून एकच कामगिरी झाली. ती कामगिरी म्हणजे अनाथ बालिका गृह ऊर्फ ऑर्फनेज स्वतःच्या घरांत उघडणे. ब्राह्मण जातीची नाक्या-नाक्यावरून आठवड्यांत आठदां पडणारी बेअब्रू वांचविणें, हें त्यांना अवश्यक वाटलें. विधवांना ब्राह्मण जातीत सक्त संन्यासाची जन्मठेप झालेली असते. भटजी मेला की बिचारी भटीण जिवंत असून मेलेली समजावी,

असा मेलेल्या ब्राह्मण्याचा वटहुकूम आहे. पाऊणशें वर्षांपूर्वीचा काळ म्हणजे आजच्या-सारखा ब्राह्मणांच्या सुधारणेचा काळ नव्हता. आज ब्राह्मणीनी नर्सेस, डॉक्टरणी तर आहेतच; पण सर्वसाधारण बहुतेक ब्राह्मण विधवासुद्धां शिक्षणाच्या मानानें ब्राह्मणेतर पुरुषांच्याहि पुढें आहेत. वैद्यकीचें सर्वसाधारण ज्ञान वैषयिक पापाला चव्हाट्यावर येऊ न देतां आंतल्या आंत नामशेष करू शकतें; परन्तु अजूनहि ऑर्फनेजीस भरून शिवाय ब्राह्मण वस्तीत हौदांतून गटारांतून मुलें पडलेलीं सांपडतात. इतकेंच नव्हें तर थेट कोर्टांतून जन्मठेपीपर्यंत शिक्षा झालेली भटीण सांपडते. हें ताजें उदाहरण तर याच वर्षातलें आहे. पाऊणशें वर्षांपूर्वी परशुरामाचा कडक बंदोबस्त होता. आठ वर्षाच्या पोरीला जरी वैधव्य आले तरी हे सनातन कसाई तिच्या डोक्यावर न्हावी फिरवून जीवितावर निर्दय संस्कृतीचा वरंवटा फिरवीत. ब्राह्मण स्त्रिया त्यावेळी पुरुषापेक्षाही अज्ञानच असणार ! ब्राह्मणेतरांत पुनर्विवाहाचा दणका असल्यामुळें आणि कष्टाचाहि कणका असल्यामुळें ब्राह्मणेतर विधवांना असले रंगढंग सुचणें शक्य नसते. एखादी अपवादादाखल निघते. पण ब्राह्मण विधवांच्या हातांत कापसाच्या वातीबरोबर अर्भकांची बाळोती द्यायलाहि हरिदास-पुराणिक टपलेले असतातच ब्राह्मण विधवांचें वातावरण अशा नरपशूंनीं बुचबुचलेले असल्यामुळें, भोळी बिचारी अभागी विधवा फसते आणि बालहत्येस प्रवृत्त होते. जोतिरावांनीं हरदास-पुराणिकांचा उठाव करण्याचा जसा प्रयत्न केला, तसाच ब्राह्मण स्त्रियांची अब्रू वांचविण्याचाहि प्रयत्न चालविला. जोतिरावांनीं आपल्या घरीं 'बालहत्या प्रतिबंधक गृह' उघडलें. जगन्माता सावित्रीबाईनें कोवळ्या ब्राह्मण मुलींचें बाळंतपण करावें, अशा तऱ्हेनें शेंकडों ब्राह्मण विधवा बाल-हत्येच्या पातकापासून वांचवल्या. जोतिरावांच्या घरात चुकूनसुद्धा ब्राह्मणेतर विधवा आली नव्हती, सर्व भटणी होत्या हें त्या वेळच्या माहितीवरून सिद्ध होत आहे. सत्यशोधकांनीं जोतिरावांची ही क्षमाशीलता आचारणांत आणावी; आपल्या बायकोवर भटांनीं खडे फेकले म्हणून जोतिराव त्यांच्या बायकांवर जोडे घेऊन धांवले नाहींत, तर उलट बदकर्मानें घायाळ झालेल्या भटणी विधवांना त्यांनी सहाय्य करून पुढे 'पापकर्म करणार नाहीं' अशा शपथा वाहवून घेतल्या आणि जगाच्या उद्धाराचा आपला उत्साह ब्राह्मण जातीकरिता कांहीं वेळ खर्चला. हें जोतिरावांचें महदुपकार ब्राह्मण विसरतील पण ज्या ब्राह्मण विधवांवर असे प्रसंग येतात त्यांना महात्मा जोतिरावांची आठवण होऊन त्या अजूनही मुळूमुळू रडत मनांत जोतिरावांचा धांवा करीत असतील, पण त्याची भट मुर्दाडांना खबरहि नसणार ! पुढें न्या. रानडे आणि लालशंकर उमियाशंकर यांनीं याच धर्तीचें पण सर्वांकरता पंढरपूरला ऑर्फनेज उघडलें. जोतिरावांचें ऑर्फनेज सर्वांकरतांच होतें पण त्याचा उपयोग फक्त ब्राह्मण विधवांनाच झाला. चिपळूणकरादि भटांना हें जोतिरावांचें सत्कृत्य खपलें नाहीं. ब्राह्मण्याला गारद केल्याशिवाय पारतंत्र्याची पक्की नरद मारली जात नाहीं हें जोतिरावांना कळून चुकलें. त्यांनीं पुनर्विवाहाची चळवळ सुरू केली आणि

पहिला पुनर्विवाह

घडवून आणला. यावेळीं टिळकांच्या मताचे मिरासी पुण्याचीं भटें यांनीं गाढवाचें लग्न लावून, वरात काढून आपली जात दाखवली. जोतिरावांच्या चळवळीच्या दणदणाटाने सरकार जागे झाले आणि असा कोणता हा धैर्यशाली महापुरुष आहे, याचा गौरव करावा अशी सरकारास इच्छा झाली. परकीय, परधर्मीय इंग्रजांनीं जोतिरावांना शाबासकी द्यावी आणि स्वकीय म्हणविणाऱ्या भटांनीं त्यांच्यावर शेणमार करावा, हें त्या काळीं जसें चालूं होतें तसेंच पण थोड्या फरकानें आजही चालूं आहे. परकीय प्रिन्स ऑफ वेल्स शिवछत्रपतींच्या पुढें मुजरा करतात आणि ही आमची भटें-भिक्षुकें त्याच वेळीं डोक्याला धोतरें बांधून सुतक्यासारखे मुद्दाम फिरतात, हे पुण्याच्या मोजून लाख माणसांनीं प्रत्यक्ष पाहिले आहे. १८५२ सालीं पुण्याच्या विश्रामबागेंत सरकारनें दरबार भरवला आणि जोतिरावांना दोनशे रुपयांची शाल अर्पण करून

त्यांचा गौरव केला.

इंग्रजांनी ही सत्यशोधकांच्या प्राणावर भर संकटाच्यावेळीं जी संरक्षक शाल घातली, त्यामुळें कोष्ट्यवधि अस्पृश्य, ब्राह्मणेतर इंग्रजांचे ऋणी आहेत. ज्याला पेशव्यांनीं हत्तीच्या पायाला बांधलें असतें, त्याला इंग्रज शाल अर्पण करतात हें चिपळूणकरांना खपलें नाहीं म्हणून तो इंग्रजावर उपसला आणि टिळकांनीं पुढें तोच गाळ उपसला! इंग्रजांनीं पेशवाईसारखा पर्वतीला रमणा मांडून ब्राह्मण्य संभाळले असते, तर टिळक–चिपळूणकरांनीं विरोध तर राहूं द्याच पण इंग्रज हे ईश्वराचे अकरावे अवतार आहेत, असें पुराण लिहून त्यांची देवळें बांधली असती. सध्याच पाहा कीं, ब्राह्मणेतर देवळांत शिरू पाहातांच हीं भटें इंग्रजांच्या बुटांत तोंड पाहून गंध लावायाला तयार होतात. ब्राह्मणेतरांनीं गणपतीची भक्ति आपल्या मतानें करूं लागतांच हे इंग्रजी बुटाच्या नालाचा खिळा व्हायला चुकत नाहींत. ब्राह्मणेतरांनीं सर्व राजकारण ताब्यांत घेतलें आणि उदार इंग्रज जाऊं लागले तर हीच भटें इंग्रज नाहींतर दुसरा कोणी बोलवायला कमी करणार नाहींत. यांना पारतंत्र्याची चीड नसून फक्त स्वजातीची चाड आहे. टिळक–चिपळूणकर यांच्या पुतळ्याच्या उदाहरणांवरून तरी काय हेच सिद्ध होत आहे. एखादा दुष्ट ब्राह्मण सच्चा म्हणून मोठा बनवायचा आणि तो तुमच्या आमच्या माथीं मारावयाचा. सर्व जनतेकरतां जर टिळक इंग्रजांशी भांडले असते तर प्रश्न वेगळा होता. पण तात्या, अण्णा आणि भाऊ करताच कौन्सिल पाहिजे असें जो भर सभेत बोलायला दचकला नाहीं, तो पुन्हां सर्व जनतेकरता धरपडत होता म्हणणें ब्राह्मणांना शोभेल, पण या 'म्हणविण्यानें' ब्राह्मणेतरांची मस्तकें सात्त्विक संतापानें तडकत आहेत ह्याची वाट काय? ब्राह्मण जातीनें आपल्या आदिअंताचा नीट विचार करूनच टिळकांना लोकमान्य म्हणावें. लोक म्हणजे गल्लोगल्ली दमें उडवीत चालणारी उघडी बोडकी चार भटें नव्हत किंवा पगडीच्या झिरमिळ्या उडवणारे चार वकील नव्हेत. 'लोक' या सदरांत अखिल

हिंदी जनतेचा समावेश होतो; आज जनता जागी होत आहे आणि टिळकांनीं भरलेले पापाचे सात रांजण तिच्याच्यावर मांडीत आहे. 'टिळक' नांव उच्चारतांच कोट्यवधि ब्राह्मणेतरांच्या कपाळावर तिरस्काराच्या आठ्या चढत आहेत. 'टिळक' शब्दानें 'फंडगुंडगिरी', भिक्षुकशाही वगैरे टिळकांच्या चरित्रातल्या हलकट मनोवृत्तींच्या आठवणी जनतेला होत आहेत. या टिळकानें आपल्याकडून फंडाच्या नांवाखाली लाखो रुपये उपटून

"तात्या, अण्णा, भाऊंच्या"

घशांत कोंबले, हें जनताजनार्दन कसा विसरेल ? लोक अज्ञान होते तोपर्यंत टिळकांना लोकमान्य ठरविण्याचें अंगारे धुपारे माजले. लोक अज्ञान होते तेव्हां इंग्रज सरकारच्या 'तार-पोष्ट-रेल्वे' इत्यादि 'देशसेवे'बद्दलहि गुण गात होतेच. सुज्ञ समाजात टिळकांना एखाद्या इंग्रजी शिकलेल्या जीर्णमतवादी भिक्षुकापेक्षां जास्त किंमत, जास्त भाव येईल असें दिसत नाहीं. नोकरशाही जशी 'डायर, ओडवायर'ला पोटाशीं धरते, तसेंच भिक्षुकशाही टिळकांना पोटाशी धरून लोकमान्य ठरविण्याची जडीबुट्टी माजवीत आहे. ज्याला भर सभेंत हलकटपणाबद्दल

अंड्यांचा, जोड्यांचा मार

बसला, ज्याच्या पुतळ्याला काढून टाका असें लोक लीलेनें लिहितात, ज्याला 'नक्टा' म्हणणें आज जनतेची करमणूक झाली आहे, त्या टिळकाला लोकमान्य म्हणणें आणि मुमताज बेगमला "सतिसावित्री" म्हणणें ही एकच मूर्खपणाचीं दोन उदाहरणें आहेत. नहमीं नेहमीं टिळकांना "लोकमान्य" म्हणून जनतेची दिशाभूल करता येईल असा भटांचा अदमास असेल तर तो साफ चुकीचा आहे. गाढवाला रोज कस्तुरीनें माखला किंवा साबणानें घासला तरी हुक्की येताच ते उकिरड्यावर जाऊन

गाढव लोळी घेणारच

आणि गाढवाला साबण लावणारा गाढव ठरणारच ! हातांत वर्तमानपत्रे आहेत, चार भिकार पुस्तककर्ते अभिप्रायाच्या उष्ट्या तुकड्यासाठीं पगडीच्या झिरमिळ्या झेलून आहेत, तोंपर्यंत हे 'लोकमान्य'त्वाचें ढोंगशत्तुरे टिकतील; पण समाज जागा झाला तर या 'टिळक महाराज की' उत्मातांच्या देशद्रोही ××× बीजाला क्रोधाच्या संतप्त यज्ञांत भस्मासात् केल्याखेरीज राहणार नाहीं.

चित्पावन भटांत आजदिनतागायत औषधालासुद्धां एकहि साधुपुरुष झाला नाहीं. चित्पावन जातीत शंभर देशद्रोही बाळाजीपंत दाखविता येतील पण एकहि तुकाराम दाखवितां यावयाचा नाहीं. चित्पावन जातींतच असले राष्ट्रद्रोही किडे का निपजावेत हा मोठमोठ्या समाजशास्त्रवेत्त्यांचा प्रश्न आहे, पण "चित्पावनात देशद्रोही शेंकडा ९९ सापडतील" हा मात्र अनुभव आहे. ऐतिहासिक सत्य आहे. टिळकासारखा चित्पावन भट म्हणजे तर कोब-याची विषारी अवलाद. चित्पावनाची जात म्हणजे

फड्या निवडुंगाची जात !

दुसऱ्याला उपयोगी पडण्याऐवजी पायांत रुतावयाची. कुंपणाला लावावी तर शेत खाऊन टाकायची. शिवकालापासून महाराष्ट्राच्या इतिहासांत जेवढी म्हणून 'दुष्कृत्यें' घडली आहेत, ती बहुतेक चित्पावन भटांकडूनच. चित्पावन मायभगिनींच्या उदरीं

"तुकाराम, शिवाजी, बाजी प्रभू"

असल्या तोडीचे नरेंद्र जन्मूंच नयेत यांत काय ईश्वरी संकेत आहे देव जाणे ! जनक रामकृष्णापासून शाहू छत्रपतीपर्यंत जर मातृभूमीच्या सच्च्या पुत्रांची यादी काढली, तर त्यांत एकहि चित्पावन सांपडावयाचा नाहीं. तेंच स्वामिद्रोह, बलात्कार, व्यभिचार, फंडगुंडगिरी, वगैरे सद्गुण (?) मंडित लोकांची यादी काढली तर त्यात बहुतेक

ब्रह्ममुख योनिसंभव

भटजींचा भरणा सांपडेल ! कुळकर्ण्यानें शेतकऱ्याला फसवून जमीन उपटली नाहीं, अशी दहा गांवें तरी महाराष्ट्रांत सांपडतील कीं नाहीं, परशुराम जाणे ! भटांच्या मुखाच्या वरणींत वेदाचें लोणचें ठेवलें तरच तें नासत नाहीं, त्याला सुतें पडत नाहींत. असा दुराग्रह धरणारे मुखमर्द भटजी, खून करविणें, विषप्रयोग करविणें यांत अति प्रवीण असतात. जोतिराव आपल्या वीरवृत्तीनें जेव्हां भटांच्या छाताडावर हिंदु धर्माचें निशाण लावूं लागले, तेव्हां त्यांनीं जोतिरावांना छळण्याची कसून तयारी केली. जोतिराव रस्त्यानें चालले कीं, त्यांच्यावर माधुकऱ्या पोराकडून खडे मारवावेत. तुळशीबागेसमोर उभें राहून जोतिराव व्याख्यानें देत असत. एके दिवशीं एका मनुष्याच्या पोटी (?) आलेल्या भटानें मैल्याची पाटी जोतिरावांवर ओतली आणि बजावून सांगितले, "जर पुन्हां असें ब्राह्मणांना दोष देशील तर नाक कापून गाढवावर धिंड काढूं". जोतिरावांनीं या चिलटाच्या फडफडीकडे लक्ष न देतां आपलें कार्य अव्याहत सुरूं ठेवलें. जोतिराव कोणत्याच उपायानें हटेनात तेव्हां ब्राह्मणांनीं शेवटचा उपाय म्हणून "जय ओंकारेश्वर" म्हणत जोतिरावांवर मारेकरी पाठविले. "जोति हिंदुधर्म बुडवतो ! तुमचे वाडवडील काय मूर्ख होते ? त्यांनीं भटाच्या पायांचे तीर्थ घेतले हा काय त्यांचा वेडेपणा ? तुम्ही गो ब्राह्मण-प्रतिपालक मराठे, आम्हीं हात पसरावा, तुम्हीं आम्हाला द्रव्य द्यावें असले तुम्ही बळीराज ! या जोतीला जगांत राहूं देऊ नये" असे मारेकऱ्यांना चिथावून जोतिरावांच्या खुनाची जय्यत तयारी केली गेली. मारेकरी जोतिरावांवर पाळत ठेवण्याकरतां त्यांच्या व्याख्यानाच्या वेळीं आसपास उभे राहूं लागले. जोतिरावांच्या व्याख्यानांत मारेकरी म्हणून आलेले मराठे तद्रूप होऊन त्यांनी जोतिरावांच्या चरणावर साष्टांग दंडवत घातले. आपण कोणाच्या चिथावणीनें आलो हे त्यांनीं कबूल केले. या मारेकरी पाठविणारांच्या मुळाशीं कोणते घेंड होते, याचा नामनिर्देश करण्याची जरूर नाहीं. पुढें हेच मारेकरी जोतिरावांचे शिष्य बनून जन्मभर सत्यशोधक मताचा प्रचार करीत होते. ज्यांनी आपल्याला पाठवले त्यांचा खून करण्याची मारेकऱ्यांनी इच्छा दर्शविली; पण जोतिरावांना तें पटलें

नाहीं. त्यांनीं सांगितलें ब्राह्मणांनीं खून करविण्याचा प्रयत्न केला हें त्यांच्या जातीला शोभले, आपणहि तसेच उलट वागण्याचें कारण नाहीं. कै. राजर्षि शाहु छत्रपति यांच्यावरहि आपल्याच लोकांकडून टिळकांच्या चेल्यांनी धोंडे फेकविले होते. त्याच वेळीं

जेधे बंधूंवर

काठ्यांचा वर्षाव होऊन खून पडण्याचा प्रसंग आला होता. पण आज ब्राह्मणाचे कपटी कावे सर्व जनतेने ओळखल्यामुळें या जेध्यांच्या पुढारपणाखालीं तेच आपले धोंडे मारणारे बंधु "शाहुमहाराज की जय" म्हणत ब्राह्मण्याचा धुव्वा उडवीत आहेत. ब्राह्मण लोक आपल्याच लोकांना आपल्याविरुद्ध चिथवून मारामाऱ्या करावयास लावतात आणि आपला स्वार्थ साधून घेतात. जनता भोळी होती तोपर्यंत ही ब्राह्मणी कारस्थानें ठणठणली. दिवसेंदिवस ब्राह्मणांच्या अंगावरच त्यांचे डाव आलेले पाहण्याचे सुप्रसंग येणार आहेत.

टिळकांवर पहिला खटला

झाला, त्यावेळी त्यांना जामीन होण्यास जोतिराव तयार झाले होते; आपल्या शत्रूलाहि संकटाच्या वेळीं उपयोगी पडणारे जोतिरावांचें श्रेष्ठत्व हजारो चिपळूणकरांनीं अनंत कालपर्यंत दोन्ही हातानें ठोकली, तरी किंचितहि कमी होणार नाहीं. हरिदास-पुराणिकानें नाडलेली गरीब ब्राह्मण विधवा असो, नाहींतर लाखोटक्यानें आपल्यावर गालिप्रदान करणारा टिळक असो, संकटाच्या वेळीं सहाय्य करणें हें जोतिरावांचें ब्रीद होतें. जोतिरावांच्या स्मारकाला ब्राह्मण लोक विरोध करतात त्याचें मूळ कारण हा मागचा इतिहास ! पहिला राजकारणी पुरुष, अद्वितीय व पहिला कर्तबगार सुधारक, एकनिष्ठ देशसेवक आणि स्वार्थत्यागाचा मूर्तिमंत अवतार अशा पुरुषोत्तम जोतिरावांचा

पुतळा उभा राहिला

तर त्या पुतळ्याकडे पाहून ब्राह्मणेतर जागे होतील, ब्राह्मणांच्या पोटावर पाय येईल, टिळकांचा बोलबाला देशोधडी जाईल, म्हणून सर्वांचे पुतळे बसवा पण फुले यांचा पुतळा बसवूं नका असा ब्राह्मण लोक हट्ट धरीत राहणार ! ज्यांना मत्स्यपुराणाला स्मरून शास्त्रोक्त वागायचे आहे, असे आमच्यातले कांहीं धर्मषंढ फुले यांचें स्मारक करूं नका असें म्हणणारच. पण शेवटीं या सर्व भटांची आणि त्यांच्या खरकट्यावर जगणाऱ्या आमच्या दोन घरभेद्यांची नाचक्की होऊन जोतिरावांचा यशःशुभ्र पुतळा पुण्यात काय पण जेथें हिंदूंची वस्ती आहे अशा अनेक ठिकाणीं उभा राहणार.

ज्या पुणें म्युनिसिपालिटीपुढें आज फुले यांचें स्मारक करण्याचा प्रश्न येऊन पडला आहे, त्याच या म्युनिसिपालिटीनें फुले यांच्या घरावरून मैत्र्याच्या उघड्या पाट्या नेवव्यात आणि दारांत ओतावयास लावाव्यात. १९२१ सालीं जर सत्यशोधकाच्या दारापुढें मैला टाकण्यास हीं भटें भीत नव्हती, तर तेव्हां त्यांनीं पुण्याचे शेतखाने डोक्यावर घेतले असतील यांत नवल नाहीं. कै० नारायण मेघाजी लोखंडे व म० फुले

यांनीं टिळकांची मुलाखत घेऊन सक्तीच्या शिक्षणाविषयीं त्यांचें मत विचारलें, त्यावेळीं "तुमचे तुम्ही पाहून घ्या, तुम्ही लोक शिकाल तर शेतकी बुडवाल" असें टिळकांनीं साफ उत्तर दिलें. त्यावेळचें टिळकांचें मत शेवटपर्यंत तसेच निर्लेप होते हे पुण्यांतील सक्तीच्या शिक्षणाच्या चळवळीच्या वेळी, अथणीच्या व्याख्यानांत, मुंबईच्या अस्पृश्यांच्या सभेंत जे जे प्रकार घडले त्यावरून पुन्हां सिद्ध होत आहे. ब्राह्मणेतरांनीं शिकू नये ही टिळकांच्या मनांतील गांठ होती. उघडपणें असें प्रतिपादन केल्यास वेड्याच्या इस्पितळांत जावयाची पाळी येईल म्हणून अप्रत्यक्षपणें आडपडद्यानें हेंच मत टिळक प्रतिपादित. त्यांच्या

गीतारहस्याचें

सूक्ष्म निरीक्षण करणारास टिळकांच्या मतांचा ब्राह्मणी मसाला ओळीओळीनें खच्चून भरलेला दिसेल. गीतारहस्य प्रसिद्ध झाले, त्यावेळीं त्या ग्रंथावर इतकी टीका झाली आहे आणि त्याचा फोलपणा इतक्या लोकांनीं सिद्ध करून दिला आहे कीं, त्याचे सविस्तर वर्णन करीत बसलों असतां गीतारहस्याएवढाच ग्रंथ लिहावा लागेल. मुंबईच्या गिरणी मजुरांच्यासंबंधीं भांडवलवाल्यांनीं जेव्हां मस्तवालशाही सुरूं केली तेव्हां टिळकांनीं भांडवलवाल्यांची बाजू उचलली आणि लोखंडे यांनीं आपल्या 'दीनबंधूं'तून कसल्याहि द्रव्यलोभाला बळी न पडतां मजुरांची सेवा बजावली. फंडगुंडगिरीचे प्रवर्तक टिळक कांहीं तरी मलिदा मिळाल्याशिवाय भांडवलवाल्यांची बाजू उचलणार नाहींत. त्यावेळच्या 'दीनबंधू' पत्राचे उतारे स्थलसंकोचास्तव देतां येत नाहींत पण जोतिरावांच्या सविस्तर चरित्रांत ते प्रसिद्ध करण्याचें आम्ही आश्वासन देतो. जोतिरावांची तत्त्वनिष्ठुरता अगदीं शंभर नंबरी होती; त्यांना तोंडानें एक बोलून कृतीनें भलतेच करणारा मनुष्य बिलकूल आवडत नसे. पुनर्विवाहाची चळवळ करून प्रत्यक्ष न्यायमूर्ति रानडे यांनींसुद्धां जेव्हां पुन्हा लग्न केलें तेव्हां जोतिराव, रानडे यांच्यावर इतके घसरले कीं असल्या

नामर्द पुढाऱ्याचें

मी तोंड पाहण्यास तयार नाहीं, असें त्यांनीं रानड्यांच्या तोंडावर सांगितलें. चाळीस बेचाळीस वर्षें अविश्रांत प्रयत्न करून १८९० सालीं महात्मा जोतिराव कालवश झाले; जोतिरावांच्या मृत्यूची बातमी ऐकून ओंकारेश्वरापुढें महापूजा झाली असेल! रस्तोरस्ती ब्राह्मणांकडून पेढे वाटले गेले असतील! शाहु छत्रपति वारले ही बातमी ऐकून ज्या नराधमांनीं पेढे वाटावयास कमी केलें नाही, त्यांनी जोतिरावांच्या मृत्युसमयीं धोतरें सोडून आनंदानें उड्या मारल्या असतील यांत विशेष नाहीं! नामर्दास प्रतिस्पर्ध्याच्या मरणानें आनंद होतो, मर्दांना प्रतिस्पर्ध्याच्या मृत्यूनें दुःख होत असते! टिळक वारले तेव्हा शाहुछत्रपतींना किती वाईट वाटलें हें आम्हीं प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिलें आहे. तार थडकतांच पुढलें ताट फेंकून 'शत्रुसुद्धा असाच असावा' हे त्यांच्या तोंडून उद्गार निघाले, ते त्यांच्या मोठेपणाला शोभेसे होते. पण टिळक कांहीं तेवढ्या मोठ्या योग्यतेचे नव्हते. जोतिरावांच्या मृत्युसमयीं टिळकांना हा मनाचा मोठेपणा आठवला नाहीं. आज टिळकहि

मेलेत, चिपळूणकरहि मेलेत. मुडद्याच्या मरणानें मरणारे रोज अनेक मरत आहेत. सरणाचे सरपण मोलाचे जळले काय आणि गाडले काय, त्यांची मातबरी जगाला नाहीं; पण म० जोतिरावांसारखे धर्माकरतां मरणारे धर्मात्मे गेले तरी जगाला जिवंत करण्याचा उद्योग नुसत्या कीर्तीनें व तत्त्वानें करीत असतात. जोतिराव हिंदु धर्माचे

कट्टे कैवारी होते.

हिंदु धर्मावर मिशनरी आग पाखडीत ती जोतिरावांना सहन न होऊन ते खिस्ती भटांवर तुटून पडत. भट खिस्ती असो नाहीं तर हिंदु असो, तो जोतिरावांना खपत नसे. ब्राह्मणांच्या गुलामगिरीनें हिंदु शेळपट, तेजोहीन व विस्कळीत बनलेत. राष्ट्रघातकी भटशाहीच्या तंत्रानें हिंदु धर्माचें वाटोळें होईल म्हणून जोतिरावांनीं आपल्याला धर्मोद्धाराकरतां वाहवून घेतले. सत्यशोधक समाज म्हणजे निराळा धर्म नाहीं, निराळा पंथ नाहीं. तर हिंदु धर्माच्या उज्ज्वल तत्त्वांनीं सर्व जगाला चकित करून सोडण्यास मोठ्या महत्त्वाकांक्षेनें एके ठिकाणीं जमलेल्या खऱ्या हिंदूंचा जमाव आहे. ब्राह्मण मूळचे इराणी आहेत, आणि आमच्या हिंदूंत घुसून केवळ पोटासाठी आम्हाला लुबाडतात. इंग्रजी शिकलेली पहिली पिढीच्या पिढी खिश्चन झाली हे जोतिरावांना खपलें नाहीं; स्वधर्माचा त्याग करणें हे महत्पाप आहे, पण स्वधर्मात भटासारख्या लबाड लोकांना लुडबुड करू देणें हें त्याहूनहि भयंकर पाप आहे.

सर पी. सी. रॉय

ब्राह्मणांना ॲटलांटिक महासागरांत फेंकून द्या म्हणतात. जोतिरावांनीं त्यांस हिंदु जनसागरांत बुडवण्याचा प्रयत्न केला आहे. टिळक फक्त भटजातीकरतां धरपडून मेले, जोतिरावांचे कार्य अखिल हिंदूंकरतां होते. भगवान बुद्धाविषयीं जसें ब्राह्मणांनी खोटें-नाटें लिहवून लिहून ठेवलें आहे, त्याचप्रमाणें फुले यांच्याविषयीं चिपळूणकरादि ब्रह्म-मुख-योनी संभव भटांनी लिहून ठेवलें आहे. बळीचें राज्य वामनानें भिक्षा मागून घेतलें तसेच शिवाजीचें राज्य भिक्षा मागून घेण्याकरता रामदास टपला होता. शिवाजी राजे कच्च्या गुरूचे चेले नव्हते; त्यांनीं भटांनासुद्धां आपल्या चरणावर लोटांगण घ्यावयास लावले. बळीच्या वेळीं वामन, शिवाजीच्या वेळीं रामदास आणि शाहु महाराजांच्या वेळीं टिळक, ही तीन भटें तीन राजांना निरनिराळ्या वेळीं तीन तऱ्हेनें फसवायला गेली. बळीपेक्षां शिवाजी महाराज जास्त शहाणे व सावध झाले होते; शिवाजी महाराजांपेक्षांहि शाहु महाराजांनीं तर या देशबुडव्या भटांना पुरे ओळखले होते. कै० दास तर शाहु महाराजांच्याहि पुढे जाऊन ब्राह्मणांच्या लेकी-बाळी महारांच्या गळा अडकवूं पाहात होते. या सर्व विवेचनावरून टिळकांना देशभक्त म्हणायला कोणताही शिवाजीचा मराठा तयार होणार नाहीं. ब्राह्मणेतर लोकहो! "हे पुस्तक निव्वळ शिव्यांनीं भरलें आहे" असें ब्राह्मण तुम्हाला सांगतील; पण त्यांना लागलीच उत्तर द्या, तुमचीं पुराणें वाचा, त्यांतल्या शिव्या जाळा, मग या पुस्तकाला दोष द्या! संत तुकारामाच्या अभंगांत सुद्धा कडक भाषा व शिव्या आहेत. वास्तविक 'शिव्या' या शब्दाची व्याख्या करणेंच अवघड आहे;

टिळकांना नीच म्हणणें ही शिवी नाहीं, हें त्यांचें यथोचित शब्दांतलें वर्णन आहे. सर्पाला सर्प म्हणायचे नाहीं तर म्हणायचे तरी काय? भटांना विनवून सांगणें आणि सर्पाशी समेट करणें हा एकजिनसी मूर्खपणा आहे. नामर्द लोक भेकडपणानें उघड उघड कोणतीहि खरी गोष्ट बोलायला भितात. तेवढा भेकडपणा प्रस्तुत लेखकाला माहीत नाहीं. ब्राह्मण स्त्रियांविषयीं 'भटीण, बोडकी' असले शब्द आम्ही वापरलेत याबद्दल ब्राह्मण लोक रुष्ट होतील हें आम्ही जाणून आहोंत. ब्राह्मण लोक ब्राह्मणेतरांच्या स्त्रियांना ग्रंथो-ग्रंथी आणि शब्दोशब्दीं कोणत्या शब्दानें संबोधतात याचा त्यांनीं प्रथम स्वतःशीं विचार करावा! बोडक्या बाईला 'केशवपन केलेली विधवा' म्हणावे असा भाषाशास्त्राचा सोवळा सिद्धांत ब्राह्मण लोक पुढे करतील. पण एवढें आढेवेढे स्वतः घेऊन, लोकांनाहि घेववि‌ण्याचा आग्रह करण्याऐवजी ब्राह्मणांनी हें विधवा-मुंडी-मुंडनच बंद केले तर चालणार नाहीं काय? काय गलिच्छ लोक आहेत! घरांत विधवा भाऊजईला न्हाव्याच्या हातून तासून घ्यायची आणि देवळांत परपुरुषस्पर्शानें पातिव्रत्य बिघडतें असें तोंडानें कबूल करावयाचे. या भटासारख्या त्रिलोकतर्कट 'मूके मुन्नूर' लोकांशी जोतिरावांनीं नरम शब्दांत गरम चहा पीत जर वादविवाद केला असता तर कांहींएक कार्य झालें नसतें. आपण सत्यशोधक कडक भाषेंत भडक सत्याच्या जोरावर बेधडक भटावर हल्ला चढवितो म्हणूनच ब्राह्मण वठणी येत चालले आहेत. आपल्या कडकपणांतच आपला विजय आहे. शहाण्याच्या चुका सरळ शब्दांत मऊ मऊ लिहून दाखवतां येतील; पण ब्राह्मणासारख्य ब्रह्मांड ठोणप्यांना सरळ सांगून पटणारच नाहीं. त्यांचें कान धरून डोकें गदगद हालवून त्यांच्यातली ही 'राष्ट्रघातकी भिक्षुकशाही' नष्ट केली पाहिजे. ब्राह्मणांना आम्हाला सोडून द्यायचे नाहींत; त्यांना देशाच्या कार्याला लावायचे आहेत; त्यांच्यातला 'स्वार्थ' काढावयाचा आहे आणि याच सद्हेतूनें आम्ही आमच्या ह्या उनाडटप्पू बंधूला किंचित टाकून बोलत असतो.

श्री. केशवराव बागडे

यांनी वर्ध्याला "आम्ही इंजक्शन द्यावयाला आलोंत" असे शब्द उच्चारले, ते अगदीं योग्य आहेत. वायकांच्या केशाचा दोर करून स्वर्गाला चढणाऱ्या भटांना नुसतें औषध पाजून त्यांची तब्येत लवकर सुधारणार नाहीं. लोक म्हणतील ही असली सुई शरीरांत टोचूं नका, पण त्या इंजेक्शनच्या सुईबरोबर गेलेलें औषध रक्तांत लवकर मिसळतें आणि लवकर गुण येतो. औषध पाजण्यापेक्षां 'इंजेक्शनची' टोचाटोची जास्त गुणकारक आहे. कै० महात्मा जोतिरावांनीं एकदम

परशुरामाला नोटीस

दिली, त्यावेळीं बरेच भोळे ब्राह्मणेतरहि त्यांना माथेफिरू म्हणाले, पण जोतिरावांनीं असलें कडक "इंजक्शन" दिलें नसतें, तर पुण्याच्या सदाशिव पेठेच्या रस्त्यांनीं महारांनीं जाऊं नये, असले कायदे करण्यापर्यंत पाळी गेली असती. समरांगणावर उभे

राहिल्यावर समोरच्या शिपायाला ठार केला तर त्याची बायको विधवा होईल, त्याची कच्चीबच्ची उपाशी मरतील, याचा विचार सैनिकानें करून चालत नसतो; सैनिकानें फक्त आपलें कर्तव्य बजवायचें असतें; आपण जोतिरावांचे सैनिक आहोंत. शाहुराजानें पाठविलेले बिनीवरले स्वार आहोंत. आपल्या लिहिण्याने ब्राह्मणांना वाईट वाटेल, कदाचित ब्राह्मण मायमाऊली आपल्यावर रागावतील याचा विचार आपण करून चालणार नाहीं. ब्राह्मणेतरांना सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करणें हेंच आपलें ध्येय आहे, तें बजावीत असतां नामर्द लोकांच्या तेजोहीन उपदेशाचा कधींहि विचार करूं नये. पहिल्या लोकांना सत्याकरितां मरावें लागतें. असा धडाका सत्यशोधकांनी, हिंदूंनीं सारखा सुरू ठेविला तर पुराणांतली आपली नालस्ती जळलेली आपणच पाहूं. महात्मा जोतिरावांचा भव्य पुतळा हिंदू धर्माचें पुनरुज्जीवनाचें स्मारक म्हणून उभारलेला पाहावयाचा असेल, तर हिंदूंनों असाच नेट धरून हें ब्राह्मण्य उलथून पाडा. हजारों वर्षांची ब्राह्मण गुलामगिरी नाहींशीं करणाऱ्यांवर जगांतले कोणतेहि प्रबल राष्ट्र दडपशाही करूं शकणार नाहीं. राजकीय दास्यांतून मुक्त व्हायला 'ब्राह्मण्य' घालविणें याशिवाय दुसरा उपाय नाहीं; "मी कोणाचाहि गुलाम नाहीं" हें वाक्य हिंदूंचें भूषण झालें पाहिजे. म्हणून पहिली गळ्याला लागलेली ही ब्राह्मणी गुलामगिरी फेका आणि एकजात व्हा, जातिभेदाची साखळी मोठमोठे घण घालून तोडून टाका! सर्व हिंदु सारखे. त्यांत कोणी श्रेष्ठ नाहीं कोणी कनिष्ठ नाहीं. सर्वांचें रक्त मांस एक हाऊ द्या! चार वर्ण ही शुद्ध लबाडी आहे. ब्राह्मणेतरांना गुलामगिरींत डांबण्याचें हें आमिष आहे. हिंदूंत भेदाभेद नाहीं, हिंदु हा एकच वर्ण! हिंदूनें हिंदूशीं राटीबेटी व्यवहार केला तरी तो अधर्म नाहीं. उलट हिंदूंत जो धार्मिक भेद पाडील तो धर्म नसून ब्राह्मणी कावा समजावा. जो हिंदु म्हणवून घेत असेल तो युरोपियन असो, आफ्रिकन असो तो आमचा स्वधर्मीय! स्वधर्माकरता, स्वधर्माच्या जयजयकाराकरता आजन्म झगडणें हा आपला बाणा ठरूं द्या! ब्राह्मण लोक हे आपल्या धर्माचें वाटोळें करण्याकरतां आलेले आपले वैरी आहेत, ही जोतिरावांची शिकवण आपण विसरूं नका. आपण जर भटांच्या नादाने आपआपसांत चार पायऱ्या आणि चार वर्ण असले भेद पाडून आपसांत लठ्ठालठ्ठी करीत बसलो, तर आपला प्यारा धर्म नामशेष होईल. स्वतंत्र वृत्तीच्या पांच लोकांवर कोणालाहि जुल्म करता येत नाहीं, मग आपण वीस कोट आहोंत. आपण सगळे मुळचे एकच आहोंत. आतांहि एकच आहोंत पण या भटांनीं आपल्यांत हें वर्णत्वाचें पिल्लूं सोडून आपल्याला विस्कळीत दशेत आणले आहे. हिंदुस्थानांत जोवर ब्राह्मण्य आहे, तोपर्यंत इंग्रज जरी गेले तरी दुसरे कोणी येतील, किंवा हेंच सुधारलेलें ब्राह्मण सत्ताधीश बनून पुन्हां पेशवाई माजवतील. इंग्रज सरकार धर्माविषयीं उदासीन आहे. अशा संधीचा फायदा घेऊन ब्राह्मण्य निकालांत काढूं या. आमचे हक्क आम्ही मिळवूं. इंग्रज आणि आम्ही भांडूं पण मध्यें ही ब्राह्मणांची लुडबुड नको. त्यांना आमच्या नांवावर कांहीं एक करण्याचा

हक्क नाहीं. आम्ही हक्क मिळवूं, चालवूं किंवा घालवूं. काय वाटेल ते करूं. ब्राह्मणांनी भलत्या उठाठेवीत पडूं नये. हे ब्राह्मण हे आमचे कैवारी नव्हेत, आमच्या देशाचे दुष्मन आहेत, हें ब्राह्मणेतरांनीं विसरू नये. एवढें ब्राह्मण्य मेले आणि आपण रक्तमांसानें, देवा-धर्माने हिताचिंतानें एक झालों तर जगांतल्या कोणत्याहि राष्ट्रावरोबर, कोणत्याहि संस्कृतीबरोबर, कोणत्याहि महाशक्तीबरोबर तोल्लो जात असतां शेरास सव्वाशेर भरूं. आपल्या राष्ट्रमंदिराचा पाया ब्राह्मण्याचा बळी दिल्याशिवाय पक्का होणार नाहीं. देशाचा दुष्मन ते आपले दुष्मन. धर्माचे दुष्मन ते आपले दुष्मन. हे दुष्मन दुसरे कोणी नसून जीर्ण मतांची राळ फेकणारे ब्राह्मण होत. ब्राह्मण लोकांना हिंदुस्थानचें वाटोळें होवो नाहीं तर गोटोळें होवो याची पर्वा नाहीं. ते फक्त त्यांच्या वर्णश्रेष्ठत्वाची पर्वा करणार! आपल्याला तसें म्हणून चालणार नाहीं. देश आपला आहे, धर्म आपला आहे. आपल्या धर्माला दुसऱ्यानें त्रास दिला तर आपल्याच हृदयाला धक्का बसतो. आपल्याला आपल्या देशाकरतां मेलेच पाहिजे. आपण एकजीव झालो नाहींत तर वेगवेगळे फोडून आपल्याला नाहींसे करणें कोणालाहि अवघड नाहीं. चार पायऱ्या पाडण्याचा भट प्रयत्न करतात तो स्वार्थाकरता. आपण असल्या भेद पाडण्याकरताच आपल्यात घुसलेल्या या दुष्मनांना हाकलले पाहिजे. कोणालाहि जन्मतः कनिष्ठ ठरविण्याचा अधिकार नाहीं. कोणताहि मनुष्य जन्मानें नीच ठरत नाहीं, कृतीनें ठरत असतो. ब्राह्मण लोक कृतीनें नीच ठरले आहेत. त्यांच्यापेक्षां दुसरा नीच समाज जगांत सापडणार नाहीं. सर्पाशी सहकार्य करा, तो तुमचा फक्त जीव घेऊन एकट्याचा नाश करील! पण ब्राह्मणाशी सहकार्य कराल तर तो तुमच्या पिढ्यान् पिढ्या हीन ठरवून, तुमचा वंश गुलाम बनवील. जो ब्राह्मण 'ब्राह्मण' म्हणवून न घेता 'हिंदु' या नावाखालीं आपल्यांत समानतेनें मिसळून जाईल—रक्तमांसानें एक होईल तोच आपला समजावा. नुसती तोंडीं पोपटपंची लढवून वेळेवर जात दाखवणारे भटोपाध्याय दुष्मन समजून त्यांच्यापासून दूर राहावे. कौन्सिलें, नोकऱ्या, स्थानिक स्वराज्यें, सार्वजनिक संस्था यांतून भटांची आमूलाग्र हकालपट्टी करून सर्व आपलेसे करून टाका. गांजा ओढणाऱ्या, दारू पिणाऱ्या, माड्या चढणाऱ्या ब्राह्मणाला दक्षिणा देणें हे पाप आहे. ब्राह्मणाला जेवूं घालणें म्हणजे देशाची संपत्ति फुकटखाऊ पोळ पोसण्यांत व्यर्थ घालविणें हा मूर्खपणा आहे...भटांच्या हातून लग्नें लावणें म्हणजे शुभ कार्यांत अपशकुनी भट पाडून पुढल्या गुलाम संततीची जन्मपत्रिका लिहिण्यासारखेच महापाप आहे. ब्राह्मणाचें सकाळी तोंड पाहणें हें अशुभ आहे. ज्या कार्यांत भट पडला त्या कार्याचा विध्वंस झालाच पाहिजे...भटाला ज्यानें ओसरी दिली त्याच्या घरादाराचें वाटोळें झालेंच पाहिजे. भटांना ज्या देशांत गुरुपद मिळाले तो देश परतंत्र झालाच पाहिजे. ही जोतिरावांची शिकवण लक्षांत ठेवून या दुष्मन भटांना आपल्यांतून बहिष्कृत करा. दुष्मन ओळखला आहे, आतां त्याला नेस्तनाबूद करणें आपल्या सामर्थ्यावर अवलंबून आहे.

◇◇◇



सवाल १ ला

सवाल १ ला



भटाभिक्षुकांचा द्वेष करूं नये, भट कापले तरी आपलेच आहेत. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांची धर्मभूमि, कर्मभूमि व जन्मभूमि एक होती, आहे व असणार. अशा पाघळ्या पंडितांचा विरजण-वाद भर ब्राह्मणेतर उमेदीच्या ऐन कानाजवळ हरहमेश भणभणत असतो. भिक्षुकशाहीची पायतणें चघळून एकठेपी भट्टी मोक्षाच्या मिटक्या मारणारे भटाळूं, मूर्ख म्हणून माणसांतून वजा केले, तरी ज्यांचा मेंदू भटकीच्या पटकीने बेमार झाला नाहीं अशी खास हमी भरतां येईल असले पंडितबुद्धुकसुद्धां आगाऊ सभ्यतेच्या ऊर्फ संभावित नेभळेपणाच्या नांवाखाली धडधडणाऱ्या प्रखर स्पष्टवक्तेपणावर वाह्यात, शिवराळ, अतिप्रसंगी असले स्टीरियो छाप आरोपांचे छत उभारून, इच्छा नसता दोषांचे धनी बनतात. "ब्राह्मण्य" नावाच्या क्रूर हिंस्र पशूनें पाडलेले मानव्याचे मुडदे सडत, किडत असतां पुन्हां तें ब्राह्मण्य बोकाळूं नये, पण नुसते राहूं देणें हें जन्मा आल्या हेल्याखेरीज इतरा सोसणें शक्य नाहीं. अनादि कालापासून हरघडी बढणाऱ्या भटांच्या नजरफाट पापाकडे पाहून कोणताहि डोके खांद्यावरच असलेला माणूस

"या लुब्धभऱ्या भटकुत्र्यांना"

गांवगन्ना हुसकावून लावा असली कमालकबुली देईल! मात्रागमनी या गीर्वाण शब्दाचे बोकडबीज हें गावठाणी प्रतिबिंब, भटोबांच्चे मातृभूमीशी होत असलेले वर्तन देखले-ऐकले म्हणजे बोकडाचा तेवढाच हलकट गुण भटानें बिनतोड उचलून बीमोड पचबलासा दिसतो. तना-मनानें हिंदु इमान जपणाऱ्या भोळ्या ब्राह्मणेतरांपुढें जे आज अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत, त्यापैकीं ब्राह्मणेतरांच्या घरादारावर हुळे भाजून उन्हाळे भट्टी ग्रंथ हाही एक अति महत्त्वाचा प्रश्न आहे. धर्मग्रंथ ह्या बाळसेदार नांवाखालीं भटाभिक्षुकांनीं जे शेतखाने सारवून ठेवले आहेत ते जाळून पोळून उद्ध्वस्त केले नाहींत, तर त्यांतूनच द्वेषाचा वणवा भडकून आजचे वर्तमानपत्रांचे खेळ पुढें पिस्तुलें, बाँबगोळे याने खेळले जाण्याचे दिवस उगवतील. या धर्मग्रंथांच्या गोंडस चेहऱ्याखालील ठिस-ठिसणारे भट्टी अंतःकरण ब्राह्मणेतर जातींची पिढ्यान् पिढ्या अब्रू घेत आहे व ब्राह्मणेतर असेच जर भट्टी लक्ष चौऱ्याशींच्या हट्टी भवचक्रांत गिरकत-फिरकत राहतील तर ब्राह्मणेतर जातींच्या

बेअब्रूचे जाहीर लिलावांत ठणाणत राहणार!

प्रत्येक हिंदूला स्वकुलाचा अभिमान असतो व तो अवश्य पाहिजे. भटा-भिक्षुकांनीं निःवळ स्वतःची टिमकी पिटण्याकरतां अनेक ब्राह्मणेतर जातीच्या शीलाचे सांगाडे उसकून हाडाचा उपयोग टिमकी वाजवण्याकडे केला आहे. भटाला ब्र म्हणताच साऱ्या ब्रह्मांडाला फेंफरें भरल्याचा कल्पांत कल्लोळ भट्टवृंदांत उसळूं लागतो, पण ब्राह्मणेतर जातीच्या नीति उत्पत्तीवर आज असंख्य वर्षें भटांकडून आघात होत असतां ब्राह्मणेतर अजून भट गुरुमाऊलीच्या दावण गोठ्यांत हूं कीं चूं न करतां उभे राहिले आहेत. ब्राह्मणेतर समाजांतील माळी, सोनार, शिंपी, सुतार, तांबट, जिनगर वगैरे असंख्य जातींच्या माणसांनो! तुम्हाला कोणी आईमाईवरून तोंडावर शिवी हासडली तर लागलीच तुमचे हात त्या तोंडापर्यंत प्रवास करतात. मागे शिवी दिली असे जरी कळले तरी मुठींना वळवळ सुरूं होते शिव्यांचा कुबेर भांडारापैकीं "तुझी जातच आकरमाशीं" हें रत्न जितकें पाणीदार तितकें आणीदार आहे. या शिवीनें मागल्या सात पिढ्यांसह स्वतः शिवी खाणारा

"हं आपला असाच"

ठरला जातो. जो मनुष्य एखाद्यानें तोंडावर केलेले आरोप खालच्या मानेनें ऐकून गिळतो, 'त्याच्या खालीच कांहीं तरी ढिसूळ असावे' असें तिसरा मनुष्य म्हणू लागेल. आजपर्यंत अज्ञानामुळें ब्राह्मणांनी मोजलेल्या शिव्या, केलेलीं नालस्ती आपण अज्ञानच असल्यामुळें आपल्या लक्षांत आली नाहीं, पण येथून पुढें लक्षांत आल्यावरसुद्धां गिळू लागलो तर मग पुढें कांहींच बोलण्याचीच सोय नाहीं. ब्राह्मणेतर जातींची नालस्ती ब्राह्मण म्हणविणाऱ्या नरपशूंनी, नुसतें तोंडीच नव्हे, एकदाच नव्हें व आजच नव्हें तर अनेक शतकें बऱ्याच ब्राह्मणेतर जाती व्यभिचारोत्पन्न आकरमाशा आहेत असे नुसतें मोघम नव्हे तर जातवार, तपशीलवार लिहून ठेवले आहे. त्याच लिहिण्याला धर्मग्रंथ हे नांव प्राप्त झाले आहे यापेक्षां शरमेची गोष्ट ती कोणती? आकरमाशे, व्यभिचारोत्पन्न म्हणून अशा ब्राह्मणेतर जातींनों जगण्यापेक्षां हा खोटा कलंक धुवून काढण्यांत त्याचें सर्वस्व निःसंतान झाले तरी बेहत्तर! मनुष्य प्राण्यांतील कमाल नीच मनोवृत्तींचा निर्भेळ मासला, बेगुमान बदमाषपणाचा मालमसाला जर कोठे पाहावयाचा असेल तर ते आमच्या ब्राह्मणी ग्रंथांतून शोधावा. अलम दुनियेतील बेफाम पाजीपणाचें जर प्रदर्शन भरवले तर त्यांत आमचे हिंदूंचे ब्राह्मणांनीं लिहिलेले कांहीं धर्मग्रंथ बिनशर्त पहिला नंबर पटकावतील. या धार्मिक ग्रंथांतून व्यभिचार-विलासाचे संगीत रंगीत उभे केलेले तमाशाचे तापे अनुभवीत चालले म्हणजे सदभिरुचीला तर मळमळ सुटतेच पण या बीभत्स पाजीपणाबद्दल भटांविषयीं संताप आल्यावाचून राहात नाही. हिंदूंच्या आचारविचारांचे नियम बांधून देणारे स्मार्त प्रबंधकार झालेत. त्यांपैकीं कांहींनी जाति-विवेकावरहि आपल्या कुटाळ अकलेचे तारे तोडले आहेत. सोनार, शिंपी, माळी इत्यादि जाति जर अजूनहि

आहेत अशा स्वस्थ राहातील तर जातिविवेकांचे हे भटी टेंभे त्या जातीच्या तोंडांन असेच पिढ्यान्‌पिढ्या करचळीत जातील यांत शंका नाहीं.

"शूद्रकमलाकर" या महाभट्टी ग्रंथांत चौथ्या प्रकरणांत भट्ट महाशय जेहत्ते लिहितात —

"शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणश्चेत्कथंचन ।
जनयेद् ग्राम्य धर्मेण तपस्यां पारसवं सुतम् ॥

मस्त झालेल्या गलेलठ्ठ भटानें, दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणी नसून अंथरुणावर शूद्रिणीशी "ग्राम्य" व्यवहार केल्याने जी संतति होते तिला पारसव म्हणतात. हा भटांचा लेकावळा "पारसव" म्हणजे कोण याचा पुढे उलगडा करतात—

"महाशूद्रः स विख्यातः शूद्रेभ्यः किंचिदुत्तमः ।
स्वर्णकारस्य तस्येह स्नानं धौत्रं पवित्रकम् ॥

हा शूद्रिणीशी ग्राम्यव्यवहार करून झालेला आकरमाशा पारसव महाशूद्र आहे; पण शूद्रापेक्षा किंचित बरा, ह्याला सोनार म्हणतात. यानें स्नान करावे व स्वच्छ "धोत्रं" नेसावे. अरेरे! काय ही घालघुसड! ज्या सोनारांना भट्टी पगडी व भट्टी सोवळें नेसण्यात भूषण वाटते, त्यांची ब्राह्मणांनी काय ही दशा उडवली आहे! सोनाराची जात अशी भटापासून पैदा झाली आहे असें एखादा सोनार कबूल करावयाला तयार आहे काय? ही धादांत घालघुसडी लबाडी उजेडांत आणून सोनार हे असें नाहींत हें खास ठरवता येईल व तसे प्रयत्नहि झाले; पण त्यामुळें मूलचा हा 'शूद्र कमलाकर' नाहींसा होतो काय? हा ग्रंथच नाहींसा केल्याशिवाय त्याला दुसरा उपाय नाहीं; या सद्‌ग्रंथांत (?) माळी जातीची उत्पत्ति दिली आहे ती अशी —

सोनारीण (पारसव स्त्री) व क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री
या पासून झालेले कडबोळे संतान यांचा संयोग होऊन माळी झालेत.

ज्यांना माळी जात सांगावी लागते, ज्यांच्या पूर्वजांच्या माता पतिव्रता होत्या अशी खात्री आहे, अशा माळी बंधूंनी वरील ब्राह्मणी आहेर आपल्या शिरपेचावर चिटकवावा कीं लाथेखाली तुडवावा हें त्यांचें ते ठरवतील; माळी जात मागासलेली असली तरी ती असला "आकरमाशेपणाचा" खोटा कलंक कधीच सहन करणार नाहीं. "मराठ्याचा लेकावळा व भटाची लेकावळी" यापासून माळी उत्पन्न झाले असे ब्राह्मण ग्रंथकार लिहितात आणि त्या ग्रंथांना मान्यता द्या असे हल्लीचे ब्राह्मण म्हणतात. ज्या भट्टुड्यांनीं माळ्यांच्या कुळावर असला लेखी दरवडा घातला त्याच भटांचे जोडे चघळणारा जो कोणी माळी असेल त्याची व्याख्या कशी करावी! माळी-बांधव हो, सावध व्हा! स्वस्थ राहून असले हे भट्टी ग्रंथ रस्तोरस्तीं न जाळतां स्वस्थ बसाल तर जोतिरायाची जात सांगायला तुम्ही नालायक आहांत असे जग ठरवील! पुढें शिंपी जातीविषयी भट्ट ग्रंथकार लिहितात—

वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यापासून बंदिनी नावाची कन्या उत्पन्न होते.

आणि

बांडगुळ बंदिनीचा शूद्राशी संग झाल्यामुळे शिंपी झाला.

जोपर्यंत बंदिनीच नव्हती व तिला शूद्रसंगहि घडला नव्हता तोपर्यंत कपडे शिवायचे काम बोडक्या भटणी करीत होत्या की, सडके भट करीत होते याचा उलगडा सदर भटानें केला नाही. हल्ली शैव ब्राह्मण म्हणून अर्ध्या हळकुंडानें चेकाळलेले गुरव, ब्राह्मण ग्रंथकारांनी छिनालके बेटे खुशालचेंडू ठरवले आहेत. (भटाला कळावंतिणीपासून जी संतती झाली तिला गुरव म्हणतात.) असले भट्टी पुराव्ये जोपर्यंत धर्मग्रंथांच्या यादीत आहेत, तोपर्यंत गुरवांनीं वेश्याच्या पाठी तबले पिटावेत असेच भट म्हणत राहाणार! गुरव समाजातल्या सुज्ञांनों! अगोदर तुमच्याकरता खर्चून ठेवलेली भट्टी पुण्याई नामशेष करा मग पुढें काय ते ठरवा! भट ग्रंथकार म्हणतात,

कोळीण व शूद्र यापासून घिसाडी (कुकुटक) झाला.

घिसाडी जात थोडी असली तरी ती कणखर व शूर आहे. घिसाड्यांना ब्राह्मणांनी असें आकरमासे ठरवले असतां ते स्वस्थ बसणार नाहीं. असले भट्टी ग्रंथ जाळण्यास घिसाड्यांच्या भट्ट्या नेहमी पेटलेल्याच सापडतील! ब्राह्मण ग्रंथकारांनीं कांहीं ठिकाणी तर कमाल नीचपणा केला आहे.

कुंभार व घिसाडीण यापासून साळी झाला.

वैश्य स्त्री, शूद्र पुरुष यापासून वडारी (आयोगव) उत्पन्न झाला.

यापुढचा चमत्कार तर मोठा मौजेचा आहे. पुरातन काळीसुद्धां वडाऱ्यांच्या झोपडीत शिरून भटणी जिवाची चांदरात करीत होत्या असे भटच कबूल करतात.

वडारणीशी भटाचा व्यवहार झाल्यानें जिनगर झाला व
भटणीला वडाऱ्याने लाटल्यामुळें तांबट उत्पन्न झाला.
माहिष्य व करिणी या दोन आकरमाशांपासून सुतार उत्पन्न झाला.

अशी एक कीं दोन, हजार उदाहरणे दाखवावीत! धंद्यावरून जाती पडल्या हें त्रिवार सत्य लपवून या जातींना व्यभिचारोत्पन्न ठरवणारे ब्राह्मणी ग्रंथ अजून जगावेत व त्याचे भट पाठीराखे अजून वर्णगुरु म्हणून मिरवावेत यापेक्षा लज्जेची दुसरी गोष्ट ती कोणती? जोपर्यंत ही भटें-भिक्षूकें, जाति-विवेकासारखे, चीड संताप आणणारे, स्मृत्यासारखे भट्टी-स्तोम माजवणारे किंवा बीभत्स पुराणे आपल्या हातानें जाळीत नाहींत, किंवा जाळूं देत नाहींत, तोपर्यंत ब्राह्मणांचा नुसता द्वेषच नव्हे तर नाशहि करण्यास वरील जातींनी कां तयार होऊं नये? जाती धंद्यावरून पडल्यात, असे सर्व विद्वान-जग कंठरवानें सांगत आहे आणि हे भट्टी तर्क अगोदर मिश्र जातीचा संबंध घडवून मग तिच्या संततीला धंदा शोधून देत आहे. जोपर्यंत वर्णसंकर, व्यभिचार किंवा अनुलोम-प्रतिलोमाची महामारीची साथ सुटली नव्हती

त्या वेळेस सोनार, शिंपी, सुतार यांचे धंदेच नव्हते काय ? माळी बंधूंनो, सोनार, शिंपी, सुतार बांधवांनो, तुमची ही झडून राहिलेली पिढीजाद नालस्ती नाहींशी करा—एखाद्या गाढवाला ब्राह्मणी पगडी घालून त्यावर हे जातिविवेक बृहज्जाति विवेकस्मृति-पुराणें लादून त्याची गांवभर धिंड काढून हे चटसारे ब्राह्मणी पाजी वाङ्मय मसनवटीत नेऊन जाळून टाका. ब्राह्मणेतर जातीची तीन वर्षांआंतल्या मुलांना या स्मृतिपुराणांच्या पानांवर शौचविधीला बसवा. ज्या देवळांतून असली बीभत्स पुराणें–धार्मिक ग्रंथ वाचले जात असतील ती देवळें पाडून त्यावर गाढवाचे नांगर जेव्हां फिरतील तेव्हांच कोठें तुमच्या पूर्वजांना बटकीचे ठरवणाऱ्या भटांची रग वठणी येणार आहे. माळी, सोनार, शिंपी मोजून लाखो आहेत. सगळ्यांनींच बांगड्या भरल्या नाहींत अशी आमची खात्री आहे. आणि जे स्वतःच्या जातीवर असले शतकानुशतकें पडलेले डाग साफ करण्यास समर्थ नाहींत, त्यांच्या हातून मातृभूमीचें कल्याण तरी काय होणार ? १५३ कलमांचा न्यायानें उपयोग करण्याचें जर सरकारनें मनांत आणलें तर हीं पुराणें व जातिविवेक पहिल्या सपाट्याला सरकारला जप्त करावें लागेल. धर्माच्या जे पाजी नांवाखालीं वाङ्मय आहे तें नाहीसें केलें पाहिजे; ह्यांची साथ धरणारे कोणी नरपशू भट असतील त्यांना समाजाने बहिष्कृत केले पाहिजे. पुराणें व जातिविवेक हे ऐतिहासिक ग्रंथ नाहींत. तीनशेंसाठ दिवसांत दोन हजार व्रतांच्या जाळ्यांत गुरफटून गर्भाधानापासून पिंडदानापर्यंत हिंदु जीवाला ब्राह्मणाचा सेवक बनवणारी पुराणें नुसती

अजबखान्यांत

सुद्धां ठेवतां उपयोगी नाहीं. अजबखान्यांमध्यें सर्व वस्तुसंग्रह करतात; पण कोणी शेतखाने उभारले नाहींत. देशभक्त म्हणविणारी भटेतटे त्यांच्या पूज्य पूर्वजांच्या या कुबेर संपत्तीकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत असतात. ही हल्लींची भटें "अहो आमच्या पूर्वजांच्या पापाबद्दल आम्हाला प्रायश्चित्त का ?" असे तिनताळ सभ्यपणाच्या तोलांत म्हणत असतात. ज्यांना त्या अधमाधम ग्रंथकारांचे वंशज म्हणवून घेण्यांत भूषण वाटते, त्यांनींच हे धर्मग्रंथ होळींत टाकले पाहिजेत; त्यांचे वंशजच नाहींत अशी त्याची कबुली असेल तर हल्लींच्या भटांना बेलाशक माफी करावी.

पण ब्राह्मणेतर समाज आतां असा वर भपक्याला बुजणारा भोळा राहिला नाहीं. ब्राह्मणानें ब्राह्मणेतरांच्या हातचें अन्न खाऊं नये हें एक ब्राह्मण्याचें मुख्य लक्षण म्हणून गर्जून सांगणारे

भालाकार भोपटकरासारखे

टिळक पंथाचे बिरबल अजून उघड उघड ब्राह्मणेतर जातींचा अपमान करीत नाहींत काय ? त्या भोपटकरांचा कोणताहि ब्राह्मण निषेध तर करीत नाहींच; पण उलट त्याची वाहवूक व्याख्यानें ऐकण्यांत दंग झालेला असतो. कुत्र्या-मांजराहून ब्राह्मणेतर जातीला हीन ठरवणारे भट, जातिविवेक व पुराणादि खुनशी ग्रंथांचा अभिमान वाहणारे भट, माळी-सोनार-शिंप्यांना जातिविवेकासारखी चोपडी जिवंत राहिली तर

खाण तशी माती

म्हणत अशुद्ध बीजाची नासलेली फळें म्हणायला मुळींच बिचकणार नाहीं. प्रभूसारख्या सुशिक्षित जातीलासुद्धां जातीविवेकादि कुटाळ ग्रंथाच्या आधारावर या विसाव्या शतकांत राजवाड्यासारखा चित्पावन भट संकरज म्हणायला भ्याला नाहीं; तर मग शिंपी, सोनार, सुतार, साळी यांना आकरमासे म्हणायला भट भीतील असें स्वप्नांतसुद्धां खरें वाटणार नाहीं. प्रभू जातीला संकरज म्हणणाऱ्या राजवाड्यांच्या पाठीवर सबंध ब्राह्मण समाज होता आणि उद्यां एखादा राजवाडा नाहीं तर धडेवाडा भट याच जातिविवेकाच्या बळावर या जातीवर हल्ले चढवील त्याला भट पाठिंबाहि देतील. माळीबंधूंनो, सावध व्हा! सभा भरवा, चळवळ करा आणि हा कलंक नाहींसा करा! शिंपीबंधूंनो! तुम्ही अस्सल क्षत्रीय आहांत अशी तुमची, आमची व साऱ्या जगाची खात्री आहे; तर मग हा "शूद्रकमलाकर" जाळायला मागेपुढें कां पाहतां? घिसाडी, साळी वगैरे मागासलेल्या जातींनों! ब्राह्मणांकडून त्यांचे हे सद्ग्रंथ (?) जाळण्याचे कार्य सुरू करा. तुमच्या पाठी

जीवाचे मोल

खर्चून मराठे मरायला तयार होतील. ब्राह्मणाखेरीज बाकीच्या जाती आकरमाशा आहेत असे इतिहास-संशोधनाच्या नांवाखाली भट बरळत असतात. आणि ब्राह्मणेतर निव्वळ अज्ञानामुळें दुर्लक्ष करीत असतो. थ्रेशियन, पर्शियन व फ्रिजियन यांच्या सरमिसळ उसळीच्या भरमसाट भेसळीतून अचानक पैदा होऊन गपकन पवित्र बनलेले चित्पावन, सोनार–शिंपी–माळी वगैरेंचें बीज शुद्ध नाहीं असा ग्रंथांतरी, इतिहास-मंथनाच्या नांवावर क्वचित वर्तमानपत्रांतून शंख करीत आहेत. ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना अशुद्ध बीज म्हणणे म्हणजे वेश्येने पतिव्रतेवर जळफळण्यासारखे आहें. एवढ्या जाती उत्पन्न व्हावयाला ब्राह्मणी ग्रंथांचें मत ग्राह्य मानलें तर सगळ्यांचे पूर्वज व्यभिचारी, दुर्वर्तनी होते असें मानावें लागेल. ही जुनी-पुराणी सडकी मढी उकरून काढूं नयेत असेंहि कित्येक ढिल्या स्क्रूचे मेंदु बरळत असतात. पण जुनें मढें सडत ठेवल्यास त्याच्या दुर्गंधीनें शिसारी येऊं लागते. तेव्हां ती असतील तेथून उकरून जाळून टाकली पाहिजेत. ज्या ग्रंथामुळें चीड उत्पन्न होईल, ज्या ग्रंथामुळें परमेश्वरी समतेवर बळजबरी होईल असले ग्रंथ, असलें वाङ्मय समूळ नाहीसें केलें पाहिजे. माळी, सुतार, सोनार, शिंपी वगैरे जातींच्या लोकांची या "शूद्रकमलाकर" ग्रंथात केलेली नालस्ती सपशेल बनावट आहे यांत तिळमात्र संदेह नाहीं. हें जर खरें आहे तर मग तो

"शूद्रकमलाकर"

जाळायला हरकत कोणती?

ब्राह्मण जातींच्या बीजशुद्धीचा बेहद्द कुजट भपकारा माणसाची माथी भणभणून सोडीत असतां त्याच शुद्ध (?) बीज भटांच्या मुर्वतीखातर बेमुर्वत भट्टी-बाडे समाजानें माथीं मारून घ्यावींत काय? पूर्वी ब्राह्मण जातीला दुष्टाव्याचे किडे पडले होते पण हल्लीं

त्या किड्यांची बाधपीडा कमी झाली असेल असा ज्याचा अंदाजी अदमास असेल त्या बिचाऱ्यानें केवळ न्याय म्हणून, निव्वळ करणें भागच म्हणून

स्मृति-पुराण–जातिविवेक

जाळायला तयार व्हावें आणि मग ब्राह्मणी नागाच्या माथ्यावरला तवल दहाचा नंबर पारखून घ्यावा. माळी, सोनार, शिंप्यादि जातींना हीनकुल, वाममार्गानें पैदा झालेले आहे असें ठरणारे भट्टी ग्रंथ जाळीत असतां जर भटें आडवी येतील तर

साप, विंचू व भट

हे एकाच कायद्याच्या संरक्षणाखालीं ठेवा अशी भविष्यकाळाला ग्वाही द्यावी लागेल. अगम्य स्वर्गाच्या दुर्गम दुर्गावर स्पेशल ट्रेननें पितरटोळ्या पोंचवणारे हे भाडोत्री दलाल, माळी-शिंपी-सोनाराला कधीही आडवे आल्याखेरीज राहणार नाहींत. ज्यांत भटाभिक्षुकांना बारशापासून बाराव्यापर्यंत ऐनजिनसी मालमत्तेचा फुकट पुरवठा करा असे दोन्ही हातानें खच्चून लिहिले आहे, ज्यांत भटभटणी पोटी आलेला

जंत असो नाहीतर संत

असो, त्याला पवित्र मानलाच पाहिजे असा टाहो फोडला आहे, ज्यांत ब्राह्मणाखेरीज हिंदु संकरज, शूद्र महा चांडाळ असा निकाल दिला आहे, अशा ग्रंथांनाच ब्राह्मण लोक धर्म-ग्रंथ मानून त्याविषयीं आदर बाळगीत असतात. पूर्वीच्या

ऋषींनी शेण खाल्ले

असेल नाहीतर पुराणकर्त्यांनीं झक मारली असेल त्याची चिकित्सा करण्याचा ब्राह्मणेतरांना अधिकार नाहीं असा ब्राह्मणांचा हट्ट असतो. आणि या असल्या साऱ्या ब्रह्मघोटाळ्याला ब्राह्मण्य म्हणतात. क्षत्रियाचे भगवद्-गीतेसारखे मानवी दुनियेला ललामभूत होणारे सद्धर्मग्रंथ कोणीकडे आणि ब्राह्मणी अंतःकरणाचा चिताड नकाशा दाखवणारी जाति-विवेकादि पाजी ग्रंथ कोणीकडे ! पिढ्यान्‌पिढ्या हतप्रभ झालेल्या ब्राह्मणेतर समाजा ! तूं असाच घुंगट मारून ही तोंडावरली काजळी सांभाळीत बसणार काय ? नामदेव शिंपी, नरहरी सोनार, सांवता माळी यांच्यासारख्या पुण्यश्लोक संतांनी परम पावन बनलेल्या ब्राह्मणेतर हिंदूंनों ! " शूद्रकमलाकर "सारखी जगड्व्याळ हलकटपणानें ओथंबलेली पुस्तकें " हिंदु धर्म वाङ्मय " या सदराच्या आगरात अशीच सलत ठेवणार काय ? जी जात व्यभिचारापासून उत्पन्न झाली त्या जातीचा

व्यभिचार हा कुळधर्म

असें भट ठरविणार नाहींत काय ? सोनार, शिंपी, माळी यांच्या जातीत पूर्वी व आताही सदाचरणी माणसें होती व आहेत. ह्या जाती शुद्ध कुलोत्पन्न होत्या व आहेत अशी वस्तुस्थिती असतां जातिविवेकादि ग्रंथांच्या ढिगाऱ्यांना पेटवून द्यावयाला कोणती हरकत आहे ? ब्राह्मणांनीं दुसऱ्यांची नालस्ती करण्यात, इतरांवर जुलूम करण्यात आपल्या बुद्धि-

सामर्थ्याचा पुरा उपयोग केला व करीत आहेत हे सिद्ध होत असता, सर्पाला दूध पाजणें हा जसा मूर्खपणा ठरतो, तसाच ब्राह्मणांना विद्या शिकूं देणें हा गुन्हा ठरविण्याची पाळी येईल. अगदीं अर्वाचीन विद्येच्या अत्युच्च शिखरावर चढलेला भट घ्या, किंवा धुनी-पुढें गांजा खेचणारे रामदासासारखे कानफाटे छाटीवाले घ्या, दरके भटानें ब्राह्मणेतर जातीची निंदा-कुटाळी करण्यांतच आपले बुद्धिवैभव खर्च केले आहे. एक लक्ष भटांत एखादा मनुष्य या नांवाला योग्य असा प्राणी निपजत असावा! सापात विषारी नसलेल्या अनेक जाती आहेत; पण भटांत असे किती मिळतील हे एक महाकाल जाणें! जेवढा म्हणून नासका, कुजका ग्रंथ असेल तेवढा होळींत लोटलाच पाहिजे! पुराणांतरीची खुनशी उत्पत्ती नजरेआड करून कानामागे टाकण्याइतकी निरुपद्रवी नाही. जातिविवेकांचे सर्व मुद्दे मुळांत उखडून टाकणारे अनेक जुने पुरावे आहेत; पण आरोप जिवंत ठेवून पुरावे जपत बसण्यापेक्षां आरोपच नामशेष करणें श्रेयस्कर नाहीं काय? अन्यायी स्मृत्या, हलकट पुराणें आणि जहरी जातिविवेक, सरकारकडून जप्त करविण्याची चळवळ करा! जोपर्यंत जहाल, मवाळ, कट्टर फत्तर कोणत्याहि नांवाखालीं कौन्सिलांत भट निवडून जातील तोपर्यंत भट्टी गरळ-ग्रंथाला आळा घालणें अडचणीचें जाईल. भट शेंडीचा शेवटचा केस तुटेपर्यंत व तोंडी फेस उठेपर्यंत तुम्हाला आकरमाशे ठरविण्याचाच प्रयत्न करणार. माळी-सोनार शिप्यांनों! तुम्हाला आम्ही जाहीर सवाल टाकून विचारतों कीं असें पुढें स्वस्थच बसणार काय? ज्ञातिविषयक परिषदांतून या

ज्ञातिनिर्भत्सनेचा

खरपूस समाचार घ्या! तुमच्या पवित्र कुळांतील पवित्र कुलवधुवरांची मंगलाष्टकें गर्जत असता तुमच्या पावित्र्यावर दरवडा घालणारा भट आसपास शंभर कदम फिरकूं देऊं नका. आणि वधुवरापुढें होणाऱ्या लाजा-होमांत, स्मृति-पुराणांचा जाळून होम करा. पूर्वी अशीच लग्नें होत होतीं व अजून अशीच होत आहेत अशी बातमी त्या ग्रंथांच्या धुरावरून जाऊन जीर्णमतवादी भटांच्या डोळ्यांतून झिरपू द्या! ब्राह्मणेतर जातींच्या खाणीहि पवित्र आहेत आणि मातीहि पवित्र आहे.

खाण तशी माती

ही म्हण ब्राह्मणाच्या जानव्यात अडकवली तर पूर्वीचे भट दुष्ट अर्थात् आताचे तरी सज्जन कसें निघणार? सर-भेसळीतून घरंगळत निघालेल्या भट कोडबोळ्यांचा आचार, विचार व उच्चार पाहिला, ऐकल्यावर भट नेहमीं ब्राह्मणेतर जातींचा द्वेष कां करतात याचें नेमकें उत्तर प्रश्न टाकणाऱ्यांच्या अंगावरच धावून जाईल. मूळचे शुद्ध बीज भांडवल भटाजवळ नाहींच पण कागदोपत्री म्हणविण्यापलिकडे कोणत्याहि काळांत भटांनी पावित्र्य राखलेलें नाहीं. जर ब्राह्मणांना या देशांत सलोख्यानें नांदायचे असेल, सुवर्णभूमि आपला देश आहे, अशी किंचित जरी भटाभिक्षुकांना चाड असेल; तर त्यांना आहे या गुर्मीत क्षणभर जगतां येणार नाहीं. जोपर्यंत ब्राह्मणेतर समाज निद्रीस्त आहे, तोपर्यंत हे

श्रेष्ठत्वाचे ढोंगधत्तुरे पचेल. हे ढोंगधत्तुरे अजून चालावेत अशी भटांची इच्छा दिसते ! ब्राह्मणेतर बंधूहो ! माळी, सोनार, शिंपी व सुतारांनो ! आतां इथून पुढें असेच घोरत पडणार काय ? ज्या ग्रंथांतून भटांनीं तुमची निंदा केली असेल, ती हुडकून तुमच्या मायबहिणींच्या अब्रूकरतां नामशेष करा ! जो आकरमाशा जातीचाच असेल, जो व्यभिचारोत्पन्नच असेल तो मनुष्य, हे सर्व समजून उमजून सदर " शूद्रकमलाकर " पोथीचा होम करावयास विचकेल. ब्राह्मण लोक तुमची अशीच अब्रू जावी म्हणून तुम्हांला आडवे येतील, तुमच्यात दुफळ्या पाडून तुमच्याच स्वजातीयांकडून तुम्हांला अडवतील; असे जातीच्या तोंडाला काजळ फांसणारे कोणी दिवटे निघाले, त्यांनीं व्यभिचार हा भटांनी सांगितलेला कुळधर्म मान्य केलाच तर अशा पितृद्रोही, मात्रागमनी नराधमांना जातींतून बहिष्कृत करा. जोपर्यंत अशा उत्पत्त्या, व्युत्पत्त्या भट कवटाळत राहतील तोपर्यंत धर्म-विधींतून, राजकारणातून, नित्य व्यवहारांतून भटांशी सर्व प्रकारचे संबंध तोडून टाका. तुमच्यापाठी सर्व ब्राह्मणेतर समाज आहे. तुमच्या पाठी सत्य आहे, परमेश्वर आहे. भल्याबुऱ्या मार्गाने भटांनी तुम्हांवर अरिष्टांचे सरकफास टाकले तर तुमच्या पवित्र जातीला, पवित्र कुळाला, पवित्र पितरांच्या थोर नांवाला शोभेल अशा धैर्याने संकटांना हातावर खेळवीत हे भट्टी डाग काढण्याचा कृतसंकल्प सिद्धीस न्या !

हें पुस्तक रा० दिनकरराव शंकरराव जवळकर यांनी
" प्रताप प्रेस " ६१८ शुक्रवार पुणें,
येथें छापून प्रसिद्ध केलें.

◇◇◇

सवाल २ रा

सवाल २ रा



श्री. केशव त्र्यंबक गुप्ते, एम्. ए., एलएल. बी.,
चिटणीस, चां. का. प्रभु ऐतिहासिक मंडळी, पुणे यांनी १९१९ साली प्रकाशित केलेले
" राजवाड्यांची गागाभट्टी "

या पुस्तकांतला पृ. १४१ पासून उतारा—

" जातिविवेकाची विचारसरणी "

एखादा जातिविवेकाचा ग्रंथ उघडून पाहावा व त्यांतील विचारसरणी पाहावी. ब्राह्मण पिता व वैश्य माता यांजपासून अंबष्ट जाति झाली. अंबष्ट बाप व शूद्र आई बापासून आणखी एक जात उत्पन्न झाली. अशा रीतीनें हा क्रम पानेंच्या पानें दिला जातो. ही विचारसरणी पाहून मनाला खेद वाटतो व तिटकारा उत्पन्न होतो. आम्ही हिंदू लोक पापाभिरू आहोंत, त्यांत मनु व याज्ञवल्क्य या काळचे लोक आम्हां विसावें शतकांतील लोकापेक्षां किती धर्मशील होते, आमच्यांतील स्त्रिया अत्यंत भीरू, विनयशील, कुलाचाराला कधींहि सोडून जाणाऱ्या नाहींत असे असतां ब्राह्मण स्त्रिया खुशाल शूद्रा-बरोबर लग्न करीत किंवा तशाच राहात आणि त्याहि एक-दोन नव्हेत तर शेकडो; कारण त्याशिवाय त्या चांडाळ जातीत लक्षावधि माणसें त्या मागासल्या जातींत निर्माण कशा झाल्या असत्या ? जाति-विवेकावरून असें वाटतें कीं, पूर्वीच्या आमच्या स्त्रियांना किंवा पुरुषांना सरळ विवाह मुळीच आवडत नव्हता व व्यभिचार फार प्रिय असे . ज्यांना संकर जाति म्हणतात त्यांच्या जन्मावद्दल जातिविवेकांत जीं कारणें सांगितलीं आहेत ती किती फोल व हास्यास्पद आहेत हें प्रसिद्ध इतिहासज्ञ व विद्वान गृहस्थ

सर रमेशचंद्र दत्त

यांनी आपल्या हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास या ग्रंथांत फार मार्मिक रीतीनें दाखविलें आहे. शूद्र बाप व वैश्य आई असली कीं, आयोगव नांवाची जात उत्पन्न होते. ब्राह्मण बाप व शूद्र आई पासून निषाद जात उत्पन्न होते; आयोगव बाई व निषाद पुरुष यांच्या संयोगापासून कैवर्तक जात उत्पन्न होते असें जातिविवेक सांगतो.

बंगाल इलाख्यांतील मिदनापूर, हुगळी, २४ परगणे, नडिया या जिल्ह्यांत या कैवर्तकांची वस्ती २० लाख आहे. त्या लोकांची राहाणी, आचार, शरीराचा बांधा ही सारखींच आहेत. त्यांची सहिष्णुता, त्यांची उद्योगाची आवड, श्रम करण्याची आवड वगैरे गुण प्रशंसनीय आहेत. आता कैवर्तकाच्या जातीची जातिविवेकांत सांगितलेली उत्पत्ति बरोबर मानिली तर हें उघडच होतें कीं, एवढी लोकसंख्या उत्पन्न होण्याला "हजारो ब्राह्मणांनी शूद्र स्त्रियांशीं व्यवहार ठेविलेला असला पाहिजे व हजारों वैश्य स्त्रियांनी शूद्रांच्या शयनावर आनंदानें आरोहण केलें असलें पाहिजे." शिव! शिव! इतका का आमचा पूर्वीचा समाज नीच होता? काम-शांतीशिवाय दुसरा का त्यांना कोणताच व्यवसाय नव्हता? आम्ही आर्य लोक पुत्रोत्पत्तीकरता विवाह करतो, ब्रह्मचर्याला मान देतों, असें असतां हा गोपाळकाला पूर्वी कसा होत असेल कोण जाणे!

सर रमेशचंद्रांनी

आणखी एक उदाहरण घेतलें आहे. ब्राह्मण स्त्रीनें शूद्रांशीं संयोग केला असतां प्रजा चांडाल होते असें मनु व जातिविवेककार म्हणतात. केरळातील दक्षिणेच्या चार-पांच जिल्ह्यांत चांडाळांची वस्ती आहे. ती सुमारे १५ लाख आहे. हे चांडाळ उत्तम शेतकरी आहेत. त्यांचे आचार, त्यांचे स्वभाव, त्यांचे पोषाख वगैरेमध्ये सौम्य आहे. जातिविवेकाचा नियम जर खरा धरिला तर

> शेकडो ब्राह्मण तरुणी व पुरंध्री देखील स्वपतीचा त्याग करून रंगेल शूद्रांच्या आलिंगनांत आनंद मानून शूद्रांच्या शय्येच्या समभगिनी झाल्या असल्या पाहिजेत.

अशा तऱ्हेची, स्वपतीचा त्याग करून शेकडो स्त्रियांनी प्रजा उत्पन्न करण्याकरितां शूद्रांकडे धाव मारल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत कोठेंहि सापडणार नाहीत." वगैरे. पुढें श्री. के. टी. गुप्ते वकील त्याच पुस्तकाच्या १५४ पानांत प्रसिद्ध करतात —

"ब्राह्मण जातिविवेककारांनीं सोनार, सुतार, शिंपी, तांबट, कासार वगैरे हजारों शूद्र आर्य जातींना अक्करमासे ठरवून त्यांचें आर्यधर्मत्वाचे धार्मिक हक्क हिरावून त्यांना शूद्र ठरविण्याचे पवित्र कार्य उरकून घेतले. आज एक हजार वर्षे तुम्ही शूद्र, तुम्ही शूद्र म्हणून ब्राह्मण लोक या लोकांच्या कानाशी ओरडत आहेत. या शूद्रत्वाचे कारण काय? तर या जातीत शुद्ध बीज नाहीं. ब्राह्मणांची बीजशुद्धता मात्र राहिली आहे आणि बाकीच्या कोट्यवधि आर्य बांधवांची बीजशुद्धता गेली कोठें? ज्यांना जातिविवेककारांनीं संकरजातींत ढकलले आहे, त्यांची बागणूक पाहिली असतां, सद्गुणांच्या बाबतींत ते ब्राह्मणांच्या खाली खात्रीनें येणार नाहींत. रा. राजवाडे हे हा जातिविवेककारांचाच सिद्धान्त जोरानें प्रतिपादन करीत आहे." याच पानांत श्री. गुप्ते वकील यांनीं प्रकाशित पुस्तकांत टीप दिली आहे. त्यांत पहिल्या जाहीर सवालांत आलेल्या जातीचे ब्राह्मणी वर्णन उद्धृत केले आहे. शिवाय तांबोळी व गवळी यांचीहि त्यांत भर पडली आहे.

रा. राजवाडे या नांवाच्या एका चित्पावन भटानें इतिहाससंशोधनाच्या बुरख्याखाली प्रभू जातीला ' संकरज " म्हटले होते. त्यामुळें सर्व प्रभू समाज प्रक्षुब्ध होऊन रा. राजवाडे यांच्यावर उलट मुद्दे फेकू लागला. रा. राजवाड्यांना भट्टी घमेंडीच्या वायूचे झटके येत असता, श्री. केशवराव ठाकरे यांनीं डागण्या दिल्या. त्या राजवाड्यांच्याच काय पण सर्वच भटा-भिक्षुकांच्याहि लक्षातून कायमच्या जाणार नाहींत. सव्यसाची ठाकरे " कोदंडाचा टणत्कार " झडाडून भटांवर कडाडत उठले याचे आम्हाला नवल वाटत नाहीं. कारण जीर्णमतवाद्यांचे कर्दनकाळ अशी ठाकऱ्यांची प्रसिद्धी आहे. पण बिचारे श्री. के. टी. गुप्ते वकील यांच्यासारखे सहसा किंवा मुळीच चळवळींत भाग न घेणारे गृहस्थसुद्धां ब्राह्मणांच्या दृष्टीने " अश्लील शिव्यानें ओथंबलेलें, नास्तिक, अधर्मी " असलें पुस्तक प्रसिद्ध करण्यास धजवले ही एकच गोष्ट भटीपाजीपणावर लख्ख प्रकाश पाडणारी आहे. असु—

पहिला जाहीर सवाल प्रसिद्ध होताच भट कोल्हे किंवा भटी कांखेत अभ्यंग स्नानाचें महापुण्य चाखणारें लुच्चे आमच्यावर शिव्यांची लाखोली वाहातील अशी आम्हाला कल्पना होती व ती खरी ठरली. ब्राह्मणांनीं गेल्या आठवड्यांत जो गोंधळ, दिशाभूल किंवा धूळफेक केली एवढ्यावरून ब्राह्मणेतर जातींनी या ग्रंथांतरी असलेली भट्टी लबाडी बाहेर काढूं नये अशी भटांची इच्छा दिसत नाहीं काय ? महाराष्ट्र समाजा ! ब्राह्मणेतर समाजा ! मराठी सिंहा ! या वेळीं तू असाच घोरत पडणार काय ? माळी, सोनार, सुतार, शिंपी, गुरव, प्रभु, कोळी, घिसाडी वगैरे मूळच्या एकच पण भट्टी भेद-नीतीने छिन्नविच्छिन्न झालेल्या हिंदुपुत्रांनो ! तुम्हांवर ब्राह्मणांनीं केलेले आरोप जसे काळजाला घरे पाडणारे आहेत, तसेच किंबहुना त्याहिपेक्षा भयंकर असलेले आरोप मराठ्यांवर केले आहेत; करीत आहेत. मराठ्यासारखी लढाऊ जात, मातृभूमीचा पांग फेडण्याकरता हातावर शिर घेणारे लढवय्ये मराठे, पण त्यांना सुद्धा याच मातृद्रोही भटाभिक्षुकांनीं शूद्र ठरविले आहे. मराठ्यांवर भटांनी केलेले प्रहार आज मराठे खाडकन जागे झाल्यामुळें उलट सलामीनें सव्याज परत करीत आहेत. पण अल्पसंख्य अशा माळी, सोनार, शिंप्यादि जातींनी मराठ्यांचे अनुकरण केले नाही तर ती पुराणांतरीची

जाहीर नालस्ती

तशीच तणाणत राहणार. भटांची बाजू मुळासह लंगडी असल्यामुळें ते मुद्यांना उत्तर देण्याच्या भानगडीत पडणार नाहींत. रँ. परांजप्यांनीं ब्राह्मणेतरांचे भविष्य वर्तवले म्हणजे जहाल-मवाळ भटांना गुदगुल्या होतात आणि तेच ब्राह्मणांचे भविष्य ब्राह्मणेतरांनी वर्तवले तर मग शेंडी ताठ कां व्हावी ? ब्राह्मणेतर बुद्धिमंद आहेत असा भटांचा सनातन समज आहे. त्याच समजुतीवर परांजप्यांचे भविष्य आधारलेले आहे. मग ब्राह्मण समाज देहदुर्बळ आहे अशी जी सनातन प्रख्याती आहे त्याच आधारावर " अनुमान शास्त्र्यांचें भविष्य " पचायला कोणती हरकत आहे ? पहिल्या जाहीर सवालात प्रसिद्ध

झालेले भट्टी हृदय झूट आहे असे म्हणायची एकाहि भटाची छाती नाहीं. मुद्दे संपले म्हणजे मनुष्य शिव्या देऊं लागतो. भटाकडे मुद्देच शिल्लक नाहीं तेव्हां त्यांना मांग-गारोडी कांगावा केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. ब्राह्मण समाज जातिविवेकाला जाळावयाला तयार होण्याची चुकवाचुकव करीत आहे हे माळी, सोनार, शिंप्यांनो लक्षात ठेवा ! ज्या ग्रंथांत ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांच्या आया-बहिणीच्या पातिव्रत्यावर हल्ला केला आहे असले जातिविवेक जाळा म्हणताच भटांनीं काय थेर मांडले आहेत हें पाहून ह्या भटांना तुमच्या मायभगिनींची पौराणिक नालस्ती जिवंत राहावी असे वाटत असावे हे सिद्ध होत नाहीं काय ? श्री. के. टी. गुप्ते यांच्यासारखे थंड प्रकृतीचे गृहस्थ-सुद्धां स्वजातीवर कुभांड येताच ब्राह्मणी हृदय प्रकाशांत खेचूं लागतात आणि माळी, सोनार, शिंप्यांनो ! तुमच्यांत कोणीच एखादे श्री. के. टी. गुप्ते जन्मले नाहींत काय ? आमची अशी खात्री कीं तुमच्यात सत्यान्वेषी धैर्यशाली पुरुषांची वाण पडणार नाही. नरसोबाच्या वाडीला अनुभव आलेले सोनार, नामदेव पायरीमुळें जागे झालेले शिंपी आणि फुल्यांच्या पुतळ्यामुळे जिवंत झालेले माळी, ब्राह्मणांनी कितीहि आढेवेढे घेतले किंवा गमजा केल्या तरी त्या स्मृत्या व ते जातिविवेक जाळल्याखेरीज राहणार नाहींत. पूर्वजांच्या माय-भगिनींची ही विटंबना सहन तरी कशी होती ? पंजाबातल्या एका पुतळ्याखालचे एक वाक्य नाहिसं करण्याकरतां तिथल्या देशभक्तांनी केवढा आटो-काट प्रयत्न केला आणि इकडे हजारो वाक्यें आणि शेकडोशे भटी ग्रंथ असे आहेत कीं, त्यांतली प्रत्येक ओळ नाहिशी करण्याकरतां एकेक जीवाचे मोल वेचावे लागले तरी बेहेत्तर ! न्यायी म्हणवणारे इंग्रज सरकार धर्माच्या बाबतीत उदासीन असणार. ब्राह्मणे-तरांनीं जोराची चळवळ करून या जातिविवेकादि ग्रंथावर निखारे ठेवले नाहींत तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे शेपूट कल्पांतापर्यंत—अगदीं एक भट उरेपर्यंत—सुद्धां वाढतच जाणार. सत्यशोधक जलशांना नाके मुरडणाऱ्या सभ्य लोकांनीं एकदा ही पुराणे वाचून पाहावीत. सत्यशोधक वाङ्मयाला नांवे ठेवणाऱ्या संभावितांनीं भटी किंवा भटाळलेली पत्रें वाचावीत. सत्यशोधकांनी अजून जलशांना कीर्तन म्हटले नाहीं, पण भट कथा, कीर्तन, पुराणश्रवण या नांवाखाली काय वाचीत असतात हें पाहिले म्हणजे बेलाशक " तमाशा चांगला " असें म्हणण्याची पाळी येते. ब्राह्मणेतरांनीं आपल्या मुलीबाळी, लेकी-सुना असली गलिच्छ पुराणें ऐकावयास धाडूं नयेत. श्रीकृष्णाच्या सोळा हजार एकशेंआठ स्त्रियांना कृष्णानंतर व्यभिचार व दर रविवारीं भटाला अनंगदान द्या असा मजकूर असलेले ग्रंथ यादव, जाधव, नांवाच्या कृष्ण कुलोत्पन्न मराठ्यांनीं जरूर वाचून ठेवावा. मी मी म्हणणाऱ्या मराठ्यांना-सुद्धां भटाभिक्षुकांनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन चौफेर छळले आहे. या हिंदु संघटनेच्या काळांत, हिंदुमात्रांच्या या उद्योन्मुख युगांत, हिंदी जनतेच्या स्वराज्याच्या उषः-कालांत, हिंदूंचे, मराठ्यांचे जर पहिले कोणते आद्य कर्तव्य असेल तर ते आगलावे जाति-विवेक नाक्या-नाक्यावरून पेटविणें हेंच. देशद्रोही भटें, भिक्षुकें या कामांत आडवी येतील.

पण मातृभूमीच्या सच्च्या पुत्रांनो, पवित्र आर्यांच्या पवित्र वंशजांनो या ब्रह्मांड घमेंड्या ब्राह्मणांच्या आडवणुकीकडे न पाहतां आपला मार्ग आक्रमिला पाहिजे. ब्राह्मणांना स्वजातीच्या महत्त्वापुढें स्वदेशाची पर्वा नाहीं, हे आजकालच्या कोणत्याहि भटाच्या बोलण्याचालण्यावरून समजून येईल. सर्व ब्राह्मणेतराला आम्ही

जाहीर सवाल

टाकून विचारतो कीं शिवछत्रपति, शाहूछत्रपति, म. जोतिराव इत्यादि धैर्यवीर्यशाली पुरुषांची जात ज्यांना लावायची आहे व पुण्यवंत महाराष्ट्र देश ज्यांना सांगावयाचा आहे, ते मायेचे पूत असेच स्वस्थ बसणार काय ? मराठी महाराष्ट्रा, ऊठ ! अरे या भटुर्ड्यांनीं तुझ्या पुण्यवंत शीलशाली पूर्वजांच्या अब्रूवर अंगार पसरला आहे तो डोळे उघडून पाहा. जातिविवेकाची बाजू उचलणारा मनुष्यप्राणी कसल्या कुशीत व कोणत्या मुशींत पैदा झालेला असेल त्याची किंमत ठरीव ! ब्राह्मण लोकांनाहि आम्ही जाहीर सवाल टाकून विचारतो कीं, बम्मनभाई ! इथून पुढेंहि जर तुम्ही लोक त्या खुनशी जातिविवेकादि ग्रंथांची बाजू संभाळीत बसला तर तुमचे नशीब भट्टी पगडीखाली सुरक्षित नसून जनतेच्या पायातळी लोळते आहे हे तुम्ही विसरलात म्हणावे लागेल. ब्राह्मण समाजाला स्वतःच्या स्त्रियांच्या अब्रूची चाड, चीड आहे कीं नाहीं कोण जाणे; पण ब्राह्मणेतरांच्या— माळ्यांच्या, सोनारांच्या, शिंप्यांच्या—पूर्वज स्त्री-समाजाविषयीं जें भट्टी लिखाण आज उपलब्ध आहे, त्यावरून ब्राह्मणेतर स्त्रियांच्या अब्रूची फिकीर भटें करीत नाहींत असें म्हणावें लागतें. हल्लीच्या भटांची मनःस्थिती काय आहे व त्यांना आपण कोणत्या पायरीवर वागवले पाहिजे हें ठरवायला भटांचा जातिविवेकाच्या बाबतीतला चुकार-तट्टूपणा बस्स आहे. ब्राह्मणेतर चळवळीची टर उडविण्याचा प्रयत्न करूं अशी भटांना घमेंड असेल तर त्यांना आम्ही एकच सांगून ठेवतो कीं, ब्राह्मणेतर समाज

मवाळाप्रमाणें

कचरणारा-चाचरणारा नाहीं. टोल्यास टोला, शब्दाला शब्द देण्याचे ब्राह्मणेतरांनी अजून मनांतहि आणलेले नाहीं; पण भट जर तसा ब्राह्मण तरुणांना ब्राह्मणेतरांविरुद्ध चिथावण्याचा प्रयत्न करतील तर ब्राह्मणेतर समाज आणखी असल्या भटासारख्या शेकडो जातींना कांखेत मारून नेण्याइतका खंबीर आहे. सुधारक मवाळांना विरोध करण्यांत जहाल भटें यशस्वी झाली याचे कारण त्या विचाऱ्यांना विंचवाशी कसें वागावें लागते हे उमगले नाहीं किंवा उमगून वागणे भाग पडले नाहीं असे असावे. जहाल भटांची टुरटुर, त्यांच्या त्या देशभक्तीच्या वल्गना मा-बाप सरकारच्या बुटांवर धडाधड लोटांगणें घालण्याखेरीज आतां उरलीच नाहीं. जहाल भटांचे हल्लीचे निकडीचे राजकारण सरकारला सामील कसे व्हावें हेच आहे. भटें राजकीय अधःपाताच्या रौरवांत तर सारखे डुंबत आहेत. ब्राह्मणेतर तरुणांनो ! मराठे, माळी, सोनार, शिंप्यादि जातीतील तरुणांनो ! जातिविवेकांतली ब्राह्मणेतरांची उत्पत्ति, धडधडीत लबाडीची असतां, धादांत

खोटी असता, भट केवळ पाजीपणानें दुर्लक्ष करूं लागले किंवा दिशाभूल करूं लागले तरी तुमचे स्वास्थ्य बिघडूं देऊं नका. स्वतः बेफाम न होता प्रतिपक्षाच्या बेफाम बडबडीतून स्वतःच्या फायद्याचे माप शांत वृत्तीनें मोजीत जाणारा मनुष्यच यशस्वी होत असतो. उठा, सावध व्हा! पण भडकूं नका. जागृत व्हा! पण चिडूं नका. आवेश येऊं द्या पण आवेशाला द्वेषाची तीट लागूं देऊं नका. हलकट पुराणांतले तुमच्याविषयीचे पाजी वर्णन वाचून तुमचे मस्तक भणभणून जाईल; पण स्मृति–पुराण–विवेक जाळण्या-पलिकडे तो जाऊं देऊं नका. जोपर्यंत भटें अश्लिल, बीभत्स पुराणें जाळीत नाहींत; तोपर्यंत भटाळलेली वृत्तपत्रें, पुस्तकें यांच्यावर कायदेशीर

पिकेटिंग

करण्याची वेळ येणार आहे; पण ती आज आली नाहीं. वेळ आली कीं न सांगताच घडू लागते. ब्राह्मणेतरांच्या उद्‌बोधक, उत्तेजक वाङ्मयाला ब्राह्मण लोक जेवढें वाचणार नाहींत तेवढें आपल्या फायद्याचें आहे. आपलें बळ किती वाढलें आहे याची दाद प्रतिपक्षाला कधींहि लागूं नये. ब्राह्मणेतर मर्दहो! हिंदू म्हणवून घेणाऱ्या आर्यांच्या अस्सल वंशजांनों! हिंदु धर्माच्या नांवावर जगणारें पाजी वाङ्मय तुम्ही असेंच ठेवणार काय? हिंदु धर्माला शेळपट बनवून त्याला परधर्मीयांचा चेष्टेचा विषय करविण्यास कारण होणारी भटें अजूनहि आपल्या मार्गांत आडवी येत आहेत. हिंदु धर्माला लागलेली ही ब्राह्मणांची गोचीड सरळ हातानें निघत नसली तर लचका तोडून काढली पाहिजे. प्रथम थोडासा त्रास होईल; तो स्वधर्म, स्वदेशाकरतां कोणीतरी सहन केलाच पाहिजे. कदाचित् हे कार्य करीत असतां तो त्रास सहन करणें हे आपलेच भवितव्य असेल, आणि ते वाण आपण मोठ्या आनंदानें उचललें पाहिजे. ब्राह्मण हिंदुसमाजाचे शिर आहे आणि ब्राह्मणेतर इतर अवयव आहेत अशी उपहासात्मक कोटी भटाभिक्षुकांकडून लढविण्यांत येते; पण वस्तुस्थिती अशी आहे कीं ब्राह्मण, समाजपुरुषाच्या मानेवर उपटलेले उपटसुंभ आवाळू आहे. हे आवाळू खाली दाबविण्याचा भागवत धर्मानें नम्र प्रयत्न करून पाहिला. चुचकारून शेकून हें आवाळूं नाहींसे झाले नाहीं. अर्थात आतां ते ऑपरेशन करून, म्हणजे कापून काढणे भाग पडले आहे व आज तेंच ब्राह्मणेतर समाज नेटानें करीत आहे. हें उपटसुंभ आवाळू कापून काढतांना समाजपुरुषाच्या शरीरालाहि थोडासा धक्का बसणारच; पण पुढल्या पुष्कळांच्या पुष्कळ सुखाकरतां थोड्यांनी थोडकेसे दुःख सहन केलेच पाहिजे.

गोब्राह्मणांचा प्रतिपाल

करा असा ब्राह्मण म्हणविणाऱ्या लोकांची एक ओरड असते. गायीसारख्या पुण्यवंत प्राण्याबरोबर ब्राह्मणाचे नुसते नांव उच्चारणेसुद्धां पातक आहे. विवेक-पुराणें यांचा अभिमान धरणाऱ्या ब्राह्मणांचा प्रतिपाल करावयाचा, मग बिचाऱ्या सर्पांनीच काय जगाचे घोडे मारले आहे? अनाथ, अपंगांचे संरक्षण करा. कुलस्त्रियांचे, अर्भकांचे संरक्षण करा. गलेलठ्ठ पोळांचे संरक्षण करणे म्हणजे परमेश्वरानें दिलेल्या द्रव्यबळाचा अनाठायी

उपयोग करणें आहे. आणि ब्राह्मणांनी " आमचा प्रतिपाल करा " असे लतकोडग्या-सारखे बोलावे तरी कसें ? मर्दाची जात संरक्षणाची याचना कधींच करीत नाहीं. नामर्द भटाभिक्षुकांनीं १९२५ सालीं सरकारकडेसुद्धां संरक्षणाची भीक मागितली. आमच्या छोटेखानी पुस्तकांचा येत्या गणेशोत्सवाशीं संबंध जोडण्यांत तर भट व भटाळलेल्यांचा

भेकड स्वभाव

धडधडीत उघड होत आहे. गणेशोत्सव आला असेल; नाहीं तर निवडणूक आली असेल ! त्याचा " शूद्रकमलाकर " व त्याचें विवरण याच्याशीं संबंध काय ? आणि गणेशोत्सवाकरतां पुस्तकें तरी कशाला पाहिजेत ? ब्राह्मणांचेंच आजवरचें एवढें पाप सांचलें आहे कीं, तेंच उचल खावून त्यांच्या गळी पडेल; सत्यशोधक वाङ्मयात व जलशात ब्राह्मण स्त्री-पुरुषाची नालस्ती असते असा टाहो फोडणारे भट व त्याच शब्दावरच विश्वासाची तळी उचलणारे भटाळलेले यांनीं जहाल म्हणविणाऱ्या

ब्राह्मण नराधमांनीं

याच गणेशोत्सवांत सुधारकांच्या स्त्रियांची केलेली नालस्ती एकवार वाचावी. सर्व ब्राह्मणेतर बंधूंना आमची अशी एक निकडीची विनंति आहे कीं ब्राह्मणांनीं केलेल्या कोणत्याहि आरोपांचें अंधःश्रद्धेनें ग्रहण करू नका. आतांशा एक " शूद्रकमलाकर " व त्यांतला अगदी थोडा मासला ब्राह्मणेतरांच्या प्रचितीस आणू लागलो तर भटा-भिक्षुकांची दाणादाण उडण्याची वेळ आली आहे. जे शब्द तोंडानें उच्चारण्यास शरमेलाहि शरम वाटेल, असले शब्द ज्या लिंग-पुराण, स्कंध-पुराण, मत्स्य-पुराण इत्यादि ब्राह्मणी ग्रंथांत तुडुंब उचंबळून चालले आहेत. त्या साऱ्या ब्राह्मणी करामतीला चव्हाट्यावर खेचून ब्राह्मणेतर समाजाची सेवा बजावण्यात आमच्या हातून कधींच कसूर होणार नाहीं. गणेशोत्सवाकरतां व निवडणुकीकरतां आणि त्यांतहि भटांची हबेलंडी उडवायला आमची व आमच्या पुस्तकांची मुळींच जरूर नाहीं; गणपति उत्सवाचे लाड आमच्यातला कोणीहि पुरवील. ब्राह्मणांना आमचा असा जाहीर सवाल आहे कीं तुमच्या पोथ्या, ती पुराणें, ती तुमची संस्कृति, हल्लींची तुमची प्रकृति यांच्यासह वर्तमान-हवे तर कायद्याच्या पुस्तकासह येऊन " ब्राह्मण तेवढा हरामखोर कां मानू नये " हे आमचें म्हणणें खुद्दून काढा; आमच्या ब्राह्मणेतर बंधूंतहि कांहीं ठिकाणीं थोडासा ढिलेपणा आला आहे. ओंकारेश्वरावर ब्राह्मणांकरतां मसनवटी वेगळी आहे—असू द्या की जाऊ द्या. जातिविवेकांत भटांनीं झक मारली असेल—पण आपण कशाला उकरून काढा—अशा तऱ्हेचे उद्‌गार काढण्याची संवय हिलाच विनाश कालाची विपरीत बुद्धि म्हणतात. लोकछंदानुवर्तित्वाची पर्वा म. जोतिरावांनीं केली असती तर शाहुमहाराज उत्पन्न झाले नसते आणि राजर्षि शाहुरायांनींहि जर

लोक बोले आप चाले

असा पाठ घेतला असता तर ब्राह्मणेतर पक्षच समूळ नाहींसा झाला असता. सदसद्‌विवेक

बुद्धी आणि लोकमतांचे अनेक वेळा पटत नसते. अशा वेळीं लोकमतापेक्षां सत्य मतालाच मान दिला पाहिजे; आणि आजपर्यंत मोठ्या गणल्या गेलेल्या लोकांनीं हेंच कार्य केलें आहे. आजच्या दुसऱ्या सवालांत श्री. के. टी. गुप्ते काय म्हणतात याचा उताराच वाचूनहि ज्यांचे समाधान होणार नाहीं अशाकरतां आमच्याकडे शेकडो पुरावे पडले आहेत व ते क्रमानें प्रसिद्धही होतील.

हें पुस्तक रा० दिनकरराव शंकरराव जवळकर यांनी
" प्रताप प्रेस " ६१८ शुक्रवार पुणें,
येथें छापून प्रसिद्ध केलें.

◇◇◇

मर्द हो ! नाकें कापून घ्या !

मर्द हो ! नाकें कापून घ्या !



जो मर्द असेल, जो प्रतियोगी मर्द असेल, जो प्रतिसहकारी जहामर्द असेल त्यानें पहिल्या सपाट्याला नाक कापून घेतलेंच पाहिजे. तळापासून नाक कापून घेणें हा प्रतिसहकाराचा बहादर बाणा आहे. शेंड्यासुद्धां नाक उडवणें हें प्रतिसहयोगाचें दिव्य आहे; ज्याला उंच नाक असेल; ज्याला नाक उडवायची संवय असेल; जो उठल्या सुटल्या नाक उचलून बोलत असेल, त्याला प्रतिसहयोगी बनता यायचे नाहीं, तो मोठा विद्वान असला, पंडीत असला, मुत्सद्दी असला, श्रीमंत असला किंवा दिवाण असला तरी

काय असोनिया बत्तीस लक्षणें ।
नाक आहे तेणें वाया गेले ॥

सर्वगुणसंपन्न असून जर त्याला नाक असेल तर त्याला प्रतिसहकारी बनता यायचे नाहीं. स्वराज्य मिळविण्याच्या कार्यांत जर कोणती मोठी धोंड असेल तर तें नाक! पूर्वीचे स्वराज्य जर कशानें गेले असेल तर त्या वेळच्या नरवीरांनी स्वतःचीं नाकें कापायची सोडून शत्रूची मुंडकी तोडीत बसले हेच. स्वराज्याकरता, स्वातंत्र्याकरता, स्वदेशाकरता, सुराज्याकरता साडेतीन हात देहावरले बोटभर नाक गेलें तर विशेष नुकसान होत नाहीं. आणि ज्यांना स्वराज्यासाठीं

नाक कापून घ्यायची खंत

वाटते ते शिर तरी कसें कापूं देणार आणि लढाया तरी कसे करणार ? शत्रुपक्षाच्या नाकावर टिचून आपलें आपण नाक कापलें तर कोणताही खाईन खाईन म्हणणारा मारतापीर शत्रु नाक मुठीत धरून शरण येतो; प्रतिसहकाराचें मुख्य ध्येय असें आहे कीं शत्रूचें तर नाक खाली करायचेच पण आपला पराभवच झाला तर निदान आपलें नाक तरी त्याच्या हातात जाऊं नये येवढ्याकरितां या. योगाची दीक्षा घेतानाच तें सफाई उतरून ठेवावें लागतें. विलायती वस्त्यान्यानेंच नाक कापून घ्यायच्या अटीवर आलेले निसबत सरकारी उमेदवार किंवा खास देशी वस्त्यान्यानेंच नाक कापून घेणारे स्वदेशीचे अभिमानी या योगीसंघात घ्यायची सर्रास सवलत ठेवली आहे. या योगीमंडळात सामील होताना आम्ही जात पाहात नाहीं, वय पाहात नाही, शिक्षण पाहात

नाहीं, धर्म पाहात नाहीं. फक्त आमच्यात येणाऱ्यानें नाक कापून घेतलें की तो झाला आमचा. मग त्याच्याकरता दुसऱ्याच्या माना कापाव्या लागल्या तरी त्या आम्ही तिसऱ्याच्या हातून उतरू तें चौथ्याला कळूं देणार नाहीं. ज्या वेळेस नाकाचे स्तोम माजविले गेले, त्याच वेळेस हिंदुस्तानचे वाटोळे झाले. ज्या वेळेस नाकाचे देव्हारे वाजू लागले त्याच वेळेस मनुष्य जात राक्षसासारखी थोड्या थिडक्यासाठी एकमेकाला खायला उठूं लागली हल्लीच्या युगांत नाक शाबूत ठेवून जगायचे असेल त्यानें शरीराची आशा सोडली पाहिजे. ज्याला सबंध जगायचे आहे, ज्याला जिवंत जगायचे आहे, त्याला नाक कापून घेतलेच पाहिजे. मग आम्हासारख्या प्रतिसहकारवाद्यांना तर स्वतः जगून जगाला जगवायचे आहे. आम्ही आमचें नाक सलामत ठेवणें म्हणजे स्वदेशावर बलामत आणण्यासारखे महत्पातक आहे. म. गांधींचे नाक

अतिशय उंच व लांब

असल्यामुळें बिचारा निरुपयोगी ठरला. शक्य तेथें वसकन अंगावर जायचे व अवश्य तेथें मटकन खाली बसवायचे किंवा नको तेथें आरोळ्या ठोकायच्या व पाहिजे तेथें मूग गिळायचे किंवा थोडेसे फिरवून बरेचसे खरे बोलायचे तर " साधते " असे दिसल्यावर डोळे मिटून हादडायचे आणि हाती लागत नाहीं असें दिसतांच वैराग्याचा वेदान्त आणि त्यागाचा आकांत मांडावयाचा. अशी प्रतिसहकार प्रतिसरकार किंवा " पति-सरकार " अशा निरनिराळ्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या आमच्या साध्यसाधनाची सर्व-साधारण व्याख्या करतां येईल. मर्द हो ! हिंदमातेच्या कलिजांनो ! जर तुम्हाला तुमच्या

मातृभूमीचें ऋण

फेडायचें असेल तर नाक कापून घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. बाबांनो ! हल्लीचा काळ नाकानें माका खाण्याचाही नाहीं व वांगी सोलण्याचाही नाहीं. ज्यांना अजून अहिंसा असा जप करीत अनत्याचाराचे मणी ओढीत बसावयाचे असेल त्यांनीं हिमालय गाठावा. अत्याचाराशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं. हिंसेशिवाय स्वराज्य मिळणार नाहीं.

रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?

बोला ! कोणा मिळाले ? एका हातानें आपलें नाक धरून दुसऱ्या हातात आवेशात वस्तारा घेऊन आपलेच नाक खासदिशी कापून अत्याचार केले पाहिजेत. म. गांधी बादशहा झाले तर अहिंसेचा स्मशान गोंधळ माजवतील; पण समजा मी — प्रतिसरकार योगाचा प्रवर्तक—बादशहा झालो तर

जन्मताच मुलाची नाळ न कापता

नाक कापा असा सक्तीचा कायदा करीन. " शिवाजीनें स्वराज्य मिळवले ही गोष्ट खोटीच असली पाहिजे, कारण शिवाजीचें केवढें ते अगडबंब नव्या पुलाएवढें नाक ! एवढें नाक असून स्वराज्य मिळवणें कधींच शक्य नाहीं. ज्या ज्या गोष्टी आपल्याला भूषण वाटतात, त्यांचा त्याग केला पाहिजे. नाक हे आपणांत भूषण मानले गेले आहे;

अर्थात् नाकाचा त्याग करवत नाहीं. निवळ देशाकरता तरी करवत नाहीं त्यानें स्वार्थ-त्यागाच्या गप्पा झोडाव्यात कशाला ? प्रतिपक्षाचा पराभव व्हायला त्याला प्रथम कोठे तरी अपशकून झालाच पाहिजे. असा एक अपशकून करणें नेपोलियनसारख्या अनेक लढाया मारण्याहूनहि जास्त किंमतीचे आहे. आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकून करणें ह्या व्यवहारातल्या फलदायी सिद्धान्ताकडे पाहून जे नाके मुरडतात ते व्यवहारशून्य, मूर्ख, ढोंगी असले पाहिजेत. कोणीकडून तरी आपल्याला जय मिळवायचा आहेना ? मग घ्या पाहू नाक कापून ! शेवटच्या रावबाजीच्या कारकीर्दीत वरिष्ठाकडे बायका पाठवून बढत्या मिळवीत. केवढें व्यवहारदक्ष लोक ते ! नाहीं तर हल्लीचे अव्यवहार्य शाहाणे पाहा ! असतील नसतील त्या साधनांनीं हातीं पडलेल्या

सुधारणा 'राबवून'

घ्यायच्या ह्यालाच व्यवहारी पूर्णोक्त म्हणतात. मान, दंभ, ताठा, स्वाभिमान असल्या क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष देऊन सबंध देशाचे वाटोळे करणें हें कोणत्याहि समंजस पति-सरकाऱ्याला परवडणार नाहीं. पूर्वीचे ते मूर्ख लोक ! मुसलमानी धर्म स्वीकारायचा नाहीं व स्वधर्माला सोडायचे नाहीं. एवढ्याशा व्यवहारातल्या क्षुल्लक कारणावरून त्यांनी स्वतःचे हाल करून घेतले व फुकट कुत्र्याच्या मौतीनें मेले. मुसलमानी धर्म स्वीकारला असता तर त्यांना बादशहाशी सोयिर-संबंध करता आला असता. त्यांना स्वतःला दिवाणगिऱ्या-सुद्धां मिळाल्या असत्या. एक नाक एवढें कापलें म्हणजे केवढाले फायदे होतात पाहा. कोणत्याहि पक्षाचे सभासद होता येते व कोणतेंहि मत केव्हांहि बदलता येते. पगडी फेकून टोपी घातली किंवा टोपी फेकून

साहेबी शिपतर

जरी चढवले तरी नाक कापून घेतल्यावर त्याची लाजच वाटत नाहीं. "सारा नक्ट्यांचा बाजार ॥ तयांना लाज काय असणार" हे एका आधुनिक महाकवीचे सिद्धांत-सूत्र आहे. हें काव्य बिचाऱ्यानें कोणत्याही अर्थानें गायिलेलें असो, पण तें आम्हाला जितके लागू पडते तितके लाख नक्टे जमवले तरी त्यांना लागू पडणार नाहीं. अहाहा !

"लाज काय असणार !"

"लाज काय असणार ?" ही वागीश्वराची पुण्यश्लोक रसवंती बँडच्या भोंगाण्यांतून, वाजंत्र्यांच्या पिंगाणीतून, मेळ्याच्या धिंगाण्यातून कानावर आदळत असता अजून नाकवाले लोक जगांत दिसावेत ! जगाला अपघात करणारी जी महामाया लाज ! जगाच्या सौख्यावर निखारे सारणारी जी लाज तीच एकदा गेली म्हणजे जगाच्या कोट कल्याणाला कसला पारावार आहे ? ही लाज सत्याग्रह करून जाणार नाहीं, ह्या लाजेचा मोह तुरुंगात जाऊन आवरणार नाहीं, ही लज्जा खादी पेनून तर मुळीच हलणार नाहीं. लाज घालवण्याकरता तुम्ही जन्मभर चरखा फिरवीत बसा, ती अगदी हटता हटायची नाहीं. पण तेच एखादा वस्तारा घ्या, टिळक गुरुमाऊलीचें नामस्मरण करा आणि तेवढें नाक

कापून घ्या पाहूं कीं तेथें घटकाभरसुद्धा थांबायला लाजेची माय व्याली नाही. ज्याने स्वतःमधली लाज पळवली तो देशाला लाज आणणाऱ्या उपाधि समूळ नाहिंसा कां करणार नाहीं ? नक्ट्यांना लाज नसते हें आधुनिक कवीचें काव्य आहे. याचें कारण त्या कवीच्या डोळ्यासमोर मी माझी विद्वत्ता, माझी मते, उत्साह हेंच असलें पाहिजे. मी तीनशे वर्षांपूर्वी जन्माला आलों असतों किंवा तुकाराम माझ्या वेळीं जन्मला असता तर

दर्पणाशी बुझे ॥
नक्टे दूर पळे लाजे ॥

असा अभंग तो करतांच ना ! नक्टा लाजेनें मितो हें काय बोलणें आहे ! तोंडासमोर कोल्हापुरी पायताण धरले तरी न लाजणारा, निर्नासिक वीर दर्पणांना सरपणाच्या किंमतीतच लेखणार. तुकारामाच्या वेळीं नाकाचे अभिमानी लोक होते, माझ्यासारखा एखादा जरी प्रतियोगी असता तरी

येतां पुढें नक्टे ॥
आरसा दुभंगुनी फुटे ॥

असाच अभंग केला असता. हल्लीच्या काळात, नाकाचा फुका अभिमान न धरणाऱ्या लोकांची माझ्यासमोर तरी संख्या वाढती असल्यामुळें कुठं एकादा झालाच तुकाराम तर तसा अभंग खास करील. शरमिंवेपणा, लतकोडगेपणा हे नाकवाल्या लोकांनीं बहिष्कृत केलेले सद्गुण जर राजकारणी पुरुषात नसतील तर तो स्वराज्य मिळवूच शकणार नाहीं. आजपर्यंत अनेक राज्यक्रांत्या आणि उलथापालथी झाल्या त्या याच शस्त्रांनीं झाल्या आहेत. शौर्य उपयोगी पडत नाही, धैर्य केव्हां तरी गर्भगळीत होते. क्रौर्य निर्वैर असत नाहीं; पण लतकोडगेपणा कोठेही जाऊ द्या विजयी सम्राटाप्रमाणे दिवसा मशाली लावून फिरताना दिसेल. जोपर्यंत नाक आहे तोपर्यंत हे गणेशउत्सवाला उभे राहावयाचे नाहींत. ज्याला तपश्चर्या करीत बसावयाचे आहे किंवा खुनी माथेफिरू बनावयाचे आहे, त्यांना त्यांच्या वाटा मोकळ्या असतील किंवा नसतील, पण ज्यांना या जगांत जिवंत जगावयाचें आहे, त्यांनीं जिथें तिथें टचाटच्च लागणारी ही नाकाची ब्याद काढून टाकावी. नाक असले कीं गांधी टोपी काढून पगडी कशी घालू ही उगीचच मनाला रुखरुख लागते. ज्या युनिव्हर्सिटीवर बहिष्कार तिच्यातल्या परीक्षकाच्या जागेचा स्वीकार. ज्या दिवाणगिरीचा तिरस्कार, तिचाच सत्कार. ज्या काँग्रेसला माता म्हटले तिलाच हडळ ठरविण्याचा चमत्कार ! या अजब गोष्टी केवळ एक नाक नसल्यामुळें हां हां म्हणता करता आल्या. शाबूत नाकाच्या माणसाची असले आणि इतके पराक्रम गाजवायची छाती नाहीं. देशाचे राजकारण धर्माला सोडून जाता कामा नये व आमचा हिंदू धर्म ब्राह्मणांना सोडून असता कामा नये असे माझें प्रांजल मत आहे, हे जगद्विख्यात आहे. निदान ब्राह्मणांना तरी प्रतिसहकारी बनल्यावाचून तरणोपाय नाहीं, असा माझा होरा वाहातो आहे आणि आज घटकेला

प्रतियोग व ब्रह्मयोग

यांचा योगायोग बराच जुळून आला आहे. नाक शाबूत असले म्हणजे सरकारच्या अन्यायी वर्तनावर हल्ला चढवावा लागतो. नाक सलामत असले म्हणजे ब्राह्मणेतरांच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्या लागतात. नाक असले म्हणजे सुख कसें तें नसतेच म्हणानात ? ब्राह्मणेतराची चळवळ तर उतास येऊं लागली आहे, अशा वेळी नाकवाल्या म. गांधींचे पाठी जाऊन ब्राह्मणाचे आणि ब्राह्मणांचे म्हणजे देशाचें नुकसान आहे. आपण आपला सवता नक्टा सुभा स्थापन केलाच पाहिजे जो शिरजोर होईल त्याच्या बाजूचे आपण. जो काठी घेऊन आपल्यापुढें राहील त्याचे आपण दास. दोन दोन पक्ष जर एकदम आपल्यावर धावून आले तर त्यापैकीं बलिष्ठ असेल त्याच्याकडे आपण हल्ली म. गांधींनीं कितीहि वळवळ केली किंवा ब्राह्मणेतरांनी कितीहि धडपड केली तरी नोकरशाही सर्वांत जोमांत आहे. अर्थात ते सरकारशी झगडणें, सरकारला नमविणें, सरकाची अडवणूक करणें, ही बोलण्याची भाषा आपण सोडलीच पहिजे. आपण मनापासून कधीं बोलतच नव्हतो; पण आतां मुखापासूनसुद्धां बोलता उपयोगी नाहीं; नोकरशाहीशी आपण नाक ठेवून निका लावायला निघालो तर आपल्याला दारांत कोणी उभे करणार नाहीं. तेव्हां मर्द हो ! प्रथम नाक कापून घ्या ! हे म. गांधी, हे ब्राह्मणेतर थोड्याच काळात अगदीं एक होत जाणार आणि स्वराज्य मिळवायच्या ऐवजी संन्याशाची धर्मशाळा उभी करणार. आपल्याला स्वराज्य कमवायचे आहे; तेव्हां नोकरशाहीशी आपण तद्रूप झालेच पाहिजे. नोकरशाहीत हल्लीं जीं माणसें आहेत तीं स्वराज्य भोगीत आहेतच ना ? झाले तर, त्याच माणसांच्या जाग्यावर आपण जाऊन बसलो म्हणजे स्वराज्य आपल्याला मिळालेच. इंग्रज आणि ब्राह्मण यांतला भेदच नाहींसा केला म्हणजे स्वराज्य मिळवायची जरूर नाहीं. ते आयतेच आपल्या हातात पडलेले असेल. आपण नाक उडवून दिल्यामुळें आज काँग्रेससुद्धां आपल्याला परकी भासूं लागली आहे. मग असा सराव पडत गेला तर इंग्लंड ही जन्मभूमी आपण मानूं लागूं ! नुसते नाक कापून घेण्याचा अवकाश आहे, कीं यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें आपलें दैव खाडकन उचकटेल. मर्द हो ! उठा उठा ! ज्यांना स्वदेशाचें कल्याण करायचें आहे, स्वराज्य मिळवायचें आहे, त्या भारत-मातेच्या शूर संतानाला मी गर्जून सांगतो कीं नाकें कापून घेऊन प्रतिसरकारी बना. प्रतिसरकारी बनलात कीं, तुम्हावर जुलूम कोण करतो हें कळूनसुद्धां गिळायची संवय लागेल. त्यामुळें तुम्ही सुखी व्हाल, तुमचा देश सुखी होईल. जोपर्यंत नाकवाले दुष्ट या भारतभूमीत राहात आहेत तोपर्यंत इंग्रजांना जेतेपणाची घमेंड असणार. ही इंग्रजी घमेंड जिरवायची असेल तर आपण नक्टे बनलें पाहिजे ! आपण नाक कापून घेऊन त्यांच्यापुढें उभे राहूं लागलो म्हणजे ते सुद्धां आपल्याला गोळ्या घालून बंदुकी झिजवणार नाहींत; कारण जेथें नाकवाल्या लोकांची वस्ती तेथेंच गोळीबाराचा संभव ! आपण नाक कापून घेतल्यावर या नक्ट्यांना आम्ही जिंकले असे सांगायची सुद्धा इंग्रजांना लाज वाटेल आणि त्यामुळें सहजच आपण जित नाहींत असे ठरणार. हा कांहीं

लहान सहान फायदा नव्हे ! मर्द हो ! लतकोडगेपणा, लाचारपणा, हा किती बहुमोल गुण आहे याची तुम्हाला कल्पना नाहीं. मी मी म्हणणाऱ्या हजार सैनिकांना एक लतकोडगा हटणार नाहीं. पण सारे गुण एकदम येण्याकरतांच अगोदर नाक कापून घ्यावे लागते. नाक ठिकाणावर असले म्हणजे डोकें ठिकाणावर राहात नाहीं; आणि मग जो तो लागतो भलतं सलतं बरळायला. स्वराज्य, स्वातंत्र्य याच्या व्याख्या तर पोट भरून हंसायासारख्या करू लागतात. ते म. गांधी, ते गव्हर्नराला भेटायला गेल्याबरोबर त्यांच्यावर केवढा टिकेचा गहजब ! कारण गांधी जेव्हा तेव्हां नाक उचलून बोलणारे; पण तो मीच पाहा ! मी वेश्येच्या भेटीला गेलो तरी नाक नसल्यामुळें कोणी एकही मायेचा पूत मला दोष लावायला धजवायचा नाहीं; खरंखुरं व्यक्ति-स्वातंत्र्य व मत-स्वातंत्र्य नाक असून संपूर्णतेनें भोगताच येत नाहीं. नाक नसलें म्हणजे आपल्यापुढें कोणीहि नाक खाजवायला नको व खाजवले तरी आपल्याला विधिनिषेध वाटायला नको. येत्या कौन्सिल-करतां तर ही

नाक कपाई

झपाट्यानें सुरूं केली पाहिजे. नाक कापून घेतल्यापासून काय काय फायदे आहेत ते प्रत्येक प्रतिसहकाऱ्याच्या मॅनिफेस्टोत सुवर्णअक्षरांनीं छापले पाहिजेत. नाक कापून घेणें हा ब्राह्मणांचा जन्मसिद्ध हक्क आहे अशा रस्तोरस्ती पाट्या लावल्या पाहिजेत. गांधी, दास, नेहरू या तिघांनाहि अपशकून करणारी माझी निर्नासिक परंपरा, सरकारलाहि अपशकून करील, अशी सरकारला भीति वाटण्याचा संभव आहे. निदान सहनाक पुरुष तसें भासविण्याचा प्रयत्न करतील, तेव्हां आतांपासूनच कंबर कसून प्रतिपक्षाच्या विरोधास न जुमानता कायदेकौन्सिलें म्हणजे नक्ट्यांचीं निवासस्थानें बनवून सोडलीं पाहिजेत. पूर्वी ब्राह्मणांचे पुढारपण अस्सल राजद्रोही माणसाकडे असावयाचे, समाजदेखील राजद्रोह्यावरच प्रेम करावयाचा. या अनर्थाचे कारण ब्राह्मणांचे (ब्राह्मणांचे म्हणजे देशाचे हे लक्षात ठेवावे) पुढारपण वीसवीस वर्षे एकसारखे बोलणाऱ्या हट्टी लोकांकडे होते. वीसवीस वर्षे एकच मत प्रतिपादन करणें म्हणजे निव्वळ जंगलीपणा आहे. दर आठवड्याला नसली तरी निदान दर वर्षाला तरी मते बदललीच पाहिजेत. रोज जुने जग नवे होत आहे आणि हे हट्टी लोक कुठली त्रेतायुगातली मतें अजून चघळीत बसले आहेत. असल्या हट्टी लोकांच्या तावडीत पुढारीपण सापडल्यामुळें सगळा गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ झाला होता. लोकांचा पुढारी सरकारशी झगडणारा, स्वार्थत्यागी, स्पष्टवक्ता, न्यायी असलाच पाहिजे असा नाकवाल्यांचा बाणा आहे व लोकांनीहि आजपर्यंत तोच बाळगला म्हणून सर्वस्वाला मुकले. रावबहादुर, रावसाहेब, ऑनररी मॅजिस्ट्रेटें हे लोकांचे पुढारी कां होऊ नयेत ? निदान ब्राह्मणांनी जर या ब्राह्मणेतरांच्या कहरात होरपाळायचे नसेल तर खादीभगत कट्टर, स्वराज्यवादी फत्तर यांना पथाऱ्यांच्यासह फेकून दिले पाहिजेत. सरकारचे बिनशर्त सहाय्य घेऊन

ब्राह्मणेतरांवर जे आपली मांड पक्की बसवतील असलेच लोक आपत्र पुढारी बनवले पाहिजेत. या कामी मला जितके यश आले आहे तितके कोणत्याहि विद्यमान किंवा दिवंगत पुढाऱ्याला आलेले नाहीं. ज्या शहराचा पुढारी किंवा आवडता मनुष्य अस्सल राजद्रोही असावयाचा त्याचाच पुढारी पक्का रावबहादुर आणि तोहि सरकारचा उपयोग करून घेण्याची मदत करतो म्हणूनच. हा सारा अजब चमत्कार नाक कापून घेतल्यामुळें घडत आला व पचवता येत आहे. आम्ही प्रतिसहकारवाद्यानें मनात आणले तर मुमताज बेगमला सुद्धां काँग्रेसचे अध्यक्षस्थान देऊं. प्रतिसहकारवाद्यांत भर पिकेटिंगच्या मोसमांत ज्यांनीं दारूची पिपेची पिपे फस्त केली, तेच आज मिरवत येत आहेत. जिथं "टिळकांवर ब्राह्मणेतर धावून येत असता सरकार तटस्थवृत्तीनें राही, तेच आता टिळकांच्या पुतळ्याभोंवती पोलिस उभे करून त्यांचे संरक्षण करण्यास तयार असते. ही इकडची दुनिया तिकडे फिरली ती वाऱ्यामुळें फिरली नाहीं किंवा लहरीमुळेंही फिरली नाहीं; हा असला पराक्रम गाजवायला, पूर्वेचे सूर्य पश्चिमेकडे खेचायला पुढाऱ्यानें नाक कापून घ्यावे लागते व लाज सोडावी लागते. आणि त्याप्रमाणें मी ब्राह्मणांचा वतनदार पुढारी, महाराष्ट्राचा वारसदार पुढारी अशा माझ्यासारख्या लायक पुरुषानें प्रथम स्वतःचें नाक कापून घेतलें म्हणून हा अद्‌भुतरम्य देखावा आज दिसतो आहे. मर्द हो! जहामर्द हो! जवान मर्द हो! अरे सरकारशी असहकारिता कसली करतां! नाकाशीं असहकारिता करा, नाकावर बहिष्कार पुकारा, नाकाचे ठिकाण ओस पाडा, नाकावर वस्तारा फिरवा, खेडोपाडी चरखा फिरवायची कसली बोडक्याची चळवळ करता! नाकावरून वस्तारे फिरवायची चळवळ करा! रस्तोरस्ती रोखून ठिकठिकाणीं नाकाळ लोकांना अपशकून करण्याकरता नकट्यांच्या पलटणी उभ्या करा! "नकट्यांना मते द्या" "नकट्यांना मते द्या" अशा पाट्या हवे तर गाढवांवर लावा पण गांवांत फिरवा. कोणी एका दरवडेखोरानें कांहीं वर्षांपूर्वी मारवाड्यांचीं नाकें कापावयाला सुरवात केली होती अशी मी दंतकथा ऐकतो! तो दरोडेखोर आज पुन्हा कुठे जर भूभार उतरण्याकरता अवतार घेईल तर त्याच्या मठांत जाऊन त्याला ठासून सांगेन कीं बाबा! नुसती दुसऱ्याची नाकें कापून कसल्याहि चळवळीला यश येत नसते, चळवळीत यशस्वी व्हायचे असेल तर प्रथम स्वतःचें नाक कापून घ्यावें लागतें. नाकाला राजकारणाचा वास तर मुळींच सहन होत नाहीं. याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे माझे राजकीय पुढारपण? निवडणुकीसाठीं माझ्यासारखेच झालेले उमेदवार मी शोधीत आहे. प्रत्येक पक्षांतून चार-दोन माणसें तरी मला मिळत जाणार आणि माझा पक्ष रुजणार. उमेदवाराने खालील अटी मान्य केल्याच पाहिजेत, पक्षांत सामील होणाऱ्या

(१) उमेदवारानें प्रथम स्वतः नाक कापून घेतलें पाहिजे.

(२) कमीत कमी पाच माणसें तरी आपल्यासारखी (नकटीमिंधीं) केलीच पाहिजेत.

(३) म. गांधींना शिव्या दिल्याच पाहिजेत.

(४) वाटेल तेव्हा पगडी फिरवण्यास सज्ज असले पाहिजे.

(५) तो ब्राह्मणेतरांचा द्वेष्टा असलाच पाहिजे. मुसलमानांचा नसला तरी एखादे वेळीं चालेल.

(६) " टिळकांचे राजकारणाचा " अभिमान धरलाच पाहिजे, पण मी सांगेन तेच " टिळकांचे राजकारण " समजले पाहिजे.

(७) त्याला प्रतिसहकार नांव आवडत नसेल तर त्याने इंडियन नॅशनल अगा स्वतंत्र अगर नॅशनल मॉडरेट काय वाटेल ते नाव घ्यावे. नांवाबद्दल ह्या पक्षाला अभिमान नाहीं.

(८) म्युनिसिपालिटीत अगर बोर्डात तो गेला असल्यास व्हाईसरॉय यांच्या मानपत्रास त्यानें अनुकूल असलेच पाहिजे.

(९) कौन्सिलांत जोशी वतन, कुळकर्णी वतन यांना कायम राखण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे.

(१०) सावकार व शेतकरी यांत सावकारांची बाजू उचललीच पाहिजे.

(११) या पक्षातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रतिनिधीनें नाक कापून घेण्यास मान्यता म्हणून मला मानपत्र दिलेच पाहिजे.

(१२) या पक्षाचे ऑफिस पुण्यास राहील.

वगैरे नियम, आज्ञा, उद्देश आहेत. या यमनियमांचें सार सांगता यावे म्हणून मी ते एकदम जसे आठवले तसे सांगितले आहे, पण तोंडीं सांगण्यासारखे बरेच्च नियम आहेत. नकट्या राजकारणांत लेखी सांगण्यासारखे बहुतेक नसतेच म्हटले तरी चालेल; जें काय असते तें सारे तोंडी सांगण्यासारखेच. कोणाला काढावयाचा, कोणाला उडवायचा, कोणाला छळायचा वगैरे भाऊबंदकीचे सारे नक्टे डावपेच आपल्या अनुयायांना फक्त समजून द्यावे लागत असल्यामुळें ते येथें उघड करतां येत नाहीं. पण जो आपल्या पक्षात यायला अर्थात् नाक कापून–तयार असेल त्याला हे यमनियम मोकळ्या कानानें कळतील, असा हा देशोद्धारकांचा संघ निघाला आहे; त्याला मिळणें हें प्रत्येक जगण्याची इच्छा करणाऱ्या द्विपाद प्राण्याचें आद्य कर्तव्य आहे. येत्या इलेक्शनमध्यें मोठमोठ्या मोहिमा करून सर्व नाकाळ जनांची नाके नक्षासह उतरण्यासाठीं पुन्हां पुन्हां मी मदेश-बांधवांना बोलवीत आहे. या इह लोकालाच जर स्वर्ग करून सोडावयाचे असेल तर त्यांतल्या त्यांत निदान पुण्यालाच जर इंद्रनगरी करावयाचे असेल, विशेषतः ब्राह्मणांनाच पुन्हां भूदेव कायम ठेवायचे असेल, तर बंधूहो, नाके कापून घ्या ! नकट्यांना मतें द्या ! नकट्यांना पुढारी माना ! नकट्यांचे ऐंका ! नकट्याकरतां हवे तर मरा ! पण नाके कापून घ्या ! नक्टेश्वर महाराज कीं जय !

हें पुस्तक रा० दिनकरराव शंकरराव जवळकर यांनीं
" प्रताप प्रेस " ६१८ शुक्रवार पुणें, येथें छापून प्रसिद्ध केलें.

◇◇◇

१९५० सालची ब्राह्मण परिषद

१९५० सालची ब्राह्मण परिषद



वर्तमानपत्रांचा आणि लोक-चर्चेचा विषय होऊन बसलेली १९५० सालची भट परिषद पुणे शहरांत भरली होती. सोळा साली प्रसिद्धीस आलेल्या एका फंडगुंडाचा वाडा एका समारंभात जळून उद्ध्वस्त झाला होता. तेव्हां सभेकरता आयते ते पटांगण तयारच होते. या पटांगणावर मोठा शामियाना उभारला होता. " ब्राह्मण तेतुका मिळवावा । अब्राह्मण वगळून काढावा । ये विषयीं करता तकवा । समर्थ हांसती " अशा वचनाच्या पाट्या निरनिराळ्या ठिकाणी लावल्या होत्या. दूरदूरचे प्रतिनिधी आले होते; पुरुषांपेक्षा स्त्रियांचा विशेषतः विधवांचा भरणा अफाट होता. स्त्रियांच्या खांद्यावर फारशी मुलें नव्हती. पण आसपास स्वयंसेवक मुलें व्यवस्था करीत होती. प्रत्येक प्रतिनिधीचा चेहरा ब्राह्मण जात उद्या जणू काय कत्तलीत सापडणार असा घाबरलेला दिसत होता. स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांची भाषणे अगोदरच संपली होती. त्यातला निवडक भाग मोठा गंभीर होता असे तेथे गेल्यावर मला समजले. असतु. अगदीच उशीर झाला नाहीं, एवढें समाधान मानून, अधिवेशनाचे अध्यक्ष

रावबहादूर कटनाके

यांच्या पहिल्या ठरावाकडे दोन कान जोडून बसलो. अध्यक्षांनी पहिला ठराव राजनिष्ठेचा मांडला तो अगदीं एकमतानें पसार झाला. दुसरा ठराव खुद्द अध्यक्षांनीच मांडला.

ठराव २ रा

" समतेच्या नांवाखाली जे राजद्रोहात्मक समाज विध्वंसन चालले आहे, त्याचे ही सभा तीव्र निषेध करते. " या ठरावावर कटनाके म्हणाले, " माझे ब्राह्मणबंधू हो ! व्यास, वाल्मिक, वसिष्ठ इत्यादि थोर पूर्वजांच्या कुलीन वंशात आपण जन्मलों आहों हे ब्राह्मणेतर समाजाला खपत नाहीं म्हणून त्यांनीं समता या गोंडस नांवाखाली आपला आज ३०।३५ वर्षें छळ आरंभला आहे. विषमता ही नैसर्गिक आहे. समता कृत्रिम असते. समता हे जर जगाचें अंतिम साध्य असतें किंवा परमेश्वर जर समतेचा चहाता असता तर सर्व मनुष्यांचे चेहेरे सारखे असते, आवाज सारखा असता, रंग सारखा

असता, गुण सारखे असते, अवगुण सारखे असते. ज्या प्राण्यांत कोणतेही एकमेकां-सारखे नसतात, त्यांना मनुष्यप्राणी म्हणतात ही खरी व्याख्या आहे. परमेश्वर जर सर्वांत सारखा असता तर कोणालाही दुःख झाले नसते व सुख भासले नसते; पण येथें प्रत्येकाचीं सुख-दुःखेंच भिन्न नव्हेत तर एकाच्या दुःखावर दुसऱ्याचें सुख अवलंबून असतें. तेव्हां ज्यांत देव असतो तो सुखी व ज्यांत सैतान असतो तो दुःखी असावा असा माझा तर्कशुद्ध सिद्धांत आहे. ब्राह्मणेतरांच्या हुलडीला भिऊन आपण कांही ब्राह्मण समतेच्या तत्त्वाला वरून वरून कबुली देतात पण ते सर्वस्वी घातक आहे. ज्यांनीं जातिभेदाचा वेदांतदृष्टीनें विचार केला आहे, त्याला समता हीच माया आहे असें खास वाटूं लागले. जगांत परमेश्वर सर्वत्र असता तर सृष्टी आनंदमय दिसली असती; पण हे विश्व तर हल्ली कत्तलखाना बनला आहे. आपल्या पूर्वजांनीं ज्या कल्पना बांधल्या आहेत, त्या हल्लींच्या कोणत्याहि चिकित्सा पद्धतीनें हीनकस उठणार नाहींत. उंच जातींमध्ये खालपासून परमेश्वरी अंश वाढत जातो व वरपासून खाली सैतानी अंश वाढत जातो. ब्राह्मण समाज हा अत्यंत श्रेष्ठ, पवित्र असा समाज असल्यामुळें त्यांत पूर्ण ईश्वर आहे, म्हणूनच ब्राह्मणांना भूदेव हे आदरणीय नामाभिदान प्राप्त झाले आहे. समता ही जन्मप्राप्त ब्राह्मण्यावर पडलेली कुऱ्हाड आहे, ही कुऱ्हाड पडत असतां आज आपण एवढे तरी ब्राह्मण म्हणून जमूं शकलो याबद्दल अत्यानंद होत आहे. सद्गृहस्थ व सुगृहिणींनो ! नापसंतीदर्शक ठरावाला आपण मान्यता द्याल अशी मी आशा करतो. (टाळ्या) (खाली बसतात. पास झाला असे जाहीर करतात.)

यानंतर तिसरा ठराव मांडण्याकरतां श्री. आराध्ये हे उठतात.

श्री. आराध्ये म्हणाले, " प्रिय ज्ञाती-बांधवहो ! आपल्यापुढे मी अत्यंत महत्त्वाचा ठराव मांडणार आहे, त्याकडे आपण नीट लक्ष देऊन आपल्या भविष्यतेचा विचार शांत मनानें केला पाहिजे.

ठराव ३ रा

" ब्राह्मण समाजातील शेंकडा नव्वद कुमारी ब्राह्मणेतरांशी मिश्रविवाह करीत असल्यामुळें ब्राह्मण समाजाचा झपाट्यानें ऱ्हास होत आहे; ब्राह्मणेतरांनीच पास करून घेतलेला मिश्रविवाहाचा कायदा बंद करून ब्राह्मणकुमारीशी विवाह करणाऱ्या अतिप्रसंगी ब्राह्मणेतर तरुणाला गुन्हेगार ठरवला जावा अशी ही सभा सरकारास आग्रहाची विनंती करीत आहे ". असा ठराव मांडण्याची मजकडे कामगिरी आली आहे. या ठरावासंबंधी बोलतांना अगोदर इतर थोड्या गोष्टींचा ऊहापोह केला पाहिजे. आज सबंध हिंदुस्तानांत अवघे लाख ब्राह्मण आहेत. त्यांत ८० हजार पुरुष व २० हजार स्त्रिया. वीस हजार स्त्रियांपैकी १५ हजार विधवा, ३ हजार सवाशिनी व १ हजार कुमारी. म्हणजे कायदेशीर कौटुंबिक सुख घेणारी ब्राह्मण कुटुंबें सबंध देशात अवघी तीन हजार आहेत आणि पुढच्या दहा वर्षांत आहे अशीच स्थिती टिकली तर एक हजार वाढतील. हे आकडे

मी १९४९ सालच्या खास ब्राह्मणांनी नेमलेल्या खानेसुमार कमिटीने प्रसिद्ध केलेले आकडे सांगत आहे. समाधानाची गोष्ट एवढीच आहे, एकंदर पंधरा हजार विधवांत अवघ्या ६ केशवपन केलेल्या विधवा आहेत. त्याही ८० वर्षांवरील वयाच्या असल्यामुळें वजा करून हिशोबाची तोंडमिळवणी होण्यासारखी आहे. असतु. ह्या ऱ्हासाचे कारण आणखी एक असें आहे. ब्राह्मण अल्पायुषीही फार होऊं लागले आहेत. स्त्री-समाज मात्र अजून सरासरी ५० वर्षे टिकतो. त्यामुळें एक-एक, दोन-दोन पुनर्विवाह होऊन सुद्धां विधवांची संख्या फुगतच आहे. दुसरा एक मोठा अडथळा मिश्र–विवाहाचा. ब्राह्मण पुरुषानें मिश्रविवाह केला तर फक्त तोच ब्राह्मण राहातो पण त्याची मुलेंबाळे ब्राह्मणेतर ठरतात आणि ज्या ब्राह्मण कुमारी मिश्रविवाह करतात, त्या तर कायमच्या ब्राह्मणेतर होतात. प्रौढविवाह आणि अल्पायुष्यामुळे कोणतेहि ब्राह्मण दांपत्य सरासरी दहा वर्षे संसारसुख उपभोगितें. त्यामुळें पुनर्विवाहाचें पाविऱ्य नष्ट होऊन अनेक पुनर्विवाहांना जोर लागला आहे. तरी माझे सुज्ञ ज्ञातिबांधवहो, मिश्रविवाहाला आळा घाला. आपल्या पूर्वजांनीं जे ज्ञातिनिर्बंध घातले ते किती दूरदर्शीपणाचे होते हे आज प्रत्ययाला येत आहे. पांच-पंचवीस वर्षांत हेच निर्बंध शिथिल झाल्याबरोबर अवदसा आपल्याला प्राप्त झाली आहे. पुढें स्वराज्य मिळाल्यावर आपले याहून हाल होतील. तरी परकीय सरकार आहे तोपर्यंत असले निर्बंध कायदेशीर ठरवून घेतले पाहिजेत. तेव्हा आपण या ठरावास संमति द्याच अशीं हात जोडून मी विनंती करून खाली बसतो. (टाळ्या.) या ठरावाला रा. बचंभट बाइलबुद्धे यांनी अनुमोदन दिले. या ठरावाला विरोध करण्याकरता कुमारी प्रेमाबाई शृंगारे म्हणाल्या,

"बंधूंनो, भगिनींनो! हा ठराव स्त्रियांच्या नैसर्गिक प्रेमावर गदा आणणारा आहे. मिश्रविवाह प्रेमामुळे होतात. ब्राह्मणेतरांवर ब्राह्मण कुमारींचे प्रेम बसूं लागले याचा दोष ब्राह्मण पुरुषवर्गाकिडे (सभेत हुशहुश होते). १९१९ साली मिश्रविवाहाला ब्राह्मण कुमारींनी संमति दिली होती, त्यांत त्यांचा छळ झाला; पण आता असा छळ आम्ही होऊ देणार नाहीं. ज्या प्रेमाला जात नडते ते प्रेम जातवान नसते. प्रेम हा स्त्रियांचा आत्मा किंवा स्त्रीत्वच आहे. प्रेमविरहीत स्त्री जाखीण होय. ब्राह्मण पुरुषावर प्रेम लागण्यासारखे ब्राह्मण पुरुष राहिलेच नाहींत; जे आहेत ते मिश्रविवाहाने ब्राह्मणेतरात तद्रूप झालेत. जे खरे पुरुष आहेत ते मिश्रविवाहित होऊन ब्राह्मणेतरांत समरूप होऊन गेलेत; हल्लींचे ब्राह्मण पुरुष म्हणजे निव्वळ मिशावाल्या बायका आहेत.

(शेम शेमचा गोंधळ होतो.)

ब्राह्मणेतरांच्या लाथा खात पळणारे ब्राह्मणवीर इथे बायकांच्या पुढे गोंधळ घालूं पाहतील तर इथें सुद्धा त्यांना जरासा वेगळाच अनुभव येईल.

अध्यक्ष : हा जरासा वादग्रस्त प्रश्न दिसतो आहे. येथें पुरुषांची बायकाशी

मारामारी होऊं नये म्हणून या प्रश्नाचा विचार करण्याकरतां एक कमेटी नेमावी अशी मी सूचना करतो. (मंजूर)

प्रो. पोकळकाष्टे : (व्यासपीठावर चढून) म्हणाले, " बंधुभगिनींनो ! आपण वादग्रस्त मुद्दे सोडूनच देऊ. सध्या आहो यातसुद्धां दुफळ्या चिरफळ्या नकोत. यापुढला ठराव मी मांडतो.

ठराव ४ था

" ब्राह्मण पत्नीनें ब्राह्मण नवऱ्याला बेदम मारल्याचे अनेक खटले कोर्टांत येऊ लागलेत तेव्हां ब्राह्मण पत्नीपासून ब्राह्मण पतीचें संरक्षण करणारा सरकारनें कायदा करावा असें या सभेचें मत आहे आणि असले खटले युरोपियन किंवा ब्राह्मण न्यायाधीशापुढेंच चालावेत असेहि सभेचे ठासून सांगणें आहे. " बंधुहो ! हा ठराव फार महत्त्वाचा आहे; परवा परांजपे शास्त्र्यांच्या मुलीनें तिच्या नवऱ्याला बेदम मारले; केळकरांच्या सुनेनें त्यांच्या मुलाला विष घातले, सान्यांच्या पुतणीनें तर नवऱ्यानें स्वयंपाक केलाच पाहिजे असा हट्ट धरून तिनें नवऱ्याला जाच सुरू केला आहे. पूर्वी सुनांना सासवा जाच करीत होत्या, आता जावयांना छळू लागल्या आहेत; असले खटले रोज कोर्टात येत आहेत. वर्तमानपत्रे " ब्राह्मणी संस्कृतीचा ओंफस " अशीं हेडींगें देऊन ते छापीत आहेत. कोर्टापुढें या स्त्रियांना आंतून ब्राह्मणेतर सहाय्य असतात व त्याहि त्यांच्यावर फिदा असतात असे पुरावे येऊन ब्राह्मणजातीची अब्रू धडाधड पेटते आहे इकडे लक्ष द्या ! आपल्या स्त्रीवर्गाची स्थिति या सुधारणेच्या नांवाखाली अत्यंत अवनत झाली आहे. युरोपिअनांच्या अंधानुकरणाने ब्राह्मण स्त्रिया सिगारेट ओढू लागल्या आहेत; नाटक कंपन्यांतील स्त्री-पार्टी ब्राह्मणाच्या मुली, न्हाव्याच्या सलूनमध्यें दाढी करायला राहिलेल्या ब्राह्मणांच्या मुली, सांगण्यास मोठी लज्जा वाटते, दुःख होते. अहो २५ वर्षांपूर्वी एकहि ब्राह्मण कलावंतीण नव्हती. पण आतां झाडून सारी बावनखाणी निव्वळ ब्राह्मण स्त्रियांनी गजबजून गेली आहे. एका ब्राह्मणी वेश्येनें तर पेशवे कुळांतील कुलवंत कलावंतीण अशी दारावर पाटी लावली आहे. शिव शिव ! अगदी जीव द्यावासा वाटतो पाहा. मराठ्यांच्या येथें तर ब्राह्मण स्त्रियांशिवाय दुसऱ्या जातीच्या दासीच नाहीं ! काय हे उलट झाले पहा ! " कुणबीन " याचा अर्थ मागे दासी होता. याचा सूड उगवण्याकरता " भटीण " म्हणजे वेश्या असा म्हणण्याचा ब्राह्मणेतर प्रघात पाडीत आहेत; नव्हे पूर्णपणे पाडला आणि आमच्या ब्राह्मण स्त्रियांसुद्धां " भटणींचा जंगी जलसा " यांत " भटीण सुभद्रा इचा समईचा नाच होईल " अशा पाट्या लावून थेटरं पूजित आहेत ! अरे ज्या तुम्हां लोकांच्या पायावर एकवेळ सारें जग डोकें घाशीत होते ते तुम्हीं असे निसुरे कसे बनलात ? पहिल्या प्रथम हा पतिसंरक्षक कायदा करून पुन्हां स्त्रियांना ताळ्यावर आणायला सुरुवात करा ! सुरुवात करा बंधुहो ! हा ठराव पास करा, पास करा.—(या ठरावाला अनुमोदन मिळून ठराव पास होतो.)

ठराव ५ वा

" जोंपर्यंत भूतलावर माती आहे, तेथपर्यंत जाति टिकल्याच पाहिजेत. निदान ब्राह्मण जात टिकलीच पाहिजे. कोणतीहि जात टिकण्याकरता तीत सतेज संतति उत्पन्न व्हावी लागते; तेव्हा अशी उत्पन्न होण्याकरिता एक कमेटी नेमावी व कमेटीमार्फत आज झालेले सर्व विजोड, विषम, बेढब विवाह रद्द करून पुन्हां नव्या जोड्या जमवून त्यांची पुन्हा लग्ने लावावीत. हें ज्या जोडप्याला मान्य नसेल त्यांना बहिष्कृत करावे; व ज्या कुमारी असतील त्यांना समाजानें सार्वजनिक फंडातून शिष्यवृत्त्या देऊन सुप्रजाजनन-शास्त्राचा अभ्यास करण्याकरिता विलायतेस पाठवाव्यात. हा ठराव मांडताना भले बहादुर भोपटकर म्हणाले—सध्याच्या पडत्या काळांतहि आपण जगून निघाले पाहिजेच; ह्या ठरावात चमत्कारिक असें कांहींच नाहीं. ज्या ब्राह्मणांनीं गौतम बुद्धाला देशोधडी लावले; भागवत धर्माला चिरडले, त्याच ब्राह्मणावरचा सत्यशोधकांचा पगडा उघडा करावयाचा असेल तर लाजलज्जा सोडून आपण टक्कर दिली पाहिजे. ब्राह्मणेतर शक्तिमान व बहुसंख्य म्हणून त्यांची टुरटुर चाललेली असते. आपण बहुसंख्य न होता नुसते शक्तिमान जरी बनलो तरी यांची टुरकुस आपण चालूं देणार नाही. धडधाकट ब्राह्मण तरुण तरुणींचे योग्य विवाह लागले तरच धडधाकट संतति होईल, पण आज पहावे तों एखाद्या क्षयरोग्याच्या गळ्यात एखादी महिषासुरमर्दिनी तर एखाद्या जखड माकडाच्या गळ्यांत खुबसुरत फक्कड पडलेली दिसून येत आहे. हे सर्व विवाह मोडून टाका. त्यांना जरी मुलं झाली असली तरी त्यांची पर्वा करू नका आणि पुन्हां नवी लग्नें लावून द्या ! हे पहा त्यांत कांहीं वाईट नाहीं. ब्राह्मण स्त्रीनें ब्राह्मणाशी व्यभिचार केला तरी चालेल पण ब्राह्मणेतर पुरुषांची सावली घेता कामा नये असे माझें मत आहे. ही सुधारणा झालीच पाहिजे. ज्या कुमारी सुप्रजाजननशास्त्राच्या अभ्यासाकरतां विलायतेस पाठवावयाच्या त्यांच्याकडेसुद्धां आपण निराळ्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. एखाद्या कुमारीनें सप्रयोग शिक्षण घेतलें तरी आपण संपादून घेतले पाहिजे. संतति धष्टपुष्ट पाहिजे, व तिनें पुढें ब्राह्मणेतरांवर ताण केली पाहिजे हा आपला मुख्य उद्देश; मग ती संतति कोणापासून कां होईना, त्यानें ब्राह्मण जात सांगून जातीचा अभिमान धरला म्हणजे संपले. हल्लीच्या ब्राह्मण पुरुषांत तरी ज्यांना उत्तम संतती होईल असे पुरुष फार थोडे आहेत, तेव्हां शक्य तितक्या कुमारी मूल परत घेवून येण्याच्या अटीवर परदेशात पाठवाव्यात, जी कुमारी सर्वांत जास्त मुलें घेऊन येईल तिला जास्त मान दिला पाहिजे. बंधू हो ! लढाईत दुसऱ्याची मदत घ्यावी लागते. ब्राह्मण–ब्राह्मणेतर युद्धांत ब्राह्मणांची संख्या जर कमी होऊ लागली आहे तर ती भल्याबुऱ्या उपायांनीं वाढवावयाला नको काय ? बरें यांत आता नवीन कांहीं नाहीं. असले प्रकार आपल्या रोजच्या सवयीनें झाले आहेत; फंड उभारा आणि बौद्धिक शिक्षण देण्याऐवजी ब्राह्मण मुलांमुलींना प्रजाजननशास्त्राचे शिक्षण द्या ! असा माझा ठराव आहे तो सर्वानुमतें मंजूर व्हावा. (अनुमोदन मिळून ठराव पास होतो.)

ठराव ६ वा

" ब्राह्मण जातीचे संख्याबल वाढावे म्हणून ज्या दांपत्यास लग्न झाल्यापासून पांच वर्षे मूल-बाळ होणार नाहीं त्याचें लग्न रद्द ठरवावें व त्या दोघांची निराळी सोय लावून द्यावी असे या सभेला वाटते. " ह्या ठरावावर बोलतांना निवडणूक पत्राचे संपादक म्हणाले—

" कौन्सिले, म्युनिसिपालिट्या यांच्या निवडणुकी लढवण्याकरता आपल्याला ब्राम्हण जातीची संख्या वाढविली पाहिजे, याबद्दल दुमत नाहीं; तेव्हां हा ठराव आपण पास कराल अशी आशा बाळगतो. "

(ठराव मंजूर होतो.)

ठराव ७ वा

" ज्या ब्राम्हण कुमारींनी आजपर्यंत मिश्रविवाह केले आहेत त्यांपैकी ज्यांनीं खास इंग्रजांशी विवाह केलेत त्याबद्दल समाधान मानून हा समाज आपली राजनिष्ठा व्यक्त करीत आहे. " प्रो. दूरदर्शी म्हणाले—

" आपल्याला आता अँग्लो ब्राम्हण युनिटी केलीच पाहिजे, तर जगता येईल आणि ही युनिटी घट्ट करावयाला शरीरसंबंध व्हावे लागतात. तेव्हां थोडीशी तोशीस सोसणे आपल्याला अडचणीचे नाहीं. तेव्हां हा ठराव पास करा "—

(मंजूर.)

ठराव ८ वा

" चित्पावन मूळचे इराणी आहेत असें सत्यशोधक म्हणत असतात. त्या आधारावरून इराणच्या गादीवर एखादा पेशव्यांचा वारस बसवावा व त्याच्या मोबदला महाराष्ट्रांत ब्राह्मणांनी आपल्या हॉटेलच्या धंद्याची मोनॉपोली इराण्यांस द्यावी. " या ठरावावर पेशवे हॉटेलवाले म्हणाले– " असे एखादे राज्य आपण पाठीशी घातले पाहिजे, मी पेशव्यांचा वंशज आहे व मलाहि हॉटेलचा कंटाळा आला आहे. ठराव पास करा— "

(मंजूर.)

ठराव ९ वा

" ब्राम्हण समाजाच्या ताब्यांतून सर्व देवस्थानें गेल्यामुळें भटपुजारी बेकार झाले आहे तरी सरकारनें आपल्या खर्चानें लॉर्ड क्राईव्हपासून तो आजच्या गव्हर्नरापर्यंत सर्वांची देवळे बांधून पुजाऱ्याची सोय लावावी. त्यातील मूर्तीस शिवण्याची ब्राम्हणेतरांना सक्त मनाई असावी. "

ठराव १० वा

"अल्पसंख्याकांचे संरक्षण म्हणून ज्या मराठ्याला दोनपेक्षा जास्त मुले होतील, त्यावर मुलामागे कर बसवावा व या जादा मुलांना मताचा अधिकार व शेकडा ८० स्त्री-पुरुषांना सक्तीने अविवाहित ठेवावे. ब्राम्हणांची व मराठ्यांची संख्या बरोबरीला येईपर्यंतच हे नियम लागू करावेत असें या सभेचें मत आहे."

ठराव ११ वा

"रेल्वेतून ब्राम्हणांना ब्राम्हणेतरांच्या दंडेली वर्तनामुळे अत्यंत हाल भोगावे लागतात म्हणून ब्राम्हणांकरतां स्पेशल डबे जोडावेत. या डब्यांत येऊनही ब्राम्हणेतर दांडगाई करतील म्हणुन ते डबे माणसांच्या गाडीस न जुंपता मालगाडीस लावावेत असें या सभेस वाटतें."

ठराव १२ वा

"आराडी, हिझडा, नामर्द, नेभळट व ब्राह्मण हे एकाच अर्थाचे शब्द होत चालल्यामुळे वरील शब्दांचे सक्तीनें अर्थ फिरवावेत."

ठराव १३ वा

"×××× गांवी एकशेदहा ब्राह्मण, माथेफिरू ब्राह्मणेतरांनीं घरांत कोंडून जाळले अशी बातमी आली आहे, त्याबद्दल या सभेस दुःख होत आहे. त्यांच्या एकशें-दहा विधवांनी पुनर्विवाह लावून जातीचे संख्याबल वाढविण्यास पुन्हा पहिल्याच उमेदीनें मदत करावी अशी त्यांस ही सभा विनंती करीत आहे."

ठराव १४ वा

"हौद, पाणवठे व नळ वगैरे ठिकाणी ब्राह्मण पुरुषास मराठ्याच्या बाया मारहाण करतात; म्हणून ब्राम्हणाकरता निराळे हौद बांधावेत किंवा ज्या ब्राम्हणाला हौदावर जावें लागते त्याचा विमा सरकारनें उतरावा व प्रीमीयमचे पैसे अशा मारक्या मराठ्यांच्या बायांकडून वसूल करावेत."

ठराव १५ वा

"ब्राम्हणाला सहस्र भोजनात गोमांसाखेरीज कोणतेहि मांस वर्ज्य नसावे."

ठराव १६ वा

"वेश्यांची वस्ती गावांतून उठवण्याबद्दल एक बील आलें आहे, त्याचा ही सभा निषेध करते. वेश्यांचा धंदा देवादिकांपासून आला आहे अर्थात् तो सनातन आहे.

त्यात सरकारला हात घालता येत नाही. त्यांतून शें. ९९ टक्के ब्राम्हण जातीच्या वेश्या आहेत तेव्हा सरकारनें त्यांची उपासमार होईल असे अन्यायी बील पास झाले तरी अमलांत आणू नये असे या सभेचे मत आहे."

ठराव १७ वा

"८० हजार पुरुष व २० हजार स्त्रिया अशी ब्राम्हणांची कष्टप्रद स्थिती असल्यामुळे व इतर जातींशी विवाह केल्यामुळे जात बिघडते; म्हणून जात राखण्यासाठी तरी प्रत्येक स्त्रीने वयाच्या ४० वर्षापर्यंत ५ वर्षाच्या अंतराने चार लग्ने करावी. म्हणजे सर्वांना संसार-सुख मिळून समाजात समाधान नांदेल. यांत बाप, भाऊ याखेरीज सर्व पुरुष पति होण्यास लायक समजावेत." या ठरावावर बोलताना गुंडोशास्त्री म्हणाले— "स्त्री हे धन आहे असा आपला पौराणिक समज आहे."

"ज्या भोग्य वस्तु आहेत त्यांचा सर्वांना सारखा उपयोग झाला पाहिजे. बोल्शेव्हीक तरी काय हेंच म्हणतात. एक तीळ सात भावाने वाटून खाल्ला पाहिजे. जर विवाहाला वधू मिळत नसेल तर कोणताहि तरुण या युगांत जात सांभाळीत बसणार नाही. आपल्याला जात सांभाळायची आहे तेव्हा आपण ही सोय केलीच पाहिजे; कारण ते ब्राह्मणेतर कुमारीशी विवाह करून आपलेच शत्रु होतील; अतएव छाटणे हें बेकायदेशीर असल्यामुळें गव्हर्नरसारखा दर पांच वर्षाला घराचा गव्हर्नर बदलावा व म्हाताऱ्यांना पहिली पाळी द्यावी. नाहीतर ते तोपर्यंत खुडूक होऊन जायचे. आपण या ८० हजार पांडवांच्या २० हजार द्रौपदी आहेत. एवढ्या भांडवलावर आपण जगावयाचे आहे. जात संभाळा, जात संभाळण्याकरता नीति-अनीति, सत्य-असत्य आपल्या पूर्वजांनीहि पाहिले नाहीं व आपणहि पाहता कामा नये. शिवाय या सोयीमुळे विधवा औषधालासुद्धां सांपडणार नाहीं."

अशा आशयांचे ठराव पास झाल्यावर अध्यक्ष रा. ब. कटनाके समारोपाचे दोन शब्द बोलावयास उठले. त्याचा सारांश. अध्यक्ष म्हणाले— "१९२६ साली ब्राह्मणेतरा-संबंधी कौन्सिलात कशा मौजा उडतील असले एक भविष्य एका विद्वान माणसाने केले होते व त्याला उत्तर म्हणून एका ठोकताळ्यानेंहि दुसरे भविष्य कथिले होते. सांगावयास मोठें दुःख होतें की आजपर्यंत ब्राह्मणेतर जे जे म्हणत आले तसतसें ब्राह्मणाचे होत गेले. अस्तु. सध्यां प्रश्न असा आहे की अल्पसंख्याक ब्राह्मणांनी जगावयाचे कसे? या परिषदेमध्ये निरनिराळे ठराव पास झालेत पण यापेक्षाहि आपल्या हातून कृति व्हावयाला पाहिजे. ती नुसत्या ठरावाने होत नाहीं. हल्ली पूर्वीच्या कल्पनेप्रमाणे आपली नीति बिघडली असे ठरण्याचा संभव आहे. त्याकरतां अनीतीलाच नीति ठरवणारे ग्रंथ आपण पैदा केले पाहिजेत. पातिव्रत्य व एकपत्निव्रत या दोन गोष्टींची ज्या समाजाला चाड नसते, तो समाज कोठेहि व कितीहि शतके कायम टिकतो;

लग्नविधी मात्र जातीशीच झाला पाहिजे आणि मुलांनाहि तीच जात लावली पाहिजे. एवढ्या दोन गोष्टी जात टिकवायला बस्स होतात. सध्यां जात राखणें हेंच आपलें काम आहे. या ध्येयाकडे लक्ष देऊन ब्राह्मण पतिपत्नींनी लग्नाखेरीज एकमेकांच्या खासगी वर्तनाची कधीच चौकशी करूं नये. म्हणजे आहे ती तरी ब्राह्मण संख्या कायम टिकेल असे मला वाटते. दुसरे, कुमारींनी मिश्रविवाह लावू नये. यावद्दलहि एक खबरदारी घेता येण्यासारखी आहे. ज्या कुमारी अशा जातिभ्रष्ट होण्याच्या पंथाला लागतील त्यांना तशा जातिभ्रष्ट होऊन आपल्या ब्राह्मणेतर शत्रूचे बळ वाढविण्यापेक्षां त्या जास्त विघडून वेश्या बनल्या तरी बेहेत्तर, असा करारी निर्धार करून जातीची अब्रू राखली पाहिजे. जात राखून ब्राह्मण स्त्री-पुरुषानें हवे तर दिवसाढवळ्या ढालगज गमजा कराव्यात; पण जात सोडून झालेले लग्न आम्हाला इष्ट नाही. तिसरे एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे या काली ब्राह्मणांची संख्या वाढली पाहिजे याबद्दल आपण काय तजवीज करावी हे मी सुचवितो. रक्तपित, आंधळे, पांगळे, बहिरे, मुके वगैरे पंगु व हिझडे, आरादी वगैरे बेकार भिकारी यांना गांठून त्यांना ब्राह्मण जात लावावयास लावावे व त्यांचे नांव मतदारांच्या यादीत घालण्याची आटोकाट खटपट करावी. हिझडे आपल्या फार उपयोगी पडतील; ते आपल्या मुलींना मिश्रविवाह करून पळवतील ही भीति तर नाहीच पण ते स्वतःसुद्धा कोठे सहसा पळणार नाहीत. ही बाटवाबाटवी मात्र अगदी गुपचुप व्हावी. आपल्या ब्राह्मणींनी कलावंतणी आहेत त्याचाहि या कामी उपयोग होईल. त्यांनी आपले मोहिनी अस्त्र फेकून जे पैसे काढलेले असतात त्याचा फंड म्हणून ज्ञातिकार्याकडे करावा. चौथे आपलें एक ध्येय असें आहे की ब्राह्मण संतति बलिष्ठ निपजायला पाहिजे; मनुष्य हाहि एक द्विपाद प्राणीच आहे. चतुष्पाद प्राण्यांत एखादी अवलाद उत्तम पाहिजे असल्यास आपण जसे वळू व कालवडी यांचे प्रयोग करतो, तसें ब्राह्मणाचे प्रयोग करविले पाहिजेत. मला वाटते या कामाकरता ब्राह्मण स्त्री-पुरुषांतून स्वयंसेवकाची वाण पडणार नाही. त्या पुरातन काळच्या नीति-अनीतीच्या वल्गना आतां करण्यात काही अर्थ नाहीं. आपण ब्राह्मण आहोत. आपण सांगू ती नीति. 'अनंगदान' ही ज्यांनीं एके वेळीं जाहीर नीति ठरवली त्या भूदेवांना हे प्रयोगसुद्धां नीतिमान ठरवितां येतील. बरें आपण असले एखादे पुस्तक लिहिले तर ते बेकायदेशीर ठरूं नये म्हणून त्याला पुराण हे नांव द्यावे! पुराणात रंगबाजीच्या लावण्या असल्या तरी त्या कायदेशीर ठरतात पण इतर पुस्तकांत पुराणांना बीभत्स म्हणणेसुद्धा गुन्हा ठरणार आहे; आपण दुसऱ्याने घालून दिलेले धडे गिरवायचे नाहीत. आपण सांगू ती नीति, धर्म व देव अशा आत्मविश्वासानें आपण हे कार्य शिरावर घ्यावे अशी मी सर्व बंधु-भगिनींना विनंती करीत आहे. आपण आपले कर्तव्य बजावीत असता आपल्याला कोणी हसले तरी आपण त्याकडे लक्ष देता कामा नये. कांहीं ब्राह्मणांच्या मुली मराठ्यांच्या येथें भांडी घासायला राहू लागल्या आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. भट व भटीण म्हणजे स्वयंपाकी व मोलकरीण असा अर्थ होऊं पहात आहे. तेव्हा माझ्या भटीण भगिनींनी हवे तर बावनखणीचा रस्ता पत्करावा; पण


मराठ्यांच्या घरची भांडी घासू नयेत. जातां जातां शेवटची एक विनंती करावयाची आहे ती अशी कीं, आपण ठराव पास केले व अंमलांत आणले तरीही जर ब्राम्हणांच्या मुली ब्राम्हणेतरांच्याच गळी पडू लागल्या तर केशवपन या आपल्या जुन्या चालीत तरी सुधारणा करून, सवाष्ण, विधवा अगर कुंवर या सर्वांनी केस खरडून टाकायची चाल पाडू म्हणजे त्या विद्रूप दिसूं लागतील व त्यामुळे तरी त्या आपल्या जातीत राहून जात टिकेल. असतु. आपला फार वेळ घेत नाही. पुनः पुन्हा सांगितलेले ध्यानांत ठेवा अशी विनंती करून मी आपली रजा घेतो."

हें पुस्तक रा. दिनकरराव शंकरराव जवळकर यांनी "प्रताप प्रेस"
६१८ शुक्रवार, पुणें येथें छापून
प्रसिद्ध केले.

◇◇◇



जेधे-जवळकर



जेधे-जवळकर

प्रस्तावना

हें पुस्तक प्रकाशित करण्याची सुसंधि मला मिळाली ही खरोखरच आनंदाची गोष्ट होय. श्री. **जेधे-जवळकर** ह्यांपैकीं श्री. **जेधे** ह्यांची आणि माझी ओळख फार पूर्वीची नाहीं आणि जी झाली तीही श्री. **जवळकर** ह्यांनींच करून दिली. श्री. **जवळकर** ह्यांची ओळख मात्र फार वर्षांपासूनची आहे. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे ही ओळख झाल्यापासून दोघांवरतीहि निरनिराळे प्रसंग आले आणि त्यांपैकीं कांहीं असे आले कीं ज्यांत पाताळाचें तारूं अस्मानांत आणि अस्मानाचें तारूं पाताळांत गेलें. पण ह्या सर्व वादळांतून ती ओळख कायम राहिली-वाढीला लागली-अकृत्रिम स्नेहांत रूपान्तर पावली. हें रूपान्तर नक्की कधीं झालें हें ठरवितां यायचें नाहीं. कोणत्या घुसळण्यास ताकाचें लोणी व्हायला लागतें ह्यांतलाच हा प्रश्न आहे-पण परिस्थितीच्या घुसळण्यांनीं आमची ओळख तुटली नाहीं हीच काय ती महत्त्वाची गोष्ट आहे. ती वाढतच गेली व तिला खरोखरच ताज्या शुद्ध लोण्याचें रुचकर स्वरूप आलें. दुर्दैवानें माझे आणि रा. रा. **जवळकर** ह्यांचे कार्यपरिघ निराळे आहेत आणि ते असे आहेत कीं, त्यांत अगदीं परस्पर विरुद्ध गोष्टी चाललेल्या असतात. लो. **टिळक** ह्यांचेवर अलोट प्रीति व भक्ति हा माझ्या आयुष्यपरिघाचा मुख्य विषय आहे. त्यांच्याशीं झालेल्या घनघोर रणसंग्रामानें त्या प्रीतीची व भक्तीची एक वीट देखील ढांसळली नाहीं. जवळकर हे ह्याच्या अगदी विरुद्ध वातावरणांत वावरत असतात. **टिळक** हे नांव तिथें अगदी वावडें असतें ! तें किती वावडें असतें हें सांगायला नकोच ! **देशाचे दुष्मन्** हें पुस्तक लिहिणारे रा. रा. **जवळकर**च होत एवढी आठवण दिली म्हणजे टिळकप्रेमाच्या अंशाचाहि बुणी आरोप करील असें वाटत नाही.

परंतु कार्याचे परिघ इतके विरुद्ध असतांहि रा. रा. **जवळकरांचें** आणि माझें सख्य टिकून राहिलें आहे. एवढेंच नव्हें तें सख्य वाढतें आहे-घटतें नाहीं. माझी बालंबाल खात्री आहे कीं माझेवर बरावाईट प्रसंग आल्यास रा. रा. **जवळकर** ह्यांच्या डोळ्यांत

चटकन् पाणी येईल. माझ्यावर ते अंतःकरणपूर्वक प्रेम करणारे आहेत–आणि त्याचें कारण असें कीं त्यांना अंतःकरण आहे. **सत्यशोधक** समाज किंवा इतर समाज, **सत्यशोधक** चळवळी किंवा इतर चळवळी; ह्यांच्यांत आज शेंकडों, हजारों, लोक वावरत आहेत. पण त्यांत अंतःकरणाचीं माणसें थोडीं आहेत. कांहीं लोक तर खरोखर असे सांपडतील कीं ज्यांना अंतःकरणच नाहीं. अंतःकरण नसतांना चळवळ सुरू झाली म्हणणे तिला यश येत नाहीं. जवळकरांसारखें अंतःकरण त्यांत ओता म्हणजे यशाला कांहीं तोटा नाही.

अंतःकरण हा **जवळकरांचा** मोठा गुण आहे. किंबहुना **जवळकर** हे अंतःकरण आहेत. त्यांच्या शरीराचा बांधा–त्यांची बुद्धि–त्यांची कल्पकता–छे, त्यांचें अंतःकरण वघितलें म्हणजे ह्यांपैकीं कशाकडेहि लक्ष्य जात नाहीं. असें वाटतें कीं ते अंतःकरणाचे केलेले आहेत–अंतःकरणाचे बनविलेले आहेत. ते बोलतात ते त्यांचे बोल नसून त्यांचें अंतःकरण बोलत असतें–तें चालतात तो त्यांचा देह चालत नसून त्यांचें अंतःकरण चालत असतें. अंतःकरणाचा एवढा माणूस दुसरा क्वचित् असेल आणि म्हणूनच त्यांचेकडे अंतःकरण ओढतें. ज्याला मन म्हणून आहे तो त्यांच्यापुढें विरघळतो. त्यांच्या अंतःकरणाचा हा परिणाम एवढाच होत नसून फार पुढें जातो. रा. रा. **जवळकर** हे **सत्यशोधक** चळवळीला मिळाल्यापासून ती फार वाढली ही गोष्ट सर्वांस माहीतच आहे. जर कुणाला असें वाटलें असेल कीं, कै. श्री. **शाहुमहाराज** ह्यांचा आधार होता तोपर्यंतच रा. रा. **जवळकर** ह्यांची फुशारकी होती तर तोही भ्रम आतां गेला असला पाहिजे. कारण रा. रा. **जवळकर** हे खरे प्रसिद्धीस आले ते शाहुमहाराजांच्या स्वर्गवासानंतरच आले. शाहुमहाराजांच्या नंतरच त्यांची खरी चळवळ झाली. शाहुमहाराज होते तोंपर्यंत **सत्यशोधक** चळवळीचें केंद्र पुण्यास नव्हतें. तें कोल्हापुरांत होतें. पण पुण्यांतली त्यानंतरची दंगल जवळकरांच्यामुळेंच उद्भवली. जवळकरांनींच एकामागून एक नवीं पुस्तकें काढून सरकारला दमविलें. सत्यशोधक समाजाचे लाख अनुयायी करण्याची महत्त्वाकांक्षी कल्पना जवळकरांचीच आहे व सत्यशोधक समाजाचे दौऱ्यामागून दौरे जे निघाले त्यांत व्याख्यानांचा पाऊस जर कोणी पाडला असेल तर तो जवळकरांनींच पाडला.

ह्या सर्वांस कारण जवळकरांचें अंतःकरण ! जवळकरांचें अंतःकरण फार तीव्र आहे–फार चपळ आहे–फार कळवळणारें आहे–फार जळजळीत आहे. त्यांस अंतःकरण हा एकच देह आहे. त्यांना दुसरा देह नाहीं. त्यामुळें आज सत्यशोधक चळवळ ही चळवळ राहिलेली नसून हें अंतःकरण झालेलें आहे. **सत्यशोधक** चळवळीचें तें पूर्वीचें रूप गेलें. आतां डाळिंबीच्या दाण्यासारखीं टवटवीत तरुण माणसें सत्यशोधक चळवळींत जवळकरांच्या आसपास वघितलीं म्हणजे कौतुक वाटायला लागतें. मनुष्य सत्यशोधक समाजाच्या कितीहि विरुद्ध असला तरी त्याची कुतूहलबुद्धि जागृत होते.

अगदीं सुरवातीपासून **सत्यशोधक** चळवळीचा इतिहास घेतला तरीहि असें दिसून येतें कीं सत्यशोधक चळवळ म्हणजे फक्त अंतःकरण आहे. ज्या वेळीं कै. जोतिबा फुल्यांनीं ती काढली त्या वेळीं तिला कोणतें बळ होतें? तिला काय त्या वेळीं **शाहुमहाराजां**प्रमाणें राजाश्रय होता कीं **भास्करराव जाधवां**प्रमाणें बुद्धीचा पाठिंबा होता कीं मद्रास ब्राह्मणेतरांप्रमाणें विस्ताराचा आधार होता? गरीब बिचारा जोतिबा व त्याचे गरीब बिचारे भक्त ही चळवळ कशीतरी धडपड करून चालवीत होते. त्यांना कुणी विचारीत नव्हते व तेहि कुणाला विचारीत नव्हते. त्या वेळीं अंतःकरणाचें बळ हें एकच बळ ह्या चळवळीला होतें. ह्या बळावर ती टिकली, ह्या बळावर ती जिवंत राहिली.

जोतिबांचे नंतर जिव्हाळ्याच्या कांहीं लोकांनीं ही चळवळ कांहीं दिवस चालविली. पण पुढें कांहीं काळ असा आला कीं ज्या वेळी हा जिव्हाळ्याचा ओघ तुटला. सत्यशोधक चळवळ अजिबाद बन्द झाल्याचा हा समय होय. सत्यशोधक चळवळीचें नांवदेखील ह्या अवधींत उरलेलें नव्हतें व ही चळवळ अजिबाद बुडाली असाच सर्वांचा समज होता. असा हा काळ सुमारें दहा किंवा पन्धरा वर्षांचा असावा. एखाद्या झोंपडींत किंवा एखाद्या लहानशा "हॉल"मध्यें त्या वेळीं जोतिबा फुल्यांचें तुणतुणें वाजवीत असेल तर कुणास ठाऊक! पण सररहा म्हणायचें म्हणजे कै. **आगरकर** ह्यांचें नांव ज्याप्रमाणें मध्यन्तरीं दहा-पन्धरा वर्षें अजिबाद बन्द झालेलें होतें त्याप्रमाणें कै. जोतिबा फुले ह्यांचेंहि नांव मध्यन्तरी नाहींसें होऊन गेलेलें होतें.

ह्या लाजिरवाण्या स्थितींतून सत्यशोधक चळवळ पुन्हां सुरू झाली ती श्री **शाहु** महाराजांच्या काळांत सुरू झाली. किंबहुना कारंजांत थोपवून धरलेलें पाणी ज्याप्रमाणें जास्त जोरानें वर उडायला लागतें त्याप्रमाणें मध्यन्तरींच्या दहा-पन्धरा वर्षांच्या विश्रान्तीनन्तर शाहुमहाराजांच्या प्रोत्साहनानें ती एकदम जोरानें फोंफावली. कोणी त्याला वावटळ म्हणायला लागले, कोणी त्याला टोळधाड म्हणायला लागले, कोणी त्यांना छापे आणि मोहिमी ह्यांचें रूप दिलें. एवढें खरें कीं ह्या काळांत ती एकदम जाणवूं लागली. सातारा प्रांतांत तर **सत्यशोधक** हा शब्द भीतिवाचक वाटायला लागला. **बोल्शेव्हिक** म्हणजे ज्याप्रमाणें अक्राळविक्राळ व भयानक व्यक्तीची मूर्ति आपणांपुढें उभी रहाते, त्याप्रमाणें ह्या काळांत **सत्यशोधक** मनुष्याविषयीं लोकांची कल्पना झाली. त्याला लोक भ्यायला लागले, वचकायला लागले.

पण ह्यांचेंहि कारण शाहुमहाराजांनीं ह्या चळवळींत अन्तःकरण ओतलें. शाहुमहाराज हे आंतल्या गांठीचे, पाताळयंत्री वळणाचे व वस्तादगिरींत मुरलेले असे मुत्सद्दी होते अशी अनेकांची समजूत आहे व शाहुमहाराजांविषयीं आदर असलेले लोकहि ही समजूत धारण करतात. पण त्यांस हें माहीत नाहीं कीं जिथें मुत्सद्देगिरीची सांचवणी असते तिथें अन्तःकरणाची पुष्करणी कोरडी ठणठणीत पडते. मुत्सद्देगिरी व अन्तःकरण ह्यांची संगति फारच क्वचित् असते. कै. शाहुमहाराज ह्याच थोड्या पुरुषांपैकीं होते. परंतु

एवढें खरें कीं राजर्षि शाहुमहाराजांची तुफानी मुत्सद्देगिरी आणि अंतःकरणाचा अथांग रत्नाकर या चळवळीला मिळाला नसता – राजर्षि शाहूसारखी प्रेमळ माऊली या चळवळीचे लाडकोड करावयाला लाभली नसती, राजर्षि शाहूसारखा मी मी म्हणणारांना चारीमुंडी चीत लोळवणारा बहाद्दर मुत्सद्दी या चळवळीला लाभला नसता; तर ही सत्य-शोधक चळवळ प्रार्थना समाजासारखी पंगू किंवा मवाळ सुधारकांसारखी एकलकोंडी बनली असती.

म. जोतिबांच्या वेळेस या चळवळीचा चोहोंकडून उपहासच होत होता. ज्या त्या विद्वानानें उठावें आणि फुल्यांचा उपहास करून आपली विद्वत्ता दाखवावी, ज्या त्या माणसानें उठावें आणि म्हणावें, " अरे, हे पहा वर्णसंकर करणारे, महाराच्या हातचें अन्न खाणारे ". ही निंदा, हा उपहास आज निंदा किंवा उपहास राहिला नाहीं. " मी कोणत्याहि मनुष्याच्या हातचें अन्न खाण्यास तयार आहें " असें पन्नास वर्षांपूर्वी गर्जून सांगणाऱ्या जोतिबांची त्या वेळच्या सर्व पत्रांनीं टवाळी केली. जोतिबांवर जेवढे वाक्प्रहार करतां येतील तेवढे केले. हे वाक्प्रहार करणारे व उपहास करणारे दुष्ट लोक होते असें समजण्याचें कारण नाहीं. जोतिबांच्या या कृत्याबद्दल त्यांना दोष देणारे जसे हजारों ब्राह्मण होते तसे हजारों ब्राह्मणेतरहि होते. हिंदु धर्माच्या भवितव्यतेचा विचार करून त्यांत पाहिजे त्याच सुधारणा सुचविण्याची दूरदृष्टि सगळ्याच सामान्य माणसांना फुटूं लागली तर मग जोतिबांना तरी जन्म घेण्याची काय जरूर होती ?

जोतिबा फुले ह्यांस खिस्ती म्हणणारे अजूनहि कांहीं लोक आढळतात. खरोखरच मला जर कोणत्याहि गोष्टीबद्दल अत्यन्त दुःख होत असेल तर तें ह्याच गोष्टीबद्दल होय. जोतिबा देव नव्हते, ते माणूसच होते आणि त्यामुळें त्यांच्या हातून चुका झाल्या नसतील किंवा झाल्या नाहींत असें कुणीहि म्हणूं शकणार नाहीं. जोतिबा फुल्यांनीं लिहिलेले कांहीं लेख मलाहि अत्यन्त नापसंत आहेत. परंतु हे लेखच काय, जोतिबा फुले ह्यांनीं लिहिलेली ओळन्‌ओळ किंवा शब्दन्‌शब्द कुणाला नापसंत असला तरी त्यांचें अन्तःकरण कुणालाहि विसरतां यायचें नाहीं. परमेश्वर देखील अंतःकरण बघतो – शब्द बघत नाहीं. मग आपण आपल्या देशबांधवांसंबंधानें तेवढें करावयास तयार असूं नये काय ?

राखावीं सकलांची अंतरें ।
भाग्य येतें तदनंतरें ॥

हा श्रीसमर्थ **रामदास** ह्यांचा अमोलिक उपदेश आपण नेहमीं पाठ करतों—उद्धृत करतों—मग जोतिबा फुल्यांसंबंधानेंच आपली इतकी अनुदारवृत्ति कां असावी कीं त्यांचें अंतःकरण आपल्याला पारखतां येऊं नये ?

जोतिबा फुले ह्यांना ख्रिस्ती म्हणविणारे लोक हें विसरतात कीं ख्रिस्ती झालेल्या मनुष्यांची यादी असते व ती यादी ख्रिस्ती धर्मालयांत ठेवलेली असते. जोतिबा फुले ज्या काळांत जन्माला आले तो काळ असा होता. ज्या वेळीं ख्रिस्ती धर्म आणि हिंदु धर्म ह्यांची झटापट चाललेली असे व जर्मन युद्धाप्रमाणें प्रत्येक पक्षानें पाडाव केलेल्या माणसांचीं नांवें मोठ्या गर्वानें जाहीर करण्यांत येत असत. जोतिबा फुले हे त्या वेळचे एक जगजाहीर गृहस्थ होते. निबंधमालाकार – जे लुंग्यासुंग्या प्रतिपक्षाकडे कधीं ढुंकूनहि पहायचे नाहींत – त्यांनीं ज्याच्यावर लेखणी उचलली तो पुरुष सामान्य नव्हता ही गोष्ट अगदीं उघड आहे. असा पुरुष जर खरोखर ख्रिस्ती झाला असता तर ख्रिस्ती समाजास त्या वेळी केवढा विजय वाटला असता! त्यांनीं ही गोष्ट निशाणें आणि पताका लावून प्रसिद्ध केली असती. परंतु आपण जोतिबांस ख्रिश्चन केलें किंवा जोतिबा आपले चर्चमध्यें येऊन ख्रिश्चन झाले असें म्हणण्यास त्या वेळींहि कुणी ख्रिश्चन मिशन तयार झालें नाहीं व अजूनहि कुणी तयार होत नाहीं. जोतिबा ख्रिश्चन नव्हते हें सिद्ध करण्यास यापेक्षां जास्त पुरावा कोणता?

जोतिबा फुले ह्यांनीं जर एखादी गोष्ट केली असेल तर ती एवढीच कीं त्यांनीं **सत्यशोधक** समाज काढून ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास आळा घातला. एंजिनमध्यें वाफ अतिशय झाली म्हणजे ती बाहेर सोडण्यासाठी एखादा मार्ग ठेवण्याची यंत्रचालकांची पद्धति आहे. असा मार्ग न ठेवल्यास तें एंजिन बिघडतें व फुटतें. हिंदुधर्म हा परम श्रेष्ठ; परम उच्च व स्वातंत्र्यमय आहे ही गोष्ट खरी आहे, परंतु जोतिबा फुले ह्यांचे काळांत त्याचें आवार इतकें कांटेरी झालेलें होतें कीं त्यांतून स्वतंत्र हवेंत बाहेर पडण्याची शेंकडों किंबहुना हजारों जीवांस इच्छा होत होती. ह्या वेळी हिंदु धर्म टिकविण्यास एकच उपाय होता आणि तो उपाय म्हटला म्हणजे हिंदु धर्माचें आवार मोठें करणें हाच होय. हा उपाय त्या वेळीं **परमहंस** मंडळीनें अमलांत आणला, हा उपाय त्या वेळीं **ब्रह्मसमाज** व **प्रार्थनासमाज** ह्यांनीं अमलांत आणला, हा उपाय त्या वेळीं **स्वामी दयानंद** ह्यांच्या **आर्यसमाजानें** अमलांत आणला, हा उपाय त्या वेळीं जोतिबा फुले ह्यांच्या **सत्यशोधक** समाजानेंहि अमलांत आणला. हिंदु धर्माच्या सांचलेल्या वाफेला वाव करून द्यायला जर इतक्या धर्मचालकांनीं प्रयत्न केले नसते तर हिंदु धर्माचा बॉयलर त्याच वेळीं फुटून गेला असता! ह्यांपैकीं **ब्रह्मसमाज** आणि **आर्यसमाज** ह्यांचे इतिहास लिहायला व गोडवे गायला मोठमोठीं माणसें पुढें आलेलीं आहेत. **परमहंस** मंडळी व **प्रार्थनासमाज** ह्यांचा इतिहासहि श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य ह्या विद्वान् व विवेचक लेखकानें नुक्ताच सुरस मराठी भाषेंत उतरलेला आहे. **सत्यशोधक** समाजाचा इतिहास लिहायला मात्र कोणी नाहीं. त्याचें कार्य लोकांकडून पारखलें व वाखाणलें न जातां वाऱ्यावरच पडलेलें आहे!

पण असें जरी आहे तरी त्याची कामगिरी कमी महत्त्वाची आहे असें नाहीं. माझी खात्री आहे कीं **सत्यशोधक** समाज जर त्या वेळीं निघाला नसता तर जनसमुदाया-

पैकीं हजारों लोक खिश्चन धर्मांत शिरले असते. क्रिकेटची 'प्रॅक्टिस' चालली असतां चेंडू ठराविक हद्दीचे बाहेर जाऊं नये म्हणून जसें एक "नेट्" ठेवलेलें असतें किंवा सर्कशींत उंच खांबाच्या वरील टोंकाशीं दोरींत पाय अडकवून हवेंत गिरक्या मारणारीं मुलें खालीं जमिनीवर आदळूं नयेत म्हणून त्यांच्यासाठीं जशी एक जाळीदार खोळ खालीं धरलेली असते, त्याप्रमाणें त्या वेळच्या हिंदु धर्माच्या प्रखर तडाख्यांनीं दूर उडालेले चेंडू **सत्यशोधक** समाजानें नेमके अडवून धरले. **सत्यशोधक** समाजाचें हें कार्य विसरण्याजोगें आहे काय ? पण ह्यावरून जोतिबा फुले कोण ठरतात ? ख्रिस्ती ठरतात कीं हिंदु धर्माचे उपकारक ठरतात ?

खरी गोष्ट अशी आहे कीं जोंपर्यंत प्रचलित हिंदु धर्माला राजसत्तेची जोड होती म्हणजे इ. स. १८१८ साल येऊन जोंपर्यंत महाराष्ट्रीय राजसत्तेचा नाश झालेला नव्हत तोंपर्यंत हिंदु धर्माच्या नांवाखालीं जीं सामाजिक दुःखें किंवा सामाजिक अन्याय चाललेले होते त्यांना तोंड फुटण्यास अवसर नव्हता. असल्या प्रकारच्या दुःखांना किंवा अन्यायांना स्वराज्याचे अंमलाखालीं देखील तोंड फुटत नाहीं असें नाहीं. अति झालें म्हणजे लोकांचा क्षोभ स्वराज्याचे अमलाखालीं देखील अनावर होतो व फ्रेंच रेव्होल्यूशन् किंवा इंग्लंडमधील प्रॉटेस्टण्ट धर्माची स्थापना हीं ह्याचीं प्रत्यक्ष उदाहरणें आहेत. परंतु त्यांतहि लोकांना फूस द्यायला एखादी परकी सत्ता देशांत येऊन बसलेली असली म्हणजे असल्या अन्यायांविरुद्ध बंडें उद्भवायला कांहींच उशीर लागत नाहीं. हिंदुस्थानांत मराठी सत्ता होती तोपर्यंत हिंदु धर्मांतील अन्यायांविरुद्ध निशाण उभें करायला लोक वचकत होते, पण मराठी सत्ता जाऊन तेथें इंग्रजी सत्ता आल्याबरोबर हा सर्व प्रकार बदलला व बंडखोर लोक निर्भयपणानें वावरूं लागले. इंग्रज सरकारासहि हिंदु धर्माचें प्राबल्य नकोच होतें. त्यांनीं ह्या बंडास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रोत्साहन दिलें आणि हिंदुधर्माविरुद्ध बंडेंच बंडें उसळलीं. हीं बंडें दोन प्रकारचीं होतीं. कांहीं Nihilist म्हणजे विध्वंसक होतीं व कांहीं Constitutionist म्हणजे सनदशीर होतीं. Nihilist म्हणजे विध्वंसक लोकांस हिंदु धर्मच नको होता. त्यांची कितीहि समजूत घातली किंवा त्यांना कितीहि सवलती मिळाल्या तरी हिंदु धर्माचा विध्वंस करणें हेंच त्यांना कर्तव्य वाटत होतें. वडिलोपार्जित घर अपुरें पडलें म्हणून तें अजिबात पाडण्यांतलाच हा प्रकार होय. हे लोक हिंदु धर्म झुगारून भराभर ख्रिस्ती झाले. परंतु सनदशीर (Constitutionist) लोक तसे नव्हते. त्यांना हिंदु धर्म पाहिजे होता, पण त्याच्या स्वातंत्र्याची सरहद्द त्यांन वाढवायची होती. त्यासाठीं वाटेल तो झगडा करायला ते तयार होते. त्यासाठीं वाटेल ती निन्दा किंवा छळ सहन करायलाहि ते तयार होते. त्यांचा एकच निश्चय होता कीं स्वधर्मांत राहूनच सर्व करायचें–वाटेल तें झालें तरी स्वधर्म सोडायचा नाहीं.

आणि ह्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट अशी होती कीं प्रचलित हिंदु धर्म हा त्या काळीं नुसता ब्राह्मणेतरांनाच जाचक झालेला होता असें नव्हे तर तो जितका ब्राह्मणेतरांना

जाचक होता तितकाच ब्राह्मणांनाहि जाचक होता. त्या काळच्या प्रचलित हिंदु धर्माविरुद्ध बंड करण्यांत जितके ब्राह्मणेतर होते तितके ब्राह्मणहि होते. मूर्तिपूजेचे निर्बंध, स्पर्शा-स्पर्शाचे निर्बंध, विवाहाचे निर्बंध व खाण्यापिण्याचे निर्बंध हे त्या वेळच्या जुलमाचे मुख्य प्रकार होते. ह्याशिवाय अनेक धर्मविधींनी माणसें जखडून टाकलेलीं होतीं. अशा निगडित स्थितींत कुठें तरी हवाशीर ठिकाणीं पळून जावें असें कुणालाहि वाटणें साहजिक होतें. बाहेर इंग्रजांचें खुलें राज्य तर घरांत भटजीचें किंवा म्हाताऱ्या आजीचें सुलतानी साम्राज्य! बाहेर मनुष्य मोठा पंडित असेल किंवा हायकोर्टांत जज्जाचें काम तो करून आला असेल, पण घरांत आल्याबरोबर म्हाताऱ्या आजीबाईचा हुकूम सुरू होऊन "आंघोळ करून येशील तरच घरांत पाऊल टाक" असें तिनें फर्माविलेंच!

त्या वेळीं घरांत आल्याबरोबर प्रथमतः आंघोळ करून नेसतीं वस्त्रें बदलावीं लागत असत असें त्या वेळच्या अनेक नामांकित माणसांनीं लिहिलेलें आहे. नुक्तेंच **विविध-ज्ञानविस्तार**मध्यें सुप्रसिद्ध व्याकरणकार कै. **दादोबा पांडुरंग** ह्यांचें जें आत्मचरित्र प्रसिद्ध होऊं लागलेलें आहे त्यांतही ह्या गोष्टीचा उल्लेख आहे. पण नुसतें स्नानच काय, त्या वेळीं एकहि गोष्ट अशी नव्हती कीं जिथें हिंदु धर्म जाचक होत नव्हता. आज हिंदु समाजांतून सोंवळ्याओंवळ्याचें प्रस्थ मोडलेलें आहे–निदान पुष्कळ कमी झालेलें आहे. आजकाल खेड्यापाड्यांतून देखील ओंवळ्यानें जेवायला बसणाराला कुणी नांवें ठेवीत नाहींत, परंतु त्या काळीं तसें नव्हतें. माझ्या लहानपणींदेखील सोंवळ्याओंवळ्याचा एवढा कायदा होता कीं एखाद्या चिंधीवर पाय पडल्याबरोबर वस्त्र बदलावें लागत असे. सात-आठ वर्षांच्या लहान मुलांची मुंज झाली कीं त्यांचे पाठीमागें सोंवळ्याचे सर्व निर्बंध लागत आणि ते इतके कडक असत कीं थंडीच्या महिन्यांत रात्रीं जेवायला उघडें बसायच्या वेळीं पोरें रडकुंडीला येत. त्यांपैकीं कुणी हट्ट केला तर तीं वडील माणसांच्या हातचा मार खात! लहान वयांत सकाळीं भूक लागते! पण त्या वेळीं आंघोळ केल्याशिवाय भात जेवायची सोय नव्हती. पण आंघोळ करायची म्हणजे तर अंगावर कांटा येई! टिळक–आगरकरांच्या वादांत भांडणाचा मोठा मुद्दा काय, तर रेल्वे स्टेशनवर लो. टिळक भात जेवले कीं नाहीं? आगरकर म्हणाले कीं टिळक भात जेवले व टिळक म्हणाले मी भात जेवलों नाहीं! केवढा हा महत्त्वाचा मुद्दा आणि ह्यावर भांडण कुणांत तर लो. **टिळक** आणि कै. **आगरकर** अशांसारख्या लोकोत्तर विद्वानांत!

हें सोंवळ्याओंवळ्याचें झालें. इतर बाबतींतहि असेच कडक कायदे होते! कै. **विवेकानंदांनीं** म्हटल्याप्रमाणें त्या वेळचा हिंदु धर्म **जेवूं नको, शिवूं नको** ह्या अष्टाक्षरांत येऊन बसलेला होता! त्या वेळीं विद्वानांच्या पुढें, ग्रामण्यांच्या सभांत किंवा जातगंगेच्या समोर जे बडे प्रश्न निघायचे ते असे कीं अमुकाला अमक्याचा "विटाळ" झाला का? किंवा अमुक अमक्याच्या पंक्तीला जेवला का? राष्ट्रांतले प्रश्न काय ते हे! ह्यांशिवाय दुसरे प्रश्न नाहींत. बुद्धिवान् लोकांची बुद्धि सर्व ह्यांत खर्च

व्हायची ! पुढारी लोकांचा सारा वेळ ह्यांत खर्च होऊन जायचा ! जेवण्याच्या आणि शिवण्याच्या ह्या भीतीमुळेंच परदेशांत जायचें म्हणजे हिंदु लोकांना प्राणसंकट वाटे ! आईबापांना अशी भीती पडे कीं मुलगा परदेशांत जाणें म्हणजे तो स्वधर्माला व जातीला मुकणें ! त्यापेक्षां तो मेलेला बरा किंवा आपण डोळे मिटलेले चांगले !

ह्याशिवाय ब्राह्मण लोकांना दुसरी अत्यन्त जाचक गोष्ट म्हणजे विधवापन ! प्रचलित हिंदु धर्माविरुद्ध बंडाळी उत्पन्न करायला ही गोष्ट जितकी कारणीभूत झाली तितकी दुसरी कोणतीहि झाली नसेल ! वैधव्याची आपत्ति स्त्रियांवर कोणत्याहि काळीं आली तरी ती वाईटच ! पण ज्या वेळीं चवदा-पन्धरा वर्षांची, आठ-नऊ वर्षें वयाची किंबहुना **चार-पांच** वर्षेंच वयाला झालेली व अजूनहि बोबडें बोलत असलेली एखादी बाला, तिच्या अल्प-वयांतला–तिच्या अर्भकावस्थेंतल्या लग्नांतला–नवरा वारल्यामुळें विधवा होई व त्या वयांत-देखील तिचें वपन करायचा आईबापांवर प्रसंग येई. त्या वेळीं त्यांच्या चित्ताची कालवाकालव काय होत असेल ह्याची कल्पना सहृदय वाचकांनींच करावी ! ती लिहायला आमचेजवळ लेखणी नाहीं ! आम्ही एवढेंच सांगतों कीं अशा "विधवा" बघण्याचा प्रसंग माझे स्वतःवर आलेला आहे. पुढें त्यांचें काय झालें, कालाच्या वाळवंटावरील त्या लहान कणिका–किंवा प्रचलित निर्बंधांच्या ओसाड बागेंतल्या त्या कोमल कलिका–पुढें कशा रीतीनें होरपळत राहिल्या-त्या मृत्युवश होऊन गेल्या किंवा अजूनहि आपला कष्टी जीव जाळीत बसलेल्या आहेत–हेंहि कळायला मार्ग नाहीं, पण त्यांच्या या अत्यंत करुणामय मूर्ति आठवल्या म्हणजे अजूनहि डोळ्यांत पाणी येतें.

तेव्हा जर कुणाचा असा समज असेल कीं फक्त ब्राह्मणेतर समाजच त्या काळच्या धर्मनिर्बंधांच्या उकडहांड्यांत उकडून निघत होता तर तें खरें नाहीं त्यांत ब्राह्मणवर्गहि शिजत होता व त्या आधणाच्या पाण्यांत जितके ब्राह्मणेतरांचे अश्रु पडत होते तितकेच ब्राह्मणांचेहि अश्रु सांडत होते. किंबहुना ब्राह्मणवर्गातल्या अनाथ स्त्रियांचीं निष्पाप रक्तें ह्या आधणांत पडलेलीं आहेत–त्या निष्पाप रक्तांच्यामुळें ह्या आधणाला आधणपणा आलेला आहे. आजच्या ब्राह्मण समाजांत असा एकहि मनुष्य सांपडणार नाहीं कीं ज्याची आई, आजी, मावशी किंवा मावळण ह्या भयंकर कसोटींतून जात असतांना जिच्या मांडीवर तो वाढलेला नाही.

त्यांत आणखी पुनर्विवाहाचा निर्बंध ! मग काय विचारतां ? प्रचलित हिंदु धर्मापुढें मुख्यतः ब्राह्मणांनाच **दे माय, धरणी ठाय** झालें. ब्राह्मणवर्ग इतर वर्गांपेक्षां श्रेष्ठ मानला जात असेल व सार्वजनिक पंगत बसली म्हणजे ब्राह्मणांचे पाट माजघरांत व बाकीच्यांचीं पानें बाहेरच्या सोप्यांत असा प्रकार होत असेल–पण ह्याखेरीज ब्राह्मणवर्गास कोणतेंहि सुख नव्हतें. ज्याच्या पायाचें तीर्थ ब्राह्मणेतरांना घ्यावें लागतें तो हा वर्ग नव्हे. दुस-ऱ्याच्या घरच्या लाडूपोळ्यावर जो तट्ट फुगतो तो हा वर्ग नव्हे. लग्नातल्या दक्षणेवर जो उदरनिर्वाह चालवतो तो हा वर्ग नव्हे. ब्राह्मणवर्ग अगदीं निराळा आहे व हाच वर्ग मुख्यतः पुढारी गणला जात आहे. आपल्या पायाचें तीर्थ दुसऱ्यास

देणारा, दुसऱ्याच्या घरच्या लाडूपोळ्यांवर तट्ट फुगणारा व लग्नमुंजींतल्या दक्षिणेवर उदरनिर्वाह चालविणारा जो वर्ग त्यास **भिक्षुक**वर्ग असें नांव आहे. ब्राह्मणेतर ज्यास **भट** म्हणतात ते हे भिक्षुक–ब्राह्मण नव्हेत. ब्राह्मणवर्ग स्वतः ह्या भिक्षुकवर्गाच्या अमलाखालीं आहे व ब्राह्मणेतरांवर भिक्षुकवर्गाचें जेवढें साम्राज्य आहे तेवढेंच ब्राह्मणवर्गावरहि आहे. ब्राह्मणवर्गास इतरांप्रमाणेंच भिक्षुकवर्गाच्या पायाचें तीर्थ घ्यावें लागतें. ब्राह्मणवर्गास इतरांप्रमाणेंच भिक्षुकवर्गासाठीं लाडूपोळ्या कराव्या लागतात व ब्राह्मणवर्गाच्या घरीं लग्नमुंजी झाल्या म्हणजे पहिली बाव भिक्षुकवर्गाच्या दक्षिणेचीच असते. एवढेंच कशाला ? गरिबींत संसार करणाऱ्या ब्राह्मण कुटुंबांतल्या नवराबायकोच्या जोडप्यांपैकीं नवरा घरीं मरून पडला म्हणजे पुढें उत्तरक्रियेंतल्या दक्षिणेला भिऊन किती तरी अनाथ ब्राह्मण स्त्रियांनीं पतिनिधनामुळें फुटलेला टाहो थांबवून धरलेला आहे !

निःपक्षपात दृष्टीनें विचार केला म्हणजे अशा रीतीनें ब्राह्मणवर्ग हा प्रचलित धर्मनिर्बंधाखालीं पार चिरडून गेलेला आहे ! ब्राह्मणवर्गावरील निर्बंधांचें ओझें आणि ब्राह्मणेतर वर्गावरील निर्बंधांचे ह्यांची तुलना करण्याचा आमचा विचार नाहीं. परंतु संसार सुखावह करण्यास विवाहस्वातंत्र्य, जिह्वास्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य ह्या ज्या तीन गोष्टी लागतात त्या तिन्हींचा ब्राह्मणवर्गाच्याजवळ पूर्वी पूर्ण अभाव होता व अजूनहि बराचसा आहे. ब्राह्मण म्हटला कीं त्याच्या पाठीमागें सोंवळ्याओंवळ्याचे कायदे लागले ! त्यास दुसऱ्या कुणाच्याहि हातचें खातां यायचें नाहीं ! ठराविक अन्नापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि पदार्थांवर वासना जाऊं देतां यायची नाहीं व धर्माचारांपैकीं कोणत्याहि आचाराची उपेक्षा करतां यायची नाही ! तो जंगलांत असला तरी त्याला श्रावणी केलीच पाहिजे व त्यानें कितीहि वेडेंवाकडें तोंड केलें तरी त्याला पंचगव्य घेतलेंच पाहिजे. ब्राह्मण स्त्रिया तर निर्बंधाखालीं नुसत्या भरडल्या जात होत्या ! आठ्या-नवव्या वर्षी वैधव्य आलें तरी पुनर्विवाहाची आडकाठी व त्यांतहि वपनाचा अघोर प्रसंग ! हाय, हाय ! ब्राह्मण मुलींचे ते हंबरडे अजूनहि वातावरणांत घुमत असतील. श्रीकृष्ण प्रभूच्या कानांवर अभागी हिंदुस्थानची स्वातंत्र्यार्थ फोडलेली आरोळी जर जात नसेल तर ती ह्या हंबरड्यामुळेंच जात नसेल !

सध्यां **ब्राह्मण** आणि **भट** ह्या शब्दांचा फार मोठा घोंटाळा करण्यांत येतो. बहुतेक लोक हे शब्द समानार्थक वापरतात. पण ही चूक आहे हें या विवेचनावरून लक्षांत येईल. **भटशाही** आणि **ब्राह्मणशाही** ह्या अगदीं निराळ्या शाह्या आहेत. **भटशाही** मंत्रोपजीवी असते, परोपजीवी असते. ब्राह्मणशाही तशी नसते. आतां मंत्रपठन हाहि एक धंदा आहे कीं नाहीं आणि वकील किंवा डॉक्टर हे जर Consultation म्हणजे सल्ला देण्याकरितां पैसे घेतात तर मंत्रपठनासाठी भिक्षुकांनींहि पैसे कां घेऊं नयेत वगैरे मुद्दे भिक्षुक वर्गातर्फे काढण्यांत येत असतात. ह्या मुद्याचा विचार मी पुढें करीन. परन्तु तूर्त मला जें सांगायचें आहें तें एवढेंच कीं **ब्राह्मणशाही** आणि **भिक्षुकशाही** ह्या एक नव्हेत. ब्राह्मणशाहींतील एकहि मनुष्य दुसऱ्यापासून दक्षिणा घेत नाहीं, दुसऱ्याचे घरीं

लाडूपोळ्या झोडण्यास जात नाहीं किंवा आपले पाय पुढें करून त्यांचें तीर्थ घ्या असें म्हणत नाहीं. हे भिक्षुकशाहीचे व्यवसाय आहेत. ब्राम्हणशाहींतील कोणीहि मनुष्य ते करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर तें करणें कमी प्रतीचें आहे असें तो मानतो.

मग असा प्रश्न येतो कीं ब्राह्मणवर्ग व भिक्षुकवर्ग एकच आहे असा जो घोंटाळा उडतो, तो कां ? ते जर अगदीं स्वतंत्र वर्ग आहेत व जर एकाच्या धंद्याला दुसरा कमीपणाचा समजतो तर मग तिऱ्हाइतांना तरी असा भ्रम कां उत्पन्न व्हावा ? ह्याचें कारण एवढेंच कीं मुलतानी आणि शीख ह्यांचीं जशीं नातींगोतीं असतात त्याप्रमाणे भिक्षुकवर्ग आणि ब्राह्मणवर्ग ह्यांचीं नातींगोतीं असतात. त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहार होतो. मुलतानी लोकांतून जशी शीख लोकांत भरती होत असते त्याप्रमाणें भिक्षुकवर्गांतून ब्राह्मणवर्गांत नवीन माणसें येत असतात. एकाच कुटुंबांत एक भाऊ भिक्षुक व एक भाऊ गृहस्थ असूं शकतो व ह्या गृहस्थवर्गालाच ब्राम्हणवर्ग असें म्हणण्यांत येतें. भिक्षुकवर्ग व ब्राह्मणवर्ग ह्यांचे ह्या प्रकारचे लागेबांधे आहेत, पण ह्यांतच त्यांचें पृथक्करण आहे. भिक्षुकवर्गांतून ब्राम्हणवर्गांत नवीन भरती होते, पण जो एकदां ब्राम्हणवर्गांत शिरला तो परत भिक्षुकवर्गांत जात नाहीं. ब्राह्मणवर्ग जरी भिक्षुकवर्गाच्या पायां पडत असला किंवा त्यांचें चरणतीर्थ घेत असला, तरी भिक्षुकवर्ग कमी दर्जाचा मानला जातो. त्यामुळें गृहस्थपणाच्या उच्च वर्गांत जो मनुष्य एकदां शिरला तो वाटेल तशी परिस्थिति बदलली तरी भिक्षुकवर्गांत पुन्हां शिरत नाहीं. एवढेंच कशाला ? ब्राह्मणवर्गास '**भिक्षुक**' ह्या नांवाचाहि अपमान वाटतो. जे हे भिक्षुक ते भट ! ब्राह्मण हे भट नव्हेत. म्हणून ब्राह्मणवर्गाच्या हृदयास जर एखादी गोष्ट झोंबत असली तर त्यांना "**भट**" ह्या नांवानें संबोधणें होय। सार्वजनिक चळवळींत शिरणाऱ्या माणसांनीं **भट** हा शब्द उच्चारून ब्राह्मणवर्गाच्य! हृदयास घरे पाडणें चांगलें नाहीं. अंतःकरणें जोडावींत, अंतःकरणें तोडूं नयेत. वाणी शुभ बोलावी, उत्साह चढविणारी बोलावी. ब्राह्मणेतरांस **शूद्र** ह्या शब्दाचें जेवढें वावडें आहे तेवढेंच ब्राम्हणवर्गास **भट** ह्या शब्दाचें आहे. नेहमीं दुसऱ्यास प्रोत्साहन द्यावें, त्याचे पाठीवर थाप मारावी. त्याचा मानभंग–तेजोभंग करूं नये. ब्राह्मणवर्गास **भट** म्हटल्यानें त्यांचा तेजोभंग होतो. ब्राह्मणेतरांस **शूद्र** म्हणण्याचा जसा काळ गेला तसा ब्राम्हणांना **भट** म्हणण्याचाहि काळ गेला. त्या जुन्या काळांतल्या चुक्या होत्या. त्या perpetuate (कायम) करणें चांगलें नाहीं. सध्यांचा काळ अंतःकरणें तोडण्याचा नाहीं, अंतःकरणें जोडण्याचा आहे. **सत्यशोधक** पक्ष हा अंतःकरणाचा पक्ष आहे. **सत्यशोधक** पक्ष म्हणजे अंतःकरण आहे. म्हणून मी विचारतों कीं त्याचेपुढें ब्राम्हणवर्गानें जर अंतःकरणांतलें दुःख सांगितलें व ब्राम्हणांस "**भट**" म्हणूं नका असें विनविलें तर ती विनंति वाया जाईल काय ?

भट म्हणजे कोण हें वर सांगितलेंच आहे. **भट** म्हणजे भिक्षुकी करणारा, दुसऱ्याचे घरीं हव्यकव्य करणारा किंवा दक्षिणा घेणारा परोपजीवी मनुष्य ! ब्राह्मणवर्ग परोपजीवी नाहीं. तो धंदा किंवा काबाडकष्ट करून पोट भरणारा वर्ग आहे. ब्राह्मणवर्गांत सावकारा-

पासून तों शिंपीकाम करणाऱ्यापर्यंत सर्व धंद्यांचीं माणसें आहेत. कांहीं ब्राह्मणवर्गांतील मनुष्य मोच्याचें दुकान घालो किंवा सावकारी करो, तो कुळकर्णीपणा करो, किंवा मामलेदारी चालवो, तो कधींहि परोपजीवी रहात नाहीं. पराव्यावर पोसणें ही गोष्ट ब्राह्मण मनुष्यास स्वभावतःच अप्रिय आहे. बारीक निरीक्षण केल्यास ब्राह्मणवर्गांतील माणसें उद्योगी, मितव्ययी व बरींचशीं निर्व्यसनी आढळून येतात. ब्राह्मणवर्गांत शेतकी करणारींहि माणसें आहेत. त्यांच्यांतील पुरुष बैल चालवितात, स्त्रिया शेतांत काबाडकष्ट करतात. ब्राह्मण **पाटील** तर वाटेल तितके आहेत. तरवारीचेंहि ब्राह्मणवर्गास कुपथ्य नाहीं. पहिले बाजीराव, पहिले माधवराव, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन हे विख्यात तरवार-बहादर होते. महाराणी **लक्ष्मीबाई** अशांसारख्या तरवारबहादर स्त्रियाहि ब्राह्मणवर्गांत झालेल्या आहेत. संपत्तीकडेहि ब्राह्मणवर्गाचा ओढा विशेष नाहीं. संपत्तिमान् होण्यापेक्षां कार्यकारी होण्याकडे त्यांत अनेकांचा ओढा असतो आणि ह्यामुळेंच ब्राह्मणवर्ग इतर वर्गांपेक्षां श्रीमंत नाहीं. जमिनीचा महसूल किंवा इन्कमटॅक्स ह्या सरकारी उत्पन्नाच्या दोन्ही बाबी घेतल्या तरी त्यांत ब्राह्मणवर्गाचा नंबर फारच खालीं आहे. ब्राह्मणवर्गानें शंभर वर्षें मराठी राज्य हांकलें. तें त्यांनीं न्यायानें मिळविलें कीं अन्यायानें मिळविलें हा प्रश्न ह्या वेळीं नको. माझ्या मतानें तें त्यांनीं न्यायानें मिळविलें व अन्यायानें घालविलें. परंतु तें त्यांनीं अन्यायानें मिळविलें असें जरी गृहीत धरलें तरी शंभर वर्षें राज्य करूनहि **बाळाजी विश्वनाथ** कोंकणांतून येतांना जितका गरीब होता तितकाच ब्राह्मणवर्गांतील सामान्य मनुष्य आज गरीब आहे. शंभर वर्षें राज्यलक्ष्मी हातांत असतांहि ते गबर होऊन बसले नाहींत. कित्येक ब्राह्मण कुटुंबें तर खरोखर अन्नास मोताद आहेत. धार्मिक निर्बंधामुळें ब्राह्मणेतर वर्गाचे डोळे जितके पांढरे होत असतील त्याहून हे निर्बंध ब्राह्मण-वर्गाचा जास्त पिट्टा पाडीत आहेत.

ब्राह्मणवर्गाची ह्या निर्बंधांतून मुक्तता होणें जरूर होतें. ब्राह्मणेतरवर्गासहि हे धार्मिक निर्बंध जाचीत होते. हे धार्मिक निर्बंध सर्व लोकांनाच असह्य झालेले होते. पण ह्या निर्बंधांच्या किल्ल्या भिक्षुकवर्गाचे कडोसरीस होत्या आणि भिक्षुकवर्ग हे निर्बंध सैल करण्यास नाकबूल होता. पन्नास-पंचावन वर्षांपूर्वी पुणें येथें पुनर्विवाहाचा जो जंगी वाद झाला त्या वेळीं खुद्द शंकराचार्य ह्या वादाचें निरीक्षण करीत होते, तरी अखेरचा निर्णय पुनर्विवाहाचे विरुद्ध झाला. ब्राह्मण मुलींना पुनर्विवाह करूं द्यायचा नाहीं, तिचें लग्न होऊन एक महिनाहि झाला असला तरी तिचा पुनर्विवाह होऊं द्यायचा नाहीं, ती आठ वर्षांची अजाण पोरगी असली व मनु-याज्ञवल्क्य ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें **यथा कन्या तथैव सा** असें जरी तिचें वय असलें तरी तिचा पुनर्विवाह होऊं द्यायचा नाहीं! नाहीं! तिचा पुनर्विवाह होऊं द्यायचाच नाही!

भिक्षुकशाहीनें खुद्द ब्राह्मणवर्गाविरुद्ध एवढा आग्रह धरल्यानंतर आतां ह्याला उपाय काय? ह्याला एक उपाय म्हणजे हिंदु धर्म सोडून देणें. हा उपाय Nihilst (विध्वंसक)

पक्षानें केला. पण Constitutionist (सनदशीर) लोकांनीं त्यावर निराळीच युक्ति काढली. त्यांनीं ठरविलें कीं जर भिक्षुकवर्ग इतका दुराग्रह धरीत असेल तर भिक्षुकवर्गाचा अंमल झुगारून द्यायचा व धार्मिक सत्तेच्या किल्ल्या आपल्या हातीं घ्यायच्या ! भिक्षुकवर्ग ऐकत नसेल तर न ऐको ! ते आपले गुरुच नव्हेत. जे आपली सत्ता सौम्य करण्यास तयार नाहींत–नको–त्यांची सत्ताच नको ! त्याचेऐवजी आपणच राज्याधिकार हातीं घेऊं, भिक्षुकशाहीच्या एकछत्री राज्याचे ऐवजीं आपणच लोकशाहीचें सर्वछत्री राज्य स्थापन करूं. इंग्लंडमध्यें दुसऱ्या जेम्स राजाचा जुल्म ज्या वेळीं असहन झाला आणि ज्या वेळीं तो राजा कोणत्याहि तडजोडीस कबूल होईना त्या वेळीं इंग्लंडमधील जनतेनें हेंच केलें. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळींहि असेंच झालें आणि प्रत्येक राज्यक्रांतीचे वेळीं असाच प्रकार होत असतो.

ही क्रांति करण्यांत **परमहंस**समाज, **प्रार्थनासमाज**, **ब्रह्म**समाज, **आर्य**समाज हे जसे प्रमुख होते तितकाच **सत्यशोधक** समाजहि प्रमुख होता. ह्या सर्वांनीं मिळून प्रचलित हिंदु धर्माची कोंडी फोडली व हिंदु राहून हिंदु लोकांस इतर धर्मांमधील स्वातंत्र्य मिळवून दिलें. ह्या पंथस्थापकांच्या फौजा म्हणजे विजयी क्रान्तिकारकांच्या फौजा होत्या ! ह्या सर्वांच्या अंगीं विजयीपणाचें स्फुरण होतें आणि त्यामुळें झपाट्यासरशीं त्यांचे हातून कार्य झालें ! **प्रार्थनासमाज**, **ब्रह्म**समाज वगैरे समाजांनीं आपला मोर्चा ब्राह्मणसमाजाकडे वळविला व त्यांतील लोक हस्तगत करण्याचा सपाटा चालविला. प्रार्थनासमाज, परमहंससमाज ह्या सर्वांचे अनुयायी ब्राह्मणवर्गातले होते. त्यामुळें त्यांस पाण्ढरपेशा जातींतल्या लोकांची सहानुभूति मिळाली; त्यांनीं आपलें स्वतंत्र सिंहासन स्थापन केलें––भिक्षुकशाहीस फेंकून दिलें.

सत्यशोधक समाजहि क्रान्तिकारक लोकांपैकींच होता, पण ज्याप्रमाणें दोन क्रान्तिकारकांपैकीं एकानें उत्तरेकडून हल्ला करावा व दुसऱ्यानें दक्षिणेकडून हल्ला करावा त्याचप्रमाणें **प्रार्थनासमाज** वगैरे पंथांनीं आपल्या कक्षेंत पाण्ढरपेशावर्गास आणण्याचें सुरू केलें आणि **सत्यशोधक** समाजानें खेडेगांवें व गांवकरी लोक ह्यांचीं मनें काबीज करण्याचा प्रयत्न केला. **प्रार्थनासमाज** धर्मप्रचारकाचा झगा घालून आला, **सत्यशोधक**समाज धोंगडी पांघरून आला. **प्रार्थनासमाजानें** इंग्रजी भाषा उचलली, **सत्यशोधक** समाजानें शुद्ध मराठी सुरू केली. **प्रार्थनासमाज** उपासनामंदिरांत उभा राहिला; **सत्यशोधक** समाज शेताच्या खळ्यावर थडकला. **प्रार्थनासमाज** तत्त्वज्ञान बोलूं लागला. **सत्यशोधक** समाज प्रचलित स्थिति मांडूं लागला. **प्रार्थनासमाजानें** संगीत गाणीं चालूं केलीं, **सत्यशोधक** समाज लावण्या म्हणूं लागला. **प्रार्थनासमाजानें** पेटीचे सूर काढले, **सत्यशोधक** समाजानें डफावर थाप मारली. **प्रार्थनासमाजानें** कल्पना उचंबळायला लावल्या, **सत्यशोधक** समाजानें हृदयें उचंबळून सोडलीं !

प्रार्थनासमाज आणि **सत्यशोधक** समाज ह्यांतील अंतर हे आहे. बाकी त्यांची

उत्पत्ति एकच आहे, ध्येय एकच आहे आणि स्वरूपहि म्हणजे क्रांतिकारकाचें आहे. **प्रार्थनासमाजानें** उत्तरेकडून सुरवात केली, **सत्यशोधक** समाजानें दक्षिणेकडून सुरवात केली. **प्रार्थनासमाजानें** वरच्या मजल्याकडे दृष्टि ठेवली, **सत्यशोधक** समाजानें तळमजल्याकडे दृष्टि ठेवली. **प्रार्थनासमाजानें** हिंदु धर्माचें डोकें काबीज केलें, **सत्यशोधक** समाजानें त्याच्या तळपायाला गुदगुल्या केल्या. ह्या गुदगुल्यांमुळें जनता हंसली आणि सत्यशोधक समाजाकडे बघायला लागली. प्रार्थनासमाजास जनतेला खुलवितां आलें नाहीं. **सत्यशोधक** समाजाचा जलसा उभा राहिला म्हणजे पांच हजार काय आणि दहा हजार काय, वाटेल तितके लोक जमायला अडचण पडत नाहीं. पण प्रार्थनासमाजाचा पन्नासावा वाढदिवस आला तरी पन्नास लोक जमायचीहि मारामार पडते!

हें वर्णन अतिशयोक्तीचें आहे असें कोणी म्हणतील. **सत्यशोधक** समाजाचे जलशास हजारों लोक जमतात हें कबूल करणें कोणास दुःखप्रद वाटेल, त्याचप्रमाणें प्रार्थनासमाजाच्या " फंक्शन्स "ना पन्नास लोक जमणें मुश्किलीचें पडतें हें कबूल करणेंहि कोणास जड जाईल. आतां ह्या दोन्ही गोष्टी अतिशयोक्तीच्या आहेत असेंच आपण धरून चालूं. तरीहि एवढी गोष्ट मान्य करावीच लागेल कीं गेल्या पन्नास वर्षांत **प्रार्थनासमाजा**ची चळवळ खेड्यापाड्यापर्यंत उतरू शकली नाहीं आणि **सत्यशोधक** समाजाची चळवळ पांढरपेशांपर्यंत चढू शकली नाहीं. दुसऱ्या भाषेंत बोलायचें म्हणजे प्रार्थनासमाजाचे चळवळींत Philosophy (तार्किक चर्चा) आहे, पण Heart (अंतःकरणाचा फुलेरा) नाहीं, आणि सत्यशोधक चळवळींत Heart (अंतःकरणाची लाट) आहे, पण Philosophy (ज्ञानाची उसळी) नाहीं.

सत्यशोधक समाजाची प्रगति जर ह्या पुढें करायची असेल तर ती कोणत्या दृष्टीनें करायला पाहिजे हेंहि ह्यावरून सहज समजून येणार आहे. **सत्यशोधक** समाजाला अंतःकरण आहे, पण अजून अन्तर्दृष्टि नाहीं आणि ही अंतर्दृष्टि आल्याशिवाय त्याच्या प्रयत्नांची पूर्तता व्हायची नाहीं. Head and Heart—**ज्ञान** आणि **अंतःकरण** ह्यांची ज्या वेळीं जोड जमते त्याच वेळीं एखादें मत विश्वविजयी होतें; नाहींतर त्यास एकांगीपणा येण्याचा सम्भव असतो. एखादा प्रांत काबीज करायचा म्हणजे त्यांतील **जमीन** आणि **किल्ले** हे दोन्ही ज्याप्रमाणें सर करावे लागतात, त्याप्रमाणें एखादी चळवळ सर्वव्यापी करायची म्हणजे सुशिक्षित आणि अशिक्षित, पांढरपेशे आणि गांवकरी, नागरिक आणि शेतकरी, बुद्धिमान् आणि अंतःकरणवंत, मानदार आणि इनामदार, Classes आणि Masses, ज्ञाता आणि जनता, Head आणि Heart, ह्या दोहोंचाहि कबजा घ्या लागतो. ह्या दोहोंचा कबजा घेण्याचा प्रयत्न आतांपर्यंत फक्त स्वामी **दयानंद** ह्यांच्या आर्यसमाजानें केला आणि म्हणून एके बाजूस स्वामी **श्रद्धानन्दा**सारखे ज्ञाते तर एके बाजूस गांवोगांवच्या प्रचारकांसारखे कार्यकर्ते

ह्या चळवळींत निर्माण झाले. अजूनहि ज्ञानसमृद्धीच्या बाजूनें आर्यसमाजाची संपत्ति पूर्ण झालेली नाहीं. द्वैत, अद्वैत, वेदांत, मीमांसा ह्यांच्याप्रमाणें सर्वमान्य तत्त्वज्ञान अजूनहि आर्यसमाजामध्यें निर्माण व्हायचें आहे आणि म्हणूनच आर्यसमाज कितीहि लोकप्रिय असला तरी तो अजून **योद्धा** म्हणून प्रसिद्ध आहे, **ज्ञानदाता** म्हणून प्रसिद्ध नाहीं. ह्याचे उलट सनातन हिंदु धर्माची घडी आज किती जरी विसकटलेली असली तरी त्यांतील तत्त्वज्ञानाचा भाग इतका खंबीर व इतका मनोरम आहे कीं **उपनिषदें, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रें, जैमिनी, पतंजलि, शंकराचार्य, रामानुजाचार्य** वगैरेंचा हात **ॲरिस्टाटल, प्लेटो** अशांसारखे प्राचीन तत्त्वज्ञानीच नव्हेत तर **स्पेन्सर, मिल्** ह्यांच्यासारखे आधुनिक तत्त्ववेत्तेदेखील क्वचित्च धरूं शकतील

अर्वाचीन कालांत अशांसारखे ज्ञानाचे प्रवाह वाहविण्याचे प्रयत्न **ब्रह्मसमाजानें** व त्याच्या खालोखाल **प्रार्थनासमाजानें** केले. देवर्षि **देवेन्द्रनाथ** टागोर, **केशवचन्द्र सेन**, बाबू **प्रतापचन्द्र मुजूमदार**, पंडित **शिवनाथ शास्त्री** ह्यांचे ह्या दृष्टीचे प्रयत्न खरोखरच प्रशंसनीय आहेत. आपल्या बाजूस अशांसारखे पायाशुद्ध प्रयत्न फारसे झालेले नाहींत, पण कै. सर **रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, महादेव गोविंद रानडे, वामन आबाजी मोडक** ह्यांच्या प्रार्थनांनीं उच्च विचाराच्या प्रांतांत जनतेस नेण्याचा व त्यांच्या चित्तास शांति देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. ह्या तिन्ही पुरुषांजवळ व विशेषतः **भाण्डारकर** आणि **रानडे** ह्यांच्या जवळ इतकें अगाध ज्ञान होतें कीं प्रासंगिक उपासनांपेक्षां धर्मज्ञानावर एखादा सोपपत्तिक ग्रंथ त्यांस सहज रचतां आला असता ! तसें त्यांनीं केलें नाहीं हें दुर्दैव होय !

आतां जी गोष्ट **प्रार्थनासमाजानें** देखील पूर्णपणें केली नाहीं ती गोष्ट **सत्यशोधक** समाजानें करून दाखविली नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं. पण त्याशिवाय धार्मिक काय किंवा कोणत्याही काय चळवळीस पूर्णता येणार नाहीं. आज **सत्यशोधक** समाजास जर कोणती गोष्ट हवी असेल तर ती ही कीं तिला Philosophy – ज्ञानसमृद्धि – पाहिजे. ज्या चळवळींत अंतःकरणाचे फवारे व ज्ञानाचे झरे ह्यांची सोबत जमते ती चळवळ पूर्ण होते व तसाच टिकाऊपणा येतो. Philosophy ऊर्फ ज्ञानसमृद्धि हिच्याशिवाय चाललेली धार्मिक चळवळ म्हणजे लढाईत शिर उडून नाचत राहिलेलें धड होय. हृदयाच्या चळवळीशिवाय उत्पन्न झालेली चळवळ म्हणजे चेहेरा वगैरे शरीराचा उत्तम भाग असून खांद्यापासून खालीं सर्व अंग लुळें पडलेलें होय. पहिलीस गति असते, पण दृष्टि नसते, दुसरीस दृष्टि असते, पण गति नसते. **प्रार्थनासमाज** ही अशा प्रकारची चळवळ आहे. तिला दृष्टि आहे, पण गति नाहीं. त्याचे उलट **सत्यशोधक** समाजास गति आहे, पण दृष्टि नाहीं.

एवढेंच काय, आज **सनातन हिंदु धर्म** म्हणून जो कांहीं राहिलेला आहे तोहि

आज **प्रार्थनासमाजा**प्रमाणेंच झालेला आहे, म्हणजे त्यास **दृष्टि** आहे पण **गति** नाहीं. त्याचे जवळ उत्तम प्रकारचें तत्त्वज्ञान आहे हें वर सांगितलेंच आहे. ह्या तत्त्वज्ञानाच्या बळावर त्याला आज युरोपला दिपवितां येईल, अमेरिकेवरहि छाप पाडतां येईल. ज्या वेळीं **विवेकानन्दां**सारखीं माणसें ह्यास अमेरिका खंडांत घेऊन गेलीं त्या वेळीं त्यांना तिथें खरोखर छाप पाडतां आली. त्याचें नुसतें टवटवीत मुख पाहिलें तर तो सुंदर दिसतो–त्याची छबी श्रीकृष्णासारखी मनमोहक दिसते. पण त्याच्या हातापायांकडे पाहायची सोय नाहीं, कारण त्याची गति गेलेली आहे, त्याचे हातपाय लुळे पडलेले आहेत. त्याचा नुसता **वस्ट** [चेहरामोहरा] बघितला म्हणजे कोणीहि खूष होऊन जातो आणि ह्याच खुषीच्या लहरींत " उपनिषद्‌ are the solace of my life, उपनिषद्‌ are the solace of my death " (उपनिषदांनीं मला इहलोकांत शांति दिली, उपनिषदांनींच मला मृत्यूचे वेळीं शांति मिळेल.) असे उद्गार पाश्चात्त्य पंडित काढीत असतात. मॅडम् **ब्लॅव्हॅटस्की** ह्याचमुळें हिंदु धर्मावर फिदा झाली. मिस् **नोबल** वगैरे पाश्चात्त्य स्त्रिया ह्याचमुळें हिंदु धर्मावर फिदा झाल्या. परंतु हिंदु धर्माचा चेहेरा इतका गोंडस असून त्याचे हातपाय आज लुळे पडलेले आहेत. अमेरिकाच काय, अटकेबाहेर जायचेंदेखील सामर्थ्य त्याच्यात राहिलेलें नाहीं. तो हिंदुस्थानांत तरी टिकतो कीं नाहीं ह्याची आज काळजी पडलेली आहे.

सुदैवानें स्वामी **विवेकानन्द**, स्वामी **रामतीर्थ** वगैरे महापुरुषांच्या परिश्रमामुळेंच सनातन हिंदु धर्म हा **सत्यशोधकसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, परमहंस-समाज** वगैरे चळवळींच्या सुरवातीला जसा होता तसा आज आडमुठा राहिलेला नाहीं, तो आज बराच पुढें सरकलेला आहे. बाहेरून आल्याबरोबर आज कडकडीत धर्माभिमानी घराण्यांतहि कुणाला स्नान करावें लागत नाहीं. सोंवळ्याचा दरारा जवळ जवळ लुप्तप्रायच झालेला आहे. आठ वर्षाच्या मुलीचें सध्यां कुणी लग्न करीत नाहीं, आणि अल्पवयांतच काय पण प्रौढ वयांतहि पुनर्विवाह केल्यास समाज तिकडे डोळेझांक करतो. मुली **बी. ए.** झालेल्या आहेत, **एम्. ए.** झालेल्या आहेत, बायका म्युनिसिपालिटींत शिरल्या आहेत, कौन्सिलांतहि शिरण्याच्या बेतांत आहेत. केशवपनाचें आतां कुणी नांव काढीत नाहीं व जातीजातींत लग्नें झालीं तरी समाजाला चालतात. " अस्पृश्यां "ना कोणीं जवळ घेतल्यास तो वाळींत पडत नाहीं, त्यांच्या पंक्तीला जेवल्यासहि समाज चालवून घेतो. अस्पृश्यांना देवळांत येऊं दिलें पाहिजे असें कांहीं लोकांना का होईना, पण वाटूं लागलें आहे. आणि त्यांना पाणी भरूं देण्याबद्दल जागोजागी ठराव झालेले आहेत. ते कोणी अंमलांत आणलेले नाहींत व ते अंमलांत आणूं द्यायचीहि आज कोणाची इच्छा नाहीं, पण दुराग्रहाचा हाहि ताण फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं. नेटानें प्रयत्न केल्यास अस्पृश्योद्धार हा केवळ दहा-पांच वर्षांचा प्रश्न राहिलेला आहे. बाहेर देशीं आतां सर्व लोक बिनदिक्कत जात असतात व येतांना

एखादी परजातींतली बायकोहि करून घेऊन येतात. हिंदु धर्मातून परधर्मांत गेलेले आतां सररहा हिंदु धर्मांत परत येतात. एवढेंच नव्हे तर एखादा अस्सल, जातिवंत मुसलमान किंवा युरोपियन हिंदु झाल्यास त्यालाहि हिंदु धर्मांत जागा मिळते. खाद्यपेयांसंबंधानें डॉ. मुंजांसारखे हिंदु सभेचे अध्यक्षहि मांसाहारापर्यंत ब्राह्मणांना मुभा देत आहेत, तेव्हां आतां खाद्यपेयाच्या प्रश्नाचाहि बाऊ राहिलेला नाहीं हें उघड आहे.

म्हणजे **जोतिबांनीं** ज्या मुद्यांसाठीं परिश्रम सुरू केले, ज्यासाठीं कै. **भांडारकर** खपले, ज्यासाठीं कै. **महादेव गोविंद रानडे** झगडले किंवा ज्यासाठीं स्वामी **दयानंद** ह्यांनीं आर्यसमाज सुरू केला ते सर्व मुद्दे आज सनातन हिंदु धर्मानें कबूल केलेले आहेत. पन्नास-पाऊणशें वर्षांपूर्वी असें वाटत होतें कीं ह्यांपैकी एकेक मुद्दा प्रस्थापित करायला एकएक शतक लागेल. पण हे सर्व मुद्दे अर्ध्या-पाऊण शतकाच्या आंतच हिंदु धर्मानें कबूल केले आहेत. हें श्रेय बंडखोरांचें कीं बिनबंडखोरांचें, आघाडीच्या शिपायांचें कीं गांवांतल्या रहिवाशांचें—हें ठरविणें खरोखर कठिण आहे. खरें म्हटलें म्हणजे हें सर्वांचें संकलित श्रेय आहे. ह्यांत बंडखोर आणि बिनबंडखोर ह्या दोघांचाहि सारखा वांटा आहे. **जोतिबा** फुले क्रांतिकारक होते, **आगरकर** क्रांतिकारक होते, **रानडे, भांडारकर** क्रांतिकारक होते, बाबू **देवेंद्रनाथ** क्रांतिकारक होते, **दयानंद** क्रांतिकारक होते—ह्याचे उलट लो. **टिळक,** पंडित **मदनमोहन मालवीय, सुरेंद्रनाथ बानर्जी, श्रीमद्विवेकानन्द** किंवा **स्वामी रामतीर्थ** ह्यांनीं स्वतःस कधींहि क्रांतिकारक म्हणविलें नाहीं. परंतु दोघांचें एकच कार्य झालें. ह्यांनीं त्यांना ओढलें, त्यांनी ह्यांना ओढलें. ह्यांनीं त्यांच्यावर झोड उठविली, त्यांनीं ह्यांच्यावर झोड उडविली. पण अखेरीस सर्व एका " भूमिके "वर उभे राहिले. लो. टिळकांचे शिष्य म्हणविणारे **डॉ. मुंजे** व महात्मा जोतिबा फुले ह्यांचे शिष्य म्हणविणारे श्री. **भास्करराव जाधव** ह्यांचे विचारप्रांत आज अगदीं एकच आहेत. फक्त लेबलें निराळीं आहेत.

आणि ह्यावरूनच **सत्यशोधक** समाजानें आज काय केलें पाहिजे हें सहज दिसून येणारें आहे. जोंपर्यंत सनातन हिंदु समाज हा आडमुठा होता, तोंपर्यन्त बंडखोर किंवा क्रांतिकारक हें रूप त्याला अवश्य होतें. पण ज्या अर्थी तो आज आडमुठा राहिलेला नाहीं त्या अर्थी तें बंडखोरीचें स्वरूप आज ठेवायचें कांहीं कारण नाहीं. जोपर्यंत किल्ल्याचा दरवाजा उघडला जात नव्हता, तोपर्यंत तरवारीचे हात करणें जरुरीचें होतें, पण किल्ला उघडून दिवाणखान्यांत बोलावणें आलें असतांहि पट्ट्याचे हात करीत आंत शिरणें ह्याचे योगानें विनाकारण द्वेषभाव धुमसतो. **आर्यसमाजानें** हें चटकन् ओळखून त्याप्रमाणें गेल्या चार-पांच वर्षांत आपलें धोरण बदललें. त्यामुळें दहा वर्षांपूर्वी जो आर्यसमाज हिंदु समाजाला शत्रूसारखा भासत होता तो आज मित्रासारखा भासूं लागला आहे. नाहींतर पूर्वीच्या आमदानींत स्वामी श्रद्धानंदांचें एवढें वजन पडायची काय छाती

होती ? आज स्वामी श्रद्धानंद हे क्रांतिकारक पक्षाचे आहेत असें कोणीहि मानीत नाहींत. ते सनातन धर्माचे अध्वर्यु असे मानले जातात आणि त्यांच्यासाठीं प्रत्येक घरांत आणि प्रत्येक झोंपडींत अश्रूंचे पूर लोटतात.

ह्या बाबतींत श्री शिवाजी महाराज ह्यांचें उदाहरण फार लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. मनुष्य नवीन कार्य अंगावर घेतो किंवा नवीन कल्पना काढतो त्या वेळीं तो क्रांतिकारक समजला जाणें अगदीं अपरिहार्य आहे, परंतु पुढें त्यास क्रांतिकारकाचा झगा टाकून उद्धारकाचा झगा घेणें इष्ट असतें. कोणतीहि क्रांति घेतली तरी तो जुन्या कल्पनेचा सुधार किंवा जुन्या तत्त्वाचा उद्धारच असतो. मनुष्य स्वतःस शेवटपर्यंत क्रांतिकारक म्हणवून घेईल तर त्याच्याविषयीं लोकांच्या मनांत आपुलकी उत्पन्न होणार नाहीं. क्रांतिकारक मनुष्याविषयीं लोकांच्या मनांत विस्मय व आदर उत्पन्न होतो, पण आपुलकी उत्पन्न व्हायला क्रांतिकारकाचा वेष प्रतिकूल आहे. आपुलकी उत्पन्न व्हायला लोकांना असें मनापासून वाटलें पाहिजे कीं हा मनुष्य जुनें तत्त्व जास्त सुकर स्वरूपांत मांडायला आलेला आहे–तो पहिलें घर मोडायला आलेला नसून जुनें घर जास्त मोठें करायला आणि त्याला रंगसफेती द्यायला आलेला आहे.

श्रीशिवाजीमहाराज क्रांतिकारक आहेत अशी त्यांच्याविषयींची कल्पना जावळीच्या प्रकरणापर्यंत लोकांत होती. जावळीच्या मोऱ्यांकडून श्रीशिवाजीमहाराजांना जो इतका विरोध झाला त्याचें कारण हे कोणीतरी विचारशून्य क्रांतिकारक आहेत अशी लोकांची समजूत होती. बंडखोरांविषयीं लोकांच्या मनांत आदर व विस्मय असतो व 'वाः रे बहादर !' असें ते त्याच्याविषयीं मनांत म्हणतात, पण त्यांस कांहीं ध्येय आहे असें लोक मानीत नाहींत. श्रीशिवाजीमहाराजांनीं तोरणा वगैरे घेतला त्या वेळीं लोकांना विस्मय वाटला, पण हा हिंदु स्वराज्याचा ध्येययुक्त प्रयत्न आहे अशी चंद्रराव मोऱ्यांच्या प्रकरणापर्यंत लोकांस खात्री पटलेली दिसत नाहीं. मोऱ्यांनींहि श्रीशिवाजीमहाराजांस विरोध केला त्याचें कारण हे कोणीतरी हूड व दंगेखोर आहेत अशी त्यांची समजूत होती. चंद्रराव मोरे वगैरे लोक धर्माभिमान किंवा राष्ट्राभिमान ह्यांच्या अगदीं विरहित होते अशी जी आपण कल्पना करतों ती आपली चूक आहे. ते धर्माभिमानशून्य किंवा राष्ट्राभिमानविवर्जित मुळींच नव्हते. परंतु मनुष्य कितीहि स्वदेशाभिमानानें भारलेला असला तरी तो **तंट्या भिल्ल** किंवा **बाबू चष्मेवाला** ह्यास मदत करील काय ? कधींहि करणार नाहीं.

जावळीच्या मोऱ्यांनींहि ह्याच कारणामुळें श्रीशिवाजीमहाराजांना मदत केली नाहीं. ते त्यांच्याशीं युद्ध करायला उभे राहिले. तें बंड मोडायचा त्यांनीं विचार केला. जावळी-प्रकरणानंतर लोकांस श्रीशिवाजीमहाराजांच्या स्वराज्यध्येयाची ओळख वाटायला लागली. ह्या वेळीं लोकांना समजायला लागलें कीं महाराज हे क्रांतिकारक नव्हेत–ते स्वराष्ट्रतारक व स्वधर्मोद्धारक आहेत. महाराष्ट्राचें राज्य काबीज करतांना इंग्रज सरकार

देखील छत्रपतींचे प्रधान **पेशवे** हे राज्याची व्यवस्था नीट ठेवीत नसल्यामुळें छत्रपतींच्यातर्फे आपण पेशव्यांपासून राज्याचा तावा घेत आहोंत असा जाहीरनामा काढावा लागला ! मग श्रीशिवाजीमहाराज हे तर प्रत्यक्षच स्वधर्मोद्धारक होते. तेव्हां जावळी प्रकरणानंतर त्यांच्याविषयीं लोकप्रेमाच्या महासागराला भरती येऊं लागली ह्यांत नवल तें काय ?

क्रांतिकारकांनीं क्रांतीच्या सुरवातीनंतर क्रांतीचा परका वेष फेकून देऊन स्वधर्मोद्धारकाचा बाणा पत्करला असतां केवढें कार्य होतें ह्याचें आणखी एक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रांतील संतांची कामगिरी होय ! महाराष्ट्रीय संतांनीं प्रचलित धर्मकल्पनांत भयंकर क्रांति केली ही गोष्ट निर्विवाद आहे. किंबहुना प्राचीन वैदिक कल्पनांवर बौद्धधर्मानें जेवढे आघात केले त्यापेक्षांहि महाराष्ट्रीय साधुसंतांनीं जास्त केले.

वेद आम्हांसी रुसला
आम्हीं धरलें त्याच्या बाला

ह्या साधुसंतांच्या विनयोक्तीपेक्षा वेदावर बौद्ध धर्म काय जास्त आघात करणार ? परंतु बौद्ध धर्म हा क्रांतिकारक म्हणून आला–साधुसंत उद्धारक म्हणून आले बौद्ध धर्मानें बंडखोरी आरंभली-साधुसंत संरक्षक म्हणून उभे राहिले. बौद्ध धर्म शिव्याशाप देत आला–साधुसंतांनीं प्रेमाची भाषा केली. बौद्ध धर्म बुडविण्याकरिता आला–साधुसंत नम्र वृत्तीनें उभे राहिले. बौद्ध धर्माचे हातात पठाणाचा सुरा होता–साधुसंतांनीं शस्त्रक्रियेचा चाकू उचलला. बौद्ध धर्म वैदिक धर्मावें पोट फाडीन म्हणाला–साधुसंत म्हणाले, आम्हांसहि पोट फाडायचें आहे, पण तें पुन्हां शिवायचें आहे. बौद्ध धर्माजवळ विध्वंसनाचें कार्य होतें—साधुसंतांजवळ संस्थापनेचें कार्य होतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं बौद्ध धर्म हा लोकांना "आपला" असा कधींच वाटला नाहीं. अखेरीस श्रीशंकराचार्योंनीं त्याची उचलबांगडी केली. पण बौद्ध धर्मापेक्षांहि जास्त क्रांति करूनहि साधुसंत लोकांना आपलेसे वाटले व जनतेच्या देव्हाऱ्यांत ते कायमचे जाऊन बसले.

आर्यसमाज हें धोरण लवकर शिकला आणि म्हणून अखिल हिंदुसमाजास तो जास्त प्रिय होऊं लागलेला आहे. **दयानंदां**च्या वेळीं हिंदु समाजाचे व त्याचे उडालेले खटके आतां दोघेहि विसरून गेलेले आहेत व ते एकमेकांना जास्त जास्त मिठ्या मारूं लागले आहेत. प्रार्थनासमाजाच्या लक्षांत अजून हें येत नाहीं व ब्राह्मणसमाजहि अजून हें शिकला नाहीं पण ह्यामुळें हिंदुसमाजाचे मनांत अजूनहि त्यांच्याविषयीं परका भाव आहे. सत्यशोधक समाजाची भावी प्रगतिहि ह्याच मार्गानें व्हायला पाहिजे. प्रचलित हिंदु धर्माचे बालेकिल्ले आतां सर झालेले आहेत व हिंदु समाजानें आपखुषीनें किल्ल्याचे दरवाजे उघडलेले आहेत. तो सर्वांना आदबीनें दिवाणखान्यांत बोलावीत आहे. ह्या वेळीं गुरगुरण्याची, क्रोधाची, ईर्षेची, संतापाची किंवा क्रांतीची भाषा कशाला ?

सत्यशोधक समाजाला हें करणें फारसें अवघड नाहीं. उलट एका तऱ्हेनें त्यासहि ही गोष्ट फारच चांगल्या रीतीनें साधेल. **प्रार्थनासमाज** किंवा **ब्रह्मसमाज** ह्यांस ही गोष्ट इतकी साधणार नाहीं. **आर्यसमाजानें** जनता व सुशिक्षित वर्ग ह्यांच्यामधीं प्रथमपासून नातें जोडलेलें आहे. तसें नातें **सत्यशोधक** समाजानें जोडलेलें नसलें, तथापि जनतेचा आणि त्याचा संबंध आहे. लोकसमुदायाशीं इतका जिव्हाळ्याचा संबंध असल्यावर क्रांतिकारकाचा वेष टाकून संस्थापकाचा अधिकार उचलणें कितीसें अवघड आहे ? धर्मसंस्थापकांना जी अडचण पडते ती जनतेची अंतःकरणे काबीज करण्यासंबंधाची असते. पण **सत्यशोधक** समाजास ती गोष्ट प्रथमपासूनच साध्य आहे. आतां फक्त सुशिक्षित ऊर्फ पांढरपेशा समाज उरलेला आहे. ब्राह्मणवर्ग ह्याच वर्गांत येतो. ब्राह्मण म्हणजे भट नव्हत. उलट भटशाहीपासून ब्राह्मणेतरांवर जितका जुलूम होतो तितकाच किंबहुना त्याहूनहि जास्त जुलूम ब्राह्मणवर्गावर होतो. ब्राह्मणेतर वर्गाइतकाच ब्राह्मणवर्ग कींव करण्याजोगा आहे. समाज तारायचा, राष्ट्र उद्धरायचें, लोकांना सन्मार्गाला लावायचें, त्यांत ब्राह्मण कसले आणि ब्राह्मणेतर कसले ? तुकाराममहाराजांनीं ब्राह्मणांसाठी एक गाथा आणि ब्राह्मणेतरांसाठी दुसरा गाथा लिहिला नाहीं. एकनाथांनीं ब्राह्मणांसाठी एक रामायण व ब्राह्मणेतरांसाठीं दुसरें रामायण लिहिलें नाहीं. नामदेवांनीं ब्राह्मणांसाठी एक प्रार्थना व ब्राह्मणेतरांसाठीं दुसरी प्रार्थना लिहिली नाहीं. 'धर्मस्थापनेचे नर'– त्यांना सर्व समाज सारखा ! पर्जन्याप्रमाणें सर्वांवर सारखी उपदेशवृष्टि करायला ते तयार असतात. ज्यांना हवी असेल त्यांनीं ती घ्यावी आणि स्वतःचा उद्धार घडवून आणावा. ज्यास ती नको असेल त्यांनीं ती वृष्टि होत असतां खुशाल दुरभिमानाच्या छत्र्या धराव्या. त्याबद्दल कुणाची ना असणार ?

पण ह्याला आपण बंडखोर नाहीं तर संस्थापक आहोंत ही जाणीव सत्यशोधक समाजांत वाढली पाहिजे. अजून त्यांच्यातील तरुण अनुयायांच्या डोळ्यांवर धर्मक्रांतीची लाली आहे. अजून त्यांचें मन बंडाच्या आवेशानें खवळलेलें आहे. अजून त्यांच्या कानांत तरवारींचा खणखणाट आहे. हा तरवारींचा खणखणाट एके काळीं योग्य होता. एके काळीं तरवार मारून प्रचलित हिंदु धर्म-समजुतीचे तट फोडून जायचें होतें. परंतु आता त्यांची जरुरी नाहीं. आतां स्वातंत्र्यतत्त्वाचे पुरस्कर्ते, हिंदुधर्मांतील नवीन युगाचे प्रचारक, हिंदुस्थानच्या नवजीवनाचे संस्थापक ह्या नात्यानें सर्व समाजाकडे बघितलें पाहिजे व ह्या नात्यानेंच सर्वांशीं आचरण ठेवलें पाहिजे.

आणि असें आचरण ठेवायचें म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा भेद सत्यशोधक समाजानें करतांच उपयोगी नाहीं. सत्यशोधक समाजानें धर्मस्वातंत्र्याचें विशाल ध्येय सर्व लोकांपुढें एकदम ठेवून तीं तत्त्वें सर्वदूर बिंबविण्याचा प्रयत्न ह्यापुढें करणें इष्ट आहे. धर्मस्वातंत्र्याचें उच्च तत्त्व ज्याला ज्याला म्हणून पटेल त्याच्या त्याच्या मार्गें लागून त्यास आपल्यांत समाविष्ट केल्याशिवाय महात्मा जोतिबा फुल्यांनीं जो मार्ग चोखाळला त्या मार्गाचें पूर्ण

चीज झालें असें म्हणतां यायचें नाहीं. स्वातंत्र्याचा महामंत्र प्रत्येक व्यक्तीला द्यायचा आणि जो जो भेटेल त्याच्या पायांतील बेड्या तोडून टाकायच्या असा सररहा प्रयत्न केल्याशिवाय ज्या उद्देशानें महात्मा जोतिबा फुले ह्यांनीं सत्यशोधक स्थापला त्या उद्देशाला पुरा वाव कसा मिळेल? स्वातंत्र्याचा हा मंत्र सररहा देत असतांना ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा भेद पाळणें शक्य नाहीं. स्वातंत्र्याचीं तत्त्वें म्हणजे आकाशांतील निर्मळ वातावरणांतून येणारा स्वातंत्र्याचा अमृतपर्जन्य आहे. तो सर्वांच्याकरितां आहे व सर्वांना त्याचा सुबलक लाभ देणें हेंच योग्य आहे.

प्रस्तुतचा हिंदुसमाज जरी तत्त्वदृष्ट्या सर्वांच्यासाठीं असला तरी त्यांत आज अनेक वर्गांना मज्जाव आहे. "अस्पृश्य" म्हणून गणला जाणारा वर्ग तर इतका दुर्दैवी आहे कीं त्याला आजच्या हिंदु धर्मापासून फारच थोडा लाभ आहे. अशा रीतीनें एकलकोंडा बनलेल्या हिंदु समाजाचीं तत्त्वें जरी कितीहि संग्राहक असलीं तरी त्या तत्त्वांचा कांहींएक उपयोग नाहीं. नुसतें तत्त्व म्हणजे कृति नव्हे–नुसतें तत्त्व म्हणजे लोकांचा उपयोगहि नव्हे. तत्त्व ज्या वेळीं कृतींत उतरतें त्याच वेळीं त्या तत्त्वाचा फायदा होतो. हिंदु धर्म आज अनेक वर्षें किंवा अनेक शतकें जो विजयाला मुकलेला आहे त्याचें कारण त्यानें तत्त्व ठेवलें, पण कृति टाकली! हिंदु धर्माला अशा रीतीनें उपयोगशून्यता आली. इतका सुंदर हिंदु धर्म, पण तो निरर्थक किंबहुना अनर्थकारक झाला. ही चूक **सत्यशोधक** समाजानेंच काय, पण कोणत्याहि धार्मिक चळवळीनें करतां उपयोगी नाहीं. धार्मिक चळवळींनीं अन्यायांच्या पाठीमागें लागावें, पण व्यक्तींच्या किंवा समाजाच्या पाठीमागें लागूं नये!

अन्याय करणाऱ्या व्यक्तिहि न्यायाच्या इच्छेनें प्रवृत्त झालेल्या असतात. हिंदूंवर जुलूम करणारा औरंगजेबहि आपण अल्लाची सेवा करीत आहोंत ह्या समजुतीस बळी पडलेला असतो. त्या वर्गांतील इतर व्यक्ति तर केवळ अनुकरणानें चाललेल्या असतात. त्यांची ती "मनोवृत्ति" बदलणें हें खरें शहाणपण आहे—ह्यांत खरा विजय आहे. त्या व्यक्तींच्या किंवा त्या समाजाच्या पाठीमागें लागून एका विशिष्ट वर्गावर रोख धरणें हें व्यापकत्वाला व विजयाला बाधक आहे. विरोधी समाज आपल्या उपदेशानें वळविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत पाहिजे–त्याच्यावर जिह्वा अथवा तरवार ह्यांचे प्रहार करण्यानें मतांचा प्रसार होत नाहीं. उपदेशाच्या माधुर्याची ऊब हळूहळू वाढवा म्हणजे–मनुष्य आपल्या जुन्या मतांचें पांघरूण आपोआप टाकून देतो. त्यास धोपटीत सुटा कीं तो तुमचा शत्रु होतो, तो प्रतिकाराची इच्छा धरतो, तो स्वतःत सुधारणा करून तुमच्यापेक्षां एवढा श्रेष्ठ होण्याचा संभव असतो कीं तुम्हांला पराभव द्यायला तो समर्थ होतो. नेपोलियनला आपले शत्रु बडवितां आले, पण जिरवितां आले नाहींत, म्हणून तेच शत्रु त्याच्याच विद्येच्या जोरावर त्याचा पाडाव करण्यास समर्थ झाले. औरंगजेबानें हिंदु

लोकांवर एवढा कटाक्ष ठेवला म्हणूनच त्यांच्यांत श्रीशिवाजीमहाराज उत्पन्न होऊन त्यांनीं औरंगजेबाच्या देखत त्याच्या कार्याचा विध्वंस केला. बौद्ध लोकांनीं जें कार्य उचललें तेंच साधुसंतांनीं त्यांच्यापेक्षांहि यशस्वी केलें. पण बौद्ध लोकांना विरोधी पक्ष पचवितां न आल्यामुळें ते अखेरपर्यंत परकेच राहिले--आणि क्रांतिकारकांपेक्षांहि जास्ती क्रांति करून महाराष्ट्रीय संत महाराष्ट्रीय जनतेचे पंचप्राण झाले–त्यांच्या स्नेहबिंदूंतील स्नेह व रक्तबिंदूंतील तेज बनले !

थोर लोक अन्यायांकडे पाहतात–ज्यांचेतून अन्याय उत्पन्न होतो त्या व्यक्तींकडे किंवा समाजाकडे पहात नाहींत. त्या थोर लोकांचा हा जन्मसिद्ध स्वभाव आहे आणि म्हणून त्यांच्या हातांत ऋद्धिसिद्धि तयार असतात. थोरांचें थोर कार्य चाललें असतां अमुक कोणत्या जातीचा, आणि तमुक कोणत्या जातीचा, हा क्षुद्र विचार त्यांना स्पर्शहि करीत नाहीं. ते कार्याकडे दृष्टि ठेवतात व त्या कार्यास जे हातभार लावतात ते त्यांचे प्यारे बनतात ! पहिल्या बाजीराव साहेबांनीं हा ब्राह्मण, हा मराठा, हा धनगर असला क्षुद्रभाव विषाप्रमाणें दूर ठेवून आपल्या देणग्यांची खैरात मर्दुमकीच्या लायकीप्रमाणें सर्वांवर केली आणि म्हणूनच **शिंदे, होळकर** हीं घराणीं उदयाला येऊन महाराष्ट्राच्या पडत्या काळांतदेखील तीं आज मराठ्यांची कीर्ति, इभ्रत व अब्रू सांवरून धरीत आहेत. निजामशहाला क्षणोक्षणीं लढाईंत लोळवत असतांहि मुसलमानाचा द्वेष बाजीरावानें स्वप्नांतहि केला नाहीं. एवढेंच नव्हे तर मुसलमानी राजसत्तेला धुळीला मिळविणाऱ्या ह्या बहादराच्या मर्दुमकीकडे पाहून **मस्तानी**सारखी एक मुसलमान तरुणीहि त्यांचेवर फिदा झाली ! हिंदु धर्मांत जो येईल त्याच्या कुळशीलाकडे न पाहतां त्यास **मराठा** जातींत सामील करण्याची अत्यन्त उदार कल्पना श्री. **जवळकरांनीं** काढलेली आहे आणि ती इतकी थोरपणाची आहे कीं तिला सीमाच नाही. श्रीमंत बाजीरावसाहेबांनींहि मस्तानीच्या मुलाची मुंज करून त्यास हिंदु धर्मांत सामील करून घ्यायची कल्पना दोनशें वर्षांपूर्वीच्या त्या जुन्या काळांत काढली ! महाराष्ट्राच्या सरहद्दीवर जर त्या वेळीं शत्रु खडे नसते तर ज्याप्रमाणें कै. श्रीशाहुमहाराजांनीं कोल्हापुरच्या **खोचीकरांस** एका मुसलमान स्त्रीचेपासून झालेलीं मुलें **मराठा** जातींत सामील करून घेऊन हिंदु धर्माचें सौभाग्य वाढविलें त्याप्रमाणें बाजीरावसाहेबानींहि मुसलमान स्त्रीच्या पोटच्या मुलांची मुंज गाजवून हिंदु धर्माचें क्षेत्र वाढविलें असतें. कै. स्वामी **श्रद्धानंद** ह्यांनीं हिंदु धर्माचें विस्तारक्षेत्र अधिक विस्तीर्ण करून विश्वव्यापकत्वाची शोभा त्यास आणण्याचा जो प्रयत्न केला त्यास बीजभूतानें कै. श्रीमंत बाजीरावसाहेबांचेहि प्रयत्न सहाय्यभूत झालेले आहेत. थोर माणसें जातपात पाहत नाहींत–कार्य पाहतात. त्यांचा रोख जुलमावर असतो, जुलूम करणाऱ्या व्यक्तींवर नसतो.

ह्याचें बाजीरावसाहेबांपेक्षांहि मोठें उदाहरण म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें श्रीशिवाजी-महाराजांचें होय ! बाजीरावसाहेब मुसलमानी सत्तेविरुद्ध लढत असतांहि मुसलमान जातीवर

ज्याप्रमाणें रोख धरीत नसत, त्याप्रमाणेंच श्रीशिवाजीमहाराजांचाहि मुसलमान जातीवर रोख नव्हता. कल्याणच्या मुसलमान सुभेदाराची सून त्यांनीं केवढ्या उदार पवित्रतेनें तिच्या पतीकडे पाठविली ह्याची साक्ष इतिहासाच्या परममंगल विजयघंटा देत आहेत. त्यांनीं आपल्या सैन्यात मुसलमान लढवय्ये ठेवले–आपल्या आरमारांत मुसलमान "ऑफिसर" नेमले. दिल्लीपति औरंगजेबाच्या मगरमिठींतून मोठ्या हिकमतीनें स्वतःची सुटका करून घेत असतां त्यांना त्यांत सहाय्य करणारा कोण होता? तर एक **मुसलमान** सेवक! हिरोजी फर्जंदाप्रमाणें औरंगजेबाच्या रागाचा सपाटा सहन करायला तो उभा राहिला– त्यानें आपली मान दिली, पण इमान सोडलें नाहीं.

पण श्रीशिवाजीमहाराजांच्या मनाचें अत्यंत मोठें औदार्य म्हणजे आपल्या राज्याभिषेकाच्या वेळीं त्यांनीं दाखविलेली शांति होय! ते राज्याभिषेक करायला निघाले असतां ज्या वेळीं महाराष्ट्रांतील भिक्षुकवर्गानें "आम्ही तुम्हांस राज्याभिषेक करीत नाहीं" असें साफ उत्तर दिलें. त्या वेळीं एखादा **वावुराव यादव** असता तर त्यानें डोक्यांत राख घातली असती–एखादा **आंबेडकर** असता तर "ह्यापेक्षां मी मुसलमान होईन" असा त्यानें धाक दाखविला असता–एखादा **औरंगजेब** असता तर त्यानें ब्राह्मणवर्गाची कत्तल करण्याचा हुकूम फर्माविला असता! परंतु श्रीशिवाजीमहाराजांनीं ह्यांपैकीं कांहींएक केलें नाहीं. महाराष्ट्रीय भिक्षुकवर्गास मान्य असलेल्या श्रीकाशीक्षेत्रांतील एक पंडित त्यांनीं आणविला व त्याचेकडून राज्याभिषेक करवून घेऊन महाराष्ट्रीय भिक्षुकवर्गाचा विरोध नाहींसा केला! ह्या अलौकिक उदार वर्तनाचीं अमृततुल्य फळें महाराष्ट्रास पुढें चाखायला मिळालीं! ब्राह्मणांपासून तों अत्यंत अशिक्षितांपर्यंत सर्व वर्ग महाराजांवर दिलखुष राहिले आणि संभाजीमहाराजांनंतर महाराष्ट्राची गादी जिंजीला गेली असतांहि महाराष्ट्रांतील सर्व वर्ग एक होऊन त्यांनीं महाराष्ट्राच्या शत्रूंना येथून पिटून काढले. महाराष्ट्राच्या इतिहासांतील हा भाग म्हणजे कैलासवासी झालेल्या श्रीशिवाजीमहाराजांनंतर जोमानें जिवंत राहिलेल्या त्यांच्या कर्तबगारीचा उत्तमोत्तम गाभा होय! ह्या प्रसंगाचें वर्णन करीत असतां युरोपियन इतिहासकारहि गहिंवरतात–पाझरतात. जगाच्या इतिहासांतील अत्यंत विरळ अशा प्रसंगांपैकींच हा प्रसंग होय असें कबूल करतात! त्रिकालकीर्ति शिवाजीमहाराजांच्या हिमालयोत्तर उदार वृत्तीचाच हा विजय होय! त्याचाच हा दुमदुमाट–त्याचाच हा घमघमाट!

पण इथें असा प्रश्न उद्भवतो कीं एक घाव दोन तुकडे करून एखादें कार्य जर सहज साधण्याजोगें आहे, तर तेथें उदारपणाचे इतके वळसे कशाला? पण त्याचें उत्तर असें आहे कीं एक घाव दोन तुकडे केल्यानें जय मिळाला असें तात्पुरतें वाटतें, पण जय खरा नसतो व तो टिकतहि नाहीं. जगांत असें एकहि तत्त्व नाहीं कीं जें "घाव" घातल्यामुळें तुटलेलें आहे. तें तितक्यापुरतें जरी दबलें तरी तें पुन्हां वर डोकें काढतें. ख्रिस्ती धर्मावर

हत्यार चालवून एक घाव दोन तुकडे करण्याचा अनेक रोमन् बादशहांनीं प्रयत्न केला, ख्रिस्ती धर्माचें उच्चाटन हा ह्याचा परिणाम न होतां उलट **रोम** ही ख्रिस्ती धर्माची **मुख्य गादी** झाली. औरंगजेबाचें उदाहरण वर दिलेंच आहे. त्यानें जसे **संभाजी**-महाराजांचे हाल केले, तसे शिखांचेहि हाल केले ! पण त्यामुळें मराठेहि बुडाले नाहींत व शीखहि बुडाले नाहींत ! उलट त्याचेमुळें औरंगजेब मात्र बुडाला ! त्याला मराठी मुलखांत येऊन कबर घ्यावी लागली व त्याच्या मरणास दहा-बारा वर्षें होतात न होतात तोंच **बाळाजी विश्वनाथा**ला दिल्लीस जाऊन सय्यद बंधूंविरुद्ध त्याच्या वंशजाला सहाय्य करावें लागलें. तेव्हां एक घाव दोन तुकडे करूं–चेचूं-ठोकूं-नेस्तनाबूद करूं–ही भाषाच चुकीची आहे. ह्या जगांत पचवितां येतें–खचवितां येत नाहीं. विरोधी पक्षाशीं शान्त वृत्तीनें वागून प्रेमाच्या उदरांत त्यांना पचविण्याचा प्रयत्न कराल तर पचतील, पण ठोसेबाजीखालीं त्यांना खचवूं असें मनांत आणाल तर ते जास्त बलाढ्य होतील. शान्तीच्या वृत्तीमध्यें स्वतःचा घात आहे ही कल्पना चुकीची आहे. श्रीशिवाजीमहाराजांनीं प्रतिपक्षाशीं उदारपणाचें वर्तन केलें म्हणून श्रीशिवाजीमहाराज नामशेष झाले नाहींत–प्रतिपक्षीच नामशेष झाले ! तुकाराम महाराजांच्या वह्या इंद्रायणींत बुडविल्या म्हणून तुकाराममहाराजांची अभंगवाणी नामशेष झाली नाहीं–प्रतिपक्षीच नामशेष झाले ! एकनाथाचे अंगावर त्याचे प्रतिपक्षी शम्भर वेळां थुंकले म्हणून एकनाथ नामशेष झाले नाहींत–प्रतिपक्षीच नामशेष झाले.

प्रतिपक्षाचा विरोध नाहींसा करण्याचा उत्कृष्ट उपाय म्हणजे जुलमाविरुद्ध मोहीम करणें–व्यक्तींविरुद्ध किंवा कोणत्याहि विशिष्ट वर्गाविरुद्ध मोहीम करणें नव्हे ! नवीन मत स्थापायचें म्हणजे जुन्या मताच्या विरुद्ध मोहीम करावीच लागते. पण जुन्या मताचे विरुद्ध ही जी मोहीम करायची त्यांतील यशस्वी मार्ग म्हणजे जुन्या मताचीं माणसें शांति आणि प्रेम ह्यांचे साधनांवर आपल्यांत आणून त्यांचीं मतें पचवून टाकणें–जुन्या मतांच्या लोकांवर आघात करून त्यांना विच्छेद करणें नव्हे ! विच्छेद करण्याच्या मार्गानें तेढ वाढते, शत्रुत्व वाढतें, विरोधी पक्ष बळावतो, विजय दूर होत जातो.

पण शांति धरणें म्हणजे तडजोड करणें किंवा आपलीं मतें सोडून देणें असाहि त्याचा अर्थ नाहीं. Truth knows no compromise–सत्याला समेट आवडत नाहीं. दोन आणि दोन म्हणजे चारच ! ते तीनहि नव्हेत किंवा पांचहि नव्हेत. प्रतिपक्ष्यांना खूष करण्याकरितां जर आपण दोन आणि दोन पांच असें कबूल करायला लागलों तर कोणत्याहि चळवळींत खरेपणा राहणार नाहीं. **सत्य** हा प्रत्येक चळवळीचा प्राण आहे. चळवळींत सत्य असेल तरच तिला यश येईल, नाहींतर येणार नाहीं. सूर्य पृथ्वीचे भोंवती फिरत नसून पृथ्वी सूर्याचे भोंवती फिरते असें जेव्हां **कोपर्निकस**नें प्रतिपादन केलें त्या वेळीं **पोप**नें त्याचेवर बहिष्कार टाकून त्याचा पुष्कळ छळ केला. पण इतका छळ सोसूनहि **पृथ्वी फिरते हेंच खरें** असें म्हणायला तो कचरला नाहीं. **शांति**

ह्याचा अर्थ आपलीं तत्त्वें सोडून देणें नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ मेंगेपणाहि नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ अजागळपणाहि नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ अपमान सोसणेंहि नव्हे. जो आपला अपमान करील त्याला तिथल्या तिथें चटकणी दिलीच पाहिजे. जो आपल्या अंगावर येईल त्यास लोळविलाच पाहिजे. गबाळी पोषाख करून लोकांच्या दयेला पात्र होणें हाहि **शांति** शब्दाचा अर्थ नाहीं. जरा नीटनेटका किंवा गहिरा पोषाख केला, मिशीवर पीळ दिला किंवा दंडाचा आवाज केला म्हणून **शांति** बिघडत नाहीं. **शांति** ही **स्वाभिमान** किंवा **कुरेंबाजपणा** ह्यांची द्वेष्टी नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ कोणाचाहि द्वेष न करणें. **शांति** ह्याचा अर्थ शक्य तितकें दुसऱ्याशीं जमवून घेणें. **शांति** ह्याचा अर्थ कुरापती उकरून न काढणें. **शांति** ह्याचा अर्थ समाजाच्या अन्तःकरणावर आपलीं तत्त्वें ठसविण्याकरितां **ठोसेबाजी**च्या ऐवजीं **समजुती**च्या मार्गाचा अवलंब करणें! ह्या मार्गास जरा उशीर लागतो. ठोसेबाजीइतकें तात्कालिक यश त्यास येत नाहीं. पण जें यश येतें तें कायमचें असतें. ठोसेबाजीचें यश ठोसेबाजीबरोबरच जातें, पण कोणत्याहि व्यक्तीचा किंवा वर्गाचा द्वेष न करतां समजुतीच्या, स्वार्थत्यागाच्या व सत्यप्रतिपादनाच्या मार्गानें मिळविलेलें यश कधींहि नाहींसें होत नाहीं.

ब्राह्मणवर्ग आणि **भिक्षुक**वर्ग हे दोन वर्ग जर आपण घेतले तर त्यांतील **ब्राह्मण**वर्ग हा **भटशाही**च्या दोषांपासून मुक्त आहे हें मीं मागें दाखविलेंच आहे. तो स्वतःच **भटशाही**च्या जुलमाचा बळी आहे. त्यानें भटशाहीचे जुलूम कोणावर कधींहि केले नाहींत व ते करण्याची त्याची प्रवृत्तिहि नाहीं. भिक्षुकवर्गाचीं 'पातकें' ब्राह्मणवर्गावर विनाकारण बसविलीं गेलीं आहेत आणि त्यामुळें भिक्षुकवर्गाच्या नालस्तीचे बरबंटे ब्राह्मणवर्गावर विनाकारण फिरविले गेलेले आहेत. वस्तुतः हिंदुस्थानांत जसे बाकीचे समाज आहेत, तसाच ब्राह्मण समाज आहे. ते जसे उद्योगी आहेत, तसाच हाहि उद्योगी आहे. ते जसे पापभीरु आहेत, तसाच हाहि पापभीरु आहे. भटशाहीचीं जीं सुखदुःखें त्यांना आहेत, तींच ह्यासहि आहेत. मीं वर दाखविल्याप्रमाणें इतर समाजाशीं तुलना करतां ब्राह्मण समाज संपत्तीनेंहि अधिक नाहीं. जमीन महसूल व इन्कमटॅक्स ह्या ज्या सरकारी उत्पन्नाच्या दोन बाबी त्यांत ह्यांचें नांव फारच खालीं आहे.

मग **भट**शाही ही कोण? **भट**शाही म्हणजे प्रचलित धर्मसमजुतींची अंमलबजावणी करण्याकरितां जो एक विशिष्ट वर्ग प्रत्येक समाजांत निर्माण झालेला असतो ती **भट**शाही! सरकारी कायद्यांची अंमलबजावणी करण्याकरितां जसे सरकारी अधिकारी नेमलेले असतात, तसाच हा एक अधिकारीवर्ग प्रत्येक राष्ट्रांत निर्माण झालेला असतो. ह्यास वेतन कोठें **दक्षिणे**च्या रूपानें देण्यांत येतें व कोठें पगाराच्या रूपानें देण्यांत येतें. हिंदु धर्माची प्रवृत्ति प्रायः लोकशाहीकडे असल्यामुळें हिंदु धर्मांत **दक्षिणे**चें रूप जास्त प्रचलित आहे. हिंदु धर्मांत उत्पन्नें, पगार किंवा अग्रहार नाहींत असें नाहीं. धर्म-

स्थानांचा प्रश्न ह्यामुळेंच वारंवार उत्पन्न होतो. पण अशीं उत्पन्नें असणारे भिक्षुक एकंदरींत थोडे! मुख्यतः त्यांच्या निर्वाहाची बाब म्हणजे भोजन व दक्षिणा! पण ह्यामुळें त्यांचा उदरनिर्वाह **दिवाणांच्या पगाराप्रमाणें** लोकमतांवर अवलंबून बसलेला आहे. लोकांत श्रद्धा असेल तर ते त्यांना दक्षिणेला आणि भोजनाला बोलावतील, नाहींतर नाहीं. **बोले** बिलानें तर त्यांना लोकांच्या जास्तच मुठींत आणून ठेवलेलें आहे. परंतु इंग्लंडमधील **भट**शाहीचें तसें नाहीं. त्यांना ठराविक पगार आहेत व ते त्यांना सरकारी तिजोरींतून मिळत असतात. ह्यामुळें लोकांची धर्मश्रद्धा उडाली तरी भटांच्या पगाराला धोका नसतो. एवढेंच काय, पण इंग्लंडचा धर्म खिस्ती असल्यामुळें जे खिस्ती पाद्री हिंदुस्थानांत येतात, त्यांचा पगार हिंदुस्थानच्या तिजोरींतून बेधडक देण्यांत येतो. बापाच्या श्राद्धासाठीं भटाला बोलावलें म्हणजे त्याला विनाकारण जेवण व दक्षिणा द्यावी लागते असें आपण अनेक वेळां म्हणतों, पण निदान तो बाप तरी आपला असतो. पण इंग्रज लोकांच्या बापासाठीं जीं श्राद्धें हिंदुस्थानांत करण्यात येतात त्यांची दक्षिणा ते हिंदुस्थानच्या म्हणजे आपल्याकडून घेतात. म्हणजे बाप त्यांचा व दक्षिणा आमची! किती हा विचित्र प्रकार!

हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं **भट**शाही फक्त हिंदुस्थानांतच असल्याची जी आपली कल्पना आहे ती अगदी मिथ्या आहे. सर्व जगांतील राष्ट्रांतून **भट**शाही आहे व चोहींकडे ती सारखीच अज्ञानी, सारखीच जुलमी व सारखीच दुराग्रही आहे. ती जर कोठें कमी जाचक असेल तर ती हिंदुस्थानांतच आहे, कारण तिला राजाश्रय नाहीं. पण जेव्हां तिला राजाश्रय होता त्यावेळींहि जे राक्षसी प्रकार तिनें युरोपांत केले ते इकडे केले नाहींत. ह्याचें कारण अर्थात्च हिंदु धर्माचें परम उच्च तत्त्वज्ञान! ह्या तत्त्वज्ञानामुळें मनुष्य कितीहि दुष्ट झाला तरी त्याच्या अंगचें शील अजिबात नष्ट होत नाहीं. युरोपखंडांत तसें नाहीं! युरोपखंडांत तत्त्वज्ञानाचा जन्म अगदीं अर्वाचीन आहे आणि तोहि धर्माच्या संगतीनें झालेला नसून धर्माच्या छातीवर पाय देऊन झालेला आहे आणि त्यामुळें युरोपांत शीलाचा अंश साहजिकच कमी असतो. तेथें दुष्ट म्हटला म्हणजे अगदीं निखालस दुष्ट! त्यांत माणुसकीचा ओलावाहि दिसायचा नाहीं! आज देखील खिस्ती मनुष्याला फार निर्बंध आहेत. खऱ्या खिस्ती मनुष्याला रविवारीं सर्व गोष्टी करायची छाती नाहीं आणि त्याचप्रमाणें खऱ्या मुसलमानाला चित्रकलेला हात लावतां येत नाहीं! **बायबल** न शिकविणारी शाळा काढली म्हणून अगदीं अलिकडे म्हणजे १९०८ सालीं **स्पेन**मध्यें एका थोर पुरुषास फांशी देण्यांत आलें. दोन वर्षांपूर्वी काडीमोड करण्याच्या कायद्याची इंग्लंडमध्यें दुरुस्ती करायचें ठरलें त्या वेळीं जागोजागी पाद्यांकडून म्हणजे **भट**शाहीकडून विरोध झाला! अजूनहि तिकडे काडी मोडणें म्हणजे मोठा उपद्व्याप आहे! इकडे तें फार सोपें. **विजयी मराठा** किंवा **भाला** ह्यांत नोटीस दिली कीं झाली काडीमोड!

अलीकडे रजिष्टर पद्धतीनें लग्न करण्याची चाल पडत चाललेली आहे, पण रजिष्टर पद्धति म्हणजे काय ? तर भटशाहीच ! इतके दिवस इंग्रज सरकार लग्नें लावून दक्षिणा घेत नसे, पण तें आतां घेऊं लागलें हाच त्याचा खरा अर्थ आहे. हा जर त्याचा हेतु नसता तर त्यासाठी इंग्रज सरकारनें फी ठेवली नसती. ही फी भटाच्या दक्षिणेपेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहीं. पूर्ण विचार केला तर भटाची दक्षिणाच ह्यापेक्षां स्वस्त पडते. रजिष्टर पद्धतीनें लग्न लावलें म्हणजे पैसे कमी लागतात असा पुष्कळांचा समज आहे. पण ही त्यांची चूक आहे. साधारण लग्नांत आपण जेवणाखावणाचा खर्च धरतों म्हणून तीं आपणांस महाग वाटूं लागतात, पण हा खर्च किंवा मानपान एका बाजूला ठेवला म्हणजे भटाचा खर्च अगदीं थोडा असतो. रजिष्टरच्या फीपेक्षां तो खात्रीनें कमी असतो. रजिष्टरी लग्नांत भटशाही असूं नये अशी जर इंग्रज सरकारची इच्छा असती तर इंग्रज सरकारनें त्यास फी ठेवली नसती ! वधूवरांनीं एकमेकांशीं लग्न लावून त्यावर दोन प्रतिष्ठित माणसांच्या किंवा जे. पीं.च्या सह्या घेतल्या म्हणजे पुरे असें सरकारनें ठरविलें असतें. पण भट दक्षिणेसाठीं अडवितो व इंग्रज सरकारचा रजिष्ट्रार फीशिवाय अडवितो !

भटशाही आडमुठी व अज्ञानी कां असते व तिचा जुलूम कां असह्य होतो ह्याचें कारण तें अंमलबजावणीचें खातें असतें, विचारप्रसाराचें खातें नसतें. **भट**शाही हें Executive Department आहे, Legislative Department नव्हे. लग्न लावणाऱ्या रजिष्ट्रारपुढें जाऊन जर त्यास आपण असा उपदेश करायला लागतो कीं "गड्या, ही फी कशाला मागतोस ? आमचें लग्न तसेंच लाव पाहूं ! " तर तो आपणांशीं वादविवाद करायचेऐवजीं रजिष्टर कचेरींतून उठायला सांगेल. त्याला एवढेंच माहीत आहे कीं अमुक एक फी आली म्हणजे अमुक शपथा द्याव्या व अमुक अमुक नोंदणी करावी. भटाचेहि तसेंच असतें. अमुक एक कार्य असलें म्हणजे अमुक एक मंत्र म्हणावा व त्याबद्दल अमुक एक दक्षिणा द्यावी ! त्याला ह्यापेक्षां कांहीं जास्ती माहीत नसतें ! समाज म्हणजे काय, लग्न म्हणजे काय, त्यास भट कशाला लागतो, मंत्र कां म्हटले पाहिजेत, मंत्रांचा अर्थ काय हें त्यास काय माहीत ? व माहीत असण्याचे कारण तरी काय ? रजिष्टराशीं तुम्हीं वादविवाद घातला तर तो तुम्हांला रजिष्टर कचेरींतून काढून लावील, भटाशीं वादविवाद घालायला लागला तर तो तुम्हांस **नास्तिक** म्हणून निघून जाईल.

आतां **भट**शाहीस मीं **अज्ञानी, आडमुठी, जुलमी** व **दुराग्रही** म्हटलें त्याचा आतां अर्थ काय आहे तो पाहूं. ह्यावरून तीं माणसें दुष्ट आहेत, राक्षस आहेत, वळणावर येण्याजोगीं नाहींत किंवा माणुसकीच्या पलीकडचीं आहेत असा जर कोणी अर्थ करील तर तो खरा नाहीं. तींहि माणसेंच आहेत, पण त्यांचा पेशा अंमलबजावणीचा असल्यामुळें त्यांचा नाइलाज आहे. रेल्वेवर युरोपियनांसाठीं थर्ड क्लासचा डबा रिझर्व्ह

करून ठेवणें हें अन्यायाचें आहे हें आतां जगजाहीर आहे. पण हा जुलूम नाहींसा करण्याचें काम सरकारचें असून रेल्वे नोकरांचें नसल्यामुळें एखादा हिंदु मनुष्य रिझर्व्ह डब्यांत जाऊन बसल्यास रेल्वेचा नोकर लगेच त्यास खालीं उतरविण्याकरितां येईल. हा अन्याय आहे हें त्यास माहीत असेल, त्यासाठीं मनांतून तो स्वतःहि संतापेल, पण त्यामुळें तो आपल्या कामांत चुकणार नाहीं! रस्त्यांतून उजव्या हातानें गाडी हांकणें किंवा डाव्या हातानें हाकणें, **नीतिदृष्ट्या** सारखेंच आहे; पण उजव्या हातानें गाडी हांकलल्यास पोलीस आपणांस ताबडतोब पकडील! इतकेंच काय, हायकोर्टाचे जज्ज किंवा प्रिव्ही कौन्सिलचे सभासद हेहि अंमलबजावणीचेच अधिकारी आहेत. एखाद्याचें कर्ज तीन वर्षांच्या पुढें गेलें म्हणजे ते फिर्याद काढून टाकतील, त्यावेळीं हें कृत्य अन्यायाचें आहे ह्याचा ते विचार करणार नाहींत! ह्यांत नीतिशास्त्राचें त्यांचें दिसून येणारें अज्ञान, दुसऱ्याचें बोलणें न ऐकून घेण्याचा त्यांचा आडमुठेपणा, लोकांचे पैसे बुडविणाऱ्यास मदत करण्यांत त्यांचा दिसून येणारा दुराग्रह व प्रामाणिक आणि परोपकारी मनुष्यावर होत असणारा त्यांचा पराकाष्ठेचा जुलूम ह्यांमुळें त्यांना तुम्ही खुशाल **अज्ञानी, आडमुठे, जुलमी** व **दुराग्रही** म्हणा—पण विचार करणें हें त्यांचें कामच नव्हे, अंमलबजावणी हें त्यांचें काम आहे!

हें जें मीं हायकोर्टाच्या जज्जचें उदाहरण घेतलेलें आहे तें मुद्दाम घेतलेलें आहे, कारण हायकोर्टाच्या जज्जाचा पेशा कितीहि श्रेष्ठ, किंवा वंदनीय असला तरी त्यांत विचारांचा भाग नाहीं. तो अंमलबजावणीचा भाग आहे. हायकोर्टाचा एखादा जज्ज **स्पेन्सर**पेक्षांहि विचारी असेल किंवा **सॉक्रेटीस**पेक्षांहि ज्ञानी असेल, पण तो पेशाच असा आहे कीं त्यांत ठरलेल्या कायद्यांच्या पलीकडे ज्ञानाचा कांहीं एक उपयोग नाहीं. भटजीचेंहि तसेंच! प्रचलित धर्मनियमांची अंमलबजावणी करणें एवढें त्याचें काम! ह्यामुळें **ज्ञान** किंवा विचार हे शब्द ज्या अर्थानें आपण वापरतों त्या अर्थानें त्याचें ज्ञान किंवा विचारीपणा असणें शक्य नाहीं. तो स्वतः अतिशय पढलेला असेल-व अजूनहि आपल्यांतून दशग्रंथी विद्वान् नाहीसे झालेले नाहींत. इंग्लंडमध्येंहि कांहीं पाद्री अतिशय विद्वान् म्हणून वाखाणले गेलेले आहेत. **स्पेन**मधील ज्या पाद्र्यांनीं शाळेंत **बायबल** न शिकविल्यामुळें एका थोर पुरुषास फांशी देवविल्याचें मी वर सांगितलें त्यांतहि विद्वान् लोक नसतील असें नाहीं! पण बदलत्या व वाढत्या समाजांत ह्या विद्वत्तेचा कांहींएक उपयोग नाहीं. ज्या धर्मविचाराच्या वातावरणांत हे अंमलबजावणीदार प्रथम निर्माण झाले त्या वेळीं त्यांचें ज्ञान त्या काळाशीं मिळतें असेल व त्यामुळें त्याचा जुलूमहि भासत नसेल, पण काळ नवा व अंमलबजावणीचें खातें जुनें—अशा वेळीं त्यांचा जुलूम कसा वाटणार नाहीं? व त्यांचे विचार अपुरे आणि हास्यास्पद कसे भासणार नाहींत? पूर्वीच्या काळांत ते त्या काळाशीं मिळते असल्यामुळें त्यांचा पगार किंवा दक्षिणा त्यावेळीं लोकांचे डोळ्यावर येत नसेल, पण सध्यां त्यांचा पगार अनावश्यकच

वाटणार, त्यांची दक्षिणा लुटारूपणाच दिसणार व त्यांचीं जेवणें ऐतखाऊपणाचींच समजलीं जाणार !

तेव्हां आजचें युद्ध हें सर्व जगभरच एका स्वरूपाचें झालेलें आहे, म्हणजे आज सर्व जगाचीच भटशाहीशीं (Clergyशीं) लढाई आहे. इंग्लंडमध्यें Conflict between science and religion (ज्ञान आणि धर्म यांतील युद्ध) हें ज्या वेळीं ऐकूं येतें त्या वेळीं तें युद्ध **येशू ख्रिस्ता**शीं असतें काय ? नाहीं, तें पाद्र्यांशीं ऊर्फ भटशाहीशीं असतें. नवीन **रशिया**मध्यें **लेनिन्**नें जर कांहीं केलें असेल तर तें हें कीं त्यानें रशियन् लोकांस **भट**शाहीच्या अमलांतून सोडविलें. **तुर्कस्थान**मध्येंहि **कमाल**पाशानें हेंच केलें. **खिलाफती**चा विध्वंस करून त्यानें तुर्कस्थानांतील भटशाहीच्या जुलमाचा नायनाट केला. आजहि एशियांतील मुसलमान जर भलत्या मार्गाला प्रवृत्त होत असतील तर **मुल्ला** आणि **मौलाना** ह्यांच्या अविचारीपणाच्या उपदेशामुळेंच होय ! ' **श्रद्धानंदां**चा खून करा ' असें मुसलमान समाजास **जिना** किंवा **अनसारी** हे खास शिकवीत नाहींत. वेडेविद्रे फतवे काढणारे **मौलवी**च शिकवितात व त्यामुळें गरीब बिचाऱ्या अज्ञानी मुसलमानांचीं डोकीं फुटतात !

हिंदु समाजांत हीच तऱ्हा आहे आणि तिच्येखालीं ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर सारखेच चिरडले जात आहेत. त्यांत **सत्यशोधक** समाजानें भेद करण्याचें कांहीं एक कारण नाहं, पण ह्या बाबतींत ब्राह्मण समाजानेंहि एक सुधारणा अवश्य करायला पाहिजे आणि ती सुधारणा म्हणजे ब्राह्मणेतरांचा उच्च व समान दर्जा मानणें ही होय ! खरा विचार केला, तर **ब्राह्मण-ब्राह्मणेतर** ह्यांच्यामधील झगडा भटशाहीबद्दलचाहि नाहीं व धर्माबद्दलचाहि नाहीं. कारण हिंदु धर्म हा सर्वांनाच प्यारा आहे. हा झगडा दर्जाबद्दलचा आहे. पूर्वकालीं ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा दर्जा भिन्न नव्हता. हा भेद पुढें आला. ब्राह्मण समाजाने ब्रह्मणेतरांचा समान दर्जा जर ह्याचे अगोदरच कबूल केला असता तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद इतका माजलाहि नसता ! ब्राह्मणेतर मनुष्य आपल्यापेक्षां कमी दर्जाचा आहे असें मानणें, त्याच्या हिताविषयीं बेफिकीर असणें, त्यास सहज ' अरे जारे ' किंवा ' तूं ', ' तो ' असें बोलणें, त्यास हलक्या जागी बसविणें किंवा त्याच्या अन्नपाण्याचा विटाळ मानणें ही गोष्ट अत्यंत चीड आणणारी आहे. ही गोष्ट एक क्षणभरदेखील सहन होण्याजोगी नाहीं. ब्राह्मणेतर समाजाने ही गोष्ट खरोखर मर्यादेपेक्षां जास्त काळ सहन केलेली आहे आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद जर नको असेल तर ब्राह्मण समाजानें ही गोष्ट पहिल्या प्रथम बंद केली पाहिजे.

आयुष्यांत अत्यंत आवडती जर कोणती गोष्ट असेल तर ती **दर्जा** ही होय ! मनुष्य आपलें सर्वस्व जर एखाद्या गोष्टीबद्दल वेंचायला तयार असेल तर ती **दर्जा** ही होय ! मनुष्य आपल्या जन्मांत जर एखादी गोष्ट टाकून द्यायला तयार नसेल तर ती **दर्जा** ही होय ! मनुष्याचा दर्जा कमी करणें म्हणजे त्याचें नाक कापणें होय ! हें नाक कापून मग

जगायचे कशाला ? कुणाला तोंड दाखवायचें ? कुणापुढें मिरवायचें ? कुणासमोर प्रौढी गायची ? आपला दर्जा संभाळण्यासाठीं मनुष्य घरादारावर पाणी सोडील–आपल्या संपत्तीवर पाणी सोडील–आपल्या सुखावरती लाथ मारील–आपलें राज्य लाथाडून देईल ! शूर मनुष्य आपले प्राण देतो, पण आपली तरवार देत नाहीं ! त्या तरवारींत त्याचा दर्जा असतो ! त्याला **शूर** म्हणवून जगायचें असतें आणि तोंपर्यंत तो जगायला तयार असतो. मरणांत काय आहे ? नरकांत काय आहे ? दर्जा गमावणें हेंच खरें मरण–दर्जा गमावणें हाच खरा नरक !

पण ह्या मरणांत–ह्या नरकांत–आजपर्यंत ब्राह्मणेतरवर्ग ठेवला गेलेला आहे. आतां तें त्यांना नको आहे. हा नरक आतां पुरे झाला. आतां ह्यापुढें समान दर्जाचे म्हणूनच त्यांना जगायचें आहें ! तसा त्यांचा निश्चय झालेला आहे ! ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत आज सख्य नाहीं ह्याचें कारण ब्राह्मणांकडून त्यांचें हृदय येथें दुखावलें जात आहे. तो दर्जा त्यांना द्या म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत उद्यां सख्य होईल ! हिंद-भूमींतलीं आपण लेकरें–त्यांत श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण ? आपण श्रेष्ठ असलो तर सर्वच श्रेष्ठ आहोंत. आपण कनिष्ठ असलों तर सर्वच कनिष्ठ आहोंत. आपण श्रेष्ठ असलों तर एकमेकांस मिठ्या मारून आपण त्या श्रेष्ठतेचा परिणाम गाजवूं या. आपण कनिष्ठ असलों तर एकमेकांस मिठ्या मारून कनिष्ठतेच्या नरकास स्वर्ग बनवूं या ! पण आपण एक होऊं या ! श्रेष्ठ–कनिष्ठ ही भाषा इतउत्तर नको ! ब्राह्मणवर्गावरचा रोंख ज्याप्रमाणें **सत्यशोधक** समाजानें टाकून दिला पाहिजे, त्याप्रमाणें ब्राह्मणेतरांचा समान दर्जा ब्राह्मणांनीं ताबडतोब कबूल केला पाहिजे. सध्यांचा असंतोष हा दर्जाच्या महत्त्वाकांक्षेमधून निर्माण झालेला आहे. हा असाच भडकूं दिला तर भयंकर वणवा निर्माण होईल. हा शांत केला तर त्यांतून कल्पनेच्या बाहेरचें भाग्य जन्म पावेल.

खरोखर पाहतां ज्याला आपल्या देशाचें हित करावयाचें असेल त्यानें स्वाभिमानाची ज्योत आपण होऊन पेटवायला पाहिजे. ब्राह्मणेतर समाजानें आपला समान दर्जाचा हक्क मागितला आणि ब्राह्मण समाजानें तो नंतर कबूल केला म्हणजे त्यांत कांहीं मोठेपणा नाहीं. तर ब्राह्मण समाजानें आपण होऊन हाललें पाहिजे व प्रत्येक समाजाला जागें करून तुमचा दर्जा श्रेष्ठ, तुमचा दर्जा श्रेष्ठ, असें सर्वांस समजावलें पाहिजे. नापित हे ब्राह्मणांपेक्षां श्रेष्ठ आहेत असें परवां एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. पण मी म्हणतों कीं **हिंदु** तितके एक–**हिंदु** एकमेकांचे धर्मबंधु–**हिंदु** हे एकमेकांचे पाठीराखे–ही भावना सर्वत्र पसरली म्हणजे आपल्यांत दुही पेरायची कोणाची छाती आहे ? आपणांत दुही आहे तोंपर्यंतच आपणांस दुःखें ! ही दुही नाहींशी झाली म्हणजे दुःखेंही नाहींशी होतील आणि आपलें गेलेलें स्वातंत्र्यहि आपणांस मिळेल !

ज्यांना अशी कल्पना असेल कीं ही हिंदभूमि कनिष्ठ अपत्यें प्रसवेल त्यांनीं ह्या हिंद-भूमीची योग्यता ओळखली नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. ज्या हिंदभूमीमध्यें परमेश्वरानें

दहा वेळां अवतार घेतला, ज्या हिंदभूमीमध्यें अर्जुनासारखे रणधुरंधर निर्माण झाले, ज्या हिंदभूमींत श्रीतुकारामासारख्या संतांची दिव्यवाणी घुमली, ज्या हिंदभूमींत राणी लक्ष्मीबाई निर्माण झाली, ज्या हिंदभूमींत महाराचें रूप घेऊन खुद्द विठोबा सजून आला, ज्या हिंदभूमीनें आपल्या यमुना नदीच्या वाळवंटांत श्रीकृष्ण खेळवला आणि ज्या हिंदभूमीचे पोटीं श्रीशिवाजीमहाराजांनीं जन्म घेतला त्या ह्या रत्नाच्या खाणींत गारगोट्या निघतील काय ? अशक्य ! अशक्य !! ह्या हिंदभूमीचा कुसवा एवढा भाग्यवंत आहे कीं तेथें कनिष्ठ अपत्यांना स्थानच नाहीं. त्यांतील प्रत्येक मनुष्य परमेश्वराचा लाडका ! त्यांतील प्रत्येक मनुष्य श्रेष्ठ दर्जाचा ! त्यांतील प्रत्येक मनुष्य सर्वोत्कृष्ट वैभवाचा अधिकारी !

परंतु हें सर्वांस समजलें पाहिजे आणि सर्वांत स्वाभिमान संचरला पाहिजे. " मी इंग्लिश्मन् आहें " म्हणून ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यांत कुर्रा उत्पन्न होतो त्याचप्रमाणें **मी हिंदु आहें** हें वाटण्यांत प्रत्येकाची बर मान झाली पाहिजे. सध्यांची स्थिति उलट आहे आणि ती कृत्रिम आहे. ती पांच मिनिटें देखील टिकण्याजोगी नाहीं. पण त्यासाठीं ब्राह्मणवर्गानेंच मुख्यतः प्रयत्न करायला पाहिजेत. परिस्थितीनें ती पवित्र जबाबदारी त्यांच्यावर टाकलेली आहे. राष्ट्रीय कर्तव्याचें हें पुण्यप्रद ओझें त्यांनीं उचलायला पाहिजे व त्यांनीं सर्वांच्या अगोदर जाहीर करायला पाहिजे कीं ह्या हिंदभूमींत सर्व माणसें श्रेष्ठ आहेत—ह्या हिंदभूमींत सर्वांस समाजाचे श्रेष्ठ हक्क आहेत—ह्या हिंदभूमींत सर्वांस धर्माचे सारखे अधिकार आहेत !

ब्राह्मणवर्गाचें हें मुख्य कर्तव्य असण्याचें कारण असें कीं श्रेष्ठ दर्जा हा त्यांना जन्मप्राप्त असल्यामुळें इतरांचें दुःख काय आहे हें त्यांस समजण्याचा संभव कमी असतो. ब्राह्मणवर्ग **भट**वर्गापासून निराळा असेल व ब्राह्मण लोक संपत्तीनेंही इतर वर्गांच्या बरोबरीनें नसतील. परंतु प्रचलित धर्मसमजुतीप्रमाणें त्यांस एकदम जो श्रेष्ठ दर्जा (status) प्राप्त होत असतो तो संपत्तीपेक्षां देखील जास्ती वैभवाचा आहे. दर्जापुढें संपत्तीची पर्वा नाहीं–प्राणांचीहि पर्वा नाहीं. तो दर्जा त्यांस सहज म्हणजे जन्माबरोबर प्राप्त होत असल्यामुळें दर्जा (status)साठीं हळहळणाऱ्या इतर वर्गाच्या दुःखविमोचनाकडे लक्ष पुरविणें हें त्यांचें पहिलें काम आहे. जगांत संपत्ति ही एक शक्ति असेल, पण दर्जा हें जें भूषण आहे त्याची सर संपत्तीला कधींहि यायची नाहीं. जेवणाच्या वेळेस ब्राह्मणांचीं पानें माजघरांत व इतरांचीं पानें ओटीवर मांडली म्हणजे त्यांत विशेष काय आहे असें कदाचित् त्यांस वाटेल, पण मानहानीचें दुःख एवढें आहे कीं मानहानीच्या भोजनांत पक्वान्नांतील सर्व गोडी नाहींशी होते–किंबहुना मानहानीचें जेवण देण्यापेक्षां पोटांत खंजीर खुपसला असता तरी बरा असें मनुष्यास वाटत असतें. पण असले खंजीर ब्राह्मणेतर वर्गाच्या पोटात रोज खुपसले जात आहेत. जेवणाच्या पंक्तींत, देवळाचे दारांत, पाणवठ्याच्या जागेवर, एवढेंच काय, मसणवटींत देखील

ब्राह्मणेतरांचीं मनें रोज रक्तबंबाळ केली जात आहेत. हीं मनें पुन्हां सांधलीं पाहिजेत– माजघर, देवघर, पाणीघर किंवा न्हाणीघर–ह्या सर्व ठिकाणीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर एक असा प्रयत्न खुद्द ब्राह्मणांनीं केला पाहिजे. आपल्या देशबांधवांच्या हृदयाची ही जखम भरण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न जर ब्राह्मणवर्गाकडून होणार नाहीं तर ब्राह्मणवर्गानें आपलें कर्तव्य केलें नाहीं असें म्हणावें लागेल–एवढेंच काय, पुनर्जन्माचा सिद्धांत जर खरा असेल तर दर्जा (status)च्या प्राप्तीसाठीं तळमळणाऱ्या ब्राह्मणेतरांच्या दुःखाकडे कानाडोळा करणाऱ्या आपणांस पुन्हां परमेश्वर उच्च जन्महि देणार नाहीं.

ब्राह्मणेतर वर्गास दर्जा (status) प्राप्त करून देण्यासाठीं चाललेली जी चळवळ तीच **ब्राह्मणेतर** चळवळ होय व त्यांत जे **ब्राह्मणेतर वीर** प्रस्तुत काळीं चमकत आहेत त्यांत **जेधे–जवळकर** हे अग्रगण्य होत. **जेधे–जवळकर** हे शब्द उच्चारले कीं साऱ्या ब्राह्मणेतर समाजाला आनंदाचें भरतें येतें. कारण उच्च दर्जा (status) हा हिंदुस्थानांत जन्मलेल्या प्रत्येक मनुष्याचा जो जन्मसिद्ध हक्क आहे तो देण्यासाठीं झटणारे ते हे, ही ब्राह्मणेतर वर्गास जाणीव आहे. **महात्मा गांधी** दक्षिण आफ्रिकेंत हिंदुस्थानांतील लोकांना दर्जा (status) आणण्यासाठीं झटले म्हणून ते हिंदुस्थानच्या लोकांचे गळ्यांतील ताईत बनले. पण दक्षिण आफ्रिकेच्या अगोदर हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत लोकांस दर्जा (status) मिळणें अवश्य आहे व हें महत्त्वाचें कार्य **जेधे–जवळकर** करीत आहेत. **जेधे–जवळकर** ब्राह्मणेतर वर्गांत आज जे अत्यंत प्रिय आहेत ह्याचें कारण हें आहे. ब्राह्मणेतरांची कोणतीहि सभा असो त्यांत **जेधे–जवळकरां**च्या नांवाचा आदरानें उच्चार केला जातो. गेल्या दोन-तीन वर्षांत तर ब्राह्मणेतर चळवळ **जेधे–जवळकर** ह्या नांवामध्यें पूर्ण एकवटली आहे–सर्व सत्यशोधक जलशांतून जेधे–जवळकरांच्या धैर्याचें गुणगान होत आहे. **जेध्यांनीं** पुणें म्युनिसिपालिटींत महात्मा **जोतिबा फुले** ह्यांच्या पुतळ्याचा प्रश्न पुढें आणला व श्री. **जवळकरांनी देशाचे दुश्मन्** हें पुस्तक लिहिलें इथपासूनच जेधे–जवळकरांच्या हालचालींची सुरवात झाली असें अनेक लोक समजतात, पण हें खरें नाहीं. ह्याहीपूर्वी त्यांच्या चळवळीची सुरवात झालेली आहे. ती चळवळ ना. **पटेल** ह्यांच्या मिश्रविवाह बिलापासूनची आहे. हें बिल कौन्सिलमध्यें आलें त्या वेळेपासून पुण्यास **सत्यशोधक** चळवळ जोरानें सुरू झाली. ह्या वेळीं मुख्य अडचण म्हणजे सत्यशोधक लोकांच्या सभेस जागा मिळण्याची असे, कारण **सत्यशोधक** हें नांव देखील नावडतें असल्यामुळें पुण्यांतील सभांची मुख्य मुख्य ठिकाणें त्यांना मिळणें अशक्य होतें. पण ह्याच वेळीं श्री. **जेधे** ह्यांची स्वतःची मोठी भव्य इमारत पुरी झाली आणि तेथें सत्यशोधकांच्या सभा भरूं लागल्या. जेधे **मॅन्शन्स्** ते हेंच होत. ह्यांचा फोटो ह्या पुस्तकात येथेंच दिलेला आहे व आज **सत्यशोधक** चळवळीचा तो बालेकिल्ला होऊन बसलेला आहे.

जेधे म्हटले म्हणजे एकच व्यक्ति आपल्या डोळ्यापुढें उभी राहाते, पण तसें नाहीं. ते

चार बंधु आहेत व ब्राह्मणेतर वर्गाच्या उन्नतीसाठीं हे चारी बंधु तनमनधन अर्पण करून झटत आहेत. **जेधे** शकावलीचे कर्ते सुप्रसिद्ध **कान्होजी जेधे** ह्यांचे हे वंशज होत. राष्ट्रकार्यासाठी आपल्या वतनावरच नव्हे तर तरवारीच्या पहिल्या मानावरहि आपल्या पांची मुलांसह श्रीशिवाजीमहाराजांसमोर उदक सोडण्याचा कान्होजी जेध्यांचा कुलधर्म आज हे त्यांचे वंशज तितक्याच निष्ठेनें पाळीत आहेत. त्यांच्या इमारती म्हणजे राष्ट्रकार्यासाठी बांधलेलीं सार्वजनिक मंदिरेंच. कोणीहि माणसानें जावें–जेध्यांची तिजोरी त्याला सताड मोकळीच! हे चारी बंधु धनाढ्य असूनहि अजून **अविभक्त** आहेत. ह्यांपैकीं सर्वांत वडील श्री. **सखारामराव जेधे** असून ते व त्यांचे कनिष्ठ बंधु **बळवंतराव जेधे** हे कारखाना व जमीन-जुमला सांभाळतात आणि त्यांचेपेक्षां लहान श्री. **बाबूराव** व श्री. **केशवराव** हे सार्वजनिक कामाला वाहिलेले असतात.

ह्यांनीं ज्यावेळीं सार्वजनिक कार्यास सुरवात केली त्या वेळीं सभेला माणसें यायचीं तीं देखील मुश्किलीने येत असत. पुष्कळ वेळां लग्नाच्या आमंत्रणाप्रमाणें त्यांना आमंत्रण द्यायला श्री. **बाबूराव जेध्यांना** जावें लागे. पण पुढें मोठमोठ्या सभा भरूं लागल्या व जुन्या मताच्या सभा मोडल्या जाऊं लागल्या. श्री. जवळकरांच्या लेखनव्यवसायालाहि पटेल बिलापासूनच पालवी फुटली. पुण्यास त्या वेळीं पटेल बिलावर खूपच खळबळ उडालेली होती–रणधुमाळी माजलेली होती–वातावरणांत तुफानें थडाडत होतीं. ह्यावेळीं श्री. **जवळकर** ह्यांनीं पटेल बिलाला अनुकूल असे **प्रणयप्रभाव** नांवाचें नाटक लिहिलें व श्रीशिवाजी हायस्कूलचे हेडमास्तर श्री. **बाबूराव जगताप** ह्यांच्या प्रमुखत्वाखालीं चाललेल्या **महाराष्ट्र हितचिंतक भ्रातृमंडळ** ह्या संस्थेनें तें बसविलें. नाटकाचीं हँडबिलें वाटलीं गेली, भिंतीवर जाहिराती लागल्या, एवढेंच नव्हे तर जुन्या मताच्या ब्राह्मणाचें काम आपणांस करायला सांपडावें म्हणून श्री. **बाबूराव जगताप** श्मश्रू करवून **ब्राह्मणी घेरा** ठेवून बसले. आतां नाटक लागणार–इतक्यांत कांही विशिष्ट कारणें घडलीं आणि **नाटक बंद ठेवावें लागलें.** नाट्यसंस्थेस पैशाचा चट्टा बसला आणि जवळकरांची पहिलीच कृति वादळांत सांपडली!

पण ह्यामुळें चळवळ मात्र थांबली नाहीं. ती वाढत होती. त्यांत भर देण्यास कै. **राजर्षि श्रीशाहु छत्रपति** पुढें आले व त्यांनीं चळवळीचीं सूत्रें आपले हातीं घेतलीं. चळवळीसाठीं लायक माणसें निवडून काढीत असतां त्यांस श्री. **जवळकर** सांपडले व कोल्हापूर येथें **तरुण मराठा** पत्र काढण्याकरितां त्यांनीं जवळकरांना कोल्हापुरास नेलें. ह्या वेळीं चळवळीस रंग भरलेला होता व **विजयी मराठा, राष्ट्रवीर** वगैरे ब्राह्मणेतर पत्रें सपाटून खपूं लागलेलीं होतीं. ह्या चळवळींत फक्त स्वार्थसाधुच माणसें शिरतात हा आरोपहि श्रीशाहुछत्रपतींनीं ही चळवळ हातीं घेतल्यामुळें नाहींसा झालेला होता. **जेधे** हे तर धनाढ्यच होते. **जवळकर**हि चोराची आळंदी ह्या गांवचे पाटील आहेत.

जवळकर ह्यांच्या आयुष्यावर राजर्षि शाहुमहाराज ह्यांच्या अमोलिक संगतीचे अत्यंत

महत्त्वाचे परिणाम झालेले आहेत. त्यांची संगति म्हणजे एक अपूर्व लाभ होता–एक अपूर्व भाग्य होतें. पण शाहु महाराजांचें देहावसान झालें त्यावेळीं जवळकर त्यांचे-जवळ नव्हते. मिरजेच्या हॉस्पिटलमध्यें ते अत्यवस्थ होते. ते त्यावेळीं जगतील अशीहि विशेष आशा नव्हती. पण ईश्वरकृपेनें ते काळाच्या दाढेंतून बांचले व कोल्हापुरास कांहीं दिवस राहून पुण्यास आले. **जेधे**मंडळींचा आणि त्यांचा इतके दिवस निकट संबंध नव्हता, तो आतां आला. ह्यावेळीं श्री. **केशवराव जेधे** ह्यांनीं **छत्रपती मेळा** काढून ब्राह्मणेतर चळवळीचा दरारा बसविलेला होता व **शिवस्मारक** ह्या नांवाचें एक वर्तमानपत्रहि काढलेलें होते. ह्या साधनांच्या योगानें सत्यशोधक चळवळीस भयंकर पाठिंबा मिळाला व १९२५ सालीं गणपतीच्या दहा दिवसांत पुण्यावर सत्यशोधकांचेंच राज्य आहे कीं काय असें वाटूं लागलें. १९२५ सालीं मेळ्यांच्या चळवळीचा अगदीं कळस झाला म्हटलें तरी चालेल. फुले प्रकरणापासून तर जेधे-जवळकर ह्यांच्या एकसूत्री विचारानें ब्राह्मणेतर चळवळीस जें सामर्थ्य आलें तें आश्चर्यकारक होय. जवळकरांची मति आणि धृति व जेध्यांची उदार बुद्धि आणि संपत्ति ह्यांचा अपूर्व संगम झाल्यामुळें **सत्यशोधक** नांबांत जादू आली व ह्या जादूस तरुण मंडळी दिपत आहेत, भाळत आहेत, वश होत आहेत. ह्याच प्रसंगी **मजूर** पत्र निघून त्यानें ह्या चळवळीचें लोण घरोघर पोंचविलें आणि ह्याच वेळीं ब्राह्मणब्राह्मणेतर ह्या घासाघिर्शीत श्री. **जवळकर** ह्यांचेवर खटला होऊन ते तुरुंगात गेले. ह्या खटल्याची हकीकत **संदेश** पत्रासाठीं मुलाखतीचे रूपानें घेतलेली होती तीच आज मी पुस्तक रूपानें महाराष्ट्रीय वाचकांस सादर करीत आहें. कोणत्याहि चळवळीवरील श्रद्धा शाश्वीत करण्याचें मुख्य साधन म्हणजे त्या चळवळीसाठीं तुरुंगात जाण्याचा प्रसंग आला तरी मार्ग न हटणें हा होय. जवळकरांनीं हा मार्ग चोखांळलेला आहे. किंबहुना दृढ निश्चयाची तरवार हातांत घेऊन हा शूर मराठा सर्व संकटास **मरा** आणि **हटा** असें आव्हान देत आहे.

आजकाल देशाला तरुणांची गरज आहे. आजकाल देशाला तडफदार तरुणांची गरज आहे. किंबहुना देशाकरितां आजकाल प्रत्येक वयोवृद्ध मनुष्य तरुण व्हायला पाहिजे आहे. **दर्जा, दर्जा** (Status) ही आजकाल हिंदुस्थानांतल्या लोकांची आवश्यकता आहे. तो दर्जा प्राप्त करून द्यायला एकीकडून ब्राह्मण, एकीकडून ब्राह्मणेतर, एकीकडून सनातनीय, एकीकडून सत्यशोधक, एकीकडून आर्यसमाजी, एकीकडून प्रार्थनासमाजी ह्या सर्वांनीं धांवलें पाहिजे. एवढेंच काय, ज्यांना **भट**शाही **भट**शाही असें म्हणतात त्या श्रद्धावान् व निश्चयी कालव्यत्ययामुळें अत्यंत दुराग्रही व जुलमी भासणाऱ्या पुरोहित वर्गानें **अग्निमीळे पुरोहितं** ह्या अग्नितत्त्वाची जयाची आरोळी ठोकीत नवविचारांनीं उद्युक्त होऊन नवविचाराचे, नवीन तेजाचे व नवीन तत्त्वांचे प्रचारक व्हायला पुढें आलें पाहिजे. भटशाहीचा 'जुलूम' म्हणजे कांहीं वज्रलेप नव्हे. जुन्या युगाची अंमलदारी सोडून दिली व श्रद्धानन्दांच्या खुनापासून आणि त्रिशतसांवत्सरिक महोत्सवापासून सुरू झालेल्या नवीन युगाचे अंमलदार बनले म्हणजे चोहोंकडून उसळणाऱ्या स्वातंत्र्यप्रवाहाचे

कालवे देशभर पोंचविण्याचें अप्रतिम कार्य त्यांना सहज करतां येईल. माझ्या ह्या मातृभूमीच्या अंकावर बसण्याचा अधिकार हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याला आहे. जो तिच्या अंकावर बसेल त्याला तिच्या मातृहृदयी चुंबनाचा लाभ घडेलच घडेल. आणि म्हणून ह्या मातेभोंवतीं–ह्या हिंदमातेभोंवतीं–सर्वांनीं एकत्र होऊन **वन्दे मातरम्** ह्या मंत्रानें एकमेकांस कवटाळणें हें आज प्रत्येकाचें कर्तव्य आहे. म्हणून सर्वांचीं मुखें एकमेकांस सन्मुख करा, सर्वांच्या हातांची झुलती माळ बनवा, ती सर्वांच्या कंठाभोंवतीं पडूं द्या आणि मध्यें सर्वांच्या हृदयाचें धगधगणारें यज्ञकुंड ठेवून तें भावनांच्या वाऱ्यानें भडकूं द्या म्हणजे त्यांत सर्व गैरसमजुतींची आहुति पडेल, सर्व अन्याय जळून जातील आणि हिंदुस्थानच्या पारतंत्र्याची त्यांत राखरांगोळी होऊन ही हिंद-भूमि पूर्ववैभवानें विराजित होईल. असें व्हावें अशी कोण इच्छा करणार नाहीं ?

खेतवाडी, मार्कर बिल्डिंग,
मुंबई नं. ४.
ता. २७ ऑगस्ट १९२७.

अच्युत बळवंत कोल्हटकर

◇◇◇

श्री. जवळकरांची कैफियत

श्री. जवळकरांची कैफियत



न्यायाधीशापुढें आरोपी या नात्यानें उभें राहून निकाल ऐकण्याचा मजवर पहिला प्रसंग ता. २६ एप्रिल १९२६ रोजीं आला. पहिल्या खटल्याच्या पहिल्या तारखेला कोर्टांत हजर राहतांना विकारविचारांची एक प्रकारची झुंज लागत असते. संबंधीनें कोणत्याहि गोष्टीचें उग्र किंवा मधुर स्वरूप नाहींसें झालेलें दिसतें. फौजदारी कोर्ट मी मुळींच पाहिलेलें नव्हतें व जेव्हां पाहण्याचा प्रसंग आला तेव्हां आरोपी म्हणून पाहावें लागलें. त्यामुळें प्रत्येक गोष्ट मला नवीनच होती. कै. टिळकांच्या चिरंजीवांनीं आम्हांवर केलेल्या फिर्यादीचा निकाल एप्रिल १९२६ सालांत लागून त्यांत पुण्याचे सिटी मॅजिस्ट्रेट मि. फ्लेमिंग यांनीं मला व रा. लाड यांना प्रत्येकीं ५०० रुपये दंड केला. या फिर्यादीमुळें कोर्टापुढें आरोपी म्हणून उभें राहून निकाल ऐकण्यांतलें नावीन्य मात्र निघून गेलें. आपण कोर्टापुढें उभे आहोंत. निकाल जाहीर करण्याची वेळ एक दोन सेकंदावर आली आहे, अशा वेळीं आपल्या मनामध्यें एक सेकंदभर काय वाटतें तें सांगणें कठीण आहे. आपलें आपण कर्तव्य बजावीत आहों या विचारानें कर्तव्यनिष्ठ आरोपी गोंधळून जात नाहीं हें खरें आहे; पण समजा, एखाद्या रेल्वेंतून प्रवास करतांना पुलावरून गाडी ढासळते आहे हें समजून ती गाडी ढासळेपर्यंतच्या मधल्या काळांत त्या दुर्दैवी प्राण्याच्या मनांत जो गोंधळ उडत असावा, कांहींशी तशा प्रकारची, अस्पष्ट, सुंद अशी मनाची गोंधळलेली स्थिति होत असते. निर्धार जितका प्रबळ असेल तितका निकाल नरम वाटत असतो. मॅजिस्ट्रेट साहेबांनी निकाल जाहीर केल्यावर मग तो कसाही असो, पण जणुं काय

डोक्यावरलें एक ओझें उतरलें

असें वाटूं लागतें. माझ्यावर टिळक-चिपळूणकर यांचे दोन खटले एकदम चालल्यामुळें तर एका खटल्याच्या निकालामुळें माझ्यावरचें निम्में ओझें उतरल्यासारखेंच मला वाटूं लागलें. ५०० रुपयांचा दंड आम्हांला अति जबर वाटला. दंड भरण्यास दहा दिवसांची मुदत दिली होती व तो वेळेवर भरलाहि गेला. पुढें अपीलांत पांचशेचा पन्नास झाला. आम्हांवर दुसरी "देशाचे दुष्मन" पुस्तकावरील रा. चिपळूणकरांनीं लावलेली फिर्याद चालूं होती. "फिर्याद" या सदरांखालीं येणाऱ्या सर्व विधींतून पार पडल्यामुळें त्या फिर्यादीच्या

निकालाविषयीं संबंधीनें किंवा नऊ महिने फिर्याद चालल्यामुळें, आमच्यात थोडीशी बेफिकीरी उत्पन्न झाली. " देशाचे दुष्मन " या खटल्यांत मित्रवर्य जेधे व बागडे अशीं मोठमोठीं माणसें असल्यामुळें मला काळजी वाटण्याचें तादृश तसें कांहींच कारण नव्हतें. हा दुसरा खटला चालला असतांनाच मी पुन्हां आणखी तीन पुस्तकें काढलीं. त्यावरही आणखी एकादा खटला होईल अशी मला मुळींच कल्पना नव्हती व लिहितांना माझ्या समजुतीप्रमाणें मी खटला होऊं नये अशा तऱ्हेची खबरदारीही घेतली होती. पुस्तकांचा प्रसार न करण्याची डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडून थोड्याच दिवसांत मजवर नोटीस बजावण्यांत आली आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्यांत वितुष्ट वाढेल अशा तऱ्हेचीं पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें न छापण्याची एक वर्ष मुदतीची नोटीस मजवर बजावण्यांत आली. पुण्यांत आणखी दोघातिघांवर पुस्तकांकरतां व वर्तमानपत्राकरतां अशाच नोटीसा बजावण्यांत आल्या, पण त्यांची मुदतहि माझ्या इतकी नव्हती, व त्यांतहि प्रथम

आम्हांलाच पहिला मान

मिळाला. फिर्यादीपेक्षां माझा धंदाच लेखकाचा असल्यामुळें त्या नोटीशीचा मजवर थोडासा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. माझीं पुस्तकेंहि बरींच खपत असत व त्यापासून पैशाच्या दृष्टीनें फायदाहि चांगला होत असे. या नोटीशीच्या मागोमाग आणखी एक खटलाही वाट चालतो आहे अशी शहरांत वदंता होती पण मला त्याची मुळींच खात्री वाटत नव्हती. हें नवीन प्रकरण नोटीशीवरच मिटलें असें मला वाटलें. शहरांत त्यावेळीं ब्राह्मणांच्या अनेक सभा भरत होत्या आणि ब्राह्मणेतर पक्षांतल्या विवक्षित "कंपू"-वर म्हणजे आमच्यावर ब्राह्मणांच्या सभेंतून निरनिराळे निराधार आरोप लादले जात होते. " धनवडे प्रकरण " उपस्थित झाल्यामुळें ब्राह्मण व ब्राह्मणेतर दोन्ही समाजांत एकदम चलबिचल उत्पन्न झाली होती. वर्तमानपत्रांतून—अर्थात आमच्या विरुद्ध असलेल्या—आमचा संबंध त्या घाणेरड्या प्रकरणाशी जोडण्याचें महापुण्य आमचे प्रतिस्पर्धी बांधीत होते. वर्तमानपत्रांतून मला अनेक वेळां शिव्या खाव्या लागल्या आहेत. अत्यंत दुष्ट व निष्ठुर प्रवृत्तीनें प्रवृत्त झालेल्या बऱ्याच लेखकांनी मजवर व माझ्यामुळें श्री. जेधे व बागडे यांच्यावर शिव्यांचा वर्षाव केलेला आहे. पण ते आम्ही मुळींच मनावर घेत नव्हतों. जेधे यांच्या व माझ्या पत्त्यावर फुले प्रकरणापासून शिवीगाळीनें भरलेलीं, धमक्यांनीं थबथबलेलीं, आमच्या आयामायांचा, आमच्या कुळी डहाळीचा उद्धार केलेलीं अनेक पत्रें येत असत. पण पोष्टामार्फत आलेल्या व नांव चोरून शौर्य गाजविणाऱ्या पराक्रमी वीरांचे निर्वाणीचे खलिते वाचून कचऱ्याच्या टोपलींत फेकण्यापलिकडे आम्ही त्याचा विचारहि करीत नव्हतों. प्रथम प्रथम अशा पत्रांनी थोडा संताप चढत असे पण पुढें तेंहि संवयीचेंच होऊन गेलें. पुण्याच्या कांहीं ब्राह्मणांनीं जेव्हां " धनवडे प्रकरणाचा " संबंध ब्राह्मणेतर चळवळीशीं जोडण्याचा प्रयत्न चालविला तेव्हां मात्र त्यांनीं चालवलेला हा प्रयत्न कानाडोळा करण्याइतका निरुपद्रवी नाहीं असें वाटूं लागलें. ब्राह्मणेतरांच्या

उन्नतीकरतां चाळलेल्या चळवळीवर हा अत्यंत मोठा आघात होता; त्याच वेळेला "अश्लील वाङ्मय" हा नवा खेळ पुण्याच्या राजकीय रंगभूमीवर उड्या ठोकीत आला. राजकीय दंगल ऊर्फ धार्मिक गगपति उत्सवाचा मोसमहि जवळ येत चालला होताच. गायकवाडवाड्यांतील नरसोपंतांपासून तों कुठल्याहि एखाद्या सामान्य लेखकापर्यंत या बाबतींत एक सूर निघत होता. 'अश्लील वाङ्मय' हा प्रकार काय आहे आणि हें नवतर लचांड तरी कसलें आहे याचा कांहीं थांग लागेना. मुंबई-पुण्याला निघणारीं कांहीं साप्ताहिकें किंवा "आनंद", "विनोद", "करमणूक", "सुदर्शन" इत्यादि नाटकें ज्या पुण्याच्या रंगभूमीवर रंगून गेलीं त्या पुणेकर सभ्यांच्या सदभिरुचीचा स्फोट एकाएकी या वेळींच कां व्हावा हें कोडें अजूनपर्यंत मला नीटसें उलगडलें नाहीं. कोठून तरी ब्राह्मण व ब्राह्मणेतर या दोन्ही समाजांकडून माझ्या पुस्तकांचा निषेध करण्याचा सुप्रसंग आमच्या प्रतिस्पर्ध्यांना मिळावा एवढाच त्यांत हेतु असावा असें मला वाटतें. याच सुमारास तिसरा १५३ (अ) कलमान्वयें आमच्यावर खटला भरला गेला व त्याची तारीखही लागली गेली. ब्राह्मणेतरांनीं मोळेपणानें फसणें हा ब्राह्मणेतरांचा शृंगारच असल्यासुळें बोटावर मोजण्यासारखे कांहीं ब्राह्मणेतरहि हें "अश्लील वाङ्मया"चें नवें अपत्य अंगाखांद्यावर खेळवण्यास तयार झाले होते. कलेक्टर साहेबांनीं याच सुमारास ब्राह्मण ब्राह्मणेतरांचे रीकन्सीलियेशन बोर्ड नेमलें होतें. या बोर्डांत ब्राह्मणेतर पक्षाची जी जबाबदार माणसें होतीं व त्यांनीं त्या वेळेस जें जबाबदारीनें वर्तन केलें तें त्यांनीं केलें नसतें तर हा "अश्लील वाङ्मया"चा भाला स्वपक्षाच्या छातीवर आदळला असता. ह्या वेळेस जें खरेंखरें 'अश्लील वाङ्मय' कांहीं ब्राह्मण लेखकांचे लेखणींतून उतरलेलें व पसरलेलें होतें तें गोळा करण्याचा माझा प्रयत्न चालला होता. ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या दोन्ही बाजूच्या अश्लील "वाङ्मयाचा" निषेध दोन्ही समाजानें करावा अशी एक टूम निघाली. हा बूट जेव्हां निघाला तेव्हां मला जरासें 'हायसें' वाटलें; कारण यांत न्याय होता, जबरदस्ती किंवा व्यक्तिद्वेष नव्हता. आणि ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांच्या सह्यांनीं बोलावलेली एखादी मोठी जबाबदार सभा भरवली गेली असती तर ब्राह्मणेतरांचा ब्राह्मणाबरोबर निषेध करण्यासारखें ब्राह्मणांचें वाङ्मय इतकें होतें कीं नाहीं! व तें मी तयार करूनहि ठेविलें होतें. इंग्रजांच्या हातून स्वराज्य हिसकावून घेण्यास निघालेल्या जहाल बंधूच्या राष्ट्रीय पत्रावल्यांपासून ते हरिमंदिरांत पुराणिकांच्या मुखांतून आजदिन तागायत निघणाऱ्या पुराणापर्यंत अनेक वस्तु त्यांत सांपडल्या असत्या. त्यांचे पोहे व आमचा कोंडा एके ठिकाणीं करून फुंकून खाण्याचा हा सौदा आमच्या पथ्यावर होता. तितक्यांत १५३ (अ)चा खटला धडाक्यानें सुरू झाला. या वेळपासून आपल्याला तुरुंगात जावें लागणार असें मला वाटूं लागलें. मजूर पत्रावरहि १५३ चा खटला भरला गेला होताच. या सभा किंवा हा "वाङ्मया"चा महायज्ञ माझ्या समोरून निघून गेला. कोणताहि खटला एकदम होऊन त्यांत जर तडकाफडकी शिक्षा झाली तर आरोपीवर बराच परिणाम होत असला पाहिजे असें मला वाटतें. खटला लांबला म्हणजे आपल्या मनाचीहि

उत्तम तयारी होत असते. कल्पना कितीहि उग्र, भयानक असली तरी पण त्या कल्पनेचा खुराक मनाला रोज नित्यनियमानें आपण पुरवीत गेलों तर त्यांतला उग्रपणा आपोआप नाहींसा होतो. ही वेळ माझ्या कसोटीची होती. या वेळेस माझ्या हातून थोडी जरी एखादी चूक झाली असती किंवा माझे पाठीराखे व स्वपक्षीय स्नेही यांनीं थोडें जरी मजकडे दुर्लक्ष केलें असतें तरी त्याचा परिणाम काय झाला असता हें आज सांगता येत नाहीं. माझे प्रतिस्पर्धी जितके जोरावर होते त्यापेक्षां जास्त उमेदीनें माझे सहायकर्ते पहाडासारखे पाठी उभे होते. या सहायकर्त्यांचा पहाड पाहून समोरील संकटें मला अगदीं क्षुल्लक वाटणें साहजिकच होतें. महाराष्ट्रांतून निरनिराळ्या ठिकाणांहून अनेक सुहृदांचीं उत्साहपर पत्रें येत होतीं. त्यामुळें किती तरी विसावा वाटत असें. १५३ (अ)च्या खटल्यामुळें त्या सभा तें वाङ्मय किंवा निषेध याकडे दुर्लक्ष करून खटल्यांत डिफेन्स देण्याच्या तयारीकडे मला लक्ष घालावें लागलें आणि निषेधाकरतां जें वाङ्मय जमा करून ठेवलें होतें त्यांतून खटल्याला उपयोगीं अशीं अनेक चोपडीं सांपडलीं. कांहीं ब्राह्मण लेखकांच्या लेखणींतून पैदा झालेला हा अश्लील लेखसंग्रह त्या वेळेस समाजापुढें जाहीर रीतीनें मांडण्याची मला संधी मिळाली असती तर माझी खात्री आहे कीं, जनता-जनार्दन इतका अन्यायी नाहीं. जातिमत्सर किंवा अब्रूनुकसानी या विशिष्ट मुद्यामुळें कायद्याच्या कोर्टांत माझीं पुस्तकें दोषी ठरलीं असलीं तरी त्यावरला "अश्लीलते"चा छाप मारण्यात होत असलेला वर्तमानपत्रांचा प्रयत्न मी थांबवूं शकलों असतों. या साऱ्या गडबडीमुळें मला विश्रांति मुळींच मिळत नव्हती आणि त्यामुळें एकदां तुरुंगांत गेल्यावर तरी विश्रांति मिळेल अशी आशा वाटूं लागली. त्यामुळें हा त्रास माझ्या इतका पथ्यावर पडला की, लहान मुलें जशी मे महिन्याच्या सुटीची वाट पहात बसतात तसा मी १५३ च्या खटल्याच्या निकालाची वाट पाहात बसलों.

हा खटला जेव्हां सुरू झाला तेव्हां त्याचें रोज काम चालूं लागलें. लागलीच ता. १० सप्टेंबर रोजीं रा. लाड यांना ९ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. या निकालानें पूर्वी जें मला महिना सहा महिने तुरुंगांत जावें लागेल असें वाटत होतें तें आतां लाड यांना जर नऊ महिने तर आपले नऊ दुणें अठरा महिने सहज असले पाहिजेत असें मनानें घेतलें. देशाचे दुष्मन केसचा निकाल ता. १५ सप्टेंबरला जवळ आला होता. ता. १३ सप्टेंबरला माझे मुंबईचे वयोवृद्ध मित्र डॉ. चव्हाण सकाळींच भेटण्याकरितां आले. श्री. जेधे व मी बसलों होतों. आमचे मित्र म्हणाले, "पर्वाच तुरुंगांत जाल म्हणून मुंबईहून मुद्दाम भेटण्यास आलों आहे." पण देशाचे दुष्मन खटल्यांत तुरुंगांत जावें लागणार नाहीं असें मला वाटत असें. मी त्यांना लागलेंच सांगितलें कीं, तुम्ही कांहीं काळजी करूं नका! १ महिना आणखी जात नाहीं. ता. १४ सप्टेंबरला मुंबईस सरदारगृहामध्यें ब्राह्मणेतर पक्षाची मुंबईचे उमेदवार ठरविण्याची सभा होती. त्या सभेकरितां आणि १५३ (अ) केससंबंधीं बॅरिस्टर करण्यासाठीं आम्ही मुंबईस आलों. ता. १४ सप्टेंबर रोजीं चळवळींतील सर्व ब्राह्मणेतर पुढारी तेथें भेटावयास मिळाले.

खटल्याचा निकाल उद्यांच असल्यामुळें आज सरदारगृहांत तर उद्यां कारागृहांत अशा आमच्या होणाऱ्या नव्या प्रवासाविषयीं मी सहज बोलत असें. याचें कारण दुष्मन केसमध्यें आपल्या वाट्यास तुरुंग येणार नाहीं अशी खात्री होती. ता. १५ रात्रौ मी, श्री. बाबुराव जेधे व श्री. गुप्ते वकील शेवटच्या गाडीनें मुंबईहून पुण्यास आलों. गाडींत गर्दीमुळें मला मुळींच झोंप मिळाली नव्हती. सबंध रात्र जागरण झालेलें, वादविवादानें व त्रासानें थकवा आलेला अशा त्या ता. १५ सप्टेंबर रोजीं ११ वाजता मी व रा. जेधे कोर्टांत दाखल झालों. बागडेहि आले. बागडे तर जेवून सुद्धां आले नव्हते. खिशामध्यें पाचसातशें रुपये घेऊन बागडे वेळप्रसंगीं तयारीनेंच आले होते. या खटल्याच्या निकाला-संबंधीं आम्हाला फारशी काळजीच नव्हती. बरोबर साडेअकरा वाजतां

१२ महिने साधी कैद २५० रुपये दंड

ही शिक्षा आम्हांला सांगण्यांत आली. श्री. जेधे व बागडे यांना प्रत्येकीं सहा सहा महिने व शंभर रुपये दंड सांगण्यांत आला. रा. लाड यांनाहि माझ्याइतकीच शिक्षा फर्माविण्यांत आली. निकाल ऐकण्याचा हा दुसरा प्रसंग होता. गुरुवर्य वि. रा. शिंदे व सर्व प्रमुख माणसें भराभर कोर्टांत जमा होऊं लागलीं. शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं कोर्टाचें पटांगण भरून गेलें. शहरांतील ब्राह्मणेतर पक्षीय लोकांची गर्दी होत चालली. आम्हांला कोर्टांतच बसविल्यामुळें पटांगणांत उभी असलेलीं सर्व माणसें आम्हांकडे सारखी पहात होतीं. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं आमची घरची मोटार असल्यास घरच्या मोटारीनें येरवड्यास जाण्याची परवानगी दिली. लागलीच खासेसाहेब महाराजांची मोटार बाहेर जमलेल्या समुदायापैकीं कोणी आणली; परंतु जामिनावर येथेंच मोंकळें होतां येईल तर पहावें असें बागडे यांनीं ठरविल्यामुळें त्याच घटकेला येरवड्यास गेलों नाहीं. तासाचे घंटे बरोबर साठ मिनिटांनेंच पडत होते. पण पांच-पांच मिनिटाला तास होऊन गेला असें वाटत असें. सेशन कोर्टांत अपील गुदरून जामिनावर मोकळे करण्याकरतां खासेसाहेबांच्या मोटारींत श्री. बाबुराव जेधे, गुप्ते व मोरे वकील रवाना झाले. समोरील गर्दी वाढतच होती. अखेर जामिनावर सोडविण्याकरतां गेलेली मोटार परत आली नाहीं पण येरवड्यास पोंचविण्या-करतां जाणारी ती भली मोठी कैद्यांची मोटार "घर घर" असा भयानक नाद करीत येऊन दाखल झाली. त्या वेळेस मॅजिस्ट्रेट साहेबांनीं आम्हाला निरोप दिला. कोर्टांत जिन्यांतून चोहोंकडे खूप गर्दी होती. मोटार दारापासून पाच-सात पावलांवर उभी केली होती, पण त्याच पाच-सात पाऊलांची वाट गर्दी बाजूस सारून काढलेली होती. हीं पाच-सात पाऊलें टाकीत असतां हार येऊं लागले. कैदी पोंचविणारे अधिकारी हार घालूं नका असें सांगत होतें. आम्ही आमच्या गळ्यांतील हार काढीत होतों, तरी पुन्हा लोक हार घातल्याशिवाय राहात नसत. प्रथम मी, नंतर जेधे व बागडे मोटारींत जाऊन बसले. लोकांनी आतां मोटारमध्यें हार टाकले आणि एकदम दार बंद झाल्याबरोबर बाहेर श्री शिवाजी महाराजकी जय व महात्मा फुले की जय ही गर्जना ऐकूं येऊं लागली.

कोर्टाचे बाहेर करुण रस भरलेला होता. मोटारींचा "धुमधुम" असा आवाज होऊं लागला–बाहेर लोक ओरडतच होते. आमची मोटार एकदम सुरू झाली. आंतमध्यें एक दोन कैदी होते ते बिचारे आम्हां तिघांचे कपडे व हा सारा प्रकार पाहून स्वस्थ बसले होते. मोटार सुरू झाल्याबरोबर श्री. बागडे हंसत म्हणाले, "आता बसूं या कीं चांगले मांड्या ठोकून!"

या मोटारींतून जात असतां आपण कोणत्या रस्त्यानें चाललों आहे हें मुळींच समजत नाहीं. जी सापट असते त्यांतून रस्ता दिसतो पण तो ओळखतां येणें अशक्य असतें. थोड्याच वेळांत एका ठिकाणीं वळण घेऊन मोटार उभी राहिली. मोटारचें दार उघडलें तों येरवडा सेंट्रल प्रिझनचा दरवाजा दिसला. मोटारींतून आम्ही तिघे उतरलों तेव्हां पोलीस, वॉर्डर वगैरे आंतून पाहात होते. बाहेर कामाला जाऊन "संकल" बेड्यांचा आवाज देणारे कैद्यांचे ताफे आम्हांकडे सारखे पाहात होते. मोटारींत जीं फुलें पडलीं होतीं तीं बाहेर काढण्यांत आली. तुरुंगाच्या "दिंडी"तून आम्ही आंत शिरलों. आंत शिरतांना डाव्या हाताला एक लहानसें टेबल व स्टूल ठेवून एक जमादार बसलेले असतात. तेथें आम्ही व आम्हांबरोबर आलेले कैदी दोघे दोघे असे ओळीनें बसविण्यांत आले. आमचीं नांवें तेथें लिहून घेतलीं. आमच्या खिशांतले पैसे व घड्याळें तेथें स्वाधीन करावीं लागलीं. आंत शिरतांच ती इमारत कशी निराळीच दिसूं लागली. प्रत्येक वस्तु नवलाची वाटूं लागली. भव्य दरवाजा, त्याचे ते भक्कम गज व त्यावरला पोलिसांचा जिवंत पहारा नवीनपणामुळें पाहण्यासारखा वाटला. वॉर्डरांच्या त्या पिवळ्या बिजाही पाहून तेहि कैदी असतील अशी मला प्रथम कल्पनाच आली नाहीं. आम्हांला नंतर ऑफीसमध्यें नेण्यांत आलें. एका कारकुनापुढें आमचीं नांवें व आम्हांला झालेल्या शिक्षा आमच्या तोंडून वदविण्यांत आल्यानंतर खुद्द जेलर साहेबांच्याहि पुढें उभें करण्यांत आलें. जेलरसाहेबांचें एकंदर वर्तनांत "युरोपियन जंटलमनशिप" पूर्णपणें दिसून आली. आमची साधी कैद असल्यामुळें आमचे कपडे बदलावयाचे नव्हते. झडती वगैरे होऊन नंतर खऱ्या तुरुंगाच्या आंत आमचा प्रवेश झाला. नंतर "स्टोअर"मध्ये नेऊन तेथें आम्हांला एक काथ्याचें भक्कम व नवें असें तरट व दोन नव्या करकरीत घोंगड्या प्रत्येकाला दिल्या. त्याबरोबर

थालीपाट

देण्यांत आलें. "थाली" व "पाट" (Pot) हीं दोन जस्ताचीं भांडीं असावींत असें मला वाटतें! प्रथम त्यांचा रंग मला टिनसारखाच दिसला. एका हातांत "थाली-पाट" व एका हातांत "बिस्तरा" घेऊन एक वॉर्डर आम्हांला इस्पितळांतल्या बराकींत नेत होता. नव्या पाहुण्यांचा मुक्काम प्रथम इस्पितळांतील बराकींत होत असतो. तेथें त्यांचें क्लासिफिकेशन, काम देणें, देवी काढणें वगैरे झाल्यावर त्यांना पुढें जेथें पाठवितील तेथें जावें लागतें. आम्ही दहापांच पावलें गेलों नसूं तोंच दुसरा "वॉर्डर"

आला व त्यानें " पिच्छे लाव " असा दुसऱ्या वॉर्डरला हुकूम फर्माविला. आम्हांला वाटलें आमचा जामीन पटला व आतां आम्ही सुटूं. एकच क्षण पण तिघांच्याहि चेहऱ्यावर आनंद झळकल्याशिवाय राहिला नाहीं. पण दुसऱ्याच निमिषांत " अंधरीमें रखनेका है " आणि तेवढ्याकरतां परत बोलाविलें आहे असें समजलें. लागलीच ठरलेल्या जागीं म्हणजे ८ खोल्या असलेल्या चाळींत आम्हांला नेऊन प्रत्येकाला निरनिराळ्या खोलींत जाण्यास सांगितलें. जेल बंद होण्याची वेळ होती, त्यामुळें आंत " सेल "मध्ये शिरतांच दार बंद करून " टाळा " लावण्यांत आला. एक वॉर्डर पुन्हा खात्री करून घेण्याकरतां " टाळा " तपासून गेला. थोड्याच वेळांत तुरुंगांतली जमादारांची पहिली " अलबिल " ऐकावयाला मिळाली. सर्व कैदी बंद झाल्यावर व रात्रपाळीच्या वॉर्डरच्या ताब्यांत तो हिशेब दिल्यावर पुढील मजेदार संभाषण ऐकूं येतें—

जमादार—अमुक कैदी, टाला खिडकी बोलट गज बराबर है ?

वॉर्डर—बराबर है !

जमादार—कारकून बंद है ?

वॉर्डर—बंद है !

जमा०—हं बोल.

वॉर्डर—(कैद्यांची संख्या उच्चारून) अमुक कैदी बराबर बंद है जमादारसाब ! असें म्हणून सॅलूट करीत असें. आमच्या बराकीपुढेंच हा प्रकार रोज पहाण्यास मिळे ! तुरुंगामध्यें आमच्या राहण्याच्या ठिकाण्याला अंधारी हें मराठी नांव होतें व सॉलीटरी (Solitary) हें इंग्रजी नांव होतें. येरवड्याच्या तुरुंगांत, " युरोपीन " फाशी गॅट, अंधेरी, " सप्रेट " (Separate), " इस्पिताळ " सर्कल नं. १ नं. २ व नं. ३ अशी निरनिराळ्या भागांचीं नांवें असून " इस्टोर " (Store) व " बत्तिखाना " अशी दुसऱ्या दोन भागांना नांवें आहेत. अंधेरींपैकीं आम्ही जुन्या अंधेरींत होतों. नांव अंधेरी पण तितका उजेड, तितकी स्वच्छता बाहेर पाहावयास मिळणार नाहीं. श्री. केशवराव तर त्याला क्वार्टरस म्हणत. पहिल्या दिवशीं आम्ही बंद झाल्यावर कोणाशीं कांहीं बोललों नाहीं. आधल्या रात्रीं मुंबईच्या त्रासानें व गाडींत जागरण झाल्यामुळें दमलों होतों. पोटांत जरी कांहीं नव्हतें तरी अतिश्रमामुळें मला ६ च्या सुमारास झोंप लागली. प्रातर्विधी करतां " सेल "मध्यें दोन कुंडे माडलेले असतात. ऑफिसच्या बाजूला प्रत्येक तासाला वाजणारा ' तास ' प्रथम एक दोन दिवस भेसुर नाद काढीत आहे असें वाटत असे. पहिल्या दिवशीं ऑफिसहि उंच आहे असें वाटलें. सकाळीं सुमारें साडे-सातच्या सुमारास जेल " खोलण्याची घंटा " वाजली. " चावीवाला " येऊन आमच्या सेल्स खोलून गेला. एक चावीवाला, एक जमादार असे दोन अंमलदार व चार वॉर्डर इतके अधिकारी आमच्या तुरुंगांतल्या मुलखावर असत. सकाळीं उठल्याबरोबर जवळच असलेल्या नळावर तोंड धुवून सेल जवळ येऊन बसलों ! आम्ही बुधवारी संध्याकाळीं मुक्कामाला तेथें गेलों होतों त्यामुळें दुसऱ्या दिवशीं आम्ही कोठें आहोंत याची पर्वा न

करतां नेमका बुधवारपुढें गुरुवारच आला. तिकडून एक कैदी जस्ताचाच एक भला मोठा पोहरा घेऊन व हातांत एक माप घेऊन

कंजी घेऊन आला.

कंजी हा पदार्थ काय आहे हें समजून घ्यायला तुरुंगांतच गेलें पाहिजे. हें पक्वान्न केव्हां-पासून पैदा झालें व कोणी केलें असावें हें समजत नाहीं. अश्वत्थाम्यानें दूध मागितलें असतां त्याच्या आईनें त्याला पीठ व पाणी कालवून पिण्यास दिलें होतें, अशी एक पौराणिक कथा आपल्यांत आहे, पण त्यांत त्याच्या आईनें मीठही घातलें होतें कां नाहीं हें सांगायला आज अश्वत्थामा जिवंत नाहीं. पण आमचें अश्वत्थामा छापाचें "कंडेन्सड् मिल्क" अगदीं गरम गरम आम्हांपुढें आलें. आमच्या मराठ्यांत खेडेगांवला उरसाच्या वेळीं जत्रा असली म्हणजे एखादें बकरें मारण्याचा प्रसंग असला म्हणजे त्यांत "कण्या" हें एक पक्वान्न करीत असतात. बाजरी न दळतां भातासारखी उकडून भाताच्या ऐवजीं

'बरबटा' बरोबर

ह्या "कण्या" खात असतात आणि त्या मी खाल्लेल्या आहेत. पण या कंजीत सबंध धान्य न घालतां त्या धान्याचें पीठ करून अश्वत्थाम्याचें दूध ऊर्फ कंजी तयार केलेली असतें. आम्ही तिघांनीं जेव्हां आमच्या वाट्यांची वाफा निघणारी गरमागरम कंजी थाळींत घेतली तेंव्हां तिघेही एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलों. जेधे यांच्यासारखे धनाढ्य, श्रीमंतीचे व सर्वस्वी सुखांत वाढलेले तरुण व श्री. बागडे यांच्यासारखे सुखवस्तु व विद्वान वकील यांच्यापुढें जेव्हां ती कंजी पाहिली तेव्हां मला वाईट वाटलें. बागडे यांच्या नेहमींच्या स्वभावानुसार त्यांनीं त्या कंजीकडे पाहून विनोदाला सुरुवात केली. आम्ही तोंडाला ती कंजी लावली. जेधे यांच्या घशाखाली ती कंजी उतरेना. मी डोळे झांकले आणि एकाच सपाट्याला 'थाळी' खाली करून टाकली. मला चहाचें व्यसन जबरदस्त व सुप्रसिद्ध असल्यामुळें कोणीकडून तरी घसा भाजून घेण्याची संवय पडली होती. मी सबंध कंजी प्यालेला पाहून "जवळकर म्हशीचें शेण काढीत आहां असें तुमचं एका पत्रानें कॅरिकेचर काढलें होतें तें बरोबर आहे," अशी जेधे यांनीं कोटी केली. माझ्या आईच्या वडलांचा गवळ्याचा धंदा होता त्या धंद्यांत म्हैस दूध देत नसली किंवा व्याली तर तिला "कंजी" शिजवून घालतात या प्रकारावर जेध्यांची कोटी होती. आणि ही कंजी पुढें एक दोन दिवसांत मला आणखी मिळावी असें मला वाटूं लागलें.

चहाची तहान भागवायला कंजीच जास्त चांगली. मी कंजीची जन्मभर शिफारस करीत राहीन. कारण या कंजीनें माझ्या जिभेवर चहानें पाडलेला पगडा कायमचा काढून टाकला आणि चहाशिवाय मला नुसतें जगतां येणेंच नव्हें तर सशक्त होतां येईल असें प्रत्ययास आणून दिलें. येरवड्यासारख्या स्वच्छ ठिकाणीं कंजी मिळत गेल्यामुळें माझें वजन वाढत गेलें. चहानें भूक लागत नाहीं पण कंजी म्हणजे पहिलवानाची "खुराक"

आहे. उत्तम भूक लागण्याला कंजीसारखें दुसरें औषध नाहीं असें पुढें माझ्या प्रत्ययास आलें. हा "कंजी पान" विधी आटोपल्यावर वॉर्डरनें आज

"फालीम" आहे

म्हणून सांगितलें. आमच्या भागांत दर गुरुवारीं जेलर सुपरिंटेंडेंट ह्यांची इन्स्पेक्शन असते—"फालीम" या शब्दाचा अर्थ तर नाहींच कळला, पण कशाला "फालीम" म्हणतात हेंही समजेना. प्रत्येकानें आपापल्या सेलच्या दारांत "बिस्तारा" ठेवून थालीपाट नीट ठेवून उभें राहावयाचें असतें व इन्स्पेक्शनला फालीम म्हणतात, हें नंतर ध्यानांत आलें. सुपरिंटेन्डंटसाहेब जेलरसह प्रत्येक कैद्याची सहानुभूतिपूर्वक चौकशी करीत आम्हा समोरून गेले; सेलच्या बाहेर उभे राहिलेले असे आम्ही तिघे व आणखी एक पठाण कैदी असे साध्या (simple) कैदेचेच कैदी उभे होतों. बाकी सगळे खोलीबंद होते. आमच्या बराकीसमोर एक जेलमधला मोठा रस्ताच होता. युरोपीयन वॉर्डकडे जाणारे लोक (कैदी व वॉर्डर) आमच्या समोरून जात. पोलीस अंमलदारांच्या टोपीवर एक लहानसें बक्कल असतें व त्या बक्कलावर दोन किल्ल्यांचा क्रॉस काढलेला असतो अशा तऱ्हेचे किल्लीछाप पोलीस; त्यांतून 'चावीवाल्या'च्या हातांत तर किल्ल्यांचा भला मोठा जुडगा—एक दंडा व पट्ट्याला एक 'हातबेडी' कायमची लटकलेली दिसावयाचीच. 'फालीम' होऊन गेल्यावर बरोबर ९ वाजतां आमचा सकाळचा 'कंजीवाला' व दुसरा एक कैदी एकाच्या डोक्यावर भाकरीची परात व दुसऱ्याच्या हातांत भाजीचा पोहरा अशा रीतीनें भाकरी वाटीत ते आले. लागलीच वॉर्डरनें

आपला भत्ता ले लेव

म्हणून सुचविलें. तो 'भत्ता' जवळ येईपर्यंत आम्हांला कसलीच कल्पना नव्हती. भाजीच्या पोहऱ्यांतून एक माप भाजी व तीन नंबरच्या दोन रोट्या आम्हाला देण्यांत आल्या. 'रोट्या' जोंधळ्याच्या होत्या. भाजीमध्यें निरनिराळ्या जिनसांच्या मिश्रणामुळें मूळ ही भाजी कशाची केलेली आहे हें ओळखणें दुरापास्त होतें आणि मोठा वनस्पति-शास्त्रज्ञ जरी गेला तरी पहिल्या दिवशीं त्याला त्या भाजीचें स्वरूप ठरविणें कठीण जाईल. बागडे व जेधे आम्ही तिघेही 'रोट्या' फरशीवर ठेवून भाजी 'थाळींत' ठेवून खाण्यास सुरुवात केली; 'पाट'मध्यें पिण्याकरतां पाणी भरून ठेवलेलें होतें. बागडे यांच्या विनोदानें पुनः येथें उचल खाल्लीच, आणि आमचा तें अन्न खाण्याचा पहिलाच प्रसंग असल्यामुळें अर्ध्या भाकरीवर आमच्या जिभेनें सत्याग्रह पुकारला. बागडे आदल्या दिवसाचे सबंध उपाशी होते. जेधे व मी सुद्धां दडपून जेवलों होतों तरी त्याला मोजून २४ तास लोटले होते. आणि त्या वेळेस पोटांत असें भुकेचें बंड माजलेलें नसतें तर ती अर्धी भाकरसुद्धां खाणें शक्य झालें नसतें. 'भत्ता' खाल्ल्यावर नंतर आमच्या गप्पांना सुरुवात झाली. वॉर्डर किंवा पोलीस अंमलदार आमच्याशीं आदबीनें वागताहेत असें आम्हांला

पहिल्या दिवशीं दिसून आलें. दहा वाजल्यानंतर अकरा कांहीं लवकर वाजेनात. तिवेहि एके ठिकाणींच असल्यामुळें बोलण्यास सवड होती. आमच्या खोल्यांच्या दारांत बसलें म्हणजे गाड्या वगैरे ओढीत गेलेले कैदी दिसत. तेवढ्यांत " जवळकर, पुढल्या खटल्यांत तुम्हांला समजा सक्त मजुरी झाली तर असें काम करावें लागेल. " हा जेधे यांचा विनोद चालायचाच. सकाळीं " कुंडेवाला "—हा महार किंवा भिल्ल या जातीचा बहुतेक असतो —सकाळी येऊन त्यानें प्रत्येक खोलींतले कुंडे काढून नेले होते. आमची थट्टा येथपर्यंत चालत असें कीं, आपण कुठें आहोंत याचा सुद्धां आम्हाला विसर पडत असें. स्वामी रामतीर्थ यांनीं एकदां भग्याचे संडास कां झाडलें व नम्रता येण्यास त्यालाहि आपली तयारी कशी असावी वगैरे गोष्टी बागडे सांगत. बारा, एक, दोन लवकर वाजेनात. झालें चारचे ठोके पडले आणि लागलीच एका मिनिटानें शाळा सुटण्याच्या वेळेला वाजण्यासारखी घंटा वाजली आणि आमचा " भिसीवाला " (चढण्या) " भत्ता " घेऊन आला. बागडे यांच्या सेलचा नंबर ६, जेधे यांचा ५ व माझा ४ होता. त्यामुळें बागड्यांनीं पहिल्या सपाट्याला भत्ता नको म्हणून सांगितलें. त्यांच्या पाठोपाठ आम्ही दोघांनीं सांगितलें. आम्ही भत्ता घेतला नाहीं हें पाहतांच जमादारानें आपण " इनकार " करीत आहांत कां म्हणून विचारलें, कारण कोणत्याहि कैद्यानें रोटीचा इन्कार केला कीं, त्याचा " रपोट " (Report) करावा लागतो. बागडे म्हणाले अजून आम्ही खावयाला शिकतों आहों, आम्ही " इन्कार " करीत नाहीं. कारण आमच्या जिभेचे चोचले पुरविण्याकरतां आम्ही कांहीं तुरुंगांत गेलों नव्हतों. आमचा जामीन अजून पटेल व आम्ही आज सुटूं अशीहि आम्हाला आशा होती. पांचचे ठोके पडले आणि चावीवाला येऊन नियमाप्रमाणें बंद करून गेला. आमच्या " जामीना "विषयीं आमचे निरनिराळे तर्क चालत. गुरुवार गेला, शुक्रवार आला, शुक्रवारीं पुन्हां रोजचीच कंजी व रोटी बाजरीची आली. दर मंगळवार व शुक्रवारीं बाजरीच्या प्रत्येक वेळेला दोन रोट्या मिळतात. मंगळवारीं सकाळीं व शुक्रवारीं सायंकाळीं " डाळ " मिळते. हे दोन वार खेरीजकरून डाळ घातलेली भाजी मिळते आणि या दोन दिवशीं एक वेळ निर्भेळ डाळ व निर्भेळ भाजी मिळते. शुक्रवारीं आम्ही " भत्ता " खाण्यास शिकलों किंवा आम्हांला भुकेनें शिकवलें, शुक्रवारीं संध्याकाळीं जी " डाळ " मिळाली ती तर सर्वच खाल्ली आणि तिघांनीं पोटभर " भत्ता " खाल्ला. इतक्यांत एक वॉर्डर चार कैदी पाठवा अशी चिट्ठी घेऊन आला. आम्हांला वाटलें, जमानत झाली, थोडेंसें बरेंहि वाटलें. आम्ही तिघे आणि मागल्या बराकींतून लाडांना बोलावून आणलें गेलें. लाडांच्या अंगावर कारागृहाचीं पावणें दोन वस्त्रें चढलेलीं, एक बंडी, लांडी चड्डी व टोपी. आम्ही तिघे आमच्या नेहमींच्याच पोषाखांत होतों. चौघांना मुलाखतीच्या ऑफिसांत नेण्यांत आलें आणि तेथें आमची मुलाखत झाली. जामिनाचें अजून जमलें नाहीं, उद्यां समजेल अशी बातमी समजली. टूथपावडर, साबण, धोतरें, चादरी व टुवाल हीं उद्यां येतांना घेऊन या असें सांगावें लागलें. दुसऱ्या दिवशींच सदर सामान मिळालें. शनिवारीं कारकुनानें (तोहि कैदीच

असतो) येऊन विचारल, " मटण तुमकू चलता ". बागडे मटण खात नाहींत; पण आम्ही दोघांनी होय म्हणून सांगितलें. रविवारीं सायंकाळीं मटण मिळत असतें हा आणखी नवा शोध आम्हांला लागला. या दिवसापासून तुरुंग बराच ओळखीचा झाल्यासारखा वाटूं लागला. रविवारीं तराजूनें मोजून मटण व मापानें मटणाचें पाणी किंवा कालवण किंवा रसा त्याला वाटेल तें नांव दिलें तरी एक एका अर्थानें लागूं पडेल. आम्हाला त्या दिवशीं " मटण " अगदीं घरच्यासारखें जेवण लागलें. मटण खात नाहींत त्यांना " डाळ " मिळत असते. कांहीं वाचावयास नसल्यामुळें दिवस जात नाहीं. जेलमध्यें एक मोठी लायब्ररी आहे. एक दोन दिवसांत त्यांतून तीन पुस्तकें वाचावयास मिळालीं. एक विष्णुशास्त्री चिपळुणकरांचें चरित्र, टिळकांचें गीतारहस्य व रामतीर्थांचीं व्याख्यानें. या पुस्तकांपैकीं चिपळुणकरांचें चरित्र न उघडतांच शेवटपर्यंत पडलें होतें. कारण खटल्यांत पुराव्याकरतां उलट तपासिणीकरतां उलटेंसुलटें अनेक वेळां तें आम्ही वाचून काढलेलें होतें. गीतारहस्य प्रसिद्ध झालें त्याच वेळीं मी वाचलेलें होतें आणि वेळ काढण्याकरतां पुन्हां वाचण्यास सुरवात केली. हळूहळू शेजारच्या कैद्यांची थोडी थोडी ओळख होऊं लागली. ज्यांनीं जेलमध्यें गुन्हे केले असतील त्यांना ठेवण्याचा आमचा वॉर्ड असल्यामुळें आमचा तो एक

जेलमधला जेल होता.

आम्हाला नांवाने हांक मारणें उपमर्दकारक होईल म्हणूनच कीं काय तिथेंच असलेल्या एका मोंगल कैद्यानें आम्हाला नांवें दिलीं होतीं. बागडे यांना ' वकीलसाब ', जेधे यांना ' शेटसाब ' व आम्हाला ' मास्टरसाब ' अशा पदव्या मिळाल्या आणि बहुतेक आम्हाला याच नांवानें संबोधित! कैदी नवीन आल्यावर त्याच्या कपड्यांचें वगैरे चेकिंग व्हावें लागतें, आंत येतांना जे जे कपडे आणले त्यावर पुन्हां ऑफिसरपुढें जाऊन चेकिंग व्हावें लागतें. म्हणजे यावेळेस ' भत्ता ' आमच्या तोंडवळणी पडूं लागला होता. जामिनाची वाट पाहातच होतों; बाहेर छत्रपती मेळा निघाला असेल काय वगैरे विषयीं आमचे निरनिराळे तर्क चालत असत. एक दिवस आमच्या बराकींत डॉक्टर येऊन त्यांनीं प्रत्येकाला कोयनेल पिण्यास दिलें. जेधे यांना त्यामुळें दोन सटकून ओकाऱ्या झाल्या. लागलीच डॉक्टरांनीं त्यांना पुन्हां ॲन्टी डोज दिला. रात्रौ नऊ वाजतां पुन्हां डॉक्टर एकदां येऊन जेध्यांच्या तब्येतीची चौकशी करून गेले. एक दिवस आम्ही सेलमध्यें सायंकाळीं बंद झाल्यावर मी एक पुस्तक वाचीत बसलों होतों आणि जेधे

" शिवाजी आमचा राणा, मराठी आमचा बाणा "

हें काव्य म्हणत होते. मी हें पद्य त्यांच्या तोंडून बाहेर अनेक वेळां ऐकलें होतें. पण तुरुंगांतल्या स्थल व काल महात्म्यामुळें आणि त्यांच्या खड्या सुरेल आवाजामुळें मी जणुं काय तें अगदीं पहिल्यानेंच ऐकतों आहे असें वाटूं लागलें. मी मी म्हणणारे मारते पर तुरुंग म्हणतांच नांगी टाकतात आणि आमचे जेधे तुरुंगामध्यें " शिवाजी आमचा राणा '

आळवताहेत — माझ्या डोक्यांतून सिनेमांतल्या चित्राप्रमाणें अनेक कल्पना येऊन गेल्या. जेध्यांच्या आवाजांत एक प्रकारची चैतन्य उत्पन्न करण्याची शक्ति आहे. प्रत्येक शब्द हृदयांत जाऊन भिडतो. आपला बहुमोलाचा मोठेपणा विसरून " छत्रपति मेळयां"त जेधे स्वतः पदे म्हणत असल्यामुळें मेळयाचा श्रोतृसमुदाय समुद्रासारखा मेळयाभोंवती पसरलेला असे. या त्यांच्या तुरुंगातहि गाणें म्हणण्यापर्यंत प्रफुल्लित होणाऱ्या आनंदी वृत्तीला पाहून कौतुकासह आश्चर्यहि वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आज ज्यांना परमेश्वराच्या कृपेनें कसलीहि ददात नाहीं, संतति, संपत्ति, कीर्ति, लोकप्रीति आणि गोकुळासारखें गजबजलेलें घर सोडून ते सहा महिने तुरुंगवास पत्करण्यास तयार झाले तर माझ्यासारख्या गरीब माणसाला एक वर्ष म्हणजे सहज आहे, या कल्पनेनें मला अवसान चढत असें आणि एक वर्ष हां हां म्हणता निघून जाईल असें वाटत असें. जेध्यांची पुण्याई हें ब्राह्मणेतर पक्षाचें भांडवल आहे. हें भांडवल, ही पुण्याई जर ब्राह्मणेतर पक्षाच्या पाठीवर परमेश्वराप्रमाणें उभी नसती तर राजर्षि शाहुमहाराजांच्या पाठीमागें ब्राह्मणेतर पक्षाची स्थिति केविलवाणी झाली असती. म. फुले, भालेकर, लोखंडे वगैरे पहिल्या पिढीनंतर सत्यशोधक समाज ऐकूंसुद्धां येत नव्हता. त्याप्रमाणें शाहुमहाराजांच्या नंतरहि तसें झालें असतें, परंतु ब्राह्मणेतर समाजाचें सुदैव म्हणूनच असे अनेक पुढारी उत्पन्न झाले.

कोणतोहि चळवळ यशस्वी व्हावयाला त्या चळवळीच्या नेत्यांमध्यें पहिल्या प्रतीचा प्रामाणिकपणा असावा लागतो. कोणत्याहि पक्षाच्या स्थानिक अनुयायांमध्यें काहीं तरी धुसफूस असायचीच. हें सार्वजनिक चळवळीचा बारकाईनें अभ्यास करणाऱ्या माणसाला चटकन समजून येतें. पण पुण्यांत ब्राह्मणेतर पक्षाची एवढी जूट कां यावें इंगित जेधे बंधूंच्या प्रामाणिक, प्रेमळ व परोपकारी वृत्तींत सांपडणार आहे.

सत्यशोधक

समाजाच्या नांवानें दांतओंठ खाणारे बडेबडे आदमीहि जेधे यांच्या वैयक्तिक मोठेपणामुळें व परोपकारीबुद्धीमुळें कट्टे सत्यशोधक बनलेले आहेत. ज्यांची वर्तमानपत्रांतून सारखी स्तुति येत असते पण ज्यांना आपण प्रत्यक्ष भेटलों असतां निराळाच अनुभव येईल असे अनेक पुढारी विद्यमान राजकीय पक्षांत सांपडतील, पण विरुद्ध पक्षानें ज्यांच्याविषयीं गैरसमज पसरविण्याचा कमाल प्रयत्न केला आहे त्या जेधेबंधूंना जर कोणी प्रत्यक्ष जाऊन भेटला तर तो गारीगार झालाच पाहिजे. महाराष्ट्र व वऱ्हाड येथील ब्राह्मणेतर पक्षाचें पुढारपण एकमुखी व निर्विवाद अशा रीतीनें " जेधे मॅन्शन "मध्यें एकवटण्याचें कारण जेध्यांच्या प्रामाणिकपणांतच सांपडेल. ब्राह्मणेतर पक्षाचा कोणीहि मनुष्य असो मग तो कौन्सिलचा उमेदवार असो नाहींतर मजसारखा कोर्टापुढें उभा राहिलेला आरोपी असो, पाठीमागें कोणीहि वळून पाहिल्यास मनापासून मदत करण्यास धांवून आलेल्यामध्यें अगदीं पहिल्या प्रथम जेधेबंधूंच सांपडतील. इत्यादि विचार तुरुंगांत जितक्या प्रखरतेनें

माझ्या डोक्यांत येत तितके बाहेर कधींच येत नव्हते. बाहेर अशाप्रकारचे विचार येण्यास सवडहि मिळत नसे. चळवळीला मोठेपण यायला चळवळींत मोठीं माणसें असावीं लागतात आणि माणसें मोठीं व्हायला त्यांनीं तत्त्वनिष्ठ व प्रामाणिक असावें लागतें.

चळवळीच्या पाठीवर पुढाऱ्यांचें "गुड बिल" नसेल तर ती चळवळ कशीहि असो, यशस्वी होणें कठीण असतें. तत्त्व कितीहि उन्नतिप्रद असो पण तें ध्येय व तत्त्व जर ध्येयनिष्ठ सच्च्या पुढाऱ्यांकडून प्रतिपादिलें जात नसेल तर त्याला यश येणार नाहीं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची जर कोणी तुलना करूं लागला तर आज ब्राह्मणेतर पक्ष ब्राह्मण समाजाला सारखा चौफेर रेटीत कां नेत आहे याचें इंगीत तत्त्वनिष्ठ ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या प्रामाणिकपणांत सांपडेल. आज खादी वापरा, उद्यां होळ्या करा, पर्वा कॉलेजे सोडा, पुन्हां मतें द्या, खादी फाडा, चरखा फोडा आणि नोकऱ्या जोडा असा विसंगत उपदेश करण्याचें पातक आजपर्यंत ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं कधींच केलें नाहीं.

अनुयायांचा विश्वास हेंच पुढाऱ्याचें पुढारपण

असल्यामुळें व कांहीं पुढाऱ्यांनीं वाहत्या वाऱ्याबर वाहात जाण्याची प्रवृत्ति ठेवल्यामुळें ते जनतेच्या व अनुयायांच्या विश्वासाला मुकले आहेत. ब्राह्मणेतर पक्षांत असा प्रसंग कधींच आला नाहीं. आजूबाजूची परिस्थिति गढूळ झाल्यामुळें घाबरून जाऊन त्या परिस्थितींत वाहात जाण्याचा घाबरटपणा ब्राह्मणांनीं केला आणि परिस्थितीला न डरतां आपल्या सोयी-प्रमाणेंच परिस्थिति उत्पन्न करण्याचें धैर्य ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांनीं दाखविलें. तारुण्य आणि विद्यार्थी दशा असल्यावर रक्त सळसळत असतें. तरुण भावनाप्रधान असतो आणि भावनावश तरुण त्यामुळें अंधश्रद्धाळु बनतो; असा तरुणांच्या कोंवळ्या मनाचा फायदा घेऊन त्यांना आपल्या देशभक्तीच्या वेगडी डामडौलाकरतां बळी देण्याचें महापातक ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं केलें नाहीं. तरुण ब्राह्मणेतर महाराष्ट्र भलतीकडे भडकूं न देतां सत्कार्यावरच त्याला खडा रोखण्याचें भीमकर्म राजर्षि शाहुमहाराजांनीं केलें आणि आज तें जेधेबंधु पुढें चालवीत आहेत—माझ्या स्वतःविषयीं विचाराल तर मला मातापित्यानें जन्म दिला, शाहुमहाराजांनीं तत्त्व दिलें आणि जेधेबंधूंनी चारित्र्य (Life) दिलेलें आहे.

ता. १५ सप्टेंबरला देशाचे दुष्मन केसमध्यें आम्हांला येरवडा जेलमध्यें जावें लागलें. ह्यावेळीं माझा १५३ (अ) चा खटला चालूं होताच. त्या खटल्याची तारीख २२ लागली होती. खटले लढविण्यांत पुरावे गोळा करून वकिलासंबंधीं तयारी करून देण्याची भूमिका मी व केशवराव जेधे यांच्याकडे असे आणि आम्ही दोघेहि आमच्या 'थालीपाट'मध्यें 'भिसी'वाल्याचा 'भत्ता' खात 'जुन्या' अंधारींत पडलेले! तेव्हां १५३ (अ) च्या खटल्याची हेळसांड होते कीं काय अशी एक धास्ती वाटूं लागली. खटल्याचा निकाल कसाही लागो पण निकाल लागल्यावर "आपण असें केलें असतें तर

बरें झालें असतें, तसें केलें असतें तर बरें झालें असतें" अशी मनाला पुढें खुरखुर राहूं नये म्हणून आटोकाट व अहर्निश झटून सगळ्या गोष्टींचा खटल्यांत फायदा मिळवण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतों! पण या वेळेस आम्ही "कैदी" होतों. खटला अर्धवटच संपत आला होता. श्री. गुप्ते वकील यांनीं जेल ॲथॉरिटीजबरोबर पत्रव्यवहार करून तिथें जेलमध्येंहि या १५३ च्या खटल्याचा पुरावा तयार करून देण्याची आम्हांला परवानगी मिळवून दिली. आम्हांला पाहिजे तों पुस्तकें जेलमध्यें पाठविण्यांत आलीं आणि सकाळीं ऑफिसांत बोलावून तास-दोन तास तीं वाचण्याची सवलत मिळाली.

तुरुंगामध्यें ही वेळ मौजेंत जात असे. २२ तारखेला मला कैद्याच्या मोटारींतून १५३ (अ) च्या खटल्याकरता सिटी सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट मि. स्लेडन यांचे कोर्टांत आणलें. त्यादिवशीं कांहींच काम चाललें नाहीं. पुन्हां दुसऱ्या दिवशीं आणण्यांत आलें यामुळें ती कैद्यांची मोटार जरा संवयीची वाटूं लागली. अण्डर ट्रायलस या मोटारींतून कोर्टांत पोचविण्यांत येतात. ही मोटार चोहोंकडून झांकलेली असून आंत बसतांच आतील लोक बहुतेक विड्या ओढायला सुरुवात करतात, त्यामुळें गुदमरल्यासारखें होऊं लागतें; पण दहा पंधरा मिनिटांपेक्षां जास्त तुरुंगाचा प्रवास नसल्यामुळें तेवढें सहन करतां येत असें. तुरुंगांत

तंबाखू, विडी किंवा सिगारेट

पाहण्याससुद्धां मिळत नाहीं. पूर्वी विड्याचें व सिगारेटचें व्यसन मला जबरदस्त जडलेलें होतें. तुरुंगामध्यें मात्र काय असेल तें असो पण चहा सिगारेटची आठवणसुद्धां होत नसे; बॉर्डर लोकांना त्यांच्या घरच्या पैशानें रोज सायंकाळीं तीन विड्या मिळण्याची परवानगी आहे असें बॉर्डर सांगत असत, पण आपण सर्वस्वाला सोडण्याची तयारी केल्यावर चैनीच्या वस्तु सोडणें मुळींच अवघड नसतें. बॉर्डरांना रोज जोंधळें किंवा बाजरी न मिळतां गव्हाच्या रोट्या दर वेळेस दोन मिळत असतात. तुरुंगांत पोंचल्यापासून सुमारें आठ-दहा दिवसांत कैद्यांचे क्लासिफिकेशन होत असतें. आम्हां तिघांनाहि हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें, तेथें डॉक्टरांनीं आमच्या शरीराची कसून तपासणी केली, आमची उंची व वजन मोजण्यांत आलें. माझी उंची

५ फूट ५ इंच

आहे हें तेव्हांपासून समजलें व वजन ८७ पौंड भरलें. याच वेळीं शरीरावरील मुख्य खुणा व चेहेरेपट्टी लिहून घेत असतात. माझ्या तळहातावरला तीळ पहिल्याप्रथम लिहिला गेला. याच वेळेला व्हॅक्सीनेशन करावयाचें असतें. तुरुंगात गेल्यावर प्रत्येकाला देवी काढाव्याच लागतात. डॉक्टरांनीं तपासल्यानंतर सुपरिंटेंडंटसाहेबांच्या पुढें आम्हांला उघडें उभें करण्यांत आलें. ह्या वेळेस बडेसाहेब (सुपरिंटेंडंट) क्लास ठरवीत असतात, आमची साधी कैद असल्यामुळें आमच्या बाबतीत क्लासाचें विशेष महत्त्व आम्हांला वाटलें नाहीं. कारण साध्या कैद्यांना कांहीं कामच नसते. या वेळेस बड्या साहेबांनीं माझ्या

पुस्तकावर 'पूअर फिजिक्स' हा शेरा मारला होता. आज जामीन न पटला तर आम्ही उद्यां देवी काढवूं असें बागडे यांनीं सांगितल्यामुळें त्या दिवशीं आमचें व्हॅक्सीनेशन झालें नाहीं. प्रत्येक कैद्याकरतां

"प्रिझनर्स हिस्टरी टिकेट"

असें वर लिहिलेलें पण लॉगमनच्या कॉपीबुकासारखें एक बुक असतें. ६ महिन्यांपेक्षां कमी शिक्षा असलेल्या लोकांचें बुक चारच पानांचें असतें पण ६ महिने किंवा जास्त शिक्षावाल्यांचें मोठें असतें; पान उघडतांच पुठ्ठ्याच्या पाठीवर वेटचार्ट व पहिल्या पानावर संपूर्ण नांव, पहिला धंदा, कोणत्या कोर्टाची शिक्षा झाली, कोणत्या कलमानें झाली, हॅबिच्युएल कीं नॉन्हॅबिच्युएल, पहिल्या गुन्ह्यांचा आंकडा, तुरुंगात दाखल झाल्याची तारीख, सुटण्याची तारीख, जेलमध्यें उत्तम रीतीनें वागल्यास जेलमॅन्युएलप्रमाणें मिळणारी माफी धरून सुटण्याची तारीख, क्लास व नंबर हें त्यावर लिहिलेलें असतें. या बुकांत कैद्यास जेलमध्यें झालेल्या शिक्षा नोंदविलेल्या असतात. त्याचें काम लिहिलेलें असतें. त्याची माफीहि त्यांतच नोंदतात, म्हणजे हें हिस्टरी टिकेट एकदां उघडून पाहिलें कीं, कैद्याविषयीं सर्व माहिती मिळूं शकतें. हें त्याचें तेथलें चरित्रच म्हणानात?

ता. २८ ला रा. बागडे व जेधे यांना सेशन कोर्टानें जामिनावर सोडलें. या दिवशीं मला न सोडण्याचें काय कारण असावें याचा खरा अदमास न लागल्यामुळें माझ्या मनावर त्या दिवशीं फार परिणाम झाला. आणि मला एकट्यालाच तुरुंगांत राहावें लागलें. जेधे, बागडे असतांना एक दिवशीं दुपारीं माझ्या सेलची लोखंडाची पट्टी तुटलेली होती ती आम्हीं पाहिली व लागलीच जमादाराला कळविलें. त्या दिवशीं आपल्याला निराळ्या ठिकाणीं ती पट्टी लागलीच बसविली गेली नाहीं तर—जावें लागेल ही कल्पना सुद्धां मला दुःसह वाटली. पण मग लागलीच लोहार (कैदीच) आणून ती पट्टी बसविली गेली आणि मला खोली किंवा बराक बदलावी लागली नाहीं. पण आतां तर

मी एकटाच होतों.

शेजारचे कैदी "मास्टर घबराव मत्" असें म्हणत होते. दुसऱ्या दिवसापासून पुन्हां कांहीं वाटेनासें झालें. तुरुंग ही जागा अशी आहे कीं तेथें मनुष्य कोणत्याही स्थितींत सुखासमाधानानें राहावयास शिकतो. आतां मला तेथें गप्पा गोष्टी करावयाला कोणीच नव्हतें; दुसरे कैदी तेथेंच बंद केलेले असत पण त्यांच्याशी बोलण्याची मला इच्छा होत नसे. माझ्या चाळींत जो मोंगल कैदी होता ती व्यक्ति मात्र कांहीं विशेष होती. आमच्या चाळीपाठीमागच्या बाजूसच दुसरी एक सात खोल्यांची चाळ आहे. जेलमध्येंहि त्यांनी भयंकर गुन्हे केलेले असतात अशा लोकांना ह्या खोल्यांतून बंद करून ठेवीत असतात. आमच्या इकडला मोंगल अति बंडखोर होता. धिप्पाड, मिशा पिकलेल्या, कपाळाची लहान पट्टी आणि त्यांत चकाकणारे बारीक पण दिसण्यांत क्रूर असे डोळे! या मोंगल

कैद्यांचें तोंड सुरूं झालें म्हणजे आटोपतां आटपत नसे. मागच्या बराकींतील कैद्यांचा आणि याचा कांहीं तरी तंटा होता. संध्याकाळीं बंदी होऊन टोटलाची घंटा पडली कीं, यांचें नाटक सुरूं झालेंच. पाठीमागून ते दोघे चौघे आणि इकडून हा एकटा पठ्ठ्या! तरी चौघांच्या एक शिवीला याच्या चार शिव्या असें प्रमाण असें. या शिवीगाळी प्रथम

धूऽऽऽत् तेऽऽरी

असा "धुत्कार" असे. हें एकदां "धूत्" सुरूं झालें कीं आवरत नसे. रात्रपाळीवाले वॉर्डर, मुकादम, अंमलदार सर्व त्यांना दटावीत पण त्या दटावण्याचा फार थोडा उपयोग होत असे. रात्रीचें त्यांचें वीररसप्रधान शिव्यासत्र ऐकलें म्हणजे असें वाटे कीं, सकाळीं हे एकमेकांच्या नरडीचा घोंट घेतील, पण सकाळीं पहावें तों चूपचाप!

आमची चाळ ऑफिसच्या अगदी नजीक असे. दिवसां–बडेसाहेबांच्या–ऑफिसांतून आम्ही लोक काय करतों हें सहज दिसण्यासारखें असे त्यामुळें जराही आरडाओरड झाली की कोणी तरी येत असे. हे कैदी बहुतेक जेल फिरून आलेले होते. त्यांच्या शिवीगाळींत

"तुम विसापूर जेलमें

तमाखू चुराया" "रोटी चुराया" वगैरे गंमती असत. तासांचे घंटे पडूं लागले तरी हे कैदी "बजाव तेरी" "धूत् तेरी" "और बजाव" असें ओरडत. तर्जनी व आंगठा एकावर एक ठेवून तोंडानें हे लोक एक प्रकारचा आवाज काढीत त्याला त्यांच्या भाषेंत "पपेरी" हें नांव आहे. ही एकदां "पपेरी" वाजूं लागली कीं, दुसरा चिडलाच आणि दुसऱ्याला चिडवण्याकरतांच ती वाजवतात. सकाळीं इकडला एखादा कैदी उन्हांत विस्तारा टाकायला गेला कीं, पाठीमागचे हळूंच "पपेरी" वाजवीत कीं, त्यानेंहि एक-दोन शिव्या हासडल्याच. पाठीमागच्या बराकींत सुप्रसिद्ध बाबला केसमधला

अबदुल लतीफ

होता. सकाळ संध्याकाळ तो माझ्या खोलीसमोरून जात असतां दिसत असें. तो बिचारा शेजारच्या कैद्यांना भाईमिया, बडेमिया वगैरे म्हणून गप्प बसविण्याचा कधीं कधीं प्रयत्न करी, पण त्याला कोणी जुमानीत नसे. मी एकटा असल्यामुळें मला मुळींच करमत नसे. मध्येंच ३० सप्टेंबरला खटल्याकरतां मला कोर्टांत यावें लागलें त्या वेळेस "विजयी मराठा" कर्ते श्रीपतराव शिंदे यांची साक्ष होती. पुढें चार आक्टोबर तारीख लागली.

याच सुमारास कोमागाटामारू प्रकरणाच्या वेळीं जन्मठेप शिक्षा झालेले एक शीख वॉर्डर आंत कांहीं मारामारी केल्याच्या गुन्ह्यावरून आमच्या बराकींत आणून बंद केले. त्यांची "वॉर्डरी" काढून घेण्यांत आली व खोलींत बंदीहि पुढें दोन-चार दिवसांत काढण्यांत आली. हा शीख गृहस्थ अत्यंत सभ्य, प्रसन्न आणि उमदा दिसून आला. त्याचें तें धिप्पाड, बांधेसूद, पिळदार शरीर आणि हंसत मुद्रा पाहून मला मोठें नवल

वाटे. सकाळीं प्रथम मला खोलींतून बाहेर सोडीत असत—मी नळावर चाल्लों असतां ज्या खोलींत तो शीख कैदी होता त्यांतून

"वंदे मातरम्"

या शब्दानें त्यानें मला अभिवंदन केलें. या कैद्याचें नांव **हरनामसिंग** होतें. याचा आजूबाजूच्या सर्व कैद्यांवर दरारा होता. सगळे "भाईजी" "सरदारजी" या नांवानें त्याच्याशी नरम होऊन बोलत असत. एरव्हीं बड्या बड्या बाता झोकणारे आमचे शेजारी बहादर या हरनामसिंगापुढें रात्रौचा "धूत्कार" सुद्धां फार जोरानें करीत नसत. चोर-दरवडेखोरांविषयीं हरनामसिंग कसलीहि सहानुभूति दाखवीत नसे. हा कैदी आमच्या बराकींत आल्यामुळें मी थोडा तरी माणसांच्या वसाहतींत आलों असें मला वाटूं लागलें. हे कैदी कसे भयंकर असतात व त्यांच्याशीं कसें वागावें हें मला हरनामसिंगांनीं समजून सांगितलें. रोज सकाळी उठतांच माझ्या कानीं व मुखांतूनहि या शिखांमुळें "वंदेमातरम्" हा शब्द पडत व निघत असे. शीख कैदी अत्यंत शिस्तीनें वागत असल्यामुळें ऑफिसरांच्या त्यांच्या विषयीं वर्तनांत विशेष आदर दिसून येत असें. शिखांना "पंजाबचे रॅशन" मिळतें. त्यांचा स्वयंपाकहि स्वतंत्र होत असतो व तो शीखच करीत असतात. त्यांच्या डोक्यांवर केस असल्यामुळें त्यांना टोपी घालण्यास न देतां "फेटा" देत असतात. केश, किशोरी, कंकण, कंगवा व कुकरी यांपैकीं कुकरी खेरीज तुरुंगांतहि त्यांचे चार "ककार" राखले जातात. त्यांचा "मिशीवाला" आला कीं त्याला मुसलमान कैदीदेखील "सासरी काल" (सत् श्री अकाल) "भाईजी" या शब्दानें सलाम करीत असत! "सत् श्री अकाल" हा त्यांचा अभिवंदनाचा शब्द आहे. पण त्याचा अडाणीपणामुळें "सासरी काल" असा कांहीं उच्चार करतात. जन्मठेपीचे कांहीं कैदी सुमारे बारा-चौदा वर्षें तुरुंगांत काढलेले होते पण त्यांना बाहेरच्या राजकारणाविषयीं अगदीं "अपटुडेट" माहिती असलेली दिसून आली. शिखांची भाषा मला प्रथम मुळींच समजत नसे. पण एखादा शब्द न समजला तर "इसका मतलब क्या है" हें मी विचारून त्यांच्या अतिप्रचारांतले शब्द माहितीचे करून घेतले. आपल्याशीं कोणी शीख अस्सल पंजाबी भाषेंत बोलूं लागला कीं, "जडी नाळे" अशाप्रकारचा एक ध्वनी मधून मधून पण सारखा ऐकूं येत असतो. हा शीख कैदी तुरुंगांतच उर्दू वाचण्यास शिकला होता. आपणहि याकडून उर्दू वाचण्यास शिकावें असा मी विचार केला पण "कायदा" (उर्दू प्रायमर) जवळ नसल्यामुळें मला लवकर शिकतां येईना. हा "कायदा" मागितल्यावर जेलमध्यें मिळतो व पाटीपेन्सिलहि मिळूं शकते पण ही सर्व सामुग्री मिळण्याच्या आंतच आमची सुटका झाली. या वेळेपासून तुरुंगांत

माझें वजन वाढूं लागलें

१५३ (अ) च्या खटल्याकरतां आलों म्हणजे प्रकृति पाहून स्नेही मंडळी खुष होत

असत. थोड्याच दिवसांत माझ्या डाव्या दंडावर चार ठिकाणीं देवी काढण्यांत आल्या. मला इनॉक्युलेशननें सुद्धां फिट येतें असें मी डॉक्टरांना सांगितल्यामुळें इतर कैद्यांप्रमाणें उभें न करतां खुर्चीवर बसवून शक्य ती काळजी घेऊन अगदी हलक्या हातानें देवी टोंचल्या आणि त्यामुळें मला बिलकूल त्रास झाला नाहीं. थोडासा ताप येतो असें म्हणतात पण मला बिलकुल ताप आला नाहीं. देवी काढल्यानंतर प्रकृतीवर कांहीं परिणाम झाला की काय हें पाहाण्याकरितांहि डॉक्टर दोनतीनदां येऊन गेले. शीख कैद्यांना "काथ्या काम" दिलें होतें. ह्यांत काथ्याची दोरी वळावी लागते किंवा दोरीचा काथ्या करावा लागतो. पुन्हा दुसरा एक कैदी आला. त्याला चक्की होती. ह्यांत ३५ पौंड बाजरी किंवा ज्वारी दळावी लागते. मी चक्की अजूनपर्यंत पाहिली नव्हती. कंबरे इतक्या उंचीच्या भक्कम घडवंचीवर चांगलें कुरुंदाचें जातें असतें आणि त्यावर उभ्यानें दळावें लागतें. त्याला "चक्की पिसणें" हें तुरुंगाच्या भाषेंत नांव आहे. एका खोलींत चक्की व एका खोलींत त्याला रात्रीं बंद करीत असत. हा कैदी मुंबईचा मवाली होता. त्याचें मूळचें ठिकाण "सियालकोट जिल्हा" असल्यामुळें त्याला आमच्या शेजारच्या कैद्यांनीं "सियालकोटी" हें नांव दिलें होतें. या "सियालकोटीला" ३५ पौंड चक्की म्हणजे कांहीं वाटत नसें. आपण पुन्हां सुटल्यावर आपण पूर्वीचाच धंदा करणार असें तो सहज म्हणत असें. त्याचें पूर्वीचें कांहीं 'दाखले' (Previous Convictions) होते. तुरुंगामध्यें निदान माझ्या आजूझाजूला असें "दाखलेवाले"च बहुतेक होते. एकाच खटल्यांत ज्यांना शिक्षा झाली असेल त्यांना कैद्यांच्या भाषेंत "नंबरकरी" म्हणतात. प्रत्येक कैदी आपली बढाई मारून आपल्या "नंबरकऱ्यानें" घोंटाळा केला म्हणून सांपडलों असें सांगत असतो. चोरीचा धंदा करणाऱ्या लोकांचे कांहीं ठराविक शब्दहि आहेत. ते शिपायाला

"बोलिया" म्हणतात,

रुपायाला "दमडी" म्हणतात, दोन आण्याला "तुकडा" म्हणतात, कोकेनला "भडक" म्हणतात. चोरीच्या धंद्यातसुद्धां क्लास आहेत. त्यांची आपआपसांत भाषा चालली म्हणजे सहज ऐकत बसावें म्हणजे त्यांचे पराक्रम कसले भयंकर असतात हें समजतें आणि असें वाटू लागतें कीं, मला जर यावेळीं अधिकार असता तर यांना मी जन्मभर तुरुंगांत जखडून ठेवलें असतें. या चोरीच्या धंद्यांपैकी "डांकेबाज" हे आपणाला सर्वांत श्रेष्ठ समजतात. त्यांच्या खालोखाल "गभेबाज" म्हणजे रात्रौ भिंत पाडून दार फोडून किंवा नळाला धरून मजलेच्या मजले चढून चोऱ्या करणारे. यांच्या खालचा नंबर म्हणजे "तोडबाज!" म्हणजे एखाद्या दुकानांत दिवसा-ढवळ्या दोघाचौघांनीं शिरून, एकादोघांनीं माल खरेदी करण्याच्या मिषानें मालकाला गोंधळून दुसऱ्यानें "तोड" करावयाची. याच्याहि खालचा वर्ग म्हणजे

"पडीबाज"

या "पडीबाज" शब्दाचा अर्थ उन्हाळ्यामुळें किंवा जागेच्या गैरसोयीमुळें जे बिचारे

दिवसभर श्रम करून थकूनभागून मुंबईत रस्त्याला फळीवर किंवा उघड्या जागेत झोपतात त्यांची मालमत्ता झोपेंत त्यांनीं नकळत उठवायची. तुरुंगांत ज्यानें हर उपायानें पैसे आणले असतील त्याला ते "दस्तीवाला" म्हणतात. ही "दस्ती" ते जेव्हां पकडले जातात तेव्हांच त्यांच्या जवळ असते.

जे बिलंदर व अट्टल चोर असतात त्यांनीं आपल्या घशामध्यें "खोबडे" पाडलेले असतात. म्हणजे गिनी किंवा सोन्याची आंगठी गिळायची म्हणजे ती घशामध्यें नेमक्या "खोबडा" पाडलेल्या ठिकाणीं जाऊन बसते. त्यामुळें झडतीमध्यें हा माल मुळींच सांपडत नाहीं. त्यांच्या आपसांतल्या बोलण्यावरून हा "खोबडा" पाडण्याचें सत्कार्य डॉक्टर लोकांच्या सहाय्यावांचून होत नसावें असें मला आढळून आलें. जर आमच्या शेजारी "चोर भाई"चें हें म्हणणें खरें असेल तर सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या व डॉक्टरीसारख्या पवित्र धंद्यांत असणाऱ्या माणसांनीं अशा "चोर भाई"ना हा "खोबडा" पाडण्यांत आपल्या ज्ञानाचा उपयोग होऊं द्यावा हें मोठें लज्जास्पद आहे. मी त्यांच्यापैकीं कोणाशीं बोलत नसे. पण त्यांचें आपआपसांत चाललेलें बोलणें माझ्या कानांवरून जात असें. घशामध्यें योग्य जागा कोणती हें तपासून घेऊन एक लहानशी शिशाची गोळी तिला पाठीमागें दोरा बांधून तो दोरा दातांत धरायचा. ज्या जागेवर "खोबडा" पाडायचा असेल त्या जागेपर्यंत ती गोळी पोंचेल इतका नेमका लांब दोरा असायचा. जेवणाच्या वेळेस ती गोळी काढावयाची. अशा रीतीनें शिशाच्या वजनानें आंतलें मांस झिजून तेथे नेमका कांहीं दिवसांनीं खड्डा पडतो व या लोकांना पोलिसांच्या डोळ्यांत चटकन धूळ फेंकता येतें. ही त्यांच्या बोलण्यांतून ऐकूं आलेली हकीकत जर खरी असेल तर हा प्रकार फार भयंकर आहे असें म्हणावें लागतें. कारण प्रत्यक्ष

गर्दन कापल्याशिवाय

त्यांतला मालच सांपडायचा नाहीं. परंतु माझ्या समक्ष कोणत्याहि "चोर भाई"नें "खोबड्यां"तून कांहींहि काढलेलें मला दिसलें नाहीं, त्यामुळें त्या प्रकारावर माझा विश्वास बसला नाहीं. त्यांच्या अनेक बातांपैकीं हीहि एक बात असावी असें मला वाटतें. डॉक्टरसारखा सुशिक्षित गृहस्थ अशा चौर्यकर्मांत आपल्या ज्ञानाचा उपयोगहि करून देणार नाही अशी मला खात्री वाटते. हा "खोबडा" डॉक्टरी ज्ञानाशिवाय पाडतांहि येणार नाहीं. आमचे ते बहादर शेजारी जेव्हां आपल्या पराक्रमाचे पोवाडे गात तेव्हां मला 'नाथमाधवां'च्या राय क्लब अथवा सोनेरी टोळी या कादंबरींतले हिरोज अगदीं भुरटे असल्यासारखें वाटत. श्री. नाथमाधव ह्यांच्यासारख्या खंद्या लेखकांना जर या आमच्या शेजारीं असणाऱ्या करेक्टर्स स्टडी करावयाला मिळाल्या असत्या तर मराठी भाषेस भूषणभूत होऊन राहणारी कादंबरी महाराष्ट्राला लाभली असती. ती कादंबरी नसलेली पुरवली, पण या लोकांचे शेजारी राहण्याचें दुर्दैव कोणावरहि ओढवूं नये असा माझा अनुभव आहे.

तुरुंगांतले हेहि चोर जिवंत आणि जातिवंत असतात. त्यांच्या मारामाऱ्या, त्यांचे गुन्हे, त्यांच्या बुकावर नोंदलेलें असतात. त्यांच्या मुखांतून निघणारीं मुक्ताफळें तापलेल्या सळईसारखीं कानांत घुसत असतात; मनुष्यप्राण्यांत आणि जनावरांत किती अंतर आहे हें मोजण्याकरतां जर ह्या असल्या कॅरेक्टर्स हिशोबी धरल्या तर जनावरें वरचा नंबर पटकावतील. कारण जनावरांकडूनहि जो गुन्हा होणार नाहीं असले अर्वाच्य गुन्हे जेलमध्यें या लोकांकडून कधीं कधीं घडतात आणि त्याबद्दल त्यांना तेथें शिक्षाहि मिळत असते. आपण रंगभूमीवर व्हिलन पाहात असतों. पण बिचारा नाटककार सुशिक्षित समूहात वाढलेला असतो. नाटककार हा प्राणीच गोगलगाईसारखा निरुपद्रवी असण्याचा बहुतेक संभव असतो, त्यामुळें या खऱ्या जगद्रंगभूमीवर धुमाकूळ घालणारे खरे व्हिलन्स त्याच्या दृष्टीच्या टापूत येत नाहींत. माझ्या शेजारी येरवडा जेलमधल्या गाळीव आणि अस्सल कॅरेक्टर्स होत्या; मुंबईचे हे "चोर भाई" आपसांत एकमेकाला "मजूर" म्हणत असतात. त्यांच्या जेव्हां जेव्हां मुंबईच्या गप्पा चालावयाच्या तेव्हां दोन टाकीजवळील

नार्थब्रुक गार्डन जागेवर

बसल्याच्या गप्पा असत. मी शीख कैद्याशिवाय कोणाशींहि बोलत नसल्यामुळें मला ते बरेच वचकत. माझे दोन खटले मिळून मला

१०८ दिवस

काढावे लागले. या एकशें आठ दिवसांच्या अनुभवावरून असें वाटूं लागलें की, राजकीय केसीस बगळल्या तर ज्यांच्या करतां जेल बांधला आहे त्या लोकांचा विचार केला म्हणजे असें वाटतें तुरुंगांत अजून जास्त कडकपणा आला पाहिजे.

"चोऱ्या करणें" हें व्यसन आहे. हें व्यसन एकदां लागलें कीं, जात नाहीं. तो पुढें हॅबिच्युअल बनतो याचें कारण त्याला तुरुंगांत त्याचें तें व्यसन सुटण्याइतका त्रास होत नाहीं. जेलर व सुपरिंटेंडण्ट शक्य तोंपर्यंत सहानुभूतीनें व प्रेमळपणानें वागतात. ह्या कैद्यांना सुधारण्याचा शक्य तो प्रयत्न करतात. त्यांच्या तब्येतींत थोडासा बिघाड झाल्यास त्याच्या औषधपाण्याची चोख व्यवस्था होते. कैद्याला दोन वेळां पोट भरेल एवढें जेवण मिळतें. इंग्लिश लोकांमध्यें टापटीप हा जो एक अमोलिक गुण आहे तो जेलमध्यें पूर्णत्वास पोंचलेला आढळतो. सर्व काम अगदीं यंत्राप्रमाणें चाललेलें असतें. जगण्याकरतां जेवढ्या वस्तु आवश्यक आहेत तेवढ्या मिळतात. तुरुंगांत जगण्याकरतां खावें लागतें आणि बाहेर खाण्याकरतां जगावें लागतें. एवढा फरक असल्यामुळें तुरुंगांत पोंचतांच आपण मोठे आहोंत, अर्थात आपली मोठी टापटीप राहिलीच पाहिजे असें कांहीं लोकांना वाटत असतें. मग ते तुरुंगांत निरनिराळ्या जिनसा मागूं लागतात आणि अर्थात् नियमाविरुद्ध त्या वस्तु मिळाल्या नाहींत म्हणजे तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या नांवानें ते ओरड करतात. ज्याला खाण्याकरतांच त्रास होतो त्यानें जेलचे ऐवजी बेलाशक "ताजमहाल हॉटेल" मध्यें जावें.

ज्वारी व बाजरी हें जेलमध्यें मुख्य अन्न आहे; भाजी कधीं कधीं वाईटहि होते. शंभर माणसांचें प्रयोजन असून पैसे देऊन आणलेल्या आचाऱ्याच्या हातूनसुद्धां जर स्वयंपाक बिघडलेला असतो तर केवांनींच केलेला आणि तोहि जवळजवळ दीड हजार माणसांचा स्वयंपाक थोडासा एखादेवेळीं बिघडायचाच. तुरुंगांतली जबर शिक्षा म्हणजे "चक्की". पण तेच "चक्की"वाले असले भयंकर असतात कीं, "चक्की"शिवाय आणखी एखादी भयंकर शिक्षा शोधून काढल्याशिवाय ह्या "चोर भाई"चा क्लास वठणीवर येणार नाहीं. बाहेर अत्यंत काबाडकष्ट करूनहि पोटभर अन्न न मिळणारे कोट्यवधि लोक आहेत. तुरुंगांत शक्तीबाहेर कधींच कष्ट देत नाहींत. तुरुंगांत जर कांहीं कशाची उणीव भासत असेल तर ती व्यक्ति-स्वातंत्र्याची. आपलें स्वातंत्र्य कायद्यानें जप्त झाल्यामुळें मनुष्य अगदीं गोरामोरा होत असतो. पण हा त्रास आहे, असें म्हणायला मी तयार नाहीं. कारण यामुळें स्वातंत्र्य ही काय चीज आहे याची पक्की जाणीव माणसाला होते. ह्यामुळें तुरुंग हें स्वातंत्र्याचे धडे देणारे परिणामकारक व फलदायी विद्यालय आहे असें माझें मत आहे.

जेलसारखें विद्यालय प्राप्त झालें असतां अशा विद्यालयांतून परत येऊनहि जे लोक धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय स्वातंत्र्याच्या आड येतात त्यांचा डिप्लोमा वायागेला असें म्हटलें पाहिजे. देशाचे दुष्मन केसमध्यें अपिलांत सुटल्यामुळें साध्या कैदेचा मला ३३ दिवस अनुभव मिळाला, पण १५३(अ) या खटल्याचा निकाल नोव्हेंबर १२ ला लागून पुन्हां तीन आठवड्यांतच

६ महिने सक्त मजुरी व ५०० रुपये दंड

ही दुसरी शिक्षा घेऊन मला येरवड्यासच यावें लागलें. या वेळेस सक्त मजुरी असल्यामुळें माझ्या प्रेमळ व सुहृद स्नेह्यांना चिंता पडली होती. तुरुंगाविषयीं बाहेर निरनिराळ्या अफवा पसरलेल्या असतात. जेलरिटर्न्ड 'लोक' त्या अफवा नाहींशा करण्याऐवजीं प्रसंगीं त्यांत भरच घालीत असतात. एका अत्यंत प्रेमळ वृद्धानें तर "जबळकर, तुम्ही जेलमधल्या जाचांतून परत याल की नाहीं" असे उद्गार काढले होते. १२ तारखेला मि. स्लेडन यांचेपुढें हजर राहण्याकरतां जेव्हां मी निघालों तेव्हां गुरुवर्य वि. रा. शिंदे हे कडकडून मला भेटले. अशा वेळीं मात्र मनुष्य गंभीर होतो आणि पुढें येऊन भिडलेल्या निकालाविषयीं मनुष्याला एकच क्षण पण निरनिराळे विचार सुचूं लागतात. या वेळीं खटला आणि त्याचा निकाल हें मला सहज वाटूं लागलें होतें. परंतु या वेळेला आणि या कलमाला सक्त मजुरी असल्यामुळें माझ्या अशक्त प्रकृतीमुळें सर्वांना चिंता वाटत होती. "सती जायला निघायचें आणि मग शाहूला जायचें" या शब्दांनी मी समजूत घालीत असें. यावेळीं मी घरचीं पुस्तकें घेऊन जय्यत तयारीनें निघालों होतों. या वेळेस मला फिकीर बिलकूल वाटत नव्हती. याचें अजूनहि मला आश्चर्य वाटतें. आदल्या रात्रौ उद्यां जरी खटल्याचा निकाल आहे तरी गाढ झोंप लागली होती.

माझ्यावर कसलाच परिणाम झाला नव्हता. १२ वाजल्यानंतर आम्हांला शिक्षा फर्मावण्यांत आली. लागलीच आम्हांला तिथेंच असलेल्या "चौकींत" बंदोबस्तांत नेऊन ठेवलें. हा दिवसच कांहीं विशेष होता. जेव्हां मोटार येईपर्यंत कोर्टांतल्याच गेटांत आम्ही गेलों तेव्हां माझ्या पाठीमागें कांहीं लोक मजविषयींच बोलत येत होते. माझ्याजवळ चार पुस्तकें मी घेतलींच होतीं. या दिवशीं चार वाजतां कैदी पोंचविणारे अधिकारी मिस्टर जोन्स यांनीं आपल्या खासगी टू सीटर मोटारमध्यें मला येरवड्यास पोंचविलें. म. गांधींनाहि माझ्या या खासगी मोटारींतून नेलें होतें, असें मि. जोन्स त्या वेळेस म्हणाले. आम्ही अगदीं फिरावयास चालल्याप्रमाणें मोटार उडवीत येरवडा गांठला; जेलच्या महाद्वारापुढें आम्ही गेल्यावर मी फिरून आलों असेन अशी कोणाला कल्पनाहि होणें शक्य नव्हतें. या वेळेस कोणतीच गोष्ट मला नवी नव्हती आणि ६ महिने शिक्षा मला बिलकुल मामुली वाटत होती; मी आंत शिरतांच पहिली ओळख झाल्यामुळें जो तो मजकडे पाहात होता. जेलरसाहेबांच्या पुढें गेल्यावर "जवळकर, तुम्ही पुन्हां आलांत. अपील करणार ना? जामीन वगैरेची व्यवस्था करणार ना?" अशी सहानुभूतिपूर्वक चौकशी केली. या वेळेस सक्तमजुरी असल्यामुळें कपडे बदलायचे होते. तरी त्यांतल्या त्यांत चांगले असलेले कपडे मला आणून दिले. तो स्वातंत्र्य-विद्यालयाचा युनिफार्म आम्ही चढवला; ते कपडे घातल्यावर मला जरा मोकळें मोकळें वाटल्यासारखें झालें आणि आमच्या पहिल्याच बराकींत आम्हाला नेण्यांत आलें. आमच्या बराकींतील कैदी "अरेरे, मास्टरभाई फेर लौट आये" असें ओरडूं लागले, हरनामसिंगांनी आमचें हंसत स्वागत केलें. आजूबाजूचे कैदी व वार्डर "असें कसें झालें" म्हणून म्हणूं लागलें. पुन्हा आमच्या पूर्वस्थळीं आम्हांला ठेवलें. मला कैद्याच्या पोशाखांत पाहून सर्वांनाच नवल वाटलें; कारण पूर्वी माझा घरचा पोशाख होता; आमचा पुन्हां तो थालीपाट, कंजी, भत्ता या अभिनव सृष्टींत आम्ही उतरलों. या वेळेस मला जेलचे नियम माहीत असल्यामुळें मी "भत्ता" मागितला; लागलीच वॉर्डरनें धावाधाव करून भत्ता आणून दिला. यथासांग भत्ता खाल्ल्यावर आमची स्वारी आमच्या सेलमध्यें बंद झाली. पुन्हां ती 'आलबिल' पुन्हां ते तासाला ठणठणणारे घंटे आणि पुन्हां तें "धुत्तेरेऽऽ" आम्हांला ऐकूं येऊं लागलें. या वेळेस व्हॅक्सीनेशन् वगैरे आमचे पूर्वीच झाल्यामुळें नुसतें क्लासिफिकेशन व्हावयाचें होतें. पहिल्या ३३ दिवसांत ८७ पौंडांचें ९२ पौंड वजन झालें होतें. शुक्रवारीं संध्याकाळीं आम्ही आमच्या महाविद्यालयांत मुक्कामाला गेलों होतों. हरमानसिंगांनी तर आमच्या बराकीला 'सिमला' हें नांव दिलें होतें. हवा मोकळी, जागा स्वच्छ, सर्व कांहीं ठीक होतें. शुक्रवारीं गेल्यामुळें पुढल्या गुरुवारपर्यंत म्हणजे

'फालीम' पर्यंत

आम्हाला काम मुळींच नव्हतें. सक्तमजुरीच्या कैद्याला पोंचल्या दिवसापासून थोडें बहुत

काम करावें लागतें. पण आमच्या पहिल्या आठवड्यांत आम्हांला कोणी कामहि देईना किंवा सांगेना. आमचे पहिले न्यायाधीश मि. फ्लेमिंग जेल व्हिजिटला आले होते. मला पाहिल्याबरोबर ते मजकडे आले आणि केव्हां आलांत, काम काय दिलें वगैरे चौकशी करून प्रेमळपणानें दोन शब्द बोलून गेले; याचा परिणाम असा होत असे कीं, शेजारचे कैदी त्यामुळें मला वचकत असत. या दिवशीं 'फालीम' असल्यामुळें बडेसाहेब येऊन गेले व आम्हाला काथ्या काम दिलें. एक अर्धा पौंड काथ्या माझ्या सेलच्या पुढें येऊन पडूं लागला. दोरी वळण्याचा मजबर जन्मांत प्रसंगहि आला नाहीं. मला वळताहि येत नसे. भाईजी (शीखकैदी) कडून मी दोरी वळण्यास शिकलों. कैद्यांचें बुक तयार होईपर्यंत कांहीं तरी काम नांवाला देत असतात. एकदां 'बुक' तयार झालें, त्याचा क्लास ठरला, म्हणजे जेलरसाहेब खरें काम देत असतात. सक्त मजुरींतला क्लास टोपीवरून ओळखतात. पहिल्या क्लासच्या कैद्यांना पांढरी टोपी घालावी लागते, दुसऱ्या क्लासचे काळे टोपीवाले, तिसरे पिवळे टोपीवाले आणि म्हातारेकोतारे अगदीं शेवटचे. त्यांना अर्धी पिवळी व अर्धी काळी टोपी मिळते. आम्हांला काळी टोपी मिळाली. 'बुकां' त

G. M.

आणि पूअर फिजीकस् हा शेरा होता. पहिल्या क्लासाला G. H. हा शेरा असतो. बंडीला डाव्या बाजूला एक गुंडी असते. त्या गुंडीला एक जस्ती 'बिल्ला' (Body Ticket) लावावें लागतें. त्यावर एका बाजूला प्रिझनर नंबर असतो. या वेळेस माझा कैदी नंबर १४९८ होता. मध्यें नांव, त्याखालीं १५३ (१) इं. पि. को. आणि आल्याची तारीख व सुटण्याची तारीख असते. आम्हाला डबल युनिफॉर्म व एक उत्तम अशी गरम बंडी मिळाली होती. पुढें आमच्या घरच्या कपड्यांचें गाठोडें बांधून त्याला शिऊन टाकलें! आमचें नवें बुक, नवा बिल्ला, नवा ड्रेस वगैरेसह आम्हांला सुमारें गेल्यापासून १५ दिवसांनीं "काथ्याकाम" मिळालें. या वेळेस 'रसी' करायला मी शिकलों होतों आणि जेवढें माझ्यापुढें आणून टाकीत तेवढें तेव्हांच उरकून मोकळा होत असें. या वेळीं आल्यापासून मी सारखा फिरत असें. वॉर्डरहि फिरूं नका असें सांगण्यास दचकत. बरें, कोठून कोठपर्यंत व कोणत्या टाईमाला फिरावयाचें हेंहि मला माहीत नव्हतें. कैद्यांपैकी वॉर्डरच्या खालचा वॉचमन असतो. या 'वाचमिन' (Watch) कडे फाटक असतें. तो सकाळपासून सायंकाळपर्यंत फाटकांत पहारा करीत असतो. असा सात-आठ दिवस मी खूप आमच्या कंपाऊण्डमध्यें फिरायचा. ऑफिसमधून आम्ही काय करतों हें सर्व दिसावयाचें. एकदां बडे साहेबांनीं "फार फिरूं नका" असें सांगितलें. तेव्हांपासून सकाळी ९ ते १० व सायंकाळी ४ ते ५ या दोनच तासांत फिरत असे. मधल्या वेळीं माझी 'सेल' मी मुळींच सोडीत नसे कांहीं वाचावयास नसल्यामुळें दिवस फार कंटाळवाणा जाऊं लागला. जें काम म्हणून दिलें होतें त्याला पुरा एक तासहि लागत नसें. तेव्हां आंतल्या लायब्ररींतून एखादें पुस्तक मागवून तें वाचायचें! आपल्याला पाहिजे तें पुस्तक वाचावयाला न मिळतां मिळेल तें

वाचावें लागतें. जें पाहिजे तें पुस्तक कोणी कैद्यानें वाचण्यास नेलेलें असावयाचें. या वेळेस आमच्या शेजारीं एकदोन कैदी आलेले होते. पहिला जो मुंबईचा "चक्की"वाला मवाली होता तो सुटला होता, पण दुसरा एक मवाल्यांचा मुगुटमणी माझ्या बराकीत बंदीला होता. या नवीन कैद्यामुळें जितका त्रास होत असे तितकीच करमणूकहि होत असे. प्रथम एक वर्ष होऊन पुढें तुरुंगांतून पळून जाणें वगैरे अनेक गुन्ह्यांमुळें त्यांची शिक्षा तेराचौदा वर्षेपर्यंत वाढली असें तो म्हणत असें. हा मूळचा हिंदू असून नंतर मुसलमान झालेला होता, पण त्याची वागणूक

न हिंदुर्न यवनः

अशाच तऱ्हेची असे. तुरुंगामध्यें मुसलमानांना लांब चड्डी व मोठा दुवाल देण्यांत येत असतो. येवढ्या खुणेवरून हा हिंदु कीं मुसलमान तें ओळखतां येतें. नमाज पढण्याकरतां म्हणून हें महावस्त्र देण्यांत येतें असें ऐकण्यांत आलें. या कैद्याला गाण्याचा अत्यंत शोक असे आणि तो उत्तम गातहि असे. "थाली"वर तबला वाजवीत किंवा नुसताच "भमपक" असा तोंडानें तो असा सुंदर तबला वाजवीत असें की, मला तर पोट धरधरून हसूं येत असें.

माझ्या शेजारीं जो मोंगल कैदी होता त्यानें चुगली केली असें मागल्या कांहीं कैद्यांना वाटलें; त्या दिवशीं रात्रौ-दिवसा "धुत् तेरे चुगलखोरकी" असा मारुतीच्या सैन्यासारखा सारखा भुःभुःकार चालविला होता. अखेर मोंगल कैद्याला आमच्या वॉर्डमधून काढून "सप्रेट (Separate) मध्यें नेलें. पुढें कांहीं दिवसांनीं तिकडूनहि त्याला आमच्या वॉर्डमध्यें आणण्यांत आलें. पुन्हां मागच्या "भाई"नीं "धूत्" सुरूं केलें. हा मोंगल कैदीहि बडा वस्ताद होता. जेव्हां मागले कैदी शिवीगाळी थांबविनात तेव्हां त्यानें "फांस" लावून घेण्याचा फार्स केला. लंगोटी व दुवाल, एके ठिकाणीं बांधून तो गळ्याला लावला. लागलीच माझ्या शेजारचे कैदी वॉर्डरला हांका मारूं लागले. वॉर्डर धांवत आला. रात्रपाळीवाल्या वॉर्डरवर एक मुकादम (कैदीच) असतो तोहि धांवत आला. जमादार आला, त्याला फांस सोड म्हणून सांगू लागले पण त्याला नाटकच करावयाचें असल्यामुळें तो कशाला फांस सोडतो. त्याला खात्रीहि होती कीं, आपला प्राण जात नाहीं. झालें. लागलीच जमादाराला तत्क्षणींच जेलरसाहेबांना रिपोर्ट करावा लागला. रात्रौ ९ च्या पुढें याची सेल खोलून त्याचे सर्व कपडे बाहेर काढण्यांत आले आणि दिगंबर स्थितींत त्याला पुन्हां बंद केलें. पुन्हां नंतर कांहीं वेळानें त्याला कपडे मिळाले पण सकाळींच त्याला आमच्या वॉर्डमधून काढून लावला.

पुढें एक दोन दिवसांनीं जेलमध्यें सुप्रसिद्ध असलेला एक पठाण कैदी आला. तो इंग्रजी उत्तम बोलत असे. इंग्लंडवरून त्याला डीपोर्ट केलें असें तो म्हणत असे. इंग्लीश लोकांच्या राहणीविषयीं व देशाविषयीं मात्र त्याला खूप माहिती असलेली दिसली. पहिल्या गवई कैद्याला हा जोडीदार मिळाला तेव्हां आमचा मोहला नुसता दणाणत

असे; हा पठाण कैदी आपल्या कोंबळ्या (?) आवाजांत एकदां गाऊं लागला कीं, त्याच्या गाण्याकरतां हरणें जमा होण्याऐवजीं वाघसुद्धां घाबरून पळतील असा त्याचा आवाज होता. अंडर ट्रायलसची बराक आमच्या उजव्या हाताला असल्यामुळें रोज येणारे अंडर ट्रायलस् आमच्या समोरूनच जात. त्या अंडरट्रायल्सविषयीं यांच्या ज्या आपसांत चेष्टा चालावयाच्या त्या ऐकवत नसत. त्यांत आणखी एका कैद्याची भर पडली. हा नवीन कैदी सिंधी होता. हा सिंधी कैदी जेलखान्यांतला गुंड म्हणून त्याची प्रख्याती होती. भयंकर कैद्यांना वॉर्डरसुद्धां वचकतात. या वेळेस रात्रौ बारावारा वाजेपर्यंत मला झोंप येत नसे. त्यांचीं तीं गाणीं, ते तबले, शेवटीं "किस्सा" (गोष्टी) सारख्या चालावयाच्याच. "एक बादशहा होता आणि एक वजीर होता." हे प्रत्येक गोष्टींत असावयाचेंच. कधीं कधीं

"इन्शहाल्ला कब छुडावे"

म्हणून अगदीं काकुळतीहि आलेले दिसत. "अल्ला मालिक है ऐसा बी एक दिन आयेंगा की हम बोलेंगे भाई! मैं तो कल छुटनेवाला है" हा पश्चात्ताप किंवा ही तळमळ त्यांना मनापासून होत असलेली दिसे. "क्या करे मास्टर भाई! जब जेलमें बाहेरका ख्याल आता है तब इनसान की तबियत परेशान् होती है" असें त्याच्या तोंडून करुण स्वरानें शब्द निघत. पण हा पश्चात्ताप त्यांना अगदीं थोडा वेळ होत असे. लागलीच त्यांना सर आली कीं पुन्हां त्यांची "बोम्बशोर" सुरुवात व्हावयाची. 'अंधारीं'-तून 'सर्कल'मध्यें जाण्याविषयीं विनंती करण्याकरतां ते मोठी तयारी करीत असत. कोणी म्हणें आतां जेलरसाहेब आले कीं, त्यांना धमकी देऊन 'सर्कल'मध्यें पाठविण्यास भाग पाडीन, पण यांची सारी बडबड पाठीमागें. प्रत्यक्ष जेलरसाहेब समोर येऊन उभे राहिले कीं, हे एकदम नरम पडत; याचें कारण हे लोक भेकड होते हें नसून जेरल-साहेबांच्या वागण्यांतच अशी कांहीं पद्धत असें कीं, हे सारे नरव्याघ्र गांधीसारखे होत. जेलरसाहेब गेल्यावर मग म्हणत जेलरसाहेबांशीं जोरांत बोलावें असें वाटतच नाहीं. अंडर ट्रायल्स् शिक्षा भोगून आले म्हणजे हे आपल्या शिक्षेचा हिशेब करून हा सुटेल तेव्हां "हमारी इतनी सजा बाकी होयेगी" असें म्हणत. एखादा नवा कैदी त्यांचा दोस्त असला कीं "घबरो मत", "खुष रहो", "आबाद रहो", "मस्त रहो" "ये सजा नहीं है मजा है" असें म्हणत. एक दिवस डाळ लवकर न शिजल्यामुळें बरोबर ९ वाजतां 'भत्ता' आला नाहीं दहा वाजले, अकरा वाजले, बारा वाजले या वेळेस "दोनप्रहर" याची खरी कल्पना मला झाली. मग बारा वाजतां

चटणी-कांदा-भाकर

आगहांला मिळाली. यावेळीं चटणीभाकर अमृतापेक्षांहि गोड लागली. त्या दिवसापासून न शिजणारी डाळ एकदम रद्द करण्यांत येऊन "भत्त्या"चा इतका उत्तम बंदोबस्त झाला कीं, साधारण मध्यम वर्गाच्या लोकांच्या घरांतील अन्नाप्रमाणें "भत्ता" येऊं

लागला. नाताळापासून "काथ्या"सुद्धां बरोबर वजन करून तीन पौंड येऊं लागला. त्याला भिजवून सोडवायचा व कामठीनें सडकला कीं, त्याचा अगदीं मोकळा काथ्या होत असतो. सकाळीं थंडी फार पडत असे. त्यांत भिजवलेला काथ्या खोलावा लागल्यामुळें माझ्या हातांपायांचे 'सांधे' दुखूं लागले. पुढें जेवढें काम पडलें असेल तेवढें सगळें करावयाचें असें मी ठरविलें होतें व त्याप्रमाणें करीत असे. नाताळापूर्वी कामाची 'वर्दी' नव्हती. पण आतां काम मोजून घेत असत. चार-सहा दिवस असें भर काम केलें नाहीं तोंच आमचे सांधे दुखूं लागले. रात्रौ ९ वाजतां वॉर्डरला सांगतांच डॉक्टर एकदम आले, ताप आहे कीं काय हेंहि पाहण्यांत आलें. त्या वेळेस बड्यासाहेबांची "रौंड" होती. बडेसाहेबहि आले आणि प्रकृतीविषयीं विचारपूस करून गेले. सकाळीं आम्हांला लागलीच "इस्पितळांत" नेण्यांत आलें. हॉस्पिटलमध्यें डीटेन करून आजाऱ्यांच्या बराखींत मला ठेवण्यांत आलें. या वेळेस मी घरच्या पुस्तकांची परवानगी मिळवल्यामुळें मजजवळ माझीं घरचीं दोन पुस्तकें होतीं. हीं पुस्तकें कोणाला द्यावयाचीं नाहीं असें जेलरसाहेबांनीं मला बजाविलें होतें. पण ह्या बराकी म्हणजे पंढरपूर स्टेशनच्या थर्ड क्लासच्या वेटिंगरूमसारख्या असतात. वेटिंगरूम पक्का नसतो आणि या खूप भक्कम फरसबंदी असतात. माझ्याजवळ सम्युएलचें 'Self Help' हें पुस्तक होतें. त्यांतलीं चित्रें (फोटो) पाहण्याकरतां जो तो मागूं लागला तेव्हां त्यांना "मला पुस्तक दुसऱ्याला देण्याचा हुकूम नाहीं" असें मोठ्या जुलमानें सांगावें लागत असें. तेथें आजाऱ्याची शुश्रूषा करण्याला कांहीं कैदी असतात त्यांना

बडदासी म्हणतात.

हे "बडदासी" जर एखाद्या कोवळ्या मनाच्या रोग्यानें पाहिलें तर तो जास्त आजारी पडावयाचा, इतके विद्रूप दिसतात. पण जेलमध्यें कसलेंहि कोवळें मन दगड फोडण्यासारखें टणक बनत असतें. स्वतंत्र खोली नसल्यामुळें त्या जन्नेंत मला बिलकुल बरें वाटेना. सुमारें तीस चाळीस कैदी—त्यांपैकीं कांहीं आजारी खाटेवर पडलेले—होते. "इस्पिटालमें" आजारी होऊन येण्याची या कैद्यांना मोठी हौस असते, कारण काम करावें लागत नाहीं. दूध-भात वगैरे चांगलें अन्न मिळतें. आजारी पडण्याकरतां हे लोक निरनिराळीं सोंगें करतात. जेलमधल्या दोस्ताची गांठ ध्यावयाची असल्यास त्यालाहि आजारी पडावयाला सांगतात व आपणहि आजारी पडतात. आजार उत्पन्न करण्याच्या युक्त्यांपै एक युक्ति तेथें मला ऐकावयाला मिळाली. गुंज पेरा करून तिची पावडर करावयाची. ती दोऱ्याला घासून सुईनें चामडींत टोंचून न्यावयाची. त्यामुळें तो भाग एकदम सुजतो आणि आजारी पडून "दूध" "चावल" वगैरे मजा मारावयास मिळते. त्या बराकींत रात्र मी मोठ्या कष्टानें काढली. मला त्या "चोर-भाई"च्या बढाया ऐकवेनात. सकाळीं उठल्याबरोबर मी डॉक्टरांना विनंती केली कीं, मला माझ्या स्वतंत्र 'सेल'-मध्यें पाठवाल तर मला बरें वाटण्याचा संभव आहे.

लागलींच आमचें बिऱ्हाड पूर्वस्थळीं आलें. इस्पितळाकडे चोवीस तास मला खरी शिक्षा वाटली. माझ्याशीं सर्व अदबीनें वागत पण त्यांच्यांत मिसळून गप्पा मारीत बसावें असें मला वाटेना. माझ्या स्वतंत्र "सेल"मध्यें आणल्यावर तेथें बाटलीनें मला औषध पोंचविण्यांत येत होतें. माझे सांधेहि राहिले. या वेळीं इस्पितळांत वजन केलें तेव्हां ९८ पौंड वजन भरलें होतें. राजकीय कैदी हंगर स्ट्राइक करतात म्हणून

एका मवाली कैद्यानेंहि

माझ्या बॉर्डमध्यें असतां हंगर स्ट्राईक केला होता. याची शिक्षाहि बरीच म्हणजे सात वर्षांची होती. यानें कोणत्याहि मोठ्या तत्त्वाकरतां अन्नत्याग केला नसून गव्हाची रोटी हवी म्हणून अन्नत्याग केला होता. ज्वारी-बाजरी खाऊन याचें पूर्वी वजनहि वाढलें होतें व शिवाय हे बहादर हॅबिच्युएल होते. टोटलची घंटा पडून दिवस मावळल्यावर कोणी तरी त्याला सहज विचारी, "भाईमिया, किनारी (रोटी) भेजू ?" पण तो मी मध्यें असल्यामुळें घेत नसें व त्यास विचारणाराहि बोलण्यापलिकडे कांहीं करीत नसे. एक दोन दिवसांतच तो "भत्ता" खाऊं लागला. जितकें दिवस उपवास काढण्याची मर्यादा आहे

तितके दिवससुद्धां

त्याच्यानें दम निघाला नाहीं.

आमची स्वारी त्या "सिमल्या"ला असतां आणखी एक मोठा विलक्षण प्रकार घडला. माझ्या शेजारच्या दोन सेलमधले दोन मुसलमान कैदी धर्माविषयीं कांहीं बोलत होते. बाहेर पहाऱ्यावर हिंदु बॉर्डर होता. आठ ठोके पडल्यावर बॉर्डरनें "बात मत करो" असा हुकूम फर्मावला. तरी त्यांची "बात" चाललीच होती. तिकडून बॉर्डरहि जोरांत आला. झालें! आमच्या शेजारच्या कैद्याच्या तोंडांतून छरा उडतांच जशी झाडावरचीं पाखरें उडतात तशा शिव्या उसळल्या. "पागलका बच्चा", "कुत्तेका बच्चा" येथपर्यंत जोंवर शिव्या होत्या, तोंपर्यंत ठीक होतें. पण जेव्हां "काफिरका बच्चा" ही शिवी ह्या हिंदु बॉर्डरनें ऐकली तेव्हां त्यानें झारी भरून पाणी आणून त्या कैद्याच्या सेलमध्यें "धबधब्यानें" टाकण्यास सुरुवात केली. याचा आंतून शिव्यांचा प्रवाह, त्याचा बाहेरून पाण्याचा धबधबा, अशी घनचक्कर उडून राहिली होती. त्यांच्या कसल्याहि भानगडींत आपण पडूं नये हें मला "भाइजी"नें समजावून सांगितलेलें असल्यामुळें माझ्या 'सेल'शेजारीं चाललेला धांगडधिंगा निमुटपणें पाहण्याखेरीज मला गत्यंतर नव्हतें. तितक्यांत आंतला एक मुसलमान कैदी म्हणाला 'याद राख

हमारे कुरान शरीफके उप्पर

पानी आता है' बाहेरचा हिंदुहि कांहीं कमी नव्हता. त्यानें कुराणाविषयीं कांहीं अपशब्द वापरले! झालें, या वेळीं सगळे मुसलमान बिघडले. या वेळेस मात्र आपण आतां मध्यें पडलें पाहिजे असें मला वाटूं लागलें. तिकडून "भाईजी"हि तंटा मिटविण्याचा प्रयत्न

करीत होता. हिंदु वॉर्डरला मी पाणी थांबविण्यास सांगितलें. तुम्ही ह्याचा साहेबाला रिपोर्ट करा असें मी सांगत होतों. यांच्या कसल्याहि भानगडींत मी साक्ष देण्यास तयार नसल्यामुळें ते म्हणत " हमारे मजब्रू (धर्माला) इसने गाली दिया है, तुम सावकु बोलेंगे तो हम चूपे बैठेंगे. " ह्यांवर मी त्यांना बजावलें कीं, मी होऊन साहेबांना कांहीं एक सांगणार नाहीं, तुम्ही वाटेल तें सांगा. आणि साहेबांनीं जर मला विचारलें तर मी सारें खरें सांगेन. या आमच्या अटीवर शेजारचे सर्व मुसलमान गप्प बसले. पुढें त्यांनीं साहेबांकडे रपोट केला. आम्हांला ऑफिसमध्यें बोलावण्यांत आलें. हिंदु वॉर्डर " मी कांहींच बोललों नाहीं " असें म्हणत होता. बडे साहेबांनीं त्या वॉर्डरला काय शिक्षा दिली हें मला कळणें शक्य नव्हतें; पण त्या वेळच्या एकंदर प्रकारावरून त्याचें कांहीं माफीचे दिवस तरी काटले गेले असतील असें मला वाटतें. मी बड्या साहेबांपुढें असा " खटल्या "करतां आल्यामुळें पोलीस, वॉर्डर, कारकून वगैरे माझ्या हातूनच कांहीं गुन्हा घडला कीं काय अशा समजुतीनें आश्चर्यानें पाहात होते. जेलमध्यें कोणाच्याहि भानगडींत पडावयाचे नाहीं; कसलीहि साक्ष द्यावयाची नाहीं हें जरी मी ठरवून ठेवलें होतें तरी अशा थोड्याशा चमत्कारिक प्रसंगीं माझा तो निश्चय मला मोडावा लागला. आंतल्या गुन्ह्याबद्दल जे जे असे खटले होतात त्यांत जेलर किंवा सुपरिंटेंडेंट अत्यंत सावधपणानें न्याय करतात. कांहीं दिवसांनीं " भाईजी " " वाचमन् " बनून दुसऱ्या बराकींत लागले. आमच्या बहादर शेजाऱ्यांच्या दिवसभर मौजा चालावयाच्याच. कोणी " गोरा वॉर्डर " गेला कीं " साब बिस्कुट देव " असें हे म्हणायचेच. त्या बिचाऱ्याला हिन्दी समजत नसल्यामुळें तोहि हंसत जात असे. कोणी मुक्तिफौजवाला आला कीं, " साब हमकू

ईसा मसीहमें लेते ? "

(ख्रिस्ती धर्मांत घेतां ?) असें ते विचारीत. हा त्यांचा निव्वळ मजेखातर खेळ चालत असे. एखादा गरीबसा वॉर्डर चालला कीं, एकानें म्हणावें, ' अरे यही है ' दुसऱ्यानें म्हणावें ' अरे नहीं यही तो रोटी खानेवाला है ' तिसऱ्यानें म्हणावें ' भाई जाने देव ! उसकू मत बोलो. बडा राजा आदमी है ' एखादा वॉर्डर चिडत असे आणि तो चिडला म्हणजे हें खदखदां हंसत असत. रात्रपाळीवाले पोलीस समोरून वळकटी घेऊन चालले की, ' हां, स्टेशन तो दूर है ' असें हें म्हणायचेंच ! जो कैदी किंवा वॉर्डर चांगला असतो त्याला ते ' राजा ' म्हणतात. ' बडा राजा आदमी है ' हें जेलमधलें सर्टिफिकेट आहे. जेलमध्यें एकमेकाला वॉर्डरच्या हातीं सलाम ' भेजण्या 'चा फार प्रघात आहे. टोटलची घंटा सुमारें साडेसहा वाजतां पडली म्हणजे मागल्या बराकींतलें पुढल्यांना, पुढल्या बराकीतलें मागल्यांना ' अलेकुम सलाम ' देत असत. आठची घंटा पडली कीं, कोणी तरी एक ' अझान् ' देत असें. त्या प्रार्थनेच्या वेळीं मात्र सर्व मुसलमान कैदी गप्प बसत. रात्रौ कधीं कधीं मागच्या बराकींतून अबदुल लतीफ ' अझान् ' देतांना ऐकूं येत असें. त्याच्या

आवाजांत जो मूर्तिमंत करुण रस भरलेला असे किंवा भक्ति दिसत असे तशी इतर कैद्यांतून दिसत नसें. दर पंधरा दिवसांनीं कांड्यावर आमचें वजन करीत तेव्हां

वावला केसमधले आनन्दराव फणसे

मला पहाबयास मिळत. मला माझ्या शेजाऱ्यांचा शेवटीं कंटाळा आला; कारण त्यांचा रोज रात्रौ थालीपाटाच्या धुमधडाक्यांत 'होने दो खुशी दिलकी' का जलसा चालवयाचा. शेवटीं जेलरसाहेबांना माझी जागा बदलण्याबद्दल मी विनंती केली. लागलीच दुसऱ्या दिवशीं ज्या चाळींत रा. लाड होते तिकडे एका 'सेल'मध्यें सकाळीं नेलें, पण लागलीच त्याच दिवशीं मला अपीलांत सुटावें लागलें.

पहिल्या प्रथम साधी कैद होती तेव्हां ३३ दिवस भरावे लागले पण अपीलांत निर्दोषी सुटलों. पुढें या शेवटच्या खटल्यांत ७५ दिवस अपीलांतून सुटेपर्यंत भरले. झाली एवढी शिक्षा व ५०० रुपये दंड असा अपीलांत निकाल लागला.

जेलमध्यें मला केस काढावे लागले नाहींत व कपडेहि अत्यंत स्वच्छ राखले जात असल्यामुळें कोणताहि नवीन कैदी किंवा वॉर्डर आलाच तर थोडा दबकतच बोलत असे. ऑफिसर फार प्रेमानें वागत असत. तुरुंगांत संबोधताना एकेरी नांवानें हांक मारतात पण तसा अपमानास्पद प्रसंग मजवर आला नाहीं. साधारणतः जो कैदी जेलमध्यें कसल्या भानगडी न करतां शिस्तीनें वागतो त्याला सहसा त्रास होत नाहीं.

सोंगट्या खेळणाऱ्यांना "फर्जीत" माहीत असते पण जेलमध्यें "फर्जीत" याचा अर्थ निराळाच आहे. जेलमध्यें जे पोलीस असतात त्यांना ज्या दिवशीं रात्रपाळी असते त्याच्या दुसऱ्या दिवशी सुटी मिळते, त्याला 'फर्जीत' म्हणतात. पोलिसांचे पगार मात्र फारच कमी आहेत. जेलमध्यें तंबाखू, गांजा वगैरे कधीं कधीं सांपडण्याचें श्रेय जसें हुशार कैद्यांकडे आहे तसेंच पोलिसांच्या कमी पगाराकडे अर्थात् सरकारकडेहि आहेच. येरवडा जेलमध्यें—आणि बहुतेक ठिकाणी हीच स्थिती—पोलीस ब्राह्मणेतर आहेत. विशेषतः मराठ्यांचा व महारांचा भरणा आहे. एक मात्र ब्राह्मण दिसला. माझ्यावरील जमादार अस्पृश्यांपैकीं होता. जमादार हा वॉर्डचा राजा असतो. चावीवाला त्याचा दिवाण असतो व वॉर्डर त्याचे सेनापति असतात आणि कैदी बिचारे गुलाम असतात असें जर थोडक्यांत वर्णन केलें तर वस्तुस्थितीला फारसें सोडून होणार नाहीं. जेलर, सुपरिंटेंडेंट यांच्यापर्यंत कैद्यांचा फारच थोडा संबंध येतो. सर्व कर्तुम् अकर्तुम् जमादार. जमादारानें मनांत आणलें तर कोणत्याहि कैद्याचें त्याला कांहींहि करतां येईल. अशी विलक्षण सत्ता हातीं असतांसुद्धां जमादार शक्य तोपर्यंत कैद्यांशीं सरळपणानें वागतात आणि साहेबांकडे रिपोर्ट करण्यापलिकडे ते कसलाच कायदा आपल्या हातांत घेत नाहींत. हवालदार, जमादार, सुभेदार असें त्यांचे हुद्दे आहेत पण सारे 'खिल्लीछाप'. सुभेदाराचा युनिफॉर्म जरा निराळा असतो. जमादारासारखी त्याची अर्धी विजार नसून सबंध पँट असते आणि कमरेस पट्टा नसतो. ऑफिसमध्येंहि कांहीं कारकून आहेत.

त्यांत एक सोडून बहुतेक ब्राह्मण असावेत असें वाटतें. कारकुनांना मात्र पगार भक्कम आहेत. त्यांत ' रॅशन 'वरल्या कारकुनाला कैद्यांच्या तोंडून फार शिव्या बसतांना ऐकूं येत. जराशी डाळ किंवा रोटी बिघडलेली असली कीं त्यांनीं ' रॅशन 'वरच्या कारकुनाला शिव्या द्यावयाला सुरुवात केलीच. कायद्याप्रमाणें जेवढें तेल, मीठ, मसाला भाजींत पडावयाला पाहिजे तितका पडत नाहीं अशी कैद्यांची कुरकुर असते आणि डिसेंबर (१९२६) महिन्यांत कांहीं कांहीं वेळीं अशी भाजी येत असें कीं तिचें वर्णन करूनहि समजणार नाहीं ! पण जानेवारीपासून भाजी सुधारली होती. साध्या कारकुनालासुद्धां त्या कैद्यांच्या वसाहतींतील आपण कोणी तरी विशिष्ट असल्याचें वाटत असावें. कारकुनांना आणि डॉक्टरांना सर्व कैदी ' दादा ' या नांवानें हांक मारीत असतात. मी देशाचे दुष्मन केसमध्यें अपीलांत सुटलों होतों पण १५३ (अ) च्या खटल्यांत माझा जामीन पूर्वीच घेतला आहे हें रीतसर जेल ऑथॉरिटीजना कळल्याशिवाय मला सोडतां येत नव्हतें. अर्थात् मि. स्लेडन यांचे कोर्टांतून जामीन पटल्याबद्दलचा लखोटा घेऊन श्री. बाबुराव जेधे आले. आतां आम्हांला सोडणें प्राप्त होतेंच, पण तिथेंच जेलरसमोर दोन कारकुन [ब्राह्मण असावेत] लखोटा सीलबंद नाहीं म्हणून कुरकुर करूं लागले. जेलरसाहेबांनीं अर्थात् त्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. दुसऱ्या खेपेसहि अशीच गंमत उडाली. १५३ (अ) च्या वेळेस जेव्हां आम्ही सुटण्याकरतां ऑफिसमध्यें आलों तेव्हां एक ब्राह्मण कारकून—मग त्यांना मी सुटतों हें समजून काय वाटलें कोण जाणें–उद्गारले—

कारकून—आतां पुढें काय करणार ?

मी—पहिलाच धंदा.

(पुढें गृहस्थ कांहीं न बोलतां एखाद्या हॅबिच्युअल कैद्याला जसें दचकतात तसाच दचकून गप्प बसला.) जेलरसाहेबांनीं, तुम्ही नेहमीं येतां, आतां येऊं नका, असें सांगितलें. तिथें दोन ब्राह्मण कारकून आतां मी काय उत्तर देतों हें ऐकण्याकरता अगदीं कान टवकारून होते.

" मी पुन्हां केव्हां तरी येणारच आणि मला माझ्या समाजाकरतां यावेंच लागणार " हें मजकडून त्यांना उत्तर मिळालें. यावर ' संकटांत न सांपडाल अशा तऱ्हेनेंच कर्तव्य करा ' असें म्हणून जेलरसाहेबांनीं आम्हांला निरोप दिला. तेवढे वरचे ब्राह्मण कारकून सोडून प्रत्येक ब्राह्मणेतर वॉर्डर, कैदी, जमादार, सुभेदार मी सुटलों म्हणून आनंद व्यक्त करीत होता. ' साहेब, ओळख असूं द्या ' असें अंमलदार म्हणे तर ' महाराज, जब सुटेंगे तब जरूर मिलेंगे ' असें कैदी म्हणत. पण सुटण्याच्या वेळीं मनुष्य अति गडबडींत असतो. तो सगळ्यांच्या म्हणण्याला विमनस्कतेनें नुसतें

हो हो

म्हणत असतो.

जेलमध्यें एक 'शिटी' होत असते. ऑफिसरनें शिटी वाजवली कीं भराभर शिट्या वाजूं लागतात आणि सर्व कैदी एकदम बंद करतात. ही शिटी केव्हां वाजेल याचा नेम नसतो. शिटी वाजली की धांवपळ सुरू होते. फर्जीत गेलेले अंमलदारसुद्धां अंगावर असतील त्याच कपड्यावर पट्टा व रायफल घेऊन येतात. युनिफॉर्म नसल्यामुळें त्यांचीं तीं रायफल व पट्टा शिमग्यांतल्या सोंगासारखीं दिसूं लागतात. चोहोंकडले कैदी बंद केल्याच्या शिट्या आल्या की टोटलच्या दोन घंटा वाजतात. या अलार्म शिटीच्या वेळींच जेलची खरी व्यवस्था दिसून येते.

जेलमध्यें देण्यांत येणारी फटक्याची शिक्षा कशी देतात ही आपल्याला कल्पना नसते. माझ्या सेलच्या दारांत बसलें कीं फटके कसे देतात हें पाहावयास कधीं कधीं सांपडत असे. लग्नमंडपांत हंड्या, झुंबरें लावण्याकरतां जसें उंच स्टूल किंवा घडवंची असते, त्याप्रमाणें लांकडांचा एक भक्कम सांचा असतो. त्या घडवंचीवर आरोपीला पालथा बांधून त्याची सर्व वस्त्रें काढून घेतात आणि त्याच्या नितंबभागावर हुकुमाप्रमाणें वॉर्डरकडून वेताच्या छड्या मारतात. एक फटका बसला कीं, आरोपी ओरडूं लागतो. कित्येक वेळेला ऐकणारांचें हृदय विह्वल होईल अशा करुणास्पद आरोळ्या ऐकूं येतात. आमचा मुक्काम तेथें असतां या आरोळ्या पुष्कळ वेळां कानावर आल्या. फांशीच्या शिक्षेविषयीं बाहेरच्या अडाणी समाजांत निरनिराळ्या अफवा असतात. आमच्या वॉर्डच्या भिंतीपुढेंच

फांशीं देण्याची जागा

होती. फांशीचें दार नेहमीं बंद असल्यामुळें आंत काय प्रकार आहे तें फांशी जाणाऱ्याला किंवा देणाऱ्यालाच ठाऊक! फांशीचे आरोपी 'फांशी गेट' नांवाच्या बराकीत ठेवण्यांत येतात. फांशीच्या आरोपीला खोलीबंद ठेवतात. एक फांशीचा आरोपी जेव्हां वजन करण्याकरतां आणीत तेव्हां त्याच्या हातांत 'हातबिड्या' असत. त्याला सायंकाळीं जरा कंपाऊंडमध्येंच फिरावयास मोकळीक दिली तरीहि त्याच्या हातांत 'हातबेडया' घालीत असत, असें वॉर्डराच्या बोलण्यातून मला समजलें. फांशीच्या आरोपीला इतर कैद्याप्रमाणें काथ्याचें तरट न देता, चटई देतात व जस्ताच्या 'थालीपाटा'ऐवजी मडक्याचीं भांडीं देतात. त्यानें गळफास घेऊन किंवा थालीपाट डोक्यावर आपटून आत्महत्या करूं नये म्हणून ही खबरदारी घेत असावे. पण त्यांना जोपर्यंत दगडी भिंतीच्या खोलींत कोंडलें जातें तोपर्यंत भिंतीवर धडक घेऊन त्याला आत्महत्या करता येईल. पण असल्या आरोपींना दगडी भिंतींत न ठेवलें तर ते निसटूनहि जातील. फाशीच्या गुन्हेगाराला मागेल तें खावयास मिळतें असें आपण विशेषतः म्हाताऱ्या लोकांच्या तोंडून ऐकतों, पण तसें कांहीं एक नसून जें इतर कैद्यांना देतात तेंच अन्न त्यांना देण्यांत येतें. मात्र त्यांचा 'भत्ता' एका वॉर्डरनें ऑफिसरपुढें जाऊन खाऊन दाखवून 'पास' केल्याशिवाय देत नाहींत. जुन्या दंतकथांतून राजाचें अन्न हुजऱ्यानें

खाऊन दाखविल्याशिवाय राजा खात नसे असें आपण ऐकतों. त्या राजाप्रमाणें विष-प्रयोगाच्या भीतीनें हा भत्ता 'पास' करण्याचा प्रकार असावा. फांशी सकाळीं देत असतात. सप्टेंबर महिन्यांत मी तेथें असतांना एक फांशीवाला फांशीं जाणार होता. सकाळीं साडेसाताचा सुमार असेल, आम्हांला खोल्यांतून बंद केलें गेलें. कारण त्या वेळीं त्याला फांशीं द्यावयाचें होतें. त्या दिवशीं माझ्या बराकींतल्या कैद्यांनीं 'कंजी' घेतली नाहीं. एक मनुष्य मरतो आहे म्हणून त्यांनीं त्यांच्या दृष्टीनें दुःख प्रदर्शित केलें. मी अगोदर कंजी घेऊन पिऊनहि बसलों होतों. एक पठाण कैदी म्हणाला, 'क्या मास्टरभाई, तुम कंजी खलास किया?' मी कंजी अगोदरच प्यालेलों असल्यामुळें त्यालाहि काही बोलण्यास जागा नव्हती.

जेलमधल्या शिक्षांपैकीं कंजीरोटी व कंजीक्लॉथ वगैरे शिक्षा आहेत. 'कंजीरोटी' म्हणजे 'रोटींत मीठ' घालून खावयास द्यावयाची. त्याला भाजी देत नाहींत. ही रोटी साध्या रोटींतून ओळखतां यावी म्हणून त्यावर थालीपीठासारखीं बोटें रोवलेलीं असतात. 'गंजीक्लॉथ' म्हणजे तरटाची चड्डी, तरटाची बंडी आणि तरटाची टोपी. आमच्या एका भिस्तीवाल्याला ही शिक्षा मिळाली होती. हा 'खाकी' ड्रेस घालून तो आला म्हणजे कींव तर येत असेच पण हंसूंहि येत असे. गुळाची ढेप जशी तरटानें मढवतात तसा हा तरटांत ठेवलेला! तलम सुताच्या कपड्याला सोकावलेल्या 'चोरभाई'ना हा गंजीक्लॉथ अगदीं योग्य आहे. म. गांधींच्या खादीचें महत्त्व ज्यांना पटत नसेल त्यांना एक वेळ तुरुंगांत जाण्याचा प्रसंग यावा म्हणजे बाहेर खादीची संवय झाली तर तुरुंगांत किती सोपें जाणार आहे हे त्यांचें त्यांनाच समजेल. राजर्षि शाहुमहाराजांच्या वेळीं मला पाहिजे तेवढे पैसे मिळत असल्यामुळें मला सरदारी थाटण्याची मोठीच खोड लागली होती. केशवराव जेधे यांच्या साधेपणामुळें माझा हा उंची कपडे वापरण्याचा जडलेला रोग नाहींसा झाला. कारण एक धनाढ्य गृहस्थ, पाहिजे तेवढ्याच कपड्यांवर दिवस काढून, सार्वजनिक कामांत सारा पैसा खर्चीत आहे आणि मी दिवसांतून तीन कोट बदलीत आहें याची माझी मलाच लाज वाटून कोल्हापूरला नखशिखांत थाटांत राहण्याचें मला जडलेलें व्यसन नाहींसें झालें आणि त्यामुळें तुरुंगांतला तो पावणेदोन वस्त्रांचा युनिफॉर्म चढवतांना तो माझ्या अंगाला रुतला नाहीं कीं खुपला नाहीं. म. गांधींच्या खादी चळवळीमुळें लँकेशायर लाजणार कीं मँचेस्टरला मारणार हें बाजूला ठेवून नुसत्या बहुतेक धडाडीच्या सार्वत्रिक कार्यकर्त्यांच्या नशिबीं लिहिलेला कारागृहवास हिशेबीं धरला तर खादीहि अवश्य वापरावी असें वाटूं लागतें. खादी हा पहिला पाठच म्हणतात! शाहुमहाराजांच्या आश्रयाखालीं, सार्वजनिक चळवळीला मनुष्यस्वभावाची माहिती आणि निर्भयता या अनेक गोष्टी जरी मला लाभल्या, तरी कसलेहि श्रम न करतां खर्च होतील तेवढे पैसे लहान वयांत माझ्या हातीं येऊं लागल्यामुळें ती सार्वजनिक कार्यांत घातक होणारी डामडौलाची संवय जडलेली होती. पण इंग्रज सरकारच्या खास

आश्रयाखालीं ती पार चिरडून गेली याबद्दल सरकारचे आभारच मानायला पाहिजेत. राजगृह आणि कारागृह या दोन गृहांत जेवढें अंतर आहे तेवढें कोणत्याहि दोन गृहांत नसेल, पण दोन्ही गृहांतून वावरण्याचा सुयोग आम्हांला लाभल्यामुळें त्याचा माझ्या पुढल्या आयुष्यावर चांगलाच परिणाम होईल. एके काळीं वर्षानुवर्षें मांसाच्या निरनिराळ्या राजेशाही पक्वान्नावर चटावलेली जीभ भिसीवाल्याचा 'भत्ता' मिटक्या मारून फस्त करून टाकीत असे; त्यामुळें मला आतां मनापासून भरंवसा वाटूं लागला आहे कीं, या जीवनसंग्रामांत मजवर कसलाहि खडतर प्रसंग आला तरी त्यांतून मी निभावून जाईन. तुरुंगांत जाण्याच्या वेळीं आपलें धैर्य खचेल कीं काय ही पूर्वी एखादे वेळीं तरी मनांत शंका आल्यावांचून राहात नसे. पण आतां एकदां सोडून दोनदां अनुभव आल्यामुळें त्याचें कांहीं वाटत नाहीं असें अनुभवाला येऊन चुकलें. हा माझ्या दृष्टीनें माझा फारच मोठा फायदा झाला. तुरुंगांत १०८ दिवस काढल्यामुळें माझें दोन वर्षें तरी पूर्वीपेक्षां जास्त आयुष्य वाढलें आहे.

थंड पाण्याचें स्नान किती हितावह असतें हें तुरुंगांत जाऊन शिकण्याचा आमचा योग होता. पाण्याचा नळ जमिनीपासून फार तर एक फूट उंच असेल पण त्याच नळाचें पाणी एक फूट खोलीच्या, दीडएक फूट रुंदीच्या आणि सुमारें सातआठ फूट लांबीच्या हौदांत पडत असे. या हौदाला दुसऱ्या बाजूनें पाणी जाण्याकरतां एक वाट ठेवली होती. ती कपड्याचा बोळा घालून बंद केली कीं हौद भरे. मग त्या हौदांतून 'पाटा'नें भराभर पाणी घेऊन अंघोळ करतां येत असे. हौदाच्या दोन्ही बाजूनें उतरती फरशी असल्यामुळें कपडे धुण्यालाहि स्वच्छ जागा असे. पहिल्या दिवशीं जेव्हां आम्हांला रिठ्यानें (कारण त्यावेळीं साबण मिळाला नव्हता) ती आमची स्वातंत्र्य-महाविद्यालयाचीं महावस्त्रें धुतां येईनात, तेव्हां शीख कैद्यांनीं काथ्या घेऊन फरशीवर रिठ्यांचा फेस कसा करावयाचा व मग कसे कपडे धुवायाचे हें शिकविलें. प्रथम मी बंडी भिजवून पसरली आणि त्यावरच रिठे चोळूं लागलों होतों. पुढें जेव्हां साबण आला तेव्हां आमचा चांगलाच जम बसला. जेलमध्यें हातांत साबण आला म्हणजे सोन्याची चीप हातांत येऊन जो बाहेर आनंद वाटणार नाहीं असा आनंद वाटूं लागतो. जेलच्या नियमाप्रमाणें दर तीन महिन्याला कैद्यांना

१२ दिवस माफी

मिळत असते. वॉचमनला १४ दिवस व वॉर्डरला १८ दिवस, शिवाय कपडे व थालीपाट स्वच्छ ठेवलें तर तीहि एक ३ दिवस माफी असते. या माफीकरतां कैदी थालीपाट तोंड दिसेल इतकें स्वच्छ करून ठेवतात. वर्षाला चांगल्या वागणुकीबद्दल आणखी स्पेशल २० दिवस माफी असतेच. कारकुनी काम करणाऱ्यांना म्हणजे ज्यांना रविवारींहि काम पडतें त्यांना स्पेशल माफीहि देतात. माझ्या पुस्तकावर माफी धरून दोन महिने अगोदर सुटण्याची तारीख दिली होती. ज्यांची माफी धरून निमी शिक्षा झाली आहे त्यांना कमिटीपुढें उभें करतात आणि कमिटीनें पास केलें म्हणजे त्यांना सोडून देतात.

माझ्या देखत असा निम्म्या शिक्षेवर एक ग्रीक व एक मोंगल कैदी सुटला. मात्र ही कमिटी मोठ्या शिक्षावाल्यांकरतां असते. ही कमिटी सहा महिन्यानें एकदां येते. जन्मठेपीच्या कैद्यांना त्यांना जर अंदमानांत पाठविलेलें नसलें तर माफी धरून चौदा वर्षांनीं सोडतात. आपल्याला बाहेर चौदा वर्षें म्हणजे फारच मोठीं वाटतात पण तेथें जेलमध्यें समदुःखी बरेच असल्यामुळें कांहीं वाटत नाहीं. येरवडा जेलमध्यें असे कायमचे वसाहतवाले बरेच आहेत. जन्मठेपीच्या कैद्यांच्या पायांत पहिले सहा महिने संकलबेडी असते असें वॉर्डर म्हणत. ज्यांना ६ महिन्यांच्यापेक्षां कमी शिक्षा आहेत त्यांना माफी मिळत नाहीं.

३ महिने शिक्षा व ३०० रुपये दंड, दंड न दिल्यास ३ महिने शिक्षा अशी एकंदर ६ महिने सजा होते. परंतु त्याच्या बुकावर "माफीस पात्र नाहीं" असा शेरा मारलेला असतो. येण्याचा व जाण्याचा असे दोन महिने सोडून आपल्याला मिळणारी माफी दर महा ४ दिवसाप्रमाणें मोजतां येते. मी दुसऱ्या खटल्यात नोव्हेंबर १२ तारखेला गेलो आणि ५०० रुपये दंडाबद्दलचे दोन महिने धरून ता. ११ जुलै १९२७ रोजीं सुटणार होतों. दोन्ही खटले मिळून अपीलांत एकांत निर्दोषी व एकांत कमी शिक्षा झाली नसती तर आमची स्वारी

१९२८ सालीं ऑगस्टमध्यें

सुटली असती. पण प्रत्येक खटल्यांत शक्य तोंवर आणि शेवटपर्यंत झगडण्याचा आमचा निश्चय असल्यामुळें आम्हांला 'देशाचे दुष्मन' केसमध्यें यशही आलें व १५३ (अ) मध्यें भोगलेल्या शिक्षेवर दंडावर अपीलांत मोकळें होतां आलें.

ब्राह्मणेतर चळवळीमध्यें तुरुंगांत जाणारे आम्ही पहिलेच व आम्हांवरहि हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें सर्व ब्राह्मणेतरांचें आमच्या खटल्याबरोबरच आमचें धैर्य कितपत टिकतें याकडे लक्ष्य लागलें होतें. फुले प्रकरणापासून चळवळीला तोंड लागलें. फुले प्रकरणामुळेंच देशाचे दुष्मन पुस्तक निघालें. सतत वर्ष दोन वर्षें कोर्टांतून अनुभव नसतां झगडावें लागलें आणि त्यामुळें पैशाचा अतोतात चुराडा उडाला. आमचे वकील खटल्याचें महत्त्व पाहून फीकरतां थडवीत नसत आणि ज्या कामाकरतां एरव्हीं त्यांनीं हजारांनीं रुपये घेतले असते तेच आमच्या केसमध्यें आम्ही देऊं त्या पैशावर भागवून घेत. ब्राह्मणेतर पक्षामध्यें इतर पक्षांप्रमाणें कांहीं कुचर, कांहीं दीर्घद्वेषी, कांहीं परोत्कर्षसहिष्णु लोक मनुष्यस्वभावानुसार असावयाचेच. जोतीराव फुल्यांच्या वेळेपासून जहाल, मवाळ, टवाळ, गबाळ अशा सर्व पक्षांचें एकत्र आलेले ब्राह्मण जुटीनें असें आजपर्यंत कधींच धांवून आले नव्हते. सत्यशोधक चळवळ मारण्याकरतां सर्व ब्राह्मण एकजीव होण्याचा हा पहिलाच प्रसंग आणि अशा वेळीं जर खरोखरच ब्राह्मणांचे पुढारी मुत्सद्दीपणानें वागले असते तर सत्यशोधक चळवळीवर त्याचा थोडा फार परिणाम झाल्यावांचून राहिला नसता; परंतु सत्यशोधकांचें भाग्य म्हणूनच कीं काय ब्राह्मण पुढाऱ्यांना सरकारी

कोर्टकचेऱ्या पाहण्याची आणि अधिकाऱ्यांकडे डेप्युटेशनें नेण्याची बुद्धि सुचली आणि त्यामुळेंच सत्यशोधकांचें दहा वर्षांचें कार्य एका वर्षांत पार पडलें. मी व माझे मित्र रा. केशवराव जेधे किंवा ब्राह्मणांच्या आटोपशीर भाषेंत बोलायचें म्हणजे

जेधे-जवळकर

असा आम्हां दोघांवर एक विशिष्ट कंपू म्हणून ब्राह्मणेतर पक्षांतून बाजूला काढून शाब्दिक हल्ले करण्याचे प्रयत्न होत असत. परंतु त्यांना ही त्यांची चूक लवकरच कळून आली. अर्धकच्चे किंवा ज्यांना स्वतःच्या प्रतिष्ठेपुढें कांहीं दिसत नाहीं किंवा 'जेधे – जवळकरां'ची वैयक्तिक स्पर्धा करणारे जे कोणी ब्राह्मणेतर होते, त्यांना ही संधी उत्तम सांपडली होती; जेधे-जवळकरांना निदान नुसत्या जवळकरांना तरी ब्राह्मणेतर पक्षांतून नामोहरम करण्याची उत्तम पर्वणी आली होती. ज्यांना ब्राह्मणेतर पक्षाचें ध्येय तर राहूं द्याच पण नांवसुद्धां पसंत नाहीं अशी ख्याती असलेले 'अपघातजन्य पुढारी' वर्तमानपत्राकडे धांव घेऊं लागले. 'नाहीं हो नाहीं आमचा जेधे-जवळकरांशीं मुळींच संबंध नाहीं' असें भीतीनें म्हणा किंवा मुद्दाम म्हणा पण प्रसिद्ध करूं लागले. गरीब बिचारे पोटार्थी तरुण या बडव्यांच्या हो ला हो ठोकून वाहत्या गंगेंत हात धुवून घेऊं लागले आणि असा कांहीं विलक्षण काळ आला कीं, जो चळवळीच्या नांवावर कातडी बचावून उघड उघड तुंबडी भरतो तो शहाणा पुढारी आणि जो पदराला खार लावून चामडीहि लोळवून घेतो तो वेवकूफ! ज्यांना जन्मांत स्वार्थत्याग, धैर्य किंवा सार्वजनिक काम याची स्वप्नांत कल्पनाहि नाहीं किंवा असून तिचा फायदा घेण्यापेक्षां तिचा दुसरा उपयोग माहीत नाहीं; जे ब्राह्मणेतर पक्षाचे श्राद्ध घालण्यासहि तयार होतील तेच हरीचे लाल अशा आणीबाणीच्या वेळीं कैवारीपणाचें मोठें सोंग घेऊन पुढें येऊं लागले. इथून पुढें चळवळींमध्यें धैर्यानें पडणाऱ्या

ब्राह्मणेतर तरुणांना

माझ्या अनुभवाचा झाल्यास उपयोग होईल म्हणून मुद्दाम माझी इच्छा नसतां या गोष्टी मला उजेडांत आणाव्या लागत आहेत. माझ्यावर झालेले हल्ले किंवा माझा निःपात करण्याकरतां झालेले प्रयत्न जर उजेडांत आणले तर पुढल्या तरुण वीरांना त्यापासून खात्रीनें फायदा होईल. प्रसंग कसलाहि असो, प्रतिस्पर्धी कितीहि प्रबळ असो, जनता मर्दावर फिदा असते हें प्रत्येक तरुणानें लक्षात ठेवावें. ह्या मर्दपणाचा आपण नेकीनें देशोद्धाराकरतांच जर उपयोग करीत असलों तर त्याला जनता कधींहि नजरेआड करीत नाहीं हा अढळ विश्वास ठेवावा. मधल्या ढगामुळें कदाचित काळ लागेल, पण शेवटीं यश हें येणारच. बाकीचे कोणीच काम करीत नाहींत मग आपलेंच काय घोडें अडलें आहे असा स्वप्नांतसुद्धां विचार शिवूं देऊं नये. कारण बाकीचे कोणी करीत नाहींत म्हणून तर आपल्यावर दसपट जबाबदारी पडत असते. बाकीचे सगळेच कार्य करीत असल्यावर मग आपल्या कामांची तरी जरूर काय? आजपर्यंत ब्राह्मणेतर चळवळीला

सरकारशीं विरोध

हा मुळींच माहीत नव्हता त्यामुळें सरकारच्या शब्दावर कसरत करणारे लोक पुढारी होऊन बसले होते. पण गव्हर्नरांच्या मानपत्रालाच विरोध करून श्री. जेधे यांनीं ब्राह्मणेतर पक्षाच्या नव्या युगाची सुरुवात केली आहे, आणि आजच्या ब्राह्मणेतर पक्षाची सरकारनें केलेली संभावना लक्षांत घेतली तर श्री. जेधे यांनीं केलें तेंच योग्य केलें आणि नुसत्या मानपत्रांना विरोधच काय पण सरकारचा निषेध करण्यासाठींसुद्धां खलिते रवाने होत आहेत. कांहीं दिवसांनीं असा योग येईल कीं, राजकीय गुलामगिरीची पाळेंमुळें खणण्यांत प्रत्येक सत्यशोधक गुंतलेला दिसेल. पुढाऱ्यांत कांहीं मेल गाड्या असतात आणि कांहीं मालगाड्या असतात. दोन्ही रुळांवरूनच जायच्या पण वेगांत फरक असतो. तेव्हां आपण जें करतों तें लोकापवादास पात्र झालें तरी तें देशाच्या हिताचें आहे आणि आपला स्वार्थ साधण्याचा आपण प्रयत्न करीत नाहीं अशी मनाची पक्की खात्री असल्यावर मग कोणाचीहि पर्वा करूं नये. 'पुढारपण' हें एक मोठें प्रलोभन आहे; तें ज्याला भगीरथ परिश्रमानें प्राप्त झालेलें असतें तो त्याचा उपयोग कधींहि उधळल्यासारखा करीत नाहीं. पण कोणाकोणाला निव्वळ अपघातानें पुढारपण लाभत असतें. असले अपघातजन्य पुढारी आपलें बेगडी वर्चस्व टिकावें म्हणून हरप्रकारच्या युक्त्या लढवीत असतात आणि स्वपक्षाच्या तंगड्याच तोडून न थांबतां त्याच्या नरडीवरहि स्वार्थाचें नख रोंवल्याशिवाय राहात नाहींत. कांहीं कांहीं पुढारी म्हणविणारे ब्रुव परोपजीवि असतात. म्हणजे ज्यांच्यामुळें पुढारपण स्थिर होईल अशाच लोकांच्या मतावर यांचा भाता सुरू असावयाचा. कांहींचे चळवळीचा फायदा कसा घ्यावा यांत सारें धोरण घुटमळून पडलेलें असतें, नवीन किंवा ज्याला खरोखरीच कार्य करावयाचें आहे अशा जुन्याहि समाजसेवकानें एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवावी. आपल्या धैर्याचा, आपल्या औदार्याचा व स्वार्थत्यागाचा उपयोग एखाद्या मायावी गोडबोल्या स्वार्थी माणसाच्या अघोर तृष्णेस होऊं नये. चळवळीमध्यें फायदा घेण्याकरतांच ज्यांना यावें लागतें असले स्वार्थी लोक प्रथम पोटार्थी माणसांना वश करून घेत असतात. सेनापतीपासून ते हुजऱ्या भाटापर्यंत यांना रिक्रूट मिळतात. मग त्या रिक्रूटाच्या करवीं पहिल्या जुटींत फूट उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असतात आणि पैशामुळे त्यांना अपयश येतेंच असें ठरलेलें नाहीं. या बाबतींत माझा अनुभव अत्यंत कटु आणि अंगावर शहारे आणणारा आहे. दाही दिशांना संकटांनीं ग्रासून टाकलें आहे. उद्यां काय होईल याचा आज नेम नाहीं. अशा भयंकर वेळीं सच्च्या दिलाचे लोक आपण मोजूं लागलों म्हणजे निराशेनें क्षणभर हृदयाला धक्का बसल्यावांचून राहात नाहीं. एखाद्या साध्या गोष्टीत जर हा अनुभव तर मातृभूमीकरतां कसल्याहि संकटांत उडी घालण्यास हे लोक कसे तयार होतील अशी खंत वाटू लागते. पुढारी म्हणविणारे किंवा त्यांच्याकडून एखादा अर्धा तुकडा मिळेल या आशेनें गोंडा घोळणारे दगलबाज लोक आपआपले डाव साधू लागतात. दुसऱ्याच्या सरणावर आपला भात शिजवून घेण्याची प्रवृत्ति जोंपर्यंत आम्हां हिंदु लोकांत आहे,

तोंपर्यंत गुलामगिरींत खिचपतच पडावें लागणार काय? संकटांत सांपडलेल्या माणसाला आम्ही जास्त छळलें नाहीं हे मोठे उपकार केले असें निर्लज्जपणानें म्हणण्यास देखील असले लोक कचरत नसतात. सरकारी लोखंडी कड्याच्या तुरुंगाची मला भीति वाटली नाहीं. ब्राह्मणांच्या सभेंतून होणारा शिव्यांचा वर्षाव ऐकून मला खदखदां हसूं येत असें; पण स्वपक्षांतील पोटार्थी पुढाऱ्यांच्या वर्तनांतला पक्षद्रोही स्वार्थ मात्र त्वेष आणीत असे. मला या सर्व केसीसमध्यें सबंध ब्राह्मणेतरांकडून मदत झाली आहे, पुढाऱ्यांकडूनहि झाली आहे; भावानें म्हणा भीतीनें म्हणा पण कोणत्याहि ब्राह्मणेतराला माझ्या इतका एकमुखी आणि एकसूत्री पाठिंबा मिळाला नाहीं याबद्दल सर्वांचे मला आभार मानले पाहिजेत. पण हा पाठिंबा मिळण्यास खरें कारण मी नसून ज्या एखाद्या अर्ध्या ब्राह्मणेतरानें त्या वेळेस डाव खेळण्याचा उपक्रम आरंभला ते आहेत. ब्राह्मणसमाजाशीं मी झगडत आहे आणि अशा ऐन बाणीच्या प्रसंगीं माझे पाय तोडण्याचा आपल्याच लोकांकडून प्रयत्न होत आहे ही गुणगुण ब्राह्मणेतर जनतेच्या कानांवर गेल्याबाचून राहिली नाहीं आणि जनतेचा भरभक्कम पाठिंबा आहे अशी कांहीं पुढाऱ्यांची खात्री झाल्यामुळें नाक डोळे मुरडीत का होईना आमच्या हातांत हात घालणें त्यांना भाग पडलें.


जेधे-जवळकरांशीं

आमचा संबंध नाहीं म्हणविणारे वीर जेधे-जवळकरांकरतां आम्ही अमुक अमुक केले म्हणून आम्हांला मतें द्या असें सर्टिफिकेट जनतेला दाखवूं लागले हा अद्भुतरम्य अनुभव पुढल्या पिढीला खास उपयोगी पडेल. आपण आपले लोक आहेत त्यांच्यावर नेहमीं प्रेमच करीत राहावें. त्यांनीं जरी आपल्याला झिडकारलें तरी मनांत कसलेंहि कपट न ठेवतां त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करावा; पण त्या प्रयत्नांत खुनशीपणा नसावा; सामान्य माणसें असतात तीं अशा बावटळीच्या वेळीं इतकीं कांहीं बावचळतात कीं, त्यामुळें त्यांचें हसूं येऊं लागतें. देशासाठीं बेफाम बनणाऱ्या तरुणांनों! कोणाच्या आधारावर मात्र अवलंबून बसूं नका! स्वतःच्या हिंमतीवर विश्वास ठेवा! आत्मयज्ञ केल्यावर आपल्या मागें किती येतील याची वाट पाहूं नका, कारण त्यांत तुम्हाला निराश व्हावें लागेल. आपल्याला जें वाटतें, पटतें त्याकरतां आपल्याला जें करणें प्राप्त आहे ते स्वतःच्या जिवावर बजवा.

प्रकाशक : अच्युत बळवंत कोल्हटकर,
मार्कर बिल्डिंग, खेतवाडी, मेन रोड, मुंबई नं. ४
मुद्रक : माधवराव पांडुजी बनकर
लक्ष्मी वैभव प्रेस, प्रार्थना समाजसमोर, मुंबई ४

१९२७

◇◇◇



"कैवारी" व "तेज" यांमधील लेख

"कैवारी" व "तेज" यांमधील लेख

श्री. कासल्यांच्या फोटोनें ब्राह्मणांचा जळफळाट

[कैवारी : ५ जानेवारी १९२९]

गिरणी कामगारांच्या चळवळींत जातिविशिष्ट चळवळी घुसडूं नयेत अशा मोहक सबबीखालीं पुण्याच्या केसरी पत्राच्या ब्राह्मण बातमीदारानें पुढील मजकूर प्रसिद्ध केला आहे. " एका ब्राह्मणेतर वर्तमानपत्रानें नुकत्याच झालेल्या मारहाणींत जखमी झालेले कासले ह्यांचा फोटो दिला आहे ! ब्राह्मणेतर कामगार पुढाऱ्यांना डांगेप्रभृति मंडळींपासून, ब्राह्मणेतर चळवळीचें विष त्यांच्या अंगीं भिनवून फोडण्याचा प्रयत्न सुरूं आहे. "

वरील उद्‌गार पुण्याच्या ब्राह्मणी पत्राचे आहेत. रा. कासले यांचा फोटो कैवारींत प्रसिद्ध झाल्याबरोबर केसरीच्या बातमीदाराला दुःखाचा हुंदका यावा ह्यांत मुळींच नवल नाहीं. ह्या हुंदक्याच्या मुळाशीं कोण आहे व हा सूर कोठून वहातो आहे याची सर्व ब्राह्मणेतरांना माहिती झालेलीच आहे. ब्राह्मणेतरांचा फोटो प्रसिद्ध होणें हा ब्राह्मणांच्या दृष्टीनें अत्यंत धर्मद्रोह झाला रा. कासले यांनीं कामगारांची सेवा बजावली आहे. ही सेवा बजावीत असतां त्यांच्यावर संकटें कोसळलीं आहेत, अशा बहाद्दरांचा फोटो छापल्याबद्दल अस्सल ब्राह्मणी पत्राला दुःख व्हावें यांतलें इंगीत न समजण्याइतकें ब्राह्मणेतर दुधखुळे राहिलेले नाहींत.

कामगारांनीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा वाद उद्‌भवूं नये असें आमचेंहि मत आहे, कारण कामगारांत आणि शेतकऱ्यांत ब्राह्मण असणें शक्य नाहीं आणि असलेच तर ते इतके थोडे असणार कीं त्यांना हिशेबी धरण्याची जरूरहि नाहीं.

ब्राह्मणेतर चळवळीनें सबंध महाराष्ट्र जागा केला यामुळें ब्राह्मणांचें चरण्याचें कुरण बंद झालें आहे; ब्राह्मणेतर चळवळीनें बहुजन समाज जागृत होऊन तो सर्व प्रकारच्या गुलामगिऱ्या झुगारून देतो ही ब्राह्मणेतर चळवळीची आंच लागल्याबरोबर ब्राह्मणांनीं ह्या चळवळीवर खोटे-नाटे आरोप करण्यास सुरुवात केली. बहुजन समाज जागा होऊ

नये, कामगारवर्ग, शेतकरीवर्ग आपल्या पकडीत राहावा म्हणून ब्राह्मणेतर चळवळींच्या नांवानें बोटें मोडगें हेंच ब्राह्मणाचें काम होऊन बसलें आहे.

ब्राह्मणेतर चळवळ सरकारच्या बाजूची आहे असा आरोप ब्राह्मणी महारोगानें पछाडलेले ब्राह्मण करीत असतात. सरकारच्या विरुद्ध नुसत्या तोंडबहादरी करून किंवा राज्य उलथून पाडण्याच्या गप्पा कॉंग्रेसवाले भटजी शेटजी व त्यांचे भाऊबंद मारीत असतात पण असल्या बातांनीं इंग्रजांचें राज्य उलथून पाडण्याच्या अगोदर शेतकरी व कामकरी यांचा खिसा उघडा पडून देशभक्तीचा धंदा करणाऱ्या चोरांचे खिसे मात्र भरले जातात. लोकांना भुलविण्याचा किंवा त्यांच्या मनांत त्यांच्या हातून ज्या गोष्टी होणें शक्य नाहीं, त्या गोष्टी भरविण्याचें काम ब्राह्मणेतर पक्ष करीत नाहीं; ब्राह्मणेतर पक्ष हा ब्राह्मणेतरांचा आहे, सर्व शेतकरी ब्राह्मणेतर आहेत, अर्थात् इतर मधल्या लुडबुड करणाऱ्या चोरांनी कितीहि गारुडी खेळ दाखविला तरी ब्राह्मणेतर पक्षाच्या किंवा बहुजनसमाजाच्या जुटीवर यांना हल्ला करतां यावयाचा नाहीं. केसरीकार व त्यांचे मुंबईचे भाडोत्री पित्ते यांनीं, ब्राह्मणेतर चळवळ नामशेष करून लोकांवर पुन्हां ब्राह्मणी गुलामगिरीचा पगडा बसविण्याकरितां एक कट रचलेला आहे. ब्राह्मणेतर चळवळ हाणून पाडल्याशिवाय ब्राह्मणांचें सोवळें भांडें आतां या जगांत टिकत नाहीं, असा रंग पाहून आपल्या मिंध्या हस्तकांच्या करवी ब्राह्मणेतर जनसमूहांतच ब्राह्मणेतर चळवळीची नालस्ती करण्याचे चोरटे हल्ले चालले आहेत; ह्या चोरट्या ब्राह्मणी काव्याला कोणीहि बळी पडू नये अशी आमची विनंति आहे.

" ब्राह्मण कोण " हा ओळखायचा कसा हें हल्लीं मोठें विकट होत चाललें आहे. ब्राह्मणांच्या अंगात उपजतच धूर्तपणा असल्यामुळें आपल्या खऱ्या स्वरूपाचा तो लवकर थांगपत्ता लागूं देत नाहीं. एखादा ब्राह्मण म्हणेल, " मी मांस खातों मी ब्राह्मण कसा ? " " मी जानवें घालत नाहीं मग मी ब्राह्मण कसा ? " " मी देवाची पूजा करीत नाहीं मग मी ब्राह्मण कसा ? " " मी महारांच्याही हातचे खातो मग मी ब्राह्मण कसा ? " " मी विलायतेला गेलो मग मी ब्राह्मण कसा ? " असे सवाल टाकून आपण ब्राह्मण नाहीं हे दाखवीत असतो. हल्लीं ब्राह्मणांनीं ताळतंत्र सोडल्यामुळें ते वाटेल तें खातील, वाटेल तेथें जातील, वाटेल तें करतील, हवें तें बोलतील. तेव्हां खाण्यावर, पिण्यावर किंवा जाण्यावर किंवा शेंडीच्या गोंड्यावर किंवा सोवळ्यावर, गंधावर हा माणूस ब्राह्मण आहे असें ठरवून चालायचें नाहीं; कारण असल्या कसोट्या लावल्या तर नरसोपंत केळकरापासून तो मिस मेयोच्या पाठीराख्या काळापर्यंत हजारों ब्राह्मण पळवाटा काढून ब्राह्मणेतरांना चकवायला पाहतील. ब्राह्मण कोण ही ओळखण्याची खूण निराळीच आहे. ती खूण कामगारांनीं, शेतकऱ्यांनीं लक्षांत घेऊन त्या खुणेबरहुकूम ' कोण ब्राह्मण ' हा ओळखला पाहिजे. ' ब्राह्मण ' हा पदार्थ अत्यंत भयंकर आहे, ह्या पदार्थावर विश्वास ठेवून महात्मा गौतम बुद्धाचे अनुयायी फसले. ह्या पदार्थानें एकजात सर्व संतांना छळले. ह्याच पदार्थानें राजा शिवाजीस नाडलें. ह्याच पदार्थानें मराठी राज्यास घुळीस

मिळविलें. ह्याच पदार्थानें कोट्यावधी अस्पृश्यांच्या अन्नांत माती कालविली आणि हाच पदार्थ आज काँग्रेसच्या व्यासपीठावर उभे राहून स्वातंत्र्याच्या गप्पा मारीत आहे. जो चांगल्या कामाला शिव्या देतो तो ब्राह्मण? जो बहुजन समाजाची प्रगती करणाऱ्या ब्राह्मणेतर चळवळीला शिव्या देतो तो ब्राह्मण? ही हल्लीची ब्राह्मण ओळखण्याची खूण समजावी. ब्राह्मणेतर चळवळ ब्राह्मणेतरांना गुलामगिरीतून मुक्त करीत आहे; ह्या चांगल्या गोष्टीमुळें ज्यांचें पित्त खवळतें तो हमखास ब्राह्मण समजावा. कामकरी, शेतकरी हे सर्व ब्राह्मणेतर, देश ब्राह्मणेतरांचा, सत्ता ब्राह्मणेतरांची आणि यांवर मिजास ब्राह्मणांची. ब्राह्मणेतरांनी कधींच पुढें येऊं नये, ब्राह्मण लोकांचे पुढारी होऊं नये अशी ब्राह्मणांची फार इच्छा असते. रा. कासले यांचा फोटो छापला, झालें ब्राह्मणी पत्रांचें पित्त खवळलें! कासल्यांनीं मरे मरे पर्यंत काम करावें; पण त्यांचा गौरव मात्र कोणी करूं नये हीच ब्राह्मणी कारवाई? कासल्यांचा फोटो छापल्यानें ब्राह्मणांचें डोकें भडकतें याचें कारणच हें कीं कासले काय किंवा आळवे काय? कोणीही ब्राह्मणेतरांनीं काम करावें पण त्यांचा गौरव केला जाऊं नये. अशी इच्छा नसती तर केसरीच्या बातमीदारानें गेल्या केसरींत तसें लिखाण लिहिलेंच नसतें. हा केसरीचा बातमीदार कोण आहे व त्याच्या बुडाशी कोण आहेत हें आम्हांला माहीत आहे. या सगळ्या ब्राह्मणी कारवाईच्या मागे भांडवलशाही आणि सरकार आहे. ह्या सगळ्या ब्राह्मणी गारुड्यांच्या पाठी गिरण्यांचे मालक आहेत. केसरी पत्राचा आणि भांडवलवाल्यांचा फारच घरोब्याचा संबंध आहे. केसरीकारांनीं आजपर्यंत जे जे मोठमोठे फंड हबकले ते सर्व या भांडवलवाल्या लोकांकडून हबकलेत. ते फंड पुन्हां उकळण्याकरितां टिळकांच्या केसरीचें सोवळें नेहमींच पसरलेलें असावयाचें. वरून जहालपणा दाखवीत असले तरी आंतून सरकारच्या चरणाजवळ लोटांगण घेणारे केसरीकार यांच्या धोरणाचा शेवट काय आहे हें आम्ही जाणून आहोंत. केसरीच्या पोटांतून रा. कासले यांचा फोटो पाहून जो पोटसूळ उठला याचें कारण रा. कासले हे ब्राह्मणेतर आहेत. हेच कासले जर ब्राह्मण असते आणि मग त्यांनीं कांहीं केलें नसतें तरी केसरीकार खुशाल मनांतल्या मनांत मोतीचुऱ्याचे लाडू खात बसले असते. ब्राह्मणेतर मग तो रा. कासले यांच्यासारखा बहादर असला, आळवे यांच्यासारखा मर्द असला, तरी त्यांचा गौरव होऊं नये हीच ब्राह्मणांची इच्छा! त्यातून ब्राह्मणेतर चळवळीला हाणून पाडण्याचे ब्राह्मणांनीं दोन उपाय शोधून काढलेत. निरनिराळ्या सोंगाखालीं कांहीं ब्राह्मण चोरांना ब्राह्मणेतरांत घुसवून त्यांच्या तोंडून ब्राह्मणेतर चळवळीची नालस्ती करावयाची, आणि कांहीं ब्राह्मणांनीं बाहेरून वादाचे खापर ब्राह्मणेतरांचे डोक्यावर फोडायचे. यांसाठीं सर्व ब्राह्मणेतरांनीं सावधपणानें वागावें. जो कोणी ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीला नांवे ठेवील त्यांच्यावर विश्वास ठेवूं नये. कारण ब्राह्मणेतर चळवळ मारण्यांतच ब्राह्मणांचें हित आहे. ब्राह्मणेतरांची किंवा देशाची खरी उन्नती ब्राह्मणेतर चळवळीत आहे. ब्राह्मणेतरांच्या हातीं देशाचे पुढारीपण गेलें म्हणजेच सरकारला खरी भीति आहे. ब्राह्मणांच्या चाळीस

वर्षांच्या बडबडीला सरकार भीक घालीत नाहीं; पण ब्राह्मणेतरांच्या एकाच झापेला सरकार किती भितें हे गेल्या तुकडे बिलाच्या वेळेस समजून आलें आहे. देशाचे पुढारी ब्राह्मण असावेत हें सरकारच्या हिताचें आहे, कारण ब्राह्मण पुढारी असला तर बडबडण्यापलिकडे किंवा लोकांना भुलविण्यापलिकडे कांहीं करणार नाहीं ही सरकारची गेल्या चाळीस वर्षांत खात्री पटली आहे एवढ्याकरितां सरकार हजार कारवाया करील, पण ब्राह्मणांचा पुढारीपणा टिकवून धरील. कारण ब्राह्मणेतरांच्याकडे पुढारपण गेले तर सरकारला त्राहि भगवान व्हावे लागेल हें सरकार ओळखून आहे. रा. कासले, रा. आळवे, रा. ताम्हणेकर या लोकांनीं कामगारांचें झटून कार्य केलेलें आहे. अर्थात् अशा लोकांचेच फोटो छापले गेले पाहिजेत; आजपर्यंत सगळ्या ब्राह्मणी पत्रांनीं त्यांना दडपून ठेवण्याचा जो प्रयत्न केला तो बुद्धिपुरःसर होता हे केसरीच्या पर्वाच्या लेखावरून दिसून येईल. असल्या हलकट आणि दीर्घद्वेषी केसरी पत्रावर कामगार आणि शेतकरी थुंकतील. जेव्हां केसरीचे भाडोत्री पित्ते, सरकारचे नकळत काम करणारे चोर, त्यावेळीं येऊन टिळकांच्या ब्राह्मणी अंतःकरणाचे पोवाडे गातील, त्या वेळेस सर्व कामगारांनीं त्यांना त्यांच्या भाडोत्री अंतःकरणाची जाणीव करून दिली पाहिजे. शेतकरी समाज ब्राह्मणेतर चळवळ्या बनला आहे, हे सरकार जाणून आहे. कामगारांपैकीं निम्म्याच्यावर लोकांना ब्राह्मणेतर चळवळीचा अभिमान आहे. अर्थात् सबंध कामकरी ब्राह्मणेतर चळवळे बनले तर शेतकरी एक होऊन शेटजी, भटजी व सरकार यांना एकाच घासात खाऊन टाकतील ही भीति सरकारला आहे, ही भीति शेटजीला आहे, ही भीति भटजीला आहे. कुठून तरी कामकरी वर्गाच्या मनांत ब्राह्मणेतर चळवळीच्या विरुद्ध वाटेल ते भरवून द्यावयाचे म्हणजे कामकरी व शेतकरी यांची जूट होणार नाहीं अशी सरकारी कारवाई आहे. इथल्या गिरण्या बंद पडल्या, किंवा संपांत कामकरी गांवीं गेले तर त्यांना शेतकरी व्हावे लागते, कामकरी हे मुळचेच शेतकरी आहेत आणि आतांहि त्यांच्या रोमारोमांत शेतकऱ्यांचाच अभिमान भरला आहे. बरे शेतकरी तर सर्व ब्राह्मणांच्या विरुद्ध आहेत. ब्राह्मणेतर चळवळी विरुद्ध कामकऱ्यांना चिथवण्याचा डांबरटपणा आहे. शेतकरी व कामकरी एक झाले तर ज्यांचीं नाकें ठेंचतील अशा वर्गांतले लोक शेतकरी व कामकरी यांच्या राज्याच्या बाता झोडू लागले आहेत. या गारुडी बातांवर मुळीच विश्वास ठेवू नका आणि शेतकऱ्यांच्या किंवा ब्राह्मणेतराच्या विरुद्ध जो ब्राह्मण तुम्हांपुढें बोलून आपल्या जातभाईचीं मनें दुखवील तर ती आग विझवा. ह्या आगीवर घडाभर पाणी ओता आणि तोच घडा त्यांच्याच डोक्यावर फोडा.

०००

काँग्रेसचा ढोंगी कार्यक्रम

[कैवारी : ५ जानेवारी १९२९]

कलकत्ता येथें गेल्या आठवड्यांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन पार पडलें आणि त्याबरोबर अनेक परिषदांचा तांडाहि कसा तरी घाईघाईनें पार पडला. नगाऱ्याच्या घाईपुढें टिमक्यांचा आवाज कितीहि जोरानें पिटला तरी जसा तो होत नाहीं तशी स्थिति या जोड-परिषदांची झाली होती. गाड्याबरोबर नळ्याची वरात या न्यायानें ह्या परिषदा नसून खोळंबा आणि असून अडचण अशा होत असतात. निरनिराळ्या कंपूंतले नवरदेव अध्यक्षपदाचीं बाशिंगें बांधून प्रत्यक्ष नसलें तरी अप्रत्यक्ष त्यांना काँग्रेसजवळ खेचता यावें याच उद्देशानें सदर उप-परिषदा असाव्यात असें यंदाच्या काँग्रेसवरून तरी उघड उघड दिसत आहे. निरनिराळ्या आमिषांनीं होतील तेवढे निरनिराळे गटांचे चालक कलकत्त्यास जमवून व धड ना वसाहतीचें स्वराज्य ना स्वातंत्र्य असला घेडगुजरी ठराव पास करण्यांत आला. जो सर्वांना खुष ठेवण्याचा प्रयत्न करतो तो सर्वांना फसवीत असतो. किंवा स्वतः फसत असतो. म. गांधींनीं जो समेटाचा म्हणून ठराव पास करून घेतला, त्यांत गांधीजींची अशीच स्थिति झाली आहे. स्वतः गांधीच फसत आहेत असें दिसतें. कारण त्यांनीं राष्ट्रापुढें म्हणून जो कार्यक्रम ठेवला आहे त्यावरून म. गांधी अजूनहि आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास ठेवून फसत आहेत असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागत आहे. जेव्हां नऊ महिन्यांत स्वराज्य मिळविण्याकरितां समारांगणांत उतरले आणि गांधींनीं ज्या कार्यक्रमावर किंवा ज्या लोकांवर भरवसा ठेवला त्यांत आणि आजच्या परिस्थितींत कांहीं फरक पडला आहे असें दिसत नाहीं. अगोदर बारा महिन्यांची पार्लमेंटला जी धमकीवजा नोटीस दिली आहे तीच अव्यवहार्य होईल. अगदीं ता. ३१–१२–१९२९ च्या मध्यरात्रीपर्यंत काँग्रेसला पाहिजे तशी घटना पार्लमेंटकडून शेवटच्या भट्टींतून भाजून पार पाडली जाईल हें अशक्य आहे आणि हें अशक्य म्हणूनच असहकारितेचें बावटळ उठविण्याची संधि सांपडली याच हेतूनें जर हा डाव फेकला असेल तर नुसती अशी नोटीस देऊन काँग्रेसनें कांहीं न करतां स्वस्थ बसावयाचें व एक वर्ष वाट पाहावयाची असा कार्यक्रम आखावयास पाहिजे होता. कारण सध्याच्या परिस्थितींत काँग्रेसची अंतर्गत कारभार व परस्परांविषयीं मनःस्थिति पाहतां 'कांहीं न करण्याचा' कार्यक्रमच जास्त हितकर झाला असता. तें काँग्रेसच्या पुढाऱ्यांस कळावयास पाहिजे होतें. पार्लमेंटला पुढल्या डिसेंबरच्या आंत हिंदी राज्यघटना काँग्रेसच्या स्वाधीन करणें जेवढें अशक्य तेवढेंच काँग्रेसला पुढील वर्षांत आखलेला कार्यक्रम पार पाडणें अशक्य आहे. नुसत्या कार्यक्रमाचा ठराव तपशीलवार छापला जाईल त्याची विचारपूर्वक कागदांवर छाननी केली जाईल, पण तो अमलांत मात्र मुळींच येणार नाहीं. हें तर काँग्रेसच्या सभासदांचें वैशिष्ट्य आहे. अस्पृश्यता निवारणाचा कंठाळी ठराव कार्यक्रमापुढें येतो आणि येतो तसाच

जातो; पण प्रत्यक्ष अस्पृश्यता निवारणाकरितां काँग्रेस फंड खर्च झाला हा हिशोब दाखविण्याच्या पलिकडे कांहीं अस्पृश्यता निवारणाचें काम झालें असें दाखवायला काँग्रेसला जागा आहे काय? **महाडच्या तळ्यावर**— अस्पृश्यांचें रणकंदन होण्याचा प्रसंग आला, अशा वेळीं काँग्रेसभक्त मदतीला घेऊन येण्याऐवजीं विरोध करीत होते. अशा वृत्तीच्या लोकांकडून गांधीजी आपला कार्यक्रम बारा महिन्यांत पार पाडणार? ब्रि. पार्लमेंटला चकविण्याचें धोरण राखावयाचें होतें तर काँग्रेसच्या बाह्याला कांहीं न करण्याचा कार्यक्रम पण जास्त उपयोगी पडला असता आणि पाहा आम्ही हवे तर स्वस्थ बसतो; तुम्ही तुमच्या कटाला असा रोखठोक सवाल पार्लमेंटला टाकतां आला असता; परंतु गांधीजींनीं पार्लमेंटच्या पायांत खोडा टाकण्याच्याऐवजीं मांसकुदल, तोंडीसुधारक व हंगामी देशभक्त अशा आपल्या बाजारबुणग्या अनुयायांचें लोढणें कार्यक्रमाच्या दोरखंडांत बांधून आपल्या गळ्यांत मात्र अडकवून घेतलें.

स्वातंत्र्य लीगचे सभासद म्हणविणारे लोक मनापासून स्वातंत्र्याकरितां झटणारे आहेत असें आतां समजण्याचें कारण उरलेलें दिसत नाहीं; स्वातंत्र्यापेक्षां त्यांना स्वतःचें वजन टिकवण्याची जास्त काळजी पडलेली दिसते. याशिवाय काँग्रेसवाल्यांचे नवे सहकारी मवाळ यांना फक्त देशापुढें कोणत्या तरी निमित्तानें एकदां चमकून जावयाचें आहे, उद्या गांधींनी अस्सल कार्यक्रम आंखण्यास सुरुवात केली तर पहिल्या प्रथम मवाळ वाटा काढूं लागतील. मुसलमानांनीं तर उघड उघड काँग्रेस विरुद्ध बंड पुकारलें आहे. राहता राहिले हिंदु काँग्रेसवाले. त्यांतहि अनेक फाटाफुटी. अशी आवड्यांची मोट बांधून एक वर्षाची नोटीस देण्यास पुन्हां गांधींनीं धजवावें यांवरून गांधीजी आपलें राहिलेंसाहिलें शिल्लक वजन या प्रयोगांत खर्च करून टाकणार असें दिसतें. आजपर्यंत मुसलमान गांधींकडे निराळ्या दृष्टीनें पाहात होते. निदान इतर हिंदूंपेक्षां गांधींकडे पाहण्याची मुसलमानांची दृष्टि निराळी होती. सध्याच्या परिस्थितींत म. गांधींना मुसलमानांनाहि आवरून धरतां येणें शक्य दिसत नाहीं. उलट मुसलमान गांधींनाच मोठ्या प्रमाणावर निषेधूं लागतील. शिखांनींहि आपला सवता सुभा तोडण्याचा निश्चय केला आहे; ब्राह्मणेतरांनी तर पहिल्यापासून हें पुढलें भविष्य ओळखून आपल्याला या गोंधळापासून अलिप्त ठेवलें आहे. अशा परिस्थितींत पुन्हां २० सालचे गांधी आणि २९ सालचे गांधी यांत केवढें अंतर पडलें आहे याची कल्पना गांधींना नसेल? गांधींच्या प्रत्यक्ष मुलापासून तो अगदी कम्युनिष्टापर्यंत एकजात सर्व लोक गांधींच्या ह्या बारा महिन्याच्या स्वराज्यावर विश्वास ठेवण्यास तयार होणार नाहींत गांधींनीं एक बासरूं मारताच त्यांच्या महात्मा पदावर दरवडा घालणारे जुन्या मतांचे वर्णिये गांधींना पूर्वीप्रमाणें पेशाचा पुरवठा करतीलच हें आज सांगता यावयाचें नाहीं. म. गांधींना असें वाटलें असेल कीं, डॉ. बेझंट, सप्रू किंवा मोतीलाल, मालवीय यांच्या आधारावर सबंध देश दणाणून सोडूं; पण फार तर यामुळें वर्तमानपत्रांचे कॉलम दणाणून सोडले जातील, मुळांत मात्र कांहींच नसावयाचे. याशिवाय काँग्रेस मनोवृत्तीचा दुसरा एक तऱ्हेवाईक मासला एका ठरावांत दिसून येत आहे,

सायमन कमिशनशीं सहकार करणारावर सामाजिक बहिष्कार घालण्याचा मूर्खपणाचा ठराव आज पास केला आहे, काँग्रेसचे ठराव लिहितांना किंवा पास करतांना किती विचार केला जातो किंवा जबाबदारीकडे किती लक्ष पुरविलें जातें याचा पडताळा पाहण्यास आणि काँग्रेसच्या शहाण्या पुढाऱ्यांची मुत्सद्देगिरी ठरविण्यास हा एवढा एकच पुरावा पुरा आहे. सायमन कमिशनशीं सहकार्य करणाराकर सामाजिक बहिष्कार घालण्याची काँग्रेसला जरुरीच नाही; तें काम ब्राह्मणी धर्मानेंच केलें आहे. ब्राह्मणेतर, अस्पृश्य, मुसलमान वगैरे वर्गांवर धर्माच्या नांवाखालीं वरच्या वर्गानें बहिष्कार टाकला म्हणूनच तर त्यांनीं सहकार्य केलें आहे. म्हणजे सहकारवाद्यांना बहिष्कारीही बनवायचें असेल तर धार्मिक, सामाजिक बंधनें एकाच तडाख्याला तोडणें हा उपाय होता ? उलट सहकार्य केलें म्हणून बहिष्कार म्हणजे रामभटानें शामरावांना जखम केली, आणि ती जखम बरी होण्यासाठीं शामरावांना मलम लावलें म्हणून शामरावावर बहिष्कार घातला पाहिजे म्हणणारी भंगड वृत्ति आणि सहकारवाद्यावर बहिष्कार घाला म्हणणारी वृत्ति एकाच दांपत्याचीं अपत्यें आहेत. शिवाय वर्षाचा म्हणून जो कार्यक्रम आंखला आहे त्यांत अस्पृश्योद्धार हे एक कलम आहे, अस्पृश्यांशीं सहकार्य केलेलें आहे. अर्थात् या सहकार्याच्या सबबीवर पुन्हां अस्पृश्यांवर सामाजिक बहिष्कार पुकारून अस्पृश्यता निवारण्याच्या तडाख्यातून मोकळे, अशी पळवाट ठेवण्याकरितांच हा सामाजिक बहिष्काराचा ठराव केलेला दिसतो. काँग्रेसनें हा जो जाणूनबुजून विसंगतपणा पत्करला आहे, त्यावरून काँग्रेस ही कांहीं भांडवलवाल्यांची आणि भिक्षुकी मनोवृत्तीच्या लोकांची असावी किंवा मूर्खांची असावी. असे दोनच तर्क निघूं शकतात. असले काँग्रेसचे ठराव आणि तिचा कार्यक्रम सर्व ब्राह्मणेतरांनीं झुगारून देण्यापेक्षां त्याला दुसरा उपायच नाहीं. त्यांतून कांहीं चांगलीं कलमं असतील पण न कवादांचीं गोरक्षणावरतीं व्याख्यानें समजावीत असल्या हुलईत प्रवाहपतित होऊन कोणीही वाहत जाऊं नये अशी आमची सूचना आहे.

◇◇◇

कामगारांचें अन्न खाऊन त्यांवरच भट उलटले

[कैवारी : १९ जानेवारी १९२९]

कम्युनिष्ट भटजींचा तोल सुटला जाऊन आपली ब्राह्मणशाही दाखवण्यास त्यांनीं आतां बेतालपणें सुरुवात केली आहे. मंगळवारीं नागु सयाजीच्या वाडींत जी जंगी सभा भरली त्या सभेंत काय प्रकार घडला त्याच्या उलट नवाकाळांत खोटी बातमी देणाऱ्या

भटभिक्षुकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, असले डाव करून ते आपलें ब्राह्मण्य मात्र दाखवीत आहेत. श्री. आळवे व श्री. कासले हे जे शब्द बोललेच नाहीत असले शब्द अचुक नवाकाळच्या रिपोर्टींत. ब्राह्मणांचा खोटें बोलणें हा तर धर्मच आहे; नागु सयाजींच्या वाडींत भरलेल्या सभेचा खोटा रिपोर्ट नवाकाळानें छापला यांत आम्हांला मुळींच आश्चर्य वाटत नाहीं! ब्राह्मणी पत्रें जर खरें लिहूं लागलीं, ब्राह्मणी पत्रें जर सत्य धर्मानें चालूं लागलीं, ब्राह्मणी पत्रें इमानानें रिपोर्ट छापूं लागलीं तर हिंदू समाजामध्यें एकी व्हावयाला मुळींच वेळ लागणार नाहीं; देशाचें कल्याण व्हावयाला मुळींच वेळ लागणार नाही. पण ब्राह्मण्य ही चीजच अशी आहे कीं ज्या ठिकाणीं जाईल त्या ठिकाणीं आपला गुण दाखविल्याशिवाय राहणार नाहीं. नागु सयाजीच्या वाडींत गेल्या मंगळवारीं जी सभा झाली त्या सभेचा बादांत खोटा रिपोर्ट नवकाळनें छापून आपली जात ब्राह्मण असल्याचें सप्रमाण सिद्ध केलें आहे. श्री. आळवे आणि श्री. कासले यांनीं जे शब्द उच्चारले सुद्धां नाहींत ते शब्द ते बोलले असें नवकाळ छापतो आहे. शिवाय सभेंत जो शेवटपर्यंत वृत्तांत घडला त्याची खरी हकीकत सर्वस्वी लपवून ठेवून वाटेल त्या खोट्या बातम्या छापल्या आहेत. त्यांत लबाडीचा मासला म्हणजे नवाकाळांत सभेचें हँडबील छापलें आहे. आजपर्यंत एवढ्या सभा झाल्या पण त्यांचीं हँडबिलें कधीं कोणत्याहि पत्रानें छापलीं नाहींत आणि नवाकाळनेंहि छापलीं नाहींत. पण श्री. आळवे यांच्याकडून हँडबिलावर म्हणून सही मागून त्याच हँडबिलाला स्टेटमेंट ठरविण्याचा जो ब्राह्मणांनीं पाजीपणाचा प्रयत्न केला तो श्री. आळवे यांना तेव्हांच समजला आणि हे भटजी हलकटपणाची कमाल कोठवर करतात याची पारख करण्यास त्यांनीं सुरुवात केली. ह्या दोन-तीन फुकटखाऊ भटजींना असें वाटतें कीं, आपण लफंगेगिरी करून ब्राह्मणेतरांना फसवूं पण फसविण्याचे दिवस संपले हें त्यांना आत्तांच कळून येऊं लागलें आहे; एका कम्युनिष्ट भटानें सभेंत सांगितलें कीं तो चांभाराच्या घरीं जेवायला तयार आहे. म्हणजे मोठ्याच पुरुषार्थाची गोष्ट सांगितली. हॉटेलांतून कोण्याच्याही कपबश्या विसळतां विसळतां ज्याच्या कंबरेचा काटा ढिला व्हावयाचा त्याला चांभाराकडे तरी जेवायला मिळालें तरी तो ते कां सोडील? आणि चांभार काय हलका आहे म्हणून त्यांच्याकडे जेवणें हा मोठा पराक्रम समजला जावा. उलट चांभार ब्राह्मणापेक्षां श्रेष्ठ आहेत. ह्या कम्युनिष्ट भटानें चांभाराकडे जेवून दाखवा असें आम्हांला आव्हान दिलें आहे. भटच तो? जेवणापलिकडे त्याला दुसरा विषय तरी कसा सुचणार? खाण्यापलिकडे दुसरे त्यांच्या डोक्यांत तरी काय येणार? लाडु-जिलब्याचे हरामाचे ढीग पोटांत रिचवणाऱ्या भटा-भिक्षुकांच्या तोंडून जेवणापलिकडे दुसऱ्या कोणत्या गोष्टी निघावयाच्या? भटाचे पोर म्हणजे जन्मल्यापासून तें मरेपर्यंत 'जेवण जेवण जेवण' याचाच जप करीत बसायचें. मग तो कम्युनिष्ट म्हणवून घेऊ लागला, तरी त्याची खादाड इच्छा कशी नष्ट व्हावयाची? असल्या क्षुल्लक भटुड्यांच्या आव्हानाला उत्तर देण्याची वास्तविक जरूरच नाहीं पण त्याला आम्ही हें बजावून ठेवतों

कीं असलीं आव्हानें आम्हांला देण्याच्या भानगडींत पडूं नकोस. जगांतल्या कोणत्याहि मनुष्याच्या हातचें अन्न आम्हाला चालतें आणि तें आजच नसून जेव्हां परमेश्वरानं आम्हांला सारासार विचार करण्याची बुद्धि दिली तेव्हांपासून चालतें आहे.

ना. जाधवराव यांनीं श्री. आळवे आणि कासले यांना जेवायला बोलावलें याबद्दल या भटजी महाराजांचा मोठा तिळपापड उडाला आहे. कारण इतकी उत्तम जेवणाची संधि आणि भटाला आमंत्रण नाहीं. जेवण म्हटलें कीं भट प्रेत होऊन पडला असला तरी ताटकन उठेल. एकदा पेशवाईत एक भट आजारी पडला होता, मोठा खादाड भटजी होता, पाटीभर भात, दहा डझन लाडू, आणि कढीच्या दोन पांच चरव्या हबकल्याशिवाय कधीं तो जागचा हालत नसे. असला खादाड भटजी अगदीं खूपच आजारी झाला होता. औषधोपचारानें कांहीं बरा होईना. औषधाच्या गोळ्या खाण्याऐवजी तो लाडूच मागत असे. त्यामुळें त्याचा आजार वाढत चालला. अखेर एका चाणाक्ष माणसानें, त्या आजारी भटाच्या कानांत जाऊन सांगितलें कीं आज तुम्हांला श्रीमंतांचें सहस्र भोजनाचें आमंत्रण आहे. त्याबरोबर तो आजारी भट ताडकन् उठला आणि सोवळें भांडें घेऊन कुत्र्यासारखा पळत सुटला.

सापाच्या तोंडावर पाय पडला म्हणजे जसा साप खवळतो तसें भटाला जेवणाचें आमंत्रण चुकलें म्हणजे संताप चढतो. ना. जाधवरावांनीं श्री. आळवे आणि श्री. कासले यांनाच बोलावावें आणि भटजींना बोलवूं नये याबद्दल भटांना का बरे राग येणार नाहीं? आलाच पाहिजे. भटाचें खाण्यावर किती प्रेम असतें याचा विचार केला तर त्यांचा राग सकारण असेंच म्हटलें पाहिजे. सगळे गिरण्यांचे मालक या भटांना जेवायला बोलावतात, तेव्हां इकडे गिरणी कामगार संकटांत जरी सापडलेले असले तरी हीं भटें जाऊन जेवत बसतात. मग अशा भोजनप्रिय भट-भिक्षुकांचा जेवणासाठीं तडफडाट झाला तर त्यांत काय चूक? गेल्या बुधवारीं युनियनची मॅनेजिंग कमिटीची मिटींग (सभा) भरली होती. त्या सभेत भटांनीं पुन्हां जात दाखवलीच. गेल्या बुधवारीं कैवारीचा स्पेशल अंक निघाला होता; युनियनचे साठ हजार सभासद ब्राह्मणांनीं केले हा जो डेलीमेलमध्यें मजकूर आला त्याला त्या जादा कैवारींत उत्तर दिलें होतें. खाई त्याला खवखवे? कैवारीनें डेलीमेल पत्रांतल्या पत्राविरुद्ध टीका केली म्हणून ब्राह्मणांना मोठा संताप चढला. कारण डेलीमेल पत्र गिरणीवाल्या पेटीटचें, गिरणीवाल्या पेटीटच्या पत्राविरुद्ध कैवारीनें लिहिलें म्हणून कैवारीचा अंक जाळून टाका असा एका भटानें ठराव आणला. त्यावरूनच ब्राह्मणांचा एकंदर काय डाव आहे तो कामगारांनीं ओळखावा. त्याच्या ठरावाला त्याच जागी ब्राह्मणेतर सभासदांनीं विरोध करून ब्राह्मणांचीं नाकें ठेचलीं, आणि ब्राह्मणेतर म्हणजे बोळयानें दूध पिणारे नव्हेत हे सिद्ध करून दाखविले.

कामगारांत गुजराथी भाषा बोलणारे कोणीहि नाहींत, पण गिरणीवाल्यांत सगळेच गुजराथी बोलणारे आहेत. तेव्हां कामगारांना नकळत गिरणीमालकांना कोणत्या गोष्टी कळवायच्या असल्या तर त्याला ब्राह्मणांनीं एक युक्ति शोधून ठेवली आहे. ती युक्ति

म्हणजे अशी कीं गुजराथी पत्रांतून लेख लिहायचे म्हणजे ते लेख गिरणीवाले वाचतील, पण तेच लेख मराठींत छापले तर कामगार चिडतील म्हणून या भिक्षुकांनी गुजराथींत वाटेल ते खरडायला सुरुवात केली आहे. येथें निघणाऱ्या एका गुजराथी दैनिकांत आळवे व कासले यांचें एक स्टेटमेंट लवकरच निघणार आहे अशी एकानें खोटीच बातमी छापली तर एका भटानें रा. जवळकर यांच्याकडे कामगारांनीं एक अर्ज केला आहे यावर वाटेल तें भारुड लिहिलें आहे. काय लिहिण्याची छाती असेल तर कामगाराच्या भाषेंत लिही! असा गुजराथींत लिहून बाईलपणा कां दाखवितां? कामगारांना आम्ही बजावून सांगतों आहोंत कीं तुमच्यापुढें गोंडा घोळणारीं हीं भटें तुम्हांला फसवीत आहेत. नवरा मरो नाहींतर नवरी मरो, भटाला फक्त दक्षिणा हवी असते. त्याप्रमाणें कामगारांचें कांहीं होवो ह्या भटभिक्षुकांची चैन कशी चालेल एवढीच त्यांना काळजी आहे. आंतून केसरी, नवकाळ वगैरे सगळीं ब्राह्मणी पत्रें, सगळे ब्राह्मण पुढारी, पुन्हां ब्राह्मणेतरांवर कुरघोडी करण्याकरितां एके ठिकाणीं होऊन कांहीं भाडोत्री ब्राह्मण जमा करून कामगार चळवळीचा नाश करण्याकरितां टपले आहेत हें आम्ही सप्रमाण सिद्ध करून देण्यास तयार आहोंत. ब्राह्मणांचा एक जन्मगुण असा आहे कीं, त्यांना नेहमी ब्राह्मणेतरांवर चरायला हवें असतें. स्वतः चरत असताच आणखी आपले ब्राह्मण जातभाई बोलावून मारे पक्का बंदोबस्त केला जातो. युनियन गिरणीकामगारांची, पण तिथें सर्व हिशेब ठेवणारे कारकून भटेंच! प्रत्येक सेंटरला एक भट आहे! म्हणजे चोहोकडे ब्राह्मण भरून ठेवला आहे. एकदोन ब्राह्मणेतर कारकून आहेत पण त्यांना काढण्याचा केवढा प्रयत्न! कारण ब्राह्मणेतर कारकून त्यांच्या ब्राह्मणी कटांत कधींच सामील व्हावयाचा नाहीं. कम्युनिझमचें सोंग घेऊन जमलेलीं हीं सारीं भटें ब्राह्मणेतरांचे बहुजन समाजाचे शत्रू आहेत याबद्दल आतां तिळमात्र संदेह उरला नाहीं. गेल्या मॅनेजिंग कमेटींत जेव्हां कैवारीचा अंक जाळा असा भटजीनें ठराव आणला त्याच दिवशीं ह्या भटांचें अंतःकरण उघडें पडलें. यांना ब्राह्मणी राज्य पाहिजे. कामगारांचें, ब्राह्मणेतरांचें, बहुजन समाजाचें राज्य नको आहे. कामगार राज्याच्या थापा मारून ब्राह्मणी राज्य स्थापण्याची यांची लबाडी कामगारांना संपूर्ण कळते. मॅनेजिंग कमेटींत "नवाकाळ"चा अंक जाळा असा जेव्हां ठराव आणला तेव्हां हे कम्युनिष्ट जर ब्राह्मण नव्हते, यांना जर ब्राह्मण जातीचा अभिमान नव्हता, हें जर ब्राह्मणी पत्राकडून आंतून मिंधे नसते तर नवाकाळ पत्र जाळण्यास तयार झाले असते. इतकेंच नव्हे तर डेली मेल पत्राचा गेल्या सोमवारीं प्रसिद्ध झालेला अंकसुद्धां हीं ब्राह्मणें कधीं जाळणार नाहींत; डेली मेलचा पेटीट, ज्यांची मर्जी संभाळण्याकरितां ब्राह्मणांनीं खटपट चालविली आहे ते पेटीटला नाखूष कसे करतील? सोमवारच्या डेली मेलमध्यें ६० हजार सभासद ब्राह्मणांनीं केले हा खोटा रिपोर्ट कोणीतरी ब्राह्मणांनीं लिहून छापला याला मोठा पुरावा म्हणजे गेल्या आठ दिवसांत त्या डेली मेल पत्राविषयीं एकहि भट तोंडांतून "ब्र"सुद्धा काढीत नाहीं; कारण डेली मेल गिरणीवाल्याचा. त्यांत

लिहिणारे ब्राह्मण आणि तोच अंक जाळतील किंवा त्याच्याविरुद्ध बोलतील तर गिरणीवाले या ब्राह्मणांच्या इतर भानगडी बाहेर फोडतील. असलें हें लफडें आहे! मांजर डोळे झाकून दूध पितें तेव्हां त्याला आपल्याला कोणी पहात नाहीं असें वाटतें, त्याप्रमाणें या भटांनाहि मांजरासारखें वाटूं लागलें आहे.

आम्ही या भटजींना आव्हान देतों कीं सोमवार ता. १४ चा डेली मेल ज्यांत ब्राह्मणांनी साठ हजार सभासद केले असा खोटा रिपोर्ट छापला आहे, तो अंक जाहीर सभेंत जाळून दाखवा. ब्राह्मण तो अंक कधींच जाळायला तयार होणार नाहींत. गेल्या सबंध आठवड्यांत त्या पत्राविषयी कोणी भटानें एकहि शब्द उच्चारला नाहीं. डेली मेलनें धडधडीत खोटें छापलें असतां हीं भटें गप्प बसतात यांतली मख्खी आता साऱ्या जगाला समजली आहे.

डेली मेलमध्येंच असें ब्राह्मणी पत्र यावें, कम्युनिष्ट भटांनीं त्याबद्दल एक शब्दहि बोलूं नये. या सर्व गोष्टींचा मेळ बसविला तर कोणीहि असें सांगेल कीं ब्राह्मण व गिरणीवाले यांचा हा कट आहे तर त्यांत काय चूक? यांचा कट नसेल तर तोंच सोमवारचा डेली मेलचा अंक ब्राह्मणांनीं जाळून दाखवावा? पण भटांचीं छातीच नाहीं, ते डेली मेलचे मिंधे असले पाहिजेत. गिरणी मालकांचे मिंधे असले पाहिजेत. ज्या पत्रांत दीड लाख कामगारांचा उपमर्द केलेलें पत्र छापलें गेलें; ज्या डेली मेली पत्रांत आजपर्यंत ज्या ब्राह्मणेतरांनीं परिश्रम केले त्यांचें श्रेय हिरावणारें पत्र छापलें गेलें, ज्या डेली मेल पत्रांत कामगारांना दुखविणारें पत्र छापलें गेलें, ज्या डेली मेल पत्रांत ब्राह्मणांनींच साठ हजार सभासद केले, असलें डांबिसपणाचें विधान केलें तें पत्र युनियनमधलीं भटें उराशीं धरून बसलींत. यावरून हीं युनियनमधलीं भटें कामगारांचे वैरी आहेत, कामगारांचे दुष्मन आहेत, कामगारांना फसवीत आहेत. ब्राह्मणी गुलामगिरी लादू पहात आहेत हें सिद्ध होतें. आणि या भटांच्या पाठीमागें गिरणीवाले आहेत हेंहि सिद्ध होत आहे; ब्राह्मणेतरांचा कैवारी यांना नको, गिरणीवाल्या पेटीटचा डेली मेल पाहिजे. कारण कैवारी शेतकऱ्यांचा, कैवारी बहुजन समाजाचा, कैवारीनें मागासलेला वर्ग जागा होईल, कैवारीनें कामगार खरें कामगारांचें राज्य करतील, कैवारीमुळें श्री. आळवे, कासले, ताम्हणेकर वगैरे ब्राह्मणेतरच पुढारी होतील. असला कैवारी ब्राह्मणांना कसा पसंत पडेल? त्यांना जर लोकांचें कल्याण करावयाचें असतें तर त्यांनाहि कैवारी पाहिजे होता; पण त्यांना डेली मेल पाहिजे, डेली मेलमध्ये ब्राह्मणांची बाजू सांभाळणारीं खोटीं पत्रें छापतां येतात, डेली मेलमध्यें कामगारांच्या विरुद्ध लिहिता येतें, मग असल्या डेली मेलविषयीं एकहि विरुद्ध शब्द भटाच्या तोंडून निघत नाहीं याची गोम काय असावी?

डेली मेलमध्यें कामगारांचा अपमान करणारें पत्र कम्युनिष्ट ब्राह्मणानें लिहिलें आहे हें ह्यावरून सिद्ध होत आहे. ते पत्र लिहून त्यानें गिरणीच्या मालकांशीं आंतून कांहींतरी ठरविलें आहे हेंहि उघड आहे. कामगारांनो, डोळे झांकून बसूं नका! ब्राह्मणभाई पैशाकरितां काय करील याचा नेम नाहीं. श्री. आळवे आणि कासले यांनीं पुढाकार घेऊन डेली मेलमधल्या पत्राबद्दल ब्राह्मणांना जाब विचारला पाहिजे. प्रत्येक

ब्राह्मणेतरानें, कामगारानें या भटजींना जाब विचारला पाहिजे, एका कामगार पुढाऱ्यानें तर असे उद्‌गार काढले आहेत कीं, ज्या भटानें डेली मेलमध्यें कामगारांचा अपमान करणारें पत्र लिहिलें त्याला पुढें खेचल्याशिवाय आम्ही राहणार नाहीं.

डेली मेलमधलें पत्राचें नांव काढलें कीं भट नाक कापल्याप्रमाणें तोंड करून उभा राहील. कारण आंतून गिरणीवाल्याशीं या ब्राह्मणांचा संबंध असला पाहिजे हें उघड होत आहे. बुधवारच्या मॅनेजिंग कमेटींत " ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद कामगार चळवळींत नको असा ठराव पास करण्यांत आला. " वास्तविक हीं कम्युनिष्ट म्हणविणारीं भटें जर स्वतःला ब्राह्मण समजत नाहींत तर मग त्यांना एवढी ब्राह्मणेतर चळवळीची भीति कां वाटते ? कामगारांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद नको असें तर आम्ही पहिल्यापासून म्हणत आहोंत; पण कासल्यांचा फोटो छापला, झाला ब्राह्मणांचा तर चडफडाट, आळव्यांचें चरित्र छापलें झाले ब्राह्मण घाबरे ! तेव्हां ब्राह्मणांना जी ही घास्ती वाटते ते ब्राह्मण तरी किती ? तर दीड लाखांत दीड दोन ? एखाद्या मोठ्या राजवाड्यात जसा एखादा दीडदमडीचा झाडू पडलेला असतो तसे हे ब्राह्मण दीड लाख कामगारांच्या राजवाड्यांत कोठे तरी झाडूसारखे पडलेले. कामगारांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद होणें शक्य नाहीं. कारण सर्व कामगार ब्राह्मणेतरच आहे. दहा-पांच भटांकरितां एवढी कोण तकलीफ घ्यावयास तयार आहे ? ब्राह्मणेतर कामगारांनी ब्राह्मणावर अजूनही विश्वास ठेवूं नका ? तुम्ही शेतकऱ्याचे कामकरी बनलांत, याचाच जरी इतिहास लक्षांत आणला तरी ब्राह्मणी हृदयाची पारख होईल. प्रत्येक कामकऱ्याच्या हृदयांतली खूणगाठ विचारा ! आपल्या मूळच्या गांवीं आपल्या पूर्वजांना किंवा आपल्यालाच फसवून भटजी-शेटजींनी आपल्या जमिनी घेतल्या म्हणूनच आपल्याला गांव सोडून येथें यावें लागलें आहे. आपल्या पूर्वजांच्या जागेवर बसून मिळणारी हक्काची मीठभाकर भटजी-शेटजींच्या कारस्थानामुळें आपल्या हातची जाऊन आपणा सर्वांस मुंबईस येऊन मजूर बनावें लागलें आहे. आणि येथेंहि जर आपण भटजी-शेटजींच्या नादीं लागलों आणि त्यांच्या जाळ्यांत फसलों तर आपल्या मुलाबाळांचें आपण नुकसान करीत आहोत हा आपल्यावर दोष येईल. भटजी हा बहुरूपी असतो, तो जेव्हां आपल्याला फसवायला येतो तेव्हां तो आपल्या हितकर्त्याचें सोंग घेत असतो; पण केव्हां आपल्यावर डाव टाकील याचा नेम नसतो. डेली मेल पत्रांतील मजकूर आणि भटजीचें वर्तन याचा मेळ बसविला म्हणजे तेच भटजी आंतून एक झाले आहेत हें आपोआप सिद्ध होतें. कोणी म्हणेल अहो या भटांच्या पोरांनीं कांहीं काम केलें आहे ? असें विचारणाऱ्यांना आम्ही विचारतों कीं यांनीं, ह्या भटांच्या पोरांनीं निव्वळ चैन करण्यापेक्षां काय दुसरें काम केलें आहे ? संप यशस्वी केला श्री. आळवे, कासले वगैरे सर्व ब्राह्मणेतरांनीं. दंग्यांत मेले ब्राह्मणेतर, कष्ट केले ब्राह्मणेतरांनीं. भटांनी कामगारांच्या पैशावर मोटारी उडवून सभेंत लंब्या-चवड्या गप्पा ठोकण्याशिवाय दुसरें काय केलें आहे ? ज्या भटांना अंगाला धड कपडा मिळत नव्हता, ज्या भटांना खाणावळीचीं बिलें भरतां येत नव्हतीं, ज्या भटांना कोणी तीन दिवसाच्या उधारीनें विचारीत नव्हतें.

त्याच भटुडर्यांना श्री. आळवे-कासले यांनीं अन्नाला लावलें; पण अन्न खाऊन उलटणें ह्या भिक्षुकशाहीचा गुणधर्म आहे. आज तेच भट, कामगारांचें खाऊन कामगारावर उलटले आहेत. गिरणीवाल्या पेटीटच्या पत्रांत वाटेल तें खोटें खरडीत आहेत आणि कैवारी त्यांचीं पापें बाहेर काढूं लागला म्हणून कैवारीवर एकजात सारीं भटें जळफळत आहेत.

◇◇◇

या असे मैदानांत

[कैवारी : १९ जानेवारी १९२९]

ब्राह्मणेतर चळवळीला नामशेष करण्याकरितां ब्राह्मणांचे प्रयत्न फार जोरांत चालले आहेत. पहिल्या प्रथम ब्राह्मणांनीं जो हल्ला केला तो अगदींच मूर्खपणाचाच होता, ब्राह्मणेतर चळवळ ही चळवळच नव्हे असें ब्राह्मणांनीं म्हणावयास सुरुवात केली होती. पण त्यांचा तो प्रयत्न फसला. नंतर ही सरकारची उठावणी आहे अशी हूल उठवायला सुरुवात केली, पण त्यांतहि ब्राह्मण तोंडघशी पडले; नंतर ब्राह्मणेतर चळवळ ही अत्याचारी चळवळ आहे असा पुकारा करण्यास सुरुवात केली, पण त्यांतहि ब्राह्मण चांरी मुंडे चीत झाले. यानंतर १९२५ साली जेव्हां पुण्यास म. फुले यांच्या पुतळ्याचा ठराव आला त्या वेळेस तर अत्यंत धुमाकूळ माजला. सर्व ब्राह्मण, **जहाल, मवाळ,** टवाळ, गबाळ एक होऊन सरकारचे उंबरठे झिजवूं लागले, ब्राह्मण मग तो जहाल असो, मवाळ असो, बहुनिष्ठ असो, कम्युनिष्ट असो, भोपटकरासारखा भोजनपुष्ट असो किंवा नसोंपतासारखा क्रियानिष्ठ असो. वरून वाटेल ती सोंगे घेतील पण आंतून ब्राह्मणेतरांच्या उन्नतीचा प्रश्न आला, बहुजन समाजाचा प्रश्न आला कीं सारे नष्ट-पुष्ट-भ्रष्ट-ब्राह्मण एके ठिकाणीं होऊन ब्राह्मणेतर चळवळीला विरोध करूं लागतात हा ब्राह्मणेतरांचा नित्यानुभव आहे. ब्राह्मणेतर चळवळीनें सबंध महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत आणि मद्रास व्यापून टाकल्यामुळें ब्राह्मणांना आतां कांहीं तरी नवीं नवीं सोंगें काढून आपलें ब्राह्मण्य जगविणें भाग पडलें आहे. पहिल्या प्रथम ब्राह्मणांनीं

हिंदु महासभा या नांवाचे ब्राह्मणी कोर्लात काढून ब्राह्मणेतर चळवळीवर शस्त्र उपसण्यास सुरुवात केली. ब्राह्मणेतर चळवळ दडपून टाकून पुन्हां ब्राह्मणशाही माजविण्याकरितां सर्व ब्राह्मण हिंदु-महासभेचा उपयोग करून घेऊं लागले. परंतु थोड्याच दिवसांत त्यांचें तें हिंदु महासभेचें शस्त्र बोथट होऊन गेलें. ब्राह्मणेतर चळवळीपुढें हिंदुमहासभेचें

तेजच पडेना. शेवटीं निकराचा उपाय म्हणून **कम्युनिष्ट**–हें नवीन सोंग ब्राह्मणांनीं घेतलें आहे. पण ब्राह्मणांनीं हें लक्षांत ठेवावें कीं ब्राह्मणेतरांनाच कम्युनिझमची जरूरी आहे. ब्राह्मणांनीं सोंगाकरितां जरी कम्युनिझमचा स्वीकार केला तरी शेवटीं त्यांना सोंगासाठींच सर्व ब्राह्मण्य बळी द्यावें लागेल. रशियांत जेव्हां झारशाहीच्या विरुद्ध बंड पुकारलें गेलें तेव्हां तेथें भिक्षुकशाहीच्या विरुद्धहि बंड पुकारलें गेलें होतें. पण येथले कम्युनिष्ट स्वतः भिक्षुक असून भिक्षुकांचे वर्चस्व स्थापन व्हावें म्हणून तर झटत आहेत. तेव्हां यांना भिक्षुकशाहीला जगवायचें आहे, ब्राह्मणेतर चळवळ भिक्षुकशाहीला खणून काढील ह्या भीतीमुळें हे कम्युनिष्ट म्हणविणारे ब्राह्मण खरा हा ब्राह्मणेतर चळवळीच्या विरुद्ध जाऊन राहिली आहेत. कम्युनिष्ट ब्राह्मणांचे असें म्हणणें आहे कीं त्यांना आधीं ब्राह्मण म्हणूं नये. आम्ही त्यांना असें विचारतों कीं अस्पृश्यांना बरोबर घेऊन कुठल्याहि एखाद्या ब्राह्मणाच्या देवळांत जाऊन दाखवा म्हणजे आम्ही तुम्हांला कांहींतरी माणसाळलांत असें म्हणायला तयार होऊं. नुसते अस्पृश्याकडे जेवायला तयार व्हाल हें आम्हांला माहीत आहे. अस्पृश्यांना बरोबर घेऊन एखाद्या खास ब्राह्मणाच्या देवळांत शिरा. ब्राह्मण देवळांत शिरून देत नसतील तर अस्पृश्यांकरितां मरायला तयार व्हा. अस्पृश्यांबरोबर नुसते जेवूनच भागणार नाहीं. खरे कम्युनिष्ट असतात ते भिक्षुकशाहीच्या विरुद्ध असतात. पण हे कम्युनिष्ट म्हणविणारे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीला विरोध करून भिक्षुकशाहीचे भय माजवीत आहेत. म्हणजे ब्राह्मण कशांतहि पडला, मग तो कम्युनिझममध्यें पडो तो आपली तेथें ब्राह्मण जात शाबीत केल्याशिवाय राहणार नाहीं. **महाडच्या तळ्यावर** जेव्हां अस्पृश्यांना शिवूं न देण्याबद्दल साऱ्या ब्राह्मणांनी चंग बांधला तेव्हां चांभाराच्या घरीं जेवणाकरतां हपापलेले भिक्षुक कोठें दडले होते ? नुसत्या थापांवर कामगारांना फसविण्याचे दिवस संपले आणि ब्राह्मणेतर चळवळीला, बहुजनसमाजाच्या उन्नतीला दडपून टाकण्याचा ब्राह्मणांचा जो प्रयत्न चालला आहे त्यांत त्यांना खात्रीनें अपयशच येणार. कारण ब्राह्मणेतर पक्ष ज्या बाजूला त्या बाजूला सत्य आहे आणि ब्राह्मणांच्या बाजूला ढोंग आहे. ढोंग्यांचा कधींच विजय होत नसतो.

◇◇◇

मराठा परिषदेची आवश्यकता

[कैवारी : २६ जानेवारी १९२९]

उद्यां ता. २७ रोजीं पाडळी (सातारा) येथें सातारा जिल्हा मराठा परिषदेचें अधिवेशन आमचे सहकारी मित्र श्री. केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार

आहे. ह्या परिषदेसंबंधीं गैरसमज पसरविण्याचा कांहीं धूर्त ब्राह्मण हस्तकांनीं प्रयत्न चालविला असून गेल्या आठवड्यांत जी सातारा जिल्हा ब्राह्मणेतर परिषद झाली, तींत कांहीं लोकांच्या उद्गारावरून स्पष्ट होत आहे; कांहीं अल्पसंख्य जातींना वाटेल तसलें ब्राह्मणीकृत्य करूं द्यावें. मराठा समाजासारखा बहुजन समाज तेजोहीन करावा आणि सर्व ब्राह्मणेतर पक्षानें सहन करावें अशी अल्पसंख्य जातीच्या स्वार्थी पुढाऱ्यांची इच्छा दिसते. असले स्वार्थी लोक कांगावा करूं लागले म्हणजे ज्यांना फक्त आपली लोकप्रियता टिकवायची आहे किंवा निव्वळ आपला एखादा आत्यंतिक हेतु साधावयाचा असले मराठे सुद्धां स्वार्थी पुढाऱ्यांच्या हाताखाली बाहुली बनून मराठ्यांना दोष देण्याचा आविर्भाव आणीत असतात; ब्राह्मणेतर पक्षाचीं तत्त्वें आणि सत्यशोधक चळवळीचें मर्म ज्यांना कळलें नाहीं अशा लोकांच्या किंवा सत्यशोधकत्वाचें जें नुसतें ढोंग माजवतात अशा लोकांना मराठा परिषदेची आवश्यकता भासणार नाहीं. ज्यांना सर्वांकडून चांगलें म्हणवून घेण्याचें व्यसन लागतें तीं माणसें फारच भयंकर ! कारण वाटेल त्या वेळीं ते सत्याचा अम्मल करण्यास धजतात. न्याय-अन्याय काय किंवा खरेखोटे काय याकडे जाणूनबुजून विस्मरणपूर्वक दुर्लक्ष करून विनाकारण चालत्या गाड्यास खीळ घालण्यास कारणीभूत होतात. मराठा परिषद भरविण्याची आवश्यकतासुद्धां याच कारणानें भासूं लागली. ब्राह्मणेतर समाजांतील सर्व जातींची सुधारणा व्हावी, सर्वांची उन्नति व्हावी व सर्वांना राजकीय हक्काचा उपयोग घेतां यावा एवढ्याकरितां ब्राह्मणेतर चळवळ अस्तित्वांत आली. ब्राह्मण समाज ब्राह्मणेतर समाजाला धार्मिक, सामाजिक गुलामगिरीखाली दडपून टाकू लागला म्हणून तर ब्राह्मणेतर चळवळ निघाली. ब्राह्मणी कित्ता कांहीं पांढरपेशा अल्पसंख्यांना ताळ्यावर आणण्याची खबरदारी ब्राह्मणेतर पक्षानेंच घेतली पाहिजे. पुण्यास "मराठेतर परिषद" नांवाचा फार्स ब्राह्मणांच्या चिथावणीने ज्या लोकांनी केला त्यांना यामागेच ब्राह्मणेतर पक्षानें जबाबदार धरावयास पाहिजे होतें. सदर कार्यभाग मराठेतरांच्या ब्राह्मणांपेक्षां मराठ्यांचें नुकसान करण्याकरतांच जमवून आणला होता, असें त्याच्या परिणामावरून कोणीही अनुमान काढील. मराठा परिषद हा बचाव आहे. कोणतीही जात किंवा समाज दुसरी जात अन्यायानें किंवा लबाडीनें छळूं लागली म्हणजे आपला बचाव करणार व मराठा परिषद जी भरणार आहे ती ह्याच बचावाकरतां. ब्राह्मणांच्या चिथावणीनें कांहीं पांढरपेशा ब्राह्मणेतर जाति मराठ्यांच्या वाजवी हक्कावर गदा आणीत आहेत, मराठ्यांना योग्य प्रमाणांत कसलेहि हक्क मिळूं नयेत म्हणून छळत आहेत. आंतून त्यांना सर्व ब्राह्मण मनोभावानें सहाय्य करीत आहेत. अशा प्रसंगीं मराठा समाजाच्या बचावाकरितां धावून जाणें हें ब्राह्मणेतर पक्षाचें कर्तव्य होतें. पण कर्तव्य कांहीं पक्षविद्रोही लोकांच्या कार्यास कोलाहलामुळें ब्राह्मणेतर पक्षाला वाचविताच येईना. परंतु हा पक्षविद्वेषी कोलाहल आणि कारस्थानें चांगल्या जागीं शिरून पुनः आज ब्राह्मणेतर पक्ष नव्या जोमानें टवटवीत होत आहे. ब्राह्मणेतर पक्षावर आलेलीं संकटें विसरून जूट उत्पन्न होण्याचीं चिन्हें दिसत आहेत हें गेल्या रविवारीं जी सातारा जिल्हा ब्राह्मणेतर परिषद

भरली तीवरून सिद्ध होत आहे. सातारा जिल्ह्यांत ना. जाधवरावांच्या विषयीं गैरसमज पसरविण्याचा मुख्य कारखाना जरी पुण्यास असला तरी त्यांचें कार्य मात्र सातारा जिल्ह्यांत चालत असे.

ब्राह्मणेतर पक्ष हाणून पाडायचा म्हणजे त्याचे प्रथम पुढारी हाणून पाडावयाचे हा धूर्तपणाचा ब्राह्मणी डाव जेव्हां रंगांत आला तेव्हां त्या डावाला कांहीं ब्राह्मणेतर फसणें शक्य होतें. पण त्याच सातारा जिल्ह्यांत ब्राह्मणेतर परिषदेनें उद्यां भरणाऱ्या मराठा परिषदेविषयीं आपली नापसंती न दाखवतां उलट मराठा परिषदेला उत्साहजनक होईल असाच ठराव पास केला. कोणत्याही जातीनें ब्राह्मणेतर पक्षाच्या तत्त्वास बाध न येतां आपली उन्नति करावी असा ब्राह्मणेतर परिषदेचा ठराव आहे. ब्राह्मणेतर पक्षाचीं तत्त्वें उद्याच्या मराठा परिषदेकडून कधींहि मोडलीं जाणार नाहींत याबद्दल कोणी शंकाहि घेण्याचें कारण नाहीं. श्री. जेधे अध्यक्ष आहेत, आणि श्री. बर्गे स्वागताध्यक्ष आहेत अशी स्थिति असतां जो कोणी ह्या मराठा परिषदेला ब्राह्मणेतर पक्ष विघातक ठरवील तो खास ब्राह्मण तरी असला पाहिजे किंवा ब्राह्मणाचा बगलबच्चा असला पाहिजे असें हमखास समजावें. उद्याची परिषद सर्व ब्राह्मणेतरांच्या उन्नतीस कारण होवो अशी इच्छा आम्ही प्रदर्शित करतों.

◊◊◊

स्वाभिमान चळवळीचें महत्त्व

[कैवारी : २३ फेब्रुवारी १९२९]

ब्राह्मणेतर चळवळ ही नुसती राजकीय स्वरूपाची चळवळ आहे. कोणत्याहि राजकीय चळवळीला जर धार्मिक चळवळीची बूज नसेल तर तिचें बस्तान नीट बसणें कठीण असतें ! महाराष्ट्रामध्यें ब्राह्मणेतर चळवळ हा धार्मिक स्वातंत्र्याकरितां झगडणाऱ्या सत्यशोधक चळवळीचा परिणाम आहे. मद्रासेंत ब्राह्मणेतर चळवळ अत्यंत व्यवस्थित व विस्तृत असूनहि तिला यापूर्वी स्वाभिमान (सत्यशोधक) चळवळींचा पाठिंबा नसल्यामुळें विना चालणाऱ्या चकाकीत घड्याळयाप्रमाणें तिची स्थिति झाली होती. राजकारणांत ब्राह्मणेतरांच्या हक्काची धुरा खांद्यावर पेलणारा, समाजकारणांत जर ब्राह्मणाच्याच पायाचें तीर्थ घशाखालीं लोटूं लागला, तर स्वाभिमान कोठें राहतो, हेंच आम्हांस समजत नाहीं. भटाला देवासारखें समजून त्याच्या पायपूजेचें नाहक स्तोम माजविणें म्हणजे स्वर्गांत मोक्ष मिळविणें नव्हे–पाप-पुण्याच्या स्वार्थी मंत्रतंत्राची बडबड

करणाऱ्या भटभिक्षुकांच्या ह्या मोक्षाच्या मार्गाच्या कल्पित कथेवर विश्वास ठेवून भटी धार्मिक विधीचें थोतांड माजविणें स्वाभिमानतेचें लक्षण खासच नव्हे! हिंदुस्थानांत लोकसंख्येच्या मानानें ब्राह्मणेतर समाज बहुसंख्याक आहे. ब्राह्मणेतर समाज करील ती गोष्ट राष्ट्रांत होण्यासारखी आहे. प्रत्येक स्वाभिमानी ब्राह्मणेतरांनीं या दृष्टीनें आपल्या सर्वांगीण चळवळीचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवलें तर अखिल हिंदुस्थानची सर्व चळवळ शेफारलेल्या आणि स्वार्थी अशा मूठभर भटाच्या हातून एकाच हिसक्यांत काढून घेणें मुळींच अशक्य नाहीं! महाराष्ट्रांत सत्यशोधक चळवळ सुरू झाली ती ब्राह्मणेतरांच्यात जातिबंत स्वाभिमान जागृत करण्याकरितांच? महाराष्ट्राबाहेरील आपले ब्राह्मणेतर बंधू त्याच ध्येयानें चालत आहेत आणि आतां प्रत्यक्ष कार्य करून दाखविण्याच्या उद्योगांत आहेत. हे गेल्या आठवड्यांत मद्रास येथें विशलपुट मुक्कामीं भरलेल्या.....
(सत्यशोधक).....परिषदेवरून दिसूं.....
उद्देश त्यांनी जाहीर केला असून त्यांतील आशय साधारणपणें असा आहे कीं,.....
.....हिंदवी राजकारण इतकें घाणेरडें झालें आहे कीं, स्वार्थी दृष्टीशिवाय हिंदुस्थानच्या जिव्हाळ्याचे आणि हिताचे प्रयत्न ज्यांत प्रामुख्यानें पाहूं जातां सांपडणें कठीण पडेल. अशा परिस्थितींत राजकीय वातावरणाच्या सध्याच्या क्षेत्राशिवाय आपणांस आपल्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणेचा प्रश्न प्रथम हातीं घेणें जरूर आहे. आणि ह्यासाठीं अखिल ब्राह्मणेतर जनतेस संपूर्ण सामाजिक ऐक्य प्रस्थापित होणें आवश्यक आहे. अशा ब्राह्मणेतरांचा मुख्य झगडा सरकारशी नसून भिक्षुकशाहीशीं आहे. प्रथम भिक्षुकशाहीचें बंड मोडून टाकलें, आमचा धार्मिक आणि सामाजिक दर्जा प्रस्थापित केला, म्हणजे स्वातंत्र्य मिळवणें केव्हांहि अशक्य होणार नाहीं. मद्रास येथील स्वाभिमानी ब्राह्मणेतर परिषदेबद्दल 'नवा काळ'सारख्या भटी वर्तमानपत्रांना हेवा वाटणें साहजिकच आहे. आपल्या ढोंगी कृत्यावर प्रकाश पाडण्याचें सत्यशोधकी काम स्वाभिमानी ब्राह्मणेतरांनी हातीं घेतांच हीं धर्मलंड पिछाट भटें पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें बाटेल तशीं आणि बाटेल तेथें भुकूं लागलीं तर त्यांत कांहींच नवल वाटण्यासारखें नाहीं. ब्राह्मणेतरांनीं आपलें सामाजिक वर्चस्व सर्वस्वी आपल्या हातीं घेतल्यावर हाच बहुसंख्यांक ब्राह्मणेतर समाज हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देईल. व्याख्यानबाजीला आणि फाटक्यातुटक्या खादीनें जाणूनबुजून देह नटवून देशोन्नति होणार नाहीं. स्वराज्य मिळविण्याचें असलें ढोंगी संभावितगिरीचे मार्ग स्वाभिमानी ब्राह्मणेतर कधींच पत्करणार नाहीं. हीं...नादानपणाचीं, भ्याडपणाची आणि फंडगुंडगिरीची कार्यें भटांनींच करावीं. मुलाच्या जन्मोत्सवापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व विधींचे निधि राष्ट्रीय फंडगुंडगिरीच्या मार्गानें भटांनींच काढावेत आणि राष्ट्रीय बाण्याच्या लंब्या लंब्या गप्पा मोठमोठ्या जाहीर सभांच्या द्वारें भटांनींच माराव्यात. ब्राह्मणेतर एखाद्या चळवळींत उशिरानें जरी पडले, तरी ते आपलें कार्य आस्थेनें आणि बहुजन समाजाला पोषक असेंच केल्याशिवाय राहणार नाहींत. आपल्या देशांतील अनेक जातींकडे पाहिलें तर,

ह्या सर्व जाती एकत्र झाल्याशिवाय एकमुखी स्वातंत्र्याची मागणी करणें अशक्य होईल ! बहुजन समाज अज्ञानानें ब्राह्मणी-धर्माच्या-गुलामगिरींत गुरफटलेला आहे. ह्या परस्वाधीन वृत्तीच्या आणि कमी दर्जाच्या स्वाभिमानशून्य गुलामगिरींतून ब्राह्मणेतर समाजाला मुक्त व्हावयाचें आहे. ह्या मरणप्राय ब्राह्मणी धर्माच्या मगरमिठींतून आपणाला आपल्या बहुजन समाजाला मोकळे करावयाचें आहे. सामाजिक गुलामगिरीमुळें राजकीय क्षेत्रांतलें स्वातंत्र्य मिळविणें आवश्यक असल्यामुळें स्वाभिमान वृत्तीच्या बाण्यानें आपण सामाजिक क्रांतीचा प्रसार प्रथम करणें भाग आहे. मूठभर भटांनीं आपला वाटेल तेव्हां आणि वाटेल तसा अपमान करावा ही गोष्ट यापुढें कोणाहि स्वाभिमानी ब्राह्मणेतराला सहन झालेली दिसतां कामा नये. ज्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या ब्राह्मणांना सामाजिक बाबतींत इतर बहुसंख्याक समाजाला स्वातंत्र्यता देतां येत नाहीं, त्यांनीं संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याच्या नाहक गप्पा मारूं नयेत. आपल्या पायाखालीं काय जळतें आहे याची किंचित्हि ज्यांना जाणीव नाहीं, त्यांनीं सुधारणेच्या कितीहि वल्गना केल्या तरी त्या फोल ठरल्याशिवाय राहणार नाहींत. समाजांतील चढेल ब्राह्मणी वर्चस्व नष्ट करून ब्राह्मणेतरांमध्ये स्वाभिमानाची जागृति करणें इत्यादिं गोष्टी स्वाभिमानकारक चळवळींच्या बुडाशीं आहेत. ब्राह्मणादि वरिष्ठ म्हणविणाऱ्या सर्वच जातींचें वर्चस्व आतां नोकरशाहीच्या वर्चस्वाइतकेंच दुःसह होत चाललें आहे. सध्याच्या बदललेल्या परिस्थितीकडे ब्राह्मण वर्ग जर अजूनहि चढेलपणाचें वर्तन स्वीकारून-ब्राह्मणेतरांच्या स्वाभिमानाला.....पाहील तर, यापुढें प्रसंग बिकट ओढवेल हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. लोकशाहीच्या कृत्यावर कोरडे ओढण्यास .... वाटतें, पण अगदीं तीच स्थिति ब्राह्मणांवर येऊन पडली तर काय अवस्था होईल हे आजच सांगणें जरूर आहे! सन १८७३ साली कै. म. ज्योतीराव फुले यांनीं सत्यशोधक चळवळीला आरंभ केला. ही चळवळ बहुजनसमाजाच्या सार्वभौम उन्नतीस फलदायक आहे. अशा प्रकारची खात्रीची जाणीव कै. शाहूछत्रपती महाराजांना वाटली. म्हणूनच यांनीं महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ खेडोपाडी सुरूं होण्यासाठीं अन्य प्रकारचे प्रयत्न केले आहेत .....

.....जाऊन भिडली पाहिजे. कै. म. फुले यांनीं जागृत केलेला ब्राह्मणेतर चळवळीला स्वाभिमान टिकविणें आणि त्याचें पुढील कार्य यशस्वी करणें हेंच आजच्या ब्राह्मणेतर चळवळीचें मुख्य ध्येय आहे. हाच स्वाभिमानपणाचा आणि जिवाभावाचा महामंत्र आहे. भिक्षुकशाहीस शह देऊन ब्राह्मणेतर चळवळीत चेतना व जाज्वल्य चैतन्य उत्पन्न करणारे स्वाभिमानाचे मार्ग आपल्या चळवळीचे ध्येयस्तंभ आहेत. ब्राह्मणी धर्मानें फक्त ब्राह्मणेतर समाजाच्या प्रगतीला आळा घालण्याचा मार्ग पत्करला नव्हता, तर आपल्या अस्पृश्य बांधवांच्या माणुसकीलाहि हारताळ फांसण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. पुराणाच्या पोकळ आधारावर जातिभेदाचें थोतांड निर्माण करून जन्मजातीचे-उच्चनीचतेचे-प्रकार निष्कारण समाजा-समाजांत उपस्थित केलेले आहेत. सामाजिक समतेच्या आड येणारे सर्व प्रकारचे प्रयत्न ब्राह्मणी धर्माच्या पुराणांनीं व धार्मिकपणाच्या कलमांनीं आणि

रूढीच्या परंपरेनें समाजांत घुसवून दिले आहेत. अशा वेळीं स्वाभिमानी ब्राह्मणेतराला ह्या साऱ्या लांच्छनास्पद ब्राह्मणी डावांचा बीमोड करून, बहुजन समाजांत सामाजिक स्वास्थ्य स्थापन करून आपल्या स्वाभिमान कृतीनें जगाच्या निदर्शनास आणणें हेंच खरें स्वाभिमानाचें कर्तव्य होय.

◇◇◇

वाचकांचा प्रेमाचा निरोप

[कैवारी : २३ मार्च १९२९]

येत्या बुधवारीं ता. २७ मार्च रोजीं "जिनेव्हा" बोटीनें आम्ही इंग्लंडला जात आहोंत. या प्रवासास ५ ते ६ महिने लागतील. आमच्या गैरहजेरीत 'कैवारी' पत्रांचें संपादकत्व 'कैवारी'चे पहिल्यापासूनचे सहसंपादक श्री. गणपतराव जाधव यांचेकडे सोपवीत आहोंत.

श्री. गणपतराव जाधव यांचा परिचय सर्व ब्राह्मणेतरांना आहेच. 'कैवारी'चे मुख्य संपादक म्हणून जरी आम्ही होतों, तरी आतापर्यंत कैवारींत लिहिण्याचा मोठा भाग रा. जाधवच उचलीत असत. इतकेंच नव्हे तर बाकीच्या चळवळीमुळें 'कैवारी'कडे महिनेच्या महिने लक्ष्य पुरविण्यास आम्हांस वेळहि सांपडत नसे. हें सांगण्याचा हेतु एवढाच कीं आमच्या गैरहजेरीनें 'कैवारी'च्या कोणत्याही कार्यांत फरक पडलेला दिसून येणार नाहीं. 'कैवारी'च्या आश्रयदात्यांनीं आपलें पूर्वीचें प्रेम कायम ठेवून 'कैवारी'चा विस्तार प्रखर करण्यास सहाय्य करावें अशी नम्र विनंति आहे.

श्री. रामराव बर्गे, बी. ए., ब्राह्मणेतरांतले पुढारी हेहि स्वतः येऊन 'कैवारी'ची स्वपक्षविषयक सर्व जबाबदारी शिरावर घेणार आहेत. त्यामुळें रा. जाधव यांच्या हातून ब्राह्मणेतरांची सेवा घडण्यास अमोलिक सहाय्य होणार आहे.

युरोपहून आल्यानंतर पुन्हां उत्साहानें आमच्या प्रेमळ मित्रांच्या, हितचिंतकांच्या व स्वपक्षीयांच्या सेवेस सादर होऊं.

आपला सर्वांचा नम्र,
दिनकरराव जवळकर

◇◇◇

श्री. जवळकर यांचें पत्र

[केवारी : २९ मार्च १९३०]

लंडन, ता. १३-३-३०

रा. रा. गणपतराव जाधव यांस —

आपलीं अनेक पत्रें पोंचलीं. त्याबद्दल आभारी आहें. हल्लीं मुंबई प्रांतिक ब्राह्मणेतर पक्षांत अशीं कांहीं माणसें निघालीं आहेत कीं, त्यांनीं मजविरुद्ध माझा पाडाव करण्याकरतां अगदीं कंकण बांधलें आहे असें आपण कळवितां पण त्याबद्दल डगमगण्याचें कारण नाहीं; कारण जे जे लोक आज मजविरुद्ध अगदीं काहूर माजवून सोडीत आहेत, त्यांतला प्रत्येक माणूस मला पूर्ण माहीत आहे. आणि कोणाचें अवसान किती आहे हेंहि मी जाणतों. तत्त्वापेक्षां व्यक्तिद्वेषच मूळ. असें असतांना विनाकारण त्यांना उत्तरें देत बसणें चुकीचें आहे. मला ना. जाधवरावांनीं एकच उपदेश केला आहे कीं, "आपण अगदीं शांतपणानें सहन करावें." तो मी या वेळीं माझ्या स्वभावाविरुद्ध पण निश्चयानें पार पाडला आहे. मधून मधून मला अनेक वेळां वाटतें कीं, हिंदुस्थानांत येऊन या प्रतिपक्षांचा समाचार घ्यावा पण पुनः ना. जाधवरावांच्या शिकवणुकीची आठवण होऊन 'नाही; जेव्हां आपलेच मित्र, आपले भाऊ आपलें वैर करूं लागतात आणि आपलें अकल्याण चिंतीत आपला सर्वनाश करण्याचा उद्योग करतात.' अशा वेळीं आपण शांत असणेंच जरूर. या विरोधकांपैकीं मुख्य विरोधक म्हणून रा. केशवराव जेधे पुढें यावेत ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. मी ज्यावेळीं पुणें सोडलें त्याचे आदलें रात्रीं रा. आबा साबळे यांना जेधे मॅन्शनमध्यें एकदां केशवरावांनीं माझी भेट घेऊन जावें ही विनंति करण्याकरितां मीं पाठविलें होतें. कदाचित् मी लांबच्या प्रवासास चाललों आहे माझी आणि केशवरावांची पुन्हां गांठहि पडणार नाहीं असें उगाच क्षणभर माझे चित्तास वाटलें. परंतु जेध्यांची गाठ पडली नाहीं असें साबळे यांनीं सांगितलें. रा. जेधे यांच्यावर आपण 'कैवारी'तून टीका केली हें अगदीं वाईट केलेत. कैवारीच्या पहिल्या वर्षांत रा. जेध्यांचें सहाय्य झालेलें आहे. जेधे जरी आपल्या कामगिरीला विसरले असले तरी आपण विसरतां कामा नये. जेधे वाटेल तें लिहीत सुटले म्हणून आपणहि लिहिणें बरें नाहीं. जेधे उद्यां म्हणतील कीं आमचा जवळकरांविषयीं कांहीं लोकांनीं भलताच गैरसमज करून दिला म्हणून आम्हीं तसें लिहिलें किंवा जेध्यांच्या नांवावर प्रसिद्ध झालेला मजकूर कदाचित् त्यांनी लिहिलाही नसेल. महाराष्ट्रांत जेधेबंधूंची, त्यांच्या स्वभावाची मला जास्त माहिती आहे असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं; प्रतिस्पर्ध्यांवरहि टीका करतांना जे बाबूराव जेधे सभ्यपणाचीच भाषा वापरतात, त्यांच्या नांवावर असभ्य भाषेंत असलेला मजकूर जर प्रसिद्ध झाला तर त्यांना कोणी तरी

फसविलें आहे असें मी नक्की समजतों. बाबूराव भोळे आहेत, केशवराव करारी आहेत. मी विलायतला गेलों म्हणजे अगदीं शिखरावर चढलों आणि केशवराव मात्र मागे राहिले असा त्यांचा गैरसमज कोणी तरी करून दिलेला आहे. माझा मनापासून द्वेष करणारीं माणसें या संधीची वाट पाहात बसलींच होतीं. त्यांना केशवराव कां पाहिजेत तर त्यांनीं मला विरोध करावा म्हणून, अशा वेळेस आपण जास्त खबरदारी ध्यावयास पाहिजे.

मीं हिंदुस्थानांत येऊन परिषदेला हजर राहावें आणि 'प्रतिस्पर्ध्यां'ना तोड द्यावी हें आपलें मत मला पसंत नाहीं. ब्राह्मणेतर पक्षाचीं सूत्रें ना. जाधव किंवा जवळकर याच लोकांच्या ताब्यांत कायम राहावीत हा न्याय कोठला ? आणि तीं सूत्रें आज नाहीं तरी व्यवहारांत जात आहेत जेध्यांच्या ताब्यांत ? मग भिण्याचें कारण काय ? आपणास अजून जेध्यांची माहिती नाहीं. त्यांच्या ताब्यांत सूत्रें गेलीं तर उत्तम, मग आपल्यावर एकच जबाबदारी राहील कीं जेध्यांना पाठिंबा देणें. आणि मी तेथें आलों, परिषदेंत मोठें भाषण केलें, प्रतिपक्षाच्या एक शिवीला दहा या प्रमाणांत दिल्या तर त्याचा उपयोग काय ? येथें "शेतकरी हिंदुस्थान" लिहूनहि पुरें केलें. त्याची इंग्रजी प्रत "Peasant India" या नांवाखालीं एप्रिलमध्यें प्रसिद्ध होईल. याशिवाय म. फुले यांचे इंग्रजी भाषेंत अजून एकहि चरित्र नाहीं. "सत्यशोधक समाज आणि तत्त्वज्ञान" हें पुस्तक लिहून मी हिंदुस्थानला येईल. येथें सर्व साधनसामुग्री विपुल आहे. हीं पुस्तकें लिहिण्याचें काम कोणीतरी केलेंच पाहिजे. सध्या मी असें समजतों कीं हीं पुस्तकें लिहिण्याचें काम माझ्याकडे वाटून घेतलें आहे आणि मला शिव्या देण्याचें काम माझ्या मित्रांनीं वाटून घेतलें आहे. शिव्या किंवा वर्तमानपत्रें निघून जातील, माझीं पुस्तकें कायम राहतील आणि त्यामुळें आज शिव्या देणारे मित्रही पुनः सर्व विसरून मित्र बनतील किंवा न बनतील. माझे चित्ताचें समाधान होत आहे, तें अमोल आहे.

आपण लिहितां ब्राह्मणेतर पक्षांतून अजिबात मला बगळून टाकण्याचा कांहीं लोकांचा बेत आहे. या बाबतींत आपणांस मला एकच सांगावयाचें आहे कीं, नुसत्या ठरावानें मिळालेलें मोठेपण टिकत नसतें, आणि दाबून टाकलेलेंही दबत नसतें. आणि ब्राह्मणेतर पक्ष अशी कांहीं दिवस मला रजा देईल तर ब्राह्मणेतर चळवळीला अजून "लिटरेचर" पाहिजे आहे. मीं नुसते दौरे काढले किंवा व्याख्यानें झोडलीं किंवा वर्तमानपत्रें चालविलीं पण त्यापेक्षां हें "लिटरेचर" तयार केलें तर त्याहीपेक्षा जास्त भरीव काम होणार आहे. ब्राह्मणेतर चळवळींतून मलाच काय पण कोणालाही बगळल्यास कोणतीही परिषद किंवा ठराव कधींही समर्थ होत नसतो. कोणी माणसानें चळवळ करावी किंवा करूं नये हे परिषदेनें ठरवावें. असले अज्ञानमूलक ठराव कोणीं वाचले तर हास्यास्पद ठरतील. उद्यां मी "कोल्हापुरी फेटा बांधूं नये" कारण तो ब्राह्मणेतर निदर्शक आहे असा ठराव पास केला तर त्याला काय समजावें व ठरवावें हें सांगायला नको ! असो. सर्व मित्र मंडळींस रामराम.

आपला
दिनकरराव जवळकर

◇◇◇

"कैवारी" व "तेज"

[तेज : ९ मे १९३१]

१९२८ सालीं मुंबईस "कैवारी" नांवाचें साप्ताहिक आमच्या संपादकत्वाखालीं निघून तें २९-३० असें चाललें. "कैवारी" पत्राचे आम्ही जरी संपादक होतों तरी त्याला सल्लागार मंडळ व पुढें ट्रस्टी अशीं अनेक बंधनें, जरूर नसतां आम्हीं आपल्या हातानें, केवळ पक्षसंघटणेकरतां लावून घेतलीं आणि त्याचा व्हावयाचा तो परिणाम झालाच. भांडवलशाहीच्या शेवटाला धरून राजकारणाची वैतरणी तरणाऱ्या आमच्या प्रसिद्धिलंपट मित्रांना आमचीं सोशॅलिस्ट मतें पटलीं नाहींत. परंतु सर्वस्वी जबाबदारी घेण्याची एकाच्याही अंगांत ताकद नसल्यामुळें संपादकाच्या आणि सल्लागारांच्या मतभेदांत "कैवारी"चें एक वर्ष गेलें. नुसता कैवारीच नव्हे तर सबंध ब्राह्मणेतर जनताहि सोशॅलिझमकडे जात आहे. हें पाहून आम्ही हिंदुस्थानचा किनारा दुसऱ्या खेपेस सोडतांच कैवारी पत्रावर चोहोंकडून व्याजबट्ट्याचे, काकपिंड चघळणाऱ्या व्याजाळू मित्रांनीं आपल्या भांडवलशाहीचा उकिरडा पाखडायला सुरुवात केली, आणि त्यामुळें आम्ही युरोपमध्यें असतांनाच, त्या वेळचे संपादक श्री. गणपतराव जाधव यांना 'कैवारी पत्र' बंद ठेवणें भाग पडलें. अस्सल जमीनदारांपेक्षां, जमीनदारी मिरवूं पाहणाऱ्या नकली कपर्दिकांची मनःस्थिति वाघानें मारलेल्या शिकारीवर वक्रदृष्टी ठेवणाऱ्या गिधाडापेक्षा वेगळी नसते. हिंदुस्थानचा २२ कोटी शेतकरी इंग्रजी पेढीवर गहाण लावून त्याचा बदला स्वराज्य मागण्याची भांडवली बुद्धि, महाराष्ट्रीय शेतकऱ्यांच्या डोक्यावर दारिद्र्याचे निखारे ठेवतांना बापाला बाप कशी म्हणेल?

आमचीं गेलीं बारा वर्षें ब्राह्मणेतर चळवळीच्या सर्व तऱ्हेच्या सुखदुःखांत गेलीं. ब्राह्मणाचा बिमोड करण्याकरितां जे जे पाठीराखे आमच्या पाठीवर हात टाकून 'भले शाबास' म्हणण्याकरितां धावून आले त्यांचे आम्ही आभारी आहों. पण कांहींचा ब्राह्मणेतर जनतेला लुबाडण्याचा दुष्ट हेतू होता हें पुढें पुढें प्रकाशात आपोआप येत गेलें. ब्राह्मणेतर चळवळ ही शेतकऱ्याची आहे असा ब्राह्मणेतर जनतेचा समज आहे आणि तो खराहि आहे. पण शेतऱ्यांचे खरे शत्रू कोण याची व्याख्या न ठरल्यामुळें लुच्च्या बरोबर सच्चे सुद्धां कंबरा कसून उभे राहिले. १९२९ सालीं पक्षाचें नांव बदलून त्याच्या जन्मावरून तत्त्वावर उभारणी करा, असें आम्ही सांगून पाहिलें, यामुळें आमच्या लोक (?) प्रियतेला धक्का बसेल हें आम्हीं जाणून होतों परंतु त्याला इलाज नव्हता. चळवळीचें ध्येय व कार्यक्रम ठरावा असें अनेक वेळां सांगून पाहिलें परंतु जेथें कांहीं न करण्याचा निश्चय त्या दगडाला शेंदराचा सहा मण मुलामा चढविला तरी तो थोडाच पावणार? गेल्या वर्षीं युरोपांतून आल्याबरोबर पुन्हां पत्र सुरूं करून शेतकऱ्यांची संघटना

करण्याचा निश्चय ठरला होता. परंतु स्वातंत्र्ययुद्धाची रणधुमाळी माजली असतां आमचें वैयक्तिक स्वातंत्र्य निश्चितच नव्हतें. आणि त्याप्रमाणें कांहीं ब्राह्मणेतरांच्या निषेधाचे प्रहार होत असतां आम्हांवर मुंबई युद्ध मंडळातून १५ महिन्यांचा सरकारी सक्त अनुग्रह झाला. गांधी–अर्विन समेटामुळें सुटका होतांच अखेरीस सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून महाराष्ट्रांत जो शेतकरी समाज आहे त्याचा बचाव, संघटना करण्याकरितां आम्ही हें नवीन पत्र काढीत आहोत. 'कैवारी 'वर ज्या शेतकरी बंधूंचें प्रेम होतें तें तर आमचे आहेतच. परंतु याशिवाय जो कामकरी, कारागीर वर्ग आहे, तोहि या वेळीं नेटानें पुढें येऊन निदान महाराष्ट्रांत तरी संघटित होईल अशी आम्हास पूर्ण उमेद आहे. "कैवारी" आमच्या एकट्याचा असतां तर तोच सुरूं केला असता पण पुन्हां हक्काचे नाहक झगडे लढण्यास आम्हांस वेळ नाहीं. त्यापेक्षां नवीन नांव घेणें बरें. पत्राचें नांव जरी नवीन असलें तरी ज्यांनीं कैवारीची वर्गणी भरली असून पुरे अंक मिळाले नाहींत त्यांना 'तेज' देऊन त्यांच्या वर्गणीचा बदला देण्याची जोखीम सोसण्यांत मोठा तोटा आहे हे माहीत असूनहि आम्ही तो अंगावर घेत आहोंत.

सर्वांचा कृपाभिलाषि
दिनकरराव जवळकर

०००

हिंदुस्थानचा शेतकरी आणि भावी स्वराज्य

[तेज : ९ मे १९३१]

स्वतंत्र संघटनेची आवश्यकता

म. गांधी–आयर्विन समेटांतून, सत्याग्रहाच्या चळवळीची प्रखर आंच लागल्यामुळें म्हणा अगर इंग्लंडचें सध्याचें सरकार सोशॅलिस्ट असल्यामुळें म्हणा पण हिंदी लोकशाहीचा पाया घालण्याचें तत्त्व दोन देशांच्या–हिंदुस्थान, इंग्लंडच्या–निर्विवाद प्रतिनिधींकडून मान्य केलें गेलें. सेफगार्डस फेडरेशन् आणि मध्यवर्ती सरकारांत किती सत्ता व त्या सत्तेचा संक्रमण काळ किती यावर मतभेद होतील किंवा न होतील पण हिंदुस्थानच्या शेतकऱ्यापुढें ब्रिटिश सत्तेचा जो एक अत्यंत दुर्गम पहाड होता, तो म. गांधींसारख्या जगद्वंद्य राजकारणी पुरुषानें राष्ट्राचा गाडा सुरळीत चालणाऱ्या चकारीवर पडलेल्या

धोंड्याइतका सोपा करून टाकला यांत शंका नाहीं. हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्यांत राहावयाचें असल्यास तो आपल्या खुषीनें राहील. ब्रिटिशांच्या खुषीच्या सक्तीनें राहणार नाहीं ही गोष्ट आतां इंग्रजी मुत्सद्यांनाहि मनोमन पटलेली दिसते. म. गांधींच्या अनत्याचारी तत्त्वांमुळें कोणत्याही परिस्थितींत " सशस्त्र राज्यक्रांति " अव्यवहार्य ठरत चालली असून हिंदुस्थानपुरतें तरी ' अत्याचारी युद्धाचे ' दिवस भरत आले हे खास.

ज्या वेळीं सत्तेचें संक्रमण सुरू होतें ती वेळ जास्त महत्त्वाची असते. एकदां कोणत्याहि एका विशिष्ट वर्गाची सत्ता स्थिरावली म्हणजे ती बदलणें अत्यंत कष्टाचें आणि दीर्घावधीचें होत असतें. ज्या सुधारणा–किंवा स्वराज्य–हिंदुस्थानांत अमलांत यावयाच्या आहेत, त्या लोकशाहीच्या गोंडस नांवाखालीं शेतकऱ्यांना गाफील ठेवून त्यांचे प्रतिनिधी म्हणून भांडवलशाहीच्या ताब्यांत गेल्या तर त्यापासून देशांत खरी लोकशाही स्थापन होण्याऐवजी कांहीं विशिष्ट हितसंबंधाच्या एका टोळीची ती सत्ता होईल. अर्थात् अशा प्रसंगीं शेतकरी हाच जर बहुजनसमाज आहे, किंवा हिंदुस्थानच जर शेतकऱ्यांचा आहे, तर त्यावर शेतकऱ्यांचें स्वराज्य स्थापन व्हायला पाहिजे. हिंदी स्वातंत्र्याकरितां अनत्याचारी युद्ध सुरू झालें, त्यांत शेतकऱ्यांनीं आपलें सर्वस्व राष्ट्राच्या चरणीं अर्पण केलें. तुरुंग, हालअपेष्टा, बेअब्रू वगैरे सर्व तऱ्हेच्या आणि सर्वांत जास्त छळ शेतकऱ्यांनाच सहन करावा लागला. आणि पुनः म. गांधींचें व ब्रिटिश मुत्सद्यांचें बिनसलें आणि अनत्याचारी युद्ध सुरूं झालें. तर पहिल्याहूनहि दसपट उमदीनें शेतकरी सज्ज होतील, परंतु स्वराज्याच्या रूपरेखेचा मसुदा सर्व सत्ता शेतकऱ्यांच्या हातीं न देणारा असेल तर ज्या हिंमतीवर ब्रिटिश राज्यसत्तेला ताळ्यावर आणण्यास शेतकरी पुढें झाले तीच हिंमत त्यांना स्वदेशी भांडवलवाल्यांना वठणीवर आणण्यांत खर्च करावी लागेल. याकरितां चालू संक्रमण काळांत शेतकरी समाज अगदीं स्वतंत्रपणें संघटित झाला पाहिजे. गोरी सत्ता जाऊन काळी सत्ता येणें हें स्वराज्य असतें तर मग सर्व संस्थानें स्वराज्येंच ठरतीं किंवा शेतकऱ्यांना आर्थिक गुलामगिरींत जखडून केवळ भांडवलाच्या जोरावर त्यांचे प्रतिनिधी म्हणून हिंदुस्थानवर भांडवलवाले राज्य करतील तर तेंहि पूर्ण स्वराज्य म्हणतां येणार नाहीं. हिंदु–मुसलमान, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, स्पृश्य–अस्पृश्य हे सर्व भेद जगविणें हेंच इथून पुढें भांडवलवाल्यांचें एक ध्येय राहील. हे सर्व भेद नाहींसे होण्याला एकच उपाय आहे तो हा कीं, लुबाडणारे (Exploiter) आणि लुबाडले जाणारे (Exploited) हा भेद निश्चित रेषा ओढून जेव्हां विभागला जाईल तेव्हां अमक्या सोम्या-गोम्याला हिंदु सभा कां हवी आणि तमक्या तिस्माइ अल्लीला मुस्लीम लीग कां पाहिजे याचा उलगडा होत नसेल यांतले भांडवलवाले, आपलेच धर्मबंधु.....त्यांच्या नांवानें कां होईना पण दुसऱ्या कोणाशीं लढत ठेवून आपलें अन्याय्य वर्चस्व राखण्याचा प्रयत्न करीत असतात. हिंदुस्थानसारख्या धर्मानें किडलेल्या, जातिभेदानें सडलेल्या राष्ट्राला जेव्हां वर्णकलहाची जाणीव होईल तेव्हांच त्याला स्वराज्यांत तरी सुखाचे दिवस दिसतील. उद्यां इंग्रज गेले म्हणजे आमचे सारे भांडवलवाले किंवा धर्ममार्तंड लागलींच

दलितांच्या गळीं पडून प्रेमानें मिठ्या मारतील आणि स्वराज्यांत हिंदुस्थान अगदीं नंदनवन होऊन जाईल अशा कोणी मिटक्या मारीत असेल तर त्याला मूर्ख म्हणण्या शिवाय गत्यंतर नाहीं. परकीयांची लुबाडणूक थांबविण्यासाठीं भांडवलवालेच काय पण त्याहि पलिकडच्याशीं सहकार्याकरतां शेतकरी आपला हात पुढें करील, परंतु लूट थांबली म्हणजे देशी भांडवलवाल्यांना लुटीचा मोकळा परवाना दिला असें समजण्याचें कारण नाहीं. शेतकरी समाजानें आतांपासूनच जात, धर्म, पंथ असल्या लटक्या आणि प्रति-स्पर्ध्यांच्या उपयोगी पडणाऱ्या कल्पना बाजूस सारून सर्व शेतकरी आर्थिक योजनेंत संघटित करून पूर्ण स्वराज्याला खरी लोकशाही बनविण्याची तयारी केली पाहिजे. कोणत्याहि राजकीय पक्षावर शेतकऱ्यांनीं अवलंबून राहतां कामा नये. स्वतःच्या आत्मबळावर अवलंबून असलें पाहिजे. शेतकऱ्याच्या हितसंबंधावरोबर भांडवशाहीचेंहि हित संभाळतो म्हणणारे ढोंगी लोक जास्त भयंकर असतात हें शेतकऱ्यानें ओळखून ठेविलें पाहिजे. नवीन सुधारणा अमलांत येण्यापूर्वी सर्व शेतकरी संघटित होऊन स्वराज्यांत ज्यांनीं शेतकऱ्यांच्या घरावर निखारे पसरविण्याचें कार्य सतत चालविलें आहे, जे कायदेभंग चळवळीच्या वेळीं सरकारी गोटांत सामील होऊन शेतकऱ्यांच्या मुलाबाळांच्या हालाला कारणीभूत झाले आहेत अशा भांडवलवाल्यांच्या देशद्रोही पित्त्यांना हुसकून शेतकऱ्यांचें राजकीय अस्तित्व प्रस्थापित केलें पाहिजे. त्यांत शेतकऱ्यांचे म्हणजे शेतकऱ्यांचेच त्यामध्यें काँग्रेसचे म्हणजे शेतकऱ्यांचेच किंवा ब्राह्मणेतरांचे म्हणजे शेतकऱ्यांचेच असला अर्धवटपणा असतां कामा नये. ब्राह्मणेतर आपल्यांतील सावकार व भांडवलवाल्यांना ते केवळ 'ब्राह्मणेतर' म्हणून शेतकऱ्यांच्या डोक्यावर बसविण्याचें पातक करीत आहेत, तेवढे दुष्ट सावकार किंवा त्यांचे बगलबच्चे बगळले तर सबंध ब्राह्मणेतर चळवळ शेतकऱ्यांची आहे. परंतु त्याच शेतकऱ्यांच्या नांवावर निवडून गेलेले भांडवलशाहीचे काळे हात, कौन्सिलांत शेतकऱ्यांवर बसणाऱ्या कराला 'मदत करीत आहेत. ब्राह्मणेतर चळवळीचा खरा व उघड उघड कार्यक्रम ते कधींच ठरविणार नाहींत. कारण त्यांत सर्व ब्राह्मणेतर सावकारांचें मरण आहे. असो.

काँग्रेसमध्यें देखील व्यापारी भांडवलवाल्यांचें वर्चस्व असलें तरी जोपर्यंत काँग्रेसच्या शिरावर म. गांधींचा वरदहस्त स्थिर आहे, तोपर्यंत शेतकऱ्यांचें हित होवो न होवो पण नुकसान मात्र खास होणार नाहीं असा आम्हांला भरवसा वाटतो. यदाकदाचित् सर्व हिंदी भांडवलवाले म. गांधींनाहि फसविण्याचा-बनविण्याचा प्रयत्न करतील यासाठींच सर्व शेतकरी संघटित होऊन, एक दिलानें म. गांधींच्या पाठीशीं उभे राहिले पाहिजेत.

◇◇◇

कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार

[तेज : २३ मे १९२९]

लंडन येथें भरलेल्या राऊंड टेबल परिषदेंत जी राज्य-घटनेची शाल तयार करण्याकरितां राजकारणांतले मवाळ विणकरी जमले होते, तींत फेडरेशनच्या नांबाखाली हिंदी संस्थानिकांचीं ठिगळें जोडल्यामुळें एक लोकशाहीपासून तो बेबंदशाहीपर्यंत सर्व तऱ्हेच्या बऱ्यावाईट लक्तरांची गोधडी मात्र होणार आहे. प्रजेच्या पैशावर दुसऱ्यांना महाल देणारे महाराज किंवा आंग्ल युवतीच्या झग्याकरितां डोक्याचा शिरपेच खर्ची घालणारे महाराज सरकार हिंदुस्थानच्या उदरीं पासरीभर झाले आहेत. एखादा प्रजाहित-दक्ष हिंदी संस्थानें मोजूं लागला तर कांहीं वेळ त्याला परब्रह्माचा विचार करूं पाहणाऱ्या मुमुक्षूप्रमाणें स्तंभितच व्हावें लागेल. हिंदी लोकशाहीच्या अरुणोदयावर संस्थानें हा पडलेला काळा अंधार आहे. या अंधारांत कोणी चांचपडून कांहीं शोधूं लागला तर मानवी सभ्यतेला काळिमा फासणारे अनन्वित नर्मदेचे गोटे त्यांच्या हाताला लागल्यावाचून राहणार नाहीं. कांहींत संस्थानिक चांगले असतीलहि पण मि. म्शब्लक विल्लम् किंवा बॅ. चूढागर ह्या दोन भिन्न मतांच्या पण या विषयावर अधिकारानें लिहिणाऱ्या गृहस्थांच्या पुस्तकावरूनहि संस्थानें हीं हिंदुस्थानच्या पुढें मोठी एक धोंड आहे असें दिसून येतें. फेडरल सरकारच्या उत्पन्नांत आपला हिस्सा असावा व नवीन कराला आपली संमती व मान्यता घेतली जावी असें म्हणणारे संस्थानिक, फेडरल सरकारमध्यें संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी प्रत्यक्ष रीतीनें निवडले जावे व त्यांच्या मूलभूत हक्कास मान्यता देऊन, त्याची नीट अम्मलबजावणी होत नसल्यास वरिष्ठ न्याय कोर्टाकडे तक्रार करतां यावी अशी संस्थानी प्रजेनें मागणी केल्याबरोबर, संस्थानिकांच्या सार्वभौमत्वाला (Sovereignty) बाध येतो अशी ओरड करूं लागतात. आपण आपल्या प्रजेवर कितीहि जुलूम जबरदस्ती केली तरी त्याबद्दल कोणाला कांहीं बोलतां येऊं नये अशी संस्थानिकांची इच्छा दिसते. या फेडरल घटनेमुळें संस्थानी प्रजेमध्यें मोठा असंतोष पसरूं लागला आहे व तो योग्यहि आहे. संस्थानिकांच्या राज्यकारभारावर प्रकाश पाडून गरीब जनतेवर होणारा जुलूम उजेडांत आणल्याखेरीज संस्थानिक हे कसल्या प्रकारचे प्राणी आहेत याची जगाला ओळख होणार नाहीं. ब्राह्मणी पत्रें ब्राह्मणेतर संस्थानिकांवर दांतओठ खातातच पण लाजेकाजेनें कां होईना ब्राह्मणी संस्थानांवरहि थोडी तरी टीका करतात. परंतु ब्राह्मणेतर पत्रें ज्या उमेदीनें किंवा निर्भिडपणानें ब्राह्मणी संस्थानांवर तुटून पडतात, ती उमेद व तो निर्भीडपणा ब्राह्मणेतर संस्थानिकांच्या बाबतींत मात्र पूर्णपणें लटपटू लागतो. कदाचित पुण्या-बेळगांवच्या पाळीव ब्राह्मणेतर वर्तमानपत्रांना त्यांच्याकडून मलिदा मिळत असेल. तीं कोणाच्याहि मलिद्यावर जगोत पण ब्राह्मणेतर संस्थानां-

तील गोरगरीब प्रजेबद्दल लिहितांना त्यांची लेखणी गळून पडत असेल, तर त्यांनीं शेतकऱ्यांच्या हिताचा आव आणून त्यांची फसवणूक करूं नये अशी आमची विनंती आहे. हिंदुस्थानांतील ५१३ संस्थानांपैकी महाराष्ट्रीय २९ आहेत. या २९ मध्यें १५ मराठा संस्थानें आहेत. त्या सर्वांत कोल्हापूर हें कै. शाहु महाराजांच्या वेळीं अग्रगण्य समजलें जात असे. कोल्हापूरच्या प्रगमनशील राज्यकारभाराची बरीच बोलबा अलिकडे ऐकूं येत असून मुंबईच्या टाईम्समध्यें देखील, हिंदुस्थानचें नूतन व्हाइसरॉय लॉर्ड वेलिंग्डन मुंबईला पाय लावतात त्याच दिवशीं कोल्हापूरच्या राज्यकारभाराबद्दल प्रशंसोद्गाराचे धबधबे वाहूं लागतात ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. कोल्हापूर संस्थानाबद्दल आम्हांलाच काय हिंदुस्थानांतील प्रत्येक मराठ्याला अभिमान वाटतो व त्याचबरोबर कोल्हापूरचा राज्यकारभार प्रगतशील व्हावा-अभिमानास्पद वाटावा. कोल्हापूर ही एक छोटीशी लोकशाही बनावी असें प्रत्येक ब्राह्मणेतराला वाटणें साहजिक आहे, पण सध्या तेथील राज्यकारभार ज्या चाकोरींतून हाकला जात आहे; ती चाकोरी पाहिली म्हणजे निराशाच वाटल्याशिवाय राहात नसे. कोल्हापूरचा शेतसारा ब्रिटिश मुलुखापेक्षां कितीतरी पटीनें जास्त आहे. इन्कमटॅक्स फार थोड्या प्रांतीवरहि बसविला जाणार आहे. वास्तविक, शाहू महाराजांनीं कोल्हापूरचा व्यापार वाढविण्यासाठीं शाहुपुरी शिरोळ स्टेशनवर जयसिंगपूर नांवाचें गांवहि वसविलें; शिवाय अनेक प्रकारच्या सोयी केल्या. पण अलिकडे इन्कमटॅक्ससारखे नवीन कर वाढूं लागल्यामुळें शाहुपुरीचा व जयसिंगपूरचा व्यापार बसूं लागला असून सांगली संस्थान ती जागा पटकावूं पाहात आहे. पण या गोष्टीकडे महाराजांचें अगर त्यांच्या अधिकाऱ्यांचें लक्ष नसावें असें वाटतें. कोल्हापूर संस्थानचा प्रदेश डोंगराळ असून त्यांत मुबलक झाडी असल्यामुळें रानटी श्वापदांची गर्दीहि प्रमाणाबाहेर आहे. या श्वापदांपासून शेतीचें मनस्वी नुकसान होत आहे. पण महाराजांना जवळपास शिकार करण्यासाठीं श्वापदें सांपडावींत एवढ्यासाठीं इतरांना शिकारीला बंदी केली आहे. यामुळें शेतीच्या रक्षणासाठीं ज्या बंदुका दिल्या आहेत, त्या धूळ खात कोंपऱ्यात पडल्या असून रानटी जनावरें महाराजांच्या कृपेनें गरीब शेतकऱ्यांच्या शेतीचा खुशाल फडशा उडवीत आहेत. केवळ महाराजांच्या अमावास्ये-पौर्णिमेच्या लहरी शिकारीसाठीं हजारों शेतकऱ्यांचें भयंकर नुकसान होत आहे. पण तिकडे कोणाचेंच लक्ष नाहीं. अशा शिकारीनें केव्हां केव्हां एकमेकांवर भाला टाकण्याची पाळी येते. महाराजांना रेसचा नाद लागल्यापासून पुण्या-मुंबईच्या रेसकोर्सवर कोल्हापूरच्या खजिन्यांतील लाखों रुपये उडविले जात आहेत. इतकेंच नव्हे तर दरबारांतील ऑफिसर्स, कारकून, नोकर वगैरे लोकांना सक्तीनें रेसचीं तिकिटें देऊन त्यांच्या पगारांतून पैसे वसूल केले जातात अशी बातमी आहे. ज्या शाहू महाराजांनीं गरिबांचा उद्धार करण्यासाठीं कैक लक्ष रुपये खर्ची घालून शिक्षणदानाचें पुण्य पदरीं घेतलें, त्याच महाराजांचे 'आबांच्या पावलावर पाऊल टाकतों म्हणणारें' चिरंजीव रेससाठी लाखों रुपयांचा खुर्दा उडवीत आहेत, हा कोल्हापूर संस्थानचा दैवदुर्विलासच नव्हे तर काय?

सगळा मागासलेला ब्राह्मणेतर समाज, बहुजन समाज शाहू महाराजांच्या कारकीर्दीत ज्या आशेनें व अभिमानानें कोल्हापुराकडे पाहात असे, ती आशा व तो अभिमान आता कोठें आहे व कां नष्ट झाला? मराठ्यांचें निसर्गदत्त पुढारी समजलें जाणारें कोल्हापूर संस्थान, मराठ्यांबद्दल आज काय करीत आहे? रेसशिवाय क्रिकेट मॅचीसचाहि नाद अलिकडे महाराजांना लागला आहे. त्यासाठीं पुण्या-मुंबईचे कित्येक क्रिकेटपटू पगार देऊन ठेवले आहेत. या खेळाचा प्रजेला उपसर्ग पोचला नसता तर आम्हीं तिकडे दुर्लक्षहि केलें असतें. पण आमच्याकडे ज्या कित्येक तक्रारी आल्या आहेत त्यावरुन क्रिकेटसाठीं खर्च केला जाणारा सर्व पैसा 'क्रिकेट फंड' काढून प्रजेकडून वसूल केला जातो असें दिसतें. केवळ महाराजांच्या किंवा देवास युवराजांच्या क्षणिक लहरीसाठीं गरीब प्रजेला भुर्दंड भरावा लागवा ही गोष्ट खरी असल्यास–कोल्हापूर दरबाराला लांछनास्पद आहे असेंच कोणीहि म्हणेल. याशिवाय कित्येक प्रकारचे जुलूमहि गरीब लोकांना सहन करावे लागतात. त्यापैकीं लोकांच्या मुली लग्नासाठीं पळविणें हा एक आहे. वाटेल त्या नागरिकाची सुंदर तरुण मुलगी अधिकाराच्या जोरावर दमदाटी देऊन किंवा पळवून नेऊन आपल्या मर्जीतल्या हुजऱ्यांच्या किंवा कुबेर-रायांच्या गळ्यात बांधल्याचीं कित्येक उदाहरणें कोल्हापुरांत घडलीं आहेत व घडतहि आहेत. या गोष्टी कदाचित् महाराजांच्या अदरोक्षहि होत असतील. पण तिकडे लक्ष देऊन प्रजेवर होणारा जुलूम दूर करणें हें महाराजांचें 'राजा' या नात्यानें आद्य कर्तव्य आहे. अशा प्रकारच्या कित्येक गोष्टी उजेडांत आणतां येतील. पण तेवढाच आमचा हेतु नाहीं. तर महाराज सरकारनीं गरीब प्रजेच्या हिताकडे लक्ष द्यावें एवढेंच आमचें म्हणणें आहे. ज्या मावळ्यांनीं कोल्हापूरचेंच नव्हे तर सबंध मराठ्यांचें राज्य स्थापन करण्यासाठीं आपलीं शिरकमलें वाहिलीं; त्याच मावळ्यांच्या–वंशजांचा कोल्हापूरप्रजेचा–शिवाजी महाराजांच्या वंशजाकडूनच छळ व्हावा ही दुःखाची गोष्ट होय. कोल्हापूरच्या प्रजेनेंहि आतां मौन न स्वीकारतां कोल्हापूरचा राज्यकारभार प्रगमनशील होण्यासाठीं व आपल्यावर होणाऱ्या जुलमाची दाद लावण्यासाठीं महाराजांना मदत करण्यासाठीं पुढें सरसावलें पाहिजे. भोर, सांगली, कुरुंदवाड, मिरज, औंध वगैरे छोट्या छोट्या महाराष्ट्रीय संस्थानांच्या प्रजा परिषदा भरवून आपल्याला वाचा आहे एवढें तरी तेथील प्रजा बोलून दाखवू शकते. कोल्हापूरच्या लोकांनीं देखील आपली प्रजापरिषद भरविली पाहिजे. यापुढें अमका गोम्या संस्थानिक तमक्या सोम्याला शेमला बांधितो म्हणूनच त्यांच्यापुढें जी हुजूर म्हणून मुजरा केला पाहिजे ही गुलामी वृत्ती शेतकऱ्यांतली गेली पाहिजे.

◇◇◇

खरी सत्ता हवी, दिखाऊपणा नको !

म. गांधी आपल्या ' यंग इंडियां 'त लिहितात —

राऊन्ड टेबल कॉन्फरन्सला हजर राहावयाचें नाहीं, असें पुनः पुन्हा जाहीर करूनहि जरूर पडल्यास काँग्रेसचें म्हणणें काय आहे तें सदर कॉन्फरन्सपुढें मांडण्यासाठीं (इतर बाबतींत परिस्थिति अनुकूल असल्यास) मी हजर राहावें असा ठराव काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने कां पास केला ही गोष्ट लोकांना कळलीच पाहिजे. सामान्यतः वर्किंग कमिटीच्या बैठकींत ठराव पास होण्यापूर्वी वादविवाद कोणत्या प्रकारचा झाला, कोणत्या उपसूचना नामंजूर झाल्या, कोणते विरोधी स्वरूपाचे ठराव नापास झाले, हे सदर कमिटीच्या कोणाहि सभासदास प्रसिद्ध करतां येणार नाहीं. पण प्रस्तुतच्या बाबतींत वर्किंग कमिटीनें अपवाद म्हणून लोकांसमोर ह्या गोष्टी ठेवण्याचा मला अधिकार दिला आहे. हेतु हा कीं, ठरावाशीं असलेला माझा संबंध मला स्पष्ट करून सांगता यावा आणि वर्किंग कमिटीच्या धोरणाचाहि खुलासा व्हावा.

मी स्वभावतःच खरा लोकसत्तावादी असल्यामुळें, ठरावाला जरी माझा कसून विरोध होता तरी पण त्यापुढें मी मान वाकविली. हरकत घेतली असली तरी तिला एखाद्यानें चिकटून राहिलें पाहिजे असें नाहीं, आणि जर ती मंजूर झाली नाहीं तर एखाद्या संस्थेतून बाहेर निघून जाण्याचा किंवा बहुमतवाल्यांचें मी ऐकणार नाहीं, असा धाक घालण्यापर्यंत मजल गेलीच पाहिजे असें नाहीं. तेव्हां मी वर्किंग कमिटीबरोबर झगडलों, तसेंच सार्वजनिकरीत्या किंवा रीतीनेंहि जें जें कांहीं जाहीर केलें त्याची वर्किंग कमिटीस आठवण करून दिली. इतकेंच नव्हें तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें इष्ट आणि सुसंगत असा ठरावहि कमिटीपुढें ठेवला. पण मला बहुमताचा पाठिंबा मिळाला नाहीं. त्यांना असें वाटलें कीं हिंदु-मुस्लिम प्रश्न मिटवतां आला नाहीं म्हणून राऊन्ड टेबल कॉन्फरन्सला हजर न राहणें म्हणजे शत्रूला पाहिजे तें करणें होय. शिवाय तसें केल्यानें वर्किंग कमिटीविरुद्ध विनाकारण गैरसमज पसरत राहणार.

बहुमतवाल्यांच्या बतीनें पुष्कळ सांगतां येण्याजोगें असलें तथापि माझें म्हणणें हिंदु-मुस्लिम प्रश्नावरील लाहोरच्या ठरावाशीं अधिक सुसंगत होतें असें मी समजतों. हिंदु-मुस्लिम प्रश्न मिटला नाहीं तर राऊन्ड टेबल कॉन्फरन्सला मी हजर राहूं नये असें मीं जाहीर केलें होतें. त्याला तसेंच सबळ कारण होतें, असें मला वाटतें. हिंदु-मुस्लिम प्रश्न न मिटणें याचा अर्थ एकोपा नसणें आणि एकोपा नसणें म्हणजे राष्ट्राची मागणी मान्य होण्यास आवश्यक असलेली तिच्या मागची शक्तिच नसणें होय.

म्हणून वर्किंग कमिटीपुढें मी असा ठराव मांडला कीं, जर दोन्ही पक्षांस संमत अशी तडजोड होऊं शकली नाहीं तर प्रस्तुतच्या राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या मार्फत स्वराज्याची घटना मिळविण्याची आशा काँग्रेसनें सोडून द्यावी व हिंदुस्थानांतील सर्व जाती शुद्ध राष्ट्रीय स्वरूपाची योजना मान्य करावयास तयार होईपर्यंत वाट पाहावी. दरम्यान काँग्रेसला

आपलें सामर्थ्य अधिक सुदृढ करतां येईल. असें झालें म्हणजे आज जशी काँग्रेस हिंदूंना आपली अशी वाटते, तशीच ती इतर समाजांतील श्रमजीवि लोकांस वाटूं लागेल. याचा अर्थ स्वातंत्र्याकरितां चाललेला लढा सोडून देणें नव्हे.

पण ही गोष्ट पूर्ण स्वराज्य याचा आम्ही जो अर्थ करतों, त्याजवर अवलंबून राहील. सामान्य लोकांतील जागृति, आपल्या खऱ्या हितसंबंधांविषयींची त्यांची जाणीव, आणि सर्व जग उलटलें तरी या हितसंबंधांची जोपासना करण्याचें त्याचें सामर्थ्य हाच जर पूर्ण स्वराज्य याचा अर्थ आम्ही केला, तसेंच सर्व लोक एकमेकांशीं गुण्यागोविंदानें वागणें, आगळीक करण्याबद्दलची प्रवृत्ति नष्ट होणें, सर्व लोकांची आर्थिक स्थिति सुधारत (अधिकाधिक) जाईल, अशी व्यवस्था होणें, या गोष्टी जर पूर्ण स्वराज्यापासून आम्हांस प्राप्त करून घ्यावयाच्या असतील तर आमचा हेतु आम्हांस राजकीय सत्ता नसतांहि आणि आज सत्ताधाऱ्यांवर दाब घालून, सिद्धीस नेतां येईल. प्रत्यक्ष कृतीचा एक मार्ग म्हणजे वयांत आलेल्या इसमास राज्यकारभारावर मत व्यक्त करण्याचा अधिकार देणें होय. दुसरा व अधिक कार्यक्षम भाग म्हणजे सत्याग्रह. जर वस्तुस्थिती अशी आहे आणि आटोकाट प्रयत्न केला जात असतांहि हिंदु-मुस्लिम प्रश्न आम्हांस मिटवितां आला नाहीं, तर आतांच स्वराज्याची घटना मिळविण्याचा प्रयत्न आम्हीं सोडून द्यावा, हें उघडपणेंच योग्य ठरतें. क्वचित् परिस्थिति निर्माण करून स्वराज्य इतरांवर लादण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां काँग्रेस अधिक लोकप्रिय होईपर्यंत वाट पाहात असणेच अधिक चांगलें. व असें केल्यानेंच स्वराज्य संपादनाचा हेतु लवकर सफल होईल. जें कांहीं काँग्रेस बोलून दाखविते तेंच जर काँग्रेसला कमवायचें असेल तर सर्व लोक काँग्रेसला येऊन मिळावयास फार दिवस लागणार नाहींत. अर्धपोटी राहणाऱ्या कोडो लोकांचीं दुःखें दूर करण्याचें काँग्रेसनें हातीं घेतलेलें कार्य तिचें त्याच्या वतीनें झगडूनच चालवीत राहिलेंच पाहिजे. जर हें कार्य तिला राजकीय सत्ता मिळवून करतां येत नसेल तर तें सरकार सत्तारूढ असेल त्या सरकारच्या मार्फत त्यांचें दुःख काँग्रेसनें दूर करीत राहिलें पाहिजे या प्रश्नांवर इंग्रज स्नेह्यांशीं चर्चा करीत असतांना मला असें सांगण्यांत आलें, कीं ही गोष्ट उचित दिसत नाहीं. सुधारणा करण्याकरितां लागणारी सत्ता हातीं घ्यावयाची नाहीं आणि सुधारणा देण्यांत आल्या असतां ज्यांना राज्यकारभार चालवितां येणार नाहीं त्यांना वरील गोष्टी करावयास भाग पाडावयाचें ? पण असा टोमणा देणें कसें चुकीचें ठरतें तें मीं निदर्शनास आणून दिलें. जर सत्ता काँग्रेसच्या हातीं देण्यांत येत असेल तर ती घ्यावयास काँग्रेस केव्हांहि तयार आहे. पण नाखूष माणसांच्या हातून सत्ता हिसकून घेण्याइतकी ताकद मात्र आज काँग्रेसच्या अंगीं नाहीं. कारण राऊंड टेबल कॉन्फरन्समुळें फक्त कृत्रिम परिस्थिति निर्माण झाली आहे आणि सत्ता मिळवूं पाहणाऱ्या दोन जातींत खरें ऐक्य प्रस्थापित झालें नाहीं.

काँग्रेसला खरी सत्ता पाहिजे आहे. पोकळ दिखाऊपणा नको आहे. दिखाऊपणाची वाट पाहात काँग्रेस बसूं शकेल; पण ज्या स्वातंत्र्यावांचून मूकवृत्तीनें वागणाऱ्या कोट्यवधि

लोकांचें बिलकुल चालावयाचें नाही व वे-स्वातंत्र्य त्यांस ओळखतां येईल, त्या स्वातंत्र्याकरितां मात्र कॉंग्रेस वाट पाहात बसूं शकणार नाहीं. वर्किंग कमिटीपुढें मी जें माझें म्हणणें मांडलें होतें, त्यापैकीं मुख्य भाग या लेखांत सांगण्यांत आला आहे. पण माझ्या या म्हणण्यास बहुमतांचा पाठिंबा मिळाला नाहीं. जनतेपैकींहि मोठ्या वर्गाची मला कदाचित् खात्री पटवून देता येणार नाहीं पण कॉन्फरन्सनें जर कॉंग्रेसचें म्हणणें मान्य केलें नाहीं तर माझी स्थिति अशीच राहील.

मात्र वर्किंग कमिटीच्या ठरावास मी मान्यता दिली असल्यामुळें त्याची एकनिष्ठेनें अंमलबजावणी मी करीन आणि जर कॉन्फरन्सला हजर राहूं शकलों तर शक्य तितक्या काळजीनें मी माझें कर्तव्य बजावीन. खरी सत्ता मिळत असेल तर तें मी घेण्याचें नाकारणार नाहीं. ती मिळविण्याकरितां मी अंतःकरणपूर्वक झटेन. पण जरूर पडली तर खरी सत्ता मिळविण्यास समर्थ होईपर्यंत वाट पाहण्याइतकी सहनशीलता व शहाणपणा माझ्या अंगीं आहे. मला ठाऊक आहे कीं, अशा रीतीनें वाट पाहणें म्हणजेच सत्ता मिळविण्याचा मार्ग अधिक सुलभ करणें होय.

कै. कोल्हटकर आणि शाहु छत्रपती

[तेज : २० जून १९३१]

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध वर्तमानपत्रकार आणि आमचे परमस्नेही कै. अच्युतराव यांचे शोचनीय निधनावर आज लेख लिहिण्यास आमच्या लेखणीस अत्यंत कष्ट होत आहेत. कोल्हटकरांचा कै. टिळकांशीं झालेल्या शब्दसंग्रामामुळें टिळकभक्तांना ही मृत्यूची बातमी वाचून थोडासा दिलासाहि वाटला असेल. त्यांच्या गेल्या दहा वर्षांच्या पडत्या काळांत त्यांच्या हातून ज्या लोकांना तोशीस लागली असेल त्यांचा त्यांचे संबंधींचा गैरसमजहि असेल, त्यांचेवर आरोपीतले सर्व दुर्गुण गृहित धरूनहि आम्ही असें म्हणूं शकू कीं कसल्याहि दुर्दम शत्रूला नको जीव करणारा बहादर टीकाकार आणि कसल्याहि संकटाशीं बेदर्द टक्कर देणारा साहसी विद्वान आज महाराष्ट्रांतून नाहीसा झाला आहे. मराठी वर्तमानपत्राच्या सृष्टींत त्यांनीं जी क्रांति केली ती अतिरेकामुळें पुढें पुढें लोकांना नावडेशी झाली असेल. त्यांच्या मोकाट आणि बेफाम वागण्यामुळें घायाळ झालेले सभ्य (?) मोठ्या साजुकीनें त्यांची निंदाहि करीत असतील; पण त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं बजावलेली बहुविध देशसेवा बाजूस ठेवली, तरी त्यांतली एकच गोष्ट अशी महत्त्वाची आहे कीं त्यापुढें त्यांचे सर्व दुर्गुण सज्जन म्हणविणाऱ्यांच्या हवाली करून त्यांचें नांव महाराष्ट्राच्या सार्वजनिक पुरुषांत कायमचें करण्यास कारण होईल. १९१४ सालीं कै. टिळक मंडालेहून सुटल्यावर त्यांच्या भगतगणांनीं त्यांना थेट अनभिषिक्त बादशहाच्या तख्तावर नेऊन बसविलेंहि. टिळक म्हणजे सर्व गुणांचें अधिष्ठान, टिळक

म्हणजे परमेश्वराचा अकरावा अवतार असें ठरवून त्यापुढल्या पैसा-सुपारीवर जगणारे भिक्षुकगण, गायकवाडवाड्यांतच काय पण सर्व महाराष्ट्रभर शेणांतल्या किड्याप्रमाणें वुचवुचलेले होते. सामाजिक सुधारणांना अडथळा करणें, मागासलेल्या जातींना पोरकटपणानें हिणवणें किंवा थोडक्यांत "ब्राह्मण" हा टिळकांचाच प्राण होता. अर्थात् त्यामुळें परदेशांतून आल्यावर त्यांच्या तोंडांत पश्चात्तापाचें शेण-गोमूत्र कोंबणारी भटभिक्षुक टिळकांच्या भोवती बरचढ होते ही गोष्ट सर्वांनाच माहीत आहे.

सामाजिक क्षेत्रांत प्रतिस्पर्ध्याला विरोध करणारे टिळक, आणि क्षुल्लक गोष्टींकरितां हमरीतुमरी येणारा मवाली यांच्या भाषेंत कांहीं फरक होता असे दाखविणारा कोणी निघालाच तरच आश्चर्य! संमतिवयाचा कायदा, पुण्याची सामाजिक परिषद, वेदोक्त प्रकरण, शिक्षणाचा प्रश्न या सर्व गोष्टी महाराष्ट्रापुढें आहेतच. अशा नायकाच्या भक्तगणांनीं त्याच्या राजकीय चळवळीच्या पुण्याईवर सामाजिक सुधारणेला ठेचून टाकण्याचा प्रयत्न चालविला होता. कै. आगरकर, कै. गोखले, कै. रानडे वगैरे सर्व सुधारकांना शिव्या देणें, सुधारकांचा उपहास करणें, त्यांना छळणें हा टिळकांच्या वासनेचा खेळ होता. त्यामुळें सहसा कोणाच्या भानगडींत न पडणारे लोक ह्या उन्मत्त भिक्षुकशाहीला भिऊन असत. गणपति उत्सव ही टिळकशाहींची पर्वणी. ह्या उत्सवांत सुधारकांच्या आयाबहिणींचे अब्रूचे धिंडवडे निघालेले अनेकांनीं पाहिल्याचें अजून स्मरत असेल. आणि अश्लिल आणि बीभत्स शिमग्याबद्दल गायकवाडवाड्यांत मिळालेलीं बक्षिसें अजून कित्येकांनीं जपून ठेवलीं असतील. कै. कोल्हटकरहि याच कंपनीचे प्रथम एक सभासद होते, संगतिगुणानें त्यांचेहि हातून प्रथम ब्राह्मणेतरांसंबंधी अन्याय घडले.

१९१८ च्या सुमारास टिळकांना कांकणभर जास्त भाष्याचा भक्कम प्रतिस्पर्धी मिळाला. कोट्यवधि मराठ्यांना "यदोक्त" म्हणून टवाळी करणाऱ्या टिळक-भक्तांना त्यांच्या पाळ्यामुळ्यासह हात घालून उपटण्याचा भगीरथ प्रयत्न कै. करवीरकर छत्रपती यांनीं सुरूं केला. यावेळीं टिळक-भक्तांची गांठ हळूहळू बोलणाऱ्या मवाळांशी नव्हती, की सुधारकांशी नव्हती. यावेळीं, ठोक्यास ठोका, जोड्यास जोडा ठणकावणाऱ्या मराठ्यांशीं झगडण्याचा प्रसंग येतला, सुधारकांच्या करतां राखून ठेवलेलीं अंडीं खुद्द टिळकांनाच भर समेंत पत्करावीं लागलीं, आणि भिक्षुकशाहीवर बाहेरून जोराचा हल्ला सुरूं झाला. परंतु हा बाहेरचा हल्ला होता. बाहेरून हल्ला झाला तरी टिळकांच्या आसपास एकहि बिभीषण नव्हता. जो तो आपलें साधण्यास पाहणारा. कोणी भावाकरितां, कोणी प्रस्टीजकरितां, कोणी पैशाकरितां टिळक पक्षाला भिऊनच चूपचाप! अशा ऐनवेळीं कोल्हटकरांचा "संदेश" तोफेच्या गोळ्यासारखा एकदम दणाणला. किल्ल्यांतील तोफेमुळें "टिळक बाळेंत झाले", "फंडगुंडांचें बंड फुटलें", "नसोंपंत तळमळूं लागले", "वासूकाका पळूं लागले". आणि खुद्द टिळकहि बरळूं लागले. "अरे! आपल्यांतला हा कोल्हटकर आपली याने स्तुति करावयाची आणि आधीच बहुजनसमाज ब्राह्मणांवर बिथरला असतां आपलीं प.पें महाराष्ट्राच्या वेशीवर बांधतो" झालें? खवळलेली

भिक्षुकशाही कोल्हटकरांच्या अंगावर प्रत्यक्ष रॉकेल फेकून त्यांना जिवंत जाळण्यास सज्ज झाली. त्यांनीं सभेत बोलूं नये, वाटेंत चालूं नये, घरचे हालूं नये याकरितां जेवढे नीचपणाचे उपाय असतील तेवढे सर्व घेऊन ह्या धैर्याच्या महामेरूवर ती धावून आली. कोल्हटकरांच्या ह्या हल्ल्यामुळें महाराष्ट्रातल्या ब्राह्मणेतरांच्या डोळ्यांवरची झापड एकाच दणक्याला गेली. आणि त्यामुळेंच भिक्षुकीशाही अजूनही त्यांच्या समाधीकडे पाहून बोटें मोडल्याशिवाय राहणार नाहीं.

टिळकांची बेदरकार नोकरशाही जिनें टिळकांच्या पुत्राचाहि बळी घेतला, तो कोल्हटकरांना छळण्यास तयार. आजूबाजूचे मित्र म्हणविणारे पण त्या टिळकबाजीस हरणारे ब्राह्मण मित्र, या वेळेपर्यंत संदेशकारांच्या पुण्याईवर त्यांच्या दारांत पंचपक्वान्नांवर ताव मारीत पडलेले स्नेही (?) नेमके त्यांचे शत्रु बनले! अशा परिस्थितींत एकाकी असतांना उन्मत्त शत्रूला टक्कर देणें हें नुसत्या वर्तमानपत्रकाराचें काम नाहीं हें निधड्या छातीच्या बहाद्दराचें काम आहे. लेखणी गरम असली, वाणी गरम असली पण प्रकृतिच नरम असली तर त्याच्या हातून तसलीं कामें होत नाहींत.

अशा प्रसंगीं 'संदेश'ची कामगिरी महाराष्ट्राच्या मानेवरलें भिक्षुकी गळूं कापण्यास मदत करतेसें पाहून कै. करवीकर छत्रपति आश्चर्यानें स्तंभित झाले. अशा गृहस्थाच्या मदतीस धावून गेले पाहिजे म्हणून त्यांनीं संदेशकारांची भेट घेण्याची कामगिरी आमचेवर सोपविली आणि त्याच वेळेपासून आमचा स्नेह जडला. कोल्हापूरनें संदेशला मदत केली ती यावेळीं केली. ही आगाऊ देण्याची लाच नव्हती. हें स्वयंस्फूर्तीनें लढाई मारल्यानंतर छत्रपतीनें दिलेला शिरपेच होता. परंतु यावेळची खरी गोष्ट माहीत असलेलीं माणसें फार थोडीं आहेत. हा शिरपेच छत्रपतींचा होता तरी संदेशकारांनीं नाकारला. हें आज कोणाला सांगितलें तर खरेंसुद्धां वाटणार नाहीं. त्यांनीं तो नाकारला, कांहीं कर्ज म्हणून पैसे स्वीकारले (पत्करले) पण ते कर्ज संदेश प्रेस उचलून देऊन त्यांनीं फेडलें आहे. तोच प्रेस पुढें "शिवछत्रपति प्रेस" म्हणून ब्राह्मणेतर प्रेस झाला. मशिनरी काढून नेत असतां जे पहारीचे आवाज होत, तेव्हां त्यांचा लहानसा "बंड्या" रडू लागला आणि "रडतोस कां आपण नवा प्रेस घेण्याकरितां जुना देत आहोत." असें म्हणून संदेशकार त्याची समजूत घालीत होते. आम्हांला तो प्रसंग अजून डोळ्यांपुढें दिसतो आहे. संदेशला कोल्हापूरनें मदत केली, ती किती केली आणि कां केली या सर्व गोष्टी आम्हांला नक्की माहीत आहेत. आणि त्याबरोबर कोल्हटकरांच्या निंदकांना आम्ही एवढेंच कळवीत आहोंत कीं, कै. राजर्षींची इच्छा उदारपणाचीच होती. त्यांना संदेशला सांगायचेंच होतें. पण संदेशकारांच्या बऱ्याच विक्षिप्तपणामुळें "संदेश" छत्रपतींनाहि मिळूं शकला नाहीं. जी मदत कर्जरूपानें घेतली तीच कोल्हटकरांना बाधली. असें झालें तरी शेवटपर्यंत त्यांनीं छत्रपतींशीं इमान ठेवलें. मनुष्याच्या पाठी एखादा विविक्षित कंपू हात धुवून लागला कीं त्या माणसाविषयीं वाटेल तशा कंड्या उठविणें सोपें जातें. विशेषतः ह्या कंड्या-कुटाळ्यांत भिक्षुकशाही अत्यंत प्रवीण आहे.

गौतम बुद्धापासून तो कोणत्याहि सामान्य समाजसुधारकाचा कार्यनाश व्हावा म्हणून भिक्षुकशाहीनें कोण्याविषयीं कंड्या उठविल्या नाहींत ? संदेशकारांना या कंड्यांमुळें—ते एवढें जरी धैर्यशाली बेफीकीर–बेगुमान—होते–तरी ह्या कंड्यांमुळें त्यांना किती मानसिक यातना होत असत हें त्यांच्या निकट सान्निध्यांतल्या माणसांना जरी ते समजूं देत नसत. पण सहज संभाषणाच्या ओघांत दिसून येत असे. एकदा मनुष्यांवर संकटांचे पर्वत कोसळूं लागले म्हणजे तो त्यांतून सुटण्याकरितां भलेबुरे उपाय शोधूं लागतो. पुढें त्याच्या हातून चुकाही होऊं लागतात, "संदेश"कारांच्या परिस्थितीत त्यांना नांवें ठेवणाऱ्यांपैकी एकहि सांपडला, तर तो काय प्रकारचा मनुष्य झाला असता आणि अशा परिस्थितींत संदेशकारांनीं शेवटपर्यंत किती जोरानें नेट धरला हें पाहिलें म्हणजे त्यांच्याविषयीं आदरच वाटूं लागेल.

"संदेश" पत्राविषयीं त्यांची अगदीं एकतानता झालेली होती. त्यांना आम्हीं एकदा विचारलें, "साहेब, हल्लीं काय करतांहां" तर त्यांनीं सहज हंसत उत्तर दिलें, "संदेश असला म्हणजे लिहीत असतो आणि नसला म्हणजे काढण्याचा प्रयत्न करीत असतो." संदेशशिवाय त्यांना कांहींच सुचत नसे. पत्राच्या इतर खटपटीमुळें शेवटीं शेवटीं त्यांचें लिखाणहि अगदीं खालच्या व हलक्या दर्जाला आलें होतें. सांपत्तिक अडचणीमुळें अगर मनाच्या अस्वास्थ्यामुळें कांहीं लेख त्यांनीं असले भरमसाट लिहिले कीं ते न लिहिले असते तर बरें असें वाटूं लागतें. असो, कोल्हटकरांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रांतला एक बहुश्रुत वक्ता आणि विद्वान लेखक नाहींसा झाला आहे. परमेश्वर मृताच्या आत्म्यास आतां तरी शांति देवो !

◇◇◇

ब्राह्मणेतर चळवळ

[तेज : ११ जुलै १९३१]

महाराष्ट्रांत आजपर्यंत जी ब्राह्मणेतर चळवळ झाली तिच्याकडे पाहण्याच्या अनेकांच्या अनेक दृष्टि आहेत. म. फुले यांचा सत्यशोधक समाज आणि त्याला १९१६–१७ च्या सुमारास दिसलेला राजकीय पेहराव यामुळें जो घोटाळा जडगें अपरिहार्य आहे तो उडालाच. कै. म. फुले, भालेकार, लोखंडे, पाटील, डुंबरे वगैरे सत्यशोधकांचे आद्यप्रवर्तक यांचें पुढें नुसतेंच सामाजिक कार्य होतें. त्या वेळचा काळहि नुसत्या समाजकारणाचाच

होता. अगदी मोठें राजकारण म्हणजे इंग्रजी बहादुरांच्या ऑफिसांत नोकऱ्या, परंतु अशाहि परिस्थितींत सदर सत्यशोधक पुढाऱ्यांमध्यें जी दूरदृष्टि होती तिचींच फळें आज ब्राह्मणेतर जनतेला दिसत आहेत. सामाजिक स्वरूपांतून तिचें राजकारणांत रूपांतर करतांना मात्र तिला जे पुढारी लाभले त्यांच्यांत, परिस्थितीनें भांबावून किंवा कोणत्या तरी कारणानें एक मोठी घोडचूक झाली. आणि त्या घोडचुकीमुळेंच ब्राह्मणेतर चळवळ थंडावत चालली आहे. सत्यशोधकांचें ब्राह्मण्य-विध्वंसक तत्त्व हा ब्राह्मणेतर चळवळीचा प्राण होता. आणि हें तत्त्व ज्यांना मान्य होतें अशांनाच ब्राह्मणेतर चळवळींत प्रवेश होणें इष्ट होतें. पण क्षणिक स्वार्थाकरितां त्यावेळच्या सूत्रधारांनीं एवढ्याच गोष्टीकडे दुर्लक्ष केलें. साधारणतः १९२० सालापर्यंत नाबीन्यामुळें पुढाऱ्यांत एकी होती. परंतु पायांतच तत्त्वच्युतीचा घातक बाँब पुरल्यामुळें इमारतीला केव्हां धक्का बसेल याचा नेम नव्हता. चळवळींत सामील होणें किंवा ब्राह्मणेतर म्हणवून घेणें अगर ब्राह्मणेतर पक्षाचा अभिमान दाखविणें याला विशिष्ट सूत्र, ध्येय किंवा अधिष्ठान असें कांहींच नव्हतें. प्रथम ब्राह्मणांचा मोठा विरोध, लोकांमध्यें अप्रिय होण्याची धास्ती असल्याकारणानें जीं माणसें प्रथम चळवळींत पडलीं **तीं अगदीं बेचक माणसें** होतीं. त्यांना जीर्ण-मतवाद्यांचे शिव्याशाप सहन करावे लागले. ब्राह्मणांच्या चिथावणीनें धर्माच्या मद्यानें धुंद झालेल्या आपल्याच अडाणी भाईबंदांकडून मारहि खावा लागला. सुरुवातीस धैर्यानें टक्कर देणाऱ्या या पुढाऱ्यांचें यावाबतींत मात्र कोणीहि अभिनंदन करील. चळवळ जाति मोडण्याकरितां आहे. अर्थात जाति कोणाला मोडाव्याशा वाटतात; तर ज्यांना कोणतीहि जात हक्कानें सांगता येत नाहीं. म्हणूनच ज्यांचा मराठा समाजांत प्रवेश झाला अशा लोकांना जाति मोडाव्याशा वाटणार असा ब्राह्मणांनीं पुढाऱ्यांना नामोहरम करण्याचा डाव आरंभिला. खुद्द छत्रपती शाहु महाराज चळवळींत पडेपर्यंत तसा कोणी मराठाहि चळवळीच्या अग्रभागीं नव्हता. सत्यशोधक चळवळीचे प्रमुख अग्रणी ना. भास्करराव जाधव हे कोल्हापूरच्या नोकरीत. पुण्यामध्यें किंवा महाराष्ट्रांत अगदीं चळवळीस बाहिलेला असा एकहि मराठा पुढारी नव्हता. कै. डुंबरे वगैरे जुने मराठे सत्यशोधक दिवंगत झालेले. अशा स्थितींत, जीं माणसें पुढें आलीं तींच पुढें येणें खरें होतें. ज्यांना कसली माहिती नाहीं. ज्यांना.....

दुष्ट चालीरितीत वाढलेल्या, संबंधित असलेले, असे पददलित कार्यकर्ते जेव्हां पुढें येऊं लागतात तेव्हांच समाज हादरून जातो. खानदानी किंवा अस्सल म्हणविणारे हे भटांचे पाय चाटींत बसलेले, स्वतःच्या वडिलांच्या कारकीर्दीचें गाणें करण्यांत रंगलेले. ब्राह्मणेतर चळवळीकडे उपाहासानें पाहात बसलेले. ब्राह्मण समाज तर ब्राह्मणेतर चळवळीच्या मुळावर उठलेला. अशा परिस्थितींत त्याचे कोणत्या तरी ठिकाणीं बस्तान बसलेलें आहे. अशीं माणसें पुढें येणें शक्य नव्हतें. यांना आपलें बस्तान संभाळावयाचें असतें. कै. छत्रपति, कै. बाबुराव जाधव, कै. डुंबरे पाटील, रा. कीर्तिवानराव निंबाळकर पारखे, हे दोघे अन्नदाते म्हणविणारे पुढारी साहेब दिले पण अगदीं महाराष्ट्राचा

म्हणतां येईल असा एकही 'मराठा' पुढारी खानदान म्हणविण्याऱ्यांनीं पुरवला नाही. ..... तत्त्वाकरितां शिव्याहि सहन करणें.....पडणार ! ते आपल्या मिजाशींत सुंयईचे न्याय चळवळीच्या साम्यात असते. ब्राह्मणेतर चळवळीला ह्या खानदानीवाल्यानें प्रथम जो विरोध केला तो व्हावयास पाहिजे होता. १९२०–२१ च्या सुमारापर्यंत नगरच्या नवल्यासारख्यांच्यापर्यंत सर्व मराठे ब्राह्मणेतर चळवळीचे विरोधक होते. ही खानदानी म्हणवणारीं माणसें चळवळींत जेव्हां पडलीं तेव्हां बिचाऱ्या बहिष्कृत नसल्या तरी उपहासित त्रस्त अशा परिस्थितींतून निघालेल्या पुढाऱ्यांनीं ब्राह्मणेतर चळवळीची इमारत संपूर्ण उभी केली होती. कौन्सिलच्या निवडणुकाहि आल्या तेव्हां मराठे म्हणविणारे सर्व लोक आळस बाजूला सारून चळवळीचा फायद घेण्याकरतां जाऊन आले. त्यांत मराठा म्हणविणाऱ्यांनीं प्रथम नेट धरला होता. त्यांत असे कांहीं निघाले कीं आपलें सार्वजनिक काम मिळून नुसती "मराठा" जात त्यांना मिळवायची होती. जातिभेद मोडण्याकरितां निघालेले वीर स्वतःला "मराठ्यां"त गोवून घेण्याकरितां वाटेल ते पातक करण्यास तयार झाले. येथेंच अधःपात सुरू झाला. येथें ब्राह्मण्य विध्वंसपण हें ध्येय सुटलें आणि येथेंच व्यक्तिविषयक मोठेपणा वाढविण्याची महत्त्वाकांक्षा उद्भवली. शिवाजीचे वंशजाचे ताब्यातले सरदार हाणून पाडण्यासाठीं (करितां) पेशव्यांनीं ज्या युक्त्या लढविल्या, तसल्या युक्त्या लढविण्यास सुरुवात झाली. पुढारी कसाही असो, तो सत्यशोधक असो अगर नसो, फक्त तो मराठा असो नाहीं तर शंकराचार्यप्रणित पद्पंजावर लोळणारा असो, त्यानें ब्राह्मणेतर चळवळीला सहाय्य केलेला असो अगर नसो, फक्त तो मराठा हवा. आणि त्याचा उपयोग नुसती कोणाची तरी इभ्रत वाढविण्याकरितां व्हावा असा जेव्हां पायंडा पडला तेव्हां चळवळ टिकणार कशी ? ब्राह्मणेतर चळवळीची आजची दैना इतकी शोचनीय आहे की याचें दुसरें कारण नाहीं. नुसता "मराठा" असणें एवढ्याच भांडवलावर पुढारपण मिळतें असा कांहीं लोकांनीं अदमास काढल्यामुळें कांहीं प्राणी मराठे होण्याच्या नादी लागले. परंतु त्यामुळें सर्व मराठे तर असंतुष्ट होऊन मराठा-मराठेतर ही दुफळी पडली गेली. दोन्ही समाजांतले कर्तबगार एकमेकांवर गुरगुरूं लागले. बिचारे दोन्ही डगरीवर हात ठेवणारे मध्येंच लोंबकळू लागले. जातिभेद मोडणारांना "जाती" करतांच भांडण्याची पाळी आली. हे दृश्य अत्यंत किळसवाणें आहे. मराठा-मराठेतर ही भावना उत्पन्न होणें हाच सत्यशोधक पुढाऱ्यांचा अधःपात आहे. ही जखम झाकून ठेवून आपण वेळ मारून नेऊं असें पुढाऱ्यांना अजून भ्रम आहे. पण तो निव्वळ भ्रमच आहे. दुखावलेले मराठेतर पुढारी जोपर्यंत "ब्राह्मणेतर" वातावरणांत आहेत तोपर्यंत ते मराठ्यांचा द्वेष करणारच. एखाद्या शिंपी गृहस्थानें असें जर म्हटलें आणि ते गृहस्थ तसे नेहमीं म्हणतहि असतात, कीं ते निव्वळ जातीनें शिंपी आहेत, त्याबद्दल त्यांना अभिमान आहे. त्यामुळें ते ब्राह्मणेतर चळवळींकरितां तनमनधनेंकरून एक तप सेवा केली आहे. परंतु दुसरा गृहस्थ समजा बाप सोनार आणि आई शिंपी कोणीतरी अशा पोटीं जन्मलेला. वास्तविक

त्यांत स्वाभाविक कांहीं अपराध नाहीं. पण तो "मराठा" जात लावतो. एवढ्यावरूनच त्यानें मग ब्राह्मणेतरांना मदत केलेली असो अगर नसो, पण सर्व सत्यशोधक म्हणविणारे मराठेहि अशाच मराठ्या (?) ला निव्वळ मराठा म्हणून मदत करतात हे पाहून सदर इमानी सत्यशोधक शिंपी चिडला तर त्याला दोष कोण देईल? जेव्हां तत्त्वाचें अधिष्ठान सुटून तोंडपुजेपणाला महत्त्व येतें तेव्हां असे प्रकार घडणारच. ब्राह्मणेतर चळवळींत ही पेशवाई सुरू झाली आहे. आणि तिचा शेवटहि जवळ आलेला आहे. हे कटु सत्य आज कोणाला बोलवत नसेल. पण प्रत्येक "ब्राह्मणेतर" हळूहळू "शेतकरी" होत चालला आहे. दक्षिणी संस्थानांतील ब्राह्मणेतर प्रजामंडळ स्थापण्याची सूचना कोल्हापूरच्या सत्यवादी पत्रानें केली होती. पण "ब्राह्मणेतर" नांव नको म्हणून दक्षिणी संस्थान-शेतकरी मंडळ स्थापावें अशा ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनींच सूचना केल्या आहेत. या मंडाळा-बद्दलचीं मतें "रा. ..... पुणें या पत्त्यावर कळवावींत असेंहि 'सत्यवादी' पत्रानें विनविलें आहे. "ब्राह्मणेतर" नांवाखाली जास्तच कचरा जमूं लागला तर सध्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना असा कांहीं तरी मार्ग काढावा लागणारच. ब्राह्मणेतर प्रजामंडळ निघालें समजा, संस्थानिकहि ब्राह्मणेतर असला तरी तो असणार मराठा आणि तेथें मराठेतरांची गळचेपी होत असणार. संस्थानिक म्हणणार मीहि ब्राह्मणेतर आहे. मग माझी ब्राह्मणेतर प्रजा मला कां सतावितें? ही अडचण उद्भवूं नये म्हणून प्रथमपासून शेतकरी प्रजा-मंडळ नांव घेण्यांत सदर संस्थानी पुढाऱ्यांनीं दूरदर्शित्व दाखविलें याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. पण एवढीच एक सूचना करावयाची आहे कीं पुण्याला लँड लीग किंवा शेतकरी संघाप्रमाणें या मंडळाची अवस्था होऊं नये अशी खबरदारी घेण्यांत यावी. नाहींतर हैदराबाद संस्थानांतील प्रजेची परिषद आणि अध्यक्ष ....., स्वागताध्यक्ष भोपटकर? ही चूक होऊं न देतां संस्थानी पुढाऱ्यांनाच यांत जास्त भाग घेऊं द्यावा, व खालसांतील कार्यकर्त्यांनीं त्यांना मदत करावी.

◇◇◇

सत्यशोधक महात्मा गांधी

[तेज : १८ जुलै १९३१]

चाळीस वर्षांपूर्वी मोहनदास करमचंद गांधी हे नांव कोणास माहीतहि नव्हतें. त्याच नांवाचा आज त्रिखंडांत सर्वत्र जय-जयकार होत आहे. अखिल मानवजातीच्या

उद्धारार्थ कायावाचामनें झटणारा हा पुरुष आज जगद्वंद्य ठरला. या पुढील कित्येक शतकांत असा अद्वितीय पुण्यपुरुष पुन्हां निर्माण होणें अश्यक्य वाटूं लागलें आहे. अनत्याचारी व्रताचा स्वीकार करून केवळ निःस्वार्थ बुद्धीने गांजलेल्या जीवांना दुःखमुक्त करण्याचें खडतर व्रत या महापुरुषानें आजपर्यंत अखंड चालविलें आहे. कोणी आज त्यांना येशू ख्रिस्ताच्या पदवीला नेऊन बसवितो, तर कोणी सवाई महंमद पैगंबर बनवितो. कोणी साधू म्हणून त्यांची पूजा बांधतो, तर कोणी तत्त्वज्ञानी म्हणून त्यांना साक्रेटिस, टॉलस्टॉय यांच्या पंक्तीला नेऊन बसवितो. कोणी त्यांना स्वातंत्र्याचा निःसीम उपासक म्हणतात, तर कोणी त्यांचा महा-राजकारणी पुरुष म्हणून गौरव करतात. कोणी धर्मात्मा तर कोणी काव्यात्मा. सारांश, नाना विषयांतील उपासक एकमतानें त्यांचें श्रेष्ठत्व कबूल करतात. कोणासही सहसा न मिळणारा मान आज त्यांना हटकून कोठेंहि मिळतो. यांतच त्यांच्या दिव्य संदेशाचें कौतुक चाललेलें पाहावयास मिळतें. आज ३३ कोटी लोकांनीं आपलीं सर्व सूत्रें जवळजवळ त्यांच्याच हातांत दिलेलीं दिसतात. या एकाच गोष्टीवरून या अलौकिक विभूतीवर जनताजनार्दनाचें किती प्रेम आहे. हें स्पष्ट दिसतें.

हिंदुस्थानच्या दारिद्र्याला कारण राजकीय परिस्थिति होय, हे आतां कोणाला नव्यानें सांगण्याची जरुरी नाही. परकीयांच्या सत्तेवर त्यांचा व्यापार या देशांत सुरळीत चालूं लागला. त्यामुळें इकडील मजूर व शेतकरी वर्गाची स्थिति इतकी खालावली गेली कीं त्यामुळें लौकरच देशांत अशान्तता माजण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. सर्वस्वी सत्ता परकीयांच्या हातीं स्वकीयापेक्षां परकीयांवर सत्ताधाऱ्यांची विशेष मेहरनजर त्यामुळें हां हां म्हणतां हिंदुस्थानचा धुव्वा उडवितां येईल याच घमेंडीवर जेव्हां सत्ताधारी या देशांत बेदरकारपणें धुमाकूळ घालूं लागले. तेव्हां अनेक स्वातंत्र्यप्रिय देशभक्तांनीं आपआपल्या निरनिराळ्या योजना देशापुढें मांडल्या. ध्येय एकच परंतु मार्ग मात्र निराळे. असे अनेकांनीं अनेक प्रयत्न केले. कित्येकांच्या पदरी अपयशाचा वाटा आला. कित्येकांच्या योजना पसंत झाल्या. परंतु हरएक बाबतींत प्रतिकूल परिस्थिती त्यामुळें त्या कृतीत उतरण्यास लोक समाज तयार झाला नाहीं. देशांतील एकंदर परिस्थितीचा बलाबलाचा पूर्णपणें विचार करून म. गांधींनीं असत्याच्याहि मार्गानें संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचा अट्टाहास घेतला व तो तडीस नेण्याचा ते जीवापाड प्रयत्न करीत. चालूं स्वातंत्र्य-लढ्याचा दोन वर्षांचा ताजा इतिहास वाचून हेंच प्रत्येकास कबूल करावें लागेल कीं, शेंकडो लोकप्रिय पुढाऱ्यांनीं ५० वर्षें सतत परिश्रम घेऊन, जितका लोकसमाज जागृत केला असता, तितका केवळ दोन वर्षांत म. गांधींना केला आहे. हें काम दिसावयास सोपें दिसलें तरी त्याबद्दल म. गांधींना प्रत्येक दिशेनें किती तयारी करावी लागली असेल, याची कल्पना कोणासही सांगून किंवा लिहून येणार नाही. आज सर्व जगाचें लक्ष हिंदुस्थानकडे लागलें आहे. इतक्या अल्प काळांत केवळ सत्याच्या पायावर एवढी भयंकर जागृति करणें हें कितीतरी दुर्घट काम आहे ! या देशांत नाना धर्म, पंथ, जाती, उपजाती, पोटजाती आपापसांत स्वैर धुमाकूळ घालीत असतांना, केवळ स्वतःच्या

नैतिक सामर्थ्याबरच त्यांची एकी घडवून आणणें, हे काम कोणाहि खिस्तास किंवा पैगंबरास आजच्या स्थितींत शक्य झालें असतें, असें आम्हांस वाटत नाहीं.

हिंदुस्थानचा भाग्योदय केव्हां होईल हें जरी आज नाहीं सांगता आलें तरी एवढें मात्र निश्चित सांगतां येईल कीं, भाग्योदय काल समीप येऊन ठेपला आहे. देशांत आपापल्यांत दुही माजविण्याचे कितीही प्रयत्न झाले तरी केव्हांतरी देशबांधवांना आपला मूर्खपणा दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. आज सर्वत्र जिकडे तिकडे अनश्चिततेचें वातावरण उत्पन्न झाल्यामुळें पुढील लढ्याविषयीं मनांत अनेक शंकाकुशंका डोकावूं लागतात. या अत्यंत आणीबाणीच्या वेळीं आनुभविक, कसलेल्या ब्रिटिश मुत्सद्यांना जर खरोखरीच सारासार विचार करण्याचें ज्ञान असेल तरच दोन्ही राष्ट्रांचा सलोखा यापुढें हितावह होईल. अखिल राष्ट्रांतफें, केवळ अर्धनग्न स्थितीत साधूपणानें राहणारा फकीर, स्वराज्याच्या मागणीसाठीं इंग्लंड देशांतील लंडन राजधानींत प्रवेश करणार यापेक्षां आनंदाची गोष्ट ती कोणती ? पण या मागणीला धुडकावूनच लावली तर देशाची स्थिति काय होईल हें सांगता येत नाहीं.

राजकीय परिस्थितींत इतकें झपाट्यानें स्थित्यंतर कसें झालें असावें ? आज देशांतील सर्व लहानमोठ्या संस्था राष्ट्रीय सभेच्या निशाणाखालीं एकदम कशा जमल्या ? आपापसातील धार्मिक, सामाजिक मतभेदांचा मत्सराग्नि कोणी विझविला ? इत्यादि अनेक प्रश्नांचें निरसन करणें झाल्यास म. गांधींच्या जबर पुण्याईकडे व कर्तव्यनिष्ठेकडे बोट दाखवावें लागेल. तारुण्याच्या ऐन जवानींत घोडदौडीनें मार्ग काढणाऱ्या कर्तबगार माणसांना महात्माजींनीं आज गोगलगाय बनविलें आहे. बुद्धिवादानें जग जिंकूं पाहणाऱ्या हजारों तरुणांना महात्माजींनीं आज आपल्या अफाट तपःसामर्थ्यानें थोपवून धरलें आहे.

रूढीच्या वणव्यांत हजारों वर्षें होरपळत पडलेला समाज आपसांतील मतमतांतरें विसरून गुलामगिरींचें जूं फेकून देण्यास आज एका पायावर तयार झाला आहे. यावरून परकीय सत्तेमुळें देशांतील सर्व लोक किती गांजलेले आहेत, याची कल्पना येते. शेतकरी आणि मजूर या वर्गांसाठी निःस्वार्थपणानें झटणारा महात्मा त्यांची उन्नति केल्याशिवाय राहणार नाहीं, असें आजच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन म्हटल्यास धोक्याचें होणार नाहीं.

हिंदुस्थानच्या पिंडप्रकृतीचा नीट अभ्यास करून त्याला रुचतील पचतील असे सिद्धान्त शोधून काढणें व त्यांना व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न करणें हेंच कार्य महात्माजींनीं स्वतःच्या शिरावर घेतलें आहे. कित्येकांना त्यांचीं मतें पटतात न पटतात परंतु त्यांच्या तत्त्वाचा पाडाव करण्याचें सामर्थ्य कोणाच्याही अंगीं नाहीं. घरोघरी चरखा फिरवून सूत काढणें व त्याचें कापड विणणें, दारूचें व्यसन हिंदुस्थानच्या हद्दपार करणें, अस्पृश्यता निवारणार्थ झटणें, हिंदु-मुसलमानांत एकी घडवून आणणें इत्यादि अनेक जिव्हाळ्याच्या विषयांवर त्यांनीं अहर्निश आटोकाट प्रयत्न केले. ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं किंवा पत्रकर्त्यांनीं कितीही आरडाओरड करून गैरसमज पसरविण्याचे विराट प्रयत्न केले, तरी

देशांतील वस्तुस्थिती पाहणाऱ्या कोणाही पाषाणहृदयी परकीयाला हिंदुस्थानच्या प्रेमाचा पाझर फुटल्याविना राहणार नाहीं.

हिंदी लोकांची सर्वत्र जगभर छी: थू: व्हावी या उद्देशानें, ब्रिटिश पत्रकर्ते हिंदुस्थानचीं हिडीस चित्रें नित्यशः अत्यंत निष्ठुरपणें रंगविण्यांत गुंतून गेले आहेत. दिल्ली शहर सिलोनची राजधानी समजणारा ज्ञानशून्य (?) इंग्लिश मुत्सद्दी म. गांधी किंवा त्यांचे अनुयायी यांची टर उडविण्यास चुकत नाहीं. हिंदुस्थानांत सर्वत्र रानटी लोक नांदतात, हिंदुस्थानांतील माणसें माणसाला खातात. हिंदुस्थानांत ८ वर्षांच्या मुलीला मुलें होतात. हिंदुलोक सापासारखे विषारी प्राणी मटामट खातात. इत्यादि अनेक अत्यंत निंद्य कपोल-कल्पित गोष्टी इंग्लंडमध्यें कोणीहि कोणास सांगाव्या व आपल्या जीवाची करमणूक करून घ्यावी. ब्रिटिश मुत्सद्दी व बहुतेक वर्तमानपत्रकार यांचें हिंदुस्थानविषयक ऐतिहासिक किंवा भौगोलिक ज्ञान किती अगाध आहे याची कल्पनाहि आपल्याकडील लोकांना येणार नाहीं. अशी वास्तविक वस्तुस्थिती असतांना इकडे हिंदुस्थानांत कोटें एखाद्या शहरांतल्या कोपऱ्यांत नुसता फटाकडा वाजला तर बॉम्ब, क्रान्ति इत्यादि शब्दांनी भयंकर वर्णन करणारीं किती तरी पत्रें तिकडे लाखांनींहि खपत असतात! हिंदुस्थानांत घडणाऱ्या कित्येक सनदशीर चळवळीचा तिकडे मागमूसही नाहीं. उलट ब्रिटिशांच्या यत्किंचित हिताहिताच्या प्रश्नाबद्दल वर्तमानपत्रें विकणाऱ्या पोऱ्यापासून तो पार्लमेन्टांतील अतिरथी-महारथीपर्यंत केव्हांही प्रश्नोत्तरांची केवढी खळबळ उडालेली दिसते!

हाताच्या बोटावर मोजतां येतील इतक्या विरोधी नेत्यांनीं म. गांधींचें अंतरंग समजावून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां आतां कोटें म. गांधी शान्तीचे भोक्ते आहेत म्हणून थोडेसें त्यांना कळूं लागलें आहे. अनत्याचारी मताची जीवापाड जोपासना करणाऱ्या गांधींना ब्रिटिश पत्रकारांनीं क्रांतिकारक ठरविलें. इतकेंच नव्हे, तर कानपूर-सारखीं बंडें करून हजारों निरपराधी लोकांना ठार मारण्याचें खापर त्यांनीं गांधींच्याच माथीं फोडलें. स्वार्थांध ब्रिटिश मुत्सद्द्यांना हिंदुस्थानांतील स्वतःची इभ्रत राखण्यासाठीं निष्कारण त्यांच्यावर अनेक दोषारोप करण्यांत येऊं लागले. ही स्थिति कोठपर्यंत चालत राहणार याबद्दल जरी आज कांहीं तर्क बांधता येत नाहीं, तरी पण एवढें मात्र खात्रीनें सांगतां येईल कीं, म. गांधी राऊंड टेबल परिषदेस जाण्यानें बऱ्याचशा खऱ्या गोष्टी उजेडांत येतील व ब्रिटिश वर्तमानपत्रकारांना आपलीं कित्येक विधानें परत घ्यावीं लागतील. परंतु महात्माजींचें जाणें अद्याप इकडील बऱ्याचशा गोष्टींच्या निकालावर अवलंबून असल्यामुळें त्यांहीबद्दल सध्या न बोललेलें बरें!

अहिंसा, अनत्याचार, सत्य या उच्च तत्त्वांच्या पायावर एवढी भयंकर चळवळ आज हिंदुस्थानांत सनदशीर मार्गानें पसरली गेली आहे. याचें इंगित इतक्या दिवसांनंतर कळलें म्हणूनच कीं काय हिंदुस्थानचे भारतमंत्री वेजवुड बेन् यांनीं म. गांधींना शांतता प्रस्थापित केल्याबद्दल नुकतेच धन्यवाद दिले आहेत. लॉर्ड आयर्विन यांनीं तर

"हिंदुस्थानांत गोऱ्या लोकांचें वजन बिलकूल राहिलें नाहीं" असें स्वच्छ सांगितलें आहे. हिंदुस्थानचे सध्याचे वयोवृद्ध व्हाइसरॉय कामाच्या दगदगीमुळें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं उत्सुक झालेले दिसतात. यावरून सर्वच बाबतींत उग्र स्वरूप धारण केलेल्या या हिंदुस्थानास काय मिळणार आहे, हें पाहण्याचा प्रसंग अगदीं जवळ आला आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं वेळीं प्राणहि वेचणाऱ्या या महापुरुषाला सत्यापुढें देशाच्या स्वातंत्र्याची पर्वा नाहीं. यावरून स्वातंत्र्य व सत्य या दोन गोष्टींशिवाय इतरत्र कोणत्याही गोष्टींत त्याला चैन कसें पडणार? म्हणूनच आजच्या लेखांत म. गांधींना सत्यवादी–सत्यशोधक या नांवानें मुद्दाम संबोधिलें आहे.

◇◇◇


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
30749
दा. क्र. 2222478
विभाग
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

क्रांतीचें रणशिंग

अर्पण-पत्रिका

राजकीय, सामाजिक व आर्थिक गुलामगिरींत खिचपत पडलेल्या बहुजन समाजाला वर उचलून त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीचा दिव्य मार्ग दाखविण्याकरितां आपल्या प्राणाचीहि आहुति देणाऱ्या स्वातंत्र्य देवतेच्या उपासकांस अर्पण !

बाबूराव भोंसले.

◇◇◇

प्रकाशकाचे दोन शब्द

हें पुस्तक प्रकाशित करण्याची दुर्दैवी संधी मला मिळाली, व तीही अशा स्थितींत कीं, या पुस्तकाचे लेखक कै. दिनकरराव जवळकर यांच्या मृत्यूनंतर हें पुस्तक मला पूर्ण करून वाचकांसमोर मांडावें लागत आहे ही खरोखरीच दुःखाची गोष्ट होय.

कै. दिनकरराव जवळकर यांची माझी ओळख एका चळवळीच्या निमित्तानें झाली. सन १९२७ सालीं नागपूरला पहिले रघोजी राजे यांच्या पुतळ्याची चळवळ चाललेली होती. त्याच संधीस दिनकरराव अकोला ब्राह्मणेतर परिषदेचे अध्यक्ष म्हणून परिषदेस येणार असल्याचें वर्तमानपत्रांतून वाचलें होतें. या पूर्वी जवळकर हे एक मोठे ब्राह्मणेतर व सत्यशोधक पुढारी असून तेजस्वी वक्ते आहेत, असें नुसतें आम्हीं ऐकलें होतें. प्रत्यक्ष ओळख अशी कांहींच नव्हती. त्यांना नागपुरांत व्याख्यानाकरितां बोलवावें अशी कल्पना माझ्या मनांत आली व ती कल्पना मित्रमंडळींसमोर मी मांडली. मित्रमंडळीला ती पसंत पडून त्यांनीं जवळकरांना व्याख्यानासाठीं नागपुरासआणण्याचें ठरविलें. त्याप्रमाणेंनें आम्ही अकोल्याला गेलों. व तेथें जवळकरांची भेटझाली. हीच त्यांची पहिली भेट. त्यांनीं पनागपुरास येण्याचें कबूल केलें. अकोला व उमरावती येथें त्यांचीं जाहीर व्याख्या झाल्यावर ते आमचेबरोबर नागपुरास आले. येथें त्यांचें पहिलें व्याख्यान टाऊन हालच्या टांगणांत २ जानेवारी १९२८ रोजीं झालें. व या नंतर नागपुरांतील सर्व कार्यकर्त्यांशीं त्यचा परिचय झाला. ही गोष्ट येथें एवढी विस्तारपूर्वक सांगण्याचें कारण 'नागपूरकरांशीं'

व आमच्याशीं 'जवळकरांचा परिचय' कसा झाला व त्यांना 'नागपूर व नागपूरकर' यांच्याविषयीं प्रेम कोठून व कसें वाटूं लागलें हें कळावें एवढाच आहे.

यानंतर जवळकर नागपुरास दोनदां आले. गेल्या १९३१ सालच्या गणपती उत्सवांत तरुण ब्राह्मणेतर संघाच्या वतीनें होणाऱ्या सामाजिक सप्ताहांत त्यांना एक व्याख्यान देण्याविषयीं आम्हीं तरुण ब्राह्मणेतर संघाचे सेक्रेटरी या नात्यानें विनंती केली. त्याप्रमाणें त्यांनीं स्वतःची प्रकृति बरी नसतांनासुद्धां मित्रप्रेमामुळें येण्याचें कबूल केलें व ता० २१–९–३१ रोजीं त्यांच्या पत्नी श्रीमती ताराबाईसह ते नागपुरास आले व त्याच दिवशीं संध्याकाळीं "शेतकऱ्यांचें स्वराज्य" या विषयावर त्यांचें व्याख्यान झालें. त्याशिवाय त्यांचीं नागपुरास काँग्रेसतर्फे दोन व्याख्यानें झालीं आणि यानंतर कामटी, सिंदी, वर्धा, हिंगणघाट, चांदा वगैरे ठिकाणीं त्यांचीं शेवटचींच व्याख्यानें झालीं. या वेळीं त्यांची प्रकृति बरी नसल्यामुळें ते नागपुरास थोडे दिवस राहिले. या काळांत नागपूर येथें बहुजन समाजाला उपयोगी पडणारीं पुस्तकें काढणारी एक 'ग्रंथमाला' काढावी अशी कल्पना आमच्या मित्रमंडळानें सुचविली.

ही कल्पना आम्ही कै. जवळकरांना सांगितली. त्याबद्दल त्यांनीं संतोष व्यक्त केला व मालेचें पहिलें पुस्तक मी लिहून देतों असें सांगून त्यांनीं हें 'क्रांतीचें रणशिंग' पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली.

असा या पुस्तकाच्या उत्पत्तीचा इतिहास आहे. कांहीं थोडा मजकूर लिहिल्यानंतर ते बरेच आजारी झाले. थोडी प्रकृति बरी वाटूं लागल्यावरोबर डॉक्टर-वैद्यांनीं बोलणें, वाचणें, लिहिणें अजिबात बंद करा असा सल्ला देऊनही त्यांनीं तशा स्थितींतही हें आमचें पुस्तकाचें लिहिण्याचें काम ते मधून मधून करीतच. त्यांनीं जवळ जवळ ३८ पानें 'साम्राज्यशाही व हिंदुस्थान' हें प्रकरण स्वतः लिहिलें. या नंतरची ३९ ते ६४ पानें त्यांनीं डिक्टेट करावयाचें व श्रीमती ताराबाई जवळकर किंवा कधीं कधीं आम्हीं लिहावयाचें या तऱ्हेनें तयार झालीं व तीं पानें त्याच वेळीं छापलीं जात. ते मध्यंतरीं नागपूर येथेंच फार आजारी झाले. त्यामुळें ६४ पानानंतर हें पुस्तक तसेंच पडून राहिलें. ते थोडे बरे झाल्यावर पुढील 'शेतकऱ्यांचें हिंदुस्थान' हें प्रकरण त्यांनीं लिहिण्यास घेतलें व अशा रितीनें १०४ पानें लिहून तयार झालीं व तीं आजपर्यंत छापून पडून होतीं. असो.

याच वेळीं नागपुरांत एक वर्तमानपत्र त्यांच्या संपादकत्वाखालीं काढावें, व त्यासाठीं प्रेसची वगैरे सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी श्रीमंत सरदार गुजर व श्री. दळवी यांनीं घेतली व त्याची व्यवस्था करण्याचें ठरलें. जवळकरांची प्रकृति थोडी बरी झाल्यावर पुण्यास जाऊन तेथील घरादाराची वगैरे सोय लावून नागपुरास वर्तमानपत्राकरितां येण्याचें जवळकरांनीं ठरविलें. 'नाशिकच्या मंदिर सत्याग्रहास पुण्याहून नागपुरास येतांना जाऊन येतों व पुस्तकाचा पुढील मजकूर पुण्याहून पाठवितों.' असें सांगून ते तेथून गेले. पुण्यास त्यांची प्रकृति अधिक बिघडली. ते सारखे खंगत चालले होते. तरीही ते नाशिकच्या मंदिर सत्याग्रहास गेले. हें पुस्तक त्यांच्याकडून पूर्ण करून घ्यावें म्हणून आम्हीं मुद्दाम

१९३१ च्या डिसेंबरच्या नाताळच्या सुट्टींत नाशकास गेलों, पण जवळकर अतिशय आजारी स्थितींत होते. अशा स्थितींत त्यांच्याकडून पुढील मजकूर कसा लिहून घेणार? त्यामुळें त्यांची नुसती भेट घेऊनच परत यावें लागलें. नंतर जवळकर पुण्यास गेले.

यानंतर त्यांच्या प्रकृतीविषयीं कांहींच कळत नव्हतें. एकदम ता. ३ मे १९३२ रोजीं ते कालवश झाल्याची बातमी सर्व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली, हें वाचून आम्हाला अतिशय दुःख झालें. त्यांनीं हें पुस्तक आक्टोबर १९३१ मध्यें लिहिण्यास सुरुवात केली पण त्यांच्या आजारीपणामुळें व अखेर मृत्यूमुळें २ वर्षें हें पुस्तक अर्धवटच लिहून छापून पडून राहिलें. अखेर हें पुस्तक पूर्ण करण्याची जबाबदारी आमचेवर येऊन पडली. जवळकरांसारख्या कसलेल्या व भारदस्त लेखकाचें अपुरें पुस्तक आमच्यासारख्या वाङ्मयाचा श्रीगणेशा न घेतलेल्या व्यक्तीला करावें लागणें किती कठीण आहे याची आपण कल्पना करूं शकता.

खरोखरीच एखाद्या चांगल्या वस्त्राला 'ठिगळ' लावण्यातलाच हा प्रकार आहे याची पूर्ण जाणीव आम्हाला आहे. पण करणार काय? हें पुस्तक पूर्ण झालेंच पाहिजे व नागपुरांत हें पुस्तक कोणी पूर्ण करावें हा प्रश्न पडला असल्यामुळें शेवटीं आम्हांसच हें पूर्ण करावें लागत आहे.

या पुस्तकापैकीं कागदाचा सर्व खर्च आमचे मित्र सावळाराम वाघ यांनीं दिला आहे. व छापून झालेल्या पुस्तकांचा खर्च कालिका प्रिंटिंग प्रेसला एक पैही अजून मिळाला नाहीं. दोन वर्षांपासून या छपाईचें बिल न मिळाल्यामुळें त्यांना भयंकर त्रास सहन करावा लागला आहे. या बाबतींत दोघांनाही झालेला त्रास त्यांनीं आजपर्यंत जवळकरांवरील प्रेम व आमचें निकट मित्रत्व यामुळें सहन केला आहे. याबद्दल उभयतांचे आम्ही अतिशय ऋणी आहोंत. जवळकरांच्या मृत्यूमुळें जन्मेतिहासाचाच वृत्तांत आपणासमोर मांडावा लागला. "हें जवळकरांच्या लेखणींतून शेवटचें निघालेलें अपूर्ण पुस्तक" या दृष्टीनें या पुस्तकाकडे वाचकवर्ग पाहील अशी आम्ही आशा करतों.

या पुस्तकांत कै. दिनकरराव जवळकरांचें अल्प चरित्र जोडलें आहे. आमचे मित्र श्री. गणपतराव जाधव संपादक 'सेवक' कोल्हापूर यांनीं आम्हांला सविस्तर माहिती दिली, त्यांत थोडा फेरफार करून हें चरित्र दिलें आहे. त्यांच्या मदती अभावीं तें देता आलें नसतें. त्याबद्दल त्यांचेही आम्ही फार आभारी आहोंत. शेवटीं हें पुस्तक वाचकवर्गाच्या स्वाधीन करून आम्ही जवळकरांच्या ऋणांतून मुक्त होत आहोंत.

◇◇◇

जवळकरांचें अल्प चरित्र

" जी गोष्ट कै. वा. जोतीबा फुले यांना घडवून आणतां आली नाहीं; जी घडवून आणण्यासाठीं श्री. शाहू छत्रपतींची सत्ता व संपत्ति अपुरी पडली; जी साध्य करण्याच्या कामीं लठ्ठे जाधवरावांचें पुढारीपणही कमकुवतपणाचें ठरलें, ती ब्राह्मणेतर–शेतकरी वर्गाची–बहुजन समाजाची जागृति श्री. दिनकररावांनीं आपल्या वक्तृत्वानें, जीवापाड मेहनतीनें व कमालीच्या युक्त्या-प्रयुक्त्यांनीं अगदीं अल्पकाळांत घडवून आणली. "

—ज्ञानप्रकाश ता. ५ मे १९३२

कै. दिनकरराव जवळकर यांचें नांव माहीत नसलेला मनुष्य सार्वजनिक चळवळींत विरळाच. जवळकरांनीं केवळ पस्तीस वर्षांच्या आपल्या आयुष्यमर्यादेंत महाराष्ट्राच्या सार्वजनिक चळवळींत कोणतें स्थान प्राप्त केलें होतें, हें ज्ञानप्रकाशसारख्या एका उच्च प्रतीच्या मराठी दैनिकानें त्यांच्या मृत्युसमयीं काढलेल्या वरील उद्गारावरून सहज लक्षांत येईल.

दिनकरराव चोराची आळंदी या गांवच्या पाटलाच्या प्रसिद्ध जवळकर घराण्यांतील होत. ते बालपणापासून तडफदार व बाणेदार वृत्तीचे निघतील असें दिसत होतें. त्यांचें शिक्षण जरी फारसें झालें नव्हतें, तरी त्यांनीं चळवळीच्या क्षेत्रांत मिळविलेला अनुभव व कोणतीही गोष्ट चटकन लक्षांत घेण्याची परमेश्वरानें त्यांना दिलेली शक्ति या भांडवलावर त्यांनीं महाराष्ट्राच्या सार्वजनिक इतिहासांत आपलें नांव नमूद करून ठेवलें.

पुण्याच्या प्रसिद्ध महाराष्ट्र हितचिंतक भ्रातृमंडळाच्या वक्तृत्वोत्तेजक सभेंतून जवळकरांच्या तडफदार वक्तृत्वाची प्रथम लोकांना कल्पना आली. " पटेल बिला "च्या वेळीं त्यांनीं ' प्रामुख्यानें भाग घेतला. कोल्हापूरचे राजगुरु बाळा महाराज यांच्यामार्फत शाहू महाराजांची त्यांची प्रथम ओळख झाली. व तेथूनच त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला सुरुवात झाली. सारा महाराष्ट्र हें जवळकरांच्या चळवळीचें क्षेत्र बनलें. चळवळीसाठीं शाहू महाराजांच्या मदतीनें ' जयभवानी ' व ' भवानी तरवार ' हीं पत्रें त्यांनीं काढलीं.

शाहू महाराजांच्या निधनानंतर ते पुण्यास आले व तेथें **' तरुण मराठा '** पत्र सुरूं केलें. जेव्हां पुण्याच्या शिवस्मारकाचीं सूत्रें अलिजाबहादर माधवराव शिंदे यांच्या हातीं आलीं व त्या स्मारकांत ब्राह्मणांचा हात शिरणार असें दिसतांच शिवस्मारक मराठ्यांचेंच राहावें, ह्यासाठीं त्यांनीं जोराची चळवळ केली. पुण्याच्या गणेशोत्सवाच्या मेळ्यांतून सुधारक व ब्राह्मणेतर यांची टवाळी होत असे, म्हणून केशवराव जेध्यांच्या साह्यानें पुण्यास **' छत्रपती मेळा '** काढला. १९२५ सालचें मेळा प्रकरण प्रसिद्धच आहे. याच सुमारास पुणें म्यु. पा० त **' फुले पुतळ्याचा '** वाद उत्पन्न झाला. ब्राह्मण लोकांकडून म० फुल्यांवर त्या वेळीं जे शिव्याशाप सुरूं झाले त्याला ' काठ्यानें काठ्या

काढणें' या न्यायानें '**देशाचे दुष्मन**' हें अत्यंत क्रांतिकारक पुस्तक त्यांच्या लेखणींतून निघालें. धनवडे प्रकरणाचा फायदा घेऊन जवळकरादि ब्राह्मणेतर पुढारी व ब्राह्मणेतर चळवळ यांना बदनाम करण्याकरितां नरसोपंत केळकरादि ब्राह्मण पुढाऱ्यांनीं पराकाष्ठा केली; पण व्यर्थ.

जवळकरांवर कै. टिळकांच्या चिरंजीवानीं एक व 'देशाचे दुष्मन' याबद्दल चिपळूणकरानें केलेला दुसरा खटला असे दोन खटले चालूं होते. त्याच वेळीं त्यांनीं कांहीं पुस्तकें लिहिलीं, त्यामुळें ब्राह्मण–ब्राह्मणेतरांत असंतोष पसरेल या भीतीनें सरकारनें कोणतेंच लिखाण जवळकरानें प्रसिद्ध करूं नये अशी नोटीस एक वर्षाकरितां बजावली. वरील खटल्याशिवाय १५३ (अ) चा तिसरा खटला झाला. पहिल्या खटल्यांत अपीलांत ५०० चा रु. ५० दंड, दुसऱ्या खटल्यात (देशाचे दुष्मन) १२ महिने साधी कैद व २५० रु. दंड. पण अपीलांत ३३ दिवसांची शिक्षा भोगल्यावर ते निर्दोषी सुटले. व तिसऱ्या १५३-अ च्या खटल्यांत ६ महिने सक्तमजुरी व ५०० रु. दंड ह्या शिक्षेवरील अपीलांत ७५ दिवसांची भोगलेली शिक्षा व ५०० रु. दंड झाला.

या स्वार्थत्यागामुळें ते ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी बनले व त्यांनीं मुंबईस पक्षाचें 'कैवारी' नांवाचें पत्र सुरू केलें. वऱ्हाड मध्यप्रांतांत ते दौऱ्यावर असतांना नागपूरच्या **रघोजी पुतळ्याच्या** चळवळीसाठीं ते नागपुरास येऊन गेले. या भागांतील लोकांचे त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम बसलें.

ते सायमन कमिशन विरोधी असतांही त्यांना त्या पक्षाच्या शिस्तीसाठीं सायमन सहकार करावा लागला. मराठा मिशन मार्फत सर तुकोजीरावांच्या नववधू मिस मिलरचें शुद्धीकरण करण्यास जवळकर पुढें आले, पण महाराजांनीं ऐनवेळीं माघार घेतल्यामुळें जवळकरांनीं महाराजांची पर्वा केली नाहीं.

मुंबई कायदे कौंसिलच्या तुकडे बिलाच्या वेळीं त्यांनीं महाराष्ट्रभर मोठा दौरा काढला होता. १९२८ च्या मुंबईच्या मजुरांच्या संपाच्या वेळीं ते मजुरांचे खरे पुढारी म्हणून पुढें आले व ते आपल्या 'कैवारी' पत्राचा अंक "**मजुरांचा कैवारी**" म्हणून दर बुधवारीं प्रसिद्ध करीत. बागलाण तालुक्याच्या सारावाढीच्या वेळीं ते ब्राह्मणेतर पक्षाच्या चौकशी कमेटीचे सभासद म्हणून त्यांनीं एक प्रत्यक्ष परिस्थितीचा रिपोर्ट प्रसिद्ध केला होता.

जवळकर विलायती राजकारणाचा अभ्यास करण्याकरितां दोनदां विलायतेस गेले. पहिल्यांदा विलायतेहून परत आल्यावर शेटजी–भटजी–लाटजींच्या जाचामुळें गांजलेल्या ब्राह्मणेतर-शेतकरी-अज्ञबहुजन समाजाच्या उन्नतीकरितां झटणाऱ्या ब्राह्मणेतर पक्षानें "**शेतकरी पक्ष**" हें नामाभिधान धारण व त्यासाठीं त्यांनीं एक '**योजना**' पक्षापुढें मांडली. ती '**जवळकर योजना**' म्हणून प्रसिद्धच आहे.

पुण्याच्या भटशाहीनें सरदार वल्लभभाईंच्या मदतीनें लँड-लीग काढण्याचा प्रयत्न केला. पण जवळकरानें या सावकार-जमीनदार वर्गाचें खरें स्वरूप जनतेसमोर मांडल्यावर या

पक्षाचें मूळच महाराष्ट्रांत रुजलें नाहीं. यानंतर ते दुसऱ्यांदा विलायतेस गेले. परत आल्यावर गेल्या १९३०-३१ च्या सत्याग्रह संग्रामांत मुंबई बार कौं. चे २१ वे डिक्टेटर बनले व त्यांना १५ महिने शिक्षा झाली. पण गांधी-इर्विन तहनाम्यामुळें ते दोन महिन्यांच्या शिक्षेनंतर सुटून आले. १९३१ च्या कराची कॉंग्रेसला कॉंग्रेस प्रतिनिधी म्हणून ते गेले होते. तेथून आल्यावर त्यांनीं 'तेज' नांवाचें पत्र काढलें पण तें ४-५ महिन्यांत बंद पडलें.

त्यांची या वेळीं प्रकृति अगदीं बरी नव्हती. तरी ते या वेळीं नागपूरच्या तरुण ब्राह्मणेतर संघाच्या विनंतीवरून इकडे आले व त्यांनीं या भागांत दौरा काढला. नागपूर येथें **'वर्तमानपत्र'** व **'ग्रंथमाला'** काढण्याचें ठरलें व पुण्याची व्यवस्था करण्यास जवळकर गेले. प्रकृति बरी नसतांही ते नाशिक सत्याग्रहास गेले व तेथें त्यांची प्रकृति अत्यवस्थ झाली. शेवटीं ३ मे १९३२ रोजीं रात्रो १०॥ वाजतां पुणें मुक्कामीं त्यांचें देहावसान झालें. मृत्युसमयीं त्यांचें वय ३५ वर्षांचें होतें.

इतक्या अल्पवयांत गेलीं बारा वर्षें महाराष्ट्राचें समाजकारण व राजकारण आपल्या बुद्धिसामर्थ्यानें हालवून सोडणारा ब्राह्मणेतरांचा पुढारी, सत्यशोधकांचा नेता, शेतकऱ्यांचा व मजुरांचा कैवारी, स्वातंत्र्य देवतेचा उपासक, आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता नाहींसा झाला. वक्तृत्व व लेखन ह्या दोन ईश्वरदत्त देणग्याच त्यांना मिळाल्या होत्या. बहुजन समाजाची-शेतकऱ्यांची-मजुरांची सर्वांगीण सुधारणा हें जवळकरांच्या साऱ्या आयुष्याचें ध्येय होतें. आर्थिक विषमता नष्ट करून भिक्षुकशाही, भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या तडाख्यांतून शेतकरीवर्गाची सुटका करून **'शेतकऱ्यांचें स्वराज्य'** स्थापन व्हावें ही तळमळ त्यांना लागली होती.

त्यांचा दिलदारपणा, धाडसी स्वभाव, मोहक पण मर्मभेदी वाणी, भावनाप्रधान तडफदार वक्तृत्व, तीक्ष्ण व खोंचदार लेखनशैली, वाङ्मयाच्या क्षेत्रातील उच्च स्थान व शेतकरी वर्गाची आत्यंतिक कळकळ व कोणत्याही चळवळींतील जहालपणांतील अग्रेसरत्व याबद्दल त्यांच्या टीकाकारांतही मतभेद झाला.

त्यांच्या मृत्यूनें कल्पनातीत नुकसान झालें आहे. त्यांच्या तोडीचा तरुण पुढारी बहुजन समाजांत नाहीं. ही उणीव भरून निघेल तो सुदिन. परमेश्वर जवळकरांच्या आत्म्यास चिरकाल शांति देवो!

समाप्त

◇◇◇



साम्राज्यशाही आणि हिंदुस्थान

सर्व जग जिंकून पृथ्वीपति झाल्यावर, छत्रचामरें, साम्राज्यसूचक अश्वमेध, स्वतःचा शक या महत्त्वाकांक्षी भावना पाश्चात्त्य असोत कीं पौर्वात्य असोत पण प्राचीन तरी खास आहेत. आपण कळत किंवा नकळत धारण केलेल्या विशिष्ट धर्मसमजुती किंवा धर्म यांच्या प्रसाराकरतां देशच्यादेश पादाक्रांत करण्यात पौर्वात्य किंवा पाश्चात्त्य असा भेद करण्याचें कारणच नाहीं. पोकळ वैभव किंवा नुसत्या साम्राज्याचा बडेजाव या करतां लढणारे जगज्जेते, जित देशावर एखादा अधिकारी नेमून एखादी लहानशी खंडणी घेतात, यापेक्षां त्या जित राष्ट्राची जास्त पर्वा करीत नाहींत. धर्मप्रसाराकरतां पराधीन झालेल्या देशालाही धर्मप्रसाराखेरीज जेत्याचा जुलूम सहन करावा लागत नाहीं.

भुकेकरतां साम्राज्य

आपण इतके लोक आहोंत आणि इतक्यांचा चरितार्थ येथेंच राहून भागणें शक्य नाहीं—यांची सोय लावली पाहिजे, अशी राष्ट्रीय जागृति किंवा व्यवहार्य बंधुप्रीति ज्या देशांत उत्पन्न होते; तो देश दरिद्री, दुर्बल किंवा भित्रा असला तरी त्याचे हे सर्व दुर्गुण जाऊन त्यांतील अर्धपोटी लोकांची सोय लागणें शक्य होऊं लागतें. साम्राज्याकरतां साम्राज्य किंवा धर्माकरता साम्राज्य ह्या भावनेच्या बलावर उभारलेलीं साम्राज्यें वरून कितीहि भपकेबाज दिसलीं, तरी तीं पत्त्यांच्या किल्ल्यापेक्षां टिकाऊ नसतात. परंतु "भुकेकरतां साम्राज्य" हें अत्यंत भयंकर व दीर्घकाळ भोंवणारें असतें. एखाद्या विशिष्ट लहान देशाला आपल्या अर्धपोटी लोकांची सोय लावण्याकरतां, विशिष्ट देश जेव्हां उतारपेठ (market) म्हणून ताब्यांत ठेवावा लागतो—आणि अशी पाळी जास्त पाश्चात्त्य राष्ट्रांवर आली आहे—तेव्हां श्रीमंत आणि गरीब जास्त गरीब अशी परिस्थिति उत्पन्न होणें प्राप्तच आहे. देशाची भरभराटच नव्हे तर रोजची मीठ-भाकर किंवा Bread butter दुसऱ्यावर राज्य केल्याशिवाय मिळणार नाहीं, ही स्थिति प्राप्त होण्याचें कारण त्या देशांत बाहेरून आलेली संपत्ति सर्वांना वाटली न जातां कांहीं थोड्या

भांडवलवाल्यांत वाटली जात असावी. निसर्गसिद्ध परिस्थितींतून उत्पन्न होणाऱ्या वस्तूपेक्षां गरजा वाढल्या, मग त्या मानव-सहज-प्रगतीमुळें असो किंवा लोकसंख्येच्या वाढीमुळें असो, गरजेबरोबर पुरवठा नसेल तर तो कोठून तरी उत्पन्न करावा लागतो.

गरजाच कमी करा

मग व्यापारानें, दगलबाजीनें, रक्तपातानें, चढाओढीनें, सतत श्रमानें तो पुरवठा उत्पन्न करणें आणि सतत राखणें याला उघड उघड प्रोत्साहन दिलें जातें. त्यामुळेंच नवे शोध लागले. मानवसंहार केला गेला. परंतु "गरजाच कमी करा" हें तत्त्व म. गांधींपर्यंत कोणाहि मानवजातीच्या घटकानें इतक्या नेटानें पुरस्कारून जीवनकलहाच्या भावी संकटाचें निवारण सुचविलें नव्हतें. मानवजातीनें आपल्या गरजा कमी केल्या तर लढाईचें कारणच नाहीं; "शस्त्रत्यागानें (Disarmament) युद्धें संपतील हें म्हणणेंच चुकीचें आहे. जोंपर्यंत शौर्याकरतां शौर्य किंवा पोकळ बडेजावीकरता पराक्रम हा युद्धांचा पाया होता, तोंपर्यंत शस्त्रत्यागानें महायुद्धें संपलीं असतीं, परंतु "मार्केट"-करतां साम्राज्यें किंवा देशाच्या वाढत्या संसाराकरता परदेशावर स्वाऱ्या हें सत्य जगापुढें असतां शस्त्रत्यागाऐवजीं स्वार्थत्याग म्हणजे गरजा कमी करणें हा उपाय अमलांत आला नाहीं तर महायुद्ध निवारण्याचा प्रयत्न फोल आहे. देशाचा चरितार्थच काय पण चैन चालविली पाहिजे, ह्या व्यवहारी तत्त्वावर लढाया होण्याचा दिवस केव्हा उगवला या इतिहासांत पडण्याचें कारण नाहीं. पण गेलें महायुद्ध, हें निव्वळ साम्राज्याकरतां नसून मार्केटकरतां होतें, हें स्पष्टपणें निदर्शनास आणीत आहे; ब्रिटिशांच्या पूर्वअमदानींत हिंदी कला-कौशल्याची गळचेपी झाली.

औद्योगिक क्रान्तीची सुरुवात

ग्रेट ब्रिटनला हिंदुस्थान साम्राज्यशोभेकरतां नको होता, आणि हिंदुस्थानला हळूहळू कां होईना पण "स्वराज्य" देण्यास ग्रेट ब्रिटन जे आज तयार आहे, याचा अर्थ ग्रेट ब्रिटन मोठें स्वार्थत्यागी आहे असाहि नव्हे, तर "मार्केट" न जाता हिंदी राज्यघटनेला स्वराज्य म्हणा कीं स्वातंत्र्य म्हणा, व्यवहारी इंग्रज त्याला हरकत घेणार नाहीं. वाढत्या गरजांमुळें नवे शोध आणि साहस आणि त्यामुळें अपरिहार्य "औद्योगिक क्रांति" (Industrial revolution) जपान सोडून दिलें तर आशिया खंडांत अजून व्हावयाची आहे. हिंदुस्थानांत ही क्रांति नुकतीच सुरू झाली आहे. पुरी झाली नाहीं. "उत्पत्ति" (Production) आणि "प्रसार" (Distribution) यांस अवश्य असणारे यांत्रिक शोध, उपकरणी, भांडवल व राष्ट्रीय संघशक्ति परस्पर सहकारितेनें स्वदेशाच्या भरभराटीस उपयोगी आणण्याचा पहिला धडा हिंदुस्थान घेत आहे– आशियाटिक देशांतून ही क्रांति होणें जरूर आहे व ती होणार. विशिष्ट हवामानामुळेंच विशिष्ट वस्तु उत्पन्न करण्याचा मक्ता निसर्गानें कांहीं विशिष्ट भागाला दिलेला असतो. उदाहरणार्थ "जूट"चा व्यापार बंगालच्या हवालीं निसर्गानें केला आहे. बंगालनें

जगाला "जूट" पुरवला तर बंगालला ज्याची जरुरी आहे, त्या वस्तु दुसऱ्या देशांत उत्पन्न होणाऱ्या असल्या आणि तो देश बंगालवर सत्ता गाजविणारा असला तर त्याची मोनोपोली बंगालची नसून सत्ताधीश सरकारची ठरते. बंगालचा माल सत्तेच्या जोरावर, निरनिराळ्या नाण्यांच्या हुंडणावळीच्या किंवा कराच्या कोणत्या तरी मिषाखालीं सत्ताधीश देशाला त्यापासून लुबाडून (Exploit) घेता येतो व त्याला लागणारा माल—इतर देशानें स्वतः पुरविला तरी त्याला अडथळा करून—सत्ताधीश व्यापाऱ्यांना आपला माल त्यांच्या गळीं मारता येतो. स्टेट इंग्लंडचें आणि मार्केट हिंदुस्थानचें ! शेकडा ५८ लोकांना व्यापारांत घालूनहि इंग्लंडची बेकारी वाढते आहे. शेंकडा अठ्ठावन्नांचा संसार व्यापारावर चालला पाहिजे; त्याकरतां त्याला मोठें मार्केट पाहिजे आणि तें हक्काचें असावें म्हणून सर्व गिऱ्हाइकांवर त्यांना ताबा पाहिजे.

शेतकरीच स्वातंत्र्याला लायक

चढाओढीनें (Competition) मालाचा उठाव करणें हा श्रमसाहसाचा व अनिश्चित असा मार्ग आहे. पण राजकारणाच्या जोरावर "Diplomacy" किंवा "कायदेशीर दगलबाजी"च्या जोरावर मातीचें सोनें करून दाखविण्याची व्यापारी क्लृप्ति मग ती एखाद्या सहा आण्याचा माल विकणाऱ्या क्षुल्लक व्यापाऱ्याची असो किंवा सहा कोटी व्यापार करणाऱ्या राष्ट्राची असो, सारखीच. ज्याचें घर व्यापारावर चालणार त्याला गिऱ्हाईक पाहिजे हें सत्य आहे. इंग्लंडला शेंकडा ८ लोक शेतकीकडे पुरवून भागतें. इंग्लंडची वाढती बेकारी "शेतकी"नें सुटेल अशी इंग्लंडला मनोमन खात्री असती तर तेथें बेकारीचा प्रश्नच उदभवला नसता. पण हिंदुस्थानची स्थिति अगदीं याच्या उलट आहे. हिंदुस्थान शेंकडा ७१ लोक शेतीवर कसे कां असेना पण पोसतो आहे. आणि व्यापारात (Industries) फक्त शेंकडा १२ च लोक आहेत. ज्या देशांतील बहुसंख्य देशांतील जमिनीवर जगते तो देश इतर देशांच्या मानानें पैशाच्या मापांत दरिद्री ठरला तरी तो स्वावलंबी अतएव स्वातंत्र्याला पहिल्या लायकीचा समजला पाहिजे. हिंदुस्थानच्या शेतीचें नुकसान होऊन जर औद्योगिक क्रांती होणार असेल तर ती देशाला घातक होईल. औद्योगिक उन्नति शेती हा प्रथम "राष्ट्रीय उद्योग" ठरवून झाली तर इतर देशांप्रमाणें मार्केटकरतां महायुद्धें करण्याचें महापातक हिंदुस्थानला केव्हांच करावें लागणार नाहीं. त्यांतून जर गरजाच कमी झाल्या, मग त्या "गांधीझम"च्या निःशस्त्र क्रांतीने होवोत किंवा "कम्युनिझम"च्या सशस्त्र रक्तपातानें होवोत, हिंदुस्थानची भरभराट झालीच पाहिजे.

पर राज्याचे परिणाम

इंग्लंडवर इंग्रजांचें राज्य नसतें तर इंग्लंडचा व्यापार वाढला नसता त्याचप्रमाणें हिंदुस्थानला स्वराज्य नसेल तर "शेतकी" वाढणें शक्य नाहीं. देशाची भरभराट म्हणजे सर्व हिंदुस्थान. हिंदु होणें, मुसलमान होणें किंवा ख्रिश्चन होणें यावर अवलंबून नसून सर्व देशाला किमान मीठभाकर दुसऱ्या कोणत्याहि देशाला न लुबाडतां

मिळणें. ब्रिटिश अमदानींत शेतकीच्या उत्कर्षाकरतां मोठमोठीं खातीं निघतील आणि त्याचा फायदा होईल यांत शंका नाहीं. ब्रिटिश राज्यांत रेल्वे, पोष्ट किंवा मोठमोठे रस्ते, वहातुकीची शीघ्र सोय व शांतता यामुळें "शेतकी"च्या धंद्याला फायदा होत आहे हेंहि आम्ही कबूल करतों. शेतकीकरतां मोठमोठीं कमिशनें बसून अत्यंत योग्य उपाय सुचविले जातात ह्याबद्दल आम्ही इंग्रजांचे आभारी आहोंत. मोठमोठे कालवे व तलाव खणून निर्जन प्रांतांत नांदती गोकुळें वसलीं हेंहि खरें असेल किंवा आहे, हें सर्व खरें. पण देशांतील लोकसंख्या तेथल्याच शेतकीवर जगण्याच्या प्रमाणांत जर तो देश सुखी असें म्हटलें तर गेल्या पन्नास वर्षांत शें. ९० पासून तो सध्या शेंकडा ७१ पर्यंतच शेतकीवर निर्वाह होणारांचा आंकडा असा खालीं पसरत कां यावा? यावर अनेक आक्षेप आहेत. नवीन युगामुळें झालेला राहणींतला फरक, शेतकऱ्यांची पुराणप्रियता, अज्ञान, उधळेपणा, आळस या सर्व आरोपांबद्दल आमचें कांहींएक म्हणणें नाहीं, परंतु दर शंभरापाठीमागें हे जे १९ लोक शेतकींतून गेले, त्यांना पोसण्यास त्यांची शेतकी समर्थ नव्हती म्हणूनच. त्यांतून हौसेनें जाणारे लोक किती असतील याची कल्पना शेतकऱ्यांची "वतनदारी"वरील श्रद्धा ज्याला पूर्णपणें माहीत आहे त्यालाच होईल. शेतीवर जगणारे कमी होणें याचा अर्थ नैसर्गिक स्वावलंबन जाऊन कृत्रिम परावलंबी होणें हा आहे. देशांतील व्यापार किंवा कारखाने यांच्या सुरक्षिततेवर देशाची भरभराट समजणें हें गेल्या महायुद्धांत आहुति पडलेलें युग संपलें आहे, हें जगाच्या आर्थिक परिस्थितीचा सूक्ष्म दृष्टीनें विचार करणाऱ्यास आज नाहीं केव्हां तरी कबूल करावें लागेल. सबंध ग्रेट ब्रिटन कारखान्यांनी फुलून जाऊन तेथें एक इंचसुद्धां जागा मोकळी नाहीं अशी परिस्थिति आली, पण जर त्याला गिऱ्हाईकच नसेल तर सर्वच संपलें. रोज सहकुटुंब उपास काढून सोम्याचें लखलखीत रिस्ट वॉच घेणाऱ्या गिऱ्हाइकांनीं जेव्हां सबंध जग भरून जाईल तेव्हांच काय तें अशा "फॅक्टरी"-वाल्या देशांचें जमेल.

व्यापारी महायुद्धाचें होमकुंड

प्रथम गेलें महायुद्ध कां झालें याचा विचार करूं. जर्मन कैसरला युरोप काबीज करावयाचा होता. दिल्लीच्या तक्तावर बसून चौदा-चौकडीचें राज्य स्थापन करावयाचें होतें. सर्व लहान-सहान राष्ट्रांना गुलाम करून टाकावयाचें होतें. म्हणून लहान-सहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्य संरक्षणाकरतां "न्यायप्रिय व स्वातंत्र्यप्रिय" ग्रेट ब्रिटनला महायुद्धांत पडावें लागलें आणि money, men and munition द्रव्य, मनुष्यें आणि दारूगोळा यांचा निःपात करावा लागला असें दोस्त राष्ट्रांचे ब्रिटिश पुढारी यांच्याकडून वारंवार सांगण्यांत आलें. आतांहि वेळींअवेळीं ठासून सांगण्यांत येतें. या उच्च हेतूनेंच जर गेलें महायुद्ध झालें असतें तर तें शेवटचें ठरलें असतें. पण भावनेवरून व्यापारा-करतां होणारें जगड्व्याळ असें हें पहिलें महायुद्ध मात्र ठरलें आहे. सतराव्या शतकांत

अँग्लो-फ्रेंच चकमकींतून "व्यापारी महायुद्धा"चें हें तत्त्व हडसून-खडसून ठरलें; त्याचा गेलें महायुद्ध हा परिपाक होय. गेल्या व्यापारी महायुद्धांत ८० लक्ष जवान रणभूमीवर ठार झाले. आंकडेशास्त्राच्या अंदाजाप्रमाणें बाकी सर्व तऱ्हेचें नुकसान धरून विद्यमान जग एकंदर ३॥ कोटी लोकांना मुकलें. सबंध जगाचा नूर पालटला.

मनुष्यसंहार, द्रव्यसंहार, कर्जबाजारीपणा, बेकारी वगैरे सर्व संकटें उत्पन्न करणारें महायुद्ध समता, न्याय व स्वातंत्र्य याकरतां होतें, असें लढाईच्या धामधुमींत ब्रिटिश मुत्सद्दी बजावून सांगत पण तीच लढाई संपल्यावर सरकारी किंवा निमसरकारी Empire at war या पुस्तकांत स्पष्ट कबुली दिली जाते कीं, "जर्मनीनें रणशिंग कां फुंकलें आणि कल्पनातीत नरमेध कां केला तर हिंदुस्थानच्या मार्केटकरतां"

समता, न्याय व स्वातंत्र्यावर गदा घालण्यास निघालेल्या आणि सबंध जगावर दुर्दैवाचें अभ्र आच्छादणाऱ्या जर्मनीचा हा उद्देश! म्हणजे हिंदुस्थान हिंदी लोकांचा आणि भांडण इंग्रज-जर्मनीचें!

माळ्याची मका आणि कोल्ह्यांचें भांडण!

जगड्व्याळ महायुद्धाचा मुख्य उद्देश 'हिंदुस्थान' होता. जगाच्या भावी महायुद्धांत हिंदुस्थानची ही स्थिति पालटली पाहिजे. हिंदी लोकांनीं पाश्चात्त्य राष्ट्रांना आमचा देश म्हणजे कोणाहि उतारूनीं परस्परांत भांडून विजय मिळविल्यावर येथें उतरण्याची धर्मशाळा नाहीं हें बजाविलें पाहिजे. या युद्धांत इंग्रजांचा पराभव झाला असता तरी त्या वेळीं दिलेल्या वचनांची जी आज इंग्रजांकडून हेळसांड होत आहे तीच जर्मन दोस्तांकडून झाली असती. कारण दोघांचे उद्देश एक आणि हिंदुस्थानकडे पाहण्याचे डोळे तेच. कदाचित् विजयोन्मादानें लष्करी पेशाच्या बाण्यानें, थंड इंग्रजांपेक्षांहि जर्मनीनें जास्त हडेलहप्पी केली असती. इंग्रजांच्या जवळ जर्मनीशीं उघड व्यापारी स्पर्धा करण्याचें कौशल्य नाहीं. त्यामुळें त्यांना आपला भिकार माल गळीं बांधतांना गिऱ्हाईकांची, सत्ता असून स्तुति करावी लागते. पण जर्मनीजवळ सर्वच तयार होतें. हिंदुस्थानच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टीनें जर्मनीचा पराभव होणें जरूरच होतें. युद्धापूर्वीचे जर्मन राष्ट्र म्हणजे साम्राज्यशाहीचा कळस होता. जर्मनी युद्ध जिंकता तर इंग्लंडमध्यें क्रांति झाली नसती, पण तुर्कस्थान मात्र जर्मनछाप खलीपाऱ्या सेवेला अनेक शतकें लिहून दिलेला गुलाम राहिला असता बाल्कन राष्ट्रें, पोलंड, तुर्की—जर्मन मगरमिठींत दाबलीं गेलीं असतीं. आणि कैसर इतका शहाणा कीं दहा लेनीन येऊन जरी त्यांनीं झार उलथून पाडला असता तरी कैसरनें आपल्या साम्राज्यशाहीकरतां कुठलाहि फाटका झार एखाद्या जर्मन झारीनासह रशियन तक्तावर बसवला असता जेते इंग्रजांना सोव्हिएट रशिया नेस्तनाबूत करणें जितकें अवघड ठरलें तितकें जेत्या जर्मनीला सोव्हिएटर शियाचा विध्वंस करणें सोपें होतें. हें युरोपचा नकाशा, कैसरची राजनीति आणि जर्मनीचा लष्करी कडवेपणा जमेस धरला तर सहज म्हणतां येईल. ब्रिटिश साम्राज्यशाही धूर्त म्हटली तर जर्मन

साम्राज्यशाहीला आडदांड म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मन पराभवानें खुद्द जर्मनीवरले साम्राज्यशाहीचें जूं झुगारलें गेलें. जर्मन नेहमीं कुरेंबाज असतो. ब्रिटिशांविषयीं त्याच्या मनांतली आढी गेली आहे हें म्हणणें चुकीचें ठरेल. चोटीवर एखादा जर्मन प्रवाशी असला तर तो हिंदी, फ्रेंच किंवा दुसऱ्या कोणाशीं बोलेल; पण इंग्लिश माणसाशीं बागतांना अगदीं "रिझर्व्ह" असतो. जर्मन आपल्या इकडील मराठ्यासारखा असतो. मराठ्यासारखा तो आडदांडपणानें महायुद्धांत पडला फ्रेंच बंगाल्यासारखा म्हणावा लागेल. भावनाप्रधान, ललितकलाप्रिय बंगाली, नांवापासून विचारापर्यंत अगदीं फ्रेंच मनुष्यासारखा असतो. इटालियन आपल्या इकडल्या कानडी बंधूंचे सादृश्य दाखवतो. पण इंग्रज मात्र हुबेहूब चित्पावन ब्राह्मण आहे. इंग्रजी मोर्ले, चित्पावन मुळे; इंग्रजी रॅन्ड, चित्पावन रानडे; इंग्रजी सायमन, चित्पावन सोमण यांत फारसा फरकच नाहीं. चित्पावनांचे सर्व दुर्गुण इंग्रजांकडे आहेत. समता, स्वातंत्र्याकरतां महायुद्ध नसून हिंदुस्थानच्या 'मार्केट'करतां झालेल्या महायुद्धांत हिंदुस्थाननें केवढा त्याग केला आहे. युद्धासाठीं ५॥ लाख लोक दिले–हें पाहिलें तर हिंदुस्थान हा एक साधाभोळा मित्र आहे असें दिसतें. महायुद्धाच्या धडाक्यांत झार, कैसर व खलीपा यांचा चुराडा उडाला आणि हिंदुस्थानला काय मिळालें तर पुढें केव्हां तरी स्वयंशासित करण्याचें आश्वासन मिळालें. सदर्हू आश्वासनाप्रमाणें प्रथम मॉंटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणा अंमलांत आल्या आणि त्याच आता सायमन रिपोर्ट—राऊंड टेबल वगैरेंतून घुसळून निघून पार्लमेंटच्या सहीशिक्क्यानिशीं हिंदी राज्यघटना ठरणार आहेत. ज्या ज्या वेळीं ब्रिटन आणि हिंदुस्थान यांच्यासंबंधीं विचार करण्याकरतां मुत्सद्दी बसतात तेव्हां त्यांतल्या मुख्य मुद्द्याच्या ज्या गोष्टी असतील तेवढ्याच लपविल्या जातात. कानडा, आस्ट्रेलिया किंवा साऊथ आफ्रिका वगैरे 'डोमिनियन्स'प्रमाणें हिंदुस्थाननें 'कॉमनवेल्थ' नांवाखालीं ब्रिटिश साम्राज्यांत राहण्यास खुषीनें तयार व्हावें हें अनैसर्गिक आहे. साम्राज्यांतून फुटून निघण्याचा हिंदुस्थानला हक्क नाहीं हें इंग्रजी सूत्रच एखादे दिवशीं ब्रिटिशांना हिंदुस्थानास मुकावयास लावील. बरोबरीच्या नात्यानें सर्व राष्ट्रांनीं जर एके ठिकाणीं राहावयाचें तर मग हिंदुस्थानलाच तेवढें आमंत्रण कां ? युनायटेड स्टेटस् ऑफ युरोप करण्याची कल्पना ज्या तत्त्वावर उभारली गेली आहे त्याच तत्त्वावर ही ब्रिटिश कॉमनवेल्थची उभारणी असेल तर हिंदुस्थान केव्हांहि इंग्रजांचा दोस्त म्हणून राहील. हिंदी लोकांची कसलीही राज्यघटना ब्रिटिश पार्लमेंटनेंच ठरविली पाहिजे याचा अर्थही समान दर्जाची दोस्ती नसून इंग्लंड जेते आहेत आणि हिंदुस्थान जित आहे. समान दर्जा ही निव्वळ राजकीय थाप आहे. जेव्हां हिंदी पार्लमेंट हिंदुस्थानची राज्यघटना ठरवील आणि दोस्त इंग्रज ती अमलांत आणण्यांत कसून मेहनत घेतील, परचक्रापासून हिंदुस्थानचा बचाव करण्याकरतां मदत करतील तेव्हां समान दर्जा या शब्दाला कांहींतरी किंमत येईल. ब्रिटन आणि हिंदुस्थान यांच्या मैत्रीचा प्रश्न जोंपर्यंत युरोपीयन राष्ट्रांत "हिंदुस्थान" हें एक भक्ष्य आहे अशी दृष्टी आहे तोंपर्यंत मैत्री असणें शक्य नाहीं. यापुढें होणाऱ्या महायुद्धांत

" हिंदुस्थान " हा महत्त्वाचा प्रश्न होईल व म्हणून हिंदी राजकीय चळवळीकडे सबंध जगाला लक्ष पुरविलें पाहिजे. ब्रिटिश मुकुटावरला हा " कोहिनूर " ब्रिटिश लोक घालवायला तयार होणें शक्य नाहीं. पुढील जागतिक राजकारणांत हिंदुस्थानकडे महत्त्वाचा भाग आहे. तो उत्तम तऱ्हेनें पार पाडण्यास हिंदुस्थानच स्वतः समर्थ व्हावयास पाहिजे. तो समर्थ करणें म्हणजे त्यांतला शेतकरी वर्ग शें. ७१ लोक आणि त्यांची शेती हाच एक पूर्ण स्वावलंबी करणें. शेती हा राष्ट्रीय धंदा आणि शेतकरी हा राजकारणातला मुख्य आणि स्वतंत्र घटक झाल्याशिवाय हिंदी स्वराज्य खरें स्वराज्य होणार नाहीं.

भांडवलवाल्या राष्ट्रांची युद्धाची तयारी

गेल्या महायुद्धांत युरोपांतील लोकांना भयंकर त्रास व हालअपेष्टा सहन कराव्या लागल्यामुळें तेथील प्रभावी लोकमत युद्धविरोधी बनूं लागलें. नवीन विचाराच्या तरुणांनीं व सुधारकांनीं तर सबंध युरोपमध्यें युद्धविरुद्ध जोरदार चळवळ सुरूं केली व थोड्याच दिवसांत तिला बहुजन समाजाचा पाठिंबाही मिळाला. अजूनहि युद्धविरोधी मतप्रसार जोरानें चालूं आहेच, " All quiet on the Western front " या आत्मवृत्तपर पण युद्धाचे हृदयविदारक निवेदन केलेलें जर्मन सोल्जराचें पुस्तक किंवा " Journey's end " सारखें अंगावर शहारे आणणारीं, हृदय विदारून सोडणारीं नाटकें पाश्चात्य समाजांत झपाट्यानें प्रसार पावत आहेत, याचें कारण पाश्चात्य बहुजन समाजाच्या अंतःकरणावर झालेल्या युद्धाच्या जखमा अजूनहि ठणकत आहेत. ही युद्ध-विरोधाची लाट अशीच वाढूं दिली तर, विजयी राष्ट्रांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेला खग्रास ग्रहण लागल्याशिवाय राहणार नाहीं हें जाणूनच गेल्या महायुद्धांत विजयी झालेल्या राष्ट्रांनीं राष्ट्रसंघाची (लीग ऑफ नेशन्स) स्थापना करून, युद्धाचा कायमचा शेवट करण्याचें लोकांना आश्वासन दिलें.

बोके संन्याशांचा निःशस्त्र-कर्म-योग

राष्ट्रसंघाची स्थापना होऊन १२ वर्षें होऊन गेलीं. या द्वादश वर्षांत जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न कितपत सिद्धीस गेले हें राष्ट्रसंघाच्या कार्याच्या आढाव्यावरून दिसत आहे. दिवसेंदिवस युरोपमध्यें नूतन युद्धाचा संभव जास्त दिसत असून अनेक राष्ट्रें गुप्त रितीनें भावी युद्धाची तयारी जारीनें करीत आहेत; ऑस्ट्रिया आणि जर्मनी यांना दाबून टाकण्याचें व सोव्हिएट रशियाच्या मार्गांत काटे पसरण्याचें काम मात्र राष्ट्रसंघाकडून इमाने-इतबारे पार पडत आहे! लोकांना दाखविण्यासाठीं, दर वर्षी संघातर्फे निःशस्त्रीकरण (Disarmament) परिषद भरवून जगाच्या कल्याणाप्रीत्यर्थ निःशस्त्रीकरणावर वादविवादाची झोड उडविली जात आहे. मोठमोठे ठराव पास होतात, रिपोर्ट छापले जातात; परंतु नाटकांतील अभिनयापेक्षां त्याला आतां जास्त किंमत उरलेली नाहीं. लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याकरतां केव्हां केव्हां युद्धसामुग्री कमी केली जाते; पण ती अशी असते कीं, जिचा आधुनिक काळांतील सुधारलेल्या युद्ध-सामुग्रीत काडीमात्र उपयोग नाहीं. उलट कमी केलेल्या युद्ध-सामुग्रीच्या

जागा सुधारलेल्या अधिक भयंकर शस्त्रांनीं भरून काढल्या जात आहेत. शांतता प्रस्थापित करण्यासाठीं इतकी बडबड होऊनहि समस्त देशांचा सैनिक खर्च वाढतच चालला आहे. जमीन, पाणी व आकाश संहारक यंत्रांच्या आवाजानें भरून जात आहे. त्यासाठीं कोट्यवधि रुपये खर्च करून नवे नवे कारखाने अस्तित्वांत येत आहेत. याचा परिणाम असा होत आहे कीं, सामान्य उपयोगाच्या वस्तू कमी प्रमाणांत पैदा होत असून जनतेच्या स्वाभाविक, आर्थिक विकासाला भयंकर आळा पडत आहे.

संहारकांची राक्षसी चढाओढ

आजकाल युरोपांतील राष्ट्रांवर कर्जाचा बोजा पडला आहे व सर्व राष्ट्रें आतां टेकीस आलीं आहेत असा सार्वत्रिक समज आहे. परंतु त्यांना त्याची काडीमात्र चिंता वाटत नाहीं हें निरनिराळ्या राष्ट्रांच्या सैनिक बजेटवरून दिसतें. इंग्लंडचा १९२७ सालचा लष्करी खर्च १९१३ सालच्या दुप्पट होता. फ्रान्सवाले म्हणतात कीं, आम्हीं सैनिकांची संख्या कमी केली आहे. पण 'शिल्लक राखलेल्या सैन्या'चा खर्च पहिल्यापेक्षां अधिक आहे. तहांतील शर्तीनुसार जर्मनीला एक लाखापेक्षां जास्त सैन्य ठेवतां येत नाहीं व कोणत्याही प्रकारची युद्धसामुग्री तयार करतां येत नाहीं. तरी देखील, जर्मन सेना सर्व जगांत शक्तिमान् समजली जात असतां जो खर्च होत होता त्याच्या निम्म्याइतका आतां होत आहे. इंग्लंड व जर्मनीत सैन्यांतील शिपाई कायमचे नोकर असल्यामुळें त्यांना जास्त खर्च करावा लागतो: परंतु फ्रान्स, इटाली, रशिया इत्यादि देशांत लष्करी शिक्षणाचा कायदाच असल्यामुळें तेथें त्यांना थोड्या खर्चांत जास्त सैन्य ठेवतां येतें. इटालीचा लष्करी खर्च पहिल्यापेक्षा दुप्पट आहे. रशियांत तर स्त्रियांच्या पलटणी उभारल्या आहेत. शिवाय सोव्हिएट रशियाला आपल्या तत्त्वप्रसाराकरिता नसलें तरी स्वतःच्या बचावाकरता एखादें महायुद्ध लढवावें लागणार याची पूर्ण जाणीव आहे. रशियन राज्यक्रांति चिरायु करणें हें रशियाचें ब्रीद उघडपणानें "Long live revolution" या गर्जनेनें कळवीत आहे. रशियन सैनिक इतर राष्ट्रांतील सैनिकाप्रमाणे भाडोत्री नसून हिंदी कॉंग्रेसच्या स्वयंसैनिकाप्रमाणें तत्त्वाकरतां जिवावर उदार झालेला असतो. तत्त्वाकरता झगडणारें सैन्य आणि पगाराकरता उभें केलेलें सैन्य यांतला फरक सांगण्याची जरूरच नाहीं. याशिवाय रशियापुढें जगांतील युद्धांचा शेवट करण्याचें निश्चित ध्येय असल्यामुळें व तें क्रांतीनेंच होईल असा त्यांचा पक्का विश्वास असल्यामुळें भावी महा-युद्धांत "रशिया" हें युद्धाचें कारण वा केंद्र होणें अपरिहार्य आहे. दुसरे छोटेमोठे देशहि हाच मार्ग चोखाळत आहेत. युरोप सध्या भावी युद्धाच्या तयारींत गुंतून गेलें आहे, असें बऱ्याच तज्ज्ञांचेंहि मत आहे. प्रत्येक देशांतील सैनिकांची संख्या व कायदे पाहिले तर हीच गोष्ट सिद्ध होते. इंग्लंडनें आपल्या सैन्यास थोडीशी कात्री लावली. त्यांच्याजवळ सध्या सुमारे १ लाख ४० हजार शिपाई आहेत. १८९५ सालच्या १ लाख ४८ हजाराच्या मानानें

युरोपियन राष्ट्रांचें सैन्यबळ

ही संख्या कमी आहे; पण इंग्लंडची ६० हजार गोरी सेना हिंदुस्थानांत आहे. हिंदुस्थान जोंपर्यंत इंग्लंडचा बटीकपणा—किंवा राजकारणाच्या भाषेंत साम्राज्यांतर्गत वसाहतीचें स्वराज्य—पत्करून राहील तोंपर्यंत येथील कोट्यवधि तरुणांना पाश्चात्त्य रणभूमीच्या कत्तलखान्यावर पाठविण्याचा इंग्रजी हक्क अबाधितच आहे. याशिवाय इतर वसाहतींकडून बरीच मदत झाल्याशिवाय राहणार नाहीं. तीस लाख सैन्याला पुरेल इतकी युद्धसामुग्री इंग्लंडजवळ नेहमीं तयार असते. फ्रान्सनें आपल्या सैन्याचें संघटन अशा प्रकारें केलें आहे कीं, वेळीं प्रसंगीं युद्धक्षेत्रावर ४० लाख सेना उभी करता येईल. तेथें शस्त्र चालविण्यालायक पुरुषास शिपाई बनविलें आहे. तोफा, मशिनगन्स वगैरेंचा आकार व शक्ति वाढविली जात आहे. या वेळीं त्यांच्या जवळ भारी मशिनगन्स, १९१४ सालापेक्षां बीसपट जादा आहेत. १४ सालीं पायदळाजवळ एकहि भारी तोफ नव्हती पण आता शेंकडों तोफा संग्रहीं आहेत. फ्रान्समध्यें कायद्याअन्वयें लढाईच्या वेळीं शेतकरी व व्यापारी यांनाहि शिपाई बनावें लागतें.

फ्रान्सचें सैन्यबळ

यावेळीं फ्रान्सजवळ ६ लाख १४ हजार सेना सदैव तयार असून रिझर्व सेनेची संख्या ४५ लाख आहे. तेथें २१ पासून ४९ वयाचा प्रत्येक मनुष्य आवश्यकता पडल्यास सैन्यांत काम करण्यास कायद्यानें बांधला गेला आहे. युद्धप्रसंगीं कारखान्यांतील कामगार आणि मॅनेजर—दोघांनाहि सैन्यांत सामील व्हावें लागतें. अशा प्रकारें फ्रान्सनें सबंध राष्ट्राला युद्धासाठी सशस्त्र बनविलें आहे. तेथें राज्यसत्ता सर्वप्रधान मानली जाते व तिच्या रक्षणासाठी देशांतील प्रत्येक साधन उपयोगांत आणलें जातें. युद्धाच्या वेळीं राष्ट्राचें संरक्षण करण्यासाठीं एक सुप्रीम कौन्सिल नेमलें असून त्यांत पायदळ, आरमार व दुसऱ्या सरकारी विभागाचे प्रतिनिधी घेतले जातात. हरएक मुला-मुलींना सहाव्या वर्षापासून शारीरिक शिक्षण घ्यावें लागतें. नवयुवकांना सैन्यांत दाखल करण्यापूर्वी कवाईत वगैरेचें शिक्षण दिलें जातें. फ्रान्सच्या प्रत्येक नागरिकाला बाळपणापासून युद्धाला निरुपयोगी ठरेपर्यंत जवळ जवळ सरकारच्या नजरेखालीं राहावें लागतें !

शृंखलाबद्ध जर्मनी

व्हर्सेलिसच्या तहान्वयें जर्मनीला ४ हजार ऑफिसरसह १ लाख सैन्य ठेवण्याची मोकळीक आहे. युद्धोपयोगी जहाजें, मोठ्या तोफा बनविण्यास बंदी आहे. एकाखेरीज सर्व किल्लेहि जमीनदोस्त करून टाकले आहेत. तो बेल्जम आणि फ्रान्सच्या सीमेवरील व्हाइनलंड प्रदेशात सैन्य ठेवूं शकत नाहीं युवकांना लष्करी शिक्षण देण्याचा कायदा काढून टाकला आहे. इतकेंच काय पण आहे ती फोजहि एकदम एके ठिकाणीं जमविण्याचीहि मोकळीक नाहीं. सैन्यांत दाखल होणाऱ्या प्रत्येक शिपायाला कमींत कमी

१२ वर्षें आणि हरएक ऑफिसरला २५ वर्षें नोकरी करावी लागते. या अटीमुळें जर्मनी आपल्या जनतेला लष्करी शिक्षण देण्यास असमर्थ बनला आहे. अशा प्रकारें जर्मनीचे हातपाय बांधले गेल्यामुळें तो आपल्या शिपायांची शक्ति वाढविण्यांत चूर झाला आहे. तेथील प्रत्येक शिपायाला हरएक प्रकारचें शिक्षण दिलें जातें. तहांतील अटीप्रमाणें जर्मनीला रिझर्व्ह सेना ठेवतां येत नाहीं; परंतु तेथें अशा कित्येक संस्था आहेत कीं, त्यांचे सभासद स्वतःच्या खर्चानें लष्करी शिक्षण घेत आहेत. या संस्थांचें कार्य गुप्त रीतीनें चालत असतें. हल्लीं जर्मनींतील युद्धविशारदांच्या मतांतहि परिवर्तन झालें आहे. गेल्या महायुद्धांतील अशिक्षित व अल्पशिक्षित कोट्यवधि सैन्याऐवजीं पूर्ण शिक्षित व चपळ मूठभर सैन्याला ते अधिक पसंत करतात. त्यांचें असें मत आहे कीं, शक्य तितक्या लवकर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सैन्य पाठवितां येणें ही युद्धांतील सर्वांत जास्त महत्त्वाची बाब आहे.

जर्मनीची नवीन युद्धपद्धति

व्हर्सेलिसच्या तहांतून जर्मनीची सुटका झाल्यास तो पुन्हां जुन्या सैनिक पद्धतीनुसार काम करणार नाहीं. तहांतील शर्तींत ठरल्याप्रमाणें जर्मनीचीं युद्धोपयोगी जहाजें, तोफा, मोटारी, विमानें, बंदुका वगैरे सामुग्रीचा नाश केला हें जर्मनीला आवडलें नाहीं. युद्ध-सामुग्री तयार करण्यासाठीं कोट्यवधि रुपये खर्चून बांधलेले कारखानेहि पाडून टाकण्यांत आले. जर्मनीच्या प्रत्येक कृत्याकडे फ्रान्स डोळ्यांत तेल घालून पाहात बसला आहे. तरी देखील जर्मनींत शारीरिक व्यायामाचा प्रचार करून तरुणांना सुदृढ व धट्टेकट्टे बनविण्यांत येत आहे. जर्मनीनें नाइलाजानें लाचार होऊन फ्रान्स व दुसऱ्या राष्ट्रापुढें मान तुकवली असली तरी त्याचा अंतरात्मा एकसारखा धगधगत आहे व वेळ येईल तशी तो आपली शक्ति वाढवीत आहे.

इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या तीन राष्ट्रांच्या लष्करी शक्तीची थोडीशी जाणीव यावरून होईल. आतां राहिलेल्या—ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, बेल्जम, रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, इटाली, रशिया इत्यादि राष्ट्रांचें लष्करी सामर्थ्य किती आहे व प्रत्येक देश तें वाढविण्याच्या प्रयत्नांत कसा गुंतला आहे तें पाहूं या!

जर्मनीचे युद्धकालीन साथीदार

जर्मनीचा साथीदार जो ऑस्ट्रिया, त्याची स्थिति जवळ जवळ जर्मनीसारखीच झाली आहे. त्याला ३० हजार सैन्य ठेवण्याची परवानगी आहे, पण त्यानें सध्यां २० हजारच सैन्य ठेवलें आहे. जर्मनीप्रमाणें ऑस्ट्रियांतहि बऱ्याच गुप्त संस्था असून त्या सार्वजनिक वर्गणी जमा करून जनतेला लष्करी शिक्षण देण्याचें कार्य करीत आहेत. या संस्थांना सरकारी मदत असावी असा कांहीं लोकांचा अंदाज आहे. महायुद्धानंतर ऑस्ट्रियांतून

फुटून, स्वतंत्र राष्ट्र बनलेल्या हंगेरीला ३५ हजार सैन्य ठेवतां येतें. तहांत ठरलेल्या अटीप्रमाणें त्याला कोणत्याहि प्रकारची युद्धाची तयारी करतां येत नसली तरी इटालीमधून गुप्तरीतीनें युद्धसामुग्री हंगेरींत पोंचविली जात असावी असें कांहीं लोकांना वाटत आहे. जर्मनीचा तिसरा साथीदार बल्गेरियाहि तहांतील अटींनी बांधला गेला आहे. त्याच्याजवळ २३ हजार सैन्य आहे. तुर्कस्थाननें महायुद्धांत जर्मनीला मदत केल्यामुळें त्याच्याविरुद्ध कांहीं अटी तयार करून त्याचेहि जर्मनीप्रमाणें हातपाय जखडून टाकण्याचा दोस्तराष्ट्रांचा विचार होता पण गाझी मुस्तफा केमालपाशापुढें सर्वांनाच हात टेकावे लागले. त्यानें सर्व प्रकारच्या सैन्याची तयारी केली असून सध्यां त्याच्याजवळ १॥ लाखापेक्षां जास्त सैन्य आहे व वेळ पडल्यास ही संख्या १५ लाखापर्यंत सहज जाऊं शकेल. केमालपाशानें खलिपांना कायमची रजा तर दिलीच पण मुसलमानांच्या वेडगळ धार्मिक रीतिभातीचेंहि उच्चाटन केल्यामुळें तुर्कस्थानांतील लष्करी सामर्थ्याची कल्पना नुसत्याच खड्या सैन्यावरून करणें चुकीचें होईल. फेज टोपी पासून मशिदीतील प्रार्थनेपर्यंत अंतर्बाह्य तुर्कस्थान बदलून गेला आहे. तुर्की स्वाभिमान तेजानें तळपतो आहे.

कटवाला फ्रान्स

दोस्त राष्ट्रांचे साथीदार–दुसरे छोटे छोटे देश–जारीनें युद्धाची तयारी करीत आहेत. लहानसा बेल्जम, तर त्याच्या जवळ ८० हजार सैन्य तयार असून आवश्यकता पडल्यास तो १२ लाख सैन्य जमा करूं शकतो. त्यानें जर्मनीच्या सीमेवर मोठी मजबूत किल्लेबंदी केली असून तिचा सर्व खर्च फ्रान्सकडून गुप्त रितीनें मिळतो असें म्हणतात. रुमानिया व झेकोस्कोव्हाकिया यांच्या जवळ अनुक्रमें २॥ व १ लाख सैन्य असून ते युद्धप्रसंगी १७ व ९ लाख सैन्य जमा करूं शकतात. झेकोस्लोव्हाकियाला मशिनगन् वगैरेसारखी युद्धसामुग्री फ्रान्सकडून मिळत असून त्यानें आपलें सैन्यहि फ्रान्सच्या पद्धतीवर बनविलें आहे. पोलंड देश महायुद्धापूर्वी रशियाच्या अमलाखालीं होता. त्याचा कांहीं भाग जर्मनी व आस्ट्रियांतहि सामील झाला होता. पण तहांतील अटीमुळें त्याचे विभागलेले प्रदेश एकत्र होऊन तेथें नवीन राज्य अस्तित्वांत आलें. पोलंड प्रजातंत्र समजला जातो पण वास्तविक लष्करी सत्ताच सर्वप्रधान आहे. सध्या तो फ्रान्सचा अत्यंत जिव्हाळ्याचा मित्र बनला असून सैन्याच्या बाबतींत त्यानें फ्रान्सचें अनुकरण चालविलें आहे. त्याचे लष्करी खर्चासाठीं शेंकडा ३८ टक्के खर्ची पडत आहेत. शिवाय फ्रान्सकडून मदत मिळते ती वेगळीच. १५१ सेनापती, ५०० कर्नेल, १७ हजार ऑफिसर आणि ३७ हजार छोटे ऑफिसर आहेत. शिपायांची संख्या ३ लक्ष ३० हजार आहे. वेळी प्रसंगी २० लाख सैन्य जमा करूं शकतो.

पोलंडचा कडेकोट बंदोबस्त

जर्मनी आणि रशिया यांच्यामध्यें त्यांचें राज्य असल्यामुळें स्वतःच्या संरक्षणाचा बहाणा करून तो आपल्या इच्छेप्रमाणें युद्धाची तयारी करीत आहे. ऑस्ट्रियाच्या वरच्या

सिलेशियावर व जर्मनीच्या डेनजिक नामक प्रदेशावर तो आपली हुकमत जबरदस्तीनें चालवीत असल्यामुळें आस्ट्रिया आणि जर्मनी त्याच्यावर दातओठ चावीत आहेत. फ्रान्सप्रमाणें पोलंडनें देखील बहुतेक लष्करी खर्च दुसऱ्या खात्यांत सामील केला आहे. महायुद्धपूर्वी बर्लिन शहर जसें दिसत असे तसें आता पोलंडची राजधानी–वारसा–दिसूं लागली आहे. जिकडे पाहावें तिकडे लष्करी पोषाख दृष्टीस पडतात. स्टेट बँकेचा प्रधान आणि गृहमंत्री हे सुद्धा लष्करमध्यें काम करतात. दारूगोळ्याचे बहुतेक कारखाने जर्मनीच्या सीमेवर उभारले आहेत. देशाच्या दुसऱ्या भागांतहि बाहेरील मदत घेऊन कारखाने उघडले आहेत. याशिवाय लोकांच्या खाजगी मालकीच्या कारखान्यांत युद्धसामुग्री तयार करण्याचा सरकारला अधिकार आहे. यामुळें सरकारी अधिकारी नेहमींच कारखान्याचें परीक्षण करतात व ते ज्या प्रकारची सांगतील त्या प्रकारची मशिनरी कारखानदारांना मुकाट्यानें आणावी लागते. पूर्व आणि पश्चिम सरहद्दीवर मजबूत किल्ले बांधले आहेत. शाळेंतील मुलाला लहानपणापासून लष्करी कवाईत, लष्करातील अधिकाऱ्यांस शिक्षक नेमून शिकवितात. एवढ्यानें समाधान न होऊनच कीं काय, आक्विजलिअरी कायदा काढून सोळापासून साठ वर्षें वयाच्या प्रत्येक पुरुषाकडून लष्करी काम करून घेण्याची सरकारने सोय केली आहे.

मुसोलीनीहि पवित्रा टाकून तयार

इटालीत फॅसिस्ट सरकार असून त्याची शिपाईगिरीबद्दल जगांत प्रसिद्धि आहे. अद्याप इटालीत सैन्यासाठीं जास्त खर्च केला जात नसला तरी फॅसिस्ट चळवळीच्या प्रभावानें तेथील जनतेत लढाऊपणा संचारला आहे. इटालीच्या सैन्याची संख्या ४ लाख असून युद्धप्रसंगी ४९–५० लाख सैन्य जमा करूं शकतो. लढाऊ जहाजें, टारपिडो, मोटारी यांची संख्या इतकी वाढली आहे कीं, मोठमोठ्या राष्ट्रांनाहि इटालीची भीति वाटत आहे. तेथील ६० हजार पोलीस व २३ हजार कस्टममधील नोकर लढाऊ सैनिक आहेत. युद्धाच्या वेळीं सर्व सैन्याला दारूगोळा मिळेल अशी मुसोलिनीनें व्यवस्था केली आहे. शारीरिक शक्तीच्या खेळाचा जारीनें प्रसार होत असून त्यांत स्वतः मुसोलिनी भाग घेत असतो. आठपासून चाळीस वयापर्यंतच्या पुरुषांना लष्करी शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. इटालीची सेना पाहून फ्रान्स नेहमी शंकित असतो. मुसोलिनीनें अल्बेनियाला सैनिक–सामुग्रीची मदत करून आपला साथीदार बनविला आहे. शिवाय हंगेरी, बल्गेरिया, ग्रीस व तुर्कस्थान यांच्याबरोबर मित्रवत व्यवहार ठेवला आहे.

रशिया–भांडवलशाहीच्या हृदयांत रुतलेलें शल्य

आतां राहिला रशिया. त्याला सर्व युरोपवाल्यांनीं बहिष्कृत केला आहे. त्याची शासनपद्धति जगातील सगळ्या देशापेक्षां वेगळी आहे. या पद्धतीची झळ आपल्या देशाला लागून सुख-शांतीचा (?) भंग होऊं नये म्हणून भांडवलवाले देश प्रत्यक्ष

किंवा अप्रत्यक्ष रशियाला खची करण्यासाठीं टपून बसले आहेत. पण रशियाला या 'शुभचिंतकां'च्या हेतूची जाणीव असल्यामुळें तो नेहमींच स्वतःचे रक्षण करण्यास तत्पर असतो. त्याची नियमित व रिझर्व्ह सेना बरीच आहे. स्त्रियांची इच्छा असल्यास त्यांना पुरुषाबरोबर सैन्यांत प्रवेश मिळतो. नियमित सैन्यांतील शिपायांना २१ पासून ३० वर्षें वयापर्यंत नोकरी करावी लागते. ज्यांची सैन्यांत नोकरी करण्याची तयारी नाहीं अशांना सहा महिन्यांत लष्करी शिक्षण दिलें जातें. शस्त्रें पाळण्याचा अधिकार फक्त श्रमजिवी लोकांनाच आहे. जमीनदार लोकांना हत्यार पाळण्याची परवानगी नाहीं व युद्धाच्या वेळीं त्यांना श्रमजिवी लोकांच्या पुढें उभे करण्याचा नियम आहे.

रशियन रिझर्व्ह फौज किती ?

रशियाचें नियमित सैन्य ५ लाख ६३ हजार आहे. पण सहा महिने शिक्षण देऊन तयार केलेल्यांनाहि सामील करून तो वाटेल त्या वेळीं १५ लाख शिपाई जमा करूं शकेल. त्याची रिझर्व सेनेची संख्या निश्चितपणें कोणालाच माहीत नाहीं. पण १ कोट २० लाख असावी असा अंदाज आहे. यांतील लष्करी शिक्षण घेतलेल्या लोकांची संख्या ७२ लाखांपेक्षां जास्त नाहीं. रशियामध्यें आज्ञापालनावर जास्त जोर दिला जातो. आज्ञा मोडणाऱ्यांना फार कडक शासन करितात. कायम सैन्यांतील शिपायांना पगार कमी मिळतो; परंतु घर, अन्न वगैरे बाबतींत इतक्या सवलती असतात कीं, बरेच लोक सैन्यांतील नोकरी पसंत करतात. जो बीस वर्षें सैन्यांत नोकरी करतो, त्याला पुऱ्या पगाराइतकें पेन्शन मिळतें. रशियांत लष्करी शिक्षणासाठीं सात युनिव्हर्सिट्या व कित्येक शाळा आहेत. प्रत्येक मुलाला शारीरिक शिक्षण घ्यावेंच लागतें. १६ पासून १९ वयापर्यंतच्या मुलांना सरकारी अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं विशिष्ट प्रकारचें शारीरिक शिक्षण मिळतें. लहान लहान मुलांना बाँब फेकणें व बिघारी गॅसपासून वांचण्यासाठीं 'मास्क' लावण्याचें शिक्षण देतात. जनतेंत लष्करी शिक्षणाचा फैलाव करण्यासाठीं कित्येक संस्था निघाल्या आहेत. 'ओसोवियेनत्रा' नांवाच्या संस्थेचे ३० लाख सभासद आहेत. या संस्था लोकांना रासायनिक युद्ध–पद्धतीचें शिक्षण देत असतात.

बगळ्यांचे शांतिपाठ

आजकाल युरोप हा एक दारूखाना बनला आहे. दारू-गोळा तयार आहे, आतां फक्त आगीची ठिगगीच लागण्याचा काय तो अवकाश आहे. पण गंमत अशी, भावी महायुद्धामध्यें विजय मिळविण्यासाठीं जीं राष्ट्रें परिश्रम करीत आहेत व युद्धसामुग्री वाढविण्याच्या खटपटींत आहेत, तींच सर्वांत जास्त 'शांति शांति' अशी ओरड करीत आहेत. गेल्या महायुद्धानंतर असें वाटत होतें कीं, ही शेवटचीच लढाई असून सगळें जग सार्वभौमिक साम्राज्यांत अविच्छिन्न सुखाचा अनुभव घेईल. परंतु शांततेची ही आशा स्वप्नाइतकी खोटी ठरली. आतां गेल्या महायुद्धांत, लढाईच्या मैदानावर

वाहलेलें रक्त वाळतें न वाळतें तोंच दुसऱ्या एका महायुद्धाचे काळे ढग युरोपच्या अंतरिक्षांत दिसूं लागले आहेत. या महायुद्धाची आग प्रथम युरोपांत भडकेल यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु ती युरोपालाच लागेल असें नाहीं. तिची थोडीबहुत झळ अमेरिका आणि आशिया यांनाहि लागण्याचा संभव आहे.

लीग ऑफ नेशनस्‌च्या उत्पत्तीचें कारण

कांहीं राष्ट्राच्या ताब्यांत मोठी दौलत, पुष्कळ जमीन, अनेक देश आणि वरींच साधनें आहेत. परंतु या साधनांना आणि संपत्तीला जीं राष्ट्रें मुकलीं आहेत, तीं संपत्तिमान लोकांचा सूड घेण्यासाठीं युद्धाचें कारण शोधीत आहेत. युरोपांत जेवढीं राष्ट्रें आहेत तीं सर्व दोन विभागांत वाटलीं गेलीं आहेत. एका विभागांतील राष्ट्रें अशीं आहेत कीं, ज्यांच्याजवळ अधिक देश, अधिक धन आणि अधिक शक्ति आहे आणि दुसऱ्या विभागांत ज्यांच्याजवळ पहिल्यापेक्षां कमी जमीन, कमी धन व कमी ताकद आहे, अशीं राष्ट्रें आहेत. या दोघांत अधिक भाग्यशाली राष्ट्रें इंग्लंड व फ्रान्स हीं होत. ज्या राष्ट्रांना युद्धामध्यें जय मिळतो त्यांचा स्वभावतः फायदा होतो. जी संपत्ति, देश आणि शक्ति आपल्या हातीं आलीं आहे तीं नेहमींच आपल्या ताब्यांत राहावीं अशी विजयी राष्ट्रांची मनीषा असते. एवढ्यासाठीं ती शांति, बंधुभाव वगैरेसारख्या जनतेला सुरळ पाडणाऱ्या थापा मारीत असतात. त्यांना शांतीशिवाय, गत युद्धात मिळविलेल्या संपत्तीचा सुखाचा यथेष्ट उपभोग घेतां येत नाहीं. इंग्लंड व फ्रान्स हीं वरून शांतीसाठीं सगळ्यापेक्षा जास्त उत्सुक दिसतात व तसें जगाला दाखविण्यासाठीं त्यांनी राष्ट्रसंघ--लीग ऑफ नेशन्स--काढला आहे.

परंतु कांहीं देश असे आहेत कीं, ज्यांना खरोखरीच शांतीची आवश्यकता आहे. हे देश झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लोव्हिया, रुमानिया आणि पोलंड होत. हे सर्व देश गत महायुद्धानें अस्तित्वांत आले असून त्यांची घडी अद्याप नीट बसलेली नाहीं. त्यांचा नवीन युद्धापासून फायदा होण्याऐवजीं झालाच तर एखाद्या देशाचा लोप मात्र होईल. यांतील प्रत्येक देशांत कांहीं अल्पसंख्याक जातीहि आहेत. रुमानियांत १ कोटी २५ लक्ष रुमेनियन व ५० लक्ष दुसऱ्या जातींच्या लोकांची वस्ती आहे. युगोस्लोव्हियामध्यें जवळ जवळ ५-६ वर्गांचे अल्पसंख्याक लोक आहेत. झेकोस्लोव्हाकियांत ६७ लक्ष झेक्स, २२ लक्ष स्लोव्क्स व ५० लक्ष दुसऱ्या जातीचे लोक आहेत. पोलंडची स्थिति अशीच आहे. पोलंडच्या २ कोटी ९० लक्ष लोकसंख्येपैकी अस्सल पोल्स १ कोटी ८० लक्ष आहेत. भिन्न भिन्न वर्गांची वस्ती असलेल्या देशांना, ते अलग होतील अशी भीति वाटत असल्यामुळें युद्धाची इच्छा नाहीं. याशिवाय स्वीत्झर्लंड, डेन्मार्क, बेल्जम, हॉलंड इत्यादि देशांना मुद्दाम युद्धाची तयारी करावी लागत आहे. कारण युद्धाबद्दल उदासीन राहिलें तरी अप्रत्यक्ष रीतीनें युद्धाच्या वेळीं कांहीं ना कांहीं हानी झाल्याशिवाय राहणार नाहीं. पोलंड, बेल्जम, रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया वगैरे देशांना फ्रान्स जी मदत करीत आहे; ती देवीपुढें बळी दिल्या जाणाऱ्या बोकडाला खाऊं घालण्यापेक्षां

अन्य तऱ्हेची नाहीं. पण या गोष्टीकडे त्या देशांतील, हातांत सत्ता असलेले भांडवलवाले मुद्दाम दुर्लक्ष करून भांडवलवाल्या फ्रान्सच्या जोरावर युद्धाची तयारी करीत आहे.

भावी रक्तपाताची सुख(?) स्वप्नें

कांहीं देश असे आहेत कीं, ज्यांना भावी महायुद्धाच्या भरपूर लाभाचीं स्वप्नें पडत आहेत. अशा देशांत हंगेरीचा दर्जा अव्वल आहे. गेल्या महायुद्धांत त्याचा बराच मुलूख गेला. ३० लक्ष हंगेरियन आपल्या मातृभूमीपासून अलग करून परदेशीयांच्या हुकमतीखालीं ठेवले गेले. हंगेरी याबद्दल असंतुष्ट असून ज्या तहामुळें असें झालें तो तह उलटविण्याची तो संधी पाहात आहे. हंगेरीचे सगळे लोक या तहाविरुद्ध आहेत. मातृभूमीपासून अलग केलेले ३० लक्ष लोक परत जर हंगेरीला मिळतील तर तो आजहि युद्ध करायला तयार आहे. हंगेरीच्या मोठमोठ्या संस्थांनी युद्धाची तयारी केली आहे. हंगेरियन आपल्या पराधीन भाईंना विदेशीयांच्या गुलामगिरींतून सोडविणें आपलें पवित्र कर्तव्य मानत आहेत. युद्धामुळें हा उद्देश सिद्ध होत असेल तर दुनिया काय म्हणते याची त्याला पर्वा नाहीं.

गुप्त-क्रान्तिकारी-संस्था

अशी स्थिति बाल्कनमधील मेसिडोनियाची आहे. युगोस्लोव्हिया, ग्रीस आणि बल्गेरिया या देशांमध्यें मेसिडोनिया विभागला गेला असल्यामुळें तोहि असंतुष्ट आहे. त्याला स्वातंत्र्य पाहिजे. त्यासाठीं त्यानें एक क्रांतिकारी संस्थाहि स्थापन केली आहे. संस्थेचा उद्देश शत्रूच्या सैन्यातील मुख्य मुख्य व्यक्तींचा प्रत्यक्ष किंवा गुप्त रीतीनें खून करणें हा आहे. बल्गेरियात मेसिडोनियन लोक अधिक असल्यामुळें बल्गेरियनहि मेसिडोनियन लोकांच्या या उद्योगाबद्दल सहानुभूति राखीत आहेत.

एक मोठी प्रचंड शक्ति हंगेरी, मेसिडोनिया व बल्गेरियाबद्दल सहानुभूति ठेवते-ती इटाली होय. गत महायुद्धांत इटालीला जेवढी आशा होती, जितका मुलूख आपल्याला मिळाला पाहिजे, तितका मिळाला नाहीं अशी इटलीची तक्रार आहे. मुसोलिनीच्या नेतृत्वाखालीं इटाली दिवसेंदिवस शक्तिशाली बनूं लागला आहे. तो आपल्या सद्यःस्थितीबद्दल संतुष्ट नाहीं. दुनियेत शक्तिशाली राष्ट्रांना जो दर्जा आहे तो आपल्याला मिळावा अशी त्याची इच्छा आहे. याशिवाय युगोस्लोव्हियाचा काही हिस्सा ज्युगोस्लोव्हियाला दिल्यामुळें इटाली रागात आहे. यामुळें युरोपांतील वर्तमान देशांतील सीमेमध्यें परिवर्तन करण्याची तो वाट पाहात आहे. जर कदाचित् युद्धाला सुरुवात झाली तर इटाली प्रथम त्यांत सामील होईल.

जर्मनांचा मातृभूमीकडे ओढा

जर्मनीची शक्ति दिवसेंदिवस वाढूं लागली आहे. गत महायुद्धानंतर झालेल्या तहांत जर्मनीचा मोठा भाग अलग करून दुसऱ्या देशांत सामील केला. यामुळें जर्मन फार

नाराज झाला आहे. ३ लक्ष ३५ हजार जर्मन झेकोस्लोव्हाकियांत, १ लक्ष पोलंड आणि काही लक्ष जर्मन दुसऱ्या देशांत वाटले गेले. यांपैकीं बरेच जर्मन पुनः आपल्या मातृभूमींत येऊं पाहात आहेत व ज्यांना परत येण्याची आशा नाही, ते निदान आपली मातृभूमि सर्वोच्च स्थानावर गेलेली पाहूं इच्छितात. ऑस्ट्रिया आणि जर्मनी एक व्हावा अशी जर्मनीची खटपट चालू आहे. एवढी गोष्ट खरी कीं, युरोपांत पुढें जें परिवर्तन व्हायचें आहे त्यांत जर्मनी आणि ऑस्ट्रिया मिळून एक राष्ट्र झाल्याशिवाय राहात नाहीं. साम्राज्यवादी व भांडवलवाल्या राष्ट्रांना जमीनदोस्त करण्यासाठीं रशिया तर टपून बसला आहे.

पण ठिणगी कोठें उडेल ?

हंगेरी, मेसिडोनिया, बल्गेरिया, इटाली, जर्मनी व रशिया हीं सर्व राष्ट्रें युद्धाला तयार आहेत फक्त कारण सापडण्याचाच काय तो अवकाश आहे. युद्ध सुरू झाल्यास जे देश आज " शांति शांति " म्हणत आहेत तेच युद्धांत सर्वांत पुढें दिसतील. गत महायुद्धास बाल्कन द्वीपांत सुरुवात झाली व हेंहि युद्ध तेथेंच पेट घेईल. कारण गेल्या तहामुळें नाखुष असलेले देश तेथेंच जास्त आहेत.

युरोपांत श्रीमंत आणि गरीब हा ठळक भेद दृष्टीस पडतो. श्रीमंत दिवसेंदिवस जास्त श्रीमंत आणि गरीब जास्त गरीब होत चालले आहेत. रशियानें गरिबाच्या–शेतकरी व कामकरी–दुःखाला वाचा फोडल्यापासून आपल्या हातांतहि मोठी शक्ति आहे ही जाणीव अलिकडे प्रत्येक देशांतील बहुजन समाजाला होऊं लागली आहे. लढाया माराव्यात बहुजन समाजानें आणि त्यांचा फायदा मात्र घेत आहेत भांडवलवाले. हें शेतकऱ्यांना व कामकऱ्यांना समजूं लागल्यामुळे ते केव्हां भांडवलवाल्यांवर उलटतील तें सांगता येत नाहीं. स्वतःवर उलटणाऱ्या लोकांना दुसऱ्या युद्धांत गुंतवून आपला व्यापार वाढवावा, खूप पैसा मिळवावा व सर्व सुखें उपभोगता यावींत यासाठीं इतरांपेक्षां भांडवलवाल्या देशांना महायुद्धाची अत्यंत जरुरी आहे.

शस्त्रत्यागाच्या पोकळ बाता

जगाची शांतता शास्त्रीय शोधाच्या शीघ्र गतीबरोबर चालल्यामुळें सर्व मनुष्यजातीच्या कल्याणाकरता म्हणून लागलेले शोध मानवसंहारास कारण होत आहेत. शोधाबरोबर चिंताहि वाढत चालली आहे. महायुद्धांना आळा बसल्याशिवाय लागलेले सर्व उपयुक्त शोध अनुपयुक्त ठरत आहेत. दहापांच मिनिटांच्या धडपडीनंतर उडणारी तोफ्याची बंदुक जाऊन ७० मैलांवर टप्पा मारणारी मशीनगन् आली, यामुळें रुधिरप्रिय महत्त्वाकांक्षेला उत्साहन मिळालें कीं

संहार संरक्षणाकरतां असतो

या अनादि तत्त्वाला मिठाळें हें आज तरी नक्की ठरवता येत नाहीं. या बाबतींत युरोपियन राष्ट्रांची आज शतकानुशतकें चढाओढ लागली असून, माजी कैसर यानें

तर सर्व सुधारणांचा सर्वस्वीं उपयोग करून स्वतःबरोबर जगाच्या नैतिक शाश्वतीलाहि मोठा धक्का दिला आहे; ह्या धक्क्याचा परिणाम बरा झाला कीं वाईट झाला हें मोजायला अजून अवकाश आहे. वास्तविक यांतलीं जेतीं राष्ट्रें कोणतीं आणि पराजित कोणतीं हें ठरविणें आज तरी बिकट आहे. ज्यांना आपण जेते समजतों आहोंत त्यांची स्थिति एखाद्या मोडकळीस आलेल्या पण बरून मिशांना तूप चोळणाऱ्या जहागिरदारासारखी झाली आहे. हिंदी राष्ट्र स्वावलंबनाच्या संक्रमणावस्थेंत असतांना त्याला "शस्त्रत्याग कीं शस्त्रस्वीकार" याचा विचार केलाच पाहिजे. विशेषतः हिंदी शेतकऱ्यांना तर या प्रश्नाचा विचार केला पाहिजे, कारण जेव्हां जेव्हां लढाईची धामधूम सुरूं होते, तेव्हां तेव्हां शेतकऱ्यांना आणि कामकऱ्यांनाच हातात शस्त्रें घेऊन एकमेकांचे गळे कापावे लागतात. वरचा भांडवलवाला वर्ग आपल्या हिताकरता "राष्ट्रीय" या नावाखाली शेतकरी-कामकऱ्यांना शिपाई बनवून "रणभूमीच्या कत्तलखान्यावर" पाठवीत असतो.

लढाईतला खरा 'दुष्मन' कोण ?

शत्रु मानलेल्या राष्ट्रांतील शेतकऱ्यांनी दुसऱ्या शेतकऱ्यांचें कसलेंहि नुकसान केलेलें नसतें; परंतु साम्राज्यशाहीच्या अगर व्यापारी साम्राज्याच्या अघोर तृष्णेकरतां बहुजन समाजाचा रणयज्ञ करणें ही भांडवलदारी कुटिल राजनीति होय. भांडवलवाली रुधिरप्रिय राष्ट्रें सध्यां शस्त्रत्यागाच्या बाता मारूं लागलीं आहेत. प्रथम युरोपिय राष्ट्रसंघाच्या खटपटीची छाननी केल्यास मग हिंदी शेतकऱ्यांनीं काय करावें हें ठरविणें सोपें जाईल. १९२५ सालीं भरलेल्या राष्ट्रसंघाच्या सहाव्या परिषदेनें एक ठराव पास केला आहे. राष्ट्रसंघाच्या कॉव्हेनंटनें शस्त्रत्यागाचें तत्त्व मान्य केलें आहे, यासंबंधीं जें कॉव्हेनंटचें कलम आहे तें आठवें आहे. या आठव्या कलमाला धरून परिषदेनें "सर्वसाधारण शांतता" (General Security) राहण्यास धोका नसेल तर सर्व राष्ट्रांच्या सैन्यांत छाट किंवा मर्यादा घालण्याबद्दल विनंति केली. या परिषदेनंतर अवघ्या ३ आठवड्यांतच लोकोनों परिषदेनें सर्वसाधारण शांतता शक्य आहे किंवा साध्य करतां येईल अशी घोषणा केली आणि युरोपांतील सर्व प्रबळ राष्ट्रांनीं एक विचारानें पुढील जाहीरनामा प्रसिद्ध केला.

शांततेचा जाहीरनामा

"ज्या ज्या गव्हर्नमेंटचे प्रतिनिधी येथें आहेत ते आम्ही जाहीर करतों कीं, निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें जी स्पर्धा–द्वेष माजून राहिलेला आहे त्याला या शस्त्रमर्यादेच्या तहामुळें नैतिक बळ राहणार नाहीं. युरोपमधील शांतता अबाधित राहावी म्हणून राष्ट्रसंघाच्या कॉव्हेनंटच्या ८ व्या कलमाप्रमाणें "शस्त्रत्याग" व्हावा असें आमचें ठाम मत आहे. यामुळें युरोपचे गुंतागुंतीचे राजकीय आणि आर्थिक प्रश्नहि सुलभ होतील असेंहि आमचें मत आहे" वगैरे. यानंतर कांहीं दिवसांनीं त्या वेळचे इंग्लंडचे परराष्ट्र

मंत्रि मि. चेंबरलेन यांनीं उद्गार काढले कीं, " लोकोनोंचा करार युद्धांना अशक्य करणार नाहीं, कोणीहि मनुष्य किंवा संघ अशी हमीहि देऊं शकणार नाहीं; परंतु सदर तहामुळें इतर कोणत्याहि उपायांपेक्षां युद्धें जरा दूर (less probable) ढकललींत ही गोष्ट मात्र खरी आहे, लोकोनों तहानें जगाच्या शांततेला मोठी मदत केली आहे असें मला वाटतें; इतर सरकारप्रमाणें ब्रिटिश सरकारचेहि तेथें प्रतिनिधी होते आणि त्यांनीं या तहाला अगदीं जोराचा पाठिंबा दिला आहे. एकमेकांविषयीं संशय, भीति घालविण्याचा आम्हीं प्रयत्न केला आणि " सेक्युरिटी "ची जाणीव उत्पन्न करून दिली. आम्ही शस्त्र-संन्यास शक्य केला आणि तो अमलांत येत जाणार. "

राष्ट्रसंघावर वर्चस्व

राष्ट्रसंघावर इंग्लंड आणि फ्रान्स यांचे वर्चस्व आहे अशी चर्चा जिनेव्हामध्यें नेहमीं चालत असे किंवा आंग्लो-फ्रेंच म्हणजेच राष्ट्रसंघ अशी समजूत अजूनहि प्रचलित आहे. ही समजूत अतिशयोक्तीची आहे असें दोन्ही राष्ट्रांतले धूर्त, मुत्सद्दी म्हणत असत. पण वस्तुस्थिति–विशेषतः रशिया आणि जर्मनी यांचा प्रश्न निघाला तर याच दोन राष्ट्रांच्या हातांत संघाची किल्ली आहे. जेव्हां इटालीचा वाद उद्भवतो आणि मुसोलिनी गुरगुरू लागतो तेव्हां ब्रिटिश जॉनबुल थोडासा वचकून, घड ना फ्रान्स ना इटाली अशा लवचिक मुद्द्यावर आपलें मुत्सद्दीपण चालवतो. लहानलहान राष्ट्रांनीं आत्म-संरक्षणासाठीं शस्त्र-मर्यादेची मागणी अनेक दिवस चालवली होती. लोकोनों तहावर फ्रान्स–इंग्लंड–इटाली आणि लाचार जर्मनी यांचें एकमत झाल्यामुळें हा शस्त्रत्यागाचा फार्स तेवढ्यापुरता त्यांना जगाला चांगल्या तऱ्हेनें दाखवतां आला.

संहारक तो सुधारक

वास्तविक जो जास्त संहारक तो सुधारक अशी युरोपची मनःस्थिती झालेली आहे. मनुष्य-संहार सफाईनें कसा करतां येईल ही सुधारणा आणि सर्व मनुष्यजातीला अत्यंत भयंकर अशा आर्थिक गुलामगिरीत कसें टाकतां येईल हें साध्य, ही युरोपची आज-पर्यंतची साध्यसाधनाची व्याख्या आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत सबंध युरोपखंड लष्करी पेशाच्या राक्षसी वृत्तीनें धुंद झाला होता. साम्राज्यशाहीच्या जुन्या तरवारीला संशोधनाचें तेजप लावून मनुष्यजात गुलाम करण्याचा युरोपियन कट अखेर आपसांतल्या यादवीनें किंवा गेल्या महायुद्धानें युरोपच्या अंगावरच उलटला. रशियन राज्यक्रांतीनें युरोपची धुंदी उतरली. एकदां लॉर्ड ग्रे यांना एक जपानी इंग्लंडमध्यें भेटला असतां, " सिव्हिलायझेशन "संबंधीं त्या जपान्यानें लॉर्डांना खडखडीत पण मोठें मार्मिक उत्तर दिलें आहे. रुसो-जपान युद्धानंतर जपानला युरोपमध्यें जें महत्त्व आलें आणि त्याची सुधारलेल्या राष्ट्रांत गणना कां होऊं लागली याविषयीं तो जपानी म्हणतो, " We were to be a nation of artist; our art was really very good; you called us barbarian then, now our art is not so good as it

was, but we learnt how to kill, and you call us civilised " " आमचें राष्ट्र सर्व कलानिपुण होतें. खरोखरीच उत्तम कलावंत होतें पण त्या वेळेस तुम्ही पाश्चात्त्य लोक आम्हाला जंगली म्हणत होतां, हल्लीं आमचें कलाकौशल्य पूर्वीइतकें उत्तम राहिलेलें नाहीं; परंतु 'मारावें कसें' ही कला आम्ही शिकलों त्याबरोबर तुम्ही आम्हाला सुधारलेलें राष्ट्र म्हणूं लागलांत." लॉर्डसाहेबांनीं आपल्या 'Twenty–five years' या पुस्तकांत हे शब्द उद्धृतहि केले आहेत. या वेळीं सदर जपानी गृहस्थानें जें उत्तर दिलें तें नुसत्या जपानचें उत्तर नसून अखिल आशिया आणि आफ्रिका यांच्यातर्फे युरोपच्या सुधारणेची ती त्यानें किंमत केली. कसाईखान्यांत जैन संन्याशाला लाथा खाव्या लागणार व जंगली गोसावडा म्हणून अपमान सहन करावा लागणारच. जेथें सुधारणेचा अर्थच संहार; तेथें कला, सौंदर्य, काव्य, शिल्प वगैरेंची मातब्बरी काय? कलेच्या दृष्टीनें हिंदुस्थान युरोपच्या कधींही मागें नव्हता किंवा सर्वांच्या गुरुस्थानीं होता असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. पण कसाई–कला हिंदुस्थानला माहीत नसल्यामुळें अगर तो आतां शस्त्र-संन्यासाची राख लावणाऱ्या युरोपच्या याहि बाबतींत पुढें गेला असल्यामुळें त्याला युरोपपुढें 'जंगली' ठरावें लागलें, आणि त्याचा 'रानटी'पणा काढून टाकण्याकरतां साता समुद्राहून काबाडकष्ट वेऊन त्याचे गोरे 'ट्रस्टी' धांवून आले. हिंदुस्थानचा 'ट्रस्ट' ज्या वेळीं इंग्लंडनें हातीं घेतला तेव्हां हिंदुस्थान सर्व कलासंपन्न होतें. फक्त ही 'संहार' अवकला विपन्न होतें. जंगली लोकांत जेव्हां दुसऱ्याची कत्तल करावयाची असेल तेव्हांच लवकर एकी होते. युरोपियन राष्ट्रांत दुसऱ्याला लुबाडतांना राजापासून तो रंकापर्यंत तेव्हांच एकी होत असे, असा इतिहास आहे. या लांडग्यांच्या सुधारणेला जेव्हां जपाननें उत्तर दिलें तेव्हां जपानहि 'राष्ट्र' आहे; पौर्वात्य राष्ट्रांतला 'जंगलीपणा' जाणें शक्य आहे, असें युरोपियन राष्ट्रांना वाटूं लागलें.

युरोपची रक्तलालसा किती अघोर आहे हें अजूनही त्यांच्या स्वराष्ट्र संरक्षणाच्या नांवाखालीं परराष्ट्र संहारणासाठीं खड्या असलेल्या सैन्यावरून ठरवतां येईल.

गेल्या महायुद्धाच्या हंगामांत सुरुवातीला संबंध युरोप खंडांतील प्रबळ सहा राष्ट्रांजवळ नुसत्या पहिल्या आणि दुसऱ्या लाईन ट्रुपस शिपाई एक कोटी ऐंशी लक्ष होते आणि त्यांची सर्व संघटित शक्ति ३ कोटी ७८ लक्ष लोक होती. एवढी सामुग्री एकमेकांचे गळे कापण्याकरतां तयार करणें ही युरोपियन राष्ट्रांची सुधारणा! कोट्यवधि शेतकरी व कामकरी एकमेकांत झुंझवून युरोपनें काय साधलें तर कर्जबाजारीपणा, दारिद्र्य, उपासमार! लढाईनें फायदा भांडवलवाल्यांचा मात्र झाला. लढाईकरतां म्हणून जें त्यांनीं भांडवल घातलें होतें तें लढाईच्या वेळीं आणि नंतरहि शतपटीनें उगवून घेतलें.

◇◇◇

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३०२५
दा. क. २२-५-५६
शिवाजी २१/८/५६
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

सोशियालिझम–समाजसत्तावाद

"**सोशियालिझम**" हें नांव ऐकतांच निरनिराळे प्राणी एकदम गोंधळून जातात. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या विद्वान म्हणविणाऱ्या सद्गृहस्थांनीसुद्धां भांडवलवाल्यांच्या पत्रावरून सोशियालिझमविषयीं निरनिराळ्या कुकल्पना ठाम करून घेतलेल्या असतात. कांहीं असत्य गोष्टी गृहित धरून सोशियालिझमची वेळी-अवेळी टवाळी केली जाते. कांहीं लोक तें न समजण्याइतके अज्ञानच असतात, तेव्हां त्यांची कीव करणें जरूर आहे; महाराष्ट्रापुरताच जरी विचार केला तरी असें सहज म्हणतां येईल कीं, "ब्राह्मण्याचे" अभिमानी पुढाऱ्यांचा कोठा सोशियालिझम पचविण्यास सोईचाच नाहीं. सत्यशोधक पुढाऱ्यांना वाचनाच्या अभावी सोशियालिझमचा अर्थ कळला नाहीं तरी सत्यशोधक समाजच सोशियालिस्ट असल्यामुळें त्यांचें वर्तन तरी अर्धवट सोशियालिस्ट असतें, त्यांतूनहि ज्याची दृष्टि फक्त कौन्सिलावर किंवा लोकलबोर्डावर अगर सवंग मान्यतेवर खिळली आहे, अशांना सोशियालिझमचा विचार करण्याची जरूर तरी **काय** आणि तो त्यांनीं **कां** करावा ? शेतकऱ्यांमध्यें सोशियालिझमचा प्रसार झाला म्हणजे हे आपले "बंधुजनहो, मी तुमचाच आहे" म्हणायला तयार. यातूनहि एक धूर्त वर्ग असा आहे कीं, त्याला सर्व माहीत असतें, त्यांना भविष्यकाळ दिसतोहि पण "कानडाचा गरम कोट हिंदुस्थानच्या अंगाला येणार नाहीं." अशी सबब पुढें करणाऱ्या बेडर इंग्रजाप्रमाणें यांची मनःस्थिति असते त्यांना कोणीकडून तरी समाजसत्तावादाला गाडून टाकावयाचें असतें व त्याकरतां या सबबी पुढें कराव्या लागतात. "सत्यशोधक" म्हटला कीं तो नास्तिक, दुष्ट, शिव्या देणारा अशी ब्राह्मणी पत्रानें मोहीम सुरूं करून सत्यशोधकाविषयीं गैरसमज पसरविला होता; त्याचेंच अनुकरण कांहीं अपघातजन्य ब्राह्मण–ब्राह्मणेतर पुढारी सोशियालिझमच्या बाबतींत करीत आहेत. सोशियालिझमशीं शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा संबंध येणार आहे. ग्रेट ब्रिटनसारख्या कट्टर साम्राज्यवादी देशांतसुद्धां कामकरी व शेतकरी वर्ग सोशियालिस्ट बनत चालला आहे. हिंदुस्थानांत जें स्वराज्य असावयास पाहिजे तें

सोशियालिस्ट सरकार

असावयास पाहिजे. हिंदी शेतकरी आतांपासून सोशियालिस्ट तत्त्वावर संघटित होईल तर भांडवलवाल्यांचें स्वराज्य होणेंच अशक्य होईल.

सोशियालिझमची उत्पत्ति

आधुनिक सोशियालिझमची चळवळ ही प्रतिभासंपन्न कविकल्पनेतून निघाली नाहीं किंवा नैमिषारण्ये शौनकादिकांनीं सूताच्या पुढ्यांत फेकून दिलेली ताडपत्री नाही. प्लेटो आणि थॉमस मूर यांनी "रिपब्लिक" आणि "युटोपिया" यांत आपल्या कल्पना-सृष्टींतील आदर्शभूत समाज रंगविले किंवा स्मृतिकार मनु आणि पौर्वात्य पुराणकार यांनीं अद्भुतरम्य देखावे दाखविले, त्याप्रमाणें सोशियालिझमची उत्पत्ति नाहीं. सोशियालिझमची चळवळ ही भूतकालापासून होत असलेली मनुष्यजातीची उत्क्रांति, इतिहास आणि समाजाचे जीवनसंग्रामाकरतां नैसर्गिक फेरफार यावर उभारलेली आहे, मनुष्यजातीची निसर्गसिद्ध परिणति होत असतां कविकल्पना, भावना बाजूला ठेवून

"प्रत्यक्ष वस्तुस्थितीवर"

सर्व योजना उभारावी लागते, त्याप्रमाणे सोशियालिझमची चळवळ ही "वस्तुस्थिती"-वर उभारलेली आहे, तिथूनच तिची उत्पत्ति आहे. सोशियालिझम अगदी निर्विकार मनानेंच कोणत्याहि गोष्टींचा विचार करणार; पूर्वी समाजांत फेरफार कां झाले आणि पुढेंहि कां झालेच पाहिजेत हें ऐतिहासिक सत्य अगदीं उघडें-बोडकें करून फरक कां होणार हें निर्विवाद पटवून देण्याची चळवळ ती

सोशियालिस्ट चळवळ.

धर्म, जाति, पंथ, स्वर्ग वगैरे सर्व **भावना** जर अर्थशास्त्राच्या कसोटीवर उतरल्या गेल्या तर त्याकडे सोशियालिझम दुर्लक्ष करील किंवा त्यांना सांभाळून घेईल, परंतु आजपर्यंत इतिहासांत याच्या उलट अनुभव आल्यामुळें या सर्वांना धर्मसंस्थापकांच्या बरोबरच लोकांतून हद्दपार करायला सोशियालिझम भीत नाही. प्रत्येक धर्माभिमानी आपल्या धर्माचा गौरव करण्याकरतां सोशियालिझमची ओढाताण करीत असतो, पण बिचाऱ्यांना या वेळीं निराश व्हावें लागणार आहे. पंढरीची एकच वेळ यात्रा करतांच मागल्या-पुढल्या चौऱ्यांशी जन्मांची सोय लावण्याची ढोंगी हमी सोशियालिझम घेणार नाहीं, हिंदु असला म्हणजेच त्याला स्वर्गाला जवळच्या गल्लीतून दरवाजा उघडला जातो आणि मुसलमानांना मात्र अरबस्तानांतून जावें लागतें, असलें ढोंग सोशियालिस्टाला माहीत नाहीं. आकाशांतल्या बापानें सहा दिवस पृथ्वी उत्पन्न करून सातव्या दिवशीं विश्रांति घेतली पण सोशियालिझम त्याला आतां सातहि दिवस विश्रांति दिल्याखेरीज राहणार नाहीं. सोशियालिस्ट, मनुष्य जन्मल्यापासून मरेपर्यंत

त्याच्या मीठभाकरीचा विचार

करील, तुसत्या मीठभाकरीचा विचार स्वतः तूपपोळ्या झोडणाऱ्या परान्नपुष्टांना हलक्या प्रतीचा वाटेल किंवा स्वर्गात अमृताच्या डोहांत जीव देऊन अमर होणाऱ्या

उपाशी विठोबांना चिडवीत असेल पण मनुष्यजातीच्या प्रत्येक घटकाला तो जरा या जगांत उत्पन्न झाला आहे तर त्याच्या पोटाला

भाजी भाकर

मिळालीच पाहिजे. एक भाकर भाकर करीत मरत असतां दुसरा ढेकर देत मरतो, ही आतांपर्यंतची समाजरचना आहे. आजची समाजरचना म्हणजे कोणी जादुगरानें उत्पन्न केलेली मयसृष्टि नव्हे आणि आतां त्याला तिला यक्षणीची कांडी फिरवून सोशियालिस्ट बदल करतील असेंहि नव्हे. आज जी समाजरचना आहे हिची पुढली पायरीच निसर्गतः सोशियालिझम आहे. सोशियालिझम हें निसर्गाचें अपत्य आहे आणि त्यांत सर्वांना समाविष्ट व्हावें लागणार.

मनुष्याचा चरितार्थ

मनुष्यजात प्रथम माकडापासून निघालेली असो कीं माशापासून निघालेली असो, परंतु तिच्या संभवापासून तों आजदिनतागायत ती सारखी बदलत आहे हा उघडा इतिहास आहे. मनुष्याच्या सध्याच्या शरीरावर स्थिर होण्यापर्यंतचा इतिहास बाजूस ठेवूं. त्याचें बुद्धीचें इंद्रिय केव्हां उद्भवलें किंवा उत्क्रांत झालें हें बाजूस ठेवूं, परंतु पोटास कांहीं तरी खाल्ल्याशिवाय जगणें शक्य नाहीं, तें तोंडाचा व हाताचा उपयोग केल्याशिवाय खातां येत नाहीं ही बुद्धि जेव्हां मनुष्यास प्राप्त झाली तेव्हांपासूनच मनुष्यप्राणी हिशेबास धरूं या. या वेळीं त्याच्यामध्यें आणि जनावरामध्यें मुळींच फरक नव्हता. अवयवांचा उपयोग केल्याशिवाय जगतां येत नाहीं, ही सारखी बुद्धि सर्व प्राण्यांत अनेक काळ राहून ती इतकी अंगवळणी पडली कीं त्यांतला फरक तो साफ विसरून गेला. हात आणि तोंड या वेळेपर्यंत तो आपलीं हत्यारें (Tools) समजत होता. वाघ पंजात पकडून तोंडानें फाडफाडून आपलें भक्ष्य खातो. मनुष्यहि प्रथमावस्थेंत या पुढें असणें शक्य नाहीं. **रोज नवी शिकार करून त्रास घेण्यापेक्षां इतर कांहीं युक्त्यांनीं खाद्यांत बदल करून** हाताच्या साहाय्याला तीर-कमठा घेऊन किंवा पुढें नांगर तो आतांचे ट्रॅक्टर मोठमोठ्या गिरण्या-कारखाने येथपर्यंत त्यानें आपल्या हत्यारांची (Tools) प्रगति केली. कांहीं कांहीं पशूंतहि नैसर्गिक अवयवापेक्षां इतर साधनांचा उपयोग करून आपलें भक्ष्य मिळविण्याची बुद्धि असते, पण मनुष्यबुद्धि इतकी दूर जाऊन पोचली आहे कीं, नुसत्या पशूंनाच काय पण ती पंचमहाभूतांना सुद्धां आपल्या इच्छेप्रमाणें गुलाम करून त्यापासून आपलीं पाहिजे तीं कामें करून घेऊं शकतें. मनुष्य चरितार्थाकरता कशकशा युक्त्या शोधीत गेला हा "मनुष्यत्वा"चा इतिहास आहे. त्याचीं रूपांतरें ठळक पुढीलप्रमाणें चढत्या पायरींत दाखवितां येतील. प्रथमावस्था **पशुतुल्य** (Savagery) किंवा Barbarism. त्यांत कोणाला कांहीं फेर करावयाचा असला तर त्यानें आपला ठरवून घ्यावा. या अवस्थेपुढें तो संघ करून राहूं लागला; त्याचें

नेतृत्व एकाकडे देणें सोयीचें पडूं लागलें; पण त्यामुळें बाकीच्यांना गुलामगिरी (Slavery) मिळाली. हिचें रूपांतर जमीनदार–राजे–सम्राट (Feudalism) असें सारखें वाढत गेलें. परंतु भौतिक सुधारणांच्या अद्‌भुत आणि त्वरित फरकामुळें त्याला " भांडवलशाही " (Capitalism) हें आजचें स्वरूप आलें आहे. " राजा " म्हणजे अनेक जमीनदारांचें पण एकाच्या ताब्यांत असलेलें राज्य. परंतु समाज सारखा पुढें जात असल्यामुळें जन्मसिद्ध जमीनदार किंवा राजे सर्व बाजूस जाऊन, भांडवलशाहीवर उभारलेलीं लोकसत्ताक (?) राज्यें ही आजची परिस्थिति आहे. फ्रेंच रेव्होल्युशन, क्रॉमवेलची धामधूम हे जमीनदार राजापासून सत्ता हिसकून भांडवलवाल्यांच्या ताब्यांत सत्ता जाण्यास कारण झालें. या क्रांतीची जरूरच होती, परंतु यापुढें कॅपिटॅलिझम किंवा भांडवलशाही हिचें अपत्य म्हणजे सोशियालिझम होय आणि याबद्दल सर्व जगभर क्रांति होत आहे.

ज्या वेळीं कॅपिटॅलिझमनें सत्ता काबीज केली, तेव्हां तिला जन्मसिद्ध वतनदारांना उलथून पाडण्याकरतां जें तत्त्व अमलांत आणावें लागलें तें कॅपिटॅलिझमच्या पोटांत असल्यामुळें त्यांतून सोशियालिझम निघणें अगदीं अपरिहार्य होतें. कॅपिटॅलिझमनें कितीहि राष्ट्रीयत्वाचा अभिमान दाखवला तरी त्याचा मुख्य परमेश्वर " नफा " तो साधला म्हणजे तें आंतरराष्ट्रीय संगनमत करूं लागतें. त्याप्रमाणें सोशियालिझम हे कॅपिटॅलिझमचेंच अपत्य असल्यामुळें त्यांतून सर्व राष्ट्रीय समाजसत्तावाद (International Socialism) हें आपोआपच संभवत आहे. भांडवलदार सत्ताधारी वर्ग ही आजपर्यंतची उत्क्रांति, नफा हें त्यांचें मुख्य ध्येय व त्याला सत्ता हें निव्वळ साधन. भांडवलशाहीनें आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केल्यामुळें स्वदेशी अगर परदेशी कोणीहि " कामगार " असो त्यांच्या दृष्टीनें ' नफेबाजी 'साठीं गुलामच.

खाजगी सत्ता आणि राज्यें (State)

अर्धवट रानटी किंवा समाजाच्या प्राथमिक अवस्थेत (Primitive) शेतीसंबंधीं सर्व उपकरणें सर्वांच्या मालकीचीं असत. समाजाचा दीर्घकाल अशा प्राथमिक (Primitive Communism) कम्युनिझममध्ये गेला, गोत्र, जथा किं पाश्चात्त्य Clan या अवस्थेत मनुष्यजाति आल्यामुळें सुधारणा (Civilisation) शक्य झाली. समाजस्थिति अशी असतां " खाजगी मत्ते "च्या कल्पनेचा उदय केव्हां झाला हें नक्की सांगणें चुकीचें होईल. परंतु उपकरणें जसजशीं जास्त वाढूं लागलीं व मनुष्यजात जास्त जवळ जवळ येऊं लागली, तसतसे प्रथम सोईकरतां या कल्पनेचा उदय झाला. उदाहरणार्थ एखादें अविभक्त हिंदु कुटुंब घ्या. त्या कुटुंबांत बहुतेक सर्व वस्तु सर्वांच्या अशी मनाला संवय लागलेली असते. हेंच कुटुंब अवजड झालें म्हणजे कांहीं वस्तु मलाच पाहिजेत असें एखाद्याला वाटूं लागतें. घरचा कर्ता पुरुष मग प्रत्येकाची वस्तु वाटून देतो. ही सुरुवात प्रथम बिस्तार कपडे वगैरे लहानसहान गोष्टींपासून होते. पुढें कुटुंब जास्त

अवजड झालें कीं त्यांत भांडणें तंटे होऊं लागतात; नंतर कुटुंब विभक्त होतें. विभक्त होणें तेवढ्यापुरतें सोईचें झालें पण त्यामुळें प्रत्येक कुटुंब वेगळें होऊन आर्थिकदृष्ट्या वेगळा घटकच होतो. प्रत्येक कुटुंबापुढें मग स्वार्थ, आपली संपत्ति वाढविण्याचा मोह उत्पन्न होतो. पुढें तो त्याकरतां दुसऱ्याचा घातपात करूं लागतो. त्यांतून त्याला संभाळण्याकरतां आपल्यापेक्षां कमी म्हणजे गुलाम अशीं नोकर माणसें ठेवून जमीनदार बनतो, राजा बनतो आणि ह्या सर्वांला जो मान्यता देईल त्याला धर्म ठरवतो. "नाविष्णुः पृथ्वीपतिः" हें वाक्य ज्या धर्मगुरूंनीं अमलांत आणण्यास प्रोत्साहन दिलें त्यांनांच देऊन लोकांना मानसिक गुलामगिरींत टाकण्यासहि ही सबंध टोळी सहाय्य करते. धर्मांची आणि साम्राज्यशाहीची अशी सलगी आहे. अशा परिस्थितींत खाजगी मत्ता कोणाचीच नाहीं. सर्व राजाची आहे आणि त्याला ईश्वरानें मुद्दाम उत्पन्न केला आहे वगैरे भारूड सांभाळण्याकरतां परमेश्वरापासून तों सर्व देवादिकांपर्यंत खेंचाखेंच चाललेली असते. धर्मप्रसाराकरतांच सत्तेचा मुख्य उपयोग करणारे राजे नुसत्या धर्माचेच उपास काढीत नसत. त्याबरोबर दुर्बलाची सर्व संपत्तीहि लुबाडीत असत. जसजसा काळ बदलत चालला तसतसे उपायहि बदलणारच. राजाची सत्ता प्रजेतील प्रबळांच्या हातांत आली, जमीनदार जाऊन भांडवलवाले आले पण खाजगी सत्ता शाबूत ठेवून त्यावर लोकसत्तेचे उभारलेले डोलारे राजेशाहीपेक्षांहि भयंकर असतात यांचीं उदाहरणें रशिया-खेरीज प्रत्येक राष्ट्रांत थोड्या अधिक प्रमाणांत आज आहेत. खाजगी मालमत्ता काढून घेतल्यावर लोकांत इर्षा उत्पन्न होणार नाहीं आणि सुधारणा होणार नाहीं असा एक ठरीव आक्षेप सोशियालिझमचे शत्रू घेत असतात. इर्षेला स्फूर्ति देणारें मुख्य कारण संपत्ती कां? याचें कारण काय, याचा मात्र त्यांनीं विचार केलेला नसतो. आणि जिला हे 'ईर्षा' म्हणतात त्याचाहि ते गोंधळ करून ठेवतात; जगांतली संपत्ति स्थिर आहे आणि मर्यादित आहे. ती वाढणें म्हणजे आकाशांतून पडत नाहीं कीं दुसऱ्या गोलावरून येत नाहीं. ती एकाच्या खिशांतून दुसऱ्याच्या खिशांत जाणें याचा अर्थ संपत्ति वाढणें. जोपर्यंत भौतिक सुधारणांची वाढ झालेली नव्हती, तोंपर्यंत ही संपत्ति फक्त शस्त्रास्त्राच्या जोरावर स्थित्यंतर पावत असे. स्थित्यंतर होत असतांनासुद्धां सामान्य जनसमूहाला फाकेच मारावे लागत. ही जागा हल्ली भांडवलवाल्यांनीं घेतली आहे. परंतु सामान्य जनास जी परिस्थिति पहिली होती तीच कायम आहे, किंबहुना संपत्तीची हालचाल अत्यंत वेगानें होत असल्यामुळें शोचनीय बनत चालली आहे. मनुष्यजातीच्या गरजा ज्या प्रमाणांत वाढल्या त्याच्या अनेक पटीनें यांत्रिक शोधामुळें पुरवठा करण्याची ताकद वाढली आहे. जगांतील बेकारी हें वाढत्या यांत्रिक सुधारणेचें मूळ आहे. यावरून यांत्रिक सुधारणा याला कारण असें कोणी समजूं नये. याचें मुख्य कारण "खाजगी मत्ता" हें आहे. या बाबतींत जास्त खुलासा होण्याकरितां प्रथम कारखान्यांचेंच उदाहरण घेऊं. सर्व कारखाने कामगारांकडून चालविले जातात. कारखान्यांत जो माल उत्पन्न होतो तो सर्व कामगारांच्या कष्टामुळें उत्पन्न होतो. त्या कारखान्यांत त्यांचा काडीचाहि अधिकार नसतो.

त्याची मालकी दुसऱ्या कोणाकडे तरी असते. यंत्राचीं चाकें तेल पुरवून आणि एंजिन कोळसा पुरवून चालविलीं जातात. यंत्रांना तेल किंवा कोळसा जास्त दिला जात नाहीं. त्याचप्रमाणें मजुरालाहि त्याच्या बौद्धिक आणि शारीरिक श्रमावद्दल त्याला जगण्यापुरतें वेतन दिलेलें असतें. एखाद्या मालाचा भाव उतरला तर कारखाना बंद पडतो. मजुरांना हाकलण्यांत येतें. एखाद्या मालाचा भाव वाढला आणि जास्त वेळ यंत्रें चालवावीं लागलीं तर त्याला तेल, कोळसा जास्त पुरवावा लागतो. मजुरालाहि रात्रपाळीकरतां थोडासा रोजमुरा मिळतो. तेल, कोळसा आणि मजुरी याची किंमत मालाला जसा बाजारभाव असेल त्यावर ठरविली जाते. मजुराचें काम म्हणजे कांहींतरी त्याच्यापासून मालक खरेदी करतो आणि विकतो. विक्रीचे भाव उतरले तर खरेदीचे उतरलेच. यावरूनच मजुराचे श्रम ही एक वस्तु (Commodity) ठरते. मजुराला जी श्रम–शक्ति विकावी लागते, तिच्यापासून तो अलग होऊं शकत नाहीं. याचा अर्थ तो स्वतःला विकून घेतो.

आधुनिक यंत्रयुगांत कामगारांची मजुरी अशी वस्तु ठरली आणि कामगार हा भांडवलशाहीचें नफेबाजीचें मुख्य साधन ठरलें गेलें. यांत्रिक शोध, मोठमोठे कारखाने व त्यांत सामुदायिक पद्धतीनें शिस्तीनें मोठ्या प्रमाणावर मालाची उत्पत्ति होऊ लागल्यामुळें त्याचा कामगारांना जर कांहीं फायदा मिळाला असेल तर तो संघटित होण्याचा. कामगारवर्ग संघटित होण्याला मुख्य कारण हे कारखाने, विजेची व वाफेची शक्ति आहे. हल्ली समाजरचना भांडवलशाहीवर उभारलेली आहे. भांडवलवाल्यांच्या संपत्तीचें संरक्षण करणें हा विद्यमान राज्यपद्धतीचा पाया आहे. त्यामुळें

भांडवलवाला म्हणजे कोणीतरी शिष्ट

गणला जात आहे. ज्याला कांहीं कष्ट न करतां नुसत्या बापजाद्याच्या किंवा स्वतःच्या बऱ्यावाईट पद्धतीनें कमावलेल्या संपत्तीवर जगता येतें तो स्वतःला श्रेष्ठ समजत असतो. विद्यमान समाजस्थितीमुळें त्याला शिक्षण व अधिकार सुलभहि होतात. हल्लींच्या समाज-व्यवस्थेंत विषमतेचा प्लेग इतका जारी आहे कीं नुसते

पुढारी होण्यासहि श्रीमंतीची आवश्यकता

लागते. जो जास्त श्रीमंत तो मोठा पुढारी. त्याला कौन्सिल निवडणुकी सहज असतात. इतकेंच - नव्हे तर बहुजनसमाजाची ठरलेली-अगर लवकरच होणारी–काँग्रेस संस्था हिचे पुढाऱ्यांत श्रीमंती हे एक अवश्य सर्टिफिकेट लागतें. श्रीमंत मनुष्य इतका उन्मत्त झालेला असतो कीं त्याला त्यानें देशाकरतां कांहीं देहदंड भोगला तर ते आपण देशावर मोठे उपकार केले असें वाटतें. काँग्रेसचे एक श्रीमंत ब्राह्मण पुढारी आपल्या "ए" क्लासचें समर्थन करतांना म्हणाले, "अहो, जे लोक बाहेर लाकडेंच फोडतात, त्यांनीं तुरुंगांत जाऊन लाकडें फोडलीं तर त्यांत काय विशेष. पण आम्ही श्रीमंत. सुखात वाढलेले, आम्ही जरी "ए" क्लासांत असलों तरी तुरुंगांत जाणें हा आमचा मोठा

स्वार्थत्याग.'' याहिपेक्षां आश्चर्य म्हणजे अशा पुढाऱ्यांचा सन्मान केला जातो हें होय! कामगारांची दैना या यंत्रयुगापूर्वी तर अत्यंत हृदयद्रावक होती. भांडवलशाहीचें साम्राज्य स्थापन होण्यापूर्वीचा समाज नुसता लष्करी (Military organization) होता. जो सैनिक किंवा सैनिकांचा सरदार, सरदारांचा राजा असेल त्यालाच समाजांत मोठी मान्यता असे. शेतावर राबणारा, कामगार–शेतकरी याची किंमत गुलामापेक्षां जास्त नसे. रोम, इजिप्त व ग्रीस या प्राचीन साम्राज्यांत तर हीं कामें प्रत्यक्ष गुलामांकडूनच करून घेण्यांत येत किंवा हीं कामें करणारांना गुलाम केले जात. आमच्या प्राचीन भरतखंडाचें तर याहिपेक्षां सर्व '' और '' होतें आणि आहे. कामगार नुसता आर्थिक गुलामच करून न ठेवतां त्याचा एकंदर सवतासुभा स्थापून त्यांना अस्पृश्य ठरविण्यापर्यंत हिंदी समाज-वेत्त्यांची तयारी होती.

आजचे अस्पृश्य

हा देशाच्या आर्थिक विषमतेचा परिणाम आहे; आर्थिक विषमता टिकविण्याकरितां प्रत्येक देशातले धूर्त लोक धर्माचें साहाय्य घेत असतात आणि धर्माचें विष पाजून त्यांना '' विषमता '' भासूं नये अशी काळजी घेत असतात. परंतु

सोशियालिस्ट समाजांत

या विषमतेला थारा मिळणें शक्य नाहीं. आजारी, अशक्त, मुलें आणि वृद्ध याशिवाय सर्व घटकांना काम करावेंच लागणार. सध्यां सर्वांना थोडेंथोडें काम मिळण्याऐवजीं थोड्यांना पुष्कळ काम आणि पुष्कळांना उपासमार अशी विपरित आणि अन्यायाची परिस्थिति उत्पन्न होते. सर्व जमीन, सर्व कारखाने, सर्व रेल्वे, सर्व खाणी राष्ट्राच्या मालकीच्या करून त्यापासून होणारा फायदा सर्व राष्ट्राला मिळावा, एखाद्या व्यक्तीला किंवा टोळीला मिळता कामा नये हें सोशियालिझमचें मुख्य तत्त्व आहे. यामुळें बेकारी राहणार नाहीं आणि कामगारांना किंवा शेतकऱ्यांना दुप्पट कामहि पडणार नाहीं. सामुदायिक मालकी असल्यावर दारिद्र्य, बेकारी व त्यांचेच अपत्य गुन्हे हे नाहींसे होतील.

कामगार वस्तु ठरली म्हणजे बाजारभावाप्रमाणेंच मजुरांचे भाव कमीजास्त होणें हें भांडवलशाहीचें परिणत स्वरूप होय. ज्या कारखान्यांत कामगार काम करतो, रात्रंदिन खपतो त्या कारखान्याची मालकी मात्र एका व्यक्तीकडे असते आणि त्यांतील हजारों कामगारांचें भवितव्य त्या व्यक्तीच्या गुणदोषावर अवलंबून असतें. सोशियालिस्ट शासनपद्धतीनेंच कामगार सुखी होईल.

समाजसत्तावाद

आर्थिक समतेच्या पायावर उभारलेला असल्यामुळें आणि समाजाचा पाया '' अर्थ '' असल्यामुळें सामाजिक समताहि त्यांतून प्रस्थापित होतेच. ज्या वस्तु समाजाकडून सामुदायिकपणें (Socially) वापरल्या जातात किंवा समाजाच्या उपयोगी असतात

त्या समाजाच्या मालकीच्या झाल्या पाहिजेत हें सोशियालिझमचें मुख्य तत्त्व आहे; परंतु ज्या वस्तु निव्वळ वैयक्तिकच (Private) असतात त्यावर सोशियालिझम मालकी सांगत नाहीं. माझें घड्याळ, फाउंटन् पेन, पगडी किंवा भारी किंमतीचा कोट **जो मलाच** वापरायचा आहे व **जो माझ्याकरतांच मी** कमविला आहे, त्यावर सोशियालिझम हक्क सांगत नाहीं, परंतु जमिनीची लागवड, मोठमोठ्या खाणींतील कामें, रेल्वे, कारखाने वगैरे **मी** एकटाच चालवूं शकत नाहीं. या सर्वांकरतां शेकडों–हजारों लोकांचे श्रम कारण होत असतात. ज्याकरितां शेंकडों–हजारों–लाखों श्रमजीवियांचे कष्ट कारण होत आहेत किंवा त्या सर्वांशिवाय जें चालणें शक्य नाहीं अशावर कोणाहि व्यक्तीचा हक्क सोशियालिस्ट मानीत नाहीं. सध्यांच्या समाजरचनेत ज्या व्यक्तीच्या ताब्यांत कारखाने असतील त्याच्या संमतीशिवाय कामगाराला तो जरी उपाशी मरत असला तरी काम करतां येत नाहीं, अगदीं निष्णात कलावंतालासुद्धां मालकाच्या हुकमाशिवाय काम करतां येत नाहीं आणि

एखादा रेम्याडोक्या असला

पण तो थोड्या पगारावर कामचलाऊ ठरला तर त्याला मालक केवळ खुषीनें ठेवूं शकतो; ज्यांतून समाजाच्या उपयोगाकरतां सामुदायिक पद्धतीनें वस्तु तयार व्हावयाच्या त्या कारखान्यांत तो केवळ व्यक्तीचा किंवा कांहीं मर्यादित व्यक्तींच्या ताब्यातला असल्या उत्तम कारागिराला ठेवणें त्यांच्या मर्जीवर असते. याचकरतां सर्व कारखाने, जमिनी, रेल्वे, खाणी देशाच्या मालकीच्या असाव्यात असें सोशियालिझम म्हणतें.

सोशियालिस्ट समाज-व्यवस्थेमध्यें प्रत्येक स्त्री-पुरुषाला काम करावें लागणार. ज्यांना नुकतेच सोशियालिझम समजूं लागलें आहे अशीं माणसें, पुरुषांना काम करावें लागणार ह्याबद्दल फारशीं आश्चर्यचकित होणार नाहींत; परंतु स्त्रियांनाहि कामगार बनावें लागेल याबद्दल कित्येकांना आश्चर्य वाटेल. सोशियालिस्ट समाजांत स्त्रियांचा दर्जा काय राहणार, त्या श्रमजीवी होणार कीं परोपजीवी असणार याविषयीं अनेकांचे अनेक तर्क चाललेले असतात. पुष्कळ लोक असे समजतात कीं अत्यंत सुधारलेला समाज व अत्यंत सुखी आणि संपन्न समाज म्हणजे ज्यांत स्त्रिया नुसत्या गृहदेवता बनून त्यांना सर्व श्रमापासून अलिप्त करणें; किंवा कांहीं लोकांची स्त्रियांच्या कामाची व्याख्या त्यांनीं फक्त घरगुती काम करावें आणि केवळ स्त्रियांनाच बालसंगोपनासारखे व्यवसाय जे निसर्गानेंच लावले आहेत ते त्यांनीं उत्तम तऱ्हेनें करणें आणि हीं सर्व कामें त्यांनीं आपल्या कुटुंबापुरतींच करावींत असेंही कांहीं म्हणतात. स्त्री ही नुसती गृहदेवता, तिनें कांहीं करूं नये, संसाराच्या नुसत्या उतरंडी रचाव्या, मुलाबाळांचें लेंढार सांभाळावें आणि चुलीच्या कोपऱ्यांत बसूनच राजकारण करावें, हे विचार मनुष्यजातीच्या उत्क्रान्तीला विरुद्ध असून समाजाला अगदीं खालच्या दर्जास पोहोंचविणारे आहेत. सोशियालिझमनें स्त्रियांना नुसते ऐतखाऊ बनवले, त्यांना जरुरीच्या कामापासून मुक्त करून तीं कामें

पुरुषांना लावलीं तर त्यामुळें समाजाची अधोगति होईल आणि सबंध स्त्रीजाती स्वातंत्र्य, सौंदर्य आणि आनंद या नंदनवनांतून बलात्कारानें काढून एखाद्या मोंगल बादशहाच्या जनानखान्यांत कोंडल्यासारखें होईल. जागतिक व्यवहारांतून स्त्रियांना अलिप्त ठेवल्यास निसर्ग-सहज उत्क्रान्ति तर थांबेलच शिवाय त्याचा परिणाम मनुष्यजातीचें अस्तित्वच नाहिसें होण्यांत होईल.

स्त्रीस्वातंत्र्य

यंत्रयुगापूर्वी स्त्रियांचें सारें कौशल्य, सद्गुण आणि उत्साह फक्त त्यांच्या कौटुंबिक व्यवहाराकरतांच उपयोगी पडत असत. सार्वजनिक आयुष्यापासून त्यांना दूर ठेवल्यामुळें त्यांच्यापासून होणाऱ्या फायद्याला समाज मुकत असे आणि आर्थिक गुलामगिरींत ठेवून त्यांचें खरें स्वातंत्र्य हिरावलें जात असे. गुलामगिरीचा हा एक दिसण्यांत मोहक परंतु अत्यंत जाचक नमुनाच होय. भविष्यकालिन स्त्रीचे व्यवहार नुसते घराकरतांच घुटमळून पडणें शक्य नाहीं. त्यांच्या कर्तृत्वशक्तीला जसा वाव मिळण्याची संधि प्राप्त होईल आणि सामाजिक बंधनाच्या नावाखालीं ती संधि गमाविण्याची त्यांच्यावर जबरदस्ती झाली तर तीं सामाजिक बंधनेंच तुटतील. स्त्रियांच्या घरगुती कामापैकीं बरीचशीं कामें सध्यांच घराबाहेर गेलीं आहेत. दोन पिढ्यांपूर्वी प्रत्येक स्त्रीच्या पाठीमागलें दळणें व धुणें घराच्या बाहेर जात आहेत; यापैकीं नुसत्या दळणाचाच जर विचार केला तर हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशांतहि खेड्यांतल्या खोपटांतलीं जातीं नाहींशीं होत असून इंजिननें चालणाऱ्या गिरणीवर जाऊन आदळत आहे. सध्यांच्या विस्कळित समाजव्यवस्थेंतहि सुखवस्तु स्त्रियांचे श्रम शाळा-विश्वविद्यालयें वगैरेंत व्यतीत होत आहेत; आणि गरिबीनें गांजलेला स्त्रीसमुदाय–ज्याची संख्या शेंकडा नव्याण्णवपेक्षां तिळमात्र कमी नाहीं—गिरण्या, कारखाने, मळे ह्यावर मोलमजुरी करण्याकडे लोटत आहे. सध्यां सर्व स्त्रियांना पुरेल इतकें काम घरांत उरलेलें नाहीं, मोटमोटीं यंत्रें जाऊन हातानें काम करण्याचें युग पुन्हां जर आलें, रेल्वे बंद करून लोक जर पुन्हां बैलगाडीनें प्रवास करूं लागतील तर कदाचित् स्त्रियांची पिछेहाट होऊन त्यांनाहि घरगुती कामाच्या बंदीवासांत पडावें लागेल. सोशियालिस्ट समाजांत स्त्रियांकरितां राखून ठेवलेलें काम नाहीं. स्त्री आणि पुरुष हे कामगार दृष्टीनें सारखे मानले जातात. फक्त नैसर्गिक अडचणी हिशेबांत धरल्या जातील.

कसलेंही काम न करतांना आपलें आयुष्य कंठणाऱ्या स्त्रिया स्वभावतःच फार थोड्या आहेत. असला स्त्री-वर्ग हा समाजाला भारभूत असतो. या भारभूत स्त्री-समाजाचें पर्यवसान संततिनाश किंवा निःसंतान व अधःपतन यांत होतें. एवढा मूठभर स्त्री-समाज जर सोडून दिला तर बाकीचा जगांतील सबंध स्त्रीवर्ग जगाच्या सुरुवातीपासून सारखा कष्टच करत आला आहे. ज्या वेळेस पुरुष नुसते लढायाच करीत, त्या वेळेस स्त्रियांना सर्व तऱ्हेचीं कामें करावीं लागत. स्त्रिया आणि श्रम यांचा संयोग जगाच्या सुरुवातीपासून आहे. सोशियालिझम फक्त या श्रमाची दिशा बदलील.

मनुष्यजातीच्या संवर्धनाकरतां स्त्री-कामगारांमुळें ज्या अडचणी उत्पन्न होतील त्याचें निवारण सोशियालिझमच्या तत्त्वावर चाललेल्या कारखान्यांतून उत्तम तऱ्हेनें होईल. मातृपदास पोहोंचलेल्या अगर गरोदर स्त्री-कामगाराला तासानुतास उभे राहून अजस्र मशिनरी चालविणें आणि पर्यायानें मनुष्यजातीच्या हत्त्येस कारण होणें हें पातक आजच्या भांडवलवाल्याकडून निव्वळ नफ्याकरतां होत आहे.

कामगारांचें शिक्षण

सोशियालिस्ट समाजांत प्रत्येक स्त्री अगर पुरुष कामगाराला आपल्या कामाचें योग्य शिक्षण दिलें जाईल. सध्यांच्या परिस्थितींत कामगाराला निरनिराळीं कामें धरसोडीनें करणें भाग पडत असल्यामुळें तो एकांतही वाकबगार होत नाहीं. अशी स्थिति विशेषतः स्त्री-कामगारांची होते. सोशियालिझममध्यें कामगाराच्या लायकीकडे सर्वांत जास्त लक्ष पुरवलें जाईल. कामगारांना नुसतें त्यांच्या कामाचेंच शिक्षण नव्हे तर कला, वाङ्मय, आरोग्य कसें राखावें व एकंदर मानवी जीवन ह्याचेंही शिक्षण मिळेल. समाजाचा प्रत्येक घटक सुशिक्षित असला पाहिजे हे तत्त्व सोशियालिझमला नवीन नाहीं. सध्यांसुद्धां कामगारांच्या मुलांनी व श्रीमंतांच्या मुलांनीं प्राथमिक व उच्च शिक्षण घ्यावें ह्यांत संशय नाहीं, पण प्रत्यक्ष वस्तुस्थितिच मुळीं अशी आहे कीं कामगारांच्या मुलांना श्रीगणेशा-पलिकडे फारसें जाता येत नाहीं. कारण कामगारांच्या मुलांना, विशेषतः मुलींना अगदीं अल्पवयांतच कामावर जावें लागतें. श्रीमंतांचीं मुलें केवळ त्यांना सांपत्तिक सुस्थिति असल्यामुळें मग तीं निव्वळ मूढ असलीं तरी महाविद्यालयापर्यंत त्यांना जाता येतें. जीवनसंग्रामाची किंवा 'उद्यां'ची पंचाईत नसल्यामुळें श्रीमंतांच्या मुलांना महत्त्वाकांक्षा असणें शक्य नाहीं. सध्यां शिक्षणाचीं साधनें आहेत पण संधिच नाहीं. गरिबांच्या अर्ध-पोटीं, उघड्यावाघड्या मुलांनीं जास्त शिक्षणाची आशा करणें व्यर्थ होय. सोशियालिझममध्यें मुलांना व मुलींना शिक्षण घेण्याच्या सारख्या संधि देण्यांत येतील.

भावी समाजांत शिक्षण संपादण्याची मुलामुलींची कालमर्यादा वाढविण्यांत येईल. कारण त्याला मुलांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक शिक्षणाची जबाबदारी कळेल. शरीराची व मनाची पूर्ण वाढ झाल्याखेरीज तरुण मुलांमुलींच्या हातून जगाचें कोणतेंहि काम पार पडणार नाहीं.

धाकट्या वयांत आलेल्या स्त्री-पुरुषांच्या श्रमावर समाजाची उभारणी झाली म्हणजे मुलांच्या तसेंच अशक्त अपंगांच्या कष्टांची जरूर नाहीं. भावी समाजांत प्रत्येक म्हातारा स्त्री-पुरुष काम केल्याशिवाय स्वतःची उपजीविका करण्यास समर्थ होईल. एक रशियन शास्त्रज्ञ एलो मेचन्कॉफ म्हणतो, "म्हाताऱ्याकरतां विशेष अनुभव लागणाऱ्या अशा महत्त्वाच्या जागा राखून ठेवाव्यात." शासनपद्धति व कोणतेहि राष्ट्रीय कार्य स्त्रीपुरुषांच्या सहकार्यानेंच होणार. सोशियालिझममध्यें स्त्री-पुरुष भेदाला मुळींच महत्त्व देण्यांत येणार नाहीं. स्त्रियांना राजकीय समता देणें हें भावी शासनपद्धतींत फार महत्त्वाचें आहे.

भावी स्त्रीला मतदानाचा हक्क मिळेल, तसेंच वाटेल त्या जागा मिळतील व पुरुषांप्रमाणेंच नागरिकत्वाचे सर्व हक्कही उपभोगितां येतील.

जागतिक शांतता हेंच सोशियालिझमचें मूलतत्त्व

प्राचीन कालापासून नफ्याचा मोह, दुसऱ्याला लुबाडण्याची बुद्धि हीच बहुतेक सर्व लढाया व युद्धांचीं कारणें होत.

गेलें महायुद्धही राज्यकर्त्यांच्या व भांडवलवाल्यांच्या राक्षसी लोभाचा परिणाम आहे. युरोपमधील कामगारांना लढाई करण्यास कांहींच कारण नव्हतें; परंतु देशाभिमानाच्या नांवाखाली कत्तल करणें त्यांना भाग पडलें आणि ह्याचा फायदा मात्र अनेक रूपांनीं सत्ताधारीवर्गालाच मिळाला. तशीच स्थिति तेथील स्त्रियांची होती. त्या जरी युद्धाला सहानुभूति दाखवीत व दुःख सोशीत व स्वार्थत्याग करीत तरी ते स्वखुषीनें नव्हे तर तसें करणें त्यांना भाग होतें. देशाभिमानाच्या गोंडस नांवाखालीं हें सर्व करणें जरूर होतें.

जेव्हां सर्वच कामगार होतील व आपआपल्या श्रमांचीं फळें उपभोगतील तेव्हां दुसऱ्याला लुबाडण्याची बुद्धिच मुळीं नाहींशी होईल. कष्ट करणारे कामगार एकमेकांविरुद्ध शस्त्र उपसण्याचें नाकारतील. व्यक्तिगत मालमत्ताच नाहींशी झाल्यावर लष्कर नामशेष होईल व सर्वत्र अशा तऱ्हेनें शांततेचें साम्राज्य पसरल्यावर स्त्रियांच्या कर्तृत्वाला पूर्ण वाव मिळेल. सध्यांच होत असलेल्या बदलावरून स्त्रियांचा भावी दर्जा काय राहील हें दिसत आहे. ह्यापुढें बहुतेक सर्व घरचीं कामें स्त्रिया सामुदायिकपणें करतील आणि अशा तऱ्हेनें सामुदायिक कार्यें झालीं म्हणजे सहजच वेळाची बचत होईल. त्यांना शिक्षण वगैरे घेण्यास जास्त सवड सांपडेल. सध्यां स्त्रियांची राजकीय समता मिळविण्याकरितां चाललेली खटपट पाहतां तर पुढें त्यांना ती मिळेल ह्यांत शंकाच नाहीं. अशा तऱ्हेनें स्त्रियांचा कामगार व नागरिक या दृष्टीनें दर्जा जरी स्पष्ट असला तरी ती आदर्श पत्नी, माता व गृहिणी होईल कीं नाहीं हा एक प्रश्न आहे.

समाजसत्तावाद गृह व कुटुंबनाशक होईल काय ?

होईल ही गोष्ट खरी आहे. परंतु गृह व कुटुंब सध्या ज्या स्थितींत आहेत त्यांचा मात्र समाजसत्तावाद नाश करील. पण म्हणून सोशियालिझमची भीति वाटायला नको. कारण कुटुंब व संसार ह्यास अवश्य असणाऱ्या गोष्टींचाहि तो नाश करील ही भीति वृथा आहे. खासगी आयुष्य, व्यक्तिस्वातंत्र्य तसेंच पतिपत्नी व मुलें यांमधील गाढ प्रेमाचा सोशियालिझम नाश करूं शकणारच नाहीं. परंतु सध्यां घरांना आलेलें कृत्रिम स्वरूप मात्र नाहींसें होईल. ज्यांत स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहेत अशीं कुटुंबें अस्तित्वांत राहणार नाहींत. पण स्त्रिया जेव्हांपासून गिरणी, कारखान्यांत कामास जाऊं लागल्या तेव्हांपासूनच हलके हलके अशा कुटुंबाचा नाश होण्यास सुरुवात झाली. भांडवलशाहीमुळें स्त्रीच्या आर्थिक दर्जांत घडवून आणलेली क्रान्ति अजून अपूर्णच आहे, कारण

स्त्रीला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यास जरी संधी देण्यांत येते तरी लग्नानंतर ह्यांत बदल होण्याचा संभव असतो. समाजसत्तावादामुळें हा बदल पूर्णावस्थेस पोहोंचून स्त्री ही आर्थिकदृष्ट्या पूर्ण स्वतंत्र होईल.

गृह

दमल्या भागल्या जीवाला घर हें सुखासमाधानानें विश्रांती घेण्याचें स्थान होय. तेव्हां तें निरनिराळ्या वस्तु तयार करण्याचा कारखाना बनावा असें कोणासही वाटणार नाहीं. पिंजणें, विणणें, शिवणें, दूधदुभतें करणें, शिजवणें इत्यादि सर्वच कामें प्रत्येक घरीं करूं म्हटलें तर अशीं घरें नकोशीं होतील. सध्यां स्वयंपाक करणें, कपडे धुणें वगैरे कामें घरींच केलीं जातात. चुलीशिवाय घर व गृहकुलाशिवाय गृहिणी ही कल्पनाच कित्येकांना सहन होत नाहीं. तरी इतःपर चूल व धुणेंपाणी ह्याशिवायही गृह रमणीय होऊं शकेल ह्यांत शंका नाहीं. नवेनवे शोध लागत आहेत व ह्या सर्व घरच्या गरजा पुरविणारीं यंत्रें निर्माण होतील. सध्यां कांहीं लोकांना ह्या यांत्रिक शोधांचा घरच्या खाजगी सुखसोयीकडे उपयोग करावासा वाटत नाहीं. परंतु सामुदायिक फायद्याकरितां जेव्हां समाजाची प्रस्थापना होईल तेव्हां ह्या सर्व गोष्टींचा पूर्ण उपयोग केला जाईल.

चवदा घरी चवदा चुली मांडण्यापेक्षां जर सामुदायिकरित्या स्वयंपाक केला तर स्त्रियांना इतर कामें करण्यास अवसर सांपडून स्वयंपाक आरोग्यदृष्ट्या चांगला होईल. पुढील स्वयंपाकी नुसते आचारीच नसून त्यांच्या धंद्यामध्यें तज्ज्ञ असतील. प्रत्येक धंद्याचें उत्तम शिक्षण मिळाल्यामुळें कोणताही धंदा सन्माननीय होईल. पाकशास्त्राचे पद्धतशीर शिक्षणानें होणारा मोठा फायदा लोकांचें आरोग्य सुधारील. अशा तऱ्हेनें सर्व घरच्यीं कामें सामुदायिकपणें होऊन भावी गृहें हीं खरोखरच नंदनवनें होतील. हीं सर्व कामें स्त्रिया सामुदायिकपणें वेतन घेऊन करीत असल्यामुळें साहजिकच त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतील.

विवाहसंस्था

समाजस्वास्थ्याकरितां प्रतिपत्नीमध्यें प्रेम असणें जरूर आहे. पोषण करण्यास नवरा व घर संभाळण्यास बायको एवढ्याकरतांच झालेलीं लग्नें सुखी होत नाहींत. तर उलट जे स्त्री-पुरुष सांपत्तिकदृष्ट्या परस्परावलंबित नसतात अशांचें जीवन उत्तम व सुखी असतें व सध्यांसुद्धां आहेत. पण सध्यां स्त्रीच्या महत्त्वास घातक अशीं कामें त्यांना आर्थिक स्वातंत्र्याकरतां करावीं लागतात. म्हणून आजची विवाहित कामगार स्त्रीची स्थिति कांहीं मोठी चांगली नाहीं. आणि ज्यांच्यामागें मुलाबाळांचें लेंढार जास्त अशा स्त्रियांना तर काम करण्याची जरूरही जास्त असते. अशा तऱ्हेनें भांडवलशाहीखालीं सध्यांची स्त्री वेतनाची गुलाम बनते. तिच्या स्त्रीपणाला व बालकांना ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या सध्यां तिला पारख्या आहेत.

वेतनाकरितां गुलामगिरी आणि संसाराकरतां लग्न हा प्रश्न भावी स्त्रियांपुढें उरणारच नाहीं. लग्न हें इतर कांहीं उद्देशाकरितां नसून आपल्या पसंतीच्या पुरुषाच्या व स्वतःच्या शारीरिक व मानसिक संपूर्ण एकीकरणाकरतांच होईल. भावी सुदृढ तरुण मुली आपलें शिक्षण संपवून आयुष्यांतील पसंत केलेले धंदे करतील, मग स्वयंपाकाचा असो कीं मास्तरणीचा असो. परंतु प्रत्येकाला त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळून त्यांचें जीवन सुखकर होईल. खालावलेल्या सांपत्तिक परिस्थितीनें दुर्मुखलेले चेहरे दिसणार नाहींत. तारुण्याला नैसर्गिक उल्हास व शक्ति प्राप्त होईल. म्हणून भावी स्त्रिया मातृपदाला व गृहिणीपदाला लायक होतील ह्यांत शंकाच नाहीं. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यानें लग्नसंस्थेत बाध येईल ही भीति निराधार आहे.

लग्नें कोणत्या तऱ्हेनें होतील हा प्रश्न विशेष महत्त्वाचा नाहींच. कारण सध्याची परिस्थितीच सांगते कीं विशेष समारंभ, गाजावाजा न करतां शक्य तितके साध्या रितीनें थोडक्या खर्चांत व वेळांत लग्नें उरकलीं जातील. किंबहुना लग्न ही धार्मिक बाब राहणार नसून तो फक्त एक करार (Contract) होईल. लग्नाची किंमत बाह्य भपक्यानें होत नसून अंतःकरणाच्या उत्कट भावनेनेंच होते. सामाजिक क्रांतीबरोबर लग्नाच्या तऱ्हा बदलतील. पण स्त्री-पुरुषांतील परस्पराकर्षण नेहमीं कायम राहील. सोशियालिझममध्यें प्रेमस्वातंत्र्य राहील असें म्हटलें जातें. येथें प्रेमस्वातंत्र्य म्हणजे काय ह्याचा स्पष्ट खुलासा झाला पाहिजे. जर प्रेमस्वातंत्र्य म्हणजे जगाच्या प्रथमावस्थेंतील पाशवी वृत्तीप्रमाणें होईल, तर सोशियालिझम त्यांचा केव्हांही पुरस्कार करणार नाहीं. कारण त्याला समाजाची अधोगति नको आहे. पण प्रेमस्वातंत्र्य म्हणजे कृत्रिम व अनावश्यक बंधनाचा उच्छेद, इच्छास्वातंत्र्य असा असेल तर असले सर्व आरोप सहन करून सोशियालिझम प्रेमस्वातंत्र्याला मान्यता देईल. वास्तविक प्रेम हें नेहमींच स्वतंत्र असतें आणि पुष्कळ मोठमोठ्या लोकांनीं केवळ गाढ प्रेमाकरितां कडक नियमांचें उल्लंघन केलें आहे. फार तर काय पण शिक्षाही भोगल्या. कोणताही मानवी कायदा प्रेमाला दडपून ठेवूं शकणार नाहीं. सोशियालिझम हा प्रेमाला उच्च स्थानीं बसवील. तो मानवी सुखाकरतां आहे व मानवी सौख्य हें बऱ्याच अंशीं विवाहसौख्यावर अवलंबून आहे. प्रेमावर फक्त एकच बंधन घालण्यांत येईल तें हें कीं ज्यांची वृत्ति गुन्हे करण्याकडे आहे किंवा जे आनुवंशिक रोगग्रस्त आहेत त्यांनीं संततयोत्पादन करूं नये.

◇◇◇

शेतकऱ्यांचें हिंदुस्थान

शेतकऱ्यांचें हिंदुस्थान



"शेतकऱ्यांचा नाहीं कोणी वाली"

दीन दुबळ्या शेतकऱ्यांना कोणीच वाली राहिला नाहीं अशी सुमारें तीस-बत्तीस वर्षांपूर्वी घोषणा करणाऱ्या **शाहीर भीमराव महामुनीचें** कवन आजच्या परिस्थितींतही पूर्णपणें लागूं पडत आहे. वरील अवतरणांतलें वाक्य उच्चारतांना या वाक्यांत कसलें भयंकर सत्य भविष्य कथिलें जात आहे याची भीमराव शाहीराला कल्पना नसेलच किंवा असेलच हें जरी आज नक्की सांगता येत नाहीं, तरी आज एवढें सांगता येईल कीं भीमरावाच्या शाहिरी डफावर थाप देऊन उसळून निघालेलें काव्य–काव्य कसलें! हो शेतकऱ्यांना–काव्यें करायची तरी काय, आपली साधी भोळी मराठी लावणी आज अगदीं तंतोतंत खरी ठरत आहे. असली भयाण पण सत्य, अंगावर रोमांच उभे

शाहीराची भविष्यवाणी

करणारी पण नितांत वस्तुस्थितिदर्शक कवनें जेव्हां बाहेर पडत असतात, तेव्हां तीं कवनेंच नसतात, शाहीराच्या हृदयाला करकचून पीळ पडताना जो आवाज उन्मळून मुखावाटे बाहेर उसळतो तो सिद्धान्त वाणीच्या योग्यतेचा ठरतो. **भीमराव** शाहीराची रसवंती रंगेल राघूंच्या रंगबाजीकरतां रंगत नव्हती; पण दीनदुबळ्या शेतकऱ्यांच्या करुण हृदयाचा कोंडमारा तळमळून कळवळून, देवाच्या दुर्गम कानावर घालवीत होती. व्यासपीठाच्या बोल-घाटावरून शेतकऱ्यांच्या नशिबाच्या वाटा मोजणाऱ्या पाट-पंडितांना शेतकऱ्यांच्या स्थितीची कल्पना होणार नाहीं! कागदी घोड्याच्या फेरदौडीत स्वराज्याच्या गडकिल्ल्याकडे निघालेल्या पांढरपेशा सफेद शिलेदारांना शेतकऱ्यांच्या झोंपडीत कोंबडीच्या खुराड्याखालीं हिंदुस्थानचें नशीब कुजत पडलें आहे हें सांगून-सुद्धां खरें वाटावयाचें नाहीं! हजारों मैलांची धांवपळ करून शेतकऱ्यांच्या संरक्षणाकरतां आलेल्या मायबाप सरकाराला शेतकऱ्यांची केविल मुद्रा दिसण्याइतका सरकारचा राजेशाही चष्मा पारदर्शक असेलच, असेंहि म्हणतां यायचें नाहीं. हिंदुस्थान आणि शेतकरी हे शब्द दोन असतील पण एकाच अर्थाचे दोन शब्द आहेत. हिंदुस्थानांतला एवढा

"शेतकरी" वजा करा म्हणजे हिंदुस्थानच उरत नाहीं, असलें हें सरळ गणित आहे.

इंग्रज येण्याच्या अगोदर

याच शेतकऱ्यांची पूर्वीची स्थिति काय होती आणि आज काय आहे याचा विचार केल्याशिवाय हिंदुस्थानच्या भवितव्याचा विचार करणें मूर्खपणाचें आहे. इंग्रज माऊलीची कृपा साऊली या देशावर पडण्यापूर्वीच्या काळांतला शेतकरी आपण पाहाल तर अजूनहि तें चित्र स्मरतांना थक्क होऊन जाल. एका हातीं तरवार आणि दुसऱ्या हातीं नांगर होता. मनगटासारख्या दोराला पीळ भरीत सुगीच्या महिन्यांत नांगरावर हात टाकून जमीन वाहणारा शेतकरी, विजयादशमीला मनगटासारख्या मिशांना पीळ भरीत समशेरीची बिजली लखलखीत चौफेर मुलुखगिरीला तीरासारखा जात असे. एका हातानें जगाच्या पोटापाण्याची सोय लावून दुसऱ्या हातानें जगाचें संरक्षण करण्यास सदान्कदा तयार! त्या वेळचा शेतकरी जगत्प्रतिपालक असून जगाचा पोषकहि होता.

श्रीशिवछत्रपतींनीं उभारलेल्या साम्राज्याचा प्रत्येक कण शेतकऱ्यांच्या प्राणांचे पर्वत ओसंडून तयार झालेला होता. रानावनांत, डोंगरा-खंगरांत, उन्हा-तान्हांत फिरणाऱ्या या शेतकरी माऊलीच्या धन्य कुसवेतूनच बाजी, येसाजी, तान्हा, शिवाजी अशी मायभूमीच्या मंगल सूत्रांतील मण्यांची पैदास झालेली आहे. ओसाड गांवठाणाच्या माळावरल्या खुरप्याला स्वराज्य श्रीच्या माळावरल्या पिंपळपानाचा वाण आला होता.

तरवार व नांगर

हजारों मैलावरून धांवून आलेल्या कनवाळू सरकारला वाटलें, शेतकऱ्यांना तरवार आणि नांगर हीं दोन्ही कामें देऊन विनाकारण सतवूं नये! हीं दोन्ही कामें शेतकऱ्यांनीं करावयाचीं म्हणजे काय? न्यायी इंग्रजप्रभूच्या राज्यांत हें खपणार तरी कसें! न्यायनीतीनें राज्य चालविणाऱ्या सरकारनें शेतकऱ्यांची समशेर आल्याबरोबर हिसकून घेतली. झाले, पहिल्या प्रथम तरवार गेली! जिच्यावर जान कुरबान तीच समशेर सरकारनें पहिल्या प्रथम घेतली. शेतकरीवर्गाचें त्या वेळचें चरितार्थाचेंच नव्हे तर भाग्यश्रीचें मुख्य साधन सरकारनें काढून घेतले. बरोबरच आहे, मुलाची सतत काळजी वाहणारी आई आपल्या अर्भकाला सुरा, चाकू, विळी असल्या वस्तूंशी खेळूं देत नाहीं. मग सरकार तरी आपल्या पुत्रवत् प्रजेला असल्या हत्यारापात्यारांशी कसें खेळूं देईल?

नशीबच नापास झालें

तरवार गेली, मुलुखगिरी गेली, नशिबाची परीक्षा मेली; नशिब नापास झाल्यावर पुढें कोणत्याच परीक्षेला बसण्याचें कारण उरत नाहीं. मायबाप सरकारनें शेतकऱ्यांवर कामाचा फार बोजा पडूं नये म्हणून नुसता नांगर ठेवला. भोळा बिचारा शेतकरी तेवढ्यावरच खूष राहिला. खांद्यावर आसूड टाकून इंग्रज प्रभूचे राज्यांतील न्यायनीतीचे पोवाडे गात तसाच शेताच्या बांधावर उभा राहिला.

बुद्धि गेली–माणुसकी मेली

जेव्हां समशेरी गंजूं लागतात तेव्हां त्या ज्याच्या घरांत गंजत असतील त्याच्या शौर्य-धैर्यालाहि गंज चढवीत असतात. अवघ्या एक शतकापूर्वी आसेतुहिमाचल डरकाळ्या फोडणारा शूर शेतकरी, एखाद्या फाळणी पार्टीतल्या कारकुनापुढें सुद्धां धरून आणलेल्या गुलामासारखा दीनवाणा उभा राहूं लागला प्रथम धैर्य गेलें, मग बुद्धि गेली, बुद्धीच्या पाठोपाठ माणुसकी गेली. एवढें जरी झालें तरी शेतकरी समाज सरकारवर कधींहि चिडला नाहीं आणि एवढ्याच कारणावर कधींच चिडणार नाहीं. राजनिष्ठा या दुर्गुणाची परमावधी म्हणून जर कोठें पाहावयाची असेल तर ती शोधण्याकरतां आपल्याला शेतकऱ्यांच्याच खोपटांत गेलें पाहिजे. पंचम जॉर्ज गादीवर बसले त्या वेळीं कसला काळा का गोरा राजा डोळ्यांनीं पाहिलासुद्धां नाहीं, पण असें एक खेडें नसेल कीं, जेथें राज-निष्ठेच्या पंत्या लुकलुकल्या नाहीं. एवढे मोठे महात्मा गांधी, केवढा तो त्यांचा असहकार; पण त्या वेळींसुद्धां सर्व बाजूला ठेवून युवराजाकरतां सबंध महाराष्ट्रातला शेतकरी उठाउठी पुण्याकडे धांवूं लागला. हेंहि जाऊं द्या! राजनिष्ठेची पोषाखी दिखावणी आपण सोडून देऊं. पोषाखी समारंभाला रिक्रूट भरती करतांना आमंत्रणाचीसुद्धां जरूर लागत नाहीं. पण ज्या वेळीं ब्रिटिश साम्राज्यावर परचक्र आलें, ब्रिटिश साम्राज्याचें सिंहासनावर शत्रूंचीं गिधाडें जेव्हां झडपा टाकण्याकरतां फडफडूं लागलीं, तेव्हां सरकारच्या राजनिष्ठेनें म्हणा, किंवा स्मृतीच्या थडग्यांत कण्हत पडलेल्या वीरवृत्तीनें उसळी मारल्यामुळें म्हणा पण पाश्चात्त्य रणभूमीवरहि जाऊन आपल्या सुवासिनींचे कुंकवाचे करंडे वेपर्वाईनें लाथाडून रक्ताचे सडे शिंपडणारे, शेतकरीच होते ना?

अरेरे! शेतकरी साम्राज्याकरतां मरावेत!

ज्या रणभूमीवर हिंदी रक्त सांडलें तेथें जाऊन त्या भूमीला कान लावून पाहा, तेथला प्रत्येक मातीचा कण "एकच शेतकरी इंग्रजी साम्राज्याकरतां मेले" अशी ग्वाही देईल. अरेरे केवढी ही राजनिष्ठा! ज्या सरकारकरतां शेतकऱ्यांनी आपल्या मुलाबाळांच्या कोंवळ्या डोळ्यांतले लाडके आंसू बेफाम राजनिष्ठेच्या कैफात नुसते पुसलेसुद्धां नाहीं, साम्राज्याच्या विजयश्रीच्या माळेकरतां, घरांत लाजून उभे राहिलेल्या भोळ्या जिवाचें जिवाभावाचें मंगळसूत्र तडातडा तोडून टाकलें, त्याच शेतकऱ्यांच्या नशिबाचें खेळणें आज सरकार मांडीवर घेऊन खेळवीत आहे.

या साऱ्या गोष्टी शेतकऱ्यांनीं कोणत्या स्थितींत केल्या; डोक्याला हातभर चिंधी, काळजीनें काळवंडलेला चेहरा, अंगांत एकच असणारी पण तीहि हजार ठिकाणीं ठिगळ जोडलेली बंडी, नेसण्यास हातभर धांदूट, पायांत असलाच तर फाटका आणि मधून काथ्यानें बांधलेला जोडा, घरांतल्या मडक्यावर अटराविसवे दारिद्र्याचा खडा पहारा, शेतकऱ्याच्या घरांत जाऊन पाहाल तर करुणेनें काळीज चर्रर्र झाल्याशिवाय राहणार नाहीं. ज्यांच्या कुसवांतून एक वेळ त्रिकालबंद्य विभूति आणि योद्धे जन्मले त्याच शेतकऱ्याच्या बायकोला

धडाधडुतसुद्धां नेसायला नाहीं. ज्यांच्या जिवावर देश जगतो आहे, त्यांची कच्चीबच्ची अन्नाच्या तुटवड्यानें तडफडत आहेत अशा आपन्न लाजिरवाण्या स्थितीतहि, तोच शेतकरी पाऊस म्हणत नाही, ऊन म्हणत नाही, भूक म्हणत नाही, रात्रंदिवस काबाडकष्ट करतो आहे, तरी ओलीकोरडी **मीठभाकर** त्याला दिवसांतून दोनवेळा सुद्धां भेटत नाही. कर्जाने गांजलेला, अज्ञानानें नाडलेला, करानें वांकलेला, काळजीनें सुकलेला, कष्टानें थकलेला, जवळजवळ आधीच पार कामांतून गेलेला शेतकरी आणि अशा हैराण स्थितींत म्हणे दयाळू सरकार, सर्वस्व गेलें आतां राहता राहिला **नांगर** तोहि दयाळू सरकार काढून घेत आहे. आई भीक मागूं देईना आणि बाप पोट भरू देईना अशी एक आपली गावंढळ म्हण आहे. बाहेर जायला जागा नाहीं. हिंदुस्थान सोडून कोठें देशोधडीला उदरभरणाकरतां जावें तर हिंदुस्थानच्या बाहेर हिंदी माणसाला पत्करायला जग तयार नाहीं आणि हिंदुस्थानांत राहावे तर कृपावत्सल सरकार निरनिराळ्या करांनी बेजार करीत आहे. पांढरपेशा वर्ग व शेतकरी इतका भिन्न आहे, कीं त्याला परस्पर विरुद्ध म्हटलें तर फारसें चुकणार नाहीं. इंग्रज सरकारचे शेतकऱ्यांवर जे कांहीं थोडेबहुत उपकार झाले ते हेच आहेत कीं सरकारनें शेतकऱ्यांना शिक्षणाची मोकळीक देऊन पांढरपेशांच्या पकडीतून मुक्त होण्यास शेतकऱ्यांना थोडेंबहुत समर्थ केलें. शेतकऱ्याच्या गळ्याभोंवतीं पडलेला **सावकारी पाश** किंवा धर्मगुरूंचा **धार्मिक गळफांस** कसा सोडवावा हें कळण्यास इंग्रजी राज्यामुळें वाव मिळाला हें कोणताहि शेतकरी कबूल करील. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, या एवढ्याच इंग्रजी फायद्याकरतां शेतकऱ्यांनीं आपलें सर्वस्व इंग्रजी टेबलावर ठेवावें. कोणताहि वर्ग घ्या. शेटजी घ्या, भटजी घ्या किंवा सरकार घ्या, सर्व शेतकऱ्यांवरच टपलेले, अशा प्रसंगीं शेतकऱ्यांचा वाली तरी कोण ?

सावकारी पाश

शंभर हिंदी माणसांपैकीं ७३ शेतकरी आहेत आणि त्यांतले ४६ लोक कसें तरी अर्धपोटी जीवन कंठित आहेत. नाहीं म्हणायला उरलेले २८ शेतकरी तोंड मिळवून आहेत. आसेतुहिमाचल पसरलेल्या हिंदुस्थानांत पुरती कोंडाभाकर न मिळाल्यामुळें अशक्त झालेला दीनदुबळा आमचा शेतकरी समाज दारिद्र्याच्या वेदनेनें मनांतल्या मनांत कण्हतो आहे. या शेतकऱ्यांच्या हालाला जितकें परकीय सरकार कारणीभूत आहे, तितका, किंबहुना जास्त, आमच्याच रक्तामांसाचा, देशाचा 'सावकार' वर्ग कारण आहे. नादिरशाहाच्या स्वाऱ्या किंवा चंगीझखानाच्या मोहिमा यानें हिंदुस्थान कांहीं काळ हादरला असेल, पेंढाऱ्यांच्या किंवा ठगांच्या जुलमानें अगर लुटमारीनें हिंदुस्थानचा शेतकरी क्षणिक हैराण झाला असेल, पण जळवेप्रमाणें कसलाहि आवाज न करतां शतकानुशतकें शेतकऱ्यांचें रक्त शोषून काढणारा 'सावकार' हिंदी शेतकऱ्यांच्या मानगुटीवर जो केव्हां एकदां बसला तो अजूनहि कायम आहे.

सावकारशाहीची परंपरा

सारकारीची पद्धत फार जुनी आहे. ब्रिटिश राज्यापूर्वीहि ती अस्तित्वांत होती पण त्या वेळीं शेतकरी सशस्त्र असत आणि शासनपद्धतीहि म्हणावी तशी भक्कम नव्हती. देवळांत जाऊन मारुतीच्या शपथेवर पैसे काढून ऋणको व धनको देवघेव करीत असत. एखादें कूळ खट्याळ सांपडलें तर कुळाच्या दारीं धरणें धरून पैसे वसूल करावे लागत. यासंबंधी १८१३ सालीं Thomas Duck Broughton हे गृहस्थ लिहितात, "ज्या माणसाकडून धरणें धरावयाचें असतें त्याला ऋणकोला ताळ्यावर आणण्यासाठीं, ऋणकोच्या तंबूपुढें, किंवा वाड्यापुढें बसून राहावें लागे. यामुळें आतील माणसांना घराबाहेर पडतां येत नसे व धरणें धरणाऱ्या माणसाच्या परवानगीशिवाय बाहेरील माणसाशीं कसलाहि व्यवहार करतां येत नसे. या धरणासंबंधीचे त्या वेळचे कायदे इतर चालीरितीप्रमाणें कडक व सर्वपरिचित असत. कधी कुळाच्या अंथरुणाभोवतीं धरणें धरीत व त्याला खाऊंपीऊंहि देत नसत. अर्थात् यांतहि जबरदस्तापुढें कांहीं चालत नसे. काशी व तिच्या आसपासच्या प्रदेशांत ही पद्धत इतकी जारी होती की, केवळ याच कामासाठीं काही ब्राह्मणांना अन्नपाण्याशिवाय कित्येक दिवस राहण्याची संवय लावून मुद्दाम तयार करीत. पुढें याचा परिणाम असा झाला की ही ब्राह्मण मंडळी एखाद्या श्रीमंतांच्या दारापुढें बसून अन्नपाणी न घेण्याची शपथ वहात व मोठी रक्कम घेतल्याशिवाय उठत नसत." ही धरणाची पद्धत अद्यापहि कोठेंकोठें दृष्टीस पडते. मुंबई इलाख्यांत पठाण सावकारांचा ज्यांना अनुभव आहे त्यांना हें धरणें म्हणजे काय याची अंशतः कल्पना येईल. पूर्वीचें "धरणें" म्हणजे The strong stomach carries the day "बळी तो कान पिळी" असें असल्यामुळें एखाद्या सावकारानें अन्यायानें कर्ज वसूल करण्याचें ठरविलें तर सशस्त्र शेतकरी ऋणकोला मदत करून न्याय मिळवीत. सध्यां धरणें कायद्यानें गुन्हा ठरविलें असलें तरी कमीअधिक प्रमाणांत तें अमलांत येत असून शेतकरी मात्र पूर्णपणें निर्बल झाले आहेत. ब्रिटिश राज्य म्हणजे कायदे, कोर्टें आणि कागदपत्रें यावर चालणारें सरकार! सावकारवर्ग नेहमींच साक्षर आणि त्याचें भक्ष्य शेतकरी पूर्णपणें निरक्षर! आपल्याला हा सावकार फसविणार नाहीं असें भोळ्या शेतकऱ्यांना वाटत असतें आणि सावकार मात्र अधमपणानें मनुष्यत्वाला विकून शेतकऱ्याचा गळा कापायला सदैव तयार असतो. गेल्या शंभर वर्षांत सर्वत्र शेतकऱ्यांवर या रोगानें कहर माजवून सोडला आहे. दुष्काळ पडला तर तो एक ईश्वरी कोप समजून मानेवर मान घालून मरायला तयार होईल. पण आपलाच धर्मबंधू–देशबंधू म्हणून, जो शेतकरी सावकारांवर अवलंबून नागविला जातो, त्याला उपासमारीनें मृत्युपंथास लागलेल्या आपल्या बायकापोरांकडे पाहून काय वाटत असेल? केवळ आपण भोळे, विश्वासू म्हणून आपल्या मुलांबाळांना भाकरीच्या एका तुकड्यासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे केविलवाणें तोंड करून पाहावें लागतें आणि हा सावकार अधम व गळेकापू म्हणून त्याची चैन-चंगळ चालते; असा उलटा न्याय पाहिला म्हणजे जगांत ईश्वर तरी आहे काय असा

प्रश्न हिंदी शेतकरी स्वतःला विचारूं लागतो. सावकाराकडून शेतकऱ्यांना अनेक प्रकारें छळ सहन करावा लागतो. नुसता अंगठा उठवून घेऊन त्याची कायमची खरेदी करून घेणें, खोटे महिने मोजून व्याजाचें व्याज काढणें, ज्यानें एकदां १० रुपये घेतले त्याचे तीन महिन्यांत ३० रु. लिहून घेणें, व सहा महिन्यांत १०० रु. वरून कोर्टांत जाणें, आणि आंधळ्या न्यायदेवतेकडून शेतकऱ्याच्या घरादारावर नांगर फिरविणें, ऋणको मरून पडला असतां, त्याची बायको दुःखानें हंबरडा फोडीत बसली तरी प्रेत हलूं न देणें व पहिलें देणेंघेणें लिहून घेऊन नंतर प्रेतसंस्कार करणें अशीं कित्येक उदाहरणें घडत आहेत.

सबंध हिंदुस्थानांत ३,४४,००० सावकार आहेत असा अदमास आहे; परंतु तो साफ चुकीचा आहे. प्रत्येक खेड्यांत कमींत कमी एक तरी सावकार खात्रीनें असतो. हिंदुस्थानांत नुसतीं खेडींच ७ लक्ष आहेत. शिवाय शहरांतून त्यांचा सुळसुळाट असतो तो वेगळाच. खानेसुमारीच्या वेळेस सावकारी हा धंदा सांगणारे लोक फार थोडे असतात. बहुतेक सावकार खेड्यांत दुकानदारी करीत असतात. या बाबतींत मुंबई इलाख्याच्या सेन्सस रिपोर्टांत (१९२१) म्हटलें आहे कीं, "५५५० दुकानदारांपैकीं फक्त ४९४७ दुकानदारांनीं आपण सावकारी करतो अशी कबुली दिली आणि ३६ हजार सावकारांपैकीं अवघ्या १८९५ जणांनीं आपण दुकानदारीहि करतो असें सांगितलें. ज्यांनीं ज्यांनीं इनकमटॅक्सचीं अपिलें ऐकलीं आहेत ते जाणत असतील कीं कोणताही सावकार साधा आणि प्रामाणिक अगदींच क्वचित, व्यापाऱ्यांची अत्यंत मोठी संख्या दुकानदारी आणि सावकारी हीं दोन्ही करीत असते. मुंबई इलाख्यांत ४० ते ४१ हजार सावकार आहेत असें सेन्सस रिपोर्टांतील आकड्यावरून दिसतें. आणि ज्यांनीं दुकानदारी-सावकारीशिवाय दुसरे धंदे सांगितले आहेत (जो आंकडा सेन्सस रिपोर्टांत दिला नाहीं) तो आंकडा जरी सोडून दिला तरी ४१ हजार हा आंकडाहि अगदींच कमी आहे. प्रत्येक खेड्याला व गांवाला एक तरी सावकार बिनचूक मोजतां येईल. ज्यांना हिंदी शेतकऱ्यांच्या स्थितीची माहिती आहे, त्यांना कळून येईल कीं हें सावकारांचें प्रमाण अत्यंत कमी आहे. कांहीं खेड्यांत सावकार दुकानदार किंवा दुकानदार सावकार नसल्याचीं कांहीं उदाहरणें असतीलही; परंतु हीं खेडीं इतकीं थोडीं आहेत कीं, एकंदर शहरांतून व खेड्यांतून जी सावकारांची भरती आहे, ती ध्यानीं घेतां या खेड्यांकडे लक्ष देण्याची मुळींच जरूर नाहीं." (Page 2/4 Census Report 1921 of Bombay) हा वर्ग मुंबई इलाख्यांत बहुतेक ब्राह्मण आणि बनीया जातीचाच आहे. हे वाणी मुंबई इलाख्यांत ३ लक्ष ३३ हजार आहेत आणि ब्राह्मण १०। लक्ष आहेत. "They are chiefly moneylender and grain dealers" (Statistical Atlas, Bombay 1925) ब्राह्मणांपैकीं फारच थोडे सावकार नसतात. अगदीं यःकश्चित् भिक्षूकदेखील सावकारी करीत असतो. याशिवाय मारवाडी वगैरे वेगळेच. मुंबई इलाख्यांतील ब्राह्मण समाज धूर्त असल्यामुळें त्याच्याकडून भयंकर नागवणूक होत असते. धर्मगुरु तोच, मामलेदार, मॅजिस्टेटसारखा सरकारी नोकर तोच आणि सावकारहि

तोच. अशा स्थितींत शेतकऱ्यांचे किती भयंकर हाल होत असतील? ब्राह्मण समाज सावकारी करणारा नाहीं असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे पण तें सत्याला सोडून आहे. *

मुंबई इलाख्यांतील ब्राह्मणांची दिलेली जिल्हेवार माहिती एकदां डोळ्याखालीं घातली म्हणजे मुंबई इलाख्यांतील सावकारांत ब्राह्मणांचा किती भरणा आहे हें समजेल. भोळ्या शेतकऱ्यांना जबर व्याजानें कर्ज देणारा ब्राह्मण, त्याचा रोखा लिहिणारा ब्राह्मण, त्याचें वकीलपत्र घेणारा ब्राह्मण आणि न्याय करणारा सरकारी नोकरहि ब्राह्मणच अशी स्थिती झाल्यामुळें ब्राह्मण समाज जमीनदार बनला. हा जमीनदार स्वतः कधीं जमीन करीत नाहीं तर सावकारी व्याजामुळें किंवा व्याजाच्या गळफासामुळें दुसऱ्या जातीच्या शेतकऱ्यांना खंडकरी बनवून किंवा नोकर ठेवून पुन्हां लुबाडीत असतो. ही मुंबईची

---

* खालील आंकडे Statistical Atlas पुस्तकावरून घेतले आहेत. ते वाचून पाहिले म्हणजे खरी वस्तुस्थिती समजण्यास मदत होईल. अहमदनगर जिल्ह्यांत २०६६४ ब्राह्मण असून ते बहुतेक लेखक, सरकारी नोकर, जमीनदार, सावकार व धर्मोपाध्ये आहेत पुणें जिल्ह्यांत ५६५४५ असून ते लेखक व सरकारी नोकर आहेत. सोलापूर जिल्ह्यांत २७९१६ असून ते मुख्यतः धर्मोपाध्ये जमीनदार व सरकारी नोकर आहेत. सातारा जिल्ह्यांत २७९९१ असून, ते जमीनदार, सरकारी नोकर, धर्मोपाध्ये, व्यापारी आणि सावकार आहेत. बेळगांव जिल्ह्यांत ३०६३६ असून ते लेखक, धर्मोपाध्ये, व्यापारी आणि सरकारी नोकर आहेत. विजापूर जिल्ह्यांत २३६९९ असून ते लेखक, व्यापारी, धर्मोपाध्ये, जमीनदार, सावकार व सरकारी नोकर आहेत. धारवाड जिल्ह्यांत ३४१३३ असून ते धर्मोपाध्ये, सरकारी नोकर, जमीनदार, सावकार, वकील आणि व्यापारी आहेत. ठाणें जिल्ह्यांत २४२०६ ब्राह्मण असून ते धर्मोपाध्ये, जमीनदार व सरकारी नोकर आहेत. कुलाबा जिल्ह्यांत २१३३६ असून ते जमीनदार, सरकारी नोकर, व्यापारी, धर्मोपाध्ये आणि सावकार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांत ६२२२३ असून ते सरकारी नोकर, उपाध्ये आणि थोडेसे शेतकरी आहेत. कानरा जिल्ह्यांत ६३८९८ असून ते उपाध्ये, लेखक, सरकारी नोकर, व्यापारी, सावकार व थोडेसे शेतकरी आहेत. अहमदाबाद, कायरा, पंचमहाल, भरोच व सुरत या पांच जिल्ह्यांत अनुक्रमे ४५७७४, २९४४२, ७२८५, १०४८१ व ३९२०९ अशी ब्राह्मणवस्ती असून त्यांतील बहुतेक सरकारी नोकर, उपाध्ये, सावकार किंवा लहानसे धंदे करणारे आहेत. यांपैकी कायरा व सुरत जिल्ह्यांत कांहीं जमीनदार आहेत. बाकी प. व पू. खानदेश या दोन्ही जिल्ह्यांतील ब्राह्मण उपाध्ये, सरकारी नोकर, जमीनदार आणि सावकार असून त्यांची वस्ती १०१३५ व २४४५० आहे. नाशिक जिल्ह्यांत २३४८४ ब्राह्मण वस्ती असून त्यांत सरकारी नोकर, जमीनदार व बरेच धर्मोपाध्ये आहेत.

परिस्थिति झाली. बंगालमध्यें तर सर्व जमिनी सावकारांच्या घशाखालीं जातात कीं काय अशी धास्ती उत्पन्न झाली होती. "एका काळीं संताळ परगण्यांतील मूळच्या जातीच्या जमिनी, बंगाली सावकार हिसकावून घेतात कीं काय अशी भीति वाटत होती पण पुढें बंगाली सावकारांच्या ताब्यांत जमिनी जाणें कायद्यानें बंद केलें." (Imperial Gazetteer, 64 page) पंजाबमध्येहि सावकारांच्या तावडींतून सुटण्यासाठीं एकसारखे प्रयत्न चालू आहेत. तेथें ३८००० सावकार आहेत. परंतु इतर प्रांतांप्रमाणे इतर धंदे करून सावकारी करणारे—हे कमी धोक्याचे नाहींत—आहेत त्यांची संख्या यांत मिळविली तर आंकडा अत्यंत मोठा होईल.

बादशाही शेतकी कमिशन

हिंदी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाबद्दल (Royal Commission on Agriculture) आपल्या रिपोर्टांत म्हणतें, "शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाविषयीं व त्याच्या कारणाविषयीं दिवसेंदिवस जास्त माहिती मिळत असून त्यावर पुनः पुन्हा विचार केला जात आहे. एकीकडे शेतकऱ्यांना कर्ज देण्याची जमीनदारांची तयारी, शेतकऱ्यांचा मोह व तात्पुरत्या गरज भागविण्याची सवय यामुळें शेतकरी आपलें उत्पन्नच नव्हे तर भांडवलहि गहाण लावून देतो व मग त्याचा कर्जबाजारीपणा जास्त वाढत जातो. तर दुसरीकडे व्यापाराची शीघ्रवृद्धि, कायदे आणि कोर्ट याशिवाय कॉंट्रॅक्ट ॲक्टसारखे कायदे या सर्व गोष्टी सावकारांना साह्यकारी होत असतात. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला आळा पडण्यासाठीं जीं कायद्यांचीं बंधनें घातलीं किंवा जे कायदे केले ते पूर्णपणें अयशस्वी ठरले. कमिशनपुढें जो पुरावा आला त्यापैकी एका प्रांतांतील पुरावा असा होता कीं सिव्हिल प्रो. कोडाप्रमाणें शेतकऱ्यांचीं जनावरें, औतासारखीं हत्यारें वगैरेचा लिलांव करण्याचें बंधन पाळलें गेलें नाहीं. बिहार, ओरिसामधील (Kamiauti Agreements Act निरुपयोगी ठरला. Deccan Agriculturist Relief Act चें उल्लंघन (Evaded) होत आहे आणि Usurious Loans Act हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत जवळ जवळ मेल्यासारखा झाला आहे." यापुढें कमिशन सुचवितें कीं, 'यांतील शेवटचा कायदा हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत कां निरुपयोगी ठरला याची चौकशी व्हायला पाहिजे. जर या कायद्यांचीं सर्व कलमें पूर्णपणें अमलांत आलीं असतीं तर अनिर्बंध जबर व्याजाच्या भुताला थोडा तरी आळा पडला असता. प्रांतिक सरकारनें फेरविचार करण्यासारखे जे कायदे आहेत त्यांपैकीं १९२७ सालचा पंजाब मनिलेंडर ॲक्ट आणि ब्रिटिश मनिलेंडर ॲक्ट Rural Insolvancy Act ची छाननी व्हायला पाहिजे."

शेतकऱ्यांना सावकारांच्या तावडींतून सोडविण्याची सरकारची प्रामाणिक इच्छा असो वा न नसो पण त्यानें जे कायदे केले आहेत तेहि अमलांत येत नाहींत. याबद्दल

सरकारला दोष देतां येत नाहीं. काळ्या नोकरशाहींत सावकारांच्या जातभाईंचा प्रमाणाबाहेर भरणा असल्यामुळें शेतकऱ्यांच्या हितांच्या कायद्यांची अंमलबजावणी होऊं शकत नाहीं. सरकारी कोर्टें आणि Established सरकारमुळें सावकार कसे प्रबल झाले आहेत याचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. हें Established सरकार परकीय असतांनासुद्धां कायद्यांची मात्रा चालू देत नाहींत, तर मग सावकारांचेंच सरकार झाल्यावर शेतकऱ्यांचें काय होईल ?

बहुतेक शेतकरी कमीअधिक प्रमाणांत कर्जबाजारी आहेत. " हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांचें कर्ज ४५० कोटी रुपयांपासून ६५० कोटी रुपयांपर्यंत गणलें गेलें आहे. (India on trail, Page 21) या कर्जावरील व्याजासाठीं दरसाल कोट्यवधि रुपये शेकऱ्यांकडून लुबाडले जात असतील. नुसते व्याजाचे दर पाहिले तर ते १२ पासून १६ पर्यंत अगदी उघडपणें घेतले जातात. पण आडवाटेनें शेंकडा ४०० व्याज घेण्यापर्यंत सावकारांची मजल गेल्याचीं कित्येक उदाहरणें आहेत.

हिंदुस्थानचा शेतकरी कर्जबाजाराखालीं व त्याच्या व्याजाखालीं कसा नागवला जात आहे यांचें तंतोतंत शब्दचित्र रेखाटणें फार कठीण आहे. जगांतील गुलामगिरी नष्ट झाली पण हिंदुस्थानांतील मात्र अद्यापहि कायम आहे. लग्नासाठीं किंवा इतर कारणासाठीं काढलेल्या कर्जाच्या व्याजांत ६० लक्ष लोक राबत आहेत. मुकी बिचारी कुणी हांका अशी त्यांची स्थिति झाली आहे.

जमीनदार–शेतकऱ्यांचे मित्र ?

" जमीनदार " या शब्दाचा बराच घोटाळा उडण्याचा संभव आहे. पाच हजार एकरापेक्षां जास्त जमीन धारण करणारा एखादा सिंधी, जमीनदार म्हणवून येतो तर कोकणात दीड एकर जमिनीचा मालकहि स्वतःला जमीनदार म्हणवतो. इतकेंच नव्हे तर जमीनदार म्हणवून घेणें ही एक अभिमानाची गोष्ट आहे असा सर्वसाधारण शेतकऱ्यांचा समज आहे. जमीन धारण करणारा तो जमीनदार या न्यायानें तें योग्यहि असेल पण जमीनदार म्हणजे अत्यंत मोठ्या जमिनी धारण करणारे आणि त्या दुसऱ्याला खंडानें देऊन त्याच्या उत्पन्नावर जगणारे अशें थोडक्यांत म्हणतां येईल. ह्या जमीनदारांचे आणखी कांहीं व्यापारधंदे असतात. ज्यांचा शेतकीशीं कांहीं संबंध नाहीं असे व्यापारीहि जमीन खरेदी करून जमीनदार बनतात. बंगालमध्यें जमीनदारी पद्धतीमुळें अगदीं थोड्या लोकांच्या ताब्यांत जमिनी जाऊन जो शेतकरीवर्ग स्वतः जमीन कसतो, वर्षभर राबतो, ते उपरें कूळ आणि जे जमीनदार शेतकऱ्यांच्या कष्टावर जगतात ते मात्र वतनदार अशी स्थिति झाली आहे.

बंगालचे कायमधारा–दावेदार

बंगालची ही जमीनदारी १७९३ सालीं ब्रिटिश सरकारनें मान्य केली त्या वेळीं जे जमीनदार म्हणून दाखल झाले किंवा तालुकादार गणले गेले ते बहुतेक

सारा वसुलीकरतां नेमलेले अधिकारी, कांहीं त्या वेळच्या राजांच्या नात्यातले, असल्या लोकांच्या ताब्यांत जमिनीचा मोठा भाग कायमधारा पद्धतीनें गेल्यामुळें शेंकडा ९८ शेतकरी खंडकरी किंवा मजूर आणि हे शेंकडा २ मात्र जमीनदार. सरकार सारा ठरलेला पण या जमीनदारांचा हिस्सा मात्र लहरीवर. ज्या गांवांत जमीनदारी पद्धत असते मग तो बंगालचा जमीनदार असो, वऱ्हाडचा मालगुजार असो किंवा मलबारचा जन्मीज असो. सबंध गांवच्या गांव एकाच्या मालकीचा असतो. तेथें या जमीनदार-मालगुजारांच्या सत्तेला मर्यादा नसते आणि शेतकऱ्यांच्या हालालाहि पारावार नसतो. जमीनदार नुसते शेतकऱ्यांचे कष्ट आपल्या चैनीकरतां घेत नाहींत, तर अशीं अनेक उदाहरणें आहेत, कीं गरीब शेतकऱ्यांच्या झोपडींत एखादी सुंदर मुलगी असली तर तिचा अपहार करण्यास हे अधम जमीनदार कमी करीत नाहींत. शेतकरी गरीब असतो, कर्जानें गांजलेला असतो, त्याला जमीन सोडून जावें लागलें तर दाही दिशांना काचा दिसतात. आजूबाजूच्या शेतकऱ्यांनाहि कांहीं बोलतां येत नाहीं. सरकारी ऑफिसरहि या जमीनदारांचे मिंधे असावयाचे आणि नाडलेल्या गरीब शेतकऱ्याच्या असाह्य कन्येला या अधमाच्या राक्षसी इच्छेला बळी पडत, नशिबाला दोष देत मुळूमुळू रडण्यापेक्षां दुसरा कोणताच मार्ग उरत नाहीं. त्यांतून पापाला वाचा फुटली, परमेश्वरालाच—तो असला तर—दया आली तर असला एखादा कायद्याच्या कचाटींत सांपडावयाचा पण हें अगदीं क्वचित् जवळ जवळ अशक्य. ज्या खेड्यांत एकच माणूस सर्व गांवाच्या चरितार्थाचा दाता, त्या गांवांत तो माणूस सज्जन असला तर बरें—बहुतेक तो तसा नसतो—परंतु त्यामुळें हिंदी शेतकरी अत्यंत लाचार झाला आहे. खालसा गांवांत—ब्रिटिश मुलखांत—जर ही परिस्थिती तर संस्थानी गांवांत हे इनामदार जहागिरदार काय करीत असतील—कसला हाहाकार उडवीत असतील ?

खोतीच्या खातेऱ्यांत

कोंकणचा खोत, त्याला जर मानवी सैतान नांव दिलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. यांतले कांहीं खोत तर इतके गरीब असतात कीं, त्यांना वर्षाला १-२ रुपये खोती हक्काबद्दल यायचे, तेवढ्याकरतां सुद्धां त्यांना खोती पाहिजे. जे खोत श्रीमंत आहेत, सावकार आहेत, त्यांच्याकडून शेतकऱ्यांचा अत्यंत छळ होत असतो. या खोतांनीं मूळच्या खोताला फसवून, थोड्या पैशांत या जमिनी उपटलेल्या असतात. कित्येक वेळेला गांजलेले शेतकरी खोताच्या जुलमी वर्तनामुळें सर्व विसरून खोताचा खून करण्यास तयार होतात. आणि असे खून झालेहि आहेत.

मलबारी जन्मीज

मलबारमधील जन्मीज (जमीनदार) हेहि कांहीं खोतापेक्षां कमी जुलमी नाहींत. शेतकऱ्यांच्या सामाजिक आयुष्यावर मलबारी जन्मीज कसा निखारा पसरतो याबद्दल

Report of Malbar Tenancy Committee 1927-28, vol. 1, page 28

वर असें लिहिलें आहे कीं, " मलबारमधील कुळें अशी तक्रार करतात कीं, जन्मीज लोकांच्या हातीं कर्तुमकर्तुम् सत्ता असल्यामुळें ते विशेषतः नंबुद्रि ब्राह्मण, कुळांवर, विशेषतः हिंदू कुळांवर सामाजिक वर्चस्व अधिक ठेवूं शकतात आणि या वर्चस्वाचा उपयोग बहुधा कुळांना खालीं दडपण्यासाठींच केला जातो. नंबुद्रि जन्मीज आपल्या धार्मिक हक्काच्या नांवाखालीं कुळांना दानधर्म म्हणून नेहमीं पिळून काढीत असतात. मि. लोगन म्हणतात ते स्पेशल कमिशनर म्हणून काम करीत असतांना जेव्हां प्रवासाचा फिरण्याचा प्रसंग येई तेव्हां रस्ता दाखविणारी हिंदु कुळें आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या (Wrongs) व जबरदस्तीच्या (Oppression) हकीगती सागत असत. " हे Wrongs आणि Oppression " कशा प्रकारचें असतें याची कल्पना सुधारलेल्या आणि स्वतंत्र असलेल्या पाश्चात्त्य समाजाला एखाद्या भयानक कादंबरीप्रमाणें वाटेल. शेतकऱ्यांनीं मि. लोगन यांना ज्या हकीगती सांगितल्या त्या रेकॉर्ड करा असा त्यांनीं शेतकऱ्यांना आग्रह केला. पण त्या रेकॉर्ड करण्याची त्यांना छाती झाली नाहीं. यावरून त्या हकीगती खोट्या होत्या असें नाहीं, तर हिंदु धर्माच्या समजुतीप्रमाणें नंबुद्री ब्राह्मणाविरुद्ध तक्रार करणें म्हणजे केवढा तरी स्वजनद्रोह–स्वधर्मद्रोह.

धर्मद्रोहाची मलबारी व्याख्या.

आपल्या मुलीबाळींची अब्रू घेण्यास प्रतिकार करणें हा देखील तेथें स्वधर्मद्रोह होतो. धिक्कार असो असल्या धर्माला व त्या धर्मसमजुती धारण करणाऱ्यांना. स्वजनाची व्याख्या असल्या जुलमी लोकांना जर लागू करावयाची तर मग ती साप विंचू यांनाहि लागूं कां करूं नये? कारण तेहि स्वदेशांतलेच असतात. अशा प्रकारचा कोणी स्वजनद्रोह (?) केला तर त्याला हे नंबुद्रि ब्राह्मण Excommunicate जातीबाहेर टाकण्याची शिक्षा फर्मावीत. यासंबंधीं मलबार टेनन्सी कमिटी आपल्या रिपोर्टांत लिहिते— "जातिबाहेर (Excommunicate) टाकण्याचे परिणाम अत्यंत भयंकर, अन्यायी व दुःखकारक होत. वाळीत पडलेल्यांना न्हावी मिळत नाहीं, त्यांच्या स्त्रियांना बाळंतपणांत मदत मिळत नाहीं, देवळांत जाण्याची मनाई असे, इतकेंच नव्हे तर त्यांना विहिरीचें किंवा तळ्याचें पाणीहि घेऊं देत नाहींत. " एवढ्यावरच त्यांची दैना संपत नाहीं, कारण त्यांनीं धर्मगुरु व जमीनदार यांच्या विरुद्ध तक्रार केलेली असते. " त्यांना स्वतःला पाण्याची बंदी असेच पण दुसऱ्यांनींहि पाणी देऊं नये अशी बंदी असे. त्यामुळें लोक त्यांच्या कौटुंबिक समारंभास मदत करण्यास धजत नसत. जो कोणी त्यांना मदत करी, उपयोगी पडे किंवा त्याच्याशीं बोलतांना दिसे त्यालाहि जातीबाहेर पडावें लागे किंवा दंड भरावा लागे. कोणी व्यक्तिस्वातंत्र्याच्या जोरावर थोडाहि विरोध दाखविला तर जन्मीज चिडून जात. ज्यांच्यावर असला प्रसंग आला असेल त्यांनाच याची खरी कल्पना येईल. अशा परिस्थितींत आयुष्य नकोसें वाटे " असें वाटणें अगदीं साहजिक आहे.

मलबारी "स्वधर्म."

मलबार टे० कमिटी पुढें म्हणते, "मलबार प्रांतांत समाधा जन्मीज, नायर कुळें व ब्राह्मण यांमधील सामाजिक बंधनें शिथिल आहेत. उदाहरणार्थ, जन्मीजच्या कुटुंबांतील लहानग्या तरुण मुलाला त्याच्याच जातींतील मुलीशीं लग्न करण्याची बंदी आहे. त्यानें नायर जातीच्या मुलीशीं कांहींसा लग्नासारखा (Contract alliances) विधी करायचा असतो. पूर्वीच्या काळीं नायर जातीच्या कुटुंबांना असले विवाह मानाचे वाटत". परंतु नायर समाजात इंग्रजी शिक्षणाचा फैलाव होत असल्यामुळें या पद्धतीला जोराचा विरोध होऊं लागला आहे. तरीहि जन्मीजचें सामाजिक वर्चस्व पूर्वीप्रमाणें कायम आहे. म. टे. कमिटी म्हणते, "अद्यापहि जन्मीजचे सामाजिक वर्चस्व अबाधित आहे. त्यामुळें सुशिक्षित नायर समाजांत अत्यंत असंतोष पसरला आहे."

करांचे प्रकार

उत्तर हिंदुस्थानात औध व बंगाल हे जमीनदारीचे गड्डे समजले जातात. तेथील व मलबारमधील जमीनदारांच्या जुलमांत फारसा फरक नाहीं. औध प्रांतांत जमीनदाराला मुलगा झाला तर या जमीनदाराला सेस! मुलीचें लग्न झालें; नायकिणीच्या नाचाचा खर्च शेतकऱ्यांवर, पण नाच मात्र जमीनदाराच्या घरीं! जमीनदाराचा बाप मेला किंवा मुलगा झाला तरी शेतकऱ्यांवर कर! दसरा आला—होळी आली, या नजराणा! ताल्लुकदार नुसते फिरतीवर निघाले—केवढे त्यांचे उपकार!—ठेवा त्यांच्या पुढें कर! असले शेकडो तऱ्हेचे छोटेमोठे कर निरनिराळ्या नांवाखाली जेथें सरकारी बंधनें आहेत तेथें बेकायदेशीर रीतीनें आणि जेथें कायद्याची आडकाठी नाहीं तेथें वाजवीपेक्षां दसपट शेतकऱ्यांकडून वसूल केले जातात. मालकी हक्कावद्दल उत्पन्नांतून खंड घेतात तो वेगळाच. केवळ सामाजिक चालीरीतीच्या नांवाखालीं जमीनदार लोक खंडकऱ्यांना पिळून काढीत असतात.

रयतवारी—दगडापेक्षां वीट मऊ

जमीनदारी, तालुकदारी, मालगुजारी किंवा खोती या पद्धतीमुळें शेतकरी दारिद्र्यांत—अनिश्चित परिस्थितींत तर कायम राहतोच पण सामाजिक गुलामगिरीची त्याला जी संवय लागते, त्यामुळें त्याचें अधःपतन होऊं लागतें. आणि नव्या विचारानें किंवा शिक्षणानें जे स्वतंत्र तेज दाखवून ही सामाजिक गुलामगिरी झुगारून देण्याचा प्रयत्न करतात, त्यांना हालअपेष्टा भोगाव्या लागतात. यापेक्षां 'रयतवारी' पद्धत पुष्कळच बरी असें म्हणण्याची पाळी येते. कारण प्रत्यक्ष सरकारशींच संबंध असल्यामुळें एकदा वर्षांत जो काय सारा असेल त्याच्या पलीकडे भानगड नसते. पण अशी रयतवारी पद्धत मद्रास-मुंबई इलाख्याखेरीज मोठ्या प्रमाणांत अशी कोठेंच नाहीं. मुंबई-मद्रासमध्ये देखील जमीनदारांची कमतरता आहे असें नाहीं. मद्रासच्या उत्तर भागांत जमीनदारी आहे. मुंबई इलाख्यांत—सिंध सोडून पुढीलप्रमाणें जमीन धारण करणारे आहेत.

रयतवारी १३९२७४०, तालुकदारी ४९७, मेहवासी ६२, उधाड जमाबंदी ९५, खोती ३६८५, इजाफत ३० आणि इनाम जहागिरी २१९९ (Imperial Gazetteer of India Vol. II.) यावरून जेथें रयतवारीची संख्या मोठी आहे. प्रत्यक्ष सरकारशींच करानें बांधलेले जास्त आहेत अशा ठिकाणीं सुद्धां जमीनदारांचें पीक कमी नाहीं. रयतवारींत सुद्धां जमीनदार उत्पन्न होतो.*

---

* पुढील कोष्टकावरून मुंबई इलाख्यांत जमीनदार किती व खंडकरी किती याचा उलगडा होईल.

जमीनदार

पुरुष—स्टेट व एजन्सी ६८६०३, मुंबई उपविभाग २३१, मध्य विभाग ३८१५३, उत्तर विभाग २४०१३, दक्षिण विभाग (कर्नाटकांतील तीन जिल्हे) २७१३९, कोंकण तीन जिल्हे २०९३० व सिंध ४१७३९.

स्त्रिया—स्टेट व एजन्सी २२१५४, मुंबई उपविभाग २०३, मध्यविभाग २४१४०, उत्तर विभाग ११९५७, दक्षिण विभाग १५५७३, कोंकण ९०९४ व सिंध ३२२७.

शेती करणारे मालक

पुरुष—स्टेट व एजन्सी ३१८७३०, मुंबई उप-विभाग २६५९, मध्य विभाग ५४३८९७, उत्तर विभाग २५६१६३, दक्षिण विभाग ३०४७१२, कोंकण ९२०१७ व सिंध ७४९५३.

स्त्रिया—स्टेट व एजन्सी ८४९७५, मुंबई उपविभाग १२२२, मध्यविभाग २२४३४१, उत्तर विभाग ७०७८९, दक्षिण विभाग ७९२०६, कोंकण ७६७४२, सिंध ४२०९.

खंडकरी

पुरुष—स्टेट एजन्सी ३९४४३३, मुंबई उपविभाग ९६३, मध्यविभाग ७१२८०, उत्तर विभाग १६०८१९, दक्षिण विभाग ७२५३४, कोंकण २२२४८३, सिंध ४८७७६५.

स्त्रिया—स्टेट व एजन्सी ८१६५८, मुंबई उपविभाग २२१, मध्यविभाग १९३१३, उत्तर विभाग ५८३७४, दक्षिण विभाग १५८३२, कोंकण १८६७४०, सिंध ३०२९१.

इतर

पुरुष—स्टेट व एजन्सी २८४२१७, मुंबई उपविभाग २९२५, मध्य विभाग १७७४५६, उत्तर विभाग ४४०७५, दक्षिण विभाग १६३८९, कोंकण ३०५३५, सिंध ६५०६.

स्त्रिया—स्टेट व एजन्सी ८६७९०, मुंबई उपविभाग १४१९, मध्य विभाग ९६६७४, उत्तर विभाग २१५२६, दक्षिण विभाग ४८२१, कोंकण ३२३२४, सिंध ९६६.

जमिनीवर खंडकऱ्यांकडून किती भाडें उकळलें जातें याचा नेमका आंकडा सांगणें कधींच शक्य नाहीं. प्रत्येक जमीनदाराच्या धूर्तपणावर किंवा मूर्खपणावर तें प्रमाण अवलंबून आहे. सरकारच्या शेतकऱ्यांपेक्षां नेमके पांचपट किंवा दसपट असा आंकडा बसविणें चुकीचें आहे. खंडकऱ्याला, त्याच्या बायकामुलांसह जमीनदारींत राबविण्याची कांहीं ठिकाणीं वहिवाट आहे. नुसत्या व्याजाकरतां किंवा लग्नाला काढलेल्या कर्जाकरतां जमीनदाराकडे किंवा सावकाराकडे नोकरी करणारे लक्षावधी दुर्दैवी प्राणी आहेत.

२३ कोटी शेतकऱ्यांमध्यें १ कोटी लोक असे आहेत कीं, स्वतः शेतकी न करणारे पण २२ कोटी शेतकऱ्यांवर जगणारे जमीनदार, माल्गुजार, इनामदार, जहागिरदार वगैरे होते. या १ कोटी लोकांच्या भारामुळें २२ कोटी शेतकरी अन्नान्न दशेला पोंचले आहेत.

हिंदुस्थानांतील लोकांचे आर्थिक दृष्टीने भाग पाडावयाचे झाल्यास ते १ संस्थानिक, जहागिरदार, मोठे जमीनदार, २ छोटे जमीनदार, व्यापारी, सावकार, ३ सरकारी नोकर, पांढरपेशे वगैरे आणि ४ शेतकरी—मजूर सारखा गरीबवर्ग असे पाडतां येतील. यांपैकीं संस्थानिकांची संख्या ५६३ असून त्यांत एखाद्या स्मॉल होल्डिंगपेक्षां थोडेसें मोठें असलेल्या सिमला हिलपासून किंवा

अवघें १९ चौ. मैल

असलेल्या लोवा संस्थानापासून तो इटाली देशाएवढ्या १ कोटी ३० लक्ष वस्ती असलेल्या निजाम संस्थानापर्यंत अनेक तऱ्हेचीं संस्थानें आहेत. या संस्थानांतून त्यांनींच उत्पन्न केलेले जहागिरदार, सरदार यांचा एक निराळा गटच बनविला आहे. बहुतेक संस्थानांतील एकतंत्री राजसत्ता व राजेसाहेबांचा लहरी स्वभाव यामुळें तिथल्या एकंदर जनतेची काय स्थिति होत असेल याची कल्पना करवणार नाहीं. संस्थानांतला शेतकरी-वर्ग सबंध अधिकाऱ्यांना भीत असतो. एखाद्या

डगलेवाल्या पोलिसांपासून

तों राजदंडधारी महाराजापर्यंत त्याला सर्वच सरकार. ज्या जातीचा संस्थानिक असेल, त्याखेरीज इतर सर्व जातींची कुचंबणा, अधिकाऱ्यांचा जुलूम, हजारों तऱ्हेचे कर हे असतातच. पण याशिवाय ज्याच्यावर महाराजांची इतराजी झाली असेल त्याचा सूड उगविणें, बेलगामपणें शेतकऱ्यांच्या जमिनी हिरावून घेणें, ज्या जमिनीच्या धान्यावर वर्षभर कष्ट करून शेतकऱ्यांच्या बायकापोरांनीं जगावें; त्याच जमिनी उत्तम संस्थानिकानें आपल्या पित्त्याला देण्याकरतां बिनहिशेबी व बेकायदेशीर रीतीनें जप्त कराव्यात हे प्रकार नेहमीं दृष्टीस पडतात. हिंदुस्थानच्या संस्थानी जुलमापेक्षां जास्त ठरेल अशी जुलमी राज्यपद्धति सध्या जगाच्या कोणत्याहि भागावर विद्यमान नाहीं आणि हें सर्व

ब्रिटिश साम्राज्याखालीं विसाव्या शतकांत

चाललें आहे! एखादा संस्थानिक चांगला निघाला तर तो तेवढ्यापुरतें प्रजेचें कल्याण करतो; पण एकंदरींत जुलमी व एकतंत्री राज्यकर्त्यांची संख्याच जास्त निघेल. म्हैसूर,

बडोदा वगैरे संस्थानें चांगलीं चालतात असें कित्येकजण म्हणत असतात पण असे बुडत्याला आधार शोधत बसण्यापेक्षां हीं सगळीं

संस्थानें खालसा करून ब्रिटिश सत्तेखालीं अगर हिंदी लोकसत्तेखालीं

आणलीं तर काय बिघडेल ? संस्थानिकांना वाटतें त्यांनीं रक्त सांडून तक्तें मिळविलीं आहेत; तीं ब्रिटिश सरकारनें काढून घेणें हा घोर अन्याय होय. आपल्या पूर्वजांनीं तरवारीच्या जोरावर जहागिरी मिळविल्या आहेत असें जहागिरदारांना वाटतें; हें सर्व खरें असलें तरी, ज्या सैनिकांच्या रक्ताचा सडा शिंपडून हे राजे–जहागिरदार बनले–तक्ताधिपति झाले, त्यांच्या वंशजांना म्हणजे प्रजेला तीं जर खालसा करावीशीं वाटलीं तर कां करूं नयेत ? ' बापाची मत्ता मुलाला मिळावी ' हें तत्त्व गृहित धरूं, पण बापानें ज्यांच्या जिवावर राज्य मिळविलें आणि त्यामुळें जे गुलाम झाले, ते गुलाम किंवा राजमान्य भाषेंत बोलायचें म्हणजे प्रजा ही देखील राजाची मत्ताच काय ? बापानें जिंकलेल्या किंवा आणलेल्या दासी हे चिरंजीवहि दासी म्हणूनच वागवणार कां ? प्रजा ही जड संपत्ती-प्रमाणें वंशपरंपरा ताब्यांत जाणें

हा मनुष्यजातीचा अपमान आहे.

मनुष्याला निर्बुद्ध मालमत्तेप्रमाणें बापाच्या ताब्यांतून मुलाच्या ताब्यांत असला जर कायदा असेल तर इतका बेकायदेशीर कायदा दुसरा कोणताच असूं शकणार नाहीं. ब्रिटिश राज्यकर्ते सात कोटी हिंदी प्रजेला ५६३ अरेरावांच्या ताब्यांत देऊन हा अन्याय करीत आहेत. खुद्द पंचम जॉर्ज बादशहांना इंग्लिश लोकांवर जितके अधिकार गाजवितां येत नाहींत, त्याच्या किती तरी पटीनें जास्त अधिकार संस्थानिकांना आहेत. बादशहा चौथा जॉर्ज यांना एखादा दारूवाला " फोर्थ जॉर्ज " नांवाच्या मद्याच्या जाहिरातींतील पत्त्यांतील राजाच्या पंक्तींत सहज बसवूं शकतो. एका अँग्लोइंडियन इंग्रजी दैनिकांत ,' पांच राजे ?" या शीर्षकाखालीं इस्पीक, बदाम, किलवर, चौकट असे चार पत्त्यांतले राजे काढून पांचवे जॉर्ज म्हणजे एक मद्याची कुपी काढलेली आणि शेवटीं ह्या कुपीखालीं Yes—when the fifth is " King George IV " असें वजावलें आहे. आमच्या संस्थानिकासंबंधीं अशी जाहिरात कोणी देईल तर संस्थानिक संरक्षक कानु (Princes Protection Act) त्याच्या पाठीं लागलाच म्हणून समजावा. राज्यक्रांतीमुळें सिंहासनाला मुकलेले ग्रीसचे जार्ज, पोर्तुगालचा मनोल, बल्गेरियाचा फर्डिनांड, जर्मनीचे कैसर, हंगेरीचे ओटो, आस्ट्रियाचा झिटा, अफगाणिस्थानचे अमानुल्ला व स्पेनचे अल्फान्सो हे राजे त्यांच्या सुदैवानें हिंदी संस्थानिकांच्या पोटीं जन्म घेते तर त्यांना असा सत्तेचा संन्यास घ्यावा लागला नसता. फार फार तर सर तुकोजीराव होळकरांप्रमाणें स्वदेशीं येऊन जाऊन पुन्हां पॅरिस किंवा लंडन येथें राहतां आलें

असतें. ब्रिटिश साम्राज्याचे हे जरतारी बुरुज हिंदुस्थानांतच पैदा होत असतां ब्रिटिश सरकार तरी मग या बुरुजांच्या आंत काय सडतें आहे याकडे कां लक्ष देईल ?

ब्रिटिश सरकारनें संस्थानिकांच्या अंतस्थ कारभारांत हात घालावयाचा नाहीं हें इंग्रजी तत्त्व कदाचित् इंग्रजांना सोयीचें असेल. पण आमचे ७ कोटी लोक त्यांच्या सत्तेखालीं अहोरात्र भरडले जात आहेत त्याची वाट काय ? जोंपर्यंत हिंदी राजे आहेत तोंपर्यंत हिंदुस्थानांत

खरी लोकशाही स्थापन होणें

शक्य नाहीं. या संस्थानिकांनीं मनांत आणलें तर कोणत्याहि कौन्सिलांत किंवा पार्लमेंटमध्यें आपल्या बाजूचें बहुमत सहज करवतील. इंग्रजांना तहाच्या अटीप्रमाणें संस्थानें खालसा करतां येत नसतील, संस्थानिकांनाहि आपली राज्यतृष्णा सोडवणार नाहीं, पण ७ कोटी लोकांना हीं संस्थानें जावींत असें वाटतें हें मात्र खरें. सरकारला हिंदी जनतेचें कल्याण करायचें असेल तर या सर्व संस्थानिकांना, ते स्वतःकरतां, त्यांच्या वार्षिक रिपोर्टीत दाखवितात तेवढा खर्च द्यावा, हवें तर लाखलाख रुपये वर्षाला जास्त द्यावेत व संस्थानी प्रजेवर ब्रिटिश हिंदुस्थानांतील राज्यपद्धति सुरू करावी. वास्तविक हा सर्व पैसा–संपत्ति आमचीच आहे, पण स्वतःचें पोट भरण्यास नालायक असलेल्या या लोकांस पोसण्यासाठीं हा भुर्दंड भरणें भाग आहे. आम्हाला फक्त

शेतकऱ्यांना त्यांच्या जाचांतून

मुक्त करावयाचें आहे. पूर्व परंपरागत चालीरीतींचा, वैभवाचा किंवा संस्कृतीचा अभिमान धरण्यास हरकत नाहीं, पण दुसऱ्यावर जुलूम करणें ही पूर्वपरंपरा असेल किंवा त्याचा परिणाम असेल तर ती परंपरा एका क्षणाचाहि विलंब न करतां नष्ट करणें भाग आहे. संस्थानिकांचे चेंबर करून किंवा फेडरेशन करून याला आळा घालतां येईल असें कित्येक समंजस, मुत्सद्दी इंग्रजांनाहि वाटावें हें आश्चर्य आहे. सतीची चाल बंद केली तेव्हां इंग्रजांनीं कायदा न करतां

जिवत नवऱ्यांचें फेडरेशन

स्थापून ती थांबविण्याचा प्रयत्न केला असता तर तें फेडरेशन तेव्हांच सति गेलें असतें. उलट सर्व संस्थानिक एके ठिकाणीं येणें हें शेतकऱ्यांच्या किंवा सामान्य जनतेच्या दृष्टीनें जास्त घातक आहे. जोंपर्यंत एक एकच लांडगा येतो तोंपर्यंत तो फार तर एखादें मेंढरू खाईल, पण सर्व लांडगे जेव्हां एका विचारानें स्वाऱ्या करूं लागतील तेव्हां गरीब बिचाऱ्या जनतेची काय स्थिति होईल हें सांगणें कठीण आहे. प्रथम नरेंद्र मंडळ नांवाखालीं ही आंवळ्याची मोट आंवळली गेली पण आतां ब्रिटिश हिंदुस्थानांतील स्वराज्य घटनेंत हे संस्थानिक घालून त्यांचें फेडरेटेड इंडिया नांवाचें लोणचें तयार करूं घातलें आहे. ही कल्पना मूळची कोणाचीही असो पण हिंदी स्वराज्याच्या माथ्यावर

मारलेली ही मेख आहे. हिंदी संस्थानिकांचें एक नेहमीं गाऱ्हाणें असतें कीं त्यांचा ब्रिटिश सिंहासनाशीं (Paramount Power) प्रत्यक्ष पुनर्विवाह लागलेला आहे. त्यांना हिंदी सरकारशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं. व्हाइसरायांच्या चाबकांचे तालावर संस्थानिकांनीं चालणें हें त्यांना कमीपणाचें वाटूं लागलें यांत त्यांचा हेतु काय तो स्पष्ट दिसत आहे. ब्रिटिश हिंदुस्थान केव्हां तरी स्वायत्त होणार तर आतांपासून त्यांतून विभक्त होणें सोयीचें ही दूरदर्शी कुटिल राजनीति आणि हिंदुस्थानापासून याच दूरदृष्टीनें ब्रह्मदेशाचा लचका तोडून बाजूला काढणारी ब्रिटिश राजनीति यांत मुळींच फरक नाहीं. " सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः "

हिंदुस्थानच्या पैशावर व सैन्यावर संस्थानिक जिंकले आणि ब्रह्मदेशहि पादाक्रांत केला, परंतु सिलोनचा तुकडा अलगद बाजूला फेंकून जें राजकारण यशस्वी ठरलें तेंच आतां ब्रह्मदेशाच्या बाबतींत लढविण्यांत येत आहे. हिंदी संस्थानिकांनाहि असें बाजूला काढणें ब्रिटिशांना सोयीचें असतें तर त्यांनीं त्याचा पहिला प्रयोग केला असता, पण हिंदी नकाशावर पडलेले पिवळे डाग कुष्ठरोगाप्रमाणें सर्व शरीरभर असल्यामुळें त्याला अलग करणें बिकट ठरलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानला फेडरेटेड स्वायत्तता देणें म्हणजे त्यांतले नेमके गोरे बाजूला काढून हा संस्थानिकांचा

जो हुकूम ब्लॉक

हिंदी जनाच्या छातीवर बसविणेंच होय! आजची जी कौन्सिलची किंवा असेंब्लीची रचना आहे, त्यांतले सरकारी सभासद जाऊन संस्थानी सभासद येणें हें स्वराज्यच म्हणायचें असेल तर मग सगळा हिंदुस्थान संस्थानिकांना वाटूनच कां टाकीत नाहींत ? संस्थानांतील प्रजेचे सभासद जर निवडून येणार असले तर त्याला कांहीं तरी अर्थ आहे. भावी हिंदुस्थान " फेडरल सरकार " होणार आहे अशी सध्या वाटाघाट चालूं आहे. संस्थानिक आपले हक्क (?) राखण्याचे कसून प्रयत्न करीत आहेत, आणि बहुतेक हिंदी स्वराज्याचा चिवडा करण्याकरतां ब्रिटिश मुत्सद्दी संस्थानिकांना जादा सवलती देणारच. यावरून आमचें

भावी हिंदी पार्लमेंट

म्हणजे एक रेल्वेचें थर्डक्लास वेटिंग रूम होणार आहे. प्रत्येकाचे उद्देश वेगळे, ध्येय वेगळे व दिशा वेगळ्या ! राजे महाराजांना ठराविक पेन्शन देऊन हवें तर त्यांना पंचम जार्ज बादशहा इतकेच अधिकार ठेवले तरी पुष्कळ मिळवले ! परंतु इंग्रजांना प्रत्यक्ष नाहीं तरी संस्थानिक किंवा ज्ञातिनिष्ठ मुसलमान यांच्या तर्फेच आपलें राज्य टिकवायचें असलें तर त्यांना सध्याच्या राजनीतीचें अवलंबन करणें जरूरच आहे. संस्थानिकांची जूट ब्रिटिश सत्तेला सहसा धक्का लावणार नाहीं. उलट गव्हर्नर–व्हॉइसराय यांना पाहुणचारासाठीं प्रत्येक संस्थानिकांचीं रोजचीं आमंत्रणें येतील. कारण ब्रिटिश सत्ता आहे म्हणूनच शांततेनें व सनदशीरपणें प्रजेला छळतां येतें.

रशियांतील झारशाहीचीं कम्युनिस्टांनीं केलेलीं वर्णनें वाचलीं तर अंगावर शहारे येतात पण तेथें एकच झार होता. आम्हांजवळ ५६३ झार आहेत आणि त्यांना ७ कोटी

गुलामांचा कत्तलखाना करण्याचा ताम्रपट

ब्रिटिश सरकारनें देऊन ठेवला आहे. ब्रिटिश लोकांच्या न्यायी बुद्धीनें दूरवर विचार करून हीं संस्थानें खालसा केलीं नाहींत तर भावी जीवनसंग्रामाच्या झगड्यांत हीं संस्थानें म्हणजे

कम्युनिष्ट चळवळीचीं केंद्रें

होतील. संस्थानांतला शेतकरी आज धुळीस मिळालेला आहे. एखादा कवडी किंमतीचा पोलीस किंवा तलाठी गावांत आला तर बिचाऱ्याला त्याच्या मिजाशीकरतां किती धांवपळ करावी लागते.

संस्थानिकांच्या भोंवती जो जहागिरदार, तालुकेदार किंवा तोंडपुजे लोकांचा भरणा असतो त्या वर्गाची मानसिक रचना संवयीनें

इतकी नादान व अधम

झालेली असते कीं, त्याचें वर्णन करणें बिकट आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतहि संस्थानिकांच्या अनुकरणानें रा. ब., रा. सा. वगैरेंचें पीक दृष्टीस पडतें. जोंपर्यंत संस्थानिक आहेत आणि त्यांचे राजे आहेत तोंपर्यंत हा वर्ग असाच राहणार. या वर्गांत कांहीं मोठे जमीनदार, जहागिरदार आणि कांहीं नोकर यांचा भरणा असतो. महाराज सर्वसाक्षी व सर्वज्ञ आहेत असा महाराजांचा गैरसमज करून देण्यास हाच वर्ग कारण असतो. महाराजांचीं लफडीं यांना माहीत असतात आणि यांच्या लफड्यांत महाराज असतात. त्यामुळें सगळ्यांनी मिळून शेतकऱ्यांना लुबाडण्यास सर्वांसच सोयें जातें. नीति, धर्म, मनुष्यत्व वगैरे सर्व गोष्टी "ना विष्णुः पृथ्वीपतिः" या आमच्या हिंदु कल्पनेप्रमाणें राजाच्या राजवाड्यांत भिऊन शिरतच नाहींत. याशिवाय मोठे जमीनदार–जहागिरदार यांच खालसांत असलेला पण

संस्थानिकांची नक्कल करणारा सत्ताहीन

एक प्राणी असतो. या वर्गास अद्याप राजकारणाची जाणीव झालेली नाहीं, तरी देखील यांतील कांहीं धूर्त लोक निरनिराळ्या पक्षांच्या नांवाखालीं कौन्सिलांत घुसण्याचा अट्टाहास करीत असतात. ज्यांना लोकशाहीची कल्पना जन्मात माहीत नाहीं, अरेरावी हेंच ज्यांचें शिक्षण, आपण कोणी तरी श्रेष्ठ हाच ज्यांचा भ्रम अशा लोकांकडे शेतकऱ्यांचें पुढारीपण गेलें तर त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांचा वाली कोण ? हिंदी शेतकऱ्यांपुढें "संस्थानिक" हें एक अत्यंत बिकट कोडें आहे. हिंदी प्रतिनिधी ज्या वेळीं संस्थानी प्रतिनिधी (म्हणजे महाराज सरकारचे बंदे गुलाम) यांचे शेजारी बसून हिंदुस्थानचें स्वराज्य चालवणार आहेत. संस्थांनी प्रजेतर्फेही कांहीं सभासद निवडले जावेत अशी खटपट चालू राहील

व कांहीं निवडले जातीलही. याचा अर्थ असा एकतंत्री व लहरी राजपुत्राचे मानस-पुत्र, बहुजन समाजाच्या हिताकरतां निवडून आलेल्या प्रतिनिधीबरोबर स्वराज्य चालवणार! माँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांनी दिलेल्या द्विदल राज्यपद्धतीचे जे बारा वाजले तेंच फेडरेशनचें नशीब दिसत आहे. म. गांधींच्या अनत्याचारानें इंग्रजांकडून राज्य हिसकून घेतां येईल पण संस्थानिकांच्या बाबतीत तोच उपाय लागू पडेलच असें आज विधान करणें म्हणजे संस्थानिक इंग्रजाइतके सभ्य आहेत हें गृहीत धरावें लागेल आणि ब्रिटिश हिंदुस्थानासारखेच संस्थानी हिंदुस्थान आहे अशी कबुली द्यावी लागेल.

धर्माचें राज्य

धर्मानें जगांत पूर्वी काय गोंधळ घातला असेल तो असो, पण सध्यां तरी हिंदुस्थानचें धर्मानें जें नुकसान झालें आहे किंवा होत आहे तितकें दुसऱ्या कशानेंहि झालेलें नाहीं. हिंदुस्थानांत राजकारणाला महत्त्व नाहीं. प्राणाला महत्त्व नाहीं पण धर्माला मात्र खूप भाव आहे. धर्मासाठीं देशाचेंच नव्हे तर मानव जातीचें कर्म फोडणारे मानवी कीटक सध्यां हिंदुस्थानांत चिकार भरले आहेत. आणि तोहि धर्म कसला तर खुळ्या, रानटी समजुतींची आणि रूढींची बेरीज करून जो जमाव होईल तो. याहिपेक्षां सध्याची हिंदुस्थानांतील धर्माची व्याख्या करावयाची म्हटल्यास ती अशी करतां येईल कीं, मुसलमानांनीं हिंदूंचा द्वेष करणें हा मुसलमानांचा धर्म आणि हिंदूंनीं मुसलमानांचा द्वेष करणें हा हिंदूंचा हिंदु धर्म! जगांतील

धर्मकल्पनेचें अत्यंत भ्रष्ट स्वरूप

कोठें पाहावयाचें असेल तर त्यानें हिंदुस्थानांत पाहावें. सर्वच एका ईश्वराचीं लेकरें आहेत म्हणणारा मुसलमान धर्मवेडानें हिंदु गळ्यावर सुरा फिरवायला कमी करीत नाहीं. तर अहिंसा परमोधर्मः मानणारा मारवाडी आपल्या ऋणकोच्या पोराबाळांच्या तोंडांतून घास काढून गाईपुढें बुंदीचे लाडू टाकतांना दिसतो! कोणाला शिवावें कीं शिवूं नये, कोणाच्या हातचें खावें कीं खाऊं नये, शेणगोमूत्र कोणी घ्यावें हा धर्म. शेंडीला गाठ असावी कीं असूं नये हा धर्मच. जन्मल्यापासून मरेपर्यंत असा एकहि क्षण नाहीं कीं त्याकरतां धर्मानें कांहीं अडचण उभी केली नाहीं. हिंदुधर्मात सर्व धर्माचार, सर्व रूढी आणि सर्व जाती यांची रचना केली आहे कीं, अगदीं शेवट एकच जात संबंध हिंदुसमाजावर कांहीं एक न करतां फुकट जगावी. ही जात म्हणजे ब्राह्मण! संबंध हिंदुस्थानांत १ कोटी ४० लक्ष ब्राह्मण आहेत. यापैकीं भिक्षुक आणि सावकारी करणारे जास्त. माडर्न सिव्हिलिझेशनच्या दृष्टीनें ब्राह्मण जास्त मागासलेला आहे. त्याला इंग्रजी शिक्षण द्या. पाश्चात्त्य सुधारणेचा वरवरचा तो सर्व भपका करील आणि आपण जंगली नाहीं असें भासविण्याचा प्रयत्न करील; परंतु जेव्हां ब्राह्मण्याचा प्रश्न उपस्थित होईल तेव्हां मग तो कम्युनिस्ट म्हणविणारा ब्राह्मण असो किंवा अगदीं

जुन्या मताचा शेणमूत्र चघळणारा शास्त्री

असो, दोघांत फरक म्हणजे एक इंग्रजींत बोलेल तर दुसरा संस्कृतमध्ये बोलेल एवढाच— एक जुन्या श्रुति–स्मृति ग्रंथांचे आधार शोधील तर दुसरा कार्ल मार्क्स-लेनीन–स्टॅलीन यांच्याहि पुस्तकांत ब्राह्मणशाहीला आधार आहे असें दाखविण्याचा प्रयत्न करील.

हिंदुस्थानचा उद्धार धर्माची बेडी तुटल्याशिवाय होणार नाहीं. आणि धर्माची बेडी, चातुर्वर्ण्य आणि जाति–उपजाति व त्यांचे पुरस्कर्ते ब्राह्मण–मौलवी-पोप यांची सुधारणा झाल्याशिवाय तुटणार नाहीं. ज्या प्रमाणांत ब्राह्मण समाज जगलीपणा सोडून माणसांत येत जाईल त्या प्रमाणांत हिंदूंची प्रगति होईल. आम्हां हिंदूंपुढें 'ब्राह्मण' हा मोठा "प्रॉब्लेम" आहे. त्यांनीं सामाजिक बाबतींत Exploit फसवणूक करूं नये असा नरम भाषेंत उपदेश केला तरी त्या समाजावर त्याचा परिणाम होत नाहीं. ते देशाच्या प्रगतीला नेहमीं विरोधक असावयाचे असा त्यांचा स्वभाव बनला आहे. हा वर्ग शिक्षणांत–पाश्चात्त्य शिक्षणांत सर्वांत पुढें आहे, परंतु त्याची मनोवृत्ति अशी बनली आहे कीं, वरच्या सर्व सुधारणांखालीं ब्राह्मण्याचा निखारा मात्र कायम असतो आणि तो कोणत्या वेळेला भडकून वरच्या सर्व सुधारणा जाळून टाकील याचा नेम नसतो. देवता समजणाऱ्या

गाईचें मांस इंग्लंडमध्यें खाणारा ब्राह्मण

हिंदुस्थानांत आल्याबरोबर मोठ्या धर्माभिमानाचा आव आणून, सोवळें नेसल्याशिवाय जेवायला बसत नाहीं अशीं कित्येक उदाहरणें दाखवितां येतील.

रशियामध्यें प्रीस्ट आणि चर्च यांच्या विरुद्ध मोठी चळवळ आहे. निरीश्वरवाद्यांचे संघ आहेत. तसल्या चळवळीची आवश्यकता सध्यां हिंदुस्थानला आहे. रशियापूर्वी हिंदुस्थानांत 'सत्यशोधक' नांवाची याच तत्त्वावर पण शांततेच्या मार्गानें जाणारी चळवळ पन्नास वर्षांपूर्वी सुरू झाली. हिंदी सत्यशोधक समाज देवाच्या अस्तित्वावर हल्ला करीत नाहीं आणि त्याचें स्तोमहि माजवीत नाहीं. मद्रासकडेहि Self Respect नांवाची अशीच चळवळ सुरू झाली आहे. रशियन चळवळीप्रमाणें ही अद्याप देवळांचा विध्वंस करण्याच्या कार्याला लागलेली नाहीं पण तिनें यापुढें जास्त जोर धरला पाहिजे. रशियाप्रमाणें तिला उग्र स्वरूप आलें तरी हरकत नाहीं, कारण रशियाला एका खिस्ताशींच झगडावयाचें होतें पण आमच्या

२२ कोटी हिंदूंपुढें ३३ कोटी देव

आहेत. ईश्वर आहे किंवा नाहीं या वादांत पडणें हें मूर्खपणाचें किंवा निरर्थक आहे. अनादिकालापासून हा काथ्याकूट चालूं आहे आणि तो शेवटपर्यंत चालू राहणार. कोणाच्या मतानें देव दयाघन असेल तर कोणाला असेंहि वाटेल कीं, आमच्या हिंदुधर्मांत देवाला अकरा अवतार घेण्याची फुरसत मिळाली पण बिचाऱ्या अस्पृश्यांच्या उद्धाराकरतां हजारों वर्षांत त्याला एकदाहि क्षीरसागरातून वर येण्याची सवड झाली

नाहीं. कोणाच्या मतानें देव हें एक मानलेलें मोठें भूत असेल, कांहीं असो. या सर्व वादांचा मक्ता ज्यांना इहलोकावर कांहीं करावयाचें नसून परभारें अमृताच्या डोहांत उड्या टाकावयाच्या आहेत त्यांच्या करतां राखून ठेवूं. ईश्वर नसला तर जगाचें काय आडणार आहे आणि असला तर घोटाळा मोठें होतो आहे एवढाच विचार करणें जरूर आहे.

ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, बुद्ध धर्म आणि हिंदुधर्म असे चार मोठे धर्म जगावर चालत आहेत. यांपैकीं पहिले तिन्ही धर्म एकेका व्यक्तीच्या पायावर उभारलेले आहेत. ख्रिस्ती धर्मांत अनेक धार्मिक बंडखोर निघाल्यामुळें व आधिभौतिक सुधारणांनीं आध्यात्मिक सुधारणांची जागा पटकावल्यामुळें त्या धर्माचा, त्याच्या अनुयायांशीं फारसा संबंध उरलेला नाहीं. व्यवहारांत धर्माची हकालपट्टी करणारे जगांत खिश्चनच जास्त भरतील. मुसलमानी धर्माची स्थिति याच्या उलट आहे. व्यवहार धर्माच्या आड येत असेल तर व्यवहारालाच गचांडी मारणाऱ्या मुसलमानांची संख्या मुसलमानी धर्मांत जास्त आहे. केमालपाशानें खलिपाचें उच्चाटन करून मुसलमानी धर्म-समजुतींना पहिल्यानें जोराचा धक्का दिला. वास्तविक टर्कीच्या हातांतच जगांतील मुसलमानांच्या सुधारणेच्या किल्ल्या आहेत. केमालनें खलिपास काढून फेज टोपीपर्यंतहि पोकळ अभिमान फेकून दिला; पण त्याला रशियाचें अनुकरण करतां आलें नाहीं. रशिया, घरच्या बरोबर जगाच्या उठाठेवी, आपल्या मतप्रसारासाठीं करीत असतो. हाच कित्ता केमालनें खलिपाला हांकलतांच गिरवला असता आणि एशियाटिक मुसलमानी राष्ट्रांत आणि हिंदुस्थानांतहि

तरुण तुर्कांचा संदेश

आपल्या धर्मबांधवांना पाठविला असता, तर आज हिंदुस्थानांतल्या मुसलमानांत दिसून येणारें फाजील धर्मवेड या स्वरूपांत दिसलें नसतें, व "म. गांधींपेक्षां मला एक पाक टांगेवाला मुसलमान जास्त प्रिय आहे" असे उद्गार सुशिक्षित मुसलमानांकडून– नव्हे मुसलमान पुढाऱ्याकडून कधीं निघाले नसते. हिंदुस्थानात मुसलमान धर्मवेडानें बेहोष होऊन भलतीच गोष्ट म्हणजे धर्म समजून त्या धर्माकरितां प्राण देण्यास तयार होतो. पण धर्माकरितां मनुष्य नसून

माणसाकरितांच धर्म

आहे; ही गोष्ट विसरतो. बुद्ध धर्म हा हिंदु धर्मांतील उच्च-नीचपणाची विषमता नष्ट करण्याकरितां व अहिंसा धर्माची शिकवण देण्याकरितां उत्पन्न झाला. पण आज त्याचें अस्तित्व हिंदुस्थानेतर चीन व जपान देशांतच राहिलें. हिंदुस्थानांत हिंदु धर्मानें बुद्ध धर्माचा पाडाव करून आपली चातुर्वर्ण्याची चौकट बसविली व या चातुर्वर्ण्याच्या गटारगंगेंत जातिभेदाच्या विषमतेच्या नद्या-नाल्याच वाहात आहेत व बहुजन समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन धर्मांतले राजे-धर्मगुरू

धार्मिक रौलट ॲक्टचे

जुलमी कायदे अजूनही चालवूं पाहताहेत. अशा रीतीनें शेतकरी–मजूर किंवा कास्तकार–कामगार यांच्यावर भिक्षुकशाही आपलें धार्मिक साम्राज्य पसरूं पाहात आहे. पण आतां शेतकऱ्यांना, मजुरांना

मानवी धर्माची स्थापना

करावयाची आहे. धर्म ही सुरा आहे. आधी मनुष्याला जगण्याकरितां मानवी धर्म पाहिजे.

समता आणि स्वातंत्र्य

स्वराज्य, स्वातंत्र्य यासाठीं हिंदुस्थानांतल्या पक्षोपपक्षांनीं क्रांति-उत्क्रांति मार्गाच्या प्रगतिपर चळवळीनें जगांतल्या चळवळीच्या बाजारपेठेंत आपला नंबर खालीं न घसरतां हिंदुस्थान हाही एक 'देश' आहे असें भासविण्याचा कितीही जोराचा प्रयत्न केला तरी जगांतल्या अनेकविध चळवळींच्या घडामोडींकडे विचारपूर्वक लक्ष दिलें. सर्व प्रकारच्या सुधारणांचा व प्रगतीचा काळजीपूर्वक विचार केला तर हिंदुस्थान आपल्या प्राथमिक प्रगतीमध्येंच गोंधळत आहे. स्वातंत्र्याचा प्रत्येक प्रयत्न आरंभशूरत्वानें मागें पडून राष्ट्र या नात्यानें हिंदुस्थानचा दर्जा वाढीला लागण्याचें बाजूला पडून अज्ञ जनता स्वार्थी पुढाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडत आहे. सर्वसाधारण हिंदी जनतेच्या व हिंदी राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठींच प्रामुख्यानें प्रयत्न झाला पाहिजे.

शेटजी–भटजी–लाटजींचा नंगा नाच

किंवा भांडवलशाही—भिक्षुकशाही–नोकरशाही यांचें सैतानी साम्राज्य आज जर कोठें पूर्णावस्थेला पोहोंचलें असेल,-यांच्या जुलमी सत्तेच्या झब्बुशाहीची मिरासदारी अविच्छिन्नपणें बेदरकारपणें कोठें गाजली जात असेल तर ती हिंदुस्थानांत! साऱ्या जनतेच्या रक्त शोषण्याचें पवित्र (!) कार्य करण्याकरितां कोण्या सृष्टीच्या ब्रह्मदेवानें भटजी–शेटजी–लाटजी ह्या प्राण्यांना जन्माला आणलें! म्हणून या सृष्टिकर्त्या परमेश्वराला जनतेनें प्रेमानें कवटाळावें कीं वीत, दीडवीत पोटाची खळगी भरण्याकरितां वाटेल त्या काबाडकष्टाच्या वणव्यांत होरपळून निघणाऱ्यानें या भटजी-शेटजी--लाटजींच्या परमेश्वरावर निषेधाची लाथ कां उगारूं नये! असा प्रश्न सहजगत्या डोळ्यांसमोर दत्त म्हणून उभा राहिल्यास नवल नाहीं!

इतिहासाचें कठोर सत्य

आजपर्यंत जगांत झालेलीं युद्धें हीं जनतेच्या किंवा देशाच्या कल्याणाकरितां झालेलीं नसून भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाकरितां, भांडवलशाहीच्या मत्तेकरितां व साम्राज्यशाहीच्य त्तेकरितांच झालेलीं आहेत. याचे पुरावे इतिहासाच्या कठोर सत्याला कंठरवानें सांगितल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कोणत्याही युद्धाचें मूळ भिक्षुकशाहीची धार्मिक सत्ता, भांडवलशाहीची भांडवली लत्ता आणि साम्राज्यशाहीची राजकीय सत्ता याशिवाय वैश्यांत नाही. समरांगणांत उभ्या राहणाऱ्या शिपायांचे किंवा लढाईच्या ठिकाणीं न

जाणाऱ्या बहुसंख्याक जनतेचें युद्धापासून कवडीचेंहि हित नसून त्यांच्या जीवनाचें मातेरें व माल्मतेचें खोबरें मात्र झालेलें दिसत आहे. युद्धांत जय होवो वा अपजय होवो त्यामुळें फायदा झालाच तर तो देशांतील पुढारलेल्या वर्गाचा म्हणजे ह्या शाह्यांचा. त्यांत बहुजन समाजाचें हित किंवा फायदा हा नसावयाचाच ! हें इतिहासाचें कठोर व नागवें सत्य इतिहासज्ञांच्या ब्रह्मदेवाच्या बापालाही आतां लपवितो म्हटलें तरी अशक्य !

समरभूमीवरील रक्तांच्या नद्या

हिंदुस्थानांत किंवा हिंदुस्थानेतर देशांत आजपर्यंत समरभूमीवर ज्या रक्ताच्या नद्या वाहिल्या त्या म्हणजे पोपशाहीच्या, मुल्लाशाहीच्या किंवा भिक्षुकशाहीच्या कृष्ण-कारस्थानाचा मूर्तिमंत इतिहास. भांडवलशाहीचें, शेटसावकारांचें कपट नाटक–साम्राज्य-शाहीचे–नोकरशाहीचे उलट्या काळजाचे दाखले ! जनतेच्या कल्याणाचा आव आणावा पण तिच्याच गळ्यावर सुरी चालविण्याचें नीच कर्म करावें त्यांनींच !

आज हिंदुस्थान म्हणजे सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक

गुलामगिरीचा मूर्तिमंत नाक

बनलेला आहे. आपल्या श्रमाच्या मेहनतीनें साऱ्या देशाला जिवंत ठेवून शेतीच्या मातींतून सोनें निर्माण करणारा शेतकरी—आज अन्नाला मोताद होऊन अंगांत असलें नसलेलें रक्त शोषण होऊन त्याचा देह हा नुसता हाडांचा सांपाळा बनला आहे.

शेतकरी भाकरीला मोताद

सारा हिंदुस्थान शेतकीप्रधान, हिंदुस्थानचा मुख्य धंदा शेती. शेतीच्या भरवंशावर देशाचें जीवन. पण गेल्या हजारों वर्षांची भिक्षुकशाहीची धार्मिक कर्तृत्वाची पुण्याई, दीडशें वर्षे इंग्रजांच्या राज्यकर्तृत्वाची पुण्याई आणि कुबेराच्या संपत्तीला लाजविण्याची अहमहमिका उराशी बाळगणाऱ्या कोट्याधीशांच्या—शेटसावकारांच्या, दानशूरत्वाच्या, कर्तृत्वाची दिगंत पुण्याई काय ? तर उभा शेतकरी व मजूर अन्नाला मोताद होऊन सारा देश कंगाल स्थितींत येऊन पडला म्हणून

" शेतकरी—स्वराज्य "

स्थापन झालें पाहिजे. स्वराज्य आणि शेतकरी किंवा शेतकरी स्वराज्य ही आतां एकच गोष्ट, एकच कल्पना डोळ्यांसमोर उभी राहते आणि हें शेतकऱ्यांचें स्वराज्य पांढरपेशा वर्गानें चालविलेलें नव्हे—शहरी शहाण्यांच्या तंत्रानें चालणारें नव्हे—भांडवल्या दीड-शहाण्यांच्या हुकमतीनें चालणारें नव्हे—तर तें शेतकऱ्यांच्या खास प्रतिनिधींनीं शेतकऱ्यांसाठीं चालविलेलें शेतकऱ्यांचें स्वराज्य आज शेतकऱ्यांना व मजुरांना–बहुजन समाजाला हवें आहे. त्यांत भांडवलवाली लुडबूड नको.

हिंदवी स्वराज्याच्या चळवळीचा जमाखर्च

आजपर्यंत हिंदवी स्वराज्याच्या संस्थापनेकरितां झालेल्या चळवळीचा जमाखर्च म्हणजे

बांडगुळ्या भांडवलशाहीच्या हस्तकांच्या धडपडीच्या इतिहासाचीं पारायणें ! पण आज असलेल्या पक्षोपपक्षांनीं हिंदवी स्वराज्याकरितां काय काय केलें व शेतकऱ्यांच्या मजुरांच्या स्वार्थत्यागाच्या आगीवर आपल्या भांडवली स्वार्थाचे पापड भाजले कीं नाहीं व त्यापासून बहुजनसमाजाच्या आर्थिक विषमतेला बांध घालून समता व स्वातंत्र्य स्थापन करण्याचा कितपत प्रयत्न झाला, हें पाहणें जरूर आहे.

स्वातंत्र्य आणि राजकीय पक्ष

काँग्रेस, प्रतिसहकार पक्ष, प्रागतिक, मुसलमान, ब्राह्मणेतर, हिंदुमहासभा, शेतकरी संघ, कास्तकारी संघ, सरकार व धर्म या व इतर चळवळी ह्यांच्या गेल्या ५०–६० वर्षांत उंच भराऱ्या शहरांत पांढरपेशांनी माजविल्या व गाजविल्या. पण यांतली कोणती चळवळ शेतकऱ्यांच्या भावी स्वराज्याच्या नव-चैतन्याचा सर्चलाईट दाखविण्याच्या कामीं उपयोगी आली ?

समतेचे वैरी तेच देशाचे दुष्मन

या कसोटीवर त्या घासून पाहिल्यास श्रीमंतीच्या उबीवर जगणाऱ्या भांडवलशाही गब्बूची झब्बूशाही पुढारपणाच्या शिलेदारीचे सरदार म्हणून आघाडीला चमकतात, पण यांतल्या लत्ताबाज भटांचा धर्म आणि लत्ताबाज सावकारांचें कर्म फार तर राजकीय स्वातंत्र्याच्या पोकळ थापा मारण्याच्या पलीकडे गेलें नाहीं. ' **भुकेलेल्यास भाकरी** ' कशी मिळेल ह्या प्रश्नाचा कोणी कितीसा विचार केला आहे ?

* " १८५७ सालीं अखिल भरतखंडानें राजकारणी स्वातंत्र्यासाठीं निर्वाणीच्या तंगड्या झाडल्या; पण आज राजकारणाचा प्रश्न मागें पडून, भाकरीच्या सुक्या ओल्या तुकड्यासाठीं अपंडीत अनाड्यांना हातपायांना आचके देण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे. ब्रिटिश राजवटीनें आपल्या मेंदूची आणि जिभेची वाढ भरमसाट केली, पण

पोटाच्या पापाकडे पाठ

फिरवली. जगाचा एकूण व्यवहार पोटासाठीं. क्रांतीची भस्मासुरी भूक आणि शांतीची तृष्णा प्रथम पोटालाच लागते. इतिहासाचीं पृष्ठें मानवी रक्ताच्या लालभडक रंगानें रंगविणारीं महायुद्धें आजपर्यंत या पोटानेंच घडवून आणलीं. राजकीय वर्चस्वाची भावना, जित आणि जेते, कारखानदार आणि कामगार किंवा मालक आणि नोकर हे भेद पोटाच्या पोटींच जन्मलेले आहेत. सावाचा चोर, सज्जनाचा दुर्जन, मित्राचा शत्रु, राजनिष्ठाचा राज्यक्रांतिकार बनविण्याच्या कामीं पोटाच्या तिडकांची वकिली किंवा याचनाच कारण होते. मानी मनुष्याच्या मानाची मान कापण्याचा कुपराक्रम, आणि स्वदेशाच्या उदारपणासाठीं परदेशाच्या स्वातंत्र्यावर कारस्थानाचे जळजळीत निखारे ओतण्याची राक्षसी वृत्ति पोटानेंच आजवर चेतविली. एक पोट नसतें, तर या जगाला

* प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्या " शेतकऱ्याचें स्वराज्य " पुस्तकातील उतारा.

मसणवटीचे रूप आलें असतें. मसणवटींत भुतें वावरतात आणि तींही म्हणे पोटासाठींच! तेव्हां मसणवटीची उपमाही शोभणार नाहीं. पोट नसतें तर जगच जगलें नसतें. किंवहुना तें अस्तित्वांत आलें नसतें. सगळीं बंडें पत्करलीं पण

पोटाचें बंड पत्करत नाहीं

राजकारणी क्रांत्यांचीं बंडें आपल्याला मोठीं भयकर वाटतात. क्रांतिचक्राचा थैमान सुरू झाला कीं त्यांत पडणाऱ्या माणसांच्या आहुती पाहून किंवा ऐकून आपलें मन चर्र होतें; परंतु त्या बंडांना किंवा माणसांच्या कत्तलींना कारण आपलें पोटच आहे; अर्थात् तें किती भयंकर असलें पाहिजे, याचा मात्र सहसा कोणी विचार करीत नाहीं. याचें कारण पोटाचा आपलेपणा किंवा आप्पलपोटेपणा. इंग्लंडच्या ब्रेड बटरसाठीं तांदळाच्या पेजेला मुकलेल्या हिंदी शेतकऱ्यांची दैन्यावस्था पाहून आमचे ब्रिटिश सरकारसुद्धां जाड जाड रिपोर्टभर अश्रूंचा धबधबा गाळतें. पण दैन्याला कारण आपल्या इंग्लंडचेंच पोट. ही नेमकी गोष्ट त्या धबधब्यांत बिनचूक वाहून जाते व बेपत्ता होते. शेतकरी मेला कीं देश भिकेला लागला, ही गोल्डस्मिथची निर्वाणीची किंकाळी इंग्लंडनें धिक्कारल्यामुळेंच त्याला व्यापाराच्या सबबीखालीं स्वतःच्या पोटासाठीं ब्रिटिश साम्राज्य-वृद्धीचा आराखेडा करण्याची पाळी आली. हा अनुभव दृष्टीसमोर असतांहि

स्वतःला पेज आणि इंग्लण्डला भात

चारणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचा ऱ्हास साम्राज्य-सत्ता-बाजीच्या मदात त्यांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहात स्वस्थ बसावें हा मोठा क्रांतिकारक देखावा नव्हे काय? शेतकऱ्यांची शेतकी मेल्यामुळें तो कर्जबाजारी होऊन देशोधडीला पोटासाठीं हवी ती मजुरी करून जगण्याची धडपड करीत आहे. याचा परिणाम शहरी लोकांवर होऊन; त्यांचीही उपासमार सुरू झाली आहे. म्हणजे पोटाच्या बण्डाचा धिंगाणा आतां सर्व हिंदुस्थानभर संचार करूं लागला आहे. श्रमजीवि शेतकरी आणि बुद्धिउपजीवि शहरी या दोघांच्याही दुःखांना तीव्र एकजिनसीपणा आल्यावर क्रांतीच्या स्फोटाचा भावी परिणाम यथातथ्य वर्णन करण्याची कामगिरी भविष्यकाळालाच चांगली साधेल.

पोटाचें बंड आज साऱ्या जगावर धुमाकूळ घालीत आहे. रशियांतली राज्यक्रांति पोटानेंच केली आणि झारला सहकुटुंब सहपरिवार कुऱ्हाडीच्या मोतीनें ठार मारला तोही या पोटानेंच. जर्मनीसारखें बलाढ्य राष्ट्र पण या टीचभर पोटाच्या आगीनें त्याच्या सर्व शस्त्रास्त्र संपत्तीची राखरांगोळी करून त्याला गायीपेक्षांहि दीन केलें पोटाच्या बंडानेंच.

इंग्लंडांत मजूरपक्ष निर्माण झाला

आणि* चालू घटकेला (१९३० सालीं) ब्रिटिश साम्राज्याचीं सूत्रें याच पोटार्थी पार्थिवांच्या हातीं दुसऱ्यांदा आलीं आहेत. सर्व जगांत पोटानें मारलेलें जर कोणसें राष्ट्र असेल तर तें हिंदुस्थानच होय. जगाच्या पोटाच्या बंडाची आग विझविण्यासाठीं

* १९३० सालीं इंग्लंडांत मजूर मंत्रिमंडळ होतें.

हिंदुस्थाननें आजपर्यंत आपली चामडी सोलवून घेतली. पण आज त्याच्या चमडीके झोपडीमें आग लागली असून

"बुझानेवाला कौन है ?"

या त्याच्या किंकाळीला जगाकडून सक्रिय उत्तर मिळेनासें झालें आहे. पोटाचें भयंकर बंड येथें आज कित्येक वर्षें अहोरात्र बिनअटकाव व बिनउपाय चालू आहे. प. वा. दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त प्रभृति अर्थशास्त्रपटूंनीं वाढत्या हिंदवी दारिद्र्याची आरोळी ५० वर्षांपूर्वीच मारली. राजकीय बंडाच्या उपक्रमाचा नुसता खरा **खोटा** वास येतांच त्याच्या पाळ्यामुळ्या उखडतांना जे 'व्यापारी' इंग्रज सरकार सुक्या ओल्याचीही लवमात्र क्षिती बाळगीत नाहींत, त्याला एतद्देशीय पोटाच्या बंडाची मात्र दखल करण्याची बुद्धि होत नाहीं. इंग्रज पोटानेंच इंग्रजी साम्राज्याचा जगड्व्याळ वेलविस्तार वाढविला आणि अखेर आज त्याच इंग्लंडचें तेंच पोट मजूर पक्षाच्या रूपानें प्रबळ बंडखोर बनून त्याच साम्राज्याचे कर्णधार व सूत्रधार होऊन बसलें आहे.

पोट काय करणार नाहीं ?

—नव्हे, करवणार नाहीं ! पोटानेंच हिंदी नागरिकांना आणि शेतकरी–मजुरांना फिजी-केन्याचें काळे पाणी दाखविलें आणि पोटाच्या बंडामुळें तेथें उपरे आलेले गोरे लोक बंडखोर आणि मस्तवाल बनले. पोटाच्या पोटीं पुण्याच्या काय काय खाणी आहेत, याचा ठावठिकाण जरी अद्याप कोणास लागलेला नाहीं, तरी पोटाचीं पापें आज साऱ्या जगभर दिवसाढवळ्या मोकाट वावरत आहेत यांत मुळींच संशय नाहीं.

पोटाचा गुलाम

मनुष्यप्राणी परमेश्वरानें निर्माण केला व त्याबरोबर त्याला पोट दिलें. त्यामुळें तो पोटाचा गुलाम बनला. पण निसर्गानेंच ही पोटाची गुलामगिरी मानवाच्या पाठीवर लादली. म्हणून ह्या पोटाच्या गुलामगिरीचें जूं कोण्या मानवाच्या बापालाही फेंकून देतो म्हटलें तर शक्य नाहीं !

गुलामगिरीचा कारखाना !

पोटाच्या गुलामगिरींतून समाजांतल्या स्वार्थसाधू बगळ्यांनीं आपल्या स्वार्थासाठीं इतरांवर आपली गुलामगिरी लादली. गुलामगिरीच्या व्यापारावर नफेबाजीच्या सट्ट्यांत 'मोठेपणाची मिरासदारी' उत्पन्न झाली व या मिरासदारीच्या सरसेनापतींनीं आपल्या सैन्यांत गुलामांची फौज नेहमीं तयार राहावी म्हणून गुलामगिरीचा कारखाना उघडला व तो गुलामगिरीचा कारखाना म्हणजे 'सत्तेचा गुलाम', 'धर्माचा गुलाम', 'पैशाचा गुलाम' !!!

ही सत्तेची, धर्माची व पैशाची गुलामगिरी निर्माण करणाऱ्या गुलामांनीं जनतेच्या अज्ञानाच्या पायावर आपल्या पोटाच्या पापाचीं मंदिरें उभारलीं आहेत !

या मंदिरांतला परमेश्वर–म्हणजे पैसा ! व हाच तो त्यांचा देव ! या द्वैती–देवाचे पुजारी–शेटजी–भटजी–लाटजी !!!

३०१६
दा. क. 27-5-36
शाखा (स्थळ प्रत)

आर्थिक विषमतेचा वणवा[1]

शेतकरी–मजूर, कास्तकार–कामगार हे आर्थिक विषमतेच्या वणव्यात होरपळून निघाले आहेत. ही आर्थिक विषमता साऱ्या अनर्थाचें मूळ आहे. भांडवलशाही निरनिराळ्या रूपानें शेतकऱ्यांचें आर्थिक शोषण करीत आहे. ही आर्थिक विषमताच आधीं नष्ट केली पाहिजे ही गोष्ट गोरी नोकरशाही जाऊन काळी नोकरशाही आल्यानें होणार नाहीं. ही विचारसरणी देशांतल्या तरुणांत उत्पन्न झाली आहे.

आर्थिक समता हेंच खरें स्वातंत्र्य

धर्म, जाती, पंथ यांना उकिरड्यावर सोडून आर्थिक समतेच्या पायावर शेतकऱ्यांचें व मजुरांचें स्वराज्य स्थापन करून नांगर चिन्ह असलेले[2] राष्ट्रीय 'निशाण' उभारून "क्रांतीचें रणशिंग" फुंकणार ?

* समाप्त *

---

१. हिंदुस्थानांत लुटारूंचें साम्राज्य

ना. व्हाईसरॉय दरमहा पगार	ब्रिटिश मुख्य प्रधान दरमहा पगार
२१००० रु.	५४०० रु.
दररोजचें उत्पन्न ७०० रु.	दररोजचें उत्पन्न १८० रु.
हिंदी जनतेचें दररोजचें	इंग्लिश प्रजाजनांचे दररोजचे
सरासरी उत्पन्न २ आणे	उत्पन्न २ रु.

हिंदुस्थानांतील दर माणसी पडणाऱ्या दररोजच्या उत्पन्नाच्या ५००० पट व्हॉईसरायांना पगार मिळतो. ब्रिटिश मुख्यमंत्र्याला मात्र इंग्लंडांतील प्रजाजनांच्या दररोजच्या उत्पन्नाच्या नव्वदपट पगार मिळतो. ज्या राज्यपद्धतीमुळें असले बडे पगार दिले जातात ती पद्धतच ताबडतोब नष्ट केली पाहिजे.

२ मार्च १९३०

व्हाइसरायला खलिता — **महात्मा गांधी**


२. " जवळकरांच्या शेतकरी योजनेंतील उतारा पाहा.

लेखक : कै. दिनकरराव जवळकर, बाबूराव भोंसले

आवृत्ति १ ली, १९३३. किंमत १२ आणे.

प्रकाशक : श्री. बाबूराव भोंसले यांनी कालिका प्रिंटिंग प्रेस, नागपूर मध्यें छापून सर्कल नं. ६ नागपूर येथे प्रसिद्ध केलें.

(पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत.)


REFBK-0024257

महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान

संशोधन विभाग प्रकाशने



कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय

संपादक : सीताराम रायकर

किंमत पन्नास रुपये

दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय

संपादक : डॉ. य. दि. फडके.

आम्ही पाहिलेले म. फुले

(म. फुल्यांच्या समकालिनांच्या आठवणी)

किंमत आठ रुपये

तृतीय रत्न (नाटक)

लेखक : महात्मा फुले

किंमत तीन रुपये

विटाळ विध्वंसन

लेखक : गोपाळबाबा वलंगकर

संपादक : रोझलिंड ओ'मॅनहलन

किंमत तीन रुपये

आगामी प्रकाशन

'जागृती'कार भगवंतराव पाळेकर समग्र वाङ्मय

(एकमेव विक्रेते : श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे – ३०.)